प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराज विरचित

समश्लोकी श्री गुरुचरित्र निरूपण

ब्रह्मर्षि प.पू. श्री. दत्तमहाराज कवीश्वर

बार्शी, दि. ०९.०८.१९८५ - १५.०८.१९८५

विद्यावाचस्पती

ब्रह्मर्षि प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर

यांचे

प. प. श्रीवासुदेवानन्दसरस्वती स्वामिमहाराज विरचित

समश्लोकी श्री गुरुचरित्रावरील निरुपण

भगवंत मंदिर, बार्शी

०९-८-१९८५ ते १५-८-१९८५

प्रकाशक :
श्री. श. ज. जोशी
प्रधान विश्वस्त
श्री वासुदेव निवास,
४२/१७, कर्वे पथ, पुणे – ४११ ००४.
दूरध्वनी : ०२० – २५४५ ५५८४

संकलक :
डॉ. दिलीप प्र. देशमुख
डॉ. सौ. सुरेखा दिलीप देशमुख
अंकुर हॉस्पिटल,
बलभीम चौक, बीड–४३१ १२२
दूरध्वनी : ९८२२४ ५९५२०, ९८८१२२०८२०

© सर्व हक संकलकाधीन.

मुद्रक :
रमा एन्टरप्राईझेस
६, तात्या घारपुरे पथ,
खाडिलकर रोड, गिरगांव, मुंबई ४०० ००४.
भ्रमणध्वनी : ९३२३२९१०३४

स्वागत मूल्य :
३००/– रुपये

प्रस्तावना

भक्तोद्धारा तव शरणं । भक्तरक्षका तव शरणं ॥
भक्तानुग्रहगुरुभक्तप्रिय । पतितोद्धारा तव शरणं ॥

प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराजांनी लोकमंगल, लोकवर्धक, लोककल्याणकारी वाङ्मय प्रत्यक्ष प्रभूंच्या आदेशानुसार निर्माण केले. ते संपूर्ण वाङ्मय प.पू. योगिराज गुळवणी महाराज व प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज यांनी १२ खंडामध्ये प्रसिद्ध करून उपलब्ध केले. या १२ खंडापैकी श्रीगुरुसंहिता (खंड १०-११) हा एक प्रासादिक, दिव्य अनुभूती देणारा ग्रंथ, म्हणजेच समश्लोकी गुरुचरित्र होय.

ब्रह्मावर्त मुक्कामी श्रीदत्तप्रभूंच्या आज्ञेनेच समश्लोकी गुरुचरित्र हा ग्रंथ तयार झाला. वाल्मीकिमहर्षींना श्रीरामचरित्र लिहिण्याची ब्रह्मदेवांची आज्ञा नारदमहर्षींनी त्यांच्या आश्रमात येऊन कळविली. पण येथे प्रत्यक्ष चरित्रनायकानेच स्वत:चे चरित्र लिहिण्याची आज्ञा प.प.श्रीस्वामी महाराजांना केली आणि तीही मराठीतील चरित्र प्रसिद्ध असताना हे विशेष आहे. 'माझा अधिकार नसताहि पिता ज्याप्रमाणे आपल्या लहान मुलाकडून हळुहळू शब्द बोलवून घेतो आणि ते ऐकून आनंद दर्शवितो, त्याप्रमाणे माझ्याकडून निर्मल यश वदवून घेतले आणि अद्यापिहि तसेच यश वारंवार वदवून घेत आहे.' असे प.प.श्रीस्वामी महाराजांनी त्रिशती काव्याचे आरंभी म्हटले आहे. येथे प. प. श्रीस्वामी महाराजांनी सर्व कर्तृत्व त्या प्रभूचेच आहे हे लिहून स्वत:चे निरहंकारित्व सिद्ध केले आहे.

समश्लोकी गुरुचरित्र हे महाराष्ट्र भाषेतील गुरुचरित्राचाच संस्कृतांत अनुवाद आहे. महाराष्ट्रभाषा सर्व प्रांतातील लोकांना समजणार नाही म्हणून हे संस्कृत गुरुचरित्र केले आहे, असे या ग्रंथाचे उपोद्घातांत प. प. श्रीस्वामी महाराजांनीच सांगितले आहे. यातून मराठी श्रीगुरुचरित्राचे संस्कृत रूपांतर करतांना प.प.श्रीस्वामी महाराजांची मर्मदृष्टी दिसून येते.

प. प. श्रीस्वामी महाराजांचे सलग तीन चातुर्मास गंगातीरी ब्रह्मावर्त मुक्कामी झाले. त्याठिकाणीच शके १८२४ मध्ये या ग्रंथाची रचना झाली. याबद्दलचा खुलासा करतांना प.प.श्रीस्वामी महाराज म्हणतात, 'ब्रह्मावर्तास असतांना गावांत प्लेग आल्यामुळे सर्व लोक बाहेर गेले होते. कांही वृद्ध राहिले होते. त्यावेळी तेथे मूळ गुरुचरित्राचे समश्लोकी करण्याचे प्रभूंकडून सांगणे झाले. मूळ गुरुचरित्राची ५१ अध्यायाची पोथी होती. त्यावेळी तूर्त पाठ वगैरे नसल्यामुळे रोज २००/२५० श्लोक लिहून होत. तसेच ६७५० हजार श्लोक संख्या

दाखविली गेली. नंतर त्या गुरुचरित्राची जास्त संख्या पाहून कांही अध्यायांपैकी काही ओव्या, अर्थानुसंधानास अडचण न येणाऱ्या, कमी करून 'समश्लोकी' केल्यावर ही संख्या भरते असे करावे अशी त्यावेळी प्रभूंची आज्ञा झाली.'

मूळ गुरुचरित्र ५१ अध्यायात आहे. प.प.श्रीस्वामी महाराजांनी समश्लोकी गुरुचरित्र ५१ अध्यायात पूर्ण केले म्हणजे जवळ जवळ प्रत्येक श्लोकावर एक ओवी त्यांनी लिहिली. मूळ मराठी गुरुचरित्राप्रमाणे या ग्रंथाचेही ५१ अध्याय झाले आहेत. संस्कृत आणि संस्कृती यांच्यातील आंतरिक प्राणसंबंध अशा सिद्धपुरुषप्रणीत लेखनातून पुन्हा एकवार प्रगट झाले. संस्कृत माहिती नसणाऱ्या अशा मराठी वाचकांना संस्कृत संवर्धनाच्या दृष्टीनेहि हा ग्रंथ अत्यंत उपकारक असा झाला आहे. प. प. श्रीस्वामी महाराजांच्या सिद्धहस्त शैलीतून प्रासादिक श्लोक सहज, सोपे तसेच रसाळ झाले आहेत. म्हणूनच श्रद्धेने नित्य याचे वाचन करीत गेल्यास श्री गुरुचरित्राचेही अनुसंधान घडून संस्कृताचेही ज्ञान वाढणार आहे.

प्रत्येक अध्यायांत प.प. श्रीस्वामी महाराजांनी त्या अध्यायातील विषयसार ग्रथित करणारा 'सारश्लोक' दिला आहे. असे एकावन्न सारश्लोक एकत्र केले की प.प.श्रीस्वामी महाराज प्रणीत 'अवतरणिका' तयार होते. अध्यायांतर्गत श्लोकावर संस्कृत गद्यात्मक 'चूर्णिका' ही तंजावर येथे शके १८२९ मध्ये प.प.श्रीस्वामी महाराजांनी पूर्ण केली. त्यानंतर 'श्रीमद्भागवत' सप्ताह पद्धतीप्रमाणे सकाळी मूळ संहितावाचन करून सायंकाळी चूर्णिकेच्या आधारे अर्थविवरण करणे ही पद्धत सुरु झाली.

प. प. श्रीस्वामी महाराजांनी केलेल्या प्रश्नावलीत सूचित उपासनेचे महत्त्व दिलेले आहे. त्यामध्येही क्रमांक २ मधील फलिताच्या स्पष्टीकरणात समश्लोकी गुरुचरित्राचे दोन सप्ताह करावेत असे म्हटले आहे. ते येणे प्रमाणे,

वाचिता सप्तके दोन 'समश्लोकी गुरूकथा' ।
अलभ्य तेहि ये हाती चिंता का करशी वृथा ॥

समश्लोकी गुरुचरित्राची सलग २ पारायणे केल्यामुळे जे मिळवावयाचे कठीण आहे ते प्राप्त होते, काळजी करू नये. इतके आश्वासन समश्लोकी गुरुचरित्राच्या पारायणाचे दिले आहे. येथेच या ग्रंथाचे महत्व दिसून येते.

श्रीगुरुसंहिता (समश्लोकी गुरुचरित्र) या खंडाच्या प्रस्तावनेत प. पू. योगिराज श्रीगुळवणी महाराजांनी लिहिल्याप्रमाणे, समश्लोकी गुरुचरित्राच्या अर्थविवरणाचा संकल्प प. पू. ब्रह्मश्री

दत्तमहाराज कवीश्वर महाराजांनी १९८५ साली भगवंत मंदिर, बार्शी येथे समश्लोकी गुरुचरित्राचा सप्ताह निरुपण करून संपन्न केला होता. सकाळी श्रीगुरुचरित्राचे वाचन पिताश्री श्री दादाशास्त्री जोशी यांनी केले होते. त्यावेळी त्या निरुपणाचे रेकॉर्डिंग करून ते श्री. डॉ. मनोहर कुबडे यांच्याकडे मी सुपूर्त केले होते. ही सद्गुरुसेवा घडली, हे मी माझे मोठे भाग्यच समजतो. मध्यंतरी बराच काळ गेला. आता डॉ. दिलीप देशमुख (बीड) यांनी ते ग्रंथस्वरूपात आणून त्यास मूर्त स्वरूप दिले आहे. याचा मोठा फायदा वाचक, भक्त व साधकांना होणार आहे. श्रीमहाराजांच्या इतर उपलब्ध असलेल्या वाङ्मयामधे आता या अतिशय दुर्मिळ ग्रंथाची भर पडेल हे निश्चित ! कारण प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांच्या रसाळ व प्रासादिक वाणीतून झालेले हे निरूपण जसे आहे तसे ग्रंथरुपात साकार झाले आहे. यासाठी डॉ. दिलीप देशमुखांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. त्यांना प.प. श्रीस्वामिमहाराजांचे व प. पू. श्रीगुरुमहाराजांचे आशीर्वाद. तसेच हे कार्य पूर्णत्वास नेण्यास लाभलेल्या श्री. श्रीकृष्ण मु. बोडस व इतर सहकारी यांना ब्रह्मश्री दत्तमहाराजांचे आशीर्वाद.

परमार्थमार्गावर आरूढ होणाऱ्या सर्व साधकांनी व भक्तांनी या ग्रंथाचा अभ्यास करावा व अशा सर्वांना दत्तस्वरूप प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराजांची अखंड कृपा लाभावी, ही विनम्र प्रार्थना !

पौष शु. १५, शाकंभरीदेवी पौर्णिमा
दिनांक : ०६ जानेवारी, २०२३.

श. ज. जोशी

श. ज. जोशी
प्रधान विश्वस्त
श्रीवासुदेव निवास, पुणे

वाचकांशी हितगुज...

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्यो नमः ॥

प.पू. दत्तमहाराजांच्या कृपावर्षावाने आम्ही सर्व कुटुंबीय भावपूर्ण चिंब झालेलो आहोत. तशी चार पिढ्यांपासून सद्गुरुकृपेची सावली आमच्या घराण्यावर आहे.

माझे मातुल आजोबा तीर्थस्वरुप शंकरराव आजेगावकर! हे प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांचे अगदी अंतरंग शिष्य व प.पू. योगिराज गुळवणी महाराजांचे गुरुबंधू!

आमच्या मातोश्री, प.पू. शंकरराव आजेगावकर यांच्या सर्वात कनिष्ठ कन्या. गुरुबंधूच्या कन्या, या नात्याने प.पू. योगिराज गुळवणी महाराजांच्या कन्या, प.पू. गुळवणी महाराज मातोश्रींचे दीक्षागुरू, त्याच परंपरेतील प.पू. दत्तमहाराज आम्हा उभयतांचे मार्गदर्शक. दीक्षागुरु, सद्गुरु! आमचे चिरंजीव डॉ. नारायण यांस प.पू. दत्तमहाराजांच्याकडून दीक्षाप्रसाद मिळाला. आमचं पूर्ण घर व सर्व आप्तस्वकीय या सगळ्यांचे जीवन या संतकृपेने धन्य झाले आहे.

पूर्व पुण्याई एवढी थोर की, प.पू. दत्तमहाराजांचा आम्हा सर्वांना खूप सहवास लाभला. त्यांचे बीडला वारंवार येणे व्हायचे. अनेक निमित्तही असायची. कधी कधी तर जाता-येता, मार्गावर असल्यामुळे बीडला येऊन विश्रांतीसाठी त्यांचे रहाणेही व्हायचे. आम्हा सर्वांच्या दृष्टीने तो आनंदोत्सवच असायचा. या निमित्ताने आप्तस्वकीय एकत्र येत असत. सर्वांशी व इतर साधक मंडळींशी सुसंवाद व प्रवचन रुपाने प.पू. महाराजांच्या दिव्य वाणीची अनुभूती आम्हा सर्वांना यायची. या सहज सुंदर प्रवचनांच्या श्रवणभक्तीतून आमच्या जीवनात परमानंद प्रगट होत असे. सुदैवाने ती सर्व प्रवचने व बीड येथे झालेल्या त्यांच्या श्रीमद् भागवत सप्ताह विवेचनाचा कांही भाग ध्वनिमुद्रित करून घेतला गेला होता. अर्थात ती बुद्धी त्यांनीच दिली होती. पुढे अनेक वर्षानंतर ती ऐकून लिहून काढली गेली व इतर साधक मंडळी पर्यंत पोचविण्यात आली. प.पू. महाराजांशी आमचा नित्य पत्रव्यवहार होत असे. त्यांची आलेली

मार्गदर्शक पत्रे एकत्रीत करुन, त्याचे पुस्तक 'सप्रेम सादर निवेदन' या नांवाने प्रकाशितही केले गेले. ही सर्व प.पू. महाराजांचीच कृपा!

गंगेचे पाणी जसे उगमापासून मुखापर्यंत तेवढेच गोड व पवित्र असते, त्याच प्रमाणे इतर ठिकाणीही प.पू. महाराजांची रसाळ व उद्‌बोधक प्रवचने होत असत. म्हणून इतर साधकांकडून कधी कधी प्रत्यक्ष भेटीत, तर कधी दूरध्वनीवरुन संपर्क साधून आम्ही या संदर्भातील ध्वनिफिती मिळविल्या. त्या सर्व ऐकताना खूप समाधान वाटले. खर्डा, सोलापूर व बार्शी येथूनही यांस आम्हाला प्रतिसाद मिळाला आणि आमचे अहोभाग्य म्हणजे, बार्शी येथील प्रवचनांच्या ध्वनिफितीतून अवघा परमार्थाचा खजिनाच आम्हाला मिळाला.

त्याचे असे झाले, श्री क्षेत्र बार्शी येथील श्री भगवंत मंदिरात ऑगस्ट १९८५ (अधिक श्रावण मास) मध्ये समश्लोकी गुरुचरित्रावर (गुरुसंहितेवर) प.पू. दत्तमहाराजांचे निरुपण संपन्न झाले होते. त्याचे संपूर्ण ध्वनिमुद्रण श्रीवासुदेव निवासचे सध्याचे प्रधान विश्वस्त प.पू. शरदभाऊंनी केले होते. ते त्यांनी डॉ. मनोहर कुबडे यांचेकडे सुपूर्त केले होते. या सर्व १८ ध्वनिफिती आम्हाला श्रीमती कुबडे यांचे कडून प.पू. शरदभाऊंनी उपलब्ध करून दिल्या. हे आम्ही आमचे भाग्य समजतो. कुबडे परिवाराचे या मधील सहकार्य अत्यंत मोलाचे आहे.

प.पू. दत्तमहाराजांचे असंख्य भागवत सप्ताह झाले आहेत. अनेक विविध विषयांवर प्रवचने झाली आहेत. पण बार्शी येथे त्यांनी समश्लोकी गुरुचरित्रावर जे निरुपण केले होते, त्या उद्‌बोधक ध्वनिफिती उलगडत असताना अक्षरश: भान हरवून गेले. त्यातील प्रत्येक कथे मागील पारमार्थिक अंतरंग अतिशय रसाळ भाषेत त्यांनी उलगडविले आहेत. आधीच श्रीगुरुचरित्र हा ग्रंथ दत्तसंप्रदायातील अत्यंत पवित्र ग्रंथ! अशा ग्रंथाचे निरुपण प.पू. महाराजांच्या वाणीतून ऐकतांना मंत्रमुग्ध व्हायला होत होते.

आजच्या काळात ही सगळी प्रवचने एकाग्रपणे ऐकणे, त्यासाठी योग्य तो वेळ देणे, तसेच या ध्वनिफितींची व लागणाऱ्या इतर सामग्रीची मर्यादा लक्षात घेता, त्यासाठी दीर्घकाळ टिकणारे साधन म्हणजे ग्रंथ ! ग्रंथ स्वरुपात जर याचे मुद्रण झाले तर आनंददायी नक्कीच ठरेल, असे वाटू लागले. म्हणून या सर्व ध्वनिफिती जशाच्या तशा ऐकून लिहून काढण्यात आल्या. श्री. श्रीकृष्ण मुकुंद बोडस, सातारा यांनी अत्यंत चिकाटीने, परिश्रमपूर्वक या ध्वनिफितीचे श्रवण, लेखन व टंकलेखन केले. यातून निश्चितच त्यांच्यावर असलेली प.पू. महाराजांची कृपा दिसून येते. हे कार्य सिध्दीस नेण्याची प.पू. दत्तमहाराजांचीच इच्छा असावी.

या ध्वनिफिती इ.स. १९८५ च्या आहेत. त्यामुळे पूर्णपणे नीट शब्द ऐकू येत नाहीत. कांही ठिकाणी कथाभाग अपूर्ण वाटतो. कारण कॅसेट संपल्या नंतर नवीन ठेवण्यासाठी वेळ जातो; त्या काळात कथानक बरेच पुढे जात असते. त्यामुळे त्या वेळी प.पू. महाराज काय बोलले यांची कोठेही नोंद नाही. त्यामुळे ही थोडी विसंगती वाटू शकते. त्या काळातील रेकॉर्डिंगची पद्धत जुनी व तितकी अद्ययावत नव्हती. त्यामुळे प.पू. महाराजांचे शब्द ऐकू येत नाहीत. त्यामुळे या ग्रंथात मुळ गुरुचरित्रातील कांही भाग रेकॉर्ड न झाल्यामुळे यात समाविष्ट नसल्याचे वाचकांना जाणवेल. पण हा दोष त्या परिस्थितीतील रेकॉर्डिंगच्या पद्धतीमुळे उद्भवलेला आहे.

या ग्रंथतील भाषा प.पू. महाराजांची बोलीभाषा आहे. उदाहणार्थ – आणि, आणखी, म्हणाले वगैरे अशा प्रकारचे प्रवचनात आलेले शब्द हे त्यांच्या नित्य बोलण्याप्रमाणे लिहिलेले आहेत. त्यामुळे त्यात व्याकरणाच्या खोलात शिरण्याची आवश्यकता नाही. कांही वाये अधूरी सोडली आहेत. ती पण प.पू. महाराजांचीच शैली! तसेच कांही ठिकाणी श्लोकातील चरण अर्ध स्वरुपात आहेत. अशा श्लोकांच्या चरणांचे संदर्भ जसे जसे सापडत गेले, तसा तसा आम्हाला आनंद वाटू लागला. संपूर्ण श्लोक तिरप्या अक्षरात व त्यापैकी प.पू. महाराजांनी जितका श्लोक उच्चारला तितकाच श्लोक ठळक अक्षरात लिहिलेला आहे व त्यापुढे त्या श्लोकाचा संदर्भ लिहिलेला आहे.

ही प्रवचने ध्वनिफितीतून ऐकून लिहिल्यामुळे कांही श्लोक, कांही शब्द ऐकून लिहिता आले नाहीत. हे सारे अस्पष्ट ऐकू आल्याने कदाचित विपरित अर्थ निर्माण होण्याची अजूनही शक्यता आहे. अर्थात महाराजांच्या विचारांची उंची आपल्यासारख्या सामान्यांना ती कळणे कठीण आहे. त्यामुळे जितके जास्तीत जास्त ऐकू आले, समजले, ते जास्तीत जास्त शुद्ध लिहिण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही केलेला आहे.

आईच्या पदराला पकडून चिमुकल्याने तिच्या मागे–मागे चालावे, तसे त्या माउलीवर समर्पण भावनेने हे लिहिण्याचे काम आम्ही हाती घेतले. अनेक अडचणी पार करत पुढे पुढे जात असतांना, महाराजांच्या प्रवचनांत त्यांनी कधी दोन शब्दात, तर कधी एका ओळीच्या चरणात दिलेले संदर्भ, आमच्या समोर अवघड प्रश्नचिन्ह करून उभे राहिले होते. एक–दोन नव्हे तर २२७ असे संदर्भ होते, की त्यांचा आम्हाला परिचय नव्हता किंवा त्यांचा उल्लेख कुठे सापडतच नव्हता. पण शेवटी त्या माउलीवरच सारं सोडून दिलं. कुणी आवर्जून असेही सल्ले दिले की, ते वगळून पुढचं लिखाण करावं. मनाला हे पटेना. वाचकांच्या हाती हा अमूल्य ठेवा देताना त्यांना संदर्भच मिळाला नाही तर.....! मग माझे प्रयत्न सुरु झाले. असे प्रयत्न चालत असताना,

कुणीतरी यावं, कुणीतरी भेटावं आणि ते संदर्भ कुठे मिळतील, कुठल्या ग्रंथात असतील, हे सहजपणे त्यांच्या मुखातुन महाराज सांगून जात असतं. होता होता सरते शेवटी दहा संदर्भ सापडायचे राहिले. बरीच शोधाशोध केली. पण ते शब्द श्लोकांच्या मध्ये कुठे तरी असणारे होते, हे नंतर लक्षात यायचे. श्लोकांची सुरवात ज्या अक्षरावरुन झाली होती ते श्लोक पटकन मिळत होते. पण एखादा शब्द मधे कुठे तरी असावा आणि असा संदर्भ प.पू. महाराजांच्या प्रवचनांत यावा. असे संदर्भ श्लोक सापडायचे कसे? मनाला चैन पडेना. काय करावे. मार्ग खुंटला होता. धीर मात्र सोडला नव्हता. शेवटी महाराजांचीच प्रार्थना केली. मग हळूहळू त्याचे असे होऊ लागले की महाराज, कुटुंबियांपैकी कुणाला दृष्टांत द्यायचे, तो ग्रंथ, त्यातील पान संख्या दाखवायचे, सांगायचे अशा तऱ्हेने मला पडलेले कोडे हळूहळू सुटू लागले. इतके करुन सुद्धा कांही श्लोक शुद्ध मिळू शकले नाहित. त्यांचा संदर्भ सापडला नाही.

परवाचीच गोष्ट घ्या. कांही श्लोक पाहिजे होते. मला कांही विद्वान व्यक्तिंच्या रहाण्याचे पत्ते मिळले होते. त्यांच्याशी संपर्क करून मी त्यांना भेटावयास जात होतो. त्मांना मी माझी अडचण सांगत होतो. तर अशा प्रसंगी एकदा, श्रीमद् भागवतातील श्लोक एकानी मला काढून दिला. तसेच माझ्याकडील आणखी कांही श्लोक त्यांनी पाहिले. खरे तर मला कांही श्लोक असेच कोणीतरी आधी दिले होते आणि मी त्यात समाधान पावलो ही होतो. परंतु नंतर यांनी मला तो सुधारीत श्लोक काढून दिल्यावर, तो पूर्वीच्या श्लोकाबरोबर पडताळून पाहिला असता, तो तीन ओळींचाच श्लोक मला मिळालेला होता आणि तोही जो मिळाला होता तो अशुद्ध होता. पहा ना! म्हणजे सद्गुरूंनाही तो तिथं अशुद्ध नको होता आणि म्हणूनच मला त्यांच्याकडे जायची बुद्धी झाली असावी, असे मी समजतो. असाच आणखी एक किस्सा आठवतो. महाराजांच्याबरोबर शिक्षण घेतलेले त्यांचे एक स्नेही! तेही भागवत सप्ताह करीत असत. एकदा त्यांची महाराजांशी भेट झाली, त्यावेळी सहजच महाराजांना ते म्हणाले होते, 'मी भागवत प्रवचने करतो पण मला अजूनही काही शंका आहेत.' त्यावर महाराज त्यांना म्हणाले होते, 'अहो तुम्हालाच काय मलाही शंका बऱ्याच आहेत.' 'मग त्यावर उपाय काय? कशा निस्ताराव्यात?' असा त्यावेळी महाराजांना त्यांनी प्रश्न विचारला असता, महाराज एवढेच म्हणाले होते, 'आपला प्रयत्न सोडू नये. सतत वाचन करावे, शोध घेत राहावे. उत्तरे सापडत जातील.' हा प्रसंग आठवला आणि हे एका अर्थी खरेच आहे. प्रयत्न सोडला नाही तर महाराज तुम्हाला उत्तरे देत असतात. हा माझा अनुभव. याची प्रचीति मला येत होती. यावरून असेही वाटते, महाराजांचीही इच्छा हीच असावी.... **'मी आहे की तुम्हाला मदत करायला! पण तुम्ही दोन पावलं पुढे चला मी दहा पावलं तुम्हाला पुढे घेऊन जाईन.'**

सद्गुरु नेहमीच निर्मळ असून, सर्वथैव मंगल करणारे असतात. मेघांचा नाश करुन वायू जसा पृथ्वीवर जल सिंचन करतो व तिला तृप्त करतो, तसे सद्गुरु आपल्या शिष्यावर अज्ञानाचा नाश करण्यासाठी कृपेचा वर्षाव करत असतात. ते मूळ चैतन्याशी कालातीत असे पूर्ण स्वयंचलित आहेत, यात आता शंकाच उरली नाही. सद्गुरु म्हणजे शिष्याच्या चित्तरुप मंदिरात ज्ञानाचा दिवा प्रज्वलित करणारे आहेत हे मात्र निश्चित.

महाराजांची माया किती म्हणून सांगावी. पहा बरं! 'गुणातीतैही' या श्लोकाचे एक चरण होते. शोक आणि मोह हे दु:खाचे कारण आहे असे आचार्यांनी म्हटले आहे. हे जाणून मी शंकराचार्यांच्या आश्रमात गेलो. तेथील एक विद्वान गृहस्थ! त्यांनी मला हा पूर्ण श्लोक लिहून दिला. मी सुखावलो. तसे आता एक एक श्लोक मिळत चालले होते. परंतु या श्लोकाबद्दल महाराज परत परत मला काहीतरी सुचवत होते. अर्थात अंत:स्फूर्तीतून. पण माझ्यासारख्या संस्कृतचा 'ग' माहीत नसलेल्याला कसे समजावे. शंकराचार्यांच्या आश्रमातील विद्वान पंडितानी तो श्लोक पाहिला व सुधारीत श्लोक लिहून दिला. तसेच आणखी एक. दुसरा श्लोक 'बुद्धे परम आग्रह:।' असे लिहून मिळाले होते व बरोबर असल्याची ग्वाही पण दिली होती. पण कुठेतरी मनात पाल चुकचुकत होती. मी पुण्यात आलो होतो. आप्पा बळवंत चौकातील आनंदाश्रमात गेलो. तेथे मला एक पंडित भेटले. याआधीही मला त्यांनी मार्गदर्शन केले होते. म्हणून त्यांना फोन करून मी त्यांची भेट निश्चित करुन घेतली होती. त्यांना मी ते दोन्ही श्लोक दाखवले. ते पूर्णपणे चुकीचे असल्याचे सउदाहरणांनी ग्रंथातून काढून दाखविले. गंमत म्हणजे दुसरा श्लोक तर अर्थाने पूर्ण चुकला होता. 'बुद्धे परम आग्रह:।' असा नसून तो 'बुद्धे फलम् अनाग्रह:।' असा होता. असो.

कांही शब्द निट न ऐकू आल्यामुळे कांही श्लोक, कांही शब्द ऐकून लिहिता आले नाहित. हे सारे अस्पष्ट ऐकू आल्याने कदाचित विपरित अर्थ निर्माण होण्याची अजूनही शयता आहे. अर्थात महाराजांच्या विचारांची उंची आपल्या सारख्या सामान्यांना तो कळणे कठीण आहे. त्यामुळे जितके जास्तीत जास्त ऐकू आले, समजले, ते जास्तीत जास्त शुद्ध लिहिण्याचा प्रयत्न आम्ही केलेला आहे.

खरं सांगायचं तर प.पू. महाराजांच्या विचारांची, त्यांच्या अभ्यास वृत्तींची उंची किती म्हणून असावी, हे जाणून घ्यावे म्हटले तर मती सुन्न होते. केवळ त्यांनी उदाहरणार्थ सांगितेलेल्या श्लोकांचा, पदांचा संदर्भ पडताळून पहावा म्हटला तरी पन्नास एक ग्रंथ सहज सापडले गेलेत. श्रीमद् भागवत व श्रीमद्भगवत् गीता त्यांना मुखोद्गत होतेच. कांही ठिकाणी

एक सारखे श्लोक– श्रीमद् भागवत, श्रीगुरुचरित्र, त्रिशतीकाव्य, श्रीमद्भगवत् गीता, उपनिषदे वगैरे यांच्यामध्ये आहेत. पण आम्ही संदर्भासाठी जास्तीत जास्त श्रीगुरुसंहिता, द्विसाहस्री, त्रिशती यांचाच आधार घेतलेला आहे.

रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा हे तर त्यांचे नेहमीचेच ग्रंथ. पतंजली योग सुत्र, श्रीगुरुचरित्र, मांडूक्योपनिषदासारखी उपनिषदे, मनुस्मृती, दक्षस्मृती सारखे धर्मशास्त्रे, कौटिल्यासारखे अर्थशास्त्रे, चित्तबोध नक्षत्रमाला, वेदांत शास्त्र, शंकरभाष्य, ब्रह्मांड पुराणासारखी पुराणे, प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराज विरचित त्यांचे सर्वच वाङ्मय, वेणीसंहार मालविकाग्निमित्र, शाकुंतल सारखी संस्कृत नाटके! संगीत दर्पण सारखे ग्रंथ हे असे बरेच कांही. आपल्या प्रवचनात संदर्भ देताना या आणि अशा ग्रंथातील संदर्भ अगदी सहजपणे ते मांडत असत. कांही वेळा तर प.पू. महाराजांनी श्लोकांची संधी करून सांगताना आणखी नवे श्लोक स्वत:च्या शैलीत निर्माण करून त्यांचा ही समावेश ते करत असत. अशी प.पू. महाराजांच्या विचारांची, ज्ञानाची, बौद्धिक उंची आम्ही गाठू शकत नसल्याने येणाऱ्या अपूर्णत्वास व त्यांचे विचार पूर्णत्वाने आपल्यापर्यंत पोहोचवण्याकरिता आम्ही कमी पडत आहोत. त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करीत आहोत.

असे असताना आम्ही, वाचक, अभ्यासूकांना निवेदन करीत आहोत की, ज्यांना या ध्वनिफिती ऐकाव्याशा वाटत असल्यास त्यांनी आवर्जून भेटावे. तसे कोणी असलेल्या चुकांचा खुलासा करुन विस्तृत स्वरुपात कोणी ते देत असल्यास त्याचा नक्कीच विचार करुन दुसऱ्या आवृत्तीच्या वेळी त्या सामावून घेऊन ग्रंथ प्रकाशित करण्यात येईल.

श्रीक्षेत्र नरसिंहवाडीहून श्री दत्तप्रभूंचे आशीर्वाद या कार्यास लाभले आहेत.

श्रृंगेरी पीठाचे जगद्गुरु यांचेही शुभाशिर्वाद या प्रकाशनास लाभले आहेत.

जालना येथील श्री दत्ताश्रमाच्या प.पू. ताईमहाराजांचे मंगल आशीर्वाद या कार्यास लाभले.

हा ग्रंथ तयार होण्याच्या कार्यात वेदमूर्ती श्री धुंडीराजशास्त्री पाटांगणकर (बीड), वेदमूर्ती श्री. अमोल रा. जोशी (बीड), डॉ. सुनिताताई जोशी (पुणे), श्री. श्रीपाद क. देशमुख (आडगावकर) यांचे अभूतपूर्व सहकार्य लाभलेले आहेत.

वे.शा.सं.पं. न्यायपंडित श्री श्रीकृष्णशास्त्री काशीनाथशास्त्री जोशी व वे.शा.सं.पं. न्यायपंडित श्री चंद्रशेखरशास्त्री श्रीकृष्णशास्त्री जोशी, श्री शंकराचार्य मळा, गुरुवार पेठ, सातारा यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले.

श्री गोविंदशास्त्री जोशी, माजलगाव, विद्यावाचस्पती डॉ. अजित कुलकर्णी, श्री डॉ. बाबासाहेब तराणेकर यांच्या शुभेच्छा याला मिळाल्या आहेत. डॉ. संजय द. देशमुख, औरंगाबाद, पुण्याचे श्री. उन्मेष जोशी (आनंदाश्रम) यांचे सहकार्य लाभलेले आहे.

श्री. श. ज. जोशी, प्रधान विश्वस्त श्रीवासुदेव निवासचे (पुणे) यांचे आशिर्वाद व अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले आहे.

मुद्रणाचा विचार करताना हा ग्रंथ अल्प वेळेत मुद्रण करुन देण्यास श्री. मोरेश्वर पराडकर, मुंबई यांचे सहकार्य लाभले आहे.

या सर्वांचे मन:पूर्वक ऋण व्यक्त करीत आहोत. काहींचे सहकार्य लाभले असताना अनवधानाने उल्लेख करण्याचा राहिला असल्यास त्यांचेही आम्ही ऋणी आहोत.

हे पुण्यकार्य होताना सद्गुरुंच्या मांदियाळीचे कृपाकटाक्ष होतेच.

प.पू. महाराजांची ही प्रवचने वाचताना त्यांची वाणी प्रत्यक्षपणे आपल्या मनाच्या गाभाऱ्यात घुमते असा भास निर्माण होत होता. म्हणजेच वाचताना श्रवणभक्तीचाही लाभ होतो. प्रत्यक्ष दत्तप्रभूंचीच ही लीला आहे. ही प्रचीति तुम्हालाही यावी ही दत्तप्रभूंच्या चरणी प्रार्थना!

– सद्गुरू चरणरजकांक्षी
डॉ. दिलीप प्र. देशमुख
डॉ. सौ. सुरेखा दि. देशमुख
अंकुर हॉस्पिटल, बीड

अनुक्रमणिका

१. **पहिला दिवस – ९-८-१९८५ ..... पान नं. १७**

* ईश्वराला प्रिय कोण ? * श्री सद्गुरु प.प. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजकृत गुरुचरित्रावरील ग्रंथाविषय * द्रौपदीचे अन्नदान * श्रेष्ठ पुरुषांचा उद्धार * भगवान दत्तात्रेयांच्या अवताराचे प्रयोजन * मुळ गुरुचरित्र ग्रंथाविषयी * नामधारकाची तळमळ * सिद्धांची भेट व गुरुचरित्राचे महत्त्व कथन * परिक्षित राजाचे, तुकाराम महाराजांचे उदाहरण * गुरुचरित्राचे फळ * सद्गुरुंचा कोप झाल्यास ईश्वर प्राप्ति नाही. * सद्गुरुकृपा कशी झाली हे सांगण्याची नामधारकाची विनंती * सिद्धाकडून ब्रह्मवैवर्त पुराणातील कथेचे स्पष्टीकरण.

२. **दुसरा दिवस – १०-८-१९८५ ..... पान नं. ६३**

* ईश्वराच्या अनंत लीलाविषयी * पृथुराजाचे उदाहरण * श्रवणभक्ति * यज्ञाच्या दोन पद्धती * सद्गुरुंचे चरित्रही अनंत * श्री दत्तात्रेयांचा श्रीपाद अवतार * त्यांचे गोकर्ण क्षेत्रात वास्तव्य * रावणाची कथा * तत्व काय, अतत्व काय * गृहस्थाची कर्तव्ये * पांडवांचे उदाहरण * रावणाला आत्मलिंग प्रदान * बुद्धावतार कां झाला * भगवान विष्णूंची योजना * मित्रसह राजाची कथा * गोकर्ण माहात्म्य कथन * श्रीपाद श्रीवल्लभाचा दुसरा अवतार * श्रीपाद श्रीवल्लभांचे सामर्थ्य * ज्ञानेश्वर महाराजांची भिंत चालविण्याचे उदाहरण * कुरवपुरच्या परीटाची कथा * श्रीपाद स्वामी अदृश्य * चोरांनी मारलेल्या ब्राह्मण भक्तास जीवदान * श्रीनृसिंह सरस्वती चरित्राला आरंभ * गजेन्द्राच्या उद्धाराचे उदाहरण * नृसिंह सरस्वतींचा जन्म * त्यांचे उपनयन * संन्यास घेण्याची इच्छा * आईकडून गृहस्थाश्रमाचे वर्णन * नृसिंह सरस्वतींचा संन्यासाश्रम * पोटशुळ असलेल्या ब्राह्मणाची कथा * सायंदेवाला अभय * इतर शिष्यांना तीर्थयात्रेची आज्ञा * परळी क्षेत्रात निवास * गुरुद्रोह घडलेल्या ब्राह्मणास उपदेश.

३. **तिसरा दिवस – ११-८-१९८५ ..... पान नं. ११२**

* भुवनेश्वरी देवीची उपासना करणाऱ्या ब्राह्मण मुलाची कथा * शंकराचार्यांच्या काळातील घटनेचा संदर्भ * नारायण नांवाचे महत्व * सद्गुरु महिमा अगाध * कृष्णातीरावरच्या अरण्यात नृसिंह सरस्वतींचे वास्तव्य * भिक्षेसाठी न येण्याने लोकांची चिकित्सा * दिगंबरा या मंत्राचा अर्थ * शिरोळ येथील भोजन पात्राची कथा * अमरापूर येथील ब्राह्मणाची कथा * कोणत्या गोष्टी प्रगट करु नयेत * गंगानुजाची कथा–दुर्योधनाच्या जलस्तंभनाचा संदर्भ * गंगानुजाला त्रिस्थळीची यात्रा घडवली * औदुंबर माहात्म्य * चौसष्ठ योगिनींद्वारे स्वामींची पूजा * अन्नपूर्णा व मनोहर पादूका ठेवून स्वामींचे गाणगापूरला प्रयाण * वाडीक्षेत्र इतके प्रसिद्ध कसे झाले ? * शिरोळ गावच्या ब्राह्मण स्त्रीची कथा * श्रीनृसिंह सरस्वतींचे गाणगापुरात आगमन व संगमावर निवास

४. **चौथा दिवस – १२-८-१९८५ ..... पान नं. १५५**

* वांझ म्हशीला दूध येण्याचा चमत्कार * या वार्तेने राजाचे आगमन * चित्रकेतू राजाच्या कथेचा संदर्भ * राजाने महाराजांना गाणगापुरात आणले * राजासोबत महाराजांचे फिरणे * त्रिविक्रम भारतींची कथा * त्रिविक्रम भारतींचा उद्धार * महाभारतातील संदर्भ * वेदवाद करणाऱ्या ब्राह्मणांची कथा * भस्ममाहात्म्य

५. **पाचवा दिवस – १३-८-१९८५ ..... पान नं. २०१**

* भगवंताचे अवतार कोणत्या कार्या करता होता * उद्धव व गोपींचा संदर्भ * सावित्रीची कथा * सावित्रीला उपदेश – पतिव्रता धर्म समजावून सांगणे–पतिव्रतेचे सामर्थ्य कसे असते * अगस्ति व लोपामुद्रा यांचे उदाहरण * दत्तमाहात्म्यातील विष्णु दत्तांची कथा * सावित्रीची सती जाण्याची तयारी * सावित्रीच्या पतीला जिवंत केले * रुद्राक्ष महिमा कथन * राजा व प्रधानपुत्रांची कथा * तीर्थजलाचे माहात्म्य * सावित्रीद्वारा मंत्रोपदेश देण्याची विनंती * संजीवनी मंत्राची कथा * सात्विक अन्न तयार करण्याची स्त्रियांवर जबाबदारी * सावित्रीला सोमवार व्रत कथन * सीमंतिनीचे आख्यान

६. **सहावा दिवस – १४-८-१९८५ ..... पान नं. २४९**

* कर्मयोगाचे विवेचन * गाणगापूरच्या परान्न न घेणाऱ्या ब्राह्मणाची कथा * ब्राह्मणधर्माचे कथन * अन्नपूर्णा देवीद्वारे काशीमधील ब्राह्मणाच्या घरी स्वयंपाक केल्याचा संदर्भ * भास्कर ब्राह्मणाची कथा * त्यांना निर्गुण पादूकांची पूजा करण्यास सांगितले * प्राकाम्य सिद्धि * सोमनाथ ब्राह्मणाची कथा * अश्वत्थ पूजन महिमा * नरहरी ब्राह्मणाची कथा * उदयानाचार्यांचा संदर्भ * शबराची कथा

७. **सातवा दिवस – १५-८-१९८५ ..... पान नं. २९९**

* सायंदेवाबद्दल सांगण्याची नामधारकांची विनंती * सायंदेवाबद्दल सिद्धांचे सांगणे * गुरुभक्ति म्हणजे काय ? त्वष्टाचे उदाहरण * सायंदेवाला अनंतव्रत करण्याची आज्ञा * सुमंतु ऋषींचे उदाहरण * तंतुकाची कथा * नंदी ब्राह्मणाची कथा * नरकेसरी कवीची कथा * दिवाळीसाठी सात भक्तांच्या घरी जाणे * शेतकऱ्याला धान्य कापायला सांगणे * तंतुकाला त्रिस्थलीचे दर्शन * अष्टतीर्थाचे माहात्म्य * रत्नाबाईचा पापक्षय * कुरवपुरातील परिटाची कथा * चार शिष्यांसोबत श्रीशैल्यास जाण्याकरिता महाराज निघाले * गाणगापूरच्या लोकांची स्थिती * मठामध्ये लोकांना दर्शन * महाराज पाताळगंगेमध्ये अदृश्य * प्रसाद म्हणून चौघांना चार फुले पाठविली * नामधारकाची समाधी * सिद्धाद्वारे अवतरणिका रुपाने गुरुचरित्राचे कथन * नंतर गुरुचरित्राचे नामधारकाद्वारे लेखन.

खालील प्रार्थना प. पू. श्री दत्तमहाराज प्रवचनाच्या सुरुवातीस नेहमी करत असत.

ॐ नमस्तस्मै गणेशाय ब्रह्मविद्याप्रदायिने ।
यस्यावस्त्यायतेनामविघ्नसागरशोषणे ॥

यस्यस्मरणमात्रेण जन्मसंसारबंधनात् ।
विमुच्यते नमस्तस्मै विष्णवे प्रभविष्णवे ॥

विशुद्धज्ञानदेहाय त्रिवेदीदिव्यचक्षुषे ।
श्रेयःप्राप्तिनिमित्ताय नमः सोमाऽर्धधारिणे ॥

यो देवः सवितास्माकम् धियोधर्मादिगोचरः ।
प्रेरयेत्तस्य त्वद्भर्गस्तद्वरेण्यम् उपास्महे ॥

सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके ।
शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तुते ॥

नमो आदिरूपा ॐकार स्वरूपा ।
विश्वाचिया रूपा पाण्डुरंगा ॥

तुझिया सत्तेने तुझे गुण गाऊ ।
तेणे सुखी राहू सर्व काळ ॥

तूची श्रोता वक्ता ज्ञानासी अंजन ।
सर्व होणे जाणे तुझे हाती ॥

तुका म्हणे जेथे नाही मी-तू-पण ।
स्तवावे ते कवणे कवणालागी ॥

यत् कीर्तनं यत्स्मरणं यदीक्षणं यद् वन्दनं यद् श्रवणं यदर्हणम् ॥
लोकस्य सद्यो विधुनोति कल्मषम् तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः॥
विवेकिनो यच्चरणोपसादनात् संगं व्युदस्योभयतोऽन्तरात्मनः ॥

विन्दन्ति हि ब्रह्मगतिं गतक्लमाः ।
तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः॥

तपस्विनो दानपरा यशस्विनो ।
मनस्विनो मन्त्रविदस्सुमङ्गलाः ॥

क्षेमं न विन्दन्ति विना यदर्पणम् ।
तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः।
माला पात्रे च डमरू शूले शंख सुदर्शने ।
दधानं भक्तवरदं दत्तात्रेयं नमाम्यहम् ॥

योन्तःप्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्ताम् ।
संजीवयत्यखिलशक्तिधरः स्वधाम्ना ।
अन्यांश्चहस्तचरणश्रवणत्वगादीन् ।
प्राणान् नमो भगवते पुरुषाय तुभ्यम् ॥

मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरीम् ।
यत् कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ॥

आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदाम् ।
लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ॥

यत्र यत्र रघुनाथकीर्तनं । तत्र तत्र कृत मस्तकांजलिम् ।
बाष्पवारिपरिपूर्णलोचनं । मारुतिं नमत राक्षसान्तकम् ॥

पुस्तकजपवटहस्ते वरदाभयचिन्ह चारुबाहुलते ।
कर्पूरामलदेहे वागीश्वरी चोदयाशु मम वाचम् ॥

श्रीगणेशाय नमः
श्रीगुरुचरणारविन्दाभ्याम् नमः।



॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे समश्लोकी गुरुसंहितेवरील प्रवचन
भगवंत मंदिर – बार्शी, जि. सोलापूर

पहिला दिवस
अधिक श्रावण कृ. ८, शके १९०७, दि. ९ ऑगस्ट १९८५
दुपारी ४.३० ते संध्याकाळी ७

जो भगवान्, राजा अंबरीषाकरिता स्वत: अवतीर्ण झाला, त्या परम पवित्र श्री क्षेत्र द्वादशीत (बार्शीत) अशा अंबरीष वरद श्रीभगवान्, यांच्यासमोर देवांच्या आज्ञेने ही सेवा होत आहे. (ही सेवा प्रति अधिकमासात होत आली आहे.) आज **''समश्लोकी गुरुचरित्र ग्रंथावरील''** चिंतनास प्रारंभ होत आहे. ज्याप्रमाणे अधिक मासातील श्रीमद् भागवत सप्ताहातील कथेप्रमाणे सकाळी मूळ संहिता वाचन व दुपारी निरुपण अशी आजवर सेवा झाली आहे त्याप्रमाणे **''प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती विरचित समश्लोकी गुरुचरित्रावर''** कांही चिंतन व्हावे ही ईश्वरी इच्छा आहे. त्या दृष्टीने आजपासून या **'समश्लोकी गुरुचरित्र'** ज्ञानयज्ञाला आरंभ होत आहे. **भारतामधील सर्व प्रांतातील लोकांना श्रीगुरुचरित्र समजावे याकरिता समश्लोकी ग्रंथाची निर्मिती झाली.** ग्रंथ निर्मिती हे ईश्वरी कार्य आहे. परमात्मा आपले कार्य अर्थात ईश्वरी कार्य पूर्ण करण्याकरिता संतांकडून कार्य करवून घेत असतो. त्यामध्ये प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराज होत.

अंत:करणामध्ये उत्पन्न होणारे रागद्वेषादिक विकार, याच्यावरती नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न शेवटपर्यंत करणारे लोक आहेत. विकार अंतःकरणामध्ये उत्पन्न होऊ द्यायचे नाहीत.

शक्नोतीहैव य: सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात् ।

कामक्रोधोद्भवं वेगं स युक्त: स सुखी नर: **...भ.गी. ५:२३**

भगवान, सांगताहेत. 'कामक्रोधादिक विकारांचा जो आवेग आहे, तो आवरा.' अनावर ही विकार होऊ नये. विकार उत्पन्नच होऊ नये ही अगदी शेवटची भूमिका आहे. कधी राग यायचा नाही, कधी लोभ नाही, कधी काम नाही– कांही नाही, मत्सर नाही. कांही नाही. ही शेवटची भूमिका आहे. स्थितप्रज्ञाची जी भूमिका आहे ती ही आहे.. पण संसारामध्ये असेपर्यंत निदान हा अभ्यास केला पाहीजे, की आवेग जो आहे, विकार जे अनावर होतात– ते आवरण्याचा प्रयत्न जो करणार.... करतो आहे, तोच सुखी आहे– तोच योगी आहे, तोच मनुष्य आहे म्हणतात. माणसाचं हे लक्षण आहे. इकडं लक्ष देणारे अशा प्रकारचे जे सज्जन महात्मेही जगामध्ये आहेत. अनेक जन्मामध्ये इकडं लक्ष देणारे– 'आपली बुद्धी आणखी वाईट मार्गाकडं तर जात नाही ना !' आपल्या मनाकडे, आपल्या बुद्धीकडं नेहमी लक्ष देणारे महात्मे असे हे पुष्कळ जगामधे आहेत. ईश्वराची उपासना त्याकरता करताहेत – धर्माचरण त्याकरता करताहेत. आपली बुद्धी शुद्ध व्हावी...

'ममोपात्तदुरितक्षयद्वारा श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं '– याशिवाय दुसरा संकल्प मनामधे नाही. जे भोगायचं असेल ते भोगून केव्हातरी जायचं आहे – त्या करिता प्रतिकार नाहीये, पण जे कांही दुरितं असेल, तो दुरितक्षय करावा ईश्वरानी, आणि त्याची प्रीति व्हावी–– त्याचा प्रसाद व्हावा हीच फक्त इच्छा आहे. या इच्छेने धर्माचरण चाललेले आहे – उपासना चाललेली आहे. असे महात्मे जे आहेत, ते ईश्वराला अत्यंत प्रिय आहेत.

तदर्थं संभवत्यज: ... (द्विसाहस्त्री १.६)

महाराज म्हणताहेत. गुरुचरित्रावरती आणखी सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी **एक समश्लोकी गुरुचरित्र** म्हणून एक केलेलं आहे –– एका ओवीला एक संस्कृत श्लोक असं गुरुचरित्र आहे. संस्कृत भाषेमध्ये केलेलं आहे मुद्दाम. त्याचं कारणही त्यांनी आरंभाला सांगितलेलं आहे की, मराठी भाषेमध्ये **''श्रीगुरुचरित्र''** हा ग्रंथ झालेला आहे. हा ग्रंथ महाराष्ट्रापुरताच आहे. ही भाषा महाराष्ट्रापुरतीच आहे. इतर देशामध्ये – इतर प्रांतामध्ये राहणारे जे लोक आहेत, त्यांना ही मराठी भाषा समजत नाहीये. मग भगवान दत्तात्रेयांचं चरित्र त्यांना कसं समजेल ?

महाराष्ट्रीयभाषा तु न सर्वविषयोचिता ।

अत: सुगमया देववाण्येदं तन्यते मया ॥ गुरुसंहिता (समश्लोकी) अथोपोद्घात

सर्वांनांही हे चरित्र समजलं पाहिजे. सर्व प्रांतामधे संस्कृत जाणणारी मंडळी आहेत. आज कांही या संस्कृत भाषेची उपेक्षा होती आहे. परदेशातून लोक येतात, संस्कृत भाषेचा अभ्यास करतात – समजून घेतात, जातात– पण आमची भाषा इथं असताना त्याकरता काही त्याकड कुणाचं कांही लक्ष नाही. अशा प्रकारची दूरवस्था निर्माण झालेली आहे. पण 'सर्व प्रांतातल्या लोकांना हे सद्गुरुंच चरित्र समजलं पाहिजे म्हणून मी आणखी संस्कृत भाषेमध्ये करतो' म्हणून त्यांनी **समश्लोकी गुरूचरित्र** किंवा त्याला **'गुरुसंहिता'** असं ही म्हणतात. ते एक केलेले आहे. त्यानंतर त्याच्यावरती विशेष विचार म्हणून **'द्विसाहस्त्री गुरुचरित्र'** गुरुचरित्राचच नांव आहे त्याचं, दोन हजार श्लोकांचच गुरुचरित्र आहे. तेवीस अध्याय फक्त आहेत. ज्ञानकांड, कर्मकांड आणि भक्तिकांड अशा प्रकारचे विभाग त्याच्यामधे केलेले आहेत, आणि **त्याच्यावरती केलेली टीका, अगदी पहिला ग्रंथ त्यांचा हा आहे,** 'द्विसाहस्त्री– गुरुचरित्र' म्हणून. **अगोदर मूळ केल, संस्कृत श्लोक केले त्यांनी,** आणखी मग हरिद्वार का कुठेतरी असताना त्यांना ईश्वराची आणखी आज्ञा झालेली आहे. तुम्ही याच्यावरती टीका लिहा .. पुस्तक जवळ नाही, तरी सुद्धा आणखी ते लिहीलेलं आठवण करुन त्याच्यावरती सगळी व्यवस्थित टीका लिहीलेली आहे. **सगळ्या शास्त्राचे सगळे सिद्धांत आणि त्या द्विसाहस्त्री गुरुचरित्राच्या टीकेमधे महाराजांनी प्रकट केलेले आहेत.**

ऋतम्भरा तत्र प्रज्ञा । ... (पतंजली योगसूत्र–४८)

योगसूत्रकार म्हणतात त्याप्रमाणे. तर हे द्विसाहस्त्री गुरुचरित्र म्हणून दुसरं केलेलं आहे. **तिसरा प्रकार** – गुरुचरित्रातल्याच कथा आहेत. सर्वही संस्कृत भाषेचा अभ्यास करणारे जे प्राथमिक विद्यार्थी आहेत, त्या विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेचा अभ्यासही व्हावा म्हणून **'त्रिशती'** काव्य म्हणून, एक केलेलं आहे तीनशे श्लोकांचं एक काव्य – गुरुचरित्र काव्य केलेलं आहे. वेगळी वेगळी वृत्त त्याच्यामध्ये आहेत. अलंकारही आहेत. म्हणजे नवीन संस्कृत शिकणाऱ्यां विद्यार्थ्याला आणि त्यावरुन दत्तात्रेयांच चरित्र समजून येईल–संस्कृत भाषेतल्या अलंकारांच आणि वृत्तांचं वगैरे ज्ञान होईल, त्या करिताही तो एक स्वतंत्र ग्रंथ केलेला आहे. दत्तात्रेय अवतारांचं चरित्र सर्वांना कळालं पाहिजे. कारण हा **'सद्गुरु स्वरूप अवतार आहे, मार्गदर्शन करणारा अवतार आहे. अखंड राहणारा अवतार आहे'** वगैरे ही सगळी कारणं सांगून त्या करिता हे वेगळे वेगळे ग्रंथ संस्कृत भाषेमध्ये केलेले आहेत. तर त्यांपैकी **'द्विसाहस्त्री गुरुचरित्र'** प्रसिद्ध आहे आणि अवघडही आहे ते. अनेक दर्शनं, अनेक शास्त्रांचे सिद्धांत त्याच्यामध्ये त्यांनी टीकेमधे सांगितले आहेत आणि त्याच्यामधे पुष्कळ विवरण केलेले आहेत.

त्यात आरंभाला त्यांनी सांगितलं, की, जन्म–जन्म आणखी ईश्वराचा प्रसाद संपादन करण्याकरता ज्यांचे प्रयत्न चाललेले आहेत – आपलं मन, आपली इंद्रिये आवरण्याकरता

ज्यांचे प्रयत्न चाललेले आहेत, – जेवणाकडे लक्ष नसेल, – कांही नाही, – अनसूया मातेनं जी कांही अतिथी सेवा केलेली आहे, जेवणाकडे कुठलं लक्ष ? द्रौपदीनं अन्नदान केलं – कुठलं जेवणाकडे, लक्ष आहे ? द्रौपदीनं जेवण केलं की, अन्न बंद होईल म्हणून सूर्यनारायण म्हणाले म्हणे ! द्रौपदीनं जेवायचं केव्हा ? दुसरे दिवशी सूर्योदय झाल्या शिवाय पुन्हा मिळणार नाही अन्न ! अन् मग कुणी अतिथी आले तर -- हे जे सगळं कार्य चाललेलं आहे – **ईश्वराचा प्रसाद व्हावा,** त्याची आज्ञा **'अतिथिदेवो भव', -- 'मातृदेवो भव'-- 'अतिथिदेवो भव' 'आचार्यदेवो भव' ही जी ईश्वराची आज्ञा आहे, ही पालन करण्याकरता प्रयत्न करायचाय. त्याकरता मनुष्यजन्म आहे,** ही जाणीव बाळगून – सर्व आयुष्य यांनी याकरता घातलेलं आहे. -- संसाराकडे लक्ष नाही, असं नाहीये, पण **मुख्य कोणतं कार्य आहे ? ईश्वर प्रसाद संपादन करायचाय.** तेव्हा असे जे महात्मे आहेत, दैवीसंपत्ती ज्यांनी मिळविलेली आहे, मानवी, या व्यावहारिक संपत्तीकडे ज्यांचं लक्ष नाहीये. अशा महात्म्यांच्या करता म्हणून–

तदर्थं सम्भवत्यज: म्हणतात. **.... (द्विसाहस्त्री १.६)**

म्हणून सांगतात आहे. त्यांच्या करता देव अवतार घेतात, कारण हे श्रेष्ठ महात्मे आहेत. 'सामान्य लोकांकरता अवतार घेत नाहीत' – असं म्हणायलाही हरकत नाही. अनेक जीव, आम्ही सापडलो आहोत दु:खात, आमच्याकरता कशाला घेईल देव अवतार ? म्हणजे काय देवाच्याजवळ सुद्धा पक्षपात आहे असं म्हणायचं काय ? – असे जे श्रेष्ठ पुरूष असतील – सज्जन असतील – महात्मे असतील, त्यांना जर कांही प्रसंग आला, त्यांना मार्गदर्शन करण्याकरता अवतार घ्यायचा आणि बाकीच्या जीवांचा उद्धार कसा करायचा मग – सर्व जीवांचा उद्धार करण्याकरता अवतार आहे ना ! मग –

तदर्थं संभवत्यज:

म्हणजे श्रेष्ठ पुरूषांचा उद्धार करण्याकरता अवतार आहे – हे कसं काय ? तर जगामधे जे कांही, अनेक जन्म आणखी प्रयत्न करून, ज्यांनी योग्यता मिळविलेली आहे, कोणीही असो, स्त्री असो पुरूष असो, त्याला जर कांही प्रतिबंध निर्माण झाला – त्यांच्या मार्गामधे जर कांही अडचण आली, ती दूर करायची. मुख्यत: त्यांचा मार्ग मोकळा करायचा. एकदा त्यांचा मार्ग मोकळा झाला म्हणजे ते स्वत: जगाचा उद्धार करू शकतात ना! जगाचा उद्धार म्हणजे सामान्य लोकांच्या उद्धाराकरता फारसा प्रयत्न करावा लागत नाही. श्रेष्ठ जो नेता आहे – नेता चांगला पाहिजे, मुख्यत:. त्यांच्याकडे सगळ्यांची दृष्टी असती – ते कसे वागताहेत ! रामचंद्र कसे वागले ? भगवान गोपालकृष्ण कसे वागले ? अर्जुन कसा वागला ? इकडं सगळ्यांचं लक्ष आहे ना ? तेव्हा नेत्याची सुधारणा झाली की बाकीचे लोक आपोआप तसं वागू लागतात.

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जन: ।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥...(भ.गी. ३.२१)

त्याप्रमाणे आणखी चालतं. तो जसा आचरण करतो -- जसा वागतो त्याचप्रमाणे - **यत्प्रमाणं कुरुते** - तो जे प्रमाण मानतो, तो ज्या प्रमाणे आचरण करतो आहे, त्याचप्रमाणे सगळी सामान्य अज्ञ जनता जी आहे, ती त्याप्रमाणे आपोआप वागायला लागते. त्याकरता कांहीही कायदा करायला नको. कांहीही नको. म्हणून श्रेष्ठ पुरूष जे आहेत - सज्जन, त्यांच्याकडे जास्ती लक्ष द्यावं लागतं. त्यांची सुधारणा करायची आहे, म्हणजे त्यांच्या द्वारानी आपोआप सगळ्या लोकांचा उद्धार होतो आहे. बाकीच्या लोकांचा उद्धार करत नाही भगवान असं नाही. अनेक जीवांचा उद्धार भगवंतानी केलेले आहेतच -- पण मुख्य लक्ष आहे,

तदर्थं सम्भवत्यज: ।

आपल्या मनाचा - इंद्रियांचा निग्रह व्हावा अशी इच्छा बाळगणारा, त्याकरता प्रयत्नशील असलेला जो आहे महात्मा, त्याच्याकडं अधिक लक्ष आहे. हे इतकं सांगितलेलं आहे.

तर अशा रीतीने भगवान दत्तात्रेयांचा अवतार यामुळे झालेला आहे आणि **''ईश्वरस्वरूप आणि सद्गुरूस्वरूप ही दोन्हीही स्वरूपं परमेश्वराचीच आहेत.''** म्हणून गुरूभक्तीमध्ये सुद्धा ईश्वर आणि गुरू एक मानून भक्ती असावी, असं ही त्याच्यामधे आणखी हे सांगितलेलं आहे. आदेश आहे शास्त्राचा -- संत सांगताहेत, **ईश्वर निराळा आहे, आणि गुरू निराळा आहे - असं समजू नये म्हणतात. हे गुरूभक्तीचं मुख्य महत्त्व आहे.** तर अशा रीतीनं हा दत्तात्रेय अवतार हा मूळ अगोदर झाला. **कृत युगामधे झालेला आहे आणि कलियुगामधे सुद्धा भगवान दत्तात्रेयांनी 'श्रीपाद श्रीवल्लभ' आणखी 'नरसिंह सरस्वती' हे दोन अवतार पुन्हा धारण झालेले आहेत.** प्रत्येक युगा युगे, **'संभवामि युगे युगे'** - म्हणून त्यांनी सांगून ठेवलेलं आहे, आश्वासन देऊन ठेवलेलं आहे - ज्या ज्या वेळेला असे प्रसंग येतील - **'परित्राणाय साधूनाम्'** - साधूंचं संरक्षण करायचंय, मुख्य, म्हणजे आपोआप सगळे सुधारतात. त्यांचे प्रतिबंध दूर करायचे आहेत. धर्माचरण करणारे साधु, ते जर सुरक्षित जर राहीले तर धर्माचेही संरक्षण आपोआप होतं आहे म्हणून साधूंचे संरक्षण हे मुख्य उदिष्ट आहे भगवंतांच.

तर कलियुगामधे सुद्धा साधु, असाधु असे असणारच. म्हणून या कलियुगामधे सुद्धा भगवंतांनी - दत्तात्रेयांनी, पुन्हा दोन अवतार घेतलेले आहेत. **'श्रीपाद श्रीवल्लभ' हा एक अवतार आंध्र देशामधे झालेला आहे, पीठापुर क्षेत्रामध्ये (आंध्र प्रांतात) आणि त्यांनीच नंतर 'नरसिंह सरस्वती' हा दुसरा अवतार घेतला. तो वऱ्हाड प्रांतामधे कारंजा म्हणून जे गांव आहे तिथे तो अवतार झालेला आहे** आणि त्यांचच चरित्र या गुरुचरित्रामधे जास्तीत जास्त दिलेलं आहे. हा एक विचार झाला.

आता याच्यानंतर हा जो गुरूचरित्र ग्रंथ जो केलेला आहे – मूळ आहे मराठी भाषेमधे – ओविबद्ध ग्रंथ आहे. हा ग्रंथ म्हणजे भगवान नरसिंहसरस्वती महाराज जे गाणगापूर क्षेत्रामधे जाऊन राहिले शेवटी, आणि तिथं पुष्कळ लीला त्यांनी केलेल्या आहेत. त्यांचेच आणखी शिष्य – दैवीसंपत्ति ज्यांनी मिळविलेली आहे, **'सायंदेव'** नांवाचे, साखरे त्यांच आडनांव – तर ते सायंदेव फार मोठे अधिकारी शिष्य होते, संसारी होते पण आणखी परमार्थामधेही त्यांचा अधिकार मोठा होता. 'गुरुभक्ती' कशी करावी ? ह्याचं ज्ञान त्यांना होतं. त्या सायंदेवांच्या वंशामधे अुत्पन्न झालेले हे आहेत. **गंगाधरात्मज–सरस्वती गंगाधर** यांच नांव – **सायंदेवः – नागनाथः – देवरावः त्याच्यानंतर गंगाधर व त्याच्यानंतर हे सरस्वती,** अशी एकंदर परंपरा आहे. तेव्हा महाराजांचे आणखी मोठे भक्त–सायंदेव यांच्या वंशामधे उत्पन्न झालेले हे सरस्वती गंगाधर, त्यांचच **नामधारक** हे त्यांनी नांव घेतलं– आपल्याला, टोपण नांव आहे, सरस्वती गंगाधर – त्यांना भगवंतांनी आज्ञा दिल्यामुळे हा 'गुरुचरित्र' ग्रंथ तयार झालेला आहे. आता गाणगापुरच्या त्या भागात राहणारे हे, म्हणजे तो आहे कर्नाटक प्रांत आहे. कर्नाटक प्रांतात राहणारे हे महाराजांच्या आज्ञेनं मराठी भाषेमधे यांनी हा ग्रंथ तयार केलेला आहे. भाषा कर्नाटकी, पण ग्रंथ तयार झाला आहे मराठी भाषेमधे आहे. ही आता ईश्वराची कृपा आहे. सद्गुरूंची कृपा आहे. आणखी सर्वही मराठी लोकांचं भाग्य आहे. म्हणून तयार झाला, नाहीतर त्यांनी कर्नाटक मधे केला असता तर आपल्याला कुठे समजणार आहे ? कशाला आपण वाचायला गेलो असतो? कशाला विचार करू लागलो. संस्कृत भाषेमधे जरी महाराजांच्या सारख्यांनी ग्रंथ केले तरी तिकडं आपलं लक्ष कशाला गेलं असतं ?

म्हणून हा मूळ ग्रंथ जो आहे, तो त्या सरस्वती गंगाधरांनी, सायंदेवाच्या वंशात असलेल्या, म्हणजे सद्गुरुंचीच कृपा ज्या कुळावरती आहे – वंशावरती आहे, त्या वंशातून, उत्पन्न झालेला हा मोठा गुरूभक्त होता– त्यांनी हा ग्रंथ निर्माण केलेला आहे. आणि मग त्याच संस्कृत रूपांतर वगैरे वासुदेवानंद सरस्वती महाराजांनी करून पुष्कळ त्याच गुरूचरित्राचा प्रसार करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे.

तर हा जो आहे **सरस्वती गंगाधर,** संसारामधे अत्यंत आणखी त्रासलेला आहे, त्याची हकिकत त्यांनी लिहीली आहे. **'नामधारक'** नाम घेऊन त्यांनी आरंभ केलेला आहे गुरुचरित्राचा. तो जो आहे, संसारात अत्यंत त्रस्त झाल्यामुळे त्याच लक्ष इकडं गेलं. देवाला आपण शरण जावं – गाणगापूर क्षेत्रामधे जाव. त्यांची कृपा संपादन करावी. त्यांचं दर्शन आपल्याला व्हावं, अशी मनामधे अगदी तळमळ लागून राहिलेली आहे. आणि तो नामधारक जो आहे, तो गाणगापुरला जाण्याकरता निघालेला आहे. तळमळ लागलेली आहे – ती कशी तळमळ पाहिजे ? ही त्याची स्तुती आपण पाहिली, त्या स्तुतीचा विचार केला म्हणजे आपल्याला कळेल –

सर्वज्ञ मां न जानीषे *विश्वसाक्षिन्न चेक्षसे ।*
विलापो न श्रुतो विष्णो मम श्रुत्वाप्युपेक्षसे ॥ **(द्विसाहस्त्री १.२५)**

त्यांनी स्तुती करायला आरंभ केलेला असताना तो सांगतो आहे, की, ईश्वराची प्रार्थना तो करतो आहे – नामधारक शिष्य, की, ''देवा ! मला कांही कळलं नाही तुला काय त्रास झाला – तू कुठं रहातोस ? 'काय मला कांही कळत नाही' –– असं तुम्हाला म्हणता येणार नाही''

'ईश्वर कसा आहे ?' 'ईश्वर सर्वज्ञ आहे'– ही एक जाणीव अंतःकरणामधे पाहिजे. उपासना करणारा जो आहे, **त्याला खात्री पाहिजे की, ईश्वराला सर्व समजलेलं आहे – आता उशीर कां लागला, याचं कारण निराळं आहे,** पण ईश्वराला कळलेलं नाही असं समजून घेऊ नये ––'कोण कळवणार'–'कुठाय ईश्वर रहातो?' कांही माहिती आहे आपल्याला ! म्हणून त्या नामधारकाने पहिली प्रार्थना अशी केलेली आहे की–

सर्वज्ञ मां न जानीषे ।..... (द्विसाहस्त्री १.२५)

'आपण सर्वज्ञ आहात आणि माझी ओळख नाही तुम्हाला? मी कोण आहे ? कोण जीव आहे ? कुठून मी आलो आहे ? काय माझी कर्म आहेत ? काय दुःख आहेत.' हे तुम्हाला कळलं नाही असं तुम्ही सांगू शकत नाहीत' – म्हणजे ईश्वराच्या सर्वज्ञत्वाबद्दल आणि ईश्वराच्या शक्तीबद्दल पूर्ण खात्री मनामधे बाळगून तो प्रार्थना करतो आहे. आणि 'तुम्ही जर अशा रीतीनं माझ्याकडे लक्ष दिलं नाही – शक्ती आहे पूर्ण, आणि ज्ञान ही पूर्ण आहे – काय झालेलं आहे, कोणच दुःख कशामुळे आलेलं आहे, कसं दूर करायचं, सगळं ज्ञान आहे ना तुम्हाला ? दुःख कशानी झालं हे ही ज्ञान आहे – दुःख जातील कशी हे ही ज्ञान आहे, आणि केव्हां जातील – केव्हां ? आत्ताच्या आत्ता ! – तुमचा संकल्प झाला तर आत्ताही जाऊ शकतील, अशी शक्तीही आहे – हे सगळं ही तुमच्या जवळ असताना आणि मी असा दुःखी कां? असा प्रश्न त्यांनी केला –

'काय ! तू काय दिलयंस आम्हाला? हे तरी शोभतंय कां? म्हणाले तुम्हाला'––

'कांही द्यावं लागतं काय या तुमच्या दरबारात – जे व्यवहारात द्याव लागतं – त्या शिवाय कामं होत नाहीत – दिलं तरी सुद्धा होत नाहीत ! पण असं समजू आपण' – तर व्यवहार निराळा' म्हणाले 'तुमच्या दरबारामधे द्यायला पाहिजे ? ध्रुवानी काय दिलं तुम्हाला ? सुदामजींनी काय दिलं तुम्हाला? बिभिषणानी काय दिलं !!' तो सगळा विचार करून आलेला आहे. मोठा भक्त आहे, मोठा आणखी सगळं त्याला, ईश्वरचरित्राचं चिंतन केलेला भक्त आहे तो. शरण जाणं म्हणजे सोपी गोष्ट नाहिये.

सगळया एकंदर चिंतनाचा उपयोग ईश्वराच्या स्तुतीमधे- प्रार्थनेमधे केला गेला पाहिजे. तळमळ तशी लागली पाहिजे म्हणजे ईश्वराचं, अनुग्रह आपोआप होतो. काय द्यायचं? आणि कांही दिल्याशिवाय तुमचं लक्ष येणार नाही म्हणजे हा दाता होणार नाही - दाता ! खरा दाता कोण आहे ? निरपेक्ष वृत्ती -- दुःखी झालेला आहे ना ! त्याला द्यायचं- उपयोग -- त्याच्या उपयोगी पडायचं - हा खरा दाता आहे. तुम्ही खरे दाते ठरणार नाहीत, तुम्ही. जर 'मी काय केलं, असं मला जर तुम्ही विचारलात' आणि द्यायचं कशाकरता म्हणतो आहे मी? तुमच्या जवळ, कमी काय आहे ? कारण काय आहे, सर्वही निधी जगामधे जेवढे आहेत त्या निधीपती आपण आहात. सगळे आपल्याजवळ आहेत. सर्व ही सिद्धी आपल्या दासी आहेत आणि ही भगवती लक्ष्मीदेवी- ही तर आपली आणखी दासी आहे म्हणाले. आपल्या सन्निध आहे नेहमी ! अशी स्थिती असताना ''तुम्हाला द्यायचं काय?'' म्हणाले आम्ही. आणखी 'तुमचं कार्य काय करायचं तरी काय', तुम्हाला तुमच्या उपयोगी पडायचं? तुम्ही परिपूर्ण आणखी शक्ती असणाऱ्याच्या, त्यांच्या उपयोगी आमच्या सारख्या अल्प शक्तींनी काय उपयोग करायचा म्हणाले.

म्हणून असे सगळेही विचार त्यांनी आपल्या अंतःकरणात जे जे विचार उत्पन्न झाले ते सगळे त्या स्तुतीच्या वेळेला मांडलेले आहेत. शेवटी तो म्हणाला, महाराज, एखादा मनुष्य- राजाची सेवा त्याने केलेली आहे- त्याचा आणखी तो नम्रभक्त, सेवक झाला तर त्याच्या आणखी मुलाबाळाकडे राजशासनाचे लक्ष असतं. त्या मुलाला नोकरी-बिकरी कांही मिळते- कांही पेन्शन मिळते- कांही तरी साहाय्य मिळतं म्हणाले. त्या दृष्टीनं तरी तुम्ही विचार करायला नको कां? ज्या भक्तांच्या वंशामधे मी जन्माला आलेलो आहे, त्या भक्तानी आपली सेवा केलेली आहे, त्याकरता तरी तुम्ही माझ्याकडे लक्ष द्यायला पाहिजे- असे सगळेही आणखी विचार त्यांनी मांडले, अशी प्रार्थना केली - आणि अत्यंत असह्य झालं, गुरुदर्शन होत नाही म्हणून मूर्च्छित पडलेला आहे तो - आणि **मग त्याला स्वप्नामधे महाराजांचं दर्शन झालेलं आहे.**

नरसिंह सरस्वती महाराजांनी, त्या नामधारकाला, (सरस्वती गंगाधरांना) स्वप्नामधे दर्शन दिलं. उठला, सावध झाला आहे तो आणि तसाच गाणगापूरला जायला निघाला होता - चाललेला आहे -- स्वप्नामधे ही मूर्ति कोणती दिसली ? कुठे आहे ? -- असे जाता जाता, निघालेले असताना, तशीच मूर्ती पुढं त्याला भेटली. एक महापुरूष त्याला भेटलेले आहेत. पाया पडला. 'महाराज ! माझं भाग्य फार चांगलं आहे. आपलं दर्शन झालं. आपली भेट झाली. कुठून आला आपण? काय आहे? कुठं राहाता?' असं त्यानी सहज त्यांना विचारलं. त्यावेळेला त्यांनी आपलं नांव **'सिद्ध'** म्हणून सांगितलं. विशेष नांव कांही नाही - 'सिद्ध' एवढंच नांव सांगितलं. 'मी' म्हणाले 'सिद्ध' आहे. महाराजांचा एक भक्त आहे. आणि

त्यांनी आपला परिचय करून देत असताना, तो परिचय कसा करून दिलेला आहे ! महाराजांचं जे 'त्रिशतीकाव्य' आहे – गुरुचरित्र काव्य – त्यामधे हा श्लोक आलेला आहे. त्या गुरुचरित्राचं महत्त्व काय आहे हे ते सांगताहेत –

गुरोश्चरित्रामृतशांततर्षः सिद्धोऽयमीशेक्षणजातहर्षः ।
भूपृष्ठचारी विधिलब्धतोषः सदा गुरोरस्य च संनिकर्षः ॥...(त्रिशतीकाव्य १.१४)

सद्गुरूंचं जे चरित्र आहे, त्या चरित्राचं महत्त्व सांगताहेत –

भागवतामधे आणखी परिक्षित राजाने शुकाचार्य महाराजांना आणखी प्रार्थना केली, 'महाराज ! मला संपूर्ण कृष्णचरित्र आपण ऐकवा' म्हणाले. 'ही मला तळमळ लागलेली आहे. 'कृष्ण चरित्र ऐकण्याची !' 'अरे ! तुला काय भूक–बीक लागणार नाही का ! तहान नाही कां?' नाही म्हणाला.

नैषातिदुःसहा क्षुन्मां त्यक्तोदमपि बाधते ।
पिबन्तं त्वन्मुखाम्भोजच्युतं हरिकथामृतम् ॥...(भा. १०.१.१३)

श्रोता कसा असला पाहिजे. परिक्षित राजा सांगतोय – 'महाराज ! आपण मला आता सांगायला लागलात – चार दिवस झाले मी भागवत ऐकतो आहे. भगवंताच्या कथा ऐकायला मिळताहेत आपल्या सारख्या महात्म्याच्या मुखातून' – 'कांही नाही' – म्हणाले, 'मला तहान आणि भूक कांही आठवणही नाही' – भूक आवरणं अतिशय कठीण आहे. तहान भूक आवरणं अत्यंत मोठा दोष आहे. जीवाच्या पाठीमागे हे सगळे दोष जे लागलेले आहेत, जन्माला आल्यापासून अगदी जन्मल्यापासून तहान आणि भूक लागत आहे, सुरु झाली आहे हे दोन दोष आहेत. ते आम्ही दोष समजत नाही. त्याच्याकरता वाटेल तसे कांही कृत्य आम्ही करतो. तहान भूक आमची संपली पाहिजे म्हणा, आम्हाला तहान, भुकेला उपयोग झाला पाहिजे म्हणून धन मिळवायचं– काम, सारखे चाललेले आहे आमच, ते कांही थांबत नाही. हा पहिला दोष आहे. जन्मापासून. त्याच्यानंतर **अशनया पिपासा (वेदान्तसार)**, त्याला म्हणतात, शोक, मोह वगैरे प्रौढवयामधे हे आहेत. **मोह म्हणजे अविवेक उत्पन्न होतो आहे. मानसिक ताप म्हणजे शोक उत्पन्न होतो** आणि वृद्धावस्था आली म्हणजे जरा आणि मृत्यू – म्हातारपण पाठीमागे लागतं. आणि शेवटी मृत्यू !

हे जन्माला – जन्मापासून हे सगळे दोष आणखी जीवांच्या पाठीमागे आहेत, या दोषातून कसं मुक्त व्हायचं? म्हातारपणातून मुक्त होण्याकरता, देवाचा जन्म आला तर म्हातारपण येत नाही म्हणतात ! स्वर्गलोकामधे देवाला म्हातारपण नाही. सगळे तरूणच असतात म्हणे. पण देवाचा जन्म येण्याकरता पुण्य करायला पाहिजे. स्वर्गलोकामधे जायचंय ना ! तिथं कांही वाटेल त्याला परवानगी नाहीये – पण बाकीचे दोष आहेत की ? तहान आहे, भूक आहे.

तर परिक्षित राजाची प्रार्थना अशी आहे – 'मला बिलकुल नाही' म्हणाले. मी पाणीही पीत नाही अन् भुकेची तर मला आठवणही होत नाही. कारण काय ?

नैषातिदुःसहा क्षुन्मां त्यक्तोदमपि बाधते ।

पिबन्तं त्वन्मुखाम्भोजच्युतं हरिकथामृतम् ॥.....(९) (भा. १०.१.१३)

'आपण जे मला हे हरिकथारूपी अमृत देत आहात रोज' म्हणाले – 'मी ऐकतोय' 'चार दिवस ऐकतो आहे' हरिकथा हे अमृत आहे. हे आणखी आपल्याला मिळतं आहे आणि त्याच्याकडे इतकं लक्ष लागल्यामुळे तहानभूक गेली. बाह्य शरीराचा संबंध सुटलेला आहे. मनाने तो सुटू शकत नाही. मन जर इकडं आणखी ईश्वरांच्या कथेकडे लागलेलं असेल – तो परिक्षित राजा सांगतो – नाहीये.

तुकाराम महाराज भंडारा डोंगरावर जाऊन बसले. जय जय रामकृष्णहरी –– सुरूवात झाली की, गेलं – बाह्यसंबंध कांही नाही. तहान नाही – भूक नाही. सात सात दिवसपर्यंत आणखी त्या समाधी अवस्थेमधे आहेत. त्या जिजाबाईनं– बायकोनं यावं – कुठं आहेत? –– त्यांना जेवायला –– शिव्या देत होती ती. –– त्यांना आणि त्यांच्या पांडुरंगांना– दोघांनाही शिव्या द्यायची ती. पण शोधून काढायचं– त्यांना खायला घालायचं– शिव्या द्यायच्या, अन् मग आपण जाऊन जेवण करायचं. हे मात्र नियम होते तिचे. तर सात सात दिवस पर्यंत कांही नाही– तो भावावेश आहे आणि भावसमाधी मध्ये निमग्न आहेत महाराज ! तर अशा स्थितीमधे परिक्षित राजानी सांगितलं आहे. तेव्हा सिद्ध नामधारकाला सांगताहेत की, 'बाबा!' मी माझा परिचय करून देतो–

गुरोश्चरित्रामृतशान्ततर्षः सिद्धः ।...(त्रिशती १.१४)

'सिद्ध' 'माझं नांव आहे. पण मी कसा आहे? मला कोणचीही इच्छा नाही– वासना नाही' म्हणाले. हा केवढा मोठा अधिकार आहे? आज जगामधे कोणी असं सांगू शकेल – 'मला कांहीही वासना नाही'! –– कुणीच नाही, शक्यच नाही. असा भेटणंच शक्य नाही. कांहीही वासना ज्याच्याजवळ नाहीत – तो अगदी आणखी पूर्ण तृप्त असला पाहिजे नेहमी. निश्चिंत असला पाहिजे. आम्ही निश्चिंत कधीही असू शकत नाहीत. जास्ती जास्ती समृद्धी आमच्या संसारामधे होत चाललेली की जास्ती जास्ती चिंता उत्पन्न होताहेत. त्यामुळेच दुःख आहे. मानसिक ''आधि'' म्हणजे मानसिक व्यथा आहेत. त्या उत्पन्न झाल्या की, दुःखं आहेत.

तर सिद्धमुनी सांगताहेत की, 'माझ्या मनामधे कोणतीही इच्छा नाही– वासना कोणतीही नाही' कशानी....?

गुरोश्चरित्रामृतशान्ततर्षः ।

'सद्गुरूंचं चरित्र जे आहे, गुरूचरित्र हे अमृत आहे. हे मी, आणखी मला मिळालेलं आहे, त्याचं निरंतर अखंड चिंतन मी करतो आहे त्यामुळे माझं इकडं लक्षच नाही.'--

मनाच्याही पलिकडे गेलेले आहेत. **चिंतामुक्त होणं म्हणजे मनाच्याही पलिकडं जाणं आहे** – स्थूल शरीराच्या तर पलिकडे तर गेलेच ते-- तहान नाही – भुक नाही म्हणजे स्थूल शरीराचा संबंध सुटलेला आहे. म्हणजे या ठिकाणी इथे स्थूल देहामधे येऊन सुद्धा स्थूल देहाचा संबंध सोडता येतो, पण त्याच्या करता इतकी आणखी योग्यता मिळविली पाहिजे. असे महात्मे आहेत, आणि या महात्म्यांच्या करता देवांनी यायचं नाही तर कुणाकरता यायचं? हा एक सांगितला विषय – 'कांही मला इच्छा नाही' – दुसरी गोष्ट आहे.

सिद्धोऽयमीशेक्षणजातहर्षः ।...(त्रिशती १.१४)

'परमेश्वराचं मला दर्शन झालेलं आहे' म्हणाले. तो एक आनंद आहे, पूर्ण आनंद आहे, हे गुरूचरित्राचं फल आहे हे. गुरूचरित्ररूपी अमृत ज्यांना आणखी प्राशन करायला मिळाल – त्या बुद्धीन ज्यांनी आणखी ऐकलं. आणखी चिंतन केलेलं आहे, त्यांच्या सगळ्या इच्छा शांत होतात, त्यानंतर परमेश्वराचा साक्षात्कार होतो आणि पूर्ण आनंद मला प्राप्त झालेला आहे. हे दुसरं त्यांनी सांगितलं.

'राहता कुठे महाराज आपण? – राहता कुठं?' 'हे विश्वचि माझे घर!' म्हणाले 'भुपृष्ठचारी. भूमी एवढी मोठी आहे ना!' म्हणाले 'राहायला जागा कितीतरी केवढी भूमी आहे ना! त्या भूमीवरती मी फिरत असतो' म्हणाले 'सगळंच माझं आहे – आणि खाण्यापिण्याची व्यवस्था? **'विधिलब्ध तोषः'** -- त्या विधी म्हणजे प्रारब्धावरती सगळं सोपवून दिलेल आहे. प्रारब्धाने मिळालं अन्न, शिळं मिळालं, शिळं चालेल-- चांगलं मिळाले, चांगलं चालेल– मानाने मिळालं, मानाने– तेही चालेल-- अपमानाने कुणीतरी शिव्या देऊन कोणी आमच्या झोळीमधे कुणी भाकरी टाकली–तेही चालेल, सर्व आणखी **'विधीलब्ध तोषः'** जे कांही विधीनं आणखी या देहाच्या प्रारब्धानं देहाला ज्या वेळेला जे मिळेल– त्याच्यामधे आनंद मानायचा!

विधिवशात्प्राप्तेन सन्तुष्यताम् ... (साधनपञ्चकम् ४ था श्लोक)

ही एक आज्ञा आहे, हा एक मोठा गुण मिळालेला आहे. संतोष आहे–समाधान आहे, आणखी शेवटचं त्यांनी सांगितलं–

गुरोश्चरित्रामृतशांततर्षः.....सदा गुरोरस्य च संनिकर्षः ।

'सद्गुरू महाराज दत्तात्रेय नरसिंह सरस्वती – ते माझ्याजवळ नेहमी असतात.' केवढी आहे ही भूमिका ! -- **हे केवळ गुरूचरित्राचं चिंतन करण्यामुळे मला प्राप्त झालेलं आहे हे गुरू चरित्राचं महत्व आपला परिचय करून देत असताना सिद्धांनी नामधारकाना सांगितलं.**

'त्यांचा मी शिष्य आहे' मग तो म्हणाला. नामधारक, मग महाराज 'आम्ही त्यांचीच सेवा करतो की !' म्हणाला. 'आमच्याकडे त्यांच कांही लक्ष दिसत नाही, कारण कष्ट आमचे गेले नाहीत – सारखी दुःखं – सारखी चिंता – सारखा आणखी त्रास मला होतो आहे संसारातला !' –– अशी तक्रार त्या नामधारकाने केल्याबरोबर, त्याला सिद्ध म्हणाले, 'असं होणार नाही. भगवंताच्या चरित्राचं तू चिंतन केलं आहेस कां? देवाचं चरित्र कसं आहे? काय काय त्यांच्या लीला आहेत? काय त्यांची शक्ती आहे – याचा पूर्ण विचार तू केला नाहीस, आणि मनामधे संशय घेऊन बसलास म्हणाले तू !' संशय आहे आणि अश्रद्धा आहे दुसरी' – 'ईश्वराच्या शक्तीबद्दल श्रद्धा नाही, तुला विश्वास नाहीये. म्हणून असं तू बोलतोयस. हे मोठे दोष आहेत. एकतर पूर्ण ज्ञान नाही तुला –– **'अज्ञः'** ! हा एक मोठा दोष आहे. पूर्ण समजून घेतलं पाहिजे. जे आणखी महान गुरूभक्त असतील– त्यांच्याकडून ईश्वराचं महात्म्य समजून घेतलं पाहिजे किंवा आपल्याला जर तसं ज्ञान असेल तर वाचून सुद्धा, पुष्कळ ग्रंथ करून ठेवलेत, व्यास महर्षींनी – वाल्मीकी मुनींनी– महाभारत आहे– रामायण आहे–– पुष्कळ कितीतरी पुराणं आहेत.

स्वतःचं सामर्थ्य असेल, विचार शक्ती असेल, तर आपण वाचूनही ईश्वर स्वरूपाचं– त्याच्या शक्तीचं ज्ञान होऊ शकतं. हे ज्ञान पाहिजे. हे ज्ञान ही नाही– पण जे कांही ज्ञानी महात्मे आहेत त्यांच्या बोलण्यावर तरी विश्वास पाहिजे, की, ईश्वराची शक्ती फार मोठी आहे बाबा! त्या करता तो विश्वास ठेवणं– तो विश्वास बसत नाहीये, आणि त्यामुळे संशय मनामधे, हे खरं कां ते खरं – काय कशावरून खरं. कथा पुष्कळ आता आपण ऐकतो म्हणाले– मला स्वतःला अनुभव न मिळवून खरं कशावरून मानायचं? असे अनेक प्रकारचे संशय मनामधे उत्पन्न होतात. त्यामुळे आणखी तुझा अशा प्रकारचा परिणाम आहे म्हणाले. तू त्यांच्यावर विश्वास ठेवत नाहीयेस– सद्गुरूंचं माहात्म्य असं आहे.

शिवे रूष्टे गुरूस्त्राता । गुरौ रूष्टे न कश्चन ।...(गुरुचरित्र २.१३३)

हा सिद्धांत आहे म्हणाले बाबा. ईश्वराचा जरी आणखी प्रकोप झाला, तरी सद्गुरू हे त्याचं संरक्षण करू शकतात आणि सद्गुरूंचा कोप झाल्यानंतर मात्र ईश्वर नाही. तुम्ही त्या गुरूंकडेच जायला पाहिजे. असं फार माहात्म्य आहे.

तेंव्हा सद्गुरुंच्याबद्दल मनामध्ये हा अविश्वास तू धारण केलेला आहे, तो अविश्वास तू सोडून दे, म्हणाले. मग त्याने विचारले महाराज सद्गुरुचे हे जे स्वरुप आहे ते ईश्वराचे स्वरुप आहे. गुरूभक्त जो आहे, त्याला आणखी गुरूंची कृपा कशी झाली ते सगळं मला एकदा समजावून सांगा. आपल्या सारखा महात्मा मला भेटलेला आहे. **आपण जर मला उपदेश केला तर माझ्या मनातले हे सगळे दोष दूर होतील. तेव्हा तुम्ही मला हे समजावून सांगा–**

अशी प्रार्थना केल्यानंतर मग आता सिद्ध मुनी नामधारकांना पुढची सगळी कथा सांगायला लागले आहेत.

ब्रह्मदेव सृष्टी करताहेत, ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे. वेदज्ञान त्यांना सगळं मिळालेलं आहे. कशी सृष्टी करायची? काय करायचं? पंचीकरण कसं करायचं– सगळं ज्ञान त्यांना झालेलं आहे, अन् त्याप्रमाणे सृष्टी कार्य सुरू झालेलं आहे. सृष्टीमध्ये काल विभाग हा एक महत्त्वाचा आहे. जीवात्म्यांची सृष्टी––जीवात्म्यांना त्या त्या आणखी योनीमधे जन्माला घालायचं– त्यांची स्थूल शरीरं निर्माण करण्याकरता आणखी पंचमहाभूतांची सामग्री तयार आहे. पंचीकरण– पंचमहाभूतं तयार झालेली आहेत. त्यामुळे स्थूल शरीरं सगळी तयार होतील. त्या स्थुल शरीरामधे राहणारे जीवात्मे जे आहेत– या जीवात्म्यांना तशा तशा प्रकारचं कालाचंही सहाय्य ईश्वराने घेतलेलं आहे. सृष्टी करताना जीवांची कर्म तपासून सृष्टी केली. त्या त्या योनीमध्ये जन्माला घालायचं– त्या रूपामधे– त्यानंतर हा जो कालविभाग आहे– कृतयुग आहे, त्रेतायुग आहे, व्दापार युग आहे, कलियुग आहे –– कमी जास्ती प्रकार त्याच्यामधे आहेत. चढउतार हा त्याच्यामधेही आहे. पूर्ण धर्म आहे, कृतयुगामधे. ज्ञान आहे, धर्म आहे, वैराग्य आहे, भगवत उपासना आहे– भक्ती आहे. हे सगळं आणखी कृतयुगामधे पूर्ण आहे.

तर असा तो कृतयुगाचा काळ– त्याची एक देवता–– कालविभाग जरी केला असला तरी प्रत्येक काल विभागाच्या देवता म्हणूनही शास्त्रकारांनी सांगितलेल्या आहेत. प्रत्येक आणखी तासा तासाच्या म्हणा, होरा म्हणून प्रत्येक आणि होरा देवता ज्योतिष शास्त्रामध्ये सांगितल्या आहेतच त्या. त्यांनी, तर त्याप्रमाणे कृतयुग म्हणून जे आहे – त्या कृतयुगाला अगोदर सांगितलं की, 'तू जा आता सृष्टीवरती, आणखी तू कार्य कर.' कृतयुगाची प्रवृत्ती आणखी धर्ममार्गाकडे असल्यामुळे, त्या युगामधे राहणारी सगळीही आणखी मंडळी धर्मशील अशा प्रकारची राहिलेली आहेत. कांही कालानंतर धर्माचरण आणखी कमी कमी होत चाललेलं आहे. तो काल म्हणजे त्रेतायुगाचा काल. यज्ञयागादी कर्म करणं वगैरे– त्याच्यानंतर द्वापार युगाचा आलेला आहे काल– आणि **शेवटी कलियुग – फक्त संकीर्तन – भगवंताचं नाम संकीर्तनाचं विशेष महत्त्व आहे.** यज्ञयागादिकाकडे लक्ष नाही, किंवा जास्तीत जास्त मोठया मोठया तपःश्चर्या वगैरे करणं– अत्रीमहर्षींनी जशी तपःश्चर्या केली तसं नाहीये. इतकी शक्ती ही नाही– शरीरामधे ही शक्ती नाही– मनामधेही शक्ती नाही. त्यामुळे आणखी **एक जे सुलभ साधन जे आहे, नामसंकीर्तन, परंतु महत्त्वाचं– हे आणखी शास्त्रकारांनी सांगितलं आहे.**

असे एकेक एकेक युग –– कृतयुग झालं – त्रेतायुग झालं– द्वापार युग झालं, नंतर कलियुगाचा काल आलेला आहे. कलीला सांगितलं, ब्रह्मदेवानी, 'तू जा' म्हणाले 'भूलोकावरती

जा, आणखी याची व्यवस्था तू पहा' – त्याला अधिकार मिळाला. त्याने पहिल्या प्रथम ब्रह्मदेवांना सांगितलं, 'महाराज! मला भूलोकावरती तुम्ही पाठविता. काय तिथ सगळे धर्मानी वागणारी मंडळी आहेत,' म्हणाले 'हे धर्मशील जीव जे आहेत यांच्यामधे जाऊन मी कसा कार्य करीन?' मला भीती वाटते म्हणाले.

आरंभाला त्यांनी सांगितलं, 'माझी एकंदर स्थिती अशी आहे,' म्हणाले की, 'सज्जनांना मानायचं नाही– देव नाही– धर्म नाही– कांही नाही. परस्पर आणखी स्वतःचा स्वार्थ जेवढा मिळाला म्हणजे झालं– आपलं पालन–पोषण कसं होईल तिकडंच लक्ष देणारा जो आहे. धर्माधर्माचा विचार न करणारा– तो माझा मित्र आहे,' म्हणाले 'तिथं तर जास्ती संख्या तर धर्मशील पुरूषांची आहे. मी कसा जाईन म्हणाले तिथे !' असं त्या कलियुगाने सांगितलं.

मग त्यांनी सांगितलं त्याला – 'असुरी संपत्ती बरोबर घेऊन जा !' म्हणाले, 'प्रसार होईल हळू हळू – तुझाच काल आता आलेला आहे. धर्मांचा ऱ्हासच होत आलेला आहे. तेंव्हा अशा, वेळेला तुला अनुकूलता होईल' –– म्हणून त्याला पाठवलं. तरी त्यांनी त्याला सांगितलं की– कलियुगाला– 'तुझा जरी काल आलेला असला तरी कांही कांही दैवीसंपत्ती मिळविणारे अशा प्रकारचे जीवात्मे या ठिकाणी सुद्धा तुझ्या कालामध्ये सुद्धा असतील.' म्हणाले, 'गुरूसेवा करणारे, ईश्वराची उपासना करणारे, पतिची सेवा करणाऱ्या पतिव्रता स्त्रिया वगैरे, याही मोठ्या अशा प्रकारच्या अधिकारी, अशा कलियुगामधे सुद्धा आहेत!' म्हणाले, 'त्यांना मात्र तू त्रास देऊ शकणार नाही, तू देऊ नको त्यांना त्रास –– असं मुद्दाम ब्रह्मदेवांनी त्याला बजावून सांगितलेलं आहे. आणखी अशा प्रकारचे श्रेष्ठ पुरूष जे आहेत– मार्गदर्शन करणारे जे महात्मे– सद्गुरू स्वरूप– त्या गुरूंची भक्ती करणारा – हा तुला मात्र भिणार नाही. तुझ्या त्रासांचा त्याला कांहीही उपयोग होणार नाही. असं ब्रह्मदेवांनी सांगितल्यानंतर, त्या कलीनेच प्रश्न केला की, 'हे गुरुमाहात्म्य जे तुम्ही सांगता– हे गुरू म्हणजे काय आहे?' म्हणाले – 'कुठे सांगितलं हे माहात्म्य– आणि याच्या बद्दल गुरूभक्ती करणारा जो आहे त्याचं महत्त्व कसं आहे ? –– तो कसा आणखी कली पासून दूर राहतो ?' वगैरे– 'त्याच्या बद्दल कांही एखादा दृष्टांत असला तर सांगा!' म्हणाले मला 'कथा सांगा.'

मग त्यांनी त्यावेळेला आणखी सांगायला आरंभ केलेला आहे. **ब्रह्मवैवर्त पुराण** – व्यास महर्षींनी अनेक पुराण रचना केलेल्या आहेत. केवढं वाङ्मय व्यासांनी निर्माण केलेलं आहे. वेदाचे विभाग करुन ठेवले आहेत. सर्व ही वेद, अगोदर एकत्र होते–– पूर्वी एक वेद होता असं सांगतात, इतक्या वेदांच अध्ययन करणं– अभ्यास करणं अशी बुद्धी राहिली नाही–– कमी कमी होत चालली. म्हणून चार विभाग ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्वणवेद –– त्या प्रत्येक वेदामधे सुद्धा वेगवेगळ्या शाखा पुष्कळ केलेल्या आहेत.

एक विंशत्यध्वयुक्तं ऋग्वेदं कवयो विदुः

सहस्त्राध्वा सामवेदः यजुरेकशताध्वकम् ।

नवाध्वाऽथर्वणोऽन्येतु प्राहुः पञ्चदशाध्वगम् ॥ **(सामवेदीय वेदशाखा)**

असं सांगतात.

एकवीस शाखा एका ऋग्वेदाच्या केल्या– कारण काय आहे? एका ऋग्वेदाचा सुद्धा संपूर्ण अभ्यास करण्याची बुद्धी राहिलेली नाही. बुद्धी सामर्थ्य राहिलेले नाही. ऋग्वेदाच्या संहितेचे साकल शाखेचे एकंदर मिळून दहा – साडेदहा हजार मंत्र आहेत. इतके सगळे मंत्र कंठस्थ ठेवायचे? पाठ कसे ठेवायचे? ते किती कठीण आहे काम. केवळ संहिता, ब्राह्मण ग्रंथ आहेत. उपनिषदं, आरण्यके ग्रंथ आहेत. पुष्कळ सगळे बाकीचे ग्रंथ आहेत. तर अशा एकेक वेदांच्या सुद्धा अनेक शाखा आहेत म्हणाले. असा संपूर्ण वेदाचा अभ्यास होणार नाही, म्हणून वेद विभाग व्यासांनी करून ठेवले. एकेक विभागाचा तरी अभ्यास होईल म्हणाले. त्याच्यानंतर **वेदार्थ समजून सांगण्याकरता आणखी पुराण, इतिहासाची योजना, रचना त्यांनी केलेली आहे.**

इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत् ।

बिभेत्यल्पश्रुताद् वेदो मामयं प्रहरिष्यति ॥ **(महाभारत १.१.२६७ व २६८)**

वेदार्थ संपूर्ण समजण्याकरता इतिहास– पुराणांचाही अभ्यास झाला पाहिजे.

तर ही अनेक पुराणं केलेली आहेत आणि त्यात, त्यांनी, त्यापैकी ब्रह्मवैवर्त नांवाचे एक पुराण आहे. त्या **ब्रह्मवैवर्त पुराणामध्ये हे गुरुमाहात्म्य त्यांनी सांगितलेलं आहे.** सद्गुरूंचे माहात्म्य म्हणजे गुरुमाहात्म्य, भगवान श्री हरींची कृपा असेल, तर सद्गुरूंची भेट होती म्हणाले आणि सद्गुरूंची भेट झाल्यानंतर, त्यांची कृपा जर झाली तर आपल्याला आत्मदर्शन होतं–ईश्वर साक्षात्कार होतो ना ! नामदेव महाराजांना ईश्वर साक्षात्कार झालेला होता. सगुण साक्षात्कार ! पांडुरंगांना यांनी आपला नैवैद्य न्यावा– पांडुरंगांनी जेवण करावं– प्रत्यक्ष तो नैवेद्य खावा– यांच्या घरी यावं, त्यांच्या दासीला दळायला लागावं – अगदी इतकं आणखी सारखं ईश्वराचं सान्निध्य आहे, परंतु अजून ईश्वराचं दर्शन आणखी खरं व्हायचं होतं–त्यांना सुद्धा. भक्ती आहे, अगदी मोठी भक्ती आहे–परंतु त्यांना सुद्धा कच्च मडकं म्हणाले, ज्ञानी महात्मे. गोरोबांनी सांगितलं, 'हे कच्चं मडकं आहे!' म्हणाले. त्यांना वाईट वाटलं – पांडुरंगांच्याकडे तक्रार घेऊन गेले –'मला कच्चं मडकं म्हणतात' म्हणाले 'होय!' म्हणाले–'अजून कच्चं आहे, पक्का झाला नाहीस तू'– 'अहो ! तुम्ही माझ्याबरोबर बोलता, जेवता मी आणलेलं, आमच्या घरी येता– बोलता तिथं राहता आणि अजून मला कच्चं म्हणता ?' ते म्हणाले 'बाबा ! पांडुरंग फक्त आणखी मंदिरातच आहे, राऊळातच आहे. एवढंच तू म्हणतोस, पाहतो आहेस. सर्व ठिकाणी पांडुरंग आहे हे तुला कळायला पाहिजे की नको म्हणाले? हे अजून कळायचं

आहे, म्हणून, कच्चं म्हणाले ते ! तुझा अपमान करण्याची कांही त्यांची वृत्ती नाही'– म्हणून त्यांना सुद्धा आणखी विसोबा खेचरांच्याकडे त्यांनी पाठवलं.

त्यांना, सर्व, आणखी, ईश्वराला देशाची मर्यादा नाही– कालाची मर्यादा नाही. ईश्वर सर्व देशामधे, सर्व कालामधे सर्व वस्तुस्वरूप परमात्मा आहे, हे ज्ञान होण्याला वेळ लागला नाही. त्यांची इतकी आणखी भक्ती मोठी होती – प्रेम भक्ती.

'प्रेम सुख देई – प्रेम सुख देई' नेहमी ते म्हणतात. ती इतकी भक्ती होती की, त्या भक्तीमुळे ज्ञान मिळायला वेळ लागला नाही. परंतु त्यांना सुद्धा आणखी ज्ञान मिळण्यापूर्वी आणखी कच्चे – कच्चेपणा आहे असं म्हणाले. **तर सद्गुरूंचा प्रसाद झाल्यानंतर आणखी हा पक्केपणा येतो. खरं ईश्वरदर्शन जे आहे, ते त्यावेळेला होतं आहे.** संपूर्ण विश्व म्हणजे ईश्वरस्वरूप आहे.

'सर्वं स्वरूपम् परमेश्वरस्य' – असं जे म्हणतात – **'जे जे भेटिजे भूत – ते ते मानिजे भगवंत.'** म्हणून सांगताहेत संत महात्मे –– ही भूमिका उत्पन्न होण्याकरिता म्हणून आणखी गुरुसेवा व्हायला पाहिजे, सद्गुरूंचा प्रसाद व्हायला पाहिजे. तो झाल्यानंतर मग सर्व ज्ञान होतं आहे. त्याकरता, आणखी गुरूंचं माहात्म्य फार मोठं आहे, म्हणून ब्रह्मदेवांनी कलीला सांगितलेलं आहे. आणि सिद्धमुनी नामधारकाला ही कथा सांगताहेत––

त्याकरता एक आख्यान त्यांनी सांगितलेलं आहे, **'गुरूमाहात्म्य'** समजून सांगण्याकरता. गोदावरी नदीच्या तीरावरती वेदधर्मा ऋषींचा एक आश्रम होता. पूर्वी, अशी मोठी मोठी ऋषिमंडळी, ज्ञानी महात्मे, अरण्यामधे राहत असत. कुठेही शहरात वगैरे असा संबंध नाही. निसर्ग आहे, शुद्ध हवा आहे. गायी पुष्कळ असायच्या. गायीचं दूध, आणखी सात्त्विक आहार सगळ्यांना, विद्यार्थ्यांना मिळायचा. हजारो विद्यार्थी शिक्षणाकरता तिथं राहत होते. तेंव्हा त्या सगळ्या निसर्गामधे राहणं– सद्विचार श्रवण आहे, त्याचप्रमाणे सात्त्विक आहार आहे. आहार शुद्ध असल्यानंतर मन शुद्ध व्हायला कांही हरकत नाही.

आहारशुद्धौ – सत्त्वशुद्धिः

सत्त्वशुद्धौ ध्रुवा स्मृतिः स्मृतिलम्भे सर्वग्रन्थीनां
विमोक्षस्तस्मै मृदितकषायाय तमसस्पारं दर्शयति भगवान्सनत्कुमारस्तꣳ
स्कन्द इत्याचक्षते तꣳ स्कन्द इत्याचक्षते ॥ **(छान्दोग्य उपनिषत् ७.२६.२)**

म्हणतात त्याकरता. आहाराकडे लक्ष दिलेलं आहे शास्त्रकारांनी. चांगला आहार ठेवा– चांगला आहार ठेवा– या करता सांगताहेत.

तेव्हा दहा दहा हजार शिष्य आहेत– अनेक शिष्य मंडळी आहेत– शिष्ठ–प्रशिष्ठ वगैरे पुष्कळ आणखी तिथं मंडळी आहेत. तेव्हा वेदधर्मा ऋषी, एके दिवशी असे बसलेले आहेत

झाडाखाली तिथं आपल. त्या ठिकाणी पुष्कळ शिष्यमंडळी बसलेली आहेत. सभोवती आणखी यांनी बोलायला सुरूवात केलेली आहे– वेदधर्मा ऋषींनी, की, त्यांनी सांगितलं, 'बाबांनो !' आता म्हणाले आजपर्यंत पुष्कळ तपःश्चर्या वगैरे माझ्याकडून झालेली आहे म्हणाले. परंतु, तपःश्चर्येच्या योगाने पुष्कळ पापाचा क्षय झालेला आहे. पण कांही पापं माझी अद्यापी शिल्लक राहिलेली आहेत.' म्हणाले, ते ज्ञानी महात्मे होते, दुसऱ्यांची पाप–पुण्य समजून घेणं– त्यांना मार्गदर्शन करणं, हे तर ज्ञान आहेच त्यांना, पण स्वतःचे काय पाप पुण्य आहेत त्याचही ज्ञान असणं हे फार महत्वाचं आहे. काय पापं आहेत आपली ! पूर्वीची काय घडलेली आहेत? त्याच फळ आपल्याला केव्हा मिळायला लागणार आहे? हे सगळं त्यांना आणखी कळायचं. तर यांनी आपल्या शिष्यांना सांगायला सुरूवात केली, की, माझी अनेक जन्माची पातकं तपःश्चर्येनी आजपर्यंत सगळी पुष्कळ नष्ट झालीत म्हणाले, पण कांही शिल्लक राहिलेली आहेत, आणि त्या पापाचं फळ मला या ठिकाणी भोगलंच पाहिजे, म्हणाले ! काय आहे त्याचं फळ? तर म्हणाले, मी, कुष्ठरोग माझ्या शरीराला होणार आहे, मी आंधळा होणार आहे, सगळ्या शरीरातून रक्त, पू वगैरे सगळं वाहणार आहे– हे माझ्या पापाचं केव्हा कोणच्या जन्मात झालेलं आहे, त्याचं फळ हे आहे म्हणाले. केलेलं कर्म मनुष्य विसरून जातो. आम्ही विसरून जातो. पाप असो. पुण्य विसरलं पाहीजे, पण आम्ही पाप विसरतो आणि पुण्य मात्र लक्षात ठेवतो– जाहीर करतो की, मी इतकं दान केलेलं आहे, मी इतकी वारी केलेली आहे, मी इतक्या तीर्थयात्रा केल्या हे जाहीर करतो – जाहीर केलं की पुण्य गेलं – संपलं ––

'धर्मः क्षरति कीर्तनात् ।'–– आपण स्वतः तोंडांनी जर आपलं पुण्य सांगितलं की ते संपलं. तसंच पापाचंही आहे, तोंडानी, 'मी इतकं पाप केलेलं आहे – मी अमक्याला बोललेलो आहे – अमक्याला मारलेलं आहे– अमुक एक चोरी केलेली आहे' – तोंडाने जर सांगितलं, चार लोकांमधे, तर ते पापही नष्ट होतं. पण पाप सांगण्याचं धैर्य आमच्या जवळ नाहीये. ते फक्त एकाने केलेलं पाप, एकाने केलेले दोष, दुसऱ्याजवळ सांगण्याचं एवढं आम्ही काम करतो. पैशुन्य ज्याला म्हणतात–काय त्याचा उपयोग?

तर हे ऋषी सांगताहेत – 'अशी ही कर्म होऊन गेलेली असतात आमच्याकडून. त्याचा विचार आम्ही करत नाही,' म्हणाले. कोणच्या जन्मात कोणच्या वेळेला कोणच्या जीवाकडून केव्हा कोणची कर्म झालेली आहेत– बरोबर ते कर्म त्याच्याकडे येऊन पोंहचत. हजारो गायी निघालेल्या आहेत, रानामधे जाण्याकरता, आणि त्यांची वासरंही आली. तर इतक्या हजारो गायीमधे, ज्या गायीचं जे वासरू असेल ते वासरू त्या गायीकडेच बरोबर जातं– ते दुसऱ्या गायीकडे जात नाहीये. दुध प्यायचं असेल तर त्याच गायीकडे जातं. तर अनंत जरी जीवात्मे आहेत जगामधे– अनेक जीवांची अनेक कर्मे झालेली असतील, परंतु ज्या जीवाने केलेलं कर्म

त्याच्याकडेच बरोबर जातंय. ही ईश्वराची शक्ती आहे. ईश्वराने सृष्टी जी केलेली आहे – त्या सृष्टी करण्यामधे ही कर्मशक्ती जोडून दिलेली आहे. तुमची कर्म आणि तुम्ही. या दोघांचा संबंध इतका बेमालूम लावलेला आहे की तो कोणालाही टाळता येत नाही. कोणच्याही जन्मातली कर्म कोणत्या वेळेला येतील, सुरु होतील आणि त्याची शिक्षा कधी होईल ते सांगता येणार नाही. ईश्वराची शक्ती ही आहे. त्याने कर्माची शक्ती जीवांच्याकडे लावून दिलेली आहे.

वेदधर्मा ऋषी सांगताहेत, की, 'माझ्या कांही जन्माचं कर्म शिल्लक राहिलेलं आहे. त्या कर्माचं फळ म्हणजे असं भोगायचंय मला– हे दुःखं भोगायचंय –– पाप कर्म आहेत. त्या पापकर्माचं फळ मला भोगायचं आहे आणि ते कर्म भोगूनच संपणार आहे, तपानी जाणार नाही.' अशी कांही कर्म आहेत–– **उत्कट प्रारब्ध** ज्याला म्हणतात– पुष्कळ औषधं दिली. बाकीचे रोगी– तोच रोग झालेले रोगी, त्या औषधाने बरे होतात. हा मात्र बरा होत नाही. काय कारण आहे? याचं कारण काय सांगता येईल काय? औषध तेच आहे – औषध देणारा तोच आहे, परंतु एकाला त्याचा उपयोग होतो अन् दुसऱ्याला कां उपयोग होऊ नये? म्हणजे कांहीतरी आहे. प्रतिबंध आहे– आड आलेलं आहे. म्हणून कर्म मानतात–सज्जन लोक– शास्त्रकार–यांनी या कर्मशक्तीवरती आणखी हे विसंबून राहिलेले आहेत.

तेव्हा वेदधर्मा ऋषी सांगताहेत, की 'माझी कांही जन्माची कर्म अशी आहेत की, मला ते आणखी दुःख भोगलंच पाहिजे.' म्हणाले, 'कुष्ठरोग सगळ्या शरीराला होणार आहे– डोळे जाणार आहेत माझे, अशा वेळेला मला कुणाचा तरी आश्रय पाहिजे!' म्हणाले, 'कोण माझी सेवा करणार?' –– सगळे शिष्य होते तिथे बसलेले. ऐकून घेतलं सगळ्या शिष्यांनी. आपलं कांही तरी – विचार, काय हो ! एवढे मोठे आहेत, एवढ्या मोठयांना जर असं भोगावं लागतं– आमची काय अवस्था होणार? आणि आम्ही यांची काय सेवा करणार? वगैरे –– हळू हळू सगळे बाजूला झालेले आहेत. त्यात एक दीपक नांवाचा शिष्य होता– **संदीपक किंवा दीपक. अनेक जन्म संसिद्धः** म्हणतात. **ईश्वराची किंवा सद्गुरूंची भक्ती अनन्य भावाने करणं हे अनेक जन्माचं भाग्य असल्याशिवाय घडत नाहीये.**

तो दीपक उठून उभा राहिला – 'गुरू महाराज! तुमची दुःख मी भोगली तर चालतील की नाही? तुम्ही कुष्ठरोगी होणार– तुमच्या देहाला कुष्ठरोग होणार– तुमचे डोळे जाणार. हे सगळं माझ्याकडे सोपवा की !' म्हणे. 'माझे डोळे जाऊ देत. माझ्या शरीराला कुष्ठरोग होऊ देत– मी जाऊन राहतो काशीमधे– काय होईल ते होऊ देत !' –– ऐकून घेतलं वेदधर्मा ऋषींनी – 'नाही बाबा ! तसं नाही. कर्मशक्ती इतकी विलक्षण आहे की, ज्याने केलेलं कर्म त्यालाच भोगावं लागतं!'

एकः प्रसूयते जन्तुरेक एव प्रलीयते ।

एकोऽनुभुङ्क्ते सुकृतमेक एव च दुष्कृतम् ॥ (भा.१०.४९.२१)

जीवात्मा एकटाच जन्माला येतो. अक्रुरजींनी त्या धृतराष्ट्राला अुपदेश केलेला आहे की, 'धृतराष्ट्रा ! तुझ्या मुलांकडे तुझं जितकं लक्ष आहे, जितकं प्रेम आहे, तितकं पांडवांवरती प्रेम करायला शिक तू , तर तुझं कल्याण होईल' म्हणाले. आपल्या मुलांचं आणखी कल्याण व्हावं – आपल्या मुलाला राज्य व्हाव – पांडवांचा नाश व्हावा ही इच्छा चांगली नाहीये. जीव एकटाच जन्माला येतो– शेवटी एकट्यालाच त्याला जावं लागतं आणि त्यानी केलेलं कर्म त्याला एकट्यालाच भोगावं लागतं आहे, हा विचार तू कर आणि सर्व दोघाही कौरव–पांडवांबद्दल समबुद्धीनं वाग––पण त्याला कुठली बुद्धी होणार? शेवटी सगळा वंशक्षय करून घेतला त्यानी.

तर वेदधर्मा ऋषी सांगताहेत – आपल्या त्या संदीपकाला –– 'चांगल आहे !' म्हणाले– 'तुला वाटलं प्रेमामुळे – पण तसं नाही करता येणार!'–– ज्यांनी कर्तृत्व अभिमान धारण करून कर्म केलेले आहे, मी कर्ता आहे– माझ्या इच्छेप्रमाणे घडलं पाहिजे – **चांगलं कर्म किंवा वाईट कर्म. ही कर्म जी आहेत, त्याचं फल कां भोगावं लागत आहे? तर जीवात्म्याच्या बुद्धीमधे आणखी अहंकार आहे– जीव कर्ता आहे.**

तैसा कर्तृत्वाचा मद । .....(ज्ञानेश्वरी)

ज्ञानेश्वर महाराज सांगताहेत,

आणि कर्म फळाचा आस्वाद ।

या दोहींचें नांव बंध । कर्माचा कीं ॥.....(ज्ञानेश्वरी १८.२०५)

'कर्मबंधन असतं म्हणजे काय असतं?' म्हणाले – आमची बुद्धी – आमच्या बुद्धीनं आम्ही कर्मबंधन करून घेतो म्हणाले, मी कर्ता आहे– मी मोठा आहे–माझ्या इच्छेनं, माझ्या शक्तीनं सगळं झालेलं आहे! असा हा एक अहंकार मनामधे उत्पन्न होतो आणि त्यामुळे कर्म घडतं आणि मी कर्ता आहे हा अहंकार उत्पन्न झाला की, त्याचं फळ मला मिळालं पाहिजे. फलाशा–फलेच्छा ही त्याच्या पाठोपाठ येते. तेव्हा ही फलेच्छा आणि कर्तृत्व अभिमान हे दोन उत्पन्न झाल्यामुळे ती कर्म त्या जीवाला इतकी आणखी लागून राहिलेली आहेत, त्याचं फल त्याला भोगावचं लागतं. पुण्य केलं तरी जन्म घ्यायला पाहिजे– पाप केलं तरी जन्म घ्यायला पाहिजे. ध्रुवाने किती पुण्य केलं? अन्न नाही, पाणी नाही, आणखी पांच वर्षाच्या वयामध्ये राहून आणखी किती पुण्य केलेलं आहे? केवढी तपःश्चर्या केलेली आहे? भगवान प्रसन्न झाले आणि त्याला सांगितलं– 'तुझ्या करता आणखी ध्रुवपद निर्माण झालेलं आहे' म्हणाले– 'तिथं जाऊन राहा तू' वर मिळाला– सगळं झालं. आणखी मग पश्चाताप झाला ध्रुवाला – 'काय केलं?' म्हणाला 'मी हे?' देवाजवळ

अहो बत ममानात्म्यं मन्दभाग्यस्य पश्यत ।

भवच्छिदः पादमूलं गत्वायाचे यदन्तवत् ॥ (भा.४.९.३१)

संसार आणखी भेदून टाकणारा– संसारातून मुक्त करणारा परमात्मा, त्याच्या चरणाजवळ येऊन पोहोचलेला आहे, आणखी त्याच्याजवळ हे विनाशी एक स्थान मी मागून घेतलं– सर्व लोकांच्या उच्चभागी मला राहायला मिळालं पाहिजे. काय ही इच्छा – मला वासना निर्माण झाली ! आता जायलाच पाहिजे. आपणच केलेलं कर्म आहे ना ते ! ईश्वराला ते द्यावं लागेल, ते नाही कसं म्हणणार?

तेव्हा पुण्य असो किंवा पाप असो– जे कांही अभिमान कर्तृत्वबुद्धि धारण करून केलेलं आहे त्याच फळ भोगावंच लागंत म्हणाले बाबा! ते दुसरं कोणी भोगू शकत नाहीये. त्याकरता माझं मलाच भोगलं पाहिजे. हे दुःख मलाच आहे. मलाच कुष्ठरोग होणार मलाच, अंध मी होणार. तर म्हणाला, 'मी सेवा करतो तुमची, त्यानी सांगितल. काशी क्षेत्रामधे घेऊन जातो तुम्हाला' –अन् त्यांनी काळ किती सांगितला? ते म्हणाले, कुष्ठरोग होणार– अंध होणार मी– एकवीस वर्षेपर्यंत हा भोग आहे' म्हणाले– 'हा जो दुःख भोग आहे, तो एकवीस वर्षेपर्यंत भोगायचाय मला, म्हणजे या पापातून माझी मुक्तता झाली.'

तयार झाला तो संदीपक शिष्य – इतक्या हजारो शिष्यांमधे एक कां होईना, तो तयार झालेला आहे. त्याच्या अंतःकरणामधे सद्गुरूंच्या बद्दल अत्यंत आणखी श्रद्धा आहे, भक्ती आहे, प्रेम आहे, की, सद्गुरू हेच आणखी–

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः
गुरूःसाक्षात् परब्रह्म, तस्मै श्रीगुरवे नमः ॥ (गुरुगीता)

हा प्रसिद्ध श्लोक आहे. कितीतरी वेळा आपण म्हटलेला असेल. ऐकलेला असेल– पण काय त्याच एकंदर रहस्य आहे! त्याप्रमाणे आचरण आमच्याकडून घडत नाही. त्या दीपकाची भावना आणखी वेदधर्मा गुरूंच्या बद्दल अशी आहे. हेच ब्रह्मदेव, विष्णु, महेश्वर– आपले गुरू महाराज आहेत. म्हणजे ब्रह्मा–विष्णु–महेश्वर सृष्टि कर्ते आहेत, पण ते हेच आहेत. हे एकरूप आहेत. ते तीन रूपांनी कार्य करताहेत, परंतु हे त्रिमूर्ती म्हणजे साक्षात सद्गुरू महाराज आहेत– ही पहिली भूमिका त्याची अगदी घट्ट आहे, पक्की आहे आणि त्यामुळे सेवा करायला लागलेला आहे. सगळया त्रिमूर्तींची मला सेवा घडणार आहे– ही अंतःकरणामधे इच्छा आहे. भावना आहे, आणि अुत्साह मोठा आहे. सद्गुरू महाराजांची सेवा करायची आहे.

आले ! काशीक्षेत्रामधे आले, अन् एकदम त्यांच्या शरीराला तो कुष्ठरोग झाला. वेळ आली त्या कर्माचं फळ देण्याची, ते लगेच सुरू होतं, तिथं कांही विलंब लागत नाहीये. मग

ज्ञानी असो, योगी असो, कोणीही असो. राहिलेले आहेत दोघे गुरुशिष्य एका ठिकाणी. सेवा करतो आहे. अंगातून ते रक्त काय, पू काय, किडे झालेले आहेत अंगात. पाणी आणायचं– गंगाजल आणायचं– स्वच्छ करायचं– धुवायचं, चाललेलं आहे. सेवा रोज करतो आहे. आपल्या स्वतःच्या तहान, भुकेकडे लक्ष नाहीये ! गुरूमहाराजांना आणखी शुश्रुषा करून, सेवा करून त्यांचं दुःख कमी करण्याचा प्रयत्न करतो आहे बिचारा ! पण तो कर्मभोग आहे. कमी कसा होणार? असह्य दुःख होतं आहे, आणि दुपारच्या वेळेला जाऊन भिक्षा मागून आणायची– दुसऱ्याच्या घरी माधुकरी मागून. त्यांना जेवायला घालायचं.

तेव्हां ते पाप इतकं प्रबळ होतं, त्यामुळे ते जे वेदधर्मा ऋषी मोठे तपस्वी होते, पण यावेळी कांही त्यांच्या तपाचा उपयोग नाही–– आणि राग यायचा – 'काय ! म्हणाले 'काय, मला अगदी आशा काय दाखविलीस– तुमची सेवा मी करतो– काय विश्वासाने बोलला अन् इथं काय चालविलेस? म्हणाले, 'अंगावर माझ्या वस्त्र नाही हे सगळं आणखी रक्त– पू वगैरे कांही धूत नाही. कांही हे करत नाहीस !' वाटेल तसं बोलावं. इतकंच नाही – रागाच्या आवेशात त्याला मारावं सुद्धा त्यांनी. 'भूक लागली, माझ्या भुकेकडं तुझं लक्ष नाही' – भिक्षा मागून आणावी. 'काय!' म्हणाले, 'कसलं अन्न आणलेस हे ! कांही चांगले लाडू म्हणा चांगलं कांही जिलेबी कांही चांगलं पक्वान्न आणायला काय झालं?' तिथे विचार नाहीये ना आता. अशा स्थितीमधे मनुष्याला विचार राहत नाहीये. भिक्षा मागायला गेलेल्या माणसाने – 'मला लाडू वाढा आणि जिलेबी द्या' असं त्याला म्हणता येईल काय? जे झोळीमधे पडेल ते आणायला पाहिजे. पण हा विचार कुठाय ? ते अन्न तसंच टाकून द्यावं – थोडं कां आणलं?– पक्वान्न एखादं मिळावं– थोडंच आणलंस, जास्ती आणायला काय झालं? एखाद्या वेळेला केव्हातरी वाटलं, काय बाबा किती कष्ट करतोस माझ्याकरिता, इतकं, तुला अगदी झोप नाही, भूक नाही, तहान नाही माझ्याकरता आणखी फार तुला त्रास होतो, असेही एखाद्या वेळेला बोलावं– पण जास्तीत जास्त म्हणजे, अतिशय त्रास आहे त्या दीपकाला. परंतु, त्याने तिकडं लक्ष दिलं नाही. फक्त गुरूमहाराजांची सेवा करायची आहे, आपल्याला. आचार्य देवो भव – आचार्योपासना – हे ज्ञान आहे.

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।

एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥ ... (भ.गी. १३.११)

आचार्य सेवेनं ज्ञान मिळणार नाही– आचार्यसेवा सुरू झालेली आहे, तेच ज्ञान आहे, दुसरं ज्ञान नाही म्हणतात– भगवान ! –– चालू आहे सेवा. त्यांच्या बोलण्याकडं लक्ष नाही. मारलं तरी सुद्धा कांही नाही– अखंड आणखी, सगळे विकार, सगळं मन ताब्यामधे आहे. सगळी इंद्रिये ताब्यामधे आहेत– देह ताब्यामधे आहे. स्वतःला भूक लागली, तहान लागली– सगळं ताब्यामधे आहे– कशानी आहे– एक गुरूसेवा हेच ध्येय डोळ्यापुढं

ठेवलेले आहे, या सद्गुरूंची सेवा करायची आहे, त्याच्याकरता हा मानव जन्म आपल्याला मिळालेला आहे, हे भगवंतांचं हे स्वरूप आहे. हे गुरूमहाराज म्हणजे साक्षात भगवान आहेत, ही भावना आहे. त्यामुळे कार्य आहे, स्वतःच्या सुखदुःखाची पर्वाच नाहीये.

'सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ'

ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥ **... (भ.गी. २.३८)**

कांहीतरी असं ध्येय असलं म्हणजे असं होऊ शकतं. व्यवहारामधे हा उपदेश आपल्याला पटणार नाहीये आणि आपल्याकडून कोणालाही सुखदुःख समान मानावे – दुःख आलं तरी हरकत नाही– **'ठेविले अनंते तैसेची रहावे'** –– पुष्कळ उपदेश केलेत संतांनी – पण हे आपल्याला कुठं झेपणारं नाहीये ना ! आमची बुद्धीच तितक्या मार्गापर्यंत जाऊ शकत नाहीये.

पण हा महात्मा, दीपक – 'आचार्य हे आपले देव आहेत– साक्षात् परमेश्वराची सेवा आपल्याला घडती आहे'– ही आणखी श्रद्धा आहे, भावना आहे, आणि सेवा चालू आहे.

विश्वनाथ जे होते– काशी क्षेत्र म्हणजे विश्वनाथांची नगरी आहे. ती. **''मोक्षपुरी''** ती आहे. मृत्यूच्या वेळेला स्वतः विश्वनाथ तारकमंत्राचा उपदेश करतात. त्या जीवाला ज्ञान होतं आणि तो मुक्त होतो.

दर्शनादभ्रसदसि जननात्कमलालये ।

काश्यां तु मरणान्मुक्तिः *स्मरणादरुणाचले* **॥१॥ (श्रीअरुणाचलाष्टकम्)**

म्हणतात. काशीक्षेत्रामधे जर मृत्यू आला तर मुक्ती प्राप्त होती. पण मृत्यू येणं हे सुद्धा भाग्य आहे. काशी क्षेत्रामधे आता शेवटपर्यंत राहायच असं ठरवून कांही मंडळी गेलेली असतात. मृत्यू आला की शेवटी आपल्याला उपदेश होईल आणि आपण मुक्त होऊ – पण त्या मृत्यूच्या अगोदरच कांही चार–दोन दिवस कांहीतरी काम निघतं म्हणा किंवा यांच्याच मनाला वाटतं की, आपण चार दिवस जाऊन येऊ – घरी जाऊन येऊ – नंतर येऊन राहू आपण. घरी गेलं की त्यांचा मृत्यू इकडंच ठरलेला असतो. काशीमधे मरण यायचं म्हणजे इच्छेप्रमाणे येत नाही म्हणे मरण– काशीतून मरणाच्या वेळेला निघाले अन् दुसरीकडे जाऊन मृत्यू येतो ! अशी स्थिती येते.

तर असं ते क्षेत्रं – मोक्षपुरी आहे–भगवान विश्वनाथांचं वास्तव्य त्या ठिकाणी आहे. परंतु हा जो दीपक होता–गुरूसेवेमधे इतका तल्लीन झालेला आहे की तो कधी आणखी गेलेला नाही.

सद्गुरूंची सेवा करावी म्हणून ज्ञानेश्वर महाराजांनी सुद्धा सांगितलेलं आहे.

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् ।

ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥ **(भ.गी.१७.१४)**

गुरूसेवा, गुरूपूजन म्हणजे काय, गुरू शब्दाचे दोन अर्थ ज्ञानेश्वर महाराजांनी केलेले आहेत.

सकळ तीर्थांचिये धुरे । जियें कां मातापितरें ।
तयां सेवेसि कीर शरीरें । लोण कीजे ॥ **(ज्ञाने. १७.२०७)**

माता पितरांची सेवा म्हणजे गुरूसेवा आहे म्हणतात. माता-पितरांची सेवा पुंडलिकांनी केलेली आहे. पांडुरंग भेटायला आलेले आहेत, पुंडलिकाच्या भेटीकरिता आलेले आहेत, परब्रह्म साक्षात् ! पुंडलिकांनी सांगितलं, माझ्या देवाची पूजा सध्या मी करतो आहे, म्हणाले. माझ्या देवाची पूजा झाल्यानंतर मग तुम्हाला भेटायला येईन मी. तुम्हाला सवड असेल तर उभा राहा म्हणाले. त्याचे देव म्हणजे माता-पिता हे आहेत. घरात माता-पित्यांची सेवा.....देवळात जावं लागत नाही, देवाचं दर्शन व्हावं म्हणून देवाची प्रार्थना करावी लागत नाही त्यांना. हे एक गुरू आहेत गुरूंचे एक स्वरूप ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितले आहे.

आणि दुसरे म्हणजे साक्षात ज्ञानी आणि

आणि संसाराऐसा दारुण । जो भेटलाचि हरी शीण ।
तो ज्ञानदानीं सकरुण । भजिजे गुरु ॥ ... (ज्ञाने. १७.२०८)

''ज्ञानदान करणारे जे महात्मे आहेत त्यांची भेट झाल्याबरोबर **आपणासारिखे करिती तात्काळ.** कांही वेळ लागत नाही.'' अशा सद्गुरूंची सेवा, ही घडणं, त्याचप्रमाणे बुद्धी स्थिर राहणं, निर्विकार मन रहाणं हे अतिशय भाग्याचं लक्षण आहे. तेव्हा ती गुरूसेवा करणारा हा संदीपक काशीक्षेत्रामधे राहिलेला आहे. पण विश्वनाथाच्या दर्शनाकरता एक दिवससुद्धा जायला त्याला सवड मिळाली नाही. काशीमधे राहून विश्वनाथाचं दर्शन नाहीये, काय बरं आहे हे. चांगलं झालं का? किती लांबून लोक जातात, काशीमधे जातात. विश्वनाथाच्या मंदिरात जातात, दर्शन करतात, पूजा करतात. त्या आणखी क्षेत्राची देवताच विश्वनाथ असताना त्या देवतेचं सुद्धा दर्शन नाही. नाही. देवतेचं दर्शन नाही म्हणजे काय, ऐषआरामात पडलाय काय तो? खाण्या पिण्यात किंवा देवाला विसरला नाही. **विश्वनाथ म्हणजे साक्षात गुरू महाराज आहेत इथेच सगळं विश्वनाथाचं दर्शन आहे,** सर्व देवतांचे दर्शन रोज त्याला त्या ठिकाणीच होत आहे. एकही दिवस विश्वनाथांच्या दर्शनाला गेलेला नाहीये. गंगा-स्नान करायचं, गुरूमहाराजांची सेवा करायची, अंग सगळं पुसायचं, धुवायचं, माधुकरी मागुन आणायची, त्यांना जेवायला घालायचं, त्यांची बोलणी ऐकायची, मारलं तरी मार खायचा, सगळं चाललेलच आहे. पण प्रशांत मन आहे. सेवा अखंड चालली. सेवा म्हणजे फारच कठिण आहे आणि आजारी माणसाची सेवा तर फारच कठिण आहे. सगळं सहन करावं लागतं. परिचारक जो

आहे, सर्व सहन करणारा असला तर ठीक नाही तर त्या आजारी माणसाचं कठिणच आहे फार. घ्या तुम्हाला औषध घ्यायचं असलं तर घ्या. नाहीतर; जा. मरा. तो कशाला थांबतोय. तर इथे अशी सेवा चाललेली आहे. विश्वनाथांच्या मंदिरात कधीही गेलेला नाहीये. विश्वनाथांना आनंद झाला. काय मोठा गुरू सेवक आहे म्हणाले,

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः

नुसता म्हणत नाही तो श्लोक, त्याचप्रमाणे वागणं आहे, महेश्वर हे साक्षात गुरुमहाराज आहेत ही बुद्धी असल्यामुळे विश्वनाथाला त्याची पूजा पोचलेली आहे. सेवा पोचलेली आहे, दर्शनाला आला नाही म्हणून काय त्याला रागवले नाहीत. उलट त्यांना आनंद झाला आणि एके दिवशी हा दीपक, त्यांना आत झोप लागली होती वाटतं गुरूमहाराजांना म्हणा, ते पडले होते. हा बाहेर थोडा बसला असताना विश्वनाथ येऊन उभे राहिले.

'कर्पूरगौरं करूणावतारं'

ती गुरुमूर्ती साक्षात्.....

आणि रुद्राक्षमाळा घातलेल्या आहेत.

ॐ विशुद्धज्ञानदेहाय त्रिवेदीदिव्यचक्षुषे ।

श्रेयःप्राप्तिनिमित्ताय नमः सोमार्धधारिणे ॥ (सप्तशती-कीलक्-१)

चंद्रकला आणखी मस्तकावरती आहे, गंगा आहे एका जटेमध्ये. नमस्कार केला दीपकानी आणि-

या महाराज, काय, कशाकरता आगमन झालं? विश्वनाथ म्हणाले दीपका, तू आज इतकी वर्षे इथं राहिला आहेस म्हणाले, ते आम्ही पाहतो आहो. तुझी सेवा, खरोखर फार चांगली सेवा करतोस तू, तेव्हा तुला कांहीतरी वर द्यावा म्हणून मी आलोय म्हणाले. काय पाहिजे तुला ? मागून घे म्हणाले. तुला दुःखातून मुक्त करायचं आहे मला. म्हणून मुद्दाम आलो म्हणाले. एकही दिवस विश्वनाथाच्या दर्शनालासुद्धा जो गेला नाही, त्याला विश्वनाथ येऊन सांगताहेत की मुद्दाम तुला दर्शनाकरता, वर देण्याकरता, आलो म्हणाले. ऐकून घेतलं त्या दीपकाने. सांगितलं, महाराज, आमच्या गुरुमहाराजांची काय इच्छा आहे ती मी एकदा पाहतो म्हणाले, काय मला एवढच वाईट वाटतय की त्यांना फार क्लेष होतायत. अतिशय दुःख आहे, त्या दुःखातून आमचे गुरुमहाराज मोकळे व्हावेत एवढेच वाटते मला मनाला. पण ते त्यांना पसंत असलं तर मी आपल्याला येऊन सांगतो. ते जर नाही म्हणाले तर मी तुमच्या जवळ कांहीही मागणार नाही. अगोदरच सांगून ठेवलं. गेला आंत. जागे होतेच ते. त्यांना सगळं समजलं. काय रे, म्हणाले, काय चाललंय, कोण आलंय बाहेर ? तो म्हणाला, महाराज, ते विश्वनाथ आलेले आहेत. ते

म्हणाले ''वर देण्याकरता आलो'' म्हणताहेत. मग मी त्यांच्याजवळ मागू कां म्हणाले तुमची या सगळ्या दुःखातून मुक्तता, कुष्ठरोग जावा, पुन्हा तुम्हाला डोळे यावेत हे मागून घेऊ कां मी? आता त्यांच्या स्वभावाप्रमाणे ते बोलले, 'कां'? म्हणाले तुला काय, सेवा करायचा कंटाळा आलाय काय?' म्हणाले. ''ही आपली सबब सांगतोस तू. विश्वनाथ आलेले आहेत आणि त्यांना वर मागून तू सेवा सोडून जाणार काय?'' ''नाही महाराज तशी इच्छा नाही. आपले क्लेशच मला पाहवत नाहीत, म्हणून मी मागणार आहे.'' नाही, तो आमचा भोग आहे म्हणाले. 'तेव्हा ही आमची इच्छा नाही, तुला वाटेल ते कर म्हणाले.' आला बाहेर आणि विश्वनाथांना सांगितलं. 'महाराज, गुरूमहाराजांची इच्छा नाही, मला कांही मागायचं नाही. मी आपल नमस्कार करतो, क्षमा करा, आपण आले तसे जायला हरकत नाही.' त्यांनाही आश्चर्य वाटलेले आहे. कितीही हजारो वर्षे तपश्चर्या करतात, देवाचं दर्शन व्हावं, विश्वनाथाची कृपा व्हावी, ज्ञान मिळावं किंवा कांही भोग मिळावे सगळं वाटतं आणि अशा अनेक प्रकारच्या इच्छा असतात माणसांच्या. ज्याला मी होऊन आणखी त्याला वर देण्याला गेलो तर हा म्हणतो, मला जरूर नाही वराची. सगळी देव मंडळी मोक्षमंडपामधे बसलेली, सगळ्या देवामध्ये जाऊन हे सांगितलं की मोठा गुरूभक्त आलाय म्हणाले. असा गुरूभक्त मला पाहायला आजपर्यंत मिळालेला नाही. वाटलं की त्याला द्यावं, **तो मुक्तीचा अधिकारी आहे म्हणाले. तत्त्वज्ञान, सगळं त्याला मिळेल,** पण तो म्हणतो मला कांही नको आहे. असा एकही आणखी सेवक आजपर्यंत दृष्टीला पडला नाही, कांही घेत नाही म्हणाले. कांही नाही. मग महाविष्णूंनी ते ऐकलं. महाविष्णू स्वतः त्या दीपकाजवळ आले. काय बाबा दीपका, विश्वनाथ तुझ्याकडे आलेले होते. वर देण्याकरिता, अन् तू कांही नको म्हणालास. त्या दीपकाने सांगितलं, भगवंताला, की देवा म्हणाले तुम्ही काय देणार म्हणाले आम्हाला? तत्त्वज्ञान सद्गुरू महाराजांच्या कृपेने तत्त्वज्ञान होणार आहे म्हणाले. **एकंदरीत ईश्वरस्वरूप जे आहे त्या ईश्वरस्वरूपाचं ज्ञान म्हणजे,**

सकलमिदं च वासुदेवः ।

तेव्हा, हे ज्ञान गुरुमहाराज देण्याला समर्थ नाहीत कां? त्यांच्या जवळ त्यांची मी सेवा करत असताना तुम्ही कां येता वारंवार? म्हणाले. ते विश्वनाथ आले, त्यांनी तुम्हाला पाठवलं वाटतं ! म्हणाले. तुमच्याजवळ जे मागायचं किंवा जे मिळायचं, ते आमचे गुरुमहाराज द्यायला समर्थ असताना कशाकरता तुमच्याकड मागायचं? काय माग, काय वाटेल ते, तो प्रश्नच त्यांनी काढून टाकला. काय कशाकरता मागायचं म्हणाले, देवाची सेवा कशाकरता करायची. याचा अर्थ देव निराळे असा तो समजत होता असा अर्थ नाहीये. पण व्यवहार दृष्टीनं त्यानी सगळे देव म्हणा, सगळे एकत्र मानलेले आहेत. **सगळे देव म्हणजे सद्गुरूमहाराज आहेत. देवीची पूजा केली म्हणजे सगळया देवांची पूजा होते असं आहे की नाही देवीच्या उपासनेमधे. सर्व**

देवांच्या शरीरातून तेज निर्माण झालं आणि ते एकत्रित झालं म्हणून महिषासुरमर्दिनी निर्माण झाली. त्या महिषासूर मर्दिनी, सर्व देवींची पूजा करणारा जो देवीभक्त आहे त्याने जर असं मनामधे आणलं की सगळ्या देवांची पूजा मी करतो आहे. कोणत्याही देवाला जायची जरूर नाही. कांही चूक आहे ? तो कांही भेद दृष्टीचा आहे कां? सर्व देव एकत्रीत होऊनच महिषासुरमर्दिनी तयार झालेली आहे. तेव्हा या भावनेनं जर तो करत असेल तर त्याला सगळ्या देवांची पूजा घडतीच आहे. तो कांही देवांचा द्रोह करत नाहीये. हे देव आणखी कमी आणि देवी तेवढी श्रेष्ठ असं समजत नाहीये तो. त्याप्रमाणे हा जो दीपक आहे, हा असं समजतो, भगवान विष्णूंना तो म्हणाला, की सद्गुरू महाराज आमचे सर्व समर्थ आहेत. सर्व देवस्वरूप आहेत म्हणाले,

ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते ।

एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् । *... (भ.गी. ९.१५)*

उपासनेच्या ज्या अनेक पद्धती आहेत, एकनिष्ठ पद्धति, त्या एकरूप मानणं, हे एकस्वरूप म्हणजेच सर्वदेवस्वरूप आहे. तेव्हा गुरुमहाराज देणारे आहेत. मला कांहीही इच्छा नाही. तुमची सेवा नाही, तुमचे नामस्मरण नाही कांहीही नाही. तुम्ही मला भेटायला कशाकरिता आला म्हणाले? **विष्णुंनी सांगितलं, बाबा व्यक्तिशः जरी विष्णू म्हणा किंवा विश्वनाथ म्हणून आणखी तू जरी सेवा केली नाहीस तरी सर्वही आमचे अंश ज्या ठिकाणी आहेत, त्यांची सेवा करणारा जो आहे तो आमचीच सेवा करतो आहे.** पतीची सेवा करणारी पतिव्रता स्त्री, आमचीच सेवा करती आहे. हरिभावनेनं, परमात्म भावनेने, पतिची सेवा ती करते आहे, तिला हरिची पूजा, हरिची सेवा घडती आहे म्हणाले. विश्वनाथाची सेवा ती करतीच आहे, तिला कांही काशीयात्रेला जायला पाहिजे असं नाही. सज्जनांची सेवा करणारा, आणखी, अशा रीतीने जे जे आहेत ते सगळी आमची सेवा करणारे, सत्कर्म करणारे, ते आमची सेवा करणारेच आहेत. केवळ धर्मानुष्ठान करणारा जो आहे ती आमचीच सेवा आहे, **ईश्वराची आज्ञा आहे ना, 'सत्कर्मयोगे वय घालवावे' ही देवाची आज्ञा आहे.** तेव्हा सत्कर्म करण्याकडे ज्याचं लक्ष आहे, फक्त कर्मयोगी आहे, उपासना नाही, कांही नाही, ज्ञान नाही, तरीसुद्धा ती देवाची सेवा आहे. **ती दास्यभक्ती आहे. ईश्वराच्या आज्ञेचं पालन तो करतो आहे ना, धर्माचरण करणं म्हणजे, म्हणजे ही सुद्धा दास्यभक्ती आहे. आज्ञापालन करणं ही दास्यभक्ती आहे.** तेव्हा अशा रीतीने आमची सेवा ही विविधरूपांनी चालू आहे म्हणाले. प्रत्यक्ष आमची सेवा केली पाहिजे असं नाही. तेव्हा सद्गुरूमहाराजांची तू सेवा करतो आहेस, आमची सेवा झालेली आहे. आम्हाला संतोष आहे. निदान म्हणाले, 'आमच्या समाधानाकरता तरी कांही मागून घे.' इथपर्यंत ते आले आहेत. हा म्हणाला, मला कांही जरूर नाही. पण ते सांगताहेत, 'विश्वनाथ येऊन गेले. त्यांनाही पाठीमाग

लावून दिलंस तू. आता मी आलो म्हणाले. आमच्या मनाच्या समाधानाकरिता तरी आता कांही मागून घे.' मग त्यांनी सांगितलं, भगवंताला की, 'देवा, तुमचा तर आग्रह आहे, मागू मी?' तर त्यांनी एवढच सांगितलं, 'महाराज, माझ्याकडून जी गुरूभक्ती किंवा गुरूसेवा होते आहे, ती जास्तीत जास्त व्हावी माझ्याकडून सेवा, हा मला वर द्या.' काय, विलक्षण बुद्धी आहे ! निर्वासन अंतःकरण आहे, ज्ञानाची, भक्ती, सगळी योग्यता आहे. आणखी ज्ञान-ज्ञान म्हणजे काय आहे?

दीपक म्हणे विष्णूसी जरी वर आम्हां देसी ।

गुरूभक्ति होय अधिक मानसी । अैसे ज्ञान आणिक द्यावे ॥...(गु. च. २.२५०)

माझ्या हातून यापेक्षा अधिक गुरूभक्ती व्हावी, गुरूसेवा जास्ती घडावी म्हणजे स्वतःकडून होणारी भक्ती किंवा आणखी धर्माचरण हे कमीच आहे असं समजलं पाहिजे. कर्तृत्व, अभिमान ज्याचा दूर झालेला आहे त्याला ही बुद्धी उत्पन्न होईल. माझ्या हातून इतकं झालय. इतकं तरी करणारं कोण आहे. देवाची भक्ती इतकी तरी कोणी केलेली आहे किंवा कोण करतोय? मीच मोठा आहे, असा अभिमान जास्ती वाटतो आहे. परंतु दीपकाच्या अंतःकरणामधे अशी वृत्ती आहे की मला अजून सेवा घडली पाहिजे, कमीच सेवा माझ्या हातून होते आहे. तेव्हा मला जास्तीत जास्त गुरूसेवा घडावी अशी माझी मनोवृत्ती आपण द्याल कां ? मला अशी बुद्धी द्या, महाविष्णूना पाया पडून तो म्हणाला. संतुष्ट झाले. त्यांनी सांगितलं बाबा, तू आता माग किंवा न माग, मला तुला द्यायचंय. सर्व सिद्धी तुला प्राप्त होतील, सर्व भुक्ति-मुक्ती सगळंही तुला मिळेल. तू आणखी सर्वांचा उद्धार करणारा होशील, स्मृर्तगामी - स्मरण केल्याबरोबर आणि सर्वांचं कल्याण करण्याचं सामर्थ्य तुझ्या ठिकाणी उत्पन्न होईल. न मागताना त्यांच्या मुखातून ते सगळे वर बाहेर पडले. तू नाही मागितलंस तरी आम्हाला द्यायचंय म्हणाले.

नमस्कार केला महाविष्णुंना आणि ते गेले. हा आलेला आहे आंत. गुरूमहाराजांना वंदन केलं. कांरे म्हणाले, 'काय महाविष्णूंच्या जवळ काय मागून घेतलस ?' 'कांही नाही महाराज. फक्त आपली सेवा जास्ती घडावी, माझ्या हातून होत नाही म्हणाले. आपल्याला कष्ट पडतात, आपले कष्ट मी दूर करू शकत नाही. माझं दुर्दैव आहे. तेव्हा देवांनी माझ्या दुर्दैवाची सुधारणा करावी. जास्ती सेवा माझ्या हातून घडावी एवढंच मागून घेतलं' म्हणाले. संतुष्ट झाले वेदधर्मा ऋषी ! सगळं कुष्ठरोग नाही, आंधळेपणाही नाही. सगळे पुन्हा खडखडीत बरे झाले आणि सगळे वर त्यांनी त्याला दिले.

'तू चिदानंद होशील, तू मुक्त होशील, तू संसार बंधनातून तू मुक्त झालेला आहेस. तुझ्या कृपेने अनेक जीवांचा उद्धार होईल' असं गुरूमहाराजांनी त्याला सांगितलं. त्याला आणखी शिक्षणातलं सगळं ज्ञान मिळालेलं आहे. काशी प्रभाव काय असतो म्हणून सिद्धांनी

नामधारकाला ही कथा सांगितली. ही गुरूची सेवा करण्याची बुद्धी इतकी दृढ पाहिजे, म्हणाले, म्हणजे गुरूकृपा होईल.

काशीक्षेत्राचा प्रभाव कसा आहे, तो हा सगळया लोकांना समजण्याकरता वेदधर्माऋषींनी कुष्ठरोग त्यांनी घेतला, मुद्दाम घेतला. एवढा मोठा रोग तो बरा झाला.

काशीप्रभावमादेषुं शिष्यभावं परीक्षितुम् ।
वेदधर्माऽभवत्कुष्ठी पापशङ्का कुतो मुनेः ॥...(द्विसाहस्त्री २.५९)

वेदधर्मा हे कुष्ठी कां झाले? शिष्याचा भाव कसा आहे, खरा शिष्य आहे, सेवा खरी करणारा आहे. कां आपल्याला झेपेल तेवढी करणारा आहे? होईल तेवढी सेवा करू आपण, असं नाही. प्राण गेला तरी हरकत नाही. **''देह जावो अथवा राहो. पांडुरंगी दृढ भावो''** – म्हणतात – नामदेवराय आणि आणखी तसा भाव पाहिजे. देहाकडे लक्ष नाहीये. हा पूर्ण त्याची परीक्षा घेण्याकरिता म्हणून आणि वेदधर्मा महर्षि हे कुष्ठी झाले. त्यांना कुठलं पाप? वेदधर्माऋषी सारख्या ज्ञानी महात्म्याला पाप राहील कसं? त्यांनी आपलं हे सांगितलं, शिष्याची परीक्षा केलेली आहे.

अशा रीतीने, ब्रह्मदेवांनी ही कथा कलीला सांगितली आहे, मुद्दाम ! असे अधिकारी गुरु भक्त महात्मे, तुझ्याही काळात आहेत म्हणाले. तू सावध रहा, त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न करू नकोस तू. तुझ्या आधीन होणारे पुष्कळ सापडतील तुला. आणखी त्यांचं शेवटी नुकसानच होणार आहे. परंतु असे श्रेष्ठ गुरू–भक्त जे आहेत, तेही तुझ्या काळामधे आहेत, होतील, आणि तू त्यांना त्रास देऊ शकणार नाहीस हे ही त्यांनी सांगितलेलं आहे. तेव्हा सिद्धांनी, नामधारकाला आणि ही कथा सांगितलेली आहे.

हे गुरू–भक्तीचं माहात्म्य सांगून सद्गुरू अवतार जो झालेला आहे दत्तात्रेय, सद्गुरू स्वरूप काय आहे म्हणजे ईश्वराचेच दुसरं रूप आहे. ज्ञानशक्ती पूर्ण आहे, क्रियाशक्ती, इच्छा शक्ती त्या तर आहेतच आहेत. परंतु क्रिया शक्ती, इच्छा शक्ती यांचा वापर, नियामक शक्तिचा वापर ईश्वर स्वरूपामधे अधिक आहे. तुमच हे कर्म, त्या कर्माचं हे फळ, एवढं सांगून तर ईश्वर मोकळा होतो.

दुरुस्ती करायची कर्मामधे किंवा काय आहे ते सगळं कार्य म्हणजे हे सद्गुरू मुर्तीच कार्य आहे. तीहि ईश्वराचीच मूर्ती आहे. म्हणून ते गुरूमाहात्म्य, वेदधर्मा आणखी दीपक यांच्या कथेच्या रूपाने आणखी सांगितलं ब्रह्मदेवाने.

ईश्वराचे अवतार जे झालेले आहेत त्या अवतारांचं आता कारण सांगताहेत. कशाकरता अवतार झाले आहेत. हा एक कथाभाग राहिलेला आहे.

अंबरीष राजाची कथा सांगताहेत. अंबरीष राजाची कथा भागवतामधे सुद्धा आलेली आहे ती थोडी निराळी आहे. इथे ती एक निराळी आहे कथा थोडी. हा अंबरीष राजा मोठा भगवद्भक्त आहे. आणखी मोठा धर्मशील राजा आहे. ईश्वराची भक्ती करायची, पण धर्माचरण सुद्धा ईश्वराची आज्ञा म्हणून करायचं आहे. द्रौपदी मोठी कृष्णभक्त होती. त्या कृष्णभक्तीचा प्रभाव तिने दोन वेळा दाखविलेला आहे. द्रौपदीची विटंबना करण्याकरिता तिला सभेमधे आणलेलं आहे. दुःशासन तिचे आणखी वस्त्र काढायला लागलेला आहे. समोर पांच पती पांडव बसलेले आहेत, पराक्रमी आहेत. भीष्म, द्रोणासारखे ज्ञानी महात्मे, वृद्ध, ही मंडळीही स्वस्थ बसलेली आहे, आणि दुःशासन पदर धरून ओढतो आहे अशा वेळेला कोणीही रक्षण करणारं नाही. काय करायचं? जो तो आपला स्वस्थ. काय निर्णय द्यायचा म्हणाले, हे योग्य आहे, अयोग्य आहे हे सुद्धा कोणी सांगेनात. मग तिने आपला देवाकडे धावा केलेला आहे.

गोविन्द द्वारकावासिन् कृष्ण गोपीजनप्रिय ।
कौरवैः परिभूतां मां किं न जानासि केशव ।
हे नाथ हे रमानाथ व्रजनाथर्तिनाशन ।
कौरवार्णवमग्नां मामुद्धरस्व जनार्दन ॥ **(महाभारत-सभापर्व अध्याय ६८)**

हे गोविंदा, द्वारकावासी गोविंदा, या कौरवांच्या संकटातून मला बाबा तू मुक्त कर, अशी प्रार्थना केल्याबरोबर भगवान तिथे आलेले आहेत. **आपल्या स्वतःचा उद्धार द्रौपदीने स्वतः करून घेतलेला आहे.** वस्त्र निर्माण झालेली आहेत, नवीन वस्त्रं. महाभारतामधे सगळा उल्लेख त्यांनी केलेला आहे. चमत्कार चमत्कार जो आहे तो चमत्कार ''ईश्वर नेहमी जवळच आहे.'' सर्वत्र आहे, पण तो जो भक्त आहे त्याच्या अंतःकरणाची जी निष्ठा आहे, त्या निष्ठेने आपोआप चमत्कार घडून येतात. त्यात कांही करावं लागत नाही. त्यावेळेला एक स्वतःची आणखी एक सुटका द्रौपदीनं करून घेतली.

दुसरी एक महाभारतामधे कथा आलेली आहे, की द्रौपदीचे जेवण झाल्यानंतर, त्या दुर्योधनाने दुर्वास ऋषींना प्रार्थना केली, द्रौपदीचं जेवण झाल्यानंतर तिच्या आश्रमामधे तुम्ही चला आणि जेवायला पाहिजे म्हणून सांगा. नुकतच १०-११ वाजायचा समय, रात्रीची वेळ, कोणी आता येणार नाही म्हणून द्रौपदीने चार घास खाल्ले आणि ते थाली, सूर्याने दिलेले पात्र घासून पालथं घातलं, आले हे दुर्वास ऋषी. जेवायचे म्हणाले. धर्मराजाला सांगितले. आमच्याबरोबर इतके दहा हजार शिष्य आहेत. आता कुठलं घालायचं अन्न? सूर्योदय दुसरे दिवशी झाल्यानंतर पुन्हा अन्न मिळायला सुरूवात होणार. आत्ता द्रौपदी जर जेवली नसती तर आत्ताही अन्न तयार होतं पण नुकतच जेवण झालेलं आहे. धर्मराज जरी धर्मनिष्ठ असले तरी काय करणार, आणि दुर्वास ऋषींशी गांठ आहे ! मग द्रौपदीनं आणखी भगवान गोपाळकृष्णांना

बोलावलेलं आहे. आले गोपाळकृष्ण. काय म्हणाले कशाकरता बोलावलं द्रौपदी? ''अहो ! म्हणाले, 'असं संकट आलेलं आहे देवा, दुर्वासऋषी आलेले आहेत, माझं जेवण झालेलं आहे.' 'ती थाळी घेऊन ये' भगवान म्हणाले, 'अहो, घासून ठेवली आहे.' 'बघू या तरी !' त्याला एक भाजीचं पान लागलं होतं म्हणाले. तेवढंच भक्षण केलं आणि तृप्त झाले भगवान. तिकडे ते ऋषीही तृप्त झाले. निघून गेले ती कथा प्रसिद्ध आहे.

या वेळेला, धर्मराजाच्या धर्मानी संरक्षण केलं, कां द्रौपदीच्या भक्तीने रक्षण केलं? तर द्रौपदीची सुद्धा मोठी भक्ती आहे, पण धर्माचरणही तसंच आहे. दोन्ही आहे. जेवण नाही, रात्री ११-११-१२-१२ वाजेपर्यंत देहाकडे लक्ष नाहीये, **ज्याला धर्माचरण करायचय, धर्मच आपल्याला जितक आपल्यासाठी पुण्य, जितकं आपल्या पदरी घेऊन जमा करता येईल, तितकं करायचं. पुण्य करून संपादन करायचय, ही तळमळ ज्याला लागून आहे त्याचं लक्ष देहाकडे जात नाही आणि देहाकडे ज्याचं लक्ष जात नाही त्यालाच धर्माचरण खरं घडतं,** भूक लागेपर्यंत सगळं करायचं, भूक लागली की मग कांही नाही. आधी पोटोबा आणि मग विठोबा होतो. अगोदर नाही विठोबा.

तशी स्थिती आहे. धर्मशील आहे द्रौपदी. आणखी मोठी भगवत्भक्त ही आहे. अंबरीष राजा ही तसाच आहे. चाललेली आहे सेवा भगवंताची आणि दुर्वास ऋषी एकदा आलेले आहेत. द्वादशी व्रत केलं होतं त्यांनी. भागवतातही कथा आहे ही. थोडासा निराळा प्रकार इथे आहे. इथे महाराजांनी थोड निराळ्या रीतीने सांगितलेलं आहे.

आलेले आहेत, आणखी द्वादशीव्रताचं पारणं करायचं आहे. दुर्वास ऋषी स्नान-बीन करून यायला वेळ लागणार. मग त्यांनी थोडं तीर्थ घेतलं आणि तीर्थ घेवूनच एकादशीचं पारणं केलं. दुर्वास ऋषी आले. त्यांनी पाहिलं. मला म्हणाले निमंत्रण तू केलंस -- आणि माझ्या अगोदर द्वादशी सोडलीस? आता कुणाचा राग कसा होईल तसा कांही नियम नाहीये. सगळी परीक्षेचीच वेळ आहे ही. अहो मी जेवलो नाही, असं काय याने सांगायचंय कां ? ऐकून घ्यायला तयार कुठे आहेत, दुर्वास ऋषी? म्हणून आता शाप देणार, अनेक जन्म तुला घ्यावे लागतील असं म्हणणार, इतक्यात महाविष्णू तिथे आले.

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति ।
कौन्तेय प्रतिजानीहि **न मे भक्तः प्रणश्यति । ... (भ.गी. ९.३१)**

थांबा, थांबा, ऋषी महाराज ! काय तुम्हाला शाप द्यायचा तो मला द्या. म्हणाले त्याला देऊ नका, भक्ताला. दुर्वास ऋषींनीही विचार केला, बरयं म्हणाले ! कांही हरकत नाही ! माझा शाप झाल्यानंतर तरी हे देव येतील की नाही भूमीवरती? अनेक जीव म्हणाले, किती दुःख भोगताहेत. प्रत्यक्ष देव जर अवतार घेऊन आले तर त्यांचा उद्धार सहज होईल. दुर्वास

ऋषींनी, रागानी शाप दिला असं या ठिकाणी आपल्याला वाटेल, पण नाहीये. विचार करूनच शाप दिलाय. अंबरीषाला देऊ नका म्हणाले, मला द्या, मी सगळं सोसायला तयार आहे. त्यांनी विचार केला, बरं झालं म्हणाले, माझ्या शापाला, माझा शाप मानून तरी देव येतील इथे, आणि सगळ्या जीवांचं कल्याण होईल. म्हणून त्यांनी आणखी त्यांना शाप दिलेला आहे. 'तुम्हालाही आणखी जन्म घ्यावे लागतील' म्हणाले. 'घेतो' म्हणाले मी. म्हणून दहा अवतार हे आणखी प्रसिद्ध झालेले आहेत. त्या दहा अवतारांचा कालही महाराजांनी या ठिकाणी दिलेला आहे.

चैत्रशुक्लतृतीयायामपराण्हे मत्स्यरूपेणावतीर्य वेदानुद्धृत्य मनुं ररक्ष ।

मत्स्यावतार म्हणजे चैत्र शुद्ध तृतीया. अपराण्ह काळी झालेला आहे. ४-५ वाजता. सर्व वेद जे राक्षसांनी नेलेले आहेत ते घेऊन त्या राक्षसांचा नाश करून त्या मनुचं रक्षण केलेलं आहे.

वैशाखपूर्णिमायां सायं कूर्मो भूत्वाऽमृतप्राप्तये स्वपृष्ठे मंदरं दधौ ।

कूर्मावताराचा काल म्हणजे वैशाख पौर्णिमेच्या दिवशी सायंकाळी झालेला आहे. देव आणि दैत्य हे समुद्राचे मंथन करीत होते, अमृत मिळण्याकरिता, आणि तो मंदार पर्वत घुसळण्याकरता आणला होता रवी म्हणून. आता त्या समुद्रामधे आंत जायला लागला तो, बुडायला लागला. सगळे श्रम आपण केलेले फुकट जाणार. देव-दैत्य खिन्न झाले म्हणून भगवान स्वतः कासवाचं रूप घेऊन आले खाली आणि आपल्या पाठीवरती तो पर्वत त्यांनी उचललेला आहे. मग देवदैत्यांनी ते कार्य पूर्ण केलं. वैशाख पौर्णिमेच्या दिवशी सायंकाळी.

भाद्रशुक्लतृतीयायामपराण्हे वराहो भूत्वा भूमिमुद्धरिष्यन् हिरण्याक्षं ददार ।

भाद्रपद शुद्ध तृतीयेचा दिवस. अपराण्ह काळी वराह अवतार झालेलाय. समुद्रामधे रसातलापर्यंत ही भूमी गेली होती. वराहाने आंत जाऊन ती भूमी आपल्या दाढेवर घेऊन ते वर आलेले आहेत. तिची स्थापना केली आणि हिरण्याक्ष नांवाच्या दैत्याचा नाश आणखी त्यांनी केलेला आहे.

वैशाखशुक्लचतुर्दश्यां प्रदोषे नरसिंहरूपेणावतीर्य हिरण्यकशिपुं विददार ।

वैशाख शुद्ध चतुर्दशीला, नरसिंह जयंती म्हणतात. वैशाखचतुर्दशीच्या दिवशी प्रदोषकाळी आणि नरसिंह प्रकट झालेले आहेत आणि हिरण्यकश्यपूचा त्यांनी नाश केला आहे.

भाद्रशुद्धद्वादश्यां मध्यान्हे वामनो भूत्वा व्याजेन बलिं बबंध ।

वामनावताराचा काळ भाद्रपद शुद्ध द्वादशी, अगदी मध्यान्ह काली वामन अवतीर्ण झाले. त्यांनी बळीराजाकडून त्रिपाद भूमी त्यांनी मागितली वगैरे. ती कथा भागवतामधे आलेली आहे.

वैशाखशुक्लतृतीयायां मध्यान्हे परशुरामो (भार्गवरामो) वतीर्य कार्तवीर्यादिनृपानहनत् ।

अक्षय्यतृतीया. वैशाख शुद्ध तृतीयेच्या दिवशी मध्यान्ह काली परशुरामांचा अवतार झाला आणि कार्तवियादि वगैरे जे मोठे क्षत्रिय राजे होते त्यांचा त्यांनी नाश केलेला आहे.

चैत्रशुद्धनवम्यां मध्यान्हे दाशरथी रामोवतीर्य सकुलं रावणं जघान ।

चैत्र शुद्ध नवमी म्हणजे रामनवमी. त्या दिवशी रामजन्म झालेला आहे. रावणादिकांचा त्याने नाश केलेला आहे.

श्रावणकृष्णाष्टम्यां निशीथे कृष्ण आविर्भूय भूभारमवातरत् ।

श्रावण कृष्ण अष्टमी गोकुळाष्टमी प्रसिद्ध आहे. कृष्णावतार झालेला आहे. पुष्कळ भूभार त्यांनी कमी केला.

त्यानंतर बुद्ध अवतार..

अश्विनशुक्लदशम्यां सायं बुद्धो भूत्वा कारूण्यं ततान ।

भगवंताचेच हे सगळे अवतार आहेत. विजयादशमी, अश्विन शुद्ध दशमी, दसऱ्याच्या दिवशी आणखी सायंकाळी हा बुद्धावतार झाला. आणि त्यांनी सगळ्या दैत्यांना एका बाजूला केलं आणि देवांना एका बाजूला केलं. दैत्यही यज्ञ करायला लागले आणि यज्ञ करून सगळं सामर्थ्य मिळवायचं आणि पुन्हा देवांना मारायचं. त्यांचा बुद्धिभ्रंश करण्याकरता आणखी हा बुद्धावतार झालेला आहे.

काय म्हणाले, यज्ञयाग वगैरे चांगले नाहीत. त्यात पुष्कळ हिंसा केली जाते वगैरे वगैरे. त्यांची यज्ञापासून बुद्धी वळवली, त्यांनी. बुद्धिभेद केला. म्हणून बुद्धावतार हा भगवंताचाच अवतार आहे. तो सर्वही भारतीयांना मान्य आहे. पण बुद्धाची पूजा आम्ही करत नाही. त्यांनी दैत्यांना बाजूला केलं. हे कार्य ही मोठं केलेलं आहे. तरीसुद्धा धर्ममार्ग जो आहे–वैदिकधर्म, त्याच्यापासून त्यांना बाजुला केल्यामुळे ती निवड केली त्यांनी. खरे योग्य कोण आहेत? ते दैत्य एका बाजुला झाले. त्यांनी यज्ञयाग वगैरे सोडून दिले. नास्तिक त्यांनी वगैरे बनलेले आहेत. खरे जे शुद्ध सात्त्विक होते ते देव बाजूला झाले. आता कल्की अवतारात कालियुगाच्या शेवटी .....

श्रावणशुक्लषष्ठ्यां कल्की जनिष्यते म्लेच्छान्हनिष्यति च ।

आता श्रावण शुद्ध षष्ठीच्या दिवशी हा अवतार होणार आहे; पुढे कलियुगाच्या शेवटी. अजून पुष्कळ कलियुगाचा काळ आहे.

हे दहा अवतार भगवंताचे प्रसिद्ध आहेत. आता दत्तात्रेय अवतार जो आहे --

मार्गपौर्णमास्यां प्रदोषे बुधवासरे मृगभे च श्रीदत्तात्रेयोवतीर्य विजयतेऽस्मै नमः ।

मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी आणखी प्रदोषकाली बुधवारी, बुधवार त्या दिवशी होता आणि दत्तात्रेयांचा अवतार झाला. तो कायमचा अवतार आहे वगैरे. त्याच अवताराचं चरित्र आता सांगताहेत.

असे पुष्कळ अवतार भगवंताने घेतलेले आहेत. कितीतरी आहेत. निरनिराळे अवतार आहेत.

यात दहाही अवतार आहेत. नारदही भगवंताचे अवतार आहेत. असे अनेक अवतार धारण करून, आणि सर्वही एकंदर जीवांचा उद्धार करण्याचा मार्ग दाखवायचाय, म्हणून हे सगळे अवतार झालेले आहेत.

हे अंबरीष राजाच्या निमित्ताने हे घडलं. दुर्वासऋषी त्या अंबरीषाला शाप देऊन, 'तू जा म्हणाले, संसारात जन्म मरण भोगत राहा', असं सांगणार होते, आणि भगवंतांनी येऊन आपल्या भक्ताला मुक्त केलं, बाजूला केलं आणि आपण खुप जन्म घेऊन आलेले आहेत. पण जगाचे कल्याण झालेले आहे. म्हणजे दुर्वासऋषींचा शाप हा यामुळे भगवंताला अवतार घेऊन, सगळे अवतार घेऊन आणि सर्व जीवांचं कल्याण होईल, म्हणून दुर्वास ऋषींना वाटून त्यांनी शाप दिला, देवांना.

अशा रीतीने ईश्वराचे अवतार होण्याचे कारण काय तेही या ठिकाणी सांगितलेलं आहे. सिद्धांनी नामधारकाला.

आता यानंतर, प्रत्यक्ष दत्तात्रेय अवतार कसा झालेला आहे, ती दत्तात्रेय अवताराची कथा सांगायला सुरूवात केलेली आहे. भगवान ब्रह्मदेव जे आहेत, या ब्रह्मदेवांनी आपल्या संकल्पापासून आणखी असे, मोठमोठे लोक निर्माण केले आहेत. त्यामध्ये अधिकारी माहात्मे, जीवात्मे आहेत. त्यांना सनक, सनंदन, सनातन, सनतकुमार वगैरे हे आहेत. त्याचप्रमाणे मरीची, अत्रि, पुलह, वसिष्ठ वगैरे ही सगळी त्यांचीच मुले आहेत. प्रजापती, त्यांच्यापासून चांगली संतती निर्माण व्हावी आणि त्यांच्या द्वाराने जगाचं कल्याण व्हावं, हा ब्रह्मदेवांचा उद्देश आहे. आणि हे सगळेही अधिकारी जीवात्मे, जन्माला आलेले आहेत. पूर्वजन्मामधे किंवा अनेक जन्मांमधे तपश्चर्या केली. भगवंताची उपासना केली आणि त्या उपासनेच्या प्रभावाने ज्ञान संपन्न झालेले आहेत. योग–मार्ग सगळा त्यांना माहिती आहे, अशा रीतीचे महात्मे, यापैकी अत्रिमहर्षी म्हणून एक मोठे होते. ब्रह्मदेवांच्या पुत्रांपैकी अत्रिमहर्षी म्हणून एक श्रेष्ठ होते. तपस्वी पुरुष आणखी त्या तपस्वी पुरूषापैकी हे एक होते.

तर अत्रिमहर्षींची पत्नी म्हणजे अनसूयामाता. ही कर्दमऋषींची कन्या देवहूतिपासून झालेली.

अरण्यामध्ये रहाणारे हे सगळे महर्षी, कुठेही आणखी गांवात किंवा कुठे नदी तीरावरती एखादी झोपडी बिपडी वगैरे केलेली असायची. शिष्य मंडळी बरोबर असायची. त्यांना ज्ञानदान करायचं, त्यांना आणखी जेवण घालायचं, सगळं शिकवायचं त्यांना ! असं कार्य चाललेलं असायचं.

अनसूयामाता ! या अनसूयामातेच स्वतःच एक व्रत तिनं घेतलेलं होतं. मातृदेवो भव, पितृदेवो भव, अतिथिदेवो भव, आचार्यदेवो भव, अशा आज्ञा आहेत वेदाच्या. त्यापैकी

अतिथीदेवो भव ! अतिथीच हे देव आहेत आणि त्यांची सेवा करायची. त्यांना यथाशक्ती आणखी अन्नदान करायचं. हे व्रत अनसूयामातेनं स्वीकारलेलं आहे. चाललेलं आहे अखंड. अरण्यामधे जरी राहत होते, तरी आपल्या स्वतःच्या तपःप्रभावाने सुद्धा पुष्कळ धान्य वगैरे ते निर्माण करत होते. तिकड नाशिक क्षेत्राकडे, त्या भागात ते गौतम ऋषींचं वर्णन करतात, दुष्काळ पडला मोठा भयंकर. गौतम ऋषींनी आपल्या तपःसामर्थ्यानी पुष्कळ धान्य निर्माण केलं, साळी. धान्य निर्माण झालं. सगळ्या लोकांना ते धान्य दिलेलं आहे. म्हणजे असे तपःप्रभावाने समाजाला सुद्धा उपयोगी पडणारे अशा प्रकारचे ऋषी होते. करु शकत होते. सामर्थ्य होतं त्यांना. तेव्हा त्या आश्रमामधे जी कांही जमीन वगैरे असेल त्यात जे कांही पिकेल ते धान्य वगैरे घ्यायचं आणि त्यात मध्यान्हकालच्या वेळेला कोणीही अतिथी आला तर त्याला आपलं यथाशक्ती अन्नदान करायचं. हा एक अनसूयामातेचा मोठा नियम होता. आता मोठी पतिव्रता स्त्री आहे. अत्रिमहर्षींची सेवा करती आहे आणि अन्नदानही करते आहे.

तेव्हां नारदमहर्षी एकदा, ब्रह्मा, विष्णू, महेश्वरांच्या ज्या स्त्रिया होत्या, सावित्री, लक्ष्मी आणखी पार्वती, त्यांच्याजवळ जाऊन अत्रिमहर्षींच्या अनसूयेची स्तुती केली. काय म्हणाले, 'पतिव्रता स्त्री आहे आणि त्या पतिव्रतेसारखी मला कोणतीही स्त्री जगामधे दिसत नाही.' हे त्या तिघींच्याजवळ त्यांनी वर्णन केल. आता त्या तिघींनाही राग आलेला आहे. आमच्यापेक्षाही अशी पतिव्रता अशी कोण स्त्री आहे म्हणाले. या ज्या सगळ्या कथा किंवा घटना घडतायत त्याचं मुख्य तात्पर्य आपण लक्षामधे आणायचं आहे. ब्रह्मा, विष्णू, महेश्वरांच्या स्त्रियांना राग आला आणि त्या रागानी त्यांनी आपल्या पतींना सांगितले. आणि ते तिघेही अनसूयामातेची परीक्षा पाहण्याकरता आलेले आहेत, अशी जरी कथा असली तरी **अनसूयामातेचं सामर्थ्य किती आहे हे दाखविण्यासाठी ही कथा आहे. मुख्य म्हणजे उद्देश हा आहे. अनसूयामातेनं जे तप केलेलं होतं किंवा अतिथींचा सत्कार करणं, अतिथींची सेवा करण्याचं जे व्रत घेतलेलं होतं आणि ते इतक्या काटेकोरपणाने पाळलेलं आहे की तिच्या त्या धैर्याने, तिच्या तपाने आणखी त्या तिन्ही देवांना सुद्धा आणखी हार खावी लागली. हा मुख्य भाग आहे.** तपशीलामधे कांही विशेष विचार करण्याचं कांही कारण नाहीये.

आले तिन्ही देव ! मध्यान्हकालच्या वेळेला. अत्रिमहर्षि आणखी सकाळी उठून नदीवरती जात असत. मध्यान्हकालापर्यंत आणखी ध्यानधारणा म्हणा, कांही कर्माचरण वगैरे काय असेल ते करायचं, मध्यान्हकाळी आणि आश्रमामधे यायचं असा त्यांचा नियम होता. आलेले आहेत. मध्यान्हकाळ झालेला आहे. ब्रह्मा, विष्णू, महेश तीन देव, हे भिक्षूच्या वेषामधे आले. अतिथींच्या वेषामधे आलेले आहेत. अनसूयामातेचा जो नियम होता त्याप्रमाणे ''या बसा'' म्हणून, त्यांना बसायला आसनं दिलेली आहेत. पाय धुवायला पाणी दिलं. पूजा वगैरे केली

आणि काय इच्छा काय आहे महाराज सांगा. तर म्हणाले, 'आम्हाला भूक फार लागलेली आहे. जेवायची इच्छा करून आम्ही आलेलो आहोत.' 'तयार आहे म्हणाले अन्न, वाढते मी.' पण त्यांनी सांगितलं, 'आम्हाला असं वाढून चालणार नाहीये. तुम्ही दिगंबर म्हणजे अंगावरचं वस्त्र काढून टाकलं पाहिजे आणि आम्हाला वाढलं पाहिजे.'

आता असं बोलणारे जे अतिथी आहेत ते कोण आहेत, ते तिला कळलंही. पतिव्रता स्त्रीला सगळं समजत आहे. कांही तिला ना कोणी सांगावं लागतं असं नाही. ज्ञान जे, ते आपोआप होतं आहे. तिने ऐकून घेतलं आणि मनात थोडासा विचार केला. 'काय म्हणाले काय होईल यात? माझ्या मनावरती कांही परिणाम होईल कां या गोष्टींचा? हे तीन परपुरूष आलेले आहेत. हे तर अशी अट घालतायत, जर वस्त्र काढून टाकून वाढलं तर आम्ही जेवू , नाही तर आम्ही जेवणार नाही; निघून जाऊ असं म्हणताहेत. काय होईल म्हणाले. पण माझ्या मनावर कांही परिणाम नाही. पातिव्रत्य आहे, अत्रिमहर्षींची तपश्चर्या इतकी मोठी आहे की मनाचा दोष कांहीही नाही, फक्त शारीरिक दृष्टीनं असं कसं झालं असं वाटेल म्हणाले. परंतु हे जर मी मान्य केलं नाही तर हे शाप देऊन जातील म्हणाले. म्हणजे आपल्या हातून जे कांही धर्माचरण वगैरे चालू असेल किंवा कांही पुण्यकर्म चालू असेल ते अखंड चालू राहाण्याकरताही जपलं पाहिजे.' हे जे कांही महात्मे अशा प्रकारचे असतात, त्यांचा जर क्रोध झाला, त्यांचा जर शाप झाला तर आपल्या धर्माचरणामधेच आणखी विघ्न उत्पन्न होते, बुद्धी स्थिर राहात नाही, धैर्य राहात नाही, धर्माचरण कमी कमी, शिथिल होत जाते. तेव्हां धर्माचरणाकडे ज्यांच लक्ष आहे अशी ती अनसूयामाता आहे. आपला हा आणखी नियम अखंड चालला पाहिजे. आज हे अतिथी आलेले आहेत, यांची मागणी जरी आणखी अयोग्य असली तरी त्याचा परिणाम माझ्या मनावरती होणार नाही. त्यांनी आपल संतुष्ट होऊन जेवण करून जावं. एवढाच विचार तिने केलेला आहे. आणि ही माझ्या मुलांसारखी आहेत म्हणाली आणि ही एक भावना आहे. पतिव्रता स्त्रीच्या दृष्टीने, सर्वही **तिची बाळं आहेत. बालबुद्धि आहेत. बाल याचा अर्थ कांही विचार न करता बोलणे म्हणजे बाल आहेत.** अशी ही भावना अंतःकरणामधे धारण करून तिने उत्तर दिलं, 'कांही हरकत नाही महाराज. तुमच्या इच्छेप्रमाणे मी वस्त्र सोडून ठेवून तुम्हाला वाढणार.'

सत्त्वपरीक्षा आहे ही. आणि ते सत्त्व आपलं राखायचंय, त्याच्याकरता केवढं धैर्य करावं लागतं. धर्म जाण्याची पाळी आली की काय असं वाटेल, पण नाहीये, ती धर्म जाऊ देणार नाही आपला. धर्माचं पूर्ण पालन करणारी आहे. आणखी हे जे **अतिथी आलेले आहेत ते ईश्वर आहेत आणि अनसूयामाता ही जीव आहे हे लक्षात घेण्यासारखं आहे.**

या चरित्राचं सार असं आपल्याला पाहाता येईल, की जीव असू दे, आपल्या कर्मामधे सापडलेला असू दे, पण सत्संगती आणि ईश्वर प्रसादानी, तो जर चांगल्या मार्गाने गेला तर, तो

जीव इतका समर्थ होतो की **प्रत्यक्ष ईश्वर जरी परीक्षा पाहण्याला आला तरी ईश्वराचीच परीक्षा तो घेऊ शकतोही. जीव म्हणून, जीवकोटीमधे आलेली अनसूयामाता, या अनसूयामातेनं त्या ईश्वरालाच आव्हान दिलेलं आहे. कांही हरकत नाही, तुम्हाला तुमच्या इच्छेप्रमाणे मी जेवायला घालते. तुम्ही जेवण करून घ्या. माझं अतिथीचं व्रत हे कधीही मी ढळू देणार नाही.**

अशी एकनिष्ठ राहाणारी जी व्यक्ती आहे. कोणीही असो, स्त्री असो, पुरूष असो आणि त्या व्यक्तीचं सामर्थ्य इतकं वाढलेलं असतं, की ईश्वरानी जरी तिला तिच्या तपापासून आणखी भ्रष्ट करण्याची ईश्वराची इच्छा असली तरी ती इच्छा पूर्ण होऊ शकत नाही. ईश्वराचा संकल्प अमोघ असतो असं म्हणतात परंतु ईश्वराला सुद्धा आपला संकल्प सोडावा लागतो.

अर्जुन बोलायला लागला, 'तुम्ही देवा माझ्याकडे फक्त या, मला सैन्य नको, दुर्योधनाला द्या' ते देऊन टाकलं. देव म्हणाले, **'न धरी शस्त्र करी मी. गोष्टी सांगेन युक्तीच्या चार.'** कांही करा म्हणाले तुम्ही. 'तुम्ही आमच्या बाजूला असला म्हणजे पुष्कळ झालं' हा त्याचा विश्वास आहे. देवाने संकल्प केला, प्रतिज्ञा केली की मी शस्त्र हातात घेणार नाही. भीष्माचार्यांना हे समजलं. भीष्माचार्य म्हणाले, 'मी गोपालकृष्णांना शस्त्र घ्यायला लावीन म्हणाले.' त्यांनी प्रतिज्ञा केली. आता ईश्वराची प्रतिज्ञा खरी व्हायची का भीष्माचार्यांची ? मग प्रसंग आला तसा. अर्जुनाला मूर्च्छित पाडलं भीष्माचार्यांनी ! पाठीमागून बाण कां येत नाहीत म्हणून पाठीमागे वळून पाहिलं गोपालकृष्णांनी, अर्जुन मूर्च्छित पडलेला आहे. संताप आला त्यांना. 'हा म्हातारा' म्हणाले 'याला आज जिवंत ठेवायचा नाही.' खाली उतरले. इथं काय सुदर्शनचक्र वगैरे किंवा कांही आणलंच नव्हतं. एक रथाचेच चाक उचलून घेतलं आणि धावत धावत भीष्माला मारण्याकरता निघाले. भीष्माचार्य म्हणाले माझी प्रतिज्ञा पूर्ण झाली, बरं झालं. म्हणजे ईश्वराचा संकल्प अमोघ आहे की जीवांचा संकल्प अमोघ आहे. **आता इथे दोन्हीही ईश्वराचीच स्वरूपं आहेत. अनसूयामाता, ही जीव असूनही ईश्वररूप बनलेली आहे. ईश्वराला तिची मुलं व्हावं लागलेलं आहे. म्हणजे तिची किती योग्यता आहे. जरी जीवकोटीमधे ती असली– तरी तिचा संकल्प मोठा आहे की ही माझी बाळं आहेत, मुलं आहेत, बाल आहेत आणि त्याचप्रमाणे तिने कार्य केलेलं आहे.** आणखी झालं, वस्त्र काढून ठेवून बाहेर पाट मांडलेली आहेत, सगळी ही तिथं, तिघेही बसलेले आहेत.

वस्त्र सोडून अन्न घेऊन ती आली आहे, तेव्हां ती तिघंही मुलं दिसायला लागली. तिचा संकल्प मोठा झाला. **आता ती जीव राहिलीच नाहीये. तीच ईश्वररूप झालेली आहे, स्वधर्माचरणाने, भगवद्भक्तीच्या प्रभावाने. पुण्यबलाने जीवसुद्धा ईश्वररूप होऊन जातो. मग ईश्वराचा संकल्प आणि त्याचा संकल्प यांत अंतर काय राहणार ?** जीवाचा संकल्प पूर्ण झाला. असं आपण सगळं म्हणायचं फक्त. तो ईश्वररुप झाला. सगळी मुलं झालेली आहेत. तिला सगळं

समजलेलं आहे. हे मागणी करणारे, माझ्यासमोर असं बोलणारे, सामान्य कोणी असं बोलू शकणार नाही. तिला खात्री आहे की हे कोणीतरी मोठे आहेत. आणि त्याचप्रमाणे लहान मुलं झालेली आहेत. ती लगेच पुन्हा वस्त्र नेसून आलेली आहे, पाळण्यामधे त्या तिन्ही मुलांना निजवलेलं आहे, गाणं म्हणायला लागलेली आहे. ब्रह्मदेवानी तिचं जे स्तनपान, तिच्या स्तनामधेही दुध उत्पन्न झालेलं आहे. लगेच. सगळा चमत्कारच आहे तो. ब्रह्मदेव, यांनी ते दुग्धप्राशन केलं. सृष्टी करायची रोजच्या रोज किती जीवांना उत्पन्न करायचं, काय, ब्रह्मदेवाचं काम किती कठीण आहे. कुणाची कर्म कशी आहेत ही त्याची तपासणी करायची. त्याच्याप्रमाणे त्याला आणखी जन्माला घालायचंय, माणसाचा पशु करायचा आणि पशुला माणूस करायचा असं चालत नाही तिथे काही. योग्य असेल त्याला त्याप्रमाणे योग्य त्या योनिमधे. अतिशय श्रमले होते ते म्हणून या आपल्या मातेचं दूध प्राशन करून शांत झोपले म्हणे. त्यानंतर भगवान विष्णू, महाविष्णू हे सृष्टीचं संरक्षण करायचे कार्य चाललेलं आहे, ही दगदग किती आहे. बालरूप धारण करून आपलं त्या पतिव्रता मातेचं स्तनपान, दुध प्याले, त्यानंतर भगवान शंकर, शंकर हे त्या मातेचे दूध पिऊन पुष्टीवर्धन, त्यांचं नांव आहे न, **सुगन्धिं पुष्टिवर्धनम्,** पुष्टी म्हणजे स्वतःला पुष्टी मिळावी त्यांना आणि लोकांचीही पुष्टी, लोकांना पोषण करणारे भगवान शंकर हे संहार करणारे आहेत. त्यांचं पुष्टीवर्धन हे नांव आहे. सर्वांचं पोषण करणारे भगवान शंकर आहेत. त्या नांवाप्रमाणे. पतिव्रता अनसूयामातेचं दूध प्राशन करुन त्यांनाही आणखी पुष्टी मिळाली. आनंदाने ती गायन करत आहे. इतक्यात अत्रिमहर्षी आले, काय गाणं चाललय म्हणाले, कोण आहे. पाळण्यामधे तीन मुलं निजलेली. आता हे ज्ञानी, अंतर्ज्ञानी होते महर्षि. हे, साक्षात ब्रह्मा, विष्णू, महेश्वर आपल्या आश्रमात आलेले आहेत म्हणाले. आनंद झाला, त्यांनी त्या तिघांनाही नमस्कार केलेला आहे आणि नंतर त्या तिघांनी आपली मूळची रूपं धारण केली. ब्रह्मा, विष्णु, महेश्वर आपल्या मूळ स्वरूपामधे प्रकट झाले आणि अत्रिमहर्षींना त्यांनी सांगितलं, ऋषी महाराज, काय आपल्याला मागायचं, मागून घ्या म्हणाले. वर मागून घ्या.

आता अत्रिमहर्षिनी, अनसूयेचे हे पातिव्रत्य आहे म्हणाले. हिनं आपलं आणखी मन खंबीर ठेवलं, **अतिथिदेवो भव** हे व्रत आणखी पाळलं तिनं. शेवटपर्यंत. त्याचं हे फल आहे. म्हणून त्यांनी, अत्रिमहर्षींनी तिलाच मान दिला, की बाई, तुलाच काय मागायचं ते मागून घे, ही साक्षात त्रिमूर्ती प्रसन्न झालेली आहे. तिनेही सांगितले, 'महाराज, माझी काय योग्यता ? आपण मोठे तपस्वी पुरूष आहात, ब्रह्मदेवांनी आपणाला जे निर्माण केलेलं आहे उत्तम प्रजा, उत्तम संतती व्हावी, याकरता आपल्याला निर्माण केलेलं आहे, ब्रह्मदेवाचे आपण पुत्र झालेले आहात, तेव्हा यांच्यापासून आणखी तसा पुत्र मागून घ्या. या त्रिमुर्तींनी आणखी पुत्ररूपाने आपल्या घरामधे रहावेत असं आपण मागून घ्या म्हणाले.' म्हणजे अत्रिमहर्षींनी त्या स्त्रीला

महत्व दिलेलं आहे, तुझं पातिव्रत्य मोठं आहे, भाग्यवान तू आहेस. साक्षात् त्रिमूर्ती तुझ्या घरामधे येऊन आणखी भोजन केलं. तुझे पुत्र झाले म्हणतात. पण अनसूयेनं त्यांच्याच तपाला महत्व दिलेलं आहे. आदर एकमेकांविषयी आहे मग अत्रिमहर्षींनी पुष्कळ स्तुती केलेली आहे आणि नंतर अनसूयेच्या इच्छेप्रमाणे त्यांना मागितलं आहे. ते तिघेही तिथे राहिले पुत्ररूपाने. कांही काळ. ब्रह्मदेवांच्या अंशापासून चंद्र हे उत्पन्न झाले, शंकरांच्या अंशापासून आणखी दुर्वास महर्षि निर्माण झाले आणि भगवान विष्णूंच्या अंशापासून दत्तात्रेय रूप निर्माण झाले. आत्मदान केलं म्हणतात त्यांनी ! दाता आणि देय एकच आहे.

(१) **दत्तो मया तेऽहमितीह दत्त:**
पूर्वोऽपरश्चन्दनतश्च चन्द्र: ।
दुर्वासआख्य: प्रथितस्तृतीय:
साक्षात् प्रभुर्दत्त इहाद्वितीय: ॥३२॥ (त्रिशती काव्य, प्रथमशतक)

(२) *अत्रेरपत्यमभिकाङ्क्षत आह तुष्टो ।*
दत्तो मयाहमिति यद्भगवान्स दत्त: ॥
यत्पादपङ्कजपरागपवित्रदेहा ।
योगर्द्धिमापुरुभयीं यदुहैहयाद्या: ॥ **(श्रीमद्भागवत-२.७.४)**

त्यांचं दत्त हे नांव ठेवण्याचं कारण त्यांनी स्वतःच दान स्वतःच केलेलं आहे अत्रिमहर्षिंना. 'तुमची तपश्चर्या दोघांची पाहून, धर्मबुद्धी पाहून, भक्तीपाहून संतोष झालेला आहे, की मी माझेच दान तुम्हाला करून टाकतो' म्हणाले. म्हणून **'दत्त'** हे नांव आहे. आपण आपल्याला दिलं त्यांनी, अत्रिमहर्षिना आणि अनसूयेला, म्हणून **'दत्त'** या नामाने ते प्रसिद्ध झाले.

तर, अनसूयामातेचं माहात्म्य हे यात व्यक्त झालेलं आहे, अनसूयामातेचे आज जगावरती उपकार आहेत. वैकुंठपती, साक्षात भगवान महाविष्णु , अंबरीषवरद यांना आणखी भूलोकावरती दत्तरूपाने, बालरूपाने अनसूयामातेने आणलेलं आहे. त्यामुळे आज जगाचं कल्याण होत आहे. हे सगळे उपकार त्या माऊलीचे आपल्यावरती आहेत असं मानायला हरकत नाहीये. म्हणजे केवळ अनसूया पुत्राच्या रूपाने आहेत. श्रीपाद वल्लभ, त्याचप्रमाणे नरसिंह सरस्वती हे सुद्धा अवतार अशा आणखी धर्मशील पतिव्रता स्त्रियांच्यामुळेच झालेले आहेत. त्यांच्याच योगाने जगाचा उद्धार होतो आहे. आज. अशा प्रकारची ती कथा पुढे सांगताहेत.

तेव्हा याप्रमाणे, दत्तात्रेय अवतार हा अत्री आणि अनसूयामाता या दोघांच्या तपाचं फळ म्हणून 'दत्तात्रेय' अवतार झालेला आहे. चंद्रमंडलामधे चंद्र निघून गेले. दुर्वास ऋषींनीही आपल्या आईला सांगितलं, 'मी म्हणाले, तपश्चर्या करणार आहे. मला एका घराचे ठिकाणी कुठं रहायचं ? तेही निघून

गेले. भगवान दत्तात्रेय मात्र, हे तिथं राहिलेले आहेत. मातापित्यांना आनंद देण्याकरता म्हणून आणखी ते तिघेहि तिथे दत्तात्रेय रुपाने राहिले आणि ते त्रिमूर्तिस्वरूप अशा प्रकारचे आहेत. तर याप्रमाणे हे मूळ रूप इथे जे आहे, दत्तात्रेयरूप, हे मूळ गुरुपीठ आहे. तर अशा दृष्टीने हा मूळ अवतार जो आहे तो कसा झाला हे चरित्र सिद्धमुनींनी नामधारकांना सांगितले आहे.

आता याच्यापुढे श्रीपादवल्लभ नांवाचा अवतार झालेला आहे, तोही असाच आहे. **जे कांही धर्मनिष्ठ असणारे महात्मे आहेत, त्यांच्या धर्माचे फळ म्हणून हे सगळे अवतार झालेले आहेत.** वैयक्तिकही फायदा त्यांचा झाला. व्यक्तिशः कल्याण तर त्यांचं झाल पण सगळ्या जगाचं कल्याण या स्त्रियांनी, पतिव्रता स्त्रियांनी, ऋषिमंडळींनी जगाचेही कल्याण केलेलं आहे, भगवंताला असे अवतार घ्यायला लावून. म्हणून श्रीपाद वल्लभ अवतार जो झालेला आहे त्याची कथा आता सिद्धमुनी नामधारकाला निवेदन करताहेत.

पीठापूर म्हणून जे क्षेत्र आहे, त्या क्षेत्रामधे हा अवतार झालेला आहे. पीठापूर म्हणजे हैद्राबादहून आणखी इकडे जगन्नाथपुरीला जाणारा जो रस्ता आहे– रेल्वे मार्ग– विजयवाड्याच्या पुढं, पीठापूर म्हणून एक गांव आहे. जवळ जवळ हा श्रीपाद श्रीवल्लभ अवतार म्हणजे ज्ञानेश्वरमहाराजांच्याही पूर्वी, सहा–सातशे वर्षापूर्वी झालेला अवतार आहे हा. त्या पीठापूर क्षेत्रामधे एक ब्राह्मण राहतो आहे. **आपळराजा** म्हणून, आणि त्याची स्त्री, तिचं नाव **सुमती** असं होतं. पुष्कळ मंडळी त्या गांवामधे आणखी वेदशास्त्राचा अभ्यास केलेली. त्यावेळेला पुष्कळ वेदविद्या काय, शास्त्रविद्या काय, धर्माचरण करणारी मंडळी काय पुष्कळ होती त्यावेळी. कलियुग जरी असलं, कलियुगातही आता जास्तीत जास्ती धर्म कमी कमी होत चाललेला आहे. कुणी म्हणतं जास्ती वाढलेला आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून धर्म जास्ती झालेला आहे. देवभक्ती जास्ती वाढलेली आहे. यज्ञयाग वगैरे जास्ती होत आहेत असंही कांही कांही लोक सांगताहेत. शुद्धी ही अनेक प्रकारची आहे. शरीराची शुद्धी आहे, वाणीची शुद्धी आहे, मनाची शुद्धी आहे. अर्थ शुद्धी आहे. अर्थ शुद्धी ही सगळ्यात मुख्य आहे.

सर्वेषामेव शौचानामर्थशुद्धिर्विशिष्यते ।
योऽर्थे शुचिर्हि स शुचिर्न मृद्वारिशुचिः शुचिः॥ (मनुस्मृति अ. ५.१०६)

म्हणून सांगताहेत स्मृतिकार.

बाहेरून शरीराला कांहीतरी साबण म्हणा किंवा कांहीतरी लावून स्वच्छ शरीर करणं म्हणजे शुद्धी नाही, तर अर्थ शुद्धी ज्याच्या जवळ आहे, शुद्ध अर्थ आहे. द्रव्यशुद्ध आहे, ती अर्थ शुद्धी जर वाढत चालली, तर आणखी धर्म वाढत चालला असं म्हणायला पाहिजे. बाकीचं चाललेलं आहे. पूजाअर्चा होताहेत, यज्ञयाग वगैरे होताहेत. हरकत नाही. तर त्यावेळेला काय सगळ ! अशाच प्रकारचे कर्मयोगी आहेत, ज्ञानयोगी आहेत. उपासनायोगी आहेत. योगाभ्यास करणारी

मंडळी आहेत, पुष्कळ मंडळी आहेत. तर या पीठापूर क्षेत्रामध्ये हा **आपळ राजा** नांवाचा ब्राम्हण आणि **त्याची स्त्री सुमती,** नांवाप्रमाणे, उत्तम बुद्धी आहे. तिला दोन मुलं झाली होती. पण दुर्देव असं, एका मुलाला डोळे नाहीत, आणि एकाला पाय नाहीत. एक अंध आणि एक पंगु, काय उपयोग त्या मुलांचा? त्यांचंच सगळं हिला करावं लागायचं. एकाला दिसत नाही, एकाला चालता येत नाही. पण हे घरातलं, संसाराचं आपल्या प्रारब्धकर्माने आलेलं दुःख ती सहन करते आहे. परंतु अनसूयामातेचा आदर्श डोळ्यापूढे ठेवून, 'अतिथिदेवो भव', हे तिचं व्रत चाललेलं आहे. कोणीही अतिथी मध्यान्हकाली आल्यानंतर त्याला अन्न समर्पण करायचं, साक्षात विष्णू भगवान आहेत, या बुद्धीनं अन्न समर्पण करायचं. चिकित्सा नाहीये. आज्ञा–शास्त्राची आज्ञा आहे. ते फळ त्याला मिळून जाते. कायदा तसा झाल्यानंतर, हा कायदा योग्य अयोग्य विचार करण्याचा आम्हाला अधिकार नाहीये. पोस्टाच्या पाकिटाला पन्नास पैशाचं तिकिटं लावलंच पाहिजे, काय करायचं इतकं तिकिट लावून? इतकं ओझं आहे कां यात? आम्ही कमी तिकिट लावू. तुम्हाला एक रूपाया भरावा लागेल. भरा तुम्ही. इथं काय हे योग्य अयोग्य कांही चालत नाही. त्याचप्रमाणे अतिथी कोणीही जरी आलेला असला तथापि तो भगवान विष्णूच आहे. गणपतीची पूजा करण्याच्या वेळेला सुपारी जरी मांडलेली असली तरी सुपारीवरती गणपतीच आवाहन करू शकतात. मंत्र आहेत तसे. त्या मंत्रांनी, तो गणपतीचा मंत्र म्हटल्याबरोबर, अक्षद टाकल्याबरोबर गणपती त्या ठिकाणी येतात, पूजा घेतात, त्याचं फळ मिळतं. मंत्रामधेही सामर्थ्य आहे. हे सगळं – अदृष्ट आहे. ते आमच्या बुद्धीला कळू शकत नाहीये. अशा प्रकारचं अखंड चाललेलं आहे. होणार नाही हे तरी आम्ही आमच्या बुद्धीला कशावरून सांगायचं? पुढे कांही होणार नाही, याचं फळ मिळणार नाही, हे तरी आम्ही बुद्धीने किंवा डोळ्याने पाहू शकतो काय? आत्ता आम्हाला देव दिसत नाही, एवढं आम्ही डोळ्यांनी पाहून नाही म्हणतो. पण या समाधिमध्ये किंवा या मूर्तीमध्ये पूजा केल्यानंतर पुढे कांही मिळणार नाही हे तरी कशावरून सांगितलं आम्ही ? डोळ्यांनी पाहाता येतं कां तुम्हाला ? तर जी आज्ञा आहे शास्त्राची, त्या शास्त्राज्ञेप्रमाणे वागणारा जो आहे त्याला त्याचं फळ मिळतं. **तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते !** हे भगवान सांगताहेत. मी सांगतो अर्जुना म्हणून माझं ऐक असं म्हणत नाहीत भगवान. शास्त्र हे आहे प्रमाण. त्याप्रमाणे कार्य कोणतं, अकार्य कोणतं हे शास्त्राने सगळं दाखवून दिलेले आहे. त्याप्रमाणे वाग.

तशी ही आणखी सुमती नांवाची स्त्री मध्यान्हकाळच्या वेळेला, आणखी अतिथीची पूजा करणारी, अन्नदान करणारी, आणि असा एकदा अभ्यास किंवा नियम आपण घेतल्यानंतर एखादा काल तरी भाग्याचा येतो. खरे भगवान एखाद्या वेळेला येत असतील, तरी रोज अतिथी येत असतील. भावनात्मक विष्णूंची पूजा रोज होत असेल, पण खऱ्या विष्णूंची पूजा करण्याचा प्रसंग एखाद्या वेळेस तरी प्रसंग येईल, एखाद्या वेळेला तरी येईल की नाही, सवय पाहिजे. याच्यात

काय अर्थ आहे ? आम्ही कधीच विष्णूची पूजा केली नाही म्हणजे खरे ही विष्णू जरी आले तरी आम्हाला ओळख पटणार नाही. काय हे कसले विष्णू ? असंच आम्ही म्हणणार. तेव्हा खोटे कां असेना अतिथी, पण विष्णू भावनेनं, आमच्या बुद्धीने विष्णू समजून पूजा करण्याचा अभ्यास केल्यानंतर खरे विष्णू एखाद्या वेळी तरी येतात आणि त्याने कल्याण होऊन जातं.

आणि तसा प्रसंग आलेला आहे. अमावास्येचा दिवस आहे. दर्शश्राद्धाचा दिवस आहे. ब्राह्मणमंडळी अद्यापि, आणखी मध्यान्ह काळ व्हायचाय, जेवायला यायचेत. स्वयंपाक वगैरे सगळं तयार झालेलं आहे. इतक्यात भगवान दत्तात्रेय आणखी भिक्षेकऱ्याच्या वेषामधे त्या दारामधे येऊन उभे राहिलेले आहेत. **'भवति भिक्षां ददाति:'**. भिक्षा मागायची झाली तरी घरच्या मालकाचं नांव घ्यायचं नसतं.

भवान् भिक्षां देहि – आपण महाराज आम्हाला भिक्षा घाला, नाहीये. स्वयंपाकघरात किंवा अन्नदान करण्याचा पुरूषाला अधिकार नाहीये. भिक्षा वाढायची ती, त्या घरातल्या गृहिणीनेच वाढायची आहे. भिक्षा मागणाऱ्यानेसुद्धा, **बाईसाहेब आपण भिक्षा घाला,** असंच आवाहन करायचंय. ऐकलं त्या सुमतीमातेनं. आता काय करावं. आज श्राद्ध आहे, पितरांचं श्राद्ध आहे. ब्राह्मणमंडळी आता जेवायला येणार आहेत. आता हे अन्न या अतिथीला घालायचं किंवा नाही. ब्राह्मणमंडळी जेवण्याच्यापूर्वी भिक्षा घालावी किंवा नाही असा थोडासा विचार तिच्या मनामधे आलेला आहे. परंतु तिचा निर्धार आहे, हे भगवान साक्षात विष्णु आहेत, अशीच भावना ती आजपर्यंत करत आलेली आहे आणि त्या भावनेचं आज तिला फळ मिळणार आहे. खरोखर विष्णू आलेले आहेत. साक्षात भगवान विष्णू आहेत यांना आपण भिक्षा घालू. म्हणाले, ब्राह्मणमंडळी इथे येऊन मागाहून जेवतील, हरकत नाही. आपण कांही जेवलो नाही. देवांनाच घातलेलं आहे आणि देवाला समर्पण केलं म्हणजे सगळंही कांही दोष असला तरी निघून जाईल. असा निश्चय मनाचा केला. आणि ते अन्न, पात्रामध्ये घेतलेलं आहे, त्यांच्या झोळीमधे ते अन्न टाकलं. टाकल्याबरोबर तिच्यासमोर, तिची– ती सुमती म्हणजे नांवाप्रमाणे तिची जी उत्तम बुद्धी आहे, विकल्परहीत बुद्धी आहे. चिकित्सा वगैरे कांही नाहीये, साक्षात महाविष्णू आहेत. आज भगवान महाविष्णूंचा साक्षात्कार होणार आहे. दत्तात्रेय आपल्या मूळ रूपामधे प्रगट झालेले आहेत.

माला कमण्डलुरधः करपद्मयुग्मे, मध्यस्थपाणियुगले डमरुत्रिशूले ।
यन्न्यस्त ऊर्ध्वकरयोः शुभशङ्खचक्रे, वन्दे तमत्रिवरदं भुजषट्क युक्तम् ॥

सहा हात आहेत, तीन मुखं आहेत, खालच्या दोन हातामधे माला आणि कमंडलू आहेत, मधल्या दोन हातामधे डमरू आणि त्रिशूल आहे, आणि वरच्या दोन हातामधे शंख आणि चक्र आहेत. या ठिकाणी. ते दिव्य दर्शन झालं. आजपर्यंत त्रिगुणात्मक त्रैमूर्ति––नुसत आम्ही आरती म्हणतो नुसती.

जन्मात कधी दर्शनाचा योग नाही, आमचं भाग्यच तितकं आहे, म्हणायचं फक्त एवढंच, पण निदान श्रद्धा तरी ठेवायची, प्रत्यक्ष भगवानांचे, त्रिमूर्ती दत्तात्रेयांचं दर्शन झालेलं आहे. धावत धावत गेली, हात धुवून आली, पायावर मस्तक ठेवलं, हात जोडून ती उभी राहिलेली आहे, दत्त महाराज म्हणताहेत, दत्तात्रेयप्रभू, 'आई काय तुला पाहिजे, मागून घे', किती जन्माचा अभ्यास असेल, अतिथीचं व्रत अनसूयामातेनं केलं, त्याचप्रमाणे कलियुगामधे रहाणारी ही सुमतीमाता तिनेही हे व्रत केलेलं आहे. पण हे या जन्माचे, एका जन्माचं केलेलं का ? किती बुद्धी भेदाचे प्रसंग येतात ? काय बायकांना कळतंय, काय पुरूषांना तरी काय कळतं कुणाला ठाऊक ! पण आम्हाला सगळं कळतं, बायकांना कांहीच कळत नाही म्हणून त्यांची निंदा आपण करतो. त्या आपलं श्रद्धेने करतात, भोळ्या भावनेनं करतात. कांही खर नसत. चिकित्सा आपण करतो आणि आपण मोठे चिकित्सक म्हणून अभिमान आणखी धारण करतो. तेव्हा असे अनेक प्रसंग निर्माण होतायत. की जरी अत्यंत उत्तम कर्म आहे, पुण्य कर्म आहे, सत्कर्म आहे, शास्त्रांनी सांगितलेलं आहे, अनसूयामातेसारख्या आणखी महान साध्वी स्त्रीने त्याप्रमाणे व्रत केलेलं आहे, हे सगळं पुढं आहे. ते आणखी मनामधे आणून जरी 'अतिथी देवो भव' ती करायला लागली तरी पुष्कळ प्रसंग बुद्धिभेद करण्याचे निर्माण होतात.

तेव्हा ते बुद्धिभेद नाही. कांही नाही. अखंड व्रत चाललेलं आहे आणि ते अनेक जन्म चालू असलं पाहिजे. त्याशिवाय हे कसं होईल. याच जन्मात एकदम कशी बुद्धी होणार आणि त्या व्रताचं फळ आज तिला मिळालं. दत्तात्रेय प्रगट झाले. आई म्हणून हांक मारताहेत. काय पाहिजे, माताजी काय पाहिजे आपल्याला? स्तुती केली, ''देवा, काय आपलं दर्शन घडलं. किती जन्माचं माझं भाग्य आहे कुणाला ठाऊक.'' अशी कांही स्तुती थोडीशी केली. सर्व विश्व निर्माण करणारे, पालन करणारे, आणखी संहार करणारे आपण एकटे आहात. काय ईश्वराची शक्ती आहे. काय किती एकेक ऑफिसमध्ये किती नोकर असतात. किती काढावे लागतात, किती नवीन घ्यावे लागतात तरी कामे होत नाहीत, आवरत नाहीत, उत्तरं मिळत नाहीत पत्राची, सहा-सहा महिने. अशी स्थिती आहे. इथे केवढं ऑफिस चाललेलं आहे. अनंत ब्रम्हांडामधे अनंत जीव उत्पन्न होतायत त्यांचं संरक्षण योजना आहे, त्याचप्रमाणे संहार योजना आहे. उत्पत्ती योजना आहे, चाललेलं आहे. कार्य अखंड आहे, याची जाणीव ज्यांना आहे त्यांना ईश्वराच्या शक्तीबद्दल अत्यंत आदरभाव, श्रद्धाभाव मनामधे असतो. स्तुती केली तिनं. आणखी पुन्हा म्हणाले भगवान दत्तात्रेय, ''काय मागून घे आई, म्हणाले, तुला!'' ती चतुर होती थोडी. ती म्हणाली, ''देवा तुम्ही मला आई म्हणून हांक मारली ना? म्हणजे मला मुलगा पाहिजे, तुमच्यासारखा मुलगा पाहिजे, कांहीनाही. थोडक्यात, तुम्ही मला आई म्हणून संबोधन करून हांक मारलेली आहेनं. तुमचं हे आई म्हणून तुम्ही म्हणालात तेवढं तुमचं म्हणणं तेवढं

खरं करा'' म्हणाली. म्हणजे काय झालं, तुम्हीच माझे पुत्र व्हा. आई म्हणून म्हणालात हे तुमचे म्हणणं खरं करा. तुम्हीच माझे पुत्र व्हायला पाहिजे, 'बरंय' ! भगवंतांनी कबूल केलं. ''कांही हरकत नाही. तुझी योग्यताच तशी आहे म्हणाले. मी पुत्र होऊन येईन'' म्हणाले.

भगवंताला जन्म घेण्याचं कांही कारण आहे काय ? **आम्हाला जन्म घ्यावाच लागतो कारण आमची कर्म आहेत ना**? कर्माप्रमाणे आमचं आयुष्य ठरलेलं आहे. संपणार आता या ठिकाणचं आयुष्य संपणार, आमच्याकडनं. पुन्हा दुसरा जन्म आला की दुसरं आयुष्य सुरू होणार म्हणजे दुसरा जन्म आहे. आम्ही जन्माला जात नाही, आम्हाला म्हणता येत नाही. आमची कर्मच बसलेली आहेत. एक जन्म बंद करायचा दुसरा जन्म घ्यायचा. त्यात हालचाल नसते आम्हाला. तसं ईश्वराला नाहीये. जन्म घेतलाच पाहिजे अशी अट ईश्वराला नाहीये ! कारण कर्माचा संबंध नाही.

क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेषः ईश्वरः । (योगसुत्र १.२४)

योगसूत्रकार सांगताहेत, कर्माचा बिलकुल संबंध नाही. संपूर्ण विश्वाला उत्पन्न करणं, पालन करणं, पुन्हा संहार करणं ही कर्म चालू असूनसुद्धा त्याचा कांही संबंध नाही, अलिप्त आहे, परमात्मा. परंतु या सुमतिची इच्छा आहे, 'तुम्ही मला आई म्हणाले आहात, ते तुमचं भाषण, तुमचं वचन खरं झालं पाहिजे', बरयं म्हणाले. 'कांही हरकत नाही, पुत्र होतो म्हणून सांगितलं त्यांनी. आणखी पुढं भगवान दत्तात्रेय आणखी तिच्या उदरातून प्रगट झालेले आहेत. 'श्रीपाद वल्लभ' पुढे त्यांचं 'श्रीपाद' हे नांव त्यांनी घेतलं. झालं. हळूहळू वाढत चाललेले आहेत. आणि झालं, उपनयन झालं. आठ वर्षाच्या वेळेला. पांच वर्षाच्या वेळेलाही उपनयन करतात– ब्राह्मतेज आपल्या मुलाला मिळावं अशी इच्छा असेल तर त्यांनी पाचव्या वर्षीही उपनयन कराव अशी शास्त्राची आणखी संमती आहे.

उपनयन झाल्याबरोबर झालं– वेदशास्त्र सगळं तयारच आहे. ज्ञान कांही मिळवावं लागत नाही. साक्षात भगवानच आहेत ते. आपोआप ते ज्ञान, दिव्य ज्ञान आहे. हजारों मंडळी विद्वान काय, विद्यार्थी सगळे काय येतात, विचारताहेत आणि सगळ्यांना आणखी शंका समाधान, ज्ञानदान करण्याचं कार्य चाललेलं आहे. पंधरा सोळा वर्षाचा काळ झालेला आहे आणि मग मातापितरांचा विचार सुरू झाला, की, 'आता श्रीपादाचं लग्न करावं !' म्हणाले, ''म्हणजे सूनबाई येईल घरी– आपलं मुलबाळं होतील. चांगला आपला गोकुळासारखा प्रपंच होईल''. हे एकदा ह्यांच्या कानावर आलं, श्रीपादांच्या. त्यांनी, आपल्या त्या दोघांनाही, सांगितलं, म्हणाले, 'मला लग्न बिग्न कांही करायचं नाही'– दत्तात्रेयांनी आरंभाला त्या सुमतीला वर देताना सांगितलं होतं की, 'माझ्या सारखा मुलगा तुला पाहीजे ना ! होईल' म्हणाले, 'पण त्या मुलाच्या विरूद्ध तुम्ही वागू नका. तो जे सांगेल त्याला संमती द्यायची' हे त्याच वेळेला त्यांनी सांगून दिलेलं आहे.

तेव्हा श्रीपादांनी सांगितलं– ''श्रीपाद वल्लभांनी'' की, 'ही जी योगश्री आहे हीच माझी स्त्री आहे. योगशक्ती हीच माझी स्त्री आहे.' 'आणि हा एका घरातला प्रपंच करण्याकरता मी आलो नाही, म्हणाले. 'संपूर्ण विश्वाचा प्रपंच करायचाय– अनेक अधिकारी जीवात्मे आणखी प्रयत्न करताहेत– सन्मार्गानी वागण्याचा प्रयत्न करताहेत कष्ट सोसताहेत–दुःख सोसताहेत. त्यांच्या मार्गामधे काय काय अडचणी आलेल्या आहेत, त्या प्रत्यक्ष मला पहायच्या आहेत. त्या अडचणी दूर करायच्यात– त्यांचा मार्ग मोकळा करायचाय. हे मोठं काम आहे म्हणाले बाई. मला इथं रहाता येत नाही'' झालं. निघाले, लग्नाचं तर नाहीच म्हणाले 'मला आता घरातही राहायचं नाही, मला पुष्कळ कामं आहेत. संपूर्ण जगाचं कार्य करायचयं' असं म्हणून बाहेर पडले.

आता दोघे आईबाप, त्यातल्या त्यात त्या आईला तर अतिशय दुःख झालेलं आहे. तिनं सांगितलं– 'देवा ! तुम्हीच वर दिलात – तुम्ही आला आमच्या घरात. राहिलात कांही दिवस आमच्या घरात. आनंद झाला आम्हाला. आमची सगळी पापं नष्ट झाली तुमच्या कृपादृष्टीने. पण आता तुम्ही निघून गेल्यानंतर, काय' म्हणाले, 'आम्हाला काय या संसारात काय उरलेल आहे.' आणि त्यावेळेला तिनं बोलून दाखवलं, आत्तापर्यंत ती कांही बोलली नाही. दोन मुलं जी जन्माला आलेली होती, एक आंधळा अन् एक पांगळा– त्यांचं ही करायचंय– पण श्रीपाद वल्लभांचा जन्म झाल्यामुळे अगदी आनंदात आहे. ते कष्ट तिला जाणवले नाहीत. पण त्यावेळेला तिच्या मुखातून निघून गेलं की, 'आता यांचं मी कसं करावं'. म्हणाले, 'हे दुःखी जीव, आणि त्यांच्यामुळे आम्हीही दुःखी ! आमचा सबंध जन्म दुःखातच जायचां काय देवा? तुम्हीही निघून चाललात'.

मग श्रीपाद वल्लभ थांबले तिथं आणि त्यांनी, त्यांना नुसता स्पर्श केला. हस्तस्पर्श त्या दोघांना केल्याबरोबर, अंध जो होता त्याला एकदम दिसायला लागलेलं आहे, डोळ्यांनी. तो पंगू जो होता, पांगळा, तो उठून उभा राहिला. नमस्कार केला महाराजांना. झालं दोघांनाही नुसतं शरीर चांगलं झालं नाही, मनाला–बुद्धीला जो प्रतिबंध होता, तोही प्रतिबंध दूर झालेला आहे. उत्तम दिव्यज्ञान मिळालं. वेदशास्त्राचं ज्ञान त्यांना मिळालेलं आहे. असे उत्तम ज्ञानसंपन्न, उत्तम आरोग्य संपन्न ती मुलं झालेली आहेत. त्यांना श्रीपादवल्लभांच्या फक्त हस्तस्पर्शाचं हे एक निमित्त झालेलं आहे.

महात्म्यांच्या दृष्टीमधे सामर्थ्य आहे. त्यांच्या शरीरस्पर्शामधे – हस्तामधे सामर्थ्य आहे. स्पर्शामधे सामर्थ्य आहे. शब्दामधे सामर्थ्य आहे. 'तुझं दुःख गेलं !' म्हटलं की, गेलं दुःख– त्यांच्या शब्दात सामर्थ्य आहे. त्यांनी संकल्प केला की, संकल्पामधे ही सामर्थ्य आहे.

भगवान श्रीकृष्णांनी विश्वरूप दाखविलं अर्जुनाला. पाहिलं त्यांनी, शेवटी त्याला भीती वाटली 'नको बाबा देवा! मी कांही पाहू शकत नाही'

किरीटिनं गदिनं चक्रहस्तमिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव ।

तेनैव रूपेण चतुर्भुजेन सहस्त्रबाहो भव विश्वमूर्ते । (भ.गी. ११.४६)

'ते चतुर्भुजरूप तुमचं मला दाखवा !' म्हणाला. झाले प्रगट भगवान मूळच्या रूपामधे आणि त्याला सांगितलं, 'अर्जुना !

मया प्रसन्नेन तवार्जुनेदं, रूपं परं दर्शितमात्मयोगात् ।

तेजोमयं विश्वमनन्तमाद्यं यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम् ॥ **(भ.गी. ११.४७)**

मी प्रसन्न झालो' म्हणाले तुझ्यावरती – 'तुझी इच्छा पाहिली, म्हणून हे विश्वरूप तुला दाखिवलं म्हणाले. प्रसाद, ईश्वराचा प्रसाद, झाल्याशिवाय आणखी विश्वरूप दिसत नाही. प्रसाद शब्दाचा अर्थ भगवान शंकराचार्यांनी केलेला आहे. **'प्रसादः अनुग्रहबुद्धिः'** -- या शिष्याचं कल्याण व्हावं– **याची इच्छा पूर्ण व्हावी– असा नुसता संकल्प आणखी सद्गुरूंच्या चित्तामधे अुत्पन्न झाल्याबरोबर त्याचं कल्याण होतं.**

तेव्हा असे महात्मे – त्या महात्म्यांची इतकी विविध प्रकारांनी शक्ती आहे, अन् त्या शक्तीमुळे जगाचं कार्य आणखी कल्याण होतं आहे, हे ईश्वराचं कार्य त्या महात्म्यांच्या कडून झालेलं आहे. दोन्हीही मुलांचं कल्याण झालेलं आहे. ज्ञानसंपन्न झाले. त्यांना आज्ञा केली, की– 'हे तुमचं दैवत आहे, हे आईबाप तुमचं दैवत आहे बरं ! त्यांना सोडून कुठं जायचं नाही. यांची सेवा करायची. तुम्हाला कांही कमी पडणार नाही !' त्यांना आशीर्वाद दिलेले आहेत, आणि आईबापांनाही सांगितलं– आईलाही सांगितलं – 'आई ! आता ही दोन मुलं आहेत, आता चांगली झाली ना? याला दिसायला लागलं, हा चालायला लागला. हे ज्ञानी झाले. सगळे लोक आता येतील. यांची लग्न कार्य होतील, करा – तुम्हाला नातू होतील, तुम्ही राहा' म्हणाले.

असं सांगून आणखी श्रीपादवल्लभ स्वामी महाराज हे आणखी बाहेर पडलेले आहेत. जगत्कार्य करायचं, कार्य चाललेलं आहे. ते गोकर्ण क्षेत्रामधे तीन वर्ष पर्यंत जाऊन राहिले. तिथे ही अनेक मंडळी–भक्त, क्षेत्रामधे आलेली. साधक मंडळी, धर्मशील मंडळी– त्यांचाही उद्धार करायचं कार्य असेल, तर ते त्या ठिकाणी येऊन राहिलेले आहेत आणि मग अनेक जीवांचा उद्धार त्यांनी केला.

गोकर्ण क्षेत्राचं माहात्म्य काय आहे? हे आणखी सिद्धमुनींनी नामधारकाला प्रसंगानी सांगितलं. गोकर्णामध्ये येऊन कां राहिले भगवान्? शंकरांची जशी बारा ज्योतिर्लिंग आहेत, तसं हे स्वतंत्र **आत्मलिंग** आहे. गोकर्ण स्थान म्हणजे भगवंताचं, शंकरांचं स्वतंत्र लिंग आहे ते. बारा ज्योतिर्लिंगांच्या स्थानांपेक्षाही वेगळं आहे. म्हणून त्या गोकर्णाचं माहात्म्य, आणखी सिद्धमुनींनी नामधारकाला सांगितलं. म्हणून त्या क्षेत्रामधे भगवान श्रीपादश्रीवल्लभ महाराज हे तिथं जाऊन राहीले. तिथंही अनेक जीवांचा उद्धार केलेला आहे. गुरूचरित्रामधे श्रीपादवल्लभ अवताराची कथा आलेली आहे. आणखीन कांही थोड्याशा कथा एक, दोन, तीन कथा– फक्त श्रीपाद वल्लभांच चरित्र म्हणून थोड्या ह्यात दिलेल्या आहेत.

श्रीपादवल्लभांच कार्य अखंड चाललेलं आहे, ते कांही कुठं, अदृष्य फक्त झाले– एवढाच उल्लेख आहे. नरसिंह सरस्वती अदृष्य झाले. श्रीपाद वल्लभ अदृष्य झाले. श्रीकृष्ण परमात्मा अदृष्य झाले. भक्ती देऊन गेलेले उद्धवांना, एवढंच आहे. म्हणजे अजून आहेत ते. माणसा सारखं त्यांचं शरीर गेलं. चितेमधे दग्ध झालं, अमुक झालं वगैरे असं कांही संबंध नाही. तर आणखी, जरी अदृष्य असले तरी अशाप्रकारचे जे अधिकारी, उपासना करणारे जे आहेत, श्रेष्ठ भक्त– त्यांना त्यांचं दर्शन अद्यापी होत आहे. त्यांचं मार्गदर्शन होतं आहे. त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे ते वागताहेत तेव्हा त्यांचं कार्य अद्यापीहि चाललेलं आहे.

तर ते श्रीपाद वल्लभ गोकर्ण क्षेत्रामधे जाऊन राहिले. त्या गोकर्ण क्षेत्राचं माहात्म्य हे प्रसंगांनी आता सिद्धमुनी सांगणार आहेत. तेव्हा रोज सकाळच्या वेळेला गुरूचरित्र जे आहे ते ठरल्या प्रमाणे होत राहील. ते मराठीत आहे, त्याचाही अर्थ सगळयांना समजतोच आहे.

पण सायंकाळच्या वेळेस, त्यासुद्धा थोड्याच कथा आहेत. श्रीपाद श्रीवल्लभांच्या काय– किंवा नरसिंह सरस्वती महाराजांच्या काय, त्या कथा– किती त्यांचं चरित्र आहे ! अंबरीष वरद भगवंताचं चरित्र किती आहे? व्यास महर्षींनी फक्त थोडासा कथाभाग– तेवढा अंबरीषाला वर प्रदान केल, दुर्वास ऋषींच्या संकटातून वाचवलं, एवढंच सांगितलेलं आहे. भगवंतांनी कोणच्या कोणच्या भक्तांचा उद्धार आजपर्यंत केलेला आहे, किती केलेला आहे, काय सगळया कथा आहेत कां आपल्याला माहिती ? सापडणं शक्य आहे कां? कोणीतरी वर्णन करणं शक्य आहे कां? इतक छापणं तरी शक्य आहे काय?

असे अनंत आणखी कार्य चाललेली आहे भगवंताचे, अखंड आहे. हे जे मोठे भक्त आहेत, त्या भक्तांच्या उद्धाराकरताच त्यांचा जन्म आहे, अवतार आहे. तेव्हा श्रीपाद वल्लभांच्या थोड्या कथा आहेत. त्या कथांचं चिंतन आपल्याला आता उद्या करता येईल. त्यानंतर नरसिंह सरस्वती हा अवतार झालेला आहे. कारंज क्षेत्रामधे. तिथून मग ते क्रमाक्रमाने नरसोबाच्या वाडी पर्यंत आले, त्यानंतर आणखी पुढे गाणगापुर क्षेत्रामधे जाऊन राहिले. तिथं काय काय कथा घडलेल्या आहेत. कोणचे कोणचे जीव, अनेक जन्म, आणखी भगवंताचा प्रसाद संपादन करून, सत्कर्म करून त्यांनी आपलं जीवन काढलेलं आहे. **ईश्वराचा प्रसाद कसा संपादन केला? कशी श्रद्धा पाहिजे? कशी भक्ती पाहिजे? कशी सेवा केली पाहिजे? हे सगळं समजून सांगण्याकरता म्हणून हे गुरूचरित्र तयार झालेले आहे.** तेव्हा उद्यापासून आता राहिलेल्या श्रीपाद वल्लभांच्या चरित्राचा विचार आणि त्यानंतर नरसिंहसरस्वतीं अवतार– त्यांच्या चरित्राचा विचार, भगवंतांच्या आणखी या दरबारामध्ये सेवारूपाने, चिंतन रूपाने उद्यापासून आपल्याला करता येईल.

॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त ॥



॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे समश्लोकी गुरुसंहितेवरील प्रवचन
भगवंत मंदिर – बार्शी, जि. सोलापूर

दुसरा दिवस
अधिक श्रावण कृ. ९, शके १९०७, दि. १० ऑगस्ट १९८५
दुपारी ४.३० ते संध्याकाळी ७

मूकं करोति वाचालं
नामधारक उवाच ॥
शैवं तत्र गणेशेन कुतो लिङ्गं प्रतिष्ठितम् ।
सज्जनाश्रयमेतत्तु कथं श्रावय मे मुने ॥ (द्विसाहस्त्री ६.०१)

सिद्धमुनी नामधारकांना सद्गुरूंचे चरित्र सांगतात – ईश्वराची जशी अनेक चरित्रे आहेत, अनंत लीला परमात्म्याने केलेल्या आहेत अनेक अवतार धारण केले, त्या अवतारांची चरित्रे व्यास महर्षींनी लिहिलेली आहेत. अनेक पुराणं आहेत. पण ती सुद्धा कांही सर्व लिहिलेली आहेत असं नाही. सर्वज्ञ महामुनी ! पण ते जरी सर्वज्ञ असले, तरी ईश्वराच्या लीला अनंत आहेत. त्या सर्व लीलां आणखी लिहिणं, वर्णन करणं हे अशक्य आहे.

पृथुराजाची जी कथा भागवतामधे आलेली आहे, पृथुराजाने अश्वमेध यज्ञ केले. शंभर. इंद्राने त्या यज्ञामधे विघ्न उत्पन्न केलं. त्याला भीती – उत्पन्न झाली. शंभर अश्वमेध यज्ञ करणारा हा इंद्र होतो– देवांचा राजा इंद्र– याचं पद त्याला मिळतं, पण इतकं पुण्य झालं पाहिजे. ईश्वराच्या सृष्टीमधे असे मोठे मोठे अधिकार आहेत. सूर्य होणं... वरुण होणं... चंद्र होणं... अग्नी होणं... निरनिराळी रूपं किंवा निरनिराळी स्थानं– अधिकार आणखी ईश्वराच्या सृष्टीमधे जीवांना प्राप्त करून घेता येतो. पण त्या करता पुण्य किती आहे कोणाजवळ, याचा विचार केला जातो. देवांचा राजा व्हायचं म्हणजे शंभर अश्वमेध यज्ञ ज्यांनी केले, तो देवांचा राजा होऊ शकतो. इतरांना नाहीये तो !

तर त्या इंद्राला भीती निर्माण झाली की, हा पृथुराजा शंभर अश्वमेध यज्ञ करतो म्हणजे आपलं स्थान हा घेणार की काय ? अशी भीती वाटायला लागली, म्हणून त्याच्या यज्ञामधे तो विघ्न निर्माण करू लागला. पृथुराजाला हे समजलं. तो म्हणाला, 'इंद्राला मी शासन करतो'– मग भगवान स्वतः तिथे आले. त्यांनी त्याची समजूत केली. इंद्राला घेऊन आले. इंद्राने क्षमा मागितली. वगैरे कथा आहे भागवतामध्ये. पृथुराजाही मोठा भक्त होता. देवेन्द्राचं स्थान आपल्याला मिळण्याकरता कांही तो अश्वमेध यज्ञ करीत नव्हता.

यज्ञाच्या दोन पद्धती आहेत. एक आपल्याला स्वर्गादिक सुख मिळावं– स्वर्ग लोकामधे चांगलं स्थान, देवरूप मिळावं, अनेक भोग मिळावेत, याकरता एक यज्ञ करावेत असा एक प्रकार आहे. **दुसरा प्रकार म्हणजे आपली सगळी, अनंत जन्माची जी आपल्या हातून घडलेली पापं आहेत, ती सगळीही पापं नष्ट व्हावीत. आपण शुद्ध व्हावं– आपल्याला भगवंताचं स्वरूप समजावं आणि संसारातून आपण मुक्त व्हावं. या करताही यज्ञ करायचा आहे.** शुद्ध––आणखी चित्त शुद्ध होण्याकरता कर्मयोग आहे. यज्ञ अनेक प्रकारचे आहेत. हे पृथुराजा, ईश्वरप्रित्यर्थ करीत होता. त्यानी प्रार्थना केली, स्तोत्र स्तुती केली, भगवान महाविष्णुंची अन् काय मागितलं काय ?–

न कामये नाथ तदप्यहं क्वचिन्न यत्र युष्मच्चरणाम्बुजासवः ।
महत्तमान्तर्हृदयान्मुखच्युतो **विधत्स्व कर्णायुतमेष मे वरः । (भा. ४–२०–२४)**

ते वर देऊ लागले, 'मला हा वर द्या!' म्हणाले 'मला दहा हजार कान पाहिजेत'–– दहा हजार कान आता या शरीरात कुठे बसवायचे? काय बसवायचे ! ही त्यांची त्यांना काळजी आहे. कौशल्य त्यांचं आहे ते. संबंध शरीरामधे आणखी कर्णाची योजना व्हावी. कां? याच कारण त्यांनी सांगितलं, 'तुमची जी अनंत लीला आहे– किती तुमचं चरित्र ऐकायचं !' म्हणाले– दोन कानांनी शक्य आहे का ऐकायला येणं? म्हणून इतके कान मला द्या. याचा अर्थ सांगणारेही मला तितके

भेटले पाहिजेत ! – हे सगळं एका वरात मागितलं त्यानी ! भगवंताच्या लीला आणखी ऐकाव्यात, श्रवणभक्ती ही पहिली भक्ती आहे. **नवविधाभक्तीमधे श्रवणभक्ती पहिली आहे.**

तर ते श्रवण घडणं म्हणजे चित्त शुद्ध होतं. श्रवणेंद्रियांनी म्हणजे कानांनी ऐकायचं आहे, आणि भगवंताच्या लीला– त्यांची चरित्रं कानांनी ऐकत– श्रद्धेने, ऐकत असताना, भगवान स्वत: त्या मार्गाने आंत जाऊन आपलं चित्त आणखी शुद्ध करीत असतात– असं सांगतात मोठे मोठे महात्मे.

तर, हे सद्गुरूंच चरित्रं – ईश्वराचं चरित्रं जसं अनंत आहे तसं सद्गुरूंचंही चरित्र अनंत आहे. 'दत्तात्रेय अवतार' म्हणजे सद्गुरू अवतार आहे हा ! त्यांचंही अनंत चरित्र आहे. किती राजे लोकांना उपदेश केला? किती दैत्यांना–– त्यांचे सगळे शिष्य आहेत– देव शिष्य आहेत– दैत्य शिष्य आहेत– मानव शिष्य आहेत– राजेलोक शिष्य आहेत– गरीब शिष्य आहेत––सगळे शिष्य आहेत.

तर ते सद्गुरूंचं चरित्रही मोठं आहे. त्यांनी, दत्तात्रेयांनी 'श्रीपाद वल्लभ' हा जो अवतार धारण केला. त्यांचं चरित्रं सांगायला सुरूवात झालेली आहे. श्रीपाद वल्लभ स्वामी हे घरातून बाहेर पडले. त्यांना कुठेही मोह नाही– कांही नाही, 'आमचं घर – तुमचं घर'– असा संबंध म्हणजे आमच्या पुरता आहे तो. आम्ही जीव, आमचं अन् तुमचं करत बसतो. त्यांना सगळेच आपले आहेत. जगामधे जेवढे आणखी जीव आहेत, त्या सर्व जीवांचा उद्धार ते करू शकतात. 'गजेन्द्र' म्हणजे हत्तीचा जिथं उद्धार केला देवांनी– पशुच्या जन्माला गेलेला जीवात्मा– त्याचाही उद्धार केलेला आहे. मानवांचा उद्धार हा कां करणार नाहीत ते ? त्याकरता स्वतः सर्वत्र संचार करायचा– भिक्षा मागायची– घरोघरी जायचं, हे सगळे त्यांचे नियम आहेत.

तर श्रीपाद स्वामी हे गोकर्ण क्षेत्रामधे, तीन वर्ष राहिले असा उल्लेख आहे. सिद्ध मुनींनी सांगितलं– **'आत्मलिंग'** आहे, भगवान शंकरांचं. ते गोकर्णाचं माहात्म्य आणखी आता सांगायला त्यांनी सुरूवात केलेली आहे. तिथे कां राहिले? तर गोकर्णामधे जे आणखी शिवलिंग आहे– हे बारा लिंग प्रसिद्ध आहे, सबंध भारतामधे एकंदर द्वादश ज्योर्तिलिंगं प्रसिद्ध आहेत– शंकरांची स्वयंभू स्थानं आहेत– आपोआप प्रगट झालेली स्थानं, ती शिवलिंग आहेत आणि त्या ठिकाणी राहून भगवंताचं कार्य चाललेलं आहेत. मूर्तीच्या रूपाने, शिवलिंग स्वरुपानी, निरनिराळ्या आणखी अशा रुपानी ईश्वराचं वास्तव्य अनेक ठिकाणी आहे. आणि त्या त्या ठिकाणी असणारे जे जे पुण्यशील जीवात्मे आहेत, त्यांचा आणखी उद्धार करायचा आहे – मार्गदर्शन करायचं आहे. त्यांचा साधनमार्ग व्यवस्थित चालू रहावा या करता आणखी त्यांचा प्रयत्न आहे.

आता गोकर्ण हे जे स्थान आहे – हे शिवलिंग, त्या ठिकाणी आहे, पण हे निराळं शिवलिंग आहे, **आत्मलिंग** म्हणून त्याला म्हणतात. त्याकरता आणखी पूर्वीची कथा सिद्धमुनींनी

नामधारकाना सांगितली आहे– रावणाची कथा आहे. रावण हा दैत्य आहे– असुर आहे म्हणून प्रसिद्ध आहे. धर्माधर्माचा कांही विचार करायचा नाही. जमलं– आपल्याला उपयोगी पडल तेवढ्या पुरता देवधर्म मानायचा. केव्हाही सोडायचा, अशी वृत्ती आहे. तेव्हा तपःश्चर्याही त्याने केलेली होती. ऋषिपुत्र होता तो– कुबेराचा भाऊ आहे रावण –– म्हणजे कांही लहान, सामान्य नाहीये तो. पण तो इकडे असा या मार्गाकडे वळलेला आहे.

त्या रावणाची माता ही शिवभक्त होती. **कांहीतरी पुण्य असलं पाहिजे ना ! मातेचं – पित्याचं–कांही पुण्य असतं. त्यामुळे आणखी मुलाचा उत्कर्ष होतो.** तर त्याची माता, रोज नवीन शिवलिंगाची पूजा करायची– असा कांही तरी तिचा एक नियम होता. कुठे शिवलिंग नवीन असेल तिथं जायचं– त्याची पूजा करायची आणि मग येऊन जेवणखाण नंतर करायचं. एके दिवशी तिला नवीन शिवलिंग मिळालं नाही. जुनं शिवलिंग म्हणजे काय आणि नवीन म्हणजे काय? पण एक मनाची आवड आहे. प्रत्येक दिवशी नवीन स्वरूपाची पूजा करावी असं वाटत असेल तिला. एके दिवशी कांही मिळालं नाही– मग माती आणली तिनं, आणि मातीचं एक शिवलिंग तयार केलं आणि त्याची पूजा करीत ती बसली.

रावण हा रोज मातेच्या दर्शनाकरता येण्याचा त्याचा नियम होता. हे जरी असुर असले तरी त्यांचा कांहीतरी नियम असतो. उगीच इतका उत्कर्ष त्यांचा होत नाही. कांहीतरी पुण्यांश त्यांच्याकडून घडतो आहे. बाहेर देवधर्म, पापपुण्य जरी कांही मानायचं नाही– वाटेल तसं वागायचं, अशी वृत्ती जरी त्यांची असली, तरी मातेला रोज वंदन करायचं ! माता हीच माझी दैवत आहे, अशी एक त्याची बुद्धी होती आणि त्याप्रमाणे रोज दर्शनाकरता तो येत असे. त्या दिवशी आला. दर्शन केलेलं आहे आणि आई ही मातीचं शिवलिंग करून पूजा करीती आहे–– 'काय चाललयं आईसाहेब? हे काय कसली पूजा करता ?' म्हणाले– ती म्हणाली 'आज मला कांही शिवलिंग मिळालं नाही, मी आपली मातीच शिवलिंग केल आणि शिवपूजा करती आहे अन् देवाला इथं बोलावलं. देव कुठे ही येतो !' म्हणाले, 'मातीच शिवलिंग काय – चांदीचं काय – सोन्याचं काय– कशाचं रत्नाचं काय– ज्या ठिकाणी आपण भावनेनं, प्रेमानं बोलावू त्या ठिकाणी देव येतो आहे ! म्हणून आणखी मी इथंच पूजा करीत आहे'. तो म्हणाला, 'माझी आई तू आणि मातीच्या शिवलिंगाची पूजा करतेस?' म्हणाले, 'काय ! याचं फळ काय? ''फळ काय?'' म्हणाले, 'कैलास पर्वतावर जाऊन राहायचं मला आता शेवटी, आता मृत्यूनंतर' तो म्हणाला, 'इतकं अगदी शेवटी न् बिवटी कशाला ! मी आत्ताच कैलास पर्वत घेऊन येतो.' म्हणाले– 'रोज शंकराचीच पूजा तू करत जा म्हणाले ! हे शिवलिंग वगैरे कांही जरूर नाही. भगवान कैलासपती– कैलास पर्वत इथे आणून ठेवल्यानंतर ते येणारच की, त्यांच्यासहच आणायचं'.

असा आणखी पण केला– प्रतिज्ञा केली आणि रावण निघाला. कैलास पर्वताजवळ आलेला आहे. तो देवयोनीपैकीच होता. ऋषिकुमार होता. कांही तपःसामर्थ्यही होतं. शिवपूजाही करीत होता– पण बुद्धीही अशी होती मात्र ! बाकी सगळेही नियम होते, पण बुद्धी ही अशाप्रकारची – कर्माधर्माबद्दल कांहीही विचार करायचा नाही. अशी बुद्धी आहे. प्रकृतीचा कांही इलाज नाहीये. सात्त्विक, राजस, तामस – काय प्रकृति, आपली कशी असेल, कांही सांगता येत नाही.

आलेला आहे कैलास पर्वतावरती– जवळ आलेला आहे. आणि खाली, हात घालून तो कैलास पर्वत उचलायला लागला. आता एवढा मोठा डोंगर, हा उचलणार कसा? म्हणजे कांही सामर्थ्य त्याच्याजवळ होतं– एकदम आपलं डोंगर उचलायला गेला असं नाही. उचलायला लागल्याबरोबर तो हलायला लागला डोंगर. शक्ती आहे, रावणाजवळ. जिकडं तिकडं गोंधळ सुरू झाला. सगळी गणमंडळी घाबरली. पार्वतीमाता घाबरलेल्या आहेत. त्या शंकरांच्या जवळ गेल्या. 'अहो! काय तुम्ही स्वस्थ बसला !' म्हणाले 'इथे सगळा भूकंप झाला आहे, काय झालयं– कुणाला ठाऊक? आणि हे सगळं पडायला लागलयं'-- 'कांही नाही!' म्हणाले 'तो रावण आहे'– म्हणाले 'तो माझाच भक्त आहे. कांही खेळतो आहे'-- 'हा असला कसला जीव जाण्याचा खेळ?' म्हणाले 'कांहीतरी करा तुम्ही !' -- त्यांनी सहज, हातानी दाबल्या बरोबर, तो सापडला– डोंगराखाली सापडला. आणखी प्राण जाण्याची वेळ आली. शंकरांची प्रार्थना केली, 'क्षमा करा!' म्हणाला मग सोडून दिलं-- मोकळा झाला. मोकळा झाल्यानंतर, रावण हा उत्तम गवई होता. वेदाभ्यास ही उत्तम केलेला आहे त्याने. ऋग्वेद संहितेची पदं रावणाने पाडलेली आहेत. पद्पाठ जो आहे तो रावणाने केलेला आहे अस, प्रसिद्धी आहे. असा तो उत्तम गायनशास्त्राचा ज्ञाता– कोणच्या वेळेला कोणच्या रागाचं गायन करावं– कोणच्या वेळेची कोणची देवता आहे, कोणच्या रागाची देवता कोणची आहे– हे सगळं उत्तम ज्ञान-- आणि त्याप्रमाणे शंकर प्रसन्न व्हावेत म्हणून त्यांनी गायन करायला सुरूवात केली. गुरुचरित्रामधे पुष्कळ त्या गायनाचा उल्लेख त्यांनी केलेला आहे. अनेक प्रकारचे राग आहेत– रागिणी आहेत. पुष्कळ आहेत. भैरवी– भैरवी म्हणून एक देवता आहे. भैरवी राग आपण ऐकतो– शेवटी भैरवी गातात म्हणतात. तर त्या भैरवीचंही वर्णन संगीतशास्त्रामधे केलेलं आहे.

स्फटिकरचितपीठे रम्यकैलासशृङ्गे ।
विकचकमलपत्रैरर्चयन्ती महेशम् ॥
करधृतजपमाला पीतवर्णायताक्षी ।
सुखनिधिनिजमुक्ता भैरवी भैरवस्त्री ॥

(दामोदरचतुर–कृत–संगीतदर्पण अध्याय–२)

भैरवाची स्त्री भैरवी म्हणून आहे. तो राग आपण ऐकतो त्यालाच भैरवी म्हणतो. पण ती देवता आहे– भैरवी देवता.

एका स्फटिकाचं, मोठं सिंहासन आहे, कैलासपर्वताच्या एका शिखरामध्ये आणि समोर स्फटिकाचं आणखी मोठं सिंहासन मांडलेलं आहे. भगवान शंकरांची आणखी प्रतिमा, मूर्ति म्हणा– किंवा शिवलिंग तिथं आहे. आणखी त्या शंकरांची पूजा ती भैरवी करते आहे– असं तिचं वर्णन केलेलं आहे. म्हणजे प्रत्येक रागाच्या देवता त्या वेगळ्या वेगळ्या अशा प्रकारच्या संगीत शास्त्रकारांनी वर्णन केलेल्या आहेत. हा रावण म्हणजे उत्तम गवई– गायनशास्त्राचं उत्तम ज्ञान त्याला आहे. कोणची देवता– कोणच्या आणखी रागाची कोणची देवता आहे– त्या देवतेचं ध्यान करून त्यानी तो राग त्या रागात गायला सुरूवात करावी. असा उत्तम शास्त्रज्ञ आणखी भक्ती– भगवान शंकरांनी दर्शन द्यावं, एवढी तळमळ आहे.

त्याचं ते गायन उत्तम ऐकलं– शंकरही –– सर्व विद्या त्यांच्यापासूनच निघालेल्या आहेत ना!

ईशानः सर्व विद्यानां *भूतानां चेति च श्रुतेः ।*
वेदादीनामप्यधीशः स ब्रह्मा कैर्न पूज्यते ॥ **(दत्तपुराण–अष्टक १, अ. ४.२२)**

म्हणतात. भगवान हे सर्व विद्या, त्याचे अधिपती आहेत. सर्वही संप्रदाय– विद्यांचे संप्रदाय भगवान शंकरांच्यापासून निघालेले आहेत. 'आदिगुरू' त्यांना म्हणतात. सर्वांचे गुरू आहेत. त्यांनी ते गायन ऐकलं, म्हणाले, काय म्हणाले, 'रावण असे ना राक्षस, का असुर असेना का? उत्तम– मात्र त्या कलेमधे निष्णात आहे!' आले ते. प्रसन्न झाले आणि रावणाच्या जवळ येऊन त्याला विचारलं– 'रावणा ! फार कला उत्तम आहे बुवा तुझ्याजवळ. तू उत्तम अभ्यास केलेला आहेस. काय तुला पाहिजे मागून घे, म्हणाले.' प्रसन्न झाले भगवान शंकर – आणखी 'काय वाटेल ते मागून घे!' म्हणताहेत––

आता तो आईच्या करता आलेला आहे ना! आईला कांहीतरी पाहिजे– कैलास पर्वत मिळावा, शंकरांची, रोज पूजा, आईला करता यावी, अशी चांगली बुद्धी आहे. पण आता अगोदर 'शंकर प्रसन्न झाल्यानंतर आपलं अगोदर मागणं मागून घेऊ मग आईचं मागू' म्हणाले– म्हणून त्यांनी सांगितलं– 'सर्व सिद्धी मला मिळाव्यात, सर्वांमध्ये मी अजिंक्य असावं. सर्वत्र माझी सत्ता असावी' वगैरे मागून घेतलं. दिलं त्याला. 'कांही हरकत नाही!' **शंकराला प्रसन्न करून घेऊन रावण सर्वसत्ताधीश झालेला आहे––** म्हणजे त्यानेही हा प्रयत्न केला. प्रयत्नवाद जो आहे आपल्याला सत्ता मिळावी, आपल्याला संपत्ती मिळावी– याच्याकरता प्रयत्न केला पाहिजे. याबद्दल कांहीही आणखी कुणाचाही वाद नाही. पण हा जसा व्यवहारातला आपण प्रयत्न करतो–– धन मिळवायचं आहे– संपत्ती मिळवायची आहे– सत्ता मिळवायची आहे, त्याच्याकरता जो

प्रयत्न करायचा, तो प्रयत्न सुद्धा न्यायानी केला पाहिजे म्हणतात. गृहस्थ– मनुष्याचे जे नियम सांगितले आहेत त्यांनी, शास्त्रकारांनी– **'न्यायार्जितधनः'** गृहस्थाने धन अवश्य मिळवावं– पण न्यायाने धन मिळवावं म्हणतात. त्याशिवाय संसार चालायचा कसा? त्यानंतर दुसरं कार्य गृहस्थाचं म्हणजे **'तत्त्वज्ञाननिष्ठः'** ! संसार करताना धनही मिळवावं पण न्यायाने मिळवावं. तत्त्वविचार जो आहे , काय तत्त्व आहे ! खरं काय आहे, जगामधे, हा एक विचार करावा. विचार केलेला आहे, मोठया मोठया महात्म्यांनी, ग्रंथरूपाने विचार आहे, सांगणारे ही महात्मे आहेत तत्त्व काय आणि अतत्त्व काय? हे समजून घेतलं पाहिजे. कोणाच्या मागं लागायचं– खोट्याच्या मागं लागायचं कां खऱ्याच्या मागं लागायचं हे समजले पाहिजे ना ! खोट्यालाच खरं समजून आपण जर मागं लागलो तर हातात काय पडणारंय ? म्हणून तत्त्वज्ञाननिष्ठः– तत्त्व विचार हा त्या गृहस्थाने कांहीना कांही केला पाहिजे रोज.

न्यायागतधनस्तत्त्वज्ञाननिष्ठोतिथिप्रियः ।
श्राद्धकृत्सत्यवादीचगृहस्थोपीहमुच्यते ।
(स्कन्दपुराण काशीखण्ड स.अ. ४०.६४)

अतिथिप्रियः तिसरा गुण आहे, गृहस्थाच कर्तव्य– अतिथी– कुणीही येणारा पाहुणा, जरी असला तरी त्याचं आणखी आदरातिथ्य वगैरे करावं. हा एक त्याचा धर्म आहे.

श्राद्ध करायचं पितरांचं– माता पितरांचं श्राद्ध– कृतज्ञता आहे ही– त्यांनी जे आपल्याला आणखी संगोपन केलेलं आहे, विद्या दिली– आपलं सर्व संरक्षण केलं, म्हणून आपलं कर्तव्य म्हणजे त्यांचं ही पूजन वगैरे, त्यांच्याकरता हे सगळं श्राद्ध कर्म ! हेही गृहस्थाचा धर्म आहे. आणि **सत्यवादीच** हे मोठं सांगितलं– गृहस्थानी खरं बोललं पाहिजे– म्हणजे बाकीच्यांनी खरं बोलू नये असा याचा अर्थ घ्यायचा नाहीये. पण गृहस्थांच्या पाठीमागं हे आहे. सत्यवादी ! अशा रीतीनं वागणारा जो गृहस्थ आहे तो सुद्धा **'विमुच्यते'** म्हणतात. संसारातून आणखी मुक्त होऊ शकतो.

तर या प्रमाणे न्यायाने धन मिळवायचं आहे. न्यायाने सत्ता मिळवायची आहे. प्रयत्न करायचा, तो प्रयत्न या प्रमाणे करावा. आता यानी जो प्रयत्न केला, मोठे मोठे श्रेष्ठ महात्मे, धर्माचरण करणारे– पांडवांच्यासारखे, यांनीही राज्य मिळविण्याकरता प्रयत्न केलेलाच आहे की! वनवासात जरी पांडवांना पाठवून दिलं कौरवांनी. एक वर्ष अज्ञातवासासारखा एक भयंकर मोठी अवस्था होती ती, त्यातूनही त्यांची सुटका झाली, ईश्वरकृपेने–अन् नंतर त्यांनी आपलं राज्य मागितलं– अर्ध राज्य तरी आम्हाला द्या, अगदी एकेक गांव जरी एकेकाला दिलं तरी हरकत नाही, इतक्या आणखी सामोपचारांनी त्यांनी प्रयत्न केला. शेवटी मग युद्ध झालेलं आहे– **म्हणजे त्यांनी सुद्धा राज्य आपलं आपलं मिळवावं, म्हणजे धर्माचरण आपल्याला चांगलं करता येईल.**

उद्देश धर्माचरणाचा आहे. त्याकरता प्रयत्न केलेला आहे. ईश्वराची उपासना केली. धर्माचरण केलेलं आहे. धर्माचरण करणं हा सुद्धा एक प्रयत्नच आहे ना ! शास्त्रीय प्रयत्न आहे तो– शास्त्रांनी सांगितल्याप्रमाणे––तेव्हा असा प्रयत्न करणारे जे महात्मे आहेत, त्यांना सुद्धा आणखी संसारातलं जे कांही उत्कर्ष म्हणून आहे– उन्नती म्हणून ज्याला म्हणतात, ती उन्नती न्यायानी वागणारा, धर्मशील शास्त्रकार सुद्धा, ईश्वरभक्त जो आहे त्यालासुद्धा उन्नती होऊ शकते.

तेव्हा हा जरी रावण असुर होता तरी त्याचं इकडं लक्ष आहे. एक शंकराकडं लक्ष आहे– शिवभक्त आहे. मातृभक्त आहे. त्यादृष्टीनं आणखी शंकरांना त्यांनी सांगितलं की, 'माझी अशी सगळी व्यवस्था व्हायला पाहिजे. सगळी सत्ता माझ्या हातात मिळायला पाहिजे. अजिंक्य मी व्हावं !' वगैरे वगैरे–– स्वतःकरता अगोदर मागून घेतलं आणि नंतर म्हणालेला आहे की, 'मी माझ्या आई करता आलो, म्हणाले.' आईची आठवण नंतर झाली, कांही हरकत नाही. पण झाली– झाली एवढं खरं ! 'आमची माता' म्हणाले 'तुमची पूजा रोज करती आहे. आज तिला आणि नवीन शिवलिंग मिळालेलं नाही म्हणून ती आणखी मृत्तिकेचं, मातीचं शिवलिंग करून पूजा करायला लागलेली आहे– मला ते बरं वाटलं नाही, म्हणून कैलास पर्वतच आमच्या लंका राजधानीमध्ये नेण्याकरता मी आलेलो आहे, म्हणजे रोज आपलं दर्शन माझ्या आईला घडेल, मलाही घडेल,' म्हणाला 'आणखी तिथे चला आपण !' भगवान शंकरांनी आणखी त्याला सांगितलं 'कैलास पर्वत घेऊन काय करतोस?' म्हणाले, 'माझ्याजवळ एक आत्मलिंग आहे– स्वतंत्र अशा प्रकारचं ! ज्योतिर्लिंगापेक्षा निराळं आहे. तेच तुला मी देतो' –– प्रसन्न झाल्यानंतर कांही नाही **'आशुतोष'** म्हणतात भगवंताला, शंकराला, 'सगळ्या देवांमधे तीन देवामध्ये कोण लवकर संतुष्ट होणारे कोण देव आहे?' असं ऋषींनी विचारलं म्हणे– तर भगवान शंकर हे लवकर संतुष्ट होतात.

रावणावर संतुष्टच झाले. 'घे' म्हणाले– 'हे आत्मलिंग घेऊन जा. तुझ्या राजधानी मध्ये हे स्थापन कर. रोज याची पूजाअर्चा, अभिषेक करत जा. म्हणजे तूच ईश्वर होशील !' इतकंही बोलून गेले. रावणाला ते शिवलिंग मिळालं. आणखी रावण निघालेला आहे. याच्यामधे आणखी खाली टीकेमध्ये महाराजांनी लिहीलेलं आहे–

व्याजेनैव खलो जय्य *इत्युक्त्वा प्रेरयन्मुनिम् ।*
विघ्नेशं च तदा विष्णुर्लिङ्गाहरणहेतवे ॥ **(द्विसाहस्त्री ६–१६)**

हा मुळात खल आहे. बुद्धी याची चांगली नाही. शिवलिंग घेऊन जातो आहे. शंकरांची पूजा करतो आहे. सगळं करतो आहे, पण त्याचं ध्येय काय आहे? सर्व लोकांवरती सत्ता आपण मिळवायची–– सगळ्या लोकांना, आणखी आपलं ऐकून राहिले तर ते बरं– जे ऐकणार

नाहीत त्यांचा आणखी नाश करायचा. ही वृत्ती मुळातूनच आहे. त्याच्या हातात हे शिवलिंग जाऊन उपयोग नाही– हा विचार झालेला आहे.

नारदांनी जाऊन ही बातमी इंद्राला सांगितली. इंद्र घाबरला, इंद्र ब्रह्मदेवांच्याकडं गेलेला आहे, आणि ब्रह्मदेव. त्या सगळ्यांना, दोघांना घेऊन महाविष्णुंच्याकडे आले. ते म्हणाले, 'काय सगळेच बिघडून गेलं!' म्हणाले 'शंकरांनी आणि त्या रावणाला आत्मलिंग देऊन ठेवलं' म्हणाले– 'आणखी त्याला वर ही दिला, तीन वर्ष जर तू पूजा–अभिषेक वगैरे या शिवलिंगाला वरती करशील तर तूच शंकर होशील!' म्हणाले 'ईश्वर होशील!' 'आता याला काय म्हणायचं!' म्हणाले, 'असा वर त्याला द्यायचा?' महाविष्णु लगेच गडबडीनं निघाले. कैलास पर्वतावरती आले, शंकरांना म्हणाले, 'काय करताय हे तुम्ही म्हणाले?, रावणाला शिवलिंग तुम्ही दिलं– आत्मलिंग दिलं?' 'हो दिलं!' म्हणाले, 'उत्तम गवई आहे. चांगला भक्त आहे मला असं वाटलं म्हणून दिलं!' म्हणाले, 'पार्वतीला जरी दे म्हटलं असतं तरी मी दिली असती'. आता कांय म्हणायचं? 'त्याने मागितली असती तर दिली असती!' म्हणाले. 'किती वेळ झाला?' 'कांही नाही आता एक चार पाच घटका, एक तास दोन तास झाले असतील. अजून कांही तो पोचला नसेल.' म्हणाले, 'बरंय! जातो आम्ही' म्हणाले.

मग भगवान विष्णूंना, ब्रह्मदेवांनी त्यांना सगळं सांगितलं की, हा रावण म्हणाले 'तुम्हालाच याची व्यवस्था करावी लागेल. याला मारायचं, तुम्हालाच मारावं लागेल. रामावतार घेऊन. याकरता अगोदरच याला हे करा तुम्ही. सामर्थ्य हा मिळविणार आहे पण, त्या सामर्थ्याचा दुरूपयोग करणार आहे. याला सामर्थ्य मिळून उपयोग नाही – बुद्धावतार जो झालेला आहे तो याकरता झालेला आहे.

ततः कलौ सम्प्रवृत्ते **सम्मोहाय सुरद्विषाम्।**
बुद्धो नाम्नाजनसुतः कीकटेषु भविष्यति ॥ **(श्री भा.१/३/२४)**

हे जे सुरद्वेष करणारे जे आहेत, दैत्य–असुर यांच्या बुद्धीमधे मोह निर्माण करण्याकरता बुद्ध अवतार झालेला आहे. वैदिक कर्म ही त्यांनी करू नयेत, देवांनीच ठरवलं आहे. वैदिक कर्म– सगळी यज्ञयागादिक करायची, सामर्थ्य मिळवायच. राजस किंवा तामस कर्म, तामस कर्माचं कांही फळ नाही.

विधिहीनमसृष्टान्नं मन्त्रहीनमदक्षिणम्।
श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ॥ (भ.गी. १७–१३)

वगैरे जे सांगताहेत. याचं कांहीही फळ नाही. निष्फळ आहे. पण राजस कर्म जरी केलं, अभिमान धारण करून, फलेच्छेने जरी कर्म केलेले आहे, त्याचं फळ मिळतं. विधीहीन नाही,

यथाविधी ते करताहेत, असुर जरी झाले, यथाविधी केल्यामुळे त्यांच्या कर्माचं फळ निश्चित त्यांना मिळू शकतं. दैत्यांनी जरी यज्ञकर्म केलं तरी त्याचं फल त्यांना मिळतं. आता हे जर यज्ञ करायला लागले, तर काय म्हणाले 'हेच देव होऊन बसणार आता !' आणि सगळ्या एकंदर प्रजाजनांना, सगळ्यांना आणखी त्रास देणार– सामर्थ्य मिळवून ! म्हणून बुद्धावतार महाविष्णुंनी घेतला. त्यांच्या बुद्धीमधे मोह निर्माण केला. 'ही कर्म चांगली नाहीत !' म्हणाले– यज्ञकर्म वगैरे. ही सगळी अशा प्रकारची **'क्षय: विषयलिप्तः'** आहे, क्षय: आहे अतिशय आहे त्याचप्रमाणे हिंसा आहे याच्यामधे–– असं कांहीतरी सांगून त्यांचा बुद्धिभेद केला आणि त्या कर्मापासून त्यांची बुद्धी बाजूला केलेली आहे. हा एक उपकार केलेला आहे– बुद्ध अवताराने ! परंतु यज्ञकर्माबद्दल अश्रद्धा निर्माण केली, वैदिक धर्म–वेद प्रामाण्य मानत होते ते – ती बुद्धी त्यांची बदलून टाकली, म्हणून पूज्य, आणखी भारतवर्षामधे त्यांची पूजा नाहीये– बुद्धांची पूजा नाहीये. बुद्धाचं स्मरण, आहे रोज, आणखी संकल्पामधे 'बौद्धावतारे'– रोज स्मरण आहे बुद्धाचं. कोणताही संकल्प लहान मोठया कर्माचा करत असताना 'बौद्धावतारे' या ठिकाणी भारतामधे झालेला आहे हे स्मरण करून संकल्प करायचा.

तर त्यांना संमोह जसा निर्माण केला तसा 'हे महाविष्णु' ! आता ते त्या रावणानी जे शिवलिंग नेलेले आहे त्याचा तो दुरूपयोग करणार आहे. त्याच्या हातात ते शिवलिंग जाऊन उपयोग नाही– सज्जन महात्मा कोणी असेल तर त्यांनी नेलं तर चालेल' म्हणाले– म्हणून महाविष्णुंनी नारदाना सांगितलं. अगोदर सुदर्शन चक्र सोडून आणखी सूर्य आच्छादित केला. म्हणजे सूर्यास्ताचा समय झालेला आहे, असं लोकांना वाटायला लागलं. नारदांना सांगितलं– 'नारदा ! तुम्ही लौकर जाऊन रावणाला गाठा' म्हणाले 'त्याच्या बरोबर बोला, चला, त्याचा जितका वेळ जाईल तितका जाऊ दे– आम्ही बाकीची पुढची सगळी व्यवस्था करून येतो'–– नारदांना पाठवून दिलेलं आहे. आणि भगवान गणेश जे आहेत, विघ्ननाशक, त्यांच्याकडे आले. 'तुमच्याकडे एक काम आहे,' म्हणाले 'हे शिवलिंग जे आहे, आत्मलिंग – रावण घेऊन चाललेला आहे. शंकरांनी त्याला दिलेलं आहे म्हणाले. पण ते आपल्याला त्याच्या लंका राजधानी पर्यंत पोचू द्यायचं नाही, त्याकरता तुमचं सहाय्य पाहिजे. रस्त्यामधे रावण भेटेल' म्हणाले 'संध्यावंदन वगैरे करण्याची वेळ झाल्यामुळे तो संध्यावंदन वगैरे करण्याच्या वेळेला ते शिवलिंग तुमच्या जवळ देईल'– लहान मूर्ति होती गणेशांची – बालरूप मूर्ति, तर तुम्हाला पाहून त्याच्या मनामधे विश्वास निर्माण होईल. **सिद्धी–बुद्धी पती आपण आहात महाराज ! बुद्धी चित्तामधे उत्पन्न करणं आणि त्या कर्माचं फळ सिद्धीही देणं दोन्ही आपल्या ताब्यामधे आहेत,** म्हणून हे आपण कार्य करा. ते शिवलिंग तुमच्या हातात आलं की, जमिनीवर ठेऊन टाका म्हणजे झालं' शंकरांनी सांगितलेलं आहे – लंका राजधानीमधे पोचेपर्यंत हे शिवलिंग

जमिनीवर ठेऊ नकोस, तिथेच राहील ते'– गणेशांना सांगितलेलं आहे. त्यांनी आपलं कांही लाडू द्या, मोदक द्या म्हणून कांही मागितलं, दिलेलं आहे लाह्या वगैरे, निघाले. नारदमहर्षि पुढे गेलेले आहेत. म्हणजे धर्माने वागावं, सत्याने वागावं हे सगळं खरं आहे, पण कोणाबरोबर? हाही एक विचार आहे ना ? एकंदर सबंध लोककार्य किंवा समाजाचं सगळ्या जीवांचं कार्य बिघडायची वेळ आलेली असताना धर्मानी वागायचं म्हणजे काय आहे हे ? इथे सत्य–असत्याचा विचार थोडासा वेगळा आहे, वेगळा मानला पाहिजे. म्हणून महाविष्णूंनी ही योजना केलेली. नारदमहर्षींनी त्याला गाठलं.

रावणाच्या नगरामधे हे शिवलिंग गेलं की तो उपासना सुरू करणार, तो स्वतः शंकर बनणार, त्या नगरीलाही कैलास पर्वत बनवणार, हे घडू नये या हेतूने आणखी विष्णुंचा प्रयत्न चाललेला आहे.

नारद येऊन भेटले रावणाला रस्त्यामध्ये, चौकशी केली, ''काय रावणा, कुठून आलास'' वगैरे. रावणानी भगवान शंकर कसे संतुष्ट झाले, आत्मलिंग दिलेलं आहे सर्व सांगितले. नारदांनी त्याला बोलण्यामधे गुंतवलं. तू किती भाग्यवान वगैरे. रावणाला लंकेला जायची घाई होती. तेव्हा नारद म्हणाले, ''तू ऋषिकुमार आहेस. संध्यावंदनाची वेळ आहे. तर संध्या केल्याशिवाय पुढे कसा जातोस? विचार कर'' रावण असुर असला तरी संध्या करत होता. शास्त्राची आज्ञा पाळायची बुद्धी होती. पण हे शिवलिंग कुठे ठेवायचं? कोणतंही कर्म करताना ते जवळ ठेवायचं नाही. ते कुठं तरी ठेवायचं आणि नंतर कर्म करायचं. हे शंकरांचं सांगणं होतं.

आता हे शिवलिंग कोणाजवळ तरी दिलं पाहिजे तरच संध्या करता येईल. इतक्यात हे गणेश, ब्रह्मचारी वेषात तिथे फिरताना दिसले. विश्वास वाटला त्याच्यावरती रावणाला व त्याने त्या बटुला विचारले, कोण, कोणाचा मुलगा तू? तुझे आई वडिल कोण? गणेशाने, मला तुझी भीती वाटते, असे दाखविल्यावर त्याची रावणाने समजूत काढली. तू माझी संध्या होईपर्यंत हे लिंग तुझ्याजवळ देतो, ते घेऊन उभा रहा, सांगितले. गणेशाने, ते जड आहे, नको, मला इतकं जड लिंग घेता येणार नाही म्हटले, तरी पण रावणाने त्यांची समजूत वगैरे केली आणि विरोधी अशा गणेशांच्या हातात ते शिवलिंग दिले. गणेशांचं लहान रूप त्यामुळे रावणाला संशय येण्याचं कारणच नाही ना ! तो संध्या करायला गेला. त्यावेळी गणेशांनी सांगितलं, ते जर मला जड झालं तर मी फक्त तीन वेळा बोलावीन, तू जर आला नाहीस तर याच ठिकाणी मी ते जमिनीवर ठेवीन. सगळे देव आकाश मंडळामध्ये जमा झालेत. थोडा वेळ वाट पाहिली. हांक मारली, रावणा, हे जड झालंय म्हणाले, 'ठेवू कां खाली?' तीन वेळा बोलावून सुद्धा रावण न आल्याने ते शिवलिंग जमीनीवर ठेवले आणि त्याची स्थापना झालेली आहे. संध्या आटोपून आला रावण, भूमीवर लिंग ठेवल्याने गणेशांना मारू लागला. 'पित्याला सांगतो', असे म्हणून गणेश निघून गेले.

कैलास पर्वत उचलणारा रावण, ते शिवलिंग धरून हालवतो आहे, ओढतो आहे पण त्याला ते काढणं शक्य झालं नाही. खरोखरच महाबलवान रावणाला देखील ते काढता आलं नाही. महाबळेश्वर त्या लिंगाचं नांव, थोडसं मुरडून काढतो आहे, गोकर्णाकृती झाली. त्यामुळे भगवान सदाशिव या आत्मलिंगरुपाने नेहमी या ठिकाणी आहेत. **गोकर्णमहाबळेश्वर या नावाने हे ठिकाण प्रसिद्ध आहे.**

आता या गोकर्ण क्षेत्रात कोणाचा उद्धार झाला त्याबद्दल एक कथा सांगताहेत सिद्ध ! मित्रसह नांवाचा एक धार्मिक राजा होता. भगवद्भक्त होता. प्रजापालन उत्तम करे. त्याने एकदा शिकारीकरिता वनामध्ये गमन केले. शिकार करताना एक दैत्य त्याला भेटला. राजाने बाणवर्षाव करून त्या दैत्याला मारले. त्या दैत्याचा बंधु तिथे होता. आपल्या बंधुला दैत्याने सांगितले की, राजाने मला मारलं आहे त्याचा सूड तू घे ! नंतर मनुष्यवेष धारण करून त्या दैत्याचा बंधु राजधानीमधे आलेला आहे. आणखी राजवाड्यामध्ये राजाच्या अनुज्ञेने नोकरीकरिता राहिलेला आहे. तिथे स्वयंपाक करणे वगैरे कामे करतो आहे.

एके दिवशी वसिष्ठ महर्षींना राजाने भोजनाकरता बोलावले आहे. तिकडे असं झालं की हा जो बंधु होता दैत्याचा, त्याने वसिष्ठांचं रूप घेतलं आणि राजवाड्यात जाऊन राजाला सांगितलं की मला जेवतांना नरमांस आणून द्या. राजा म्हणाला कांही हरकत नाही. मग मनुष्यवेष धारण केलेला दैत्याचा जो बंधू होता त्याने पाकशाळेत नरमांस तयार केलं आणि वसिष्ठ ऋषींच्या पात्रामध्ये ते वाढलं. ते पाहिल्याबरोबर अत्यंत रागावून त्यांनी मित्रसह राजाला शाप दिला, 'तू राक्षस होशील हे असलं कर्म करणारा' राजा म्हणाला 'तुमच्याच सांगण्याप्रमाणे मी केलंय. मीही शाप देतो ! 'शाप देण्याकरिता हातात जल घेतलेलं आहे. परंतु त्याची धर्मशील पत्नी त्याला म्हणाली, 'गुरुंना शाप देणं बरं नाही', वसिष्ठांची राणीने क्षमा मागितली. वसिष्ठांनी सांगितले, 'बारा वर्षे हा राक्षस बनून राहील. नंतर तो पुन्हा राजा होऊन येईल.' राजाने हातातील जल आपल्याच पायावर टाकले. त्याचे पाय सगळे काळे झाले. कल्मषपाद म्हणतात त्याला. आणि राक्षस होऊन तो वनामध्ये गेला.

येणाऱ्या जाणाऱ्याला त्याने ठार मारावं, नरमांस भक्षण करावं असं करायला लागला. एके दिवशी एक विद्वान ब्राह्मण आणि त्याची पत्नी त्या अरण्यातून जात असताना, ह्या राक्षसाने त्याला खाण्यासाठी धरले. त्याच्या स्त्रीने राक्षसाची पुष्कळ विनवणी केली, ''माझा पती विद्वान आहे, मला सौभाग्य दान दे'' ! पण राक्षसाने न ऐकता त्या ब्राह्मणाला मारलं आणि त्याचं मांस भक्षण केलं. आपल्या पतीच्या अस्थी त्या स्त्रीने जमा केल्या व सहगमन करायच्या वेळेला राक्षसाला शाप दिला, तू खरा राजा असून आता राक्षस झाला आहेस. आणि बारा वर्षानंतर तू पुन्हा राजा होशील. परंतु स्त्रीसंग जर करशील तर तुला तात्काळ मृत्यू प्राप्त होईल.

त्याप्रमाणे बारा वर्षानंतर मित्रसह राजा परत आलेला आहे. राजवाड्यामध्ये. आपल्या पत्नीला त्याने सर्व सांगितलं. त्या पतिव्रता स्त्रीचा शाप, मृत्यू येईल म्हणून तिने सांगितले आहे. मग सर्वांचा विचार, सल्ल्याने त्या शापातून मुक्त होण्यासाठी तीर्थयात्रा वगैरे करतो आहे. परंतु ब्रह्महत्या झाली आहे, आणि त्या ब्राह्मणीचा शाप झाला आहे पुन्हा. त्यातुन त्याला कांही मुक्त होता येईना. चिंताग्रस्त असा तो मिथिला नगरीच्या परिसरात एका झाडाखाली बसलेला असतांना, गौतम ऋषी शिष्य मंडळींसह आले. राजाला त्यांचं दर्शन झालं. चिंताक्रांत राजाला त्यांनी विचारलं, 'तुला कसली चिंता उत्पन्न झाली आहे?' राजाने सगळा वृत्तांत सांगितला.

मग गौतमांनी त्याला सांगितलं, गोकर्ण हे मोठं तीर्थक्षेत्र आहे, त्या क्षेत्रामधे जाऊन तू पूजा-अर्चा वगैरे कर म्हणजे तुझा हा दोष जाईल. गौतम ऋषींनी गोकर्ण क्षेत्राचे प्रत्यक्ष पाहिलेले माहात्म्य सांगितले. ते म्हणाले असेच आम्ही एका शिवरात्रीच्या दिवशी तिथे बसलो होतो. एका मरणोन्मुख चांडाळ स्त्रीचं तिथे प्राणोत्क्रमण झाल्याबरोबर शिवदूत विमान घेऊन आले. त्यांना आम्ही विचारलं, 'कोणाकरिता विमान घेऊन आलात?' ते म्हणाले, 'हिला न्यायचं आहे.' आम्ही म्हटलं, 'हिनं काय पुण्य केलंय की हिला तुम्ही कैलास पर्वतावर घेऊन जाणार? ही तर त्याला अयोग्य आहे, पापी आहे.'

मग त्या शिवदूतांनी तिचा पूर्व जन्मीचा सगळा वृत्तांत सांगितला. ही स्त्री पूर्व जन्मामधे एका कुलीन ब्राह्मणाच्या घरात जन्माला आली. उपवर झाल्यानंतर त्याच गावामधे हिचा विवाहही करून दिला. मातापितरांना आनंद झाला. पुढे दैवयोगाने कांही दिवसांनी तिच्या पतीला मृत्यू आलेला आहे. ही माहेरी येऊन राहिलेली आहे. परंतु तारुण्य आहे, मोह आहे विषयांचा. त्या मोहामधे सापडली आणखी पापकर्म हिच्या हातून घडलेलं आहे. समजलं सगळ्या लोकांना. हिला बहिष्कृत केलेलं आहे आणि एका उत्तम व्यापाऱ्याच्या वाड्यामध्येच ती जाऊन राहिलेली आहे. त्यानेही ठेऊन घेतलेलं आहे. त्याचं सगळं घर ती सांभाळती आहे, मद्यपान काय, मांसाहार काय, पूर्ण स्वतंत्रताच आहे, कोणी आवरणारे नाही.

एके दिवशी मद्यपान करून गाईचं वासरुच तिने मारलं. त्याचं मांस शिजवलं व मस्तक शिंक्यावर ठेवलं. सावध झाल्यावर वासराचं मस्तक पाहिलं, तिला दुःख झालं. ते मस्तक तिने जमिनीत पुरून टाकलं आणि वासरू वाघाने नेलं असं खोटंच पतीला सांगितलं. पापकर्म करण्यामध्येच तिचं आयुष्य गेलं म्हणाले. नंतर तिला दुसरा जन्म मिळालेला आहे. आणि जन्मापासूनच सगळे शरीर रोगाने भरलेले, अंगातून पू वहातो आहे, कुष्ठ झाले आहे. पूर्वकर्मामुळे हा रोग झालेला आहे.

आईबाप असेपर्यंत कसेतरी तिचं पालनपोषण त्यांनी केलं. ते गेल्यानंतर भिक्षा मागून हिने दिवस काढले . एकदा गावातली मंडळी शिवरात्रीच्या यात्रेला, गोकर्ण क्षेत्राला जायला निघाली.

अंध होती ही आणि त्यांच्या बरोबर गोकर्ण क्षेत्री येऊन पोचली म्हणाले. शिवरात्रीचा दिवस आहे. भूक लागलेली आहे. आहार नाही. लोकांना अन्न द्या म्हणून मागते आहे. पण अन्न कोण देणार? कोणीतरी तिच्या हातावर बेलाची पाने टाकली आहेत. तिने वास घेतल्यावर समजले की हा खायचा पदार्थ नाही. टाकून दिली ती पाने. ती नेमकी शिवलिंगावर जाऊन पडली. आहार नाही, जागरण घडलेलं आहे, यथाविधी शिवरात्री व्रत घडलेलं आहे. आणि त्याचं फळ हिला मिळालेलं आहे. तिचा उद्धार झालेला आहे. अज्ञानानीही आणखी जरी सत्कर्म घडलं तरीसुद्धा त्याचं फल मिळतं. मग ज्ञानपूर्वक, श्रद्धेनं जर सत्कर्म, पुण्यकर्म केलं तर त्याचं उत्तम फल मिळतं.

तेनोभौ कुरुतो यश्चैतदेवं वेद यश्च न वेद ।
नाना तु विद्या चाविद्या च **यदेव विद्यया करोति**
श्रद्धयोपनिषदा तदेव वीर्यवत्तरं भवतीति
खल्वेतस्यैवाक्षरस्योपव्याख्यानं भवति । **(छांदोग्य उपनिषद १.१.१०)**

ज्ञानपूर्वक कोणतंही कर्म करणं म्हणजे श्रद्धा राहते. अज्ञानात श्रद्धा नाही असा अर्थ नाही. पण अत्यंत अज्ञान असलेल्याला वेळेस श्रद्धा-अश्रद्धा कांहीच नाही. या म्हातारीला काय श्रद्धा-अश्रद्धा कुठली आहे. वास घेतला, आता हा खाण्याचा पदार्थ नाही, राग आला आणि टाकून दिल ते. पण ते शिवलिंगावर पडलेलं आहे.

तेव्हा अज्ञानामुळे घडलेलं पुण्यसुद्धा इतकं आणखी फलद्रुप झालं म्हणाले. म्हणून ही त्यातून मुक्त झाली, आणि निघाली. गोकर्ण क्षेत्रातलीच कथा त्यांनी सांगितली वाटतं. गोकर्णामधे सगळी शिवलिंग आहेत. गौतमऋषींनी ही गोकर्णक्षेत्राची कथा सांगितली. तर तू जा म्हणाले. त्या मित्रसह राजाला सांगितलं. तो तिथं गेलेला आहे. त्या आत्मलिंगाची महाबळेश्वराची पूजा-अर्चा अभिषेक वगैरे केला आणि त्या ब्रह्महत्या दोषातून तो राजा मुक्त झाला.

ही कथा मुद्गम सिद्धमुनींनी आणखी या नामधारकाला शिष्याला सांगितली. श्रीपाद वल्लभ त्या गोकर्ण जे क्षेत्रामधे जाऊन राहिले. ते आणखी त्या शिवलिंगाचं माहात्म्य असं आहे म्हणाले. प्रत्यक्ष भगवान शिवलिंगरुपाने तिथे राहत आहेत. आणि असे श्रीपाद मुद्गम तिथं राहून त्यांनी अनेक जीवांचा उद्धारही केलेला असेल. यानंतर पुढची कथा आता ते सांगतायत.

श्रीपादवल्लभांना एक दुसरा अवतार घ्यावा लागला. अशीच एक स्त्री भक्त त्यांना भेटली. त्यांनासुद्धा, आणखी तिने प्रार्थना केल्यावरुन त्यांना स्वत: दुसरा अवतार घेण्याचा प्रसंग आलेला आहे. त्यालाही कारण एक स्त्रीच आहे. कुरवपुरामधे आणि येथे हे येऊन राहिले आहेत. कुरुगड्डी म्हणून आहे, हैद्राबादपासून जवळच आहे. कृष्णानदीच्या प्रवाहामध्येच ते आणखी कुरुगड्डी म्हणून हे स्थान आहे. चारही बाजूंनी कृष्णा नदीचा प्रवाह आहे आणि महाराजांचं ते स्थान आहे.

त्यावेळेला मोठं गांव असेल कदाचित. तर तिथे सगळी मंडळी राहतायेत, विद्वान ब्राह्मण आहेत, वेदशास्त्र शिकणारे, शिकविणारे अशा प्रकारचे तिथं होते ब्राह्मण.

एक विद्वान ब्राह्मण, सगळे लोक आणखी त्याला मान देतायत आणि महाराज, त्या कुरवपुरामधे, कृष्णातीरावरती एका झोपडीमधे राहात होते. गांवातली मंडळीही महात्म्यांच्या दर्शनाकरता वगैरे जात होती. तिथे रहाणारा एक जो विद्वान ब्राह्मण होता, पुष्कळ त्याला, शिष्य त्यांनी शिकवले, सगळ्यांना आणखी वेदशास्त्राचं ज्ञान करून दिलं, कीर्ति त्याची झालेली आहे, सगळं खरं, पण घरामधे कांही संतती नाही, मुलगा नाही, पण त्याला कांही कमी आहे कां, ज्ञान कितीतरी आहे. कोणत्या दोषामुळे संतती होत नाही ? संतती होण्याकरता काय केलं, सगळं त्याला ज्ञान आहे ना. दुसऱ्यांना सांगायचा, दुसऱ्यांना संतती व्हायची, याला नाहीये. शेवटी एक मुलगा झाला. पण तो अगदी अज्ञान, मूर्ख मुलगा झालेला आहे, कांही त्याच्या बुद्धीवरती कांही परिणाम नाही. या ब्राह्मणाने किती लोकांना, किती विद्यार्थ्यांना ज्ञान दिलेलं आहे, किती विद्यार्थी ज्ञानी होऊन गेले याच्याजवळ राहून. पण स्वतःच्या मुलाला मात्र तो कांही ज्ञान देऊ शकत नाहीये. हे अदृष्ट मानावं लागतं. अशा कांही गोष्टी आपण ऐकल्या, पाहिल्या व्यवहारामधे, पहायला आपल्याला मिळतात, कार्यकारणभाव व्यवहारामधे उपयोगी पडत नाही, निराळं कांहीतरी कारण मानावच लागतय. जी कांही दृष्ट कारण सामग्री आहे, त्या दृष्टकारण सामग्रीवरून निर्णय करता येत नाही. असं कां झालं, याचं कारण कांही सांगता येत नाही. हा प्रत्यक्ष बाप आपल्या मुलाला विद्या कां शिकवू शकला नाही? मुलाची बुद्धी कमी आहे, कां त्या शिकविणाऱ्याचा पक्षपात आहे? शिकविणाऱ्याचा पक्षपात नाही. अर्जुनाला द्रोणाचार्यांनी विद्या दिली कां अर्जुनाच्या बुद्धीनं ती विद्या ग्रहण केली ? हाही विचारणीय प्रश्न आहे. कर्णाला विद्या दिली नाही, अर्जुनाला दिली म्हणजे काय ? शिकवित सगळ्यांना सारखं शिकविणार आहेत ते. परंतु ग्रहण करणाऱ्याची बुद्धी जी आहे, एखाद्याची बुद्धी लवकर ग्रहण करू शकते, एखाद्याला कांही कळतच नाही. याला कारण म्हणजे कांही पूर्वीचं, अदृष्ट जो आहे, तो प्रतिबंध मानावा लागतो, त्याशिवाय याचा निर्णय करताच येणं शक्य नाहीये. केवळ आधुनिक बुद्धिवादाने हा निर्णय होऊ शकत नाहीये.

निराश झाला ब्राह्मण, मारावं, हे करावं, कांही नाही, मारून काय उपयोग आहे? विद्या त्याच्या बुद्धीमधे यायला पाहिजे ना, ज्ञान त्याच्या बुद्धीमधे संक्रांत करायचं कसं? ही काय मन किंवा बुद्धी काय दिसते, हाताने घ्यायची आणि त्यात ज्ञान भरायचं आहे काय कुठं, बाटलीमधे दूध भरल्यासारखं, असं कांही नाहीये, ती शक्ती नाहीये. ती शक्ती एक वेगळीच आहे ती. संतमहात्मे जे आहेत, सद्गुरुरूप जे आहेत, त्यांची ती शक्ती आहे. हे अज्ञान दूर करायचं

आणि त्याठिकाणी ज्ञानांजन त्याला द्यायचं आहे आणि त्याची दृष्टीचं उनमिलन करणं ही शक्ती त्या महात्म्यांची आहे.

तो ब्राह्मण निराश झाला, आणखी शेवटी एके दिवशी त्याचा देहांत झालेला आहे. आता काय करायचं? हा मुलगा मोठा झालेला आहे, भिक्षा मागायला जायची पाळी आली. घरांत काय? आणि सगळ्या गांवातल्या लोकांनी त्याची निंदा करायला सुरूवात केली, कशाला जन्माला आलास म्हणाले, 'जिवंत कशाला रहातोस? तुझा बाप किती विद्वान होता, तू काय राहिलायस म्हणाले, कलंक लावलायस आपल्या पित्याच्या कीर्तिला'. वाटेल ते बोलावं, 'जा, म्हणाले नदीत जीव दे जा.' किती ऐकायचं किती? रोजच्या रोज निंदा व्हायला लागल्यानंतर आईलाही सांगितलं त्यानी, आईही निराश झाली. आपण आता या नदीमधे देहत्याग करावा, आत्महत्या करावी असं दोघांनीही ठरिवलं. पण महाराज आहेत, म्हणाले. त्यांना आपण जाऊन विचारू. म्हणून नदीतीरावरती आणखी श्रीपाद स्वामी होते, तिथे आलेले आहेत, आईनं नमस्कार केला. मुलानेही केला आणि त्या आईनं सगळी हकीकत सांगितली, 'महाराज, सगळे लोक निंदा करतायत म्हणाले, ते कांही सहन होत नाही आता आम्हाला. भिक्षेशिवाय इलाज नाही, भिक्षा मागण्याकरता जायचं तर सगळ्या लोकांनी आणखी निंदा करावी अशी स्थिती आहे. त्यापेक्षा देहत्याग केला म्हणजे सुटलो याच्यातून.'

श्रीपाद महाराज म्हणाले, 'बाई, तुम्ही, हा चांगला मनुष्यदेह तुम्हाला देवाने दिलेला आहे. आत्महत्या हा मोठा दोष आहे म्हणाले. ह्या दुःखातून सुटण्याकरता आत्महत्येसारखं जर पाप कराल, तर त्या पापानी पुन्हा दुःखं भोगावी लागतील. हा देह टाकला म्हणजे पुन्हा देह येणार नाही अशी तुमची कल्पना आहे काय?' कारण विचारशक्ती संपलेली आहे. नैराश्य बुद्धीमधे उत्पन्न झाल्यानंतर विचार राहातच नाही. एकदा आपण या दुःखातून सुटू. अहो, पण देह तुम्ही टाकलात तरी पुन्हा दुसरा देह येणारच आहे की ! कोणता देह येईल याचा कांही नेम नाहीये. तुमच्या पापाचं फळ, कोणच्या जन्मामधे तुम्हाला जावं लागेल, आणि तिथं पुन्हा जन्म आला, दुसऱ्या देहाचा संबंध झाला की पुन्हा दुःखं सुरू झालीच म्हणाले. देहबंद झाला पाहिजे हे तुम्हाला कसं करता येईल? हा विचार करा. पुन्हा देहाचा संबंध म्हणजे पुन्हा जन्मालाच येऊ नये अशी जर व्यवस्था करता आली तर दुःख सुटतील म्हणाले. त्याशिवाय दुःख कायमची सुटणं शक्य नाही. जन्माला येऊ नये म्हणजे कर्म संपली पाहिजेत. जी अनंत जन्म आपणही कर्म करीत आलेलो आहोत, चांगली आहेत, वाईटही आहेत, त्या त्या कर्माप्रमाणे पुन्हा पुन्हा एक देह जरी पडला तरी दुसरा देह तयार होतो आहे, त्या देहात जीवात्म्याला जावंच लागतं. पुन्हा सुख-दुःखाचा भोग घ्यावाच लागतो आहे. कर्म संपल्याशिवाय जन्म संपत नाही. देहाचा

संबंध सुटत नाही. देहाचा संबंध संपल्याशिवाय दुःखमोक्ष नाहीये. तेव्हा यात राहूनच तुम्ही असं करा, आत्महत्या करू नका. भगवान शंकरांची आराधना तुम्ही करा असं त्या बाईना सांगितलं.

भगवान हे मृत्युंजय आहेत, मृत्यूला जिंकणारे आहेत. सर्व विद्या त्यांच्याजवळ आहेत, सर्व विद्या संपन्न आहेत. सर्व विद्या त्यांच्यापासून प्रवृत्त झालेल्या आहेत. त्यांची कृपा तुमच्यावरती झाली म्हणजे सगळी दुःख तुमची दूर होतील, आत्महत्या करू नका. असं श्रीपादस्वामींनी सांगितलं. आणि तिला शनिप्रदोषव्रत करायला सांगितलेलं आहे. ज्यावेळेला शनिप्रदोष येईल त्या दिवशी आणखी प्रदोषकाळी भगवान शंकरांची पूजा करा. बराय. तिला हे आणखी मान्य झालं. आज्ञा महाराजांची आहे त्याप्रमाणे आली. भिक्षा मागायची, मुलाला घेऊन, आहेच, निंदा सहन करायची, पण शनिप्रदोषव्रत तिने सुरू केलं. महाराजांनी सांगितलेल्या दिवसापासून शनिवारी प्रदोष आला की शंकरांची पूजा करायची. रोज ही करत असेल ती, नाही असं नाही. तर ती विशेष उपोषण वगैरे करून हे सगळं करावं.

पण ती पूजा, शंकरांची, कोणाची पुजा करत होती? त्या स्त्रीचाही एक मोठा अधिकार होता. **'गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः'** हे नुसतं म्हणणारी स्त्री ही नव्हती. सद्गुरू म्हणजे साक्षात् त्रिमूर्तिरूप आहेत. महेश्वर म्हणजे भगवान श्रीपादस्वामी, हे साक्षात शंकर आहेत, ही अंतःकरणामधे भावना दृढ असल्याकारणानी शनिप्रदोषाच्या दिवशी शंकरांची पूजा करायची प्रदोषकाळी, तर प्रदोषाच्या वेळेला नदीतीरावरती तिने जावं आणि भगवान श्रीपादस्वामींचीच तिनं पूजा करावी, बिल्वपत्र अर्पण करावं, आरती करावी, नैवेद्य सगळं दाखवून नमस्कार करून यावं. ही आता पूजा, शंकरांची पूजा, शिवलिंगाची पूजा कुठे केली, काय केलं, हे शनिप्रदोषव्रत झालं नाही, बरोबर झालं नाही, असं कोणीतरी म्हणणार ना? शंकरांची पूजा म्हणजे शिवलिंगाचीच पूजा, झाली पाहिजे, दुसरीकडे शंकर नाहीत. मग हे आता याचा अर्थ काय? **'गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः'** याचा अर्थ काय मग? सद्गुरू ही सुद्धा मूर्ती शंकरांची आहे, विष्णुंची आहे, ब्रह्मदेवांची आहे. **सर्वांची मूर्ती म्हणजे सद्गुरूनाथ आहेत, हे जर शास्त्रांनीच सांगितलं आहे,** त्या शास्त्राप्रमाणे तिनं त्यांची, सद्गुरुंची पूजा केली, शिवलिंगाची केली नाही म्हणून काय झालं? काय शंकर रागावले असतील काय? उलट त्या बाईचं आणखी मन किती स्वच्छ आहे, शुद्ध आहे, सद्गुरूंना मानव समजत नाही ती. आपला देह जसा मानवाचा आहे तसा सद्गुरूंचा देह मानवाचा नसून साक्षात ब्रम्हाविष्णुमहेश्वर ते आहेत, ही तिची दृढ भावना आहे. उलट हे ते कौतुक आहे तिचे. आणखी अंतःकरण अत्यंत शुद्ध आहे, शंकरांनासुद्धा आनंद वाटतो आहे. असं कार्य चाललेलं आहे.

परंतु मनातलं दुःख कांही जात नाहीये. आपला हा जन्म आणखी फुकट जाणार, शंकर आपले भगवान श्रीपाद स्वामींच्याकडे यावं, बोलावं, दुःख आपलं सांगावं. मला म्हणाले

आपल्यासारखा मुलगा व्हावा ही इच्छा आहे महाराज. त्याकरीता मी शनिप्रदोषव्रत करते आहे. या जन्मात आता मला मुलगा होणं शक्य नाही. पुढच्या जन्मात ! महाराज म्हणाले, 'होईल' म्हणाले, आणि आत्ता माझ्यासारखा म्हणजे मलाच यायला पाहिजे, म्हणाले. तुझी इच्छा पूर्ण होईल. पण म्हणाले पुढच्या जन्मापर्यंत वाट पहायची म्हणजे या मुलाच्याकडे पाहून रहायचं ना? घरामधे या मुलाच्यामुळे किती निंदा माझी होते, त्याची होते म्हणाली. म्हणजे हा जन्म सगळा दुःखातच घालवायचाय. अशी अगदी निराश झालेली ती आहे स्त्री, पण अंतःकरणामधे मात्र सद्गुरूंच्या बद्दल पूर्ण भावना आहे. सद्गुरू हेच आणखी शिव आहेत, शिवस्वरूप आहेत, साक्षात शंकरांची पूजा आपल्याला करायला मिळती आहे, हे तिला समाधान वाटतंय. भाग्य. आहे असं ती समजती आहे. आणि त्या भावनेनं, भक्तीनं महाराजांची पूजा ती करती आहे.

म्हणून तिचं ते दुःखी मन, पहावलं नाही महाराजांना. दया आली त्यांना आणि लगेच त्या मुलाच्या मस्तकावर त्यांनी आपला हात ठेवलेला आहे. हस्तस्पर्श होण्याचा अवकाश, सर्वही विद्या त्याला आलेल्या आहेत. प्रारब्धाने त्याची बुद्धी जी आणखी खुंटलेली होती, कांही नाही. बापसुद्धा जी विद्या, आपल्याजवळ असलेली, त्याला देऊ शकला नाही, इतका प्रतिबंध त्याच्या प्रारब्धकर्माने आणखी त्याच्या बुद्धीमध्ये निर्माण केला होता, पण ती बुद्धी एकदम आणखी स्वच्छ झालेली आहे. सर्व विद्या त्या बुद्धीमध्ये प्रगट झालेल्या आहेत. उत्तम विद्वान झाला तो मुलगा. आणि मग आनंद झाला त्या स्त्रीला. बाई, हा मुलगा, आता ह्याचं लग्न होईल म्हणाले, कीर्ति याची होईल, तुम्हालाही समाधान, तुमचंही आयुष्य समाधानाने जाईल, शनिप्रदोषव्रत करा, तुमच्या इच्छेप्रमाणे आता आमच्यासारखा म्हणजे मलाच तुमचा पुत्र होऊन यावं लागेल, आश्वासन महाराजांनी दिलेलं आहे. याप्रमाणे त्या ब्राह्मण स्त्रीचा उद्धार झालेला आहे.

शास्त्रानी सांगितलेली ही कर्म ही जीवाकरिता आहेत, मानवाकरिता सगळी कर्म सांगितलेली आहेत. मानवांनी ती कर्म, श्रद्धा, भक्तीनं, कर्तृत्व–अभिमान वगैरे सोडून जर केली तर, त्याच्या कर्माचं फळ त्याला मिळतं आहे. देव फळ देतो, देव फळ देतो म्हणजे याचा अर्थ काय? देव संरक्षण करतो म्हणजे काय करतो.

न देवा दण्डमादाय रक्षन्ति पशुपालवत् ।
यं तु रक्षिन्तुमिच्छन्ति बुद्ध्या संयोजयन्ति तम् ।
(महाभारत, उद्योगपर्व, विदुरनीति अ. ३५.४०)

त्याला बुद्धी देतो भगवान, परमात्मा, ज्याचं संरक्षण करायची इच्छा आहे, त्याला बुद्धी देतो आहे.

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ।

ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ॥ (भ.गी. १०.१०)

ज्याला, ज्या भक्ताला आपल्या जवळ आणायचा आहे देवाला, त्या भक्ताच्या मनामध्ये, बुद्धीमध्ये आणखी प्रेरणा ईश्वराकडून होती, तशी बुद्धी त्याला मिळतीये. कर्मानुसारिणी बुद्धी आहेच आहे प्रत्येकाला. पण बुद्धीकर्मानुसारिणी म्हणून सांगून टाकलंय शास्त्रकारांनी. कर्म जसं असेल तशी बुद्धी होणार, चांगली किंवा वाईट, ती कोणालाही बदलता येणार नाही. हा जरी सिद्धांत सांगितलेला असला, तरी सर्व संरक्षक भगवान आहे. केवढं आणखी या स्त्रीच संरक्षण त्यांनी केलेलं आहे. जन्मभर बाप आणखी दमला, त्याला शिकवून, नाही आली त्याला विद्या, पण महाराजांच्या आणखी कृपादृष्टीनं, हस्तस्पर्शानं एकदम त्याला विद्या आली. ही बुद्धी कोणी दिली? कर्मानुसारिणी बुद्धी अज्ञानातच सापडलेली आहे त्याची, पण ही ईश्वराने दिलेली बुद्धी ही निराळी मानली पाहिजे. आणि ती बुद्धी देण्याकरिता देवाची उपासना, धर्माचरण हे त्याकरता करायला पाहिजे. अशी बुद्धी आपणाला मिळावी, म्हणजे आपलं संरक्षण होईल, देवाच्या जवळ आपण राहू शकू. देव आपल्याला आणखी आपला म्हणेल, आपल्याकडे त्याचं लक्ष राहील, अशी जर इच्छा असेल तर त्याकरता हे केलं पाहिजे. कर्मानुसारिणी बुद्धी मिळणारच आहे त्याला, प्रत्येकाला. त्यात काय मोठं आहे ? पण चांगलीच मिळेल याचा कांही नेम नाही. आपली कर्म जर वाईट असतील पूर्वीची, तर वाईटच बुद्धी होणार, तशीच संगती घडणार आणि त्या संगतीप्रमाणे आपली बुद्धिसुद्धा आणखी पुन्हा कुन्मार्गाला लागणार आहे. त्याप्रमाणे या ब्राह्मण स्त्रीला जी बुद्धी महाराजांनी दिलेली आहे, अगोदर ब्राह्मण स्त्रीच्या बुद्धीची सुधारणा केली आणि मग नंतर तिच्या मुलाच्या बुद्धीची सुधारणा केलेली आहे. ब्राह्मण स्त्रीच्या बुद्धीमधे महाराजांनी जे शिवस्वरूप आणि शिवाची उपासना सांगितलेली आहे, ती उपासना तिने महाराजांचीच उपासना केली.

गुरूदेव हे एक मानुनि भक्ति । तयांची करी त्या करी येई मुक्ति ॥
सुयुक्ति असी ही धरी नित्य चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरे नित्य दत्ता ॥ (चित्तसद्बोध)

म्हणून महाराजांनी **'चित्तसद्बोधन नक्षत्रमाला २६ व्या स्तोत्रामधे'** हा एक मोठा सिद्धांत सांगितला आहे.

गुरू आणि देव हे एक आहेत, ही ज्याच्या मनामधे बुद्धी उत्पन्न झाली, त्याच्यावरती ईश्वराची निश्चित कृपा आहे. त्याची बुद्धी देवाने दिलेली बुद्धी आहे ती. ती माणसाने दिलेली बुद्धी नाहीये. कर्मानुसारिणी बुद्धिमध्ये विकल्प निरनिराळे उत्पन्न होतात. काय हो, माझ्याप्रमाणेच हे गुरूमहाराज, म्हणजे काय मलासुद्धा हात पाय, त्यांना हात पाय, मीही जेवण

करतो, हेही जेवण करतात, काय बोलणंचालणं आमच्या सारखंच आहे. यांच्यामधे आणि आमच्यामधे काय अंतर आहे? असा मनामध्ये विकल्प उत्पन्न होतो. ही आमची कर्मानुसारिणी बुद्धी आहे, संसर्गजन्य आहे बुद्धी, सगळ्या ठिकाणी अशीच बुद्धी, आमची तशीच आहे. पण सद्गुरूमहाराज म्हणजे भगवान शंकर आहेत, साक्षात्, त्यांची पूजा केली म्हणजे शंकरांची पूजा झालेली आहे. ही बुद्धी, ही मानवाची बुद्धी नाहीये. **ददामि बुद्धियोगं तं।** देवदत्त बुद्धी वेगळी आहे ती. अन् ती बुद्धी अगोदर त्या स्त्रीला मिळालेली आहे. आत्महत्या करण्याला निघालेली स्त्री, संसारातून आणखी कांही वाचणं शक्य नाही, जीवंत राहाणं शक्य नाही, म्हणून, तिच्या बुद्धीची सुधारणा केली. शंकरांची उपासना सांगितली. आणि ती उपासनासुद्धा सद्गुरू महाराजच शंकर आहेत या भावनेने तिच्याकडून झालेली आहे. हा तिच्या बुद्धीमधे फरक झाला आणि नंतर तिच्या मुलाच्या बुद्धीमध्येही महाराजांनी फरक केलेला आहे. त्याच्याही बुद्धीतलं सगळं अज्ञान दूर केलेलं आहे. कर्मानुसारिणी असेल बुद्धी त्याची, कांही समजायचं नाही, अज्ञान घेऊनच ती बसलेली आहे, त्याची कर्मच तशी आहेत. पण ती कर्मसुद्धा बाजूला करून स्वतंत्र बुद्धी स्वतः महाराजांनी, संकल्पाने दिलेली आहे. ती त्यांचीच शक्ती आहे, सद्गुरूंची शक्ती आहे. त्यामुळे त्या स्त्रीच्या बुद्धीची सुधारणा, तिच्या मुलाच्या बुद्धीची सुधारणा हे सगळं केलेलं आहे आणि तो जन्म तिचा आनंदात गेलेला आहे. पुढच्या जन्माचं आश्वासन देऊन ठेवलेलंच आहे की. म्हणजे स्वतःच महाराजांनी बुद्धी दिलेली आहे. तिनं उपासना महाराजांनी दिलेल्या बुद्धीनेच केलेली आहे. पण, तिच्या बुद्धीला प्रसन्न होऊन महाराजांनीच वर दिला की मी तुझा मुलगा होईन म्हणून महाराजांनीच वर दिला. म्हणजे साधनमार्ग जो आहे, हा साधनमार्गसुद्धा ईश्वराच्या कृपेनेच होतो आहे. साधन कर्ता मी आहे अशी बुद्धी जी असली की साधनामधे वैगुण्य उत्पन्न होतं आहे.

यथा भ्राम्यत्ययो ब्रह्मन् स्वयमाकर्षसन्निधौ ।
तथा मे भिद्यते **चेतश्चक्रपाणेर्यदृच्छया ।' (भा.७.५.१४)**

प्रल्हादजी सांगताहेत. त्याला विचारलं स्वतः गुरूजींनी, 'अरे तू कां हरीचं भजन करतोस, तुझा बाप, तुझ्या बापाला पसंत नाही, हरीचं भजन करू नको' ते म्हणाले, 'गुरूजी, मी भजन करत नाही.' म्हणाले. तो जो हृदस्थ परमात्मा आहे, ऋषिकेश आहे, त्याच्या इच्छेनं भजन होतं आहे म्हणाला. मी भजन करीत नाहीये. म्हणजे भगवंतानीच बुद्धी दिलेली आहे, त्यांनी दिलेल्या बुद्धीनं हे भजन झालेलं आहे. ही भावना, हा उच्च साधक आहे, आणि तो सिद्ध होऊ शकतो, ईश्वराच्या कृपेनं.

त्याप्रमाणे आणि त्या ठिकाणी अहंकार उत्पन्न होत नाहीये. महाराज म्हणजे साक्षात शंकर आहेत हे तिला कोणी शिकवलेलं आहे ? आजपर्यंत पुन्हा प्रसंगच नाहीये ना? तर हेही

देवानीच आपल्याला बुद्धी दिली अन् त्या बुद्धीनं आपल्याकडून देवाची सेवा झाली, ही जर कर्म करताना भावना असेल तर त्याचं फळ हे शुद्ध, वाटेल ते फळ मिळेल. भगवान श्रीपाद वल्लभांनी आणखी कबूल केलं की मी तुझा पुत्र होईन म्हणून, हे काय, उगीच नाहीये. कारण ती स्त्री जी आहे, तिला त्या आपल्या बुद्धीचा किंवा आपल्या साधनाचा अभिमान नाहीये. **त्वमेव सर्वं मम देव देव ।** या भूमिकेपर्यंत ती पोचलेली आहे. म्हणजे या जन्माचं कल्याण झालं, पुढच्या जन्मामधे महाराज आपले पुत्र होणार आहेत या आनंदामधे आणखी तिचं आयुष्य गेलेलं आहे.

आणखी एक कथा सांगताहेत.

सार्भामर्तुं योद्यत्ता स्त्रीस्तु तस्या दुःखं हर्तुं त्वं स्वयं तत्सुतः स्याः ।
विस्मृत्यास्मान् किं स गाढं निदद्रौ श्रीपादद्रौ वापदाहानिदद्रौ ॥

श्रीपाद श्रीवल्लभस्तोत्रम् १०५.३

श्रीपाद श्रीवल्लभ स्तोत्रम् या कथेचा उल्लेख महाराजांनी मुद्दाम केलेला आहे. आणखी पुढची एक कथा श्रीपादवल्लभांची सांगितली.

राज्यं योऽदादाशु निर्णेजकाय प्रीतो नत्या यः स्व गुप्तै नृकायः ।
विस्मृत्यास्मान् किं स गाढं निदद्रौ श्रीपादद्रौ वापदाहानिदद्रौ ॥ ४ ॥

श्रीपाद श्रीवल्लभस्तोत्रम् १०५.४

श्रीपादवल्लभ स्वामींचं सामर्थ्य काय आहे? महात्म्यांचं सामर्थ्य, अघटित घटना होतात, हे सामर्थ्य तर आहेच आहे, **पण त्यांना स्वतःच्या सामर्थ्याची कल्पनाही नाहीये. जाणीवसुद्धा नाहीये. हे मोठं सामर्थ्य आहे.** भिंत चालायला लागली, वाघावर बसून आलेले आहेत चांगदेव, त्यांना सामोरं जायचं, की यांना वाटलं. भिंत चालायला लागली. आता भिंत चालवणं ही शक्ती मोठी आहे का वाघाला चालवणं ही शक्ती मोठी आहे? वाघ काय, चाबूक हातात असला म्हणजे सर्कशीत सुद्धा वाघ ताब्यामधे राहतो आहे. हे तर प्राणी आहे तो, त्यालासुद्धा भीती आहे. तेव्हा त्याचं नियंत्रण करणं हे कांही कौशल्य नाहीये, किंवा महत्त्व नाहीये, मोठेपणा नाहीये. दगडामातीच्या भिंतीमधे कांही नाही, बुद्धी नाही, चेतना नाही, पण तिच्या मधे सुद्धा क्रिया निर्माण झालेली आहे. हे इतकं सामर्थ्य जवळ असूनसुद्धा त्या सामर्थ्याची यांना कल्पनाच नाहीये. कोणी चालवली, कुणाला ठाऊक..

करणे कां न करणे । हें आघवें तोचि जाणे ॥
विश्व चळतसे जेणें । परमात्मेनि ॥ (ज्ञाने. १२-११८) म्हणतात.

.....आपण कांहीच करत नाहीये. एक तरी ओवी अनुभवावी, यापैकी ही ओवी आहे. अगदी विलक्षण ओवी आहे ही. तर याप्रमाणे महात्म्यांची बुद्धी म्हणा किंवा त्यांचं सामर्थ्य इतकं

विलक्षण आहे की, स्वतःचं अघटित घटना करणारं सामर्थ्य असून ते सुद्धा विसरून जातायत. देवांना म्हणे आपल्या मायाशक्तीचं ज्ञानच नाही म्हणून म्हणतात, एका ठिकाणी भागवतामधे उल्लेख केलेला आहे. आपल्या शक्तीचा अंतच लागत नाही म्हणे देवाला. काय याचा अर्थ काय समजायचा? मायाशक्ती केवढी कार्य करणारी आहे, कळत नाही म्हणजे देव सर्वज्ञ नाही असं म्हणायचं कां ? सर्वज्ञच तो आहे, मग कां याचा अर्थ काय ?...तर मायाशक्तीच इतकी विलक्षण आहे की तिचा अंत लागणारच नाही. अंत लागत नाही हेच तिचं महत्त्व आहे, हे ते त्यांना. खरं ज्ञान आहे देवांना, की आपली मायाशक्ती ही अनंत आहे, म्हणजे सर्वज्ञत्व कायम ठेवून आणि त्याचं उत्तर दिलेले आहे.

तर याप्रमाणे, कुरवपूर क्षेत्रामधे श्रीपादवल्लभ महाराज राहिलेले आहेत. त्या स्त्रीचा उद्धार झाला, तिच्या मुलाचा उद्धार झाला, कार्य चाललेलं आहे. सर्वांना सुखी करायचं आहे म्हणून भगवान या ठिकाणी आलेले आहेत. आणि त्यांना कायमचंच सुखी करायचं आहे, तेवढ्यापुरतं आपलं डॉक्टरच्या दवाखान्यात गेलो म्हणजे औषध मिळतं आपल्याला, आपला रोगही जातो. म्हणजे बरं होत. सगळं खरं आहे, पण पुढं तो रोग येऊ नये याकरता औषध आहे काय? ताप आलेला गेला आमचा, पण असं औषध अजून निघालेलं नसेल कदाचित, की एकदा हे औषध घेतलं की पुढे कधीच ताप येणार नाही. अशी औषधं निर्माण करणार नाही कोणी, दवाखानेच चालणार नाहीत आणि असलं तरी ते औषध कोणी देणार नाही. असं मात्र नाहीये, **हेयं दुःखमनागतम् (पा. योगसूत्रे २.१६)** हा शास्त्राचा सिद्धांत आहे. पुढची जी दुःख आहेत ती येऊ नयेत याकरता प्रयत्न केला पाहिजे माणसांनी. आत्ता जी आहेत दुःख वगैरे ही सगळी घालवण्याचा प्रयत्न आहे, साधनं, सामग्री आहेत. ते पाहून पुढे प्रवृत्त होतो, त्याप्रमाणे कमी जास्ती होतं म्हणाले. पण पुढे आपण दुःखी होऊ नये, राहू नये, केव्हाही आपल्याला दुःख भोगावं लागू नये याकरता प्रयत्न केला पाहिजे. मानवाला बुद्धी याकरता देवानी दिलेली आहे, मानवजन्म याकरता आहे. आणि तो प्रयत्न कोणचा ? तो प्रयत्न आणखी महात्म्यांच्याकडून आपल्याला समजतो आहे. **त्यांच्या आणखी आज्ञेप्रमाणे त्यांच्या सांगण्याप्रमाणे जर आपण आणखी वागलो तर पुढचंही दुःख आपलं दूर होतंय.**

कुरवपुर क्षेत्रामधे एक परीट रहात होता. वस्त्रं धुण्याचं काम, स्वच्छ करून द्यायचं. लोकांची वस्त्रं स्वच्छ करायची आहेत. चांगलं काम आहे . मळ दूर करणं, हेच महात्म्यांचं, सद्गुरूंचं काम हेच काम आहे नां? आपल्या जवळ येणारा जो आहे, भाग्यवान जीव आहे, सुकृत जवळ घेऊन आलेला आहे, त्याशिवाय आपल्या जवळ येणंच शक्य नाहीये. इच्छाच होत नाही. साधुंना भेटायला जावं, साधुंची संगती करावी, त्यांना कांहीतरी मार्ग विचारावा अशी इच्छाच आपल्याला

होत नाहीये. ती इच्छा होणं, त्याप्रमाणे जाणं, त्यांची भेट घेणं, त्यांच्याबद्दल श्रद्धा विश्वास निर्माण होणं, हे कितीतरी आणखी अनेक जन्माच्या सुकृताचं काम आहे.

तो जो आहे परीट, चांगला श्रद्धाळू आहे, महाराजांच्याबद्दल अत्यंत श्रद्धा, भक्ती, मनामधे आहे. रोज तिथं त्यांच्या आश्रमामधे तिथे झाडून वगैरे काढायचं, स्वच्छ करायचं, वारंवार यायचं, सकाळी, दुपारी, संध्याकाळी यायचं, दर्शन करायचं, बसायचं, तिथे काय कोणाबरोबर महाराज काय बोलतात ते ऐकायचं आपलं. असं त्याचं कार्य चाललेलं होतं.

संग आहे, बुद्धी चांगली आहे, आणखी संगती महाराजांचं साक्षात म्हणजे परमेश्वराचंच दर्शन घडतंय रोज त्याला, हे भाग्यही आहे. पण, दैवयोग विलक्षण आहे, कांही सांगता येत नाही. एके दिवशी, हा आलेला आहे, नदीजवळच असायची, धुवायला आलेला असायचा, तिथं आपले तसेच कपडे-बिपडे ठेवायचे, महाराजांच्या जवळ येऊन बसायचा, नंतर जायचा पुन्हा. असाच एकदा महाराजांच्या जवळ येऊन बसलेला आहे. आणखी नमस्कार करून बसला. रोज येत होता आणि इतक्यात त्या नदीतून एका राजाची स्वारी निघाली. पुष्कळ नावा आहेत, वाद्यं वाजतायत, पुष्कळ स्त्रिया आहेत, हे सगळं राजाचं ऐश्वर्य त्या परटाच्या दृष्टीला रजकाच्या पडलेलं आहे. आता परीट जन्माचा दरिद्री आहे, कधी कांही इतकं ऐश्वर्य, कांही अनुभव तर शक्यच नाही. झालं, त्याची तिकडे दृष्टी गेली. काय म्हणाला राजा पुण्यवान आहे केवढी देवाची याच्यावर कृपा आहे? किती स्त्रिया आहेत? किती नोकर चाकर आहेत? किती नावा आहेत? काय वाद्यं वाजतायत? हे काय ऐश्वर्य ! म्हणाला. महाराजांच्या जवळ बसलाय आणि विचार हा आलेला आहे. एकदम महाराज ''काय रे !'' म्हणाले ''काय चाललाय विचार?'' महाराजांनी लगेच ओळखलं. नाही नाही म्हणाला महाराज, कांही नाही. तुमच्याजवळ रहायचंय मला. मला इथून दूर कुठेही जायचं नाही. अरे हे असं शक्य कसं आहे. राजाच्या ऐश्वर्याकडे तुझी नजर गेलेली आहे ना म्हणाले. तुला आता इथे माझ्याजवळ राहता येणार नाही. नको महाराज, मला लोटू नका दूर, नाही म्हणाले, तुला, जवळ राहयाची योग्यता अजून आलेली नाही. **दुसऱ्याचं ऐश्वर्य पाहिल्याबरोबर तुझ्या मनामधे जी वासना आहे ती वासनाच जन्माचं कारण आहे,** तुला जन्माला जायलाच पाहिजे, माझी संगती बंद म्हणाले. आता सांग म्हणाले. या जन्मात तुला राजा व्हायचंय कि पुढच्या जन्मात राजा व्हायचंय? हा प्रश्न केला. मग मात्र त्याची खरी बुद्धी कळून आली. मला नको, मला राज्य नको, अहो तुमच्याबरोबर रहाणं म्हणजे हेच खरं आहे, यातच सगळं कल्याण आहे वगैरे. या सगळ्या गोष्टी, गप्पा मारायला, तत्त्वज्ञान सांगायला फार सोपं असतं. 'या जन्मात राजा व्हायचंय की पुढच्या जन्मात व्हायचंय' म्हटल्याबरोबर तो म्हणाला, अहो मी आता म्हातारा झालोय म्हणाला. साठ सत्तर वर्षांचा. या जन्मात काय भोगणार? म्हणजे पाहिजे राज्य. जा, म्हणाले, पुढच्या जन्मात तू

राजा होशील. पण म्हणाले, मला आपलं दर्शन कसं. होईल, शेवटी. तू राजा हो म्हणाले. काय सुखभोग घ्यायचे घे, **भोग वासनांचा क्षय झाला पाहिजे, वासना जाणं शक्य नाही.**

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ॥ **(भा.९.१९.१४)**

परंतु भगवंताची आणखी कृपा जर असेल तर त्या **भोगाच्या योगाने वासनांचा क्षय होत जातो, ही ईश्वराची कृपा आहे.**

हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते । (भा. ९.१९.१४) हे मात्र होत.

हे वासनाक्षयाला त्याच, आणखी सहाय्य मिळतं भोगाचं. ईश्वरदत्त भोग असेल तर मात्र! म्हणून महाराजांच्या त्या स्तोत्रामधे, घोरात् कष्टात् उद्धरास्मान् नमस्ते । याच्यामधे , धर्मे प्रीतिम् सन्मतिम् देवभक्तिम्. सत्संगाप्तिम् देहि भुक्तिं चं मुक्तिं, **भुक्तीही मला द्या म्हणून प्रार्थना केलेली आहे. ईश्वराने संसारसुख आम्हाला द्यावे, भोग द्यावेत. ईश्वराने जर भोग दिले, ईश्वराने जर सर्व सुखसंसार चांगला दिला तर त्याच्यामधे आपली मनोवृत्ती ही उद्दाम होऊ शकत नाहीये.** सुदामजींच उदाहरण प्रसिद्ध आहे. बिभिषणाचं, उदाहरण ध्रुवाच प्रसिद्ध आहे. म्हणून या रजकाला जरी त्यांनी राजा केलं महाराजांनी किंवा राजा होशील म्हणून आशीर्वाद दिला. हा कसा आशीर्वाद दिला त्याला बुवा? त्याच्या वासना होत्या म्हणून दिला बरं. राजा कां केलं? वासनेमुळे थोडं द्यायचं सुख. एकदम राजसुख जे आहे, मानुषानंद म्हणून ज्याला म्हणतात राजाचा आनंद म्हणजे मानुषानंद आहे. असे किती तरी आनंद सांगितले उपनिषदकारांनी. तर तो इतक्या आणखी राजसुखामधे त्याला कां ठेवलं? जास्ती जास्ती त्याची वृत्ती बिघडणार नाही का? जास्ती वासना वाढणार नाही, वाढत नाही म्हणाले. हे मात्र होत जातं. त्याच्याजवळ वासना वाढणार नाही**. देवाने त्याला दिलेलं आहे, त्या देवाचं लक्ष त्याच्याकडे असणारच ना.** या भक्ताला आणखी योग्यता येण्याकरता हे आम्ही दिलेले भोग आहेत. या भोगांनी त्याची आणखी वासनावृद्धी होऊ नये याकरता त्यांचं लक्ष अवश्य रहाणारच म्हणाले. म्हणून भगवंतांनी त्या रजकाला सांगितलं की, 'श्रीपादस्वामींनी' जा म्हणाले पुढच्या जन्मामधे तू राजा होशील. लगेच गेला आणखी हृदयक्रिया बंद पडून त्याचं प्राणोत्क्रमण झालं, तो पुढे बेदरचा बादशहा झाला. त्याची कथा शेवटी शेवटी गुरूचरित्रामधे सांगितलेली आहे सिद्धमुनींनी. तर भगवंताचं सान्निध्य जरी मिळालं तरीसुद्धा हे अशा प्रकारचे प्रतिबंध निर्माण होतात. श्रीपादस्वामींच्या जवळ राहणारा, अत्यंत आणखी मोठा भक्त आहे, आनंद त्याला होतो आहे, आपण आणखी दुःखामधे आहोत, दुसऱ्याची धुणी आपण धुतो, कांही मनाला वाटायचं नाही. कर्तव्य कर्म करायचा आणि नेहमी वेळ मिळेल तसा श्रीपादमहाराजांच्या

जवळ येऊन बसायचा. असा जरी होता तरीसुद्धा त्याच्या बुद्धीमधे असलेल्या ज्या कांही वासना आहेत, कर्मफल त्याला त्याचं मिळालेलं आहे. दुसऱ्या जन्माला त्यांनी पाठवून दिलेलं आहे. म्हणजे जरी संतांची संगती घडली, अगदी ज्ञानपूर्वक घडलेली आहे, ती संगती आपल्याला रहावी असं वाटतंय त्या रजकाला, पण त्या वासना बसू देत नाहीत. श्रीपादस्वामींच्या जवळ बसून आणि त्या राजाची स्वारी पाहायला लागलेला आहे, तिकडे लक्ष लागलेलं आहे. म्हणजे काय जवळ राहून काय उपयोग आहे ? देवाच्या जवळ राहून उपयोग काय? लक्ष बाहेर आहे. आणि आंत देवाच्या, **भगवंताच्या दर्शनाकडे नुसती दृष्टी आहे, मन दुसरीकडे आहे, काय उपयोग त्याचा?** म्हणून **त्याच्या वासनेप्रमाणे त्याला जन्म आलेला आहे आणि पुढे त्याचं कल्याणही महाराजांनी केलेलं आहे.**

हा इतका कथाभाग हा श्रीपादस्वामी महाराजांच्या कथेपैकी इतक्या फक्त कथा सांगितलेल्या आहेत. अशा कितीतरी कथा झालेल्या असतील. श्रीपादमहाराजांचं स्वतंत्र गुरुचरित्रही होऊ शकेल. ते जाणणारे जे असतील, त्यांना कळलेलंही असेल, कळून घेतही असतील ते. पण याच्यामधे फक्त एवढाच उल्लेख त्यांनी केलेला आहे. यानंतर कुरवपूरातून श्रीपादस्वामी एकदम अदृश्य झाले एवढाच उल्लेख आहे. कृष्णा तीरावर ते रहात होते. परंतु अश्विन वद्य व्दादशीला, गुरुव्दादशी म्हणतात –

व्दादश्यामाश्विने कृष्णे श्रीपादस्योत्सवो महान् । आणखी...

माघे कृष्णे प्रतिपदि नरसिंहप्रभोस्तथा ॥ (नक्षत्रमालिका स्तोत्र–२९ श्लोक)

हेही महाराजांनी उल्लेख केला आहे. गुरुप्रतिपदा जी आहे त्यावेळी नरसिंह सरस्वती महाराजांची पुण्यतिथी आणि अश्विन वद्य व्दादशीला श्रीपाद स्वामींची पुण्यतिथी. गुरुव्दादशी असंच त्याचं नांव आहे आणि त्याचे गुरुप्रतिपदा म्हणून नांव आहे.

एकदम श्रीपादस्वामी अदृश्य झाले, लोक दर्शनाला येत, कुठे गेले महाराज? काय झाले? कुठे गेले? कुणाला कांही पत्ता नाही, आता अदृश्य झाले, निघून गेले असतील, कुठे गेले असतील काहीतरी तर्क वितर्क लोकांनी केले. स्वस्थ राहिले. पण आता त्या स्थानामधे श्रीपादस्वामी आहेत की नाहीत. हा एक विचार सुरू झाला, की नाही. त्यांच्या पर्णकुटीमधे नाहीयेत, दिसत नाहीत, त्याअर्थी गेले कुठेतरी. असं म्हणायला पाहिजे. तिथं नाहीयेत. देव दिसत नाही म्हणून नाही. पण देव जो दिसतो आहे, देवांनीच सांगितलं, माझी मूर्ति करून बसवा. इथे मी येऊन रहातो. त्याच्यावरही विश्वास नाही. मूर्ति म्हणजे देव आहे कां म्हणतात. मूर्तीला देव कसं म्हणायचं. जो सर्वव्यापी परमात्मा आहे तो तर डोळ्यांनी दिसत नाहीये. तो आपल्याला दिसावा आणि त्याप्रमाणे आपली बुद्धी तशा प्रकारची स्थिर व्हावी, याकरता

मूर्तिमधे देव आहे अशी भावना करुन पूजा करा, म्हणून शास्त्र सांगतं, देवांनीच सांगितलं आहे. त्याच्यावरही विश्वास नाही आणि सर्वत्र देव आहे म्हणायचं झालं तर त्याच्यावरती विश्वास नाही, म्हणजे कुठेही विश्वास आमच्या बुद्धीला नाही. देव नाही हीच बुद्धी. मग कुठलं साधन अन् कुठली उन्नती? शक्य आहे का?

तर श्रीपादस्वामी या ठिकाणी नाहीत, अशी कल्पना कदाचित होईल म्हणून पुढची कथा सांगितलेली आहे. अदृश्य झालेत. अदृश्य झाले असले तरी सुद्धा त्यांचं वास्तव्य या ठिकाणी आहे. ती शक्ती जी आहे, ईश्वरशक्ती, ही दृश्य असो किंवा अदृश्य असो, दृश्य असताना जे कार्य आहे, अदृश्य असतानाही ते कार्य चालू राहातंय. आळंदीला ज्ञानेश्वर महाराज आणि त्या समाधीमधे जाऊन बसलेले आहेत, सातशे वर्ष होऊन गेलेली आहेत. ज्ञानेश्वर महाराज नाहीत तिथं आता, तिथे वरती नाहीत. आंत काय झालंय कोणाला ठाऊक? कोण पहाणार? कुणाची शक्ती आहे पाहाण्याची ? कसे राहिले असतील ? काय राहिले असतील? आंत जाऊन बसायचं आणि वरून संबंध शिळा, दगड, बंद करून घ्यायच्या, नुसती कल्पना जरी केली आपण तरी अंगावर शहारे येतील. प्राण कोंडून जाईल. श्वास कोंडला म्हणजे कसा मी जिवंत राहीन? कोणी जायला तयार होईल कां आता? शक्य आहे कां? पण ज्ञानेश्वरमहाराज तिथे जाऊन बसलेले आहेत. कांही नाही, प्राण कोंडत नाही. कांही नाही. प्राणवायू ताब्यामधे आहे. मनःशक्ती, चित्तशक्ती, अंतःकरणशक्ती ताब्यामध्ये आहे. प्राणशक्ती सगळी ताब्यामधे आहे. अशाप्रकारचे महात्मे जरी आंत जाऊन बसले असले तरीसुद्धा, कांही त्यांना बाधा नाहीये. तर त्या ठिकाणी आता ज्ञानेश्वरमहाराज कांही बोलत नाहीत, चालत नाहीत, दिसत नाही, कांही नाही. पण नाहीयेत, असं म्हणायचं का? लक्षावधी लोक यात्रेला जातायत, वारी करतायत **पंधरा दिवसांची, ज्ञानी आळंदीची वारी पंधरा दिवसाची अलीकडची वारी, अशी वारी म्हणजे महिनाभर सबंध यात्राच करावी असे सुद्धा महात्मे आहेत.** पुण्यवान लोक. आळंदीवरून यात्रेचं दर्शन करून निघायचं. दुसऱ्या शुद्ध एकादशीला पंढरपूरला जायचं. तिथं दर्शन करुन पुन्हा वद्य एकादशीला आळंदीला यायचं. माऊलींच दर्शन करायचं. असेही पुण्यवान लोक अजून लोक आहेत, हे कशाला जातात तिथं ? ज्ञानेश्वरमहाराज नाहीत म्हणून जातात काय? आहे ती शक्ती आहे. अदृश्य शक्ती जरी असली तरी कार्य होऊ शकतंय, त्यांचं वास्तव्य ज्या ठिकाणी आहे, तिथं जरी अदृश्य असले तरी सुद्धा कार्य चालू असतं. अखंड ! त्याकरता पुढची कथा सांगताहेत सिद्धमुनी.

कुरवपुरामधे, एक ब्राह्मण, त्याला कांही विशेष ज्ञान-बिन कांही नाहीये. त्याने एक दुकान काढलेलं आहे. दुकानदारीचा व्यवसाय करतो आहे, श्रीपादवल्लभ स्वामींच्या वरती त्याची फार श्रद्धा, भक्ती आहे. पाहिलेलं नसेल त्यानी त्यांना. पण ऐकून कां होईना, पण एक मनाची भावना आहे. नवस केला त्याने की मला आता ह्या व्यापारामधे जर फायदा झाला चांगला, तर मी

एक हजार माणसांना अन्नदान करीन. असा नवस केलेला आहे आणि झाला त्याला, पुष्कळ फायदा झाला त्याला. ठरल्याप्रमाणे आणि सामग्री म्हणा, पैसे वगैरे घेतले आणि तो यात्रेकरिता म्हणून कुरवपुराला जाण्याकरिता निघाला. दुसऱ्या गावात राहात असेल तो. आता रस्त्याने त्यावेळेला म्हणजे जंगल वगैरे, अरण्यातून रस्ता होता. पैसे वगैरे घेऊन निघालेला आहे. सामग्री तिथे खरेदी करायची, त्या गांवामधे आणखी ब्राह्मणभोजन, अन्नदान सगळ्यांना करायचं. ही बातमी कांही चोरांना मिळाली, की हा जो आहे ब्राह्मण, व्यापारी, हा कुरवपूर क्षेत्रामधे श्रीपादस्वामींच्या प्रीति प्रसादाकरता म्हणून निघाला आहे. आणि तिथे कांही आणखी पूजा, अन्नदान वगैरे करणार आहे. याच्याजवळ पुष्कळ पैसे घेऊन निघालेला आहे. मग त्या चोरांनी सुद्धा यात्रेकरूचा वेष धारण केला, त्याची गाठभेट घेतली. तुम्ही निघाला म्हणाले यात्रेला, आम्ही सुद्धा तिकडे जात असतो म्हणाले. बरं झालं. तुमची संगती, तुमची भेट झाली, तुम्ही आम्ही मिळून जाऊ या म्हणाले यात्रेला. खोटी कां होईना, **खोट्या करता संगती घडली सज्जनांची, तरीसुद्धा त्याचा फायदा होतो.** या बिचाऱ्याला काय कल्पना? बरं झालं म्हणाला, सोबत भेटली तुमची. जाऊया. मधे जंगल, अरण्य वगैरे आहे, तुम्ही सोबतीला आहात, जाऊ या म्हणाला. निघाले सगळे ! आणखी अरण्यामधून रस्ता चाललेला असताना, ते कांही दर्शनाकरिता आलेलेच नव्हते. याचा पैसा घेण्याकरिता आलेले होते. कोणी नाही, अरण्यात कोण असणार? आणि त्यांनी त्याला मारलं, ठार मारलं, कोणी आपल्याला पाहिलं नाही, कांही नाही. कोण पहाणार आहे ?

पण तो एक, ती एक शक्ती आहे, ईश्वरोचक्षुः ईश्वरोबाहू, सभावो, सलोभा असं ज्याचं वर्णन केलेलं आहे, सर्व ठिकाणी त्याची दृष्टी आहे, त्याची नजर सगळीकडे आहे, तो सगळीकडे पाहू शकतो. यांना वाटलं, आता काय हा मेला बिचारा. आता पैसा घेऊन आपण जाऊ. इतक्यात श्रीपादस्वामी एकदम समोर येऊन उभे राहिले. त्रिशूल आहे, तलवार आहे, चक्र आहे आणि त्यांनी आपल्या तलवारीने ते सगळ्या, चोरांची मस्तकं तोडून टाकली. एक चोर तेवढा पाया पडू लागला, महाराज, मला कांही माहिती नव्हतं म्हणाला. मी यांच्याबरोबर आलो हे खरं आहे, पण याला मारावे अशी माझी इच्छा नव्हती.

द्रव्यलोभाने मी निघालो नाहीये. हे निघाले, आपणही निघावं म्हणून मी निघालो. आमचेच साथीदार हे आहेत. आज तरी तशी माझी इच्छा नव्हती. बरं म्हणाले. ते त्याचं मस्तक तुटून पडलेलं होतं त्या ब्राह्मणाचं. ते आण म्हणाले जवळ. त्याला जोड त्या धडाला, भस्म टाकलेलं आहे, कृपादृष्टीनं पाहिलं, सूर्योदयाची वेळ आलेली आहे. तो सावध झालेला आहे ब्राह्मण, म्हणजे जिवंत झालेला आहे.

हा चोर एक जिवंत राहिला, त्याला विचारलं, काय बाबा, काय झालं? हे इतके चोर सगळे मरून कसे पडले ? हे मला लूटण्याकरताच आले होते, पण त्यावेळेला कल्पना झाली

नाही म्हणाला. त्याने सांगितलं बाबा, तुझ्याकरता एक मोठा तपस्वी पुरूष आलेला होता, त्रिशूल, त्याचप्रमाणे तलवार हे सगळं घेऊन आला, त्यांनी या सगळ्या चोरांना मारलेलं आहे, आणि मला मात्र, मी प्रार्थना केल्यामुळे, मी तेवढा जिवंत राहिलो. तुझ्यावर फार कृपा आहे म्हणाले. ब्राह्मणाला वाईट वाटलं, काय म्हणाले, माझ्यावर कृपा? चोरी करण्याकरता येऊन आणखी मला ज्यांनी ठार मारलं, त्याला दर्शन देवानी दिलं, त्याला मारलं म्हणाले त्यांना त्यांनी, पण मला दर्शन देऊन मारलेलं आहे ना ? म्हणजे ते जन्ममरणातून सुटलेले आहेत. परमेश्वराच्या हातून ज्यांचा मृत्यू झालेला आहे, त्यांच्या शस्त्रांनी ज्यांना मृत्यू आलेला आहे, ते पवित्र झाले, ते खरोखरच उद्धरून गेलेले आहेत. देवाचं दर्शन करून त्यांना मृत्यू आलेला आहे. मला मात्र दर्शन नाहीये. वाईट वाटलं. द्रव्य घेऊन गेला तो ब्राह्मण, त्याने पुष्कळ आणखी एक हजाराचा संकल्प होता, चार हजार काय, सगळ्यांना भोजन अन्नदान केलेलं आहे. ईश्वराची, श्रीपादस्वामींची कृपा त्याच्यावरती झालेली आहे.

तर या कथेचा अभिप्राय काय घ्यायचा आपण? ज्या भक्तांनी संकल्प केलेला आहे, की मी आणखी अन्नदान करणार आहे. श्रीपादस्वामी महाराजांची पूजा करून अन्नदान करणार आहे. तो काय पुढच्या जन्मात करणार म्हणून संकल्प केला काय, तो काय साधु वाण्यासारखा संकल्प आहे का हा? मुलगा झाला किंवा मुलगी झाली म्हणजे सत्यनारायण करीन म्हणाला. झाल्यानंतर तरी करायला पाहिजे की नको? अहो इतक्यात काय? लग्नाच्या वेळेला खर्चात खर्च होऊन जाईल. सत्यनारायणाला काय खर्च होणार होता ? श्रीमंत व्यापारी आहे. कांही कमी नाही. दोन वेळा केल असतं म्हणून काय बिघडलं ? तशापैकी नाहीये. हा जो संकल्प करणारा भक्त आहे, देवाच्या कृपेनं आपल्याला द्रव्य मिळालेलं आहे, ते द्रव्य देवाला, देवाकरता खर्च झालं पाहिजे, ही अंतःकरणामधे भावना आहे, तळमळ आहे आणि त्या तळमळीनं तो निघालेला आहे. त्याचा संकल्प काय पुढच्या जन्मात हा करेल, आपल्याला अन्नदान, म्हणून देव कांही गप्प बसले नाहीत. त्यांनी केलेला संकल्प या जन्मातच त्याला त्याच्या हातून पूर्ण व्हायला पाहिजे. म्हणून त्याला जरी मारलं चोरांनी, तरी पुन्हा त्याला जिवंत करून त्याच जन्मामधे त्याच्याकडून त्याने केलेला संकल्प देवानी पूर्ण करून घेतलेला आहे.

ही ईश्वरावरती ठेवलेल्या श्रद्धेचं किंवा भक्तीचं हे फळ मिळत असतं. सकाम जरी असला भक्त, तरी त्या सकाम भक्ताची भक्तीसुद्धा इतकी फळ देणारी आहे. प्राण गेला तरी सुद्धा आपण जिवंत होऊ शकतो आणि आपण देवाची सेवा करू शकतो, पण मनापासून मात्र तसा संकल्प पाहिजे, तर हे कार्य होतय.

तेव्हा श्रीपादस्वामी अदृश्य झालेले नाहीत, अजून त्या ठिकाणी आहेत. हेही प्रत्यंतर सर्वांना कळलेलं आहे. सर्वांना ही त्या व्यापाऱ्याची गोष्ट कळली. मेलेला पुन्हा जिवंत झाला

म्हणे. श्रीपाद महाराजांनी त्याला जिवंत केला. सर्वांची श्रद्धा भक्ती वाढलेली आहे. पुष्कळ आणखी त्या ठिकाणी कार्य झालेलं आहे.

याप्रमाणे, श्रीपादवल्लभांचं चरित्र हे इतकं सिद्धमुनींनी सांगितलेलं आहे. आता यानंतर नरसिंहसरस्वती महाराजांच्या चरित्राला आरंभ होणार आहे. ही जी **कुरवपुरामधे रहाणारी ब्राम्हण स्त्री, महाराजांच्या आज्ञेप्रमाणे शनिप्रदोषव्रत करीत होती, श्रीपादमहाराज अदृश्य झाल्यानंतर मग शिवलिंगाची पूजा करू लागली ती. श्रीपादस्वामी असेपर्यंत त्यांचीच पूजा ती करीत होती.** याप्रमाणे तिलाही मृत्यू आलेला आहे आणि ती त्या कुरवपूरातून इकडं वऱ्हाड प्रांतामधे, कारंजा म्हणून जे गांव आहे, लाडाचा कारंजा असं म्हणत. ते पूर्वी फार मोठं व्यापारी गांव होतं म्हणतात. उंटावरून आणि गोण्या भरून, केशर, कस्तुरी, वगैरे त्या ठिकाणी विकण्याकरिता येत होत्या म्हणे. असे व्यापारी तिथ होते म्हणे. तिथे केशर, कस्तुरी विकत घेणारे लोक होते. आता तूपही मिळत नाही, दूधही मिळत नाही किंवा चांगलं धान्यही मिळत नाही. सगळच सगळं हे झालेल आहे. अशी एकंदर भारताची स्थिती, इतकं वैभव भारतामधे होतं.

तर कारंजा क्षेत्रामधे हिला जन्म आलेला आहे. ईश्वराची सगळी सृष्टी आहे. कुठे कोणाला जन्माला घालायचं हे त्याच्या इच्छेनं आहे. त्याप्रमाणे त्या स्त्रीला त्या ठिकाणी एका उत्तम ब्राम्हणाच्या आणखी कुळामधे तिचा जन्म झालेला आहे. हळुहळू ती मोठी झालेली आहे. विवाहही तिचा झाला. त्याच गांवातला एक माधव नांवाचा ब्राम्हण, तोही शंकरांचा भक्त आणि हीही लहानपणापासून शंकरांचाच भक्त राहिलेली. पूर्वीचा जो संस्कार आहे, **मनुष्य जन्म आल्यानंतर आपली बुद्धी चांगली सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ही बुद्धीच आपल्याबरोबर येत असती.** बरोबर याठिकाणचं कांहीही घेऊन जाता येत नाहीये. देहसुद्धा इथंच ठेऊन जावा लागतो. पण या **देहामधे जो सूक्ष्म देह आहे, बुद्धितत्त्व म्हणून जे आहे, ते मात्र जर चांगलं बनवलं गेलं, चांगले संस्कार जर त्या बुद्धीवरती झाले, तर ती बुद्धी घेऊन दुसऱ्या जन्माला आपल्याला जाता येईल** आणि **त्या बुद्धीच्या चांगल्या संस्काराप्रमाणे चांगली कर्मे आपल्या हातून घडतील, म्हणजे उत्तरोत्तर, आपला उत्कर्ष होण्याला बुद्धीही आपल्याला सहाय्यभूत होणारी आहे.** म्हणून मानव जन्मामधे बुद्धी चांगली बनवण्याकरीता प्रयत्न करायचाय. सात्त्विक बुद्धी व्हावी, दैवी संपत्ती त्या बुद्धीमधे आणखी मिळावी याकरता प्रयत्न करायचाय. हत्तीच्या जन्माला गेलेला आणखी गजेंद्र, त्याने देवाची स्तुती केली आणि भगवान ते आलेले आहेत, त्या मगरापासून त्याला मुक्त केलं, त्याला वैकुंठलोकाला घेऊन गेले. ही कथा म्हणजे काय सांगतीय? हत्तीनं देवाची स्तुती कशी केली? कांहीतरी काल्पनिक गोष्ट लिहिली आहे? लिहिणारे व्यास आहेत ते. सांगणारे शुकाचार्य आहेत. हा विचार करावा

बुद्धिवाद्यांनी, एकदम बोलून उपयोग नाहीये. त्याचा अभिप्राय असा आहे, की, मागच्या जन्मामधे तो मोठा भक्त होता, त्याला शाप झाला अगस्तिऋषींचा, त्यामुळे तो आणखी हत्ती झालेला आहे. पण मागच्या जन्मामधे हरिभक्ती करण्यामधे त्याचं सगळं आयुष्य गेल्यामुळे त्याची बुद्धी आणखी हरिभक्तीने पूर्ण झालेली आहे. हत्तीच्या जन्मामधे जरी तो आलेला असला जीवात्मा, तरीसुद्धा हरीची भक्ती त्या जन्मामधे सुद्धा तो करू शकला, स्तोत्र करू शकला, आणि हे सुद्धा स्तोत्र सामान्य नाही.

ॐ नमो भगवते तस्मै यत एतच्चिदात्मकम् ।
पुरुषायादिबीजाय परेशायाभि धीमहि ॥ (गजेंद्रमोक्ष भा. ८.३.२)

कोणत्याही देवांच रूप त्यानी किंवा नांवसुद्धा त्यानी घेतलेलं नाहीये, परमात्मा सर्वव्यापी जो आहे, चैत्यनघन परमात्मा, सच्चिदानंद, त्याच्यामुळे हे सर्व विश्व चेतनात्मक, क्रियाशाली होतं आहे, तो जो सर्वाना प्रेरक जो आहे, सर्वाधिष्ठानभूत आहे, त्या परमेश्वराला नमस्कार असो.

म्हणजे संपूर्ण ठिकाणी असणारं जे एक ईश्वरतत्त्व आहे, त्या ईश्वरतत्त्वापर्यंत त्या हत्तीच्या जन्माला गेलेल्या जीवात्म्याची ही बुद्धी गेलेली आहे. तत् पदार्थ शुद्धि जी वेदांत शास्त्रामधे सांगतायत, ईश्वर सर्वत्र एक आहे.

विराडादिस्थावरान्ता ईश्वराः बहवः श्रुताः । (सत्यदत्त कथा अध्याय-२.२)

ईश्वराची अनेक रूपे दिसत असतील, परंतु ज्ञानी माणसाला सर्व ठिकाणी एकच ईश्वर आहे ही भावना आहे. शिव, विष्णु, महेश, शंकर, सगळीही आणखी एकच आहेत. सर्वत्र एकच ईश्वर आहे. अश्वत्थ वृक्ष ही परमेश्वराचं स्वरूप आहे. आणखी औदुंबर वृक्षही परमेश्वराचं स्वरूप आहे. पण एकच ईशशक्ती आहे. ही बुद्धी उत्पन्न होणं म्हणजे तत् पदार्थ शुद्धि आहे. त्याशिवाय वाक्यार्थ ज्ञान, वेद ज्ञान हेच ईश्वरतत्त्व तू आहेस, म्हणून जो महावाक्यानं केलेला उपदेश, त्या उपदेशाचं ज्ञान होणं कठीण आहे. सर्वत्र एक ईश्वरतत्व आहे. या आणखी, इथपर्यंत ज्याची बुद्धी गेलेली आहे. हत्तीच्या जन्माला गेलेला तो भक्त, म्हणजे त्याने बुद्धी कशी कमावलेली असेल आधी. म्हणून त्या हत्तीच्या जन्मामधे सुद्धा त्याचा उद्धार होऊ शकतो. हे उत्तर शास्त्रदृष्टीने विचार केल्यानंतर हे उत्तर देता येतं. नाहीतर, हे शक्य नाही. ही खोटी कथा आहे, कांहीतरी ही काल्पनिक कथा आहे, स्थितप्रज्ञाची लक्षणं सुद्धा काल्पनिक आहेत म्हणणारे बुद्धिवादी होऊन गेलेले आहेत. काय कादंबरी आहे का भगवद्गीता म्हणजे, काल्पनिक लिहायला ती ! असो

तर अशा दृष्टीनं ती जी स्त्री आहे, अंबा तिचं नांव, आणि तिचा पती म्हणजे माधव, दोघेही शिवभक्त, शनिप्रदोषव्रत त्यांनी त्यावेळेपासून सुरू केलेलं आहे, त्यांच्या घराण्यात कुळाचारही असेल शिवभक्तीचा. यांचीही बुद्धी आणखी तशीच आहे. शनिप्रदोषव्रत, पूर्वीच्या जन्मात जसं केलं होतं, तसं या जन्मातही शनिप्रदोष व्रत ती करती आहे. श्रीपादस्वामींनी सांगितलं होतं तिला, की तुझ्या इच्छेप्रमाणे मी तुझा मुलगा होईन, म्हणाले. म्हणून आणखी श्रीपादस्वामींनी तिच्यापासून अवतार घेण्याचं ठरवलेलं आहे. गर्भिणी झाली ती. आणि पुढं, पौष शुद्ध द्वितीया, या द्वितीयेच्या दिवशी नरसिंहसरस्वतींचा जन्म झालेला आहे. तो बालक बाहेर आला मात्र. आणखी ॐकाराचा उच्चार करतो आहे. **ओंकारोच्चारणम्**, हे ईश्वर आहे हे कशावरून ठरवायचं? त्याला एक गमक दिलेलं आहे महाराजांनी. जन्माला आल्याबरोबर तो ॐकाराचा उच्चार करतो आहे, ॐकाराचा उच्चार हा कांही सामान्य नाहीये. **संन्यासी महात्मा जो झालेला आहे त्यालाच फक्त प्रणवाचा जप करायचा अधिकार आहे.** ॐकार तत्त्व म्हणजे फार मोठं आहे, त्याच्यामधे सर्वाकार, आणखी सर्व एकंदर, स्थूल, सूक्ष्म किंवा सर्वकारण वगैरे सगळ्या सृष्टीचा समावेश त्याच्यामधे होतो आहे. आणि ते ईश्वराचं नांव आहे ॐकार. तर त्या निर्गुण, निराकार स्वरूपाचं, परमात्मा तत्त्वाचं, जे वाचक जे आहे प्रणव, त्या प्रणवाचा उच्चार करीत तो आणखी बालक येतो, सगळे लोक म्हणाले जन्माला आलेला मुलगा, आणि बोलायला लागला, ते बोलणं म्हणजे प्रत्यक्ष ॐकाराचा ध्वनी करतो आहे, उच्चार करतो आहे. सगळे गांवातले लोक पहायला आलेले आहेत. काय असा हा काय चमत्कार आहे म्हणाले. जन्मापासून हे सुरू आहे.

झाले, वर्ष झालं, दोन वर्ष झाली, चार वर्ष झाली, पण भाषा नाही, कांही कुणी बोललं तरी ॐकाराशिवाय दुसरा आणखी कांहीहि शब्द नाही. आज बोलेल, उद्या बोलेल, आईला वाटलं, पण नाही, सहा सात वर्ष झालेली आहेत. आठवं वर्ष लागलेलं आहे. आता उपनयन कसं करायचं? हा प्रश्न आहे. उपनयन करायचं म्हणजे याला गायत्री मंत्राचा उपदेश कसा करायचा, याला बोलताच येत नाही, नुसता ॐकाराचा उच्चार करतो, त्याशिवाय दुसरा शब्द माहिती नाही. पित्यानी उपदेश कसा करायचा? उपनयन म्हणजे नुसतं आणखी बँड बाजा किंवा अमुक कांही तरी भोजन बिजन आपल्या आप्तेष्टांना, ओळखीच्या लोकांना भोजन घालणं म्हणजे उपनयन नाहीये. हे बहिरंग आहे सगळं. मुख्य म्हणजे गायत्री मंत्राचा उपदेश त्या बटूला द्यायचा. आठ वर्षाच्या बटूला, **सर्व विश्वाला निर्माण करणारी, प्रेरणा करणारी जी ईश्वरशक्ती आहे**, त्या ईश्वरशक्तीचं आणखी या ठिकाणी वर्णन केलेलं आहे.

यो देवः सवितास्माकं धियो धर्मादिगोचरे ।
प्रेरयेत्तस्य तद्भर्गस्तद्वरेण्यमुपास्महे ॥

(संध्या समालोचन, मंत्रानुसंधान पुराणोक्त गायत्रीध्यान)

हे संपूर्ण विश्वाला अधिष्ठानभूत प्रेरक जी,अंतर्यामी शक्ती, ईश्वरशक्ती आहे, त्या ईश्वरशक्तीचं प्रतिपादन करणारा, महामंत्र, हा आठव्या वर्षाच्या मुलाला शिकवायचाय. कोणत्या देशामधे आज हे आहे? ईश्वराबद्दल कल्पना आठव्या वर्षापासून दिली जाते, भारतामधे आहे. त्या महामंत्राचा उपदेश कसा करायचा? ही काळजी आईबापांना उत्पन्न झाली. अन् ती आई म्हणाली, काय म्हणाले बाळ आहे बघा, शंकराची पूजा आम्ही केली आणि हे फळ मिळालं आम्हाला, की ज्याला बोलायला सुद्धा येऊ नये ? दुःखी झालेले आहेत.

मग त्यांनी, महाराजांनी काय केलं, आंत गेले, एक पहार आणली, ती पहार लगेच सोन्याची झाली. घ्या म्हणाले, कांही बोलले नाहीत. मग त्यांना वाटलं की हा कांही मुर्ख मुलगा नाही. मोठा ज्ञानी महात्मा दिसतो आहे. पण बोलत नाही. लोखंडाच सुवर्ण ज्याच्या आणखी त्याच्या दृष्टीने झालेल आहे, त्याची शक्ती कांही वेगळी असली पाहिजे. सामर्थ्यवान कोणीतरी मुलगा आहे. पण बोलत कां नाही ? प्रार्थना केली, बाबा, तुझी आता मुंज करायची आहे, कशी करायची मुंज? काय करायचं? सामग्री सगळी... सोनं दिलं. नंतर आता काय यांना संपत्तीला कमी आहे काय? मुंज वाटेल तितकी थाटात करता आली असती, पण थाटात करून काय उपयोग? उपदेश कसा करायचा? त्यांनी नुसतं खूण करून दाखवलेलं आहे, जानवं घाला म्हणजे मी बोलेन, वगैरे सांगितलं. मग त्यांनी, मातापित्यांनी सगळी तयारी केली, आप्तेष्ट मंडळी सगळी आलेली आहेत. उत्तम प्रकाराने उपनयन झालं. मंत्रोपदेश झालेला आहे आणि लगेच गायत्री मंत्राचा उपदेश झाला. उपनयन संस्कार झाल्याबरोबर महाराजांनी आणखी वेदमंत्र म्हणायला सुरूवात केलेली आहे. ऋग्वेदमंत्र आहे, यजुर्वेदमंत्र आहे, साममंत्र आहे, अथर्ववेदमंत्र आहे. सगळ्या मंत्रांचा उच्चार केलेला आहे. म्हणजे बोलायला लागला हा मुलगा, बोलायला येतंय याला. पण मुद्दामच याने आणखी भाषण केलं नाहीये. लोकांचा संसर्ग जास्ती नकोय ना. बोलायला लागला म्हणजे झालं. हजारो लोक.... झालं, तसं पुढं झालच शेवटी.

महाराज बोलायला लागले, भिक्षा घातली, त्या मातेनं त्यांच्या पात्रामधे, लगेच महाराजांनी सांगितलं, नरसिंह त्यांचं नाव ठेवलं. नरहरी, त्यांचं कुलदैवत, काळे आडनांव त्यांचं. आहेत, त्यांच्या वंशातले लोक अद्यापी काशीला आहेत. नागपूरला आहेत. तर भिक्षा मातेनं घातल्याबरोबर ते म्हणाले, आता तुम्हीच मला भिक्षा मागायची अनुज्ञा दिली म्हणाले, आता मी बाहेर पडतो, जातो आता भिक्षा मागून कुठेतरी राहतो म्हणाले, क्षेत्रामध्ये वगैरे. त्या आईला कांही कल्पनाच नाही, आठ वर्ष झाली म्हणाले आत्तापर्यंत एकही शब्द बोलला नाही. आता बोलायला लागला तर आता म्हणतो जातो आता मी घरातून बाहेर. आता करायचं काय? मग तिनं थोडसं तत्त्वज्ञान सांगायला सुरुवात केली. हे काय, म्हणाले शास्त्रांनी

सांगितलंय नाही, क्रमसंन्यास आहे म्हणाल्या. संन्यास घ्यायचा म्हणजे एकदम संन्यास घेता येणार नाही म्हणाले. अगोदर ब्रह्मचर्याश्रम आहे, सर्व वेदांच ज्ञान, सांग वेदांच ज्ञान करुन घेण्याकरिता ब्रह्मचर्याश्रमाचा स्वीकार केला पाहिजे. मार्कंडेयमहर्षि आपल्या गुरूंच्या आश्रमामधे वेदग्रहणाकरताच राहिले. कितीतरी दिवस राहिले. संपूर्ण वेदाचा अभ्यास करण्याची इच्छा असेल तर आणखी नैष्ठिक ब्रह्मचारीही राहू शकतो. यावज्जीव. निदान आपल्या वेदाचं अध्ययन करण्यापुरतं तरी राहातो आहे. तर अगोदर म्हणाले,, ब्रह्मचर्याश्रमाचं पालन केलं पाहिजे. अशी शास्त्राची आज्ञा आहे, ती आई सांगायला लागली त्याला. त्याच्यानंतर गृहस्थाश्रम आहे म्हणाले. गृहस्थाश्रम इतका मोठा आहे, पुण्यवान आहे, **धन्यो गृहस्थाश्रमः** म्हणून त्याचं वर्णन केलेलं आहे म्हणाली. कुणीही ब्रह्मचारी विद्यार्थी असो, किंवा कोणी संन्यासी असो, वानप्रस्थ असो, त्यानी भिक्षा मागण्याकरिता गृहस्थाश्रमी माणसाच्याच घरात यावं लागतं त्याला. गृहस्थाश्रमी मनुष्यच सगळ्यांना भिक्षा देऊ शकतो, म्हणजे संन्यासी, बाकीचे कोणी आणखी विद्यार्थी, कोणीही जरी असले ब्रम्हचारी, त्यांचं जे जे कांही कर्तव्यकर्म ते करीत असतील, पुण्यकर्म, त्या सगळ्याला या गृहस्थाश्रमाचं सहाय्य होतं म्हणाले. असा मोठा पवित्र गृहस्थाश्रम आहे. त्या गृहस्थाश्रमाप्रमाणे वागलं पाहिजे. त्याच्यानंतर वानप्रस्थाश्रम आहे. हळू हळू वासनाक्षय करण्याकरता आणि शेवटी संन्यास आहे. त्याग हा शेवटी आहे. त्यागाचा अभ्यास करत करत जायचंय पुढं. एकदम संन्यास कसा घेता येईल म्हणाली. क्रमसंन्यास आहे, अशी शास्त्राची आज्ञा आहे. अशी ती आई त्याला सांगायला लागली.

महाराजांनी सांगितलं, बाई, हा ही नियम आहे. क्रमाने संन्यास घ्यावा हे खरं आहे म्हणाले. पण कोणाला, ज्याच्या मनामधे अद्यापी वैराग्य पक्कं बाणलेलं नाहीये. थोडासा संसारही बरा वाटतो, इथं राहिलं तरी बराय बुवा, राहू या इथं आता, एखाद्या वेळी वाटतं. नको बुवा हा संसार, आपण जाऊन राहावं, काशीवास करावा, असंही एखाद्या वेळेला वाटतं. अशी जोपर्यंत आणखी संदिग्ध स्थिती मनाची आहे, जोपर्यंत मनाला संसार सोडून द्यावा असं पक्कं वाटत नाही, तोपर्यंत मात्र एकदम संन्यास घेता येणार नाही. म्हणजे, वैराग्य पूर्ण ज्या दिवशी होईल, त्याच दिवशी संन्यास घ्यायला हरकत नाही, अशीही शास्त्राची आज्ञा आहे. मनामधे पूर्ण जर विरक्ती उत्पन्न झाली तर कांही आडकाठी शास्त्राची नाहीये. आणि दुसरी गोष्ट, ही पूर्ण विरक्ती कोणाला उत्पन्न होते? तर आपलं हे जे शरीर आहे, हे शरीर केव्हां पडेल याचा नियम नाहीये, इकडे लक्ष जो देतो आहे.

अजरामरवत्प्राज्ञो विद्यामर्थं 'च' चिन्तयेत

गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत् । (सुभाषितरत्न भांडार, श्लो. ४२७) म्हणतात.

यमधर्मानी एका हातात आमचे केस धरलेले आहेत, दुसऱ्या हातात तलवार उपसून वरती उचललेली आहे. मानेवर आमच्या घाव घालणार आहे, हे लक्षात आणून धर्माचरण करावं, ईश्वराची भक्ती करावी, केव्हां पडेल आमचा देह, आणखी जीव संपेल याचा नेम नाही, हा मनामधे विचार आणून, होईल जेव्हढं धर्माचरण करता येईल तेवढं कराव. तेव्हा शरीर अशाश्वत आहे. सांसारिक वैभव जे आहे बाबा, ते सगळं अशाश्वत वैभव आहे. शरीरही हे अशाश्वत आहे. तेव्हा मृत्यू जवळ आहे हा विचार करून, आणखी त्याप्रमाणे ईश्वराची उपासना, धर्माचरण हे करावं, केलं पाहिजे. अशी खरी बुद्धी ज्याला उत्पन्न झाली, स्थिरबुद्धी, त्याला म्हणाले संन्यासाश्रम करायला हरकत नाही. क्रमसंन्यासच त्यांनी केला पाहिजे. क्रमानेच गृहस्थाश्रम करायचा, हे करायचं, मध्येच मृत्यू आला तर? संन्यास राहिला की नाही ? म्हणून थोरल्या महाराजांच्या चरित्रामधे कथा आहे. ते सावंतवाडी, आपल्या माणगांवहून आपल्या गांवावरुन, निघाले, पत्नी बरोबर येणार म्हणाली. या म्हणाले, कांही बरोबर घ्यायचं नाही, कांही एक पातळ किंवा लुगडं त्यावेळेला असेल, तेवढं जास्ती कांही नाही. **इथं बार्शीला आले म्हणतात**. इथं कोणी होतं म्हणतात. तिकडचेच होते कोणीतरी. बावडेकर बुवा काय !

इथं आले, इथे राहिले अन् इथून मग गंगाखेडला गेले ते. आणि गंगाखेडला त्यांच्या पत्नीचा देहांत झाला. त्यांना संन्यासाश्रम घ्यायचा होता. पत्नीची आडकाठी दूर झालेली आहे. सगळे चौदा दिवस झाल्याबरोबर संन्यासाश्रम, चौदा दिवस होण्यापूर्वी अशौचामधे, त्यांना कोणीतरी एक स्वप्नामधे कुणीतरी आलेला आहे, तुम्हाला आम्ही घेऊन जाणार म्हणे. ते म्हणाले, मी येणार नाही, माझा संन्यास होणार आहे. दत्तात्रेयांना प्रार्थना केली, तुम्ही मला म्हणाले इकडे उत्तरेला जायला सांगता आणि इथे येऊन आता संन्यास घेण्यापूर्वी अशौचामधे मला मृत्यू यायचा? त्या यमधर्माला सांगितलं, मी येणार नाही म्हणाले. संन्यासाश्रम अजून व्हायचाय. मग झाला. चौदाव्या दिवशी संन्यास दीक्षा त्यांनी घेतली. पुढं त्यांचे पुष्कळ चातुर्मास वगैरे झालेलं आहे. तर ही संन्यासदीक्षा केव्हा घ्यायची आहे, गृहस्थाश्रम झाला पाहिजे. वानप्रस्थाश्रम झाला पाहिजे, सगळ्याच्या शेवटी संन्यास आहे. झाला, झाला, नाही नाही, असं करायचं काय म्हणाले. मनामधे जर खरी विरक्ती उत्पन्न झाली तर तत्काळ संन्यासदीक्षा घ्यावी, अशीही शास्त्राची आज्ञा आहे. एकदम आणखी संन्यास, ब्रह्मचर्याश्रमातूनच संन्यासाश्रम स्वीकारता येतो. शंकराचार्य महाराज, ब्रह्मचर्य आश्रमातूनच संन्यासी झाले. त्यांनी कुठे गृहस्थाश्रम केला? त्याचप्रमाणे नरसिंह सरस्वती महाराजांनी आपल्या आईला सांगितले आहे, की हा कांही प्रतिबंध नाही म्हणाले, क्रमानेच संन्यास घेतला पाहिजे, गृहस्थाश्रम केल्यावाचून संन्यास घेता येत नाही असं कांही नाही. ज्याचं मन तयार झालेलं आहे, मनांत कोणतीही वासना राहिलेली नाही तो केव्हाही संन्यास घेऊ शकतो. तेव्हा मला आता जायला परवानगी द्या म्हणाले. आता काय करायचं?

कांही बोलता येईना, त्यांनी सांगितलं की तुम्हाला आणखी मुलं होतील म्हणाले. दोन मुलं होतील, चार मुलं आणि तुमचा संसार चांगला होईल. तुम्हाला सुख आहे, मग त्या आईनं सांगितलं, तुम्ही मला सांगता मुलं होतील म्हणून, पण तुमच्या वाक्यावर माझा कांही विश्वास बसत नाही. हे तिला बोलावं लागलं मुद्दाम. विश्वास बसत नाही आता इतकं सामर्थ्य त्यांचं पाहते आहे, हे करते आहे. जन्मल्या बरोबर ॐकार उच्चारण करणारे, अखंड ॐकाराचा जप करणारे, विश्वास बसत नाही कसा? पण हे सांगितल्याशिवाय हे थांबणार नाहीत. निदान मुलं होईपर्यंत तरी थांबतील. अशा उद्देशानं तिनं सांगितलं, मला कांही विश्वास वाटत नाही, मुलं झाल्यानंतर पाहू म्हणाले. मग राहिले तिथे.

भक्त मंडळी येतायत, सर्वांना आणखी ज्ञान देण्याचं कार्य चाललेलं आहे, वेदशास्त्र फार गूढ आहे ना. कळणं कठीण आहे.

जन्माद्यस्य यतोऽन्वयादितरतश्चार्थेष्वभिज्ञः स्वराट् ।
तेने ब्रह्म हृदा य आदिकवये मुह्यन्ति यत्सूरयः ।
तेजोवारिमृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गोऽमृषा ।
धाम्ना स्वेन सदा निरस्तकुहकं सत्यं परं धीमहि ॥ **(भा. १-१-१)**

वेदार्थ लावणं, वेदांचा अभिप्राय समजून घेणं याच्याबद्दल मोठे मोठे ज्ञानी लोकांनासुद्धा मोह उत्पन्न होतो. तेव्हा त्या वेदार्थाचं स्पष्टीकरण करण्याचं कार्य चाललेलं आहे, मोठे मोठे विद्यार्थी, पंडित, जिज्ञासु, विद्वान मंडळी येतायत. सर्वांना उपदेश करायचं कार्य चाललेलं आहे. पुढं एक वर्षानंतर त्यांच्या आईला दोन मुलं झालेली आहेत.

फार मोठे अधिकारी व्यक्ती आहेत. आठ वर्षाचा मुलगा. देहाची सुद्धा ज्याला पर्वा नाही आहे, त्रिकाल स्नान करतो आहे. माधुकरीत जे मिळेल ते अन्न, घेतो आहे. आणखी सारखा ध्यान साधून, ध्यानाभ्यास चाललेला आहे. योगाभ्यास अखंड चाललेला आहे. हा अधिकारी महात्मा आहे. त्यांचे गुरू, सर्व संन्याशांचे, आणखी कृष्णसरस्वती नांवाचे होते. अगदी ब्रह्मदेवापासून ती परंपरा आलेली, ज्ञानपरंपरा आलेली, कृष्णसरस्वतींपर्यंत आलेली आहे. त्यांनी आपल्या या सगळ्या संन्याशी शिष्यांना सांगितलं की हा मोठा आहे म्हणाले. मोठा अवतारी पुरूष आहे. त्यांना जाऊन तुम्ही विनंती करा की महाराज, आपण संन्यासाश्रम घ्या. म्हणजे आम्ही सुद्धा तुम्हाला वंदन करू शकू, आम्ही तुमची पूजा करू शकू. आणि संन्यासाश्रम योग्य नाही, त्याची निंदा पुष्कळ लोक करतात म्हणाले– शंकराचार्यांनी स्वतः संन्यासाश्रम घेऊन अनेक शिष्यांना संन्यासाश्रम दीक्षा त्यांनी दिली, आणि संन्यासाश्रमाचे महत्व हे त्यांनी स्वतः त्यावेळेला व्यक्त केलं. आता ते पुढं चालत आलेलं आहे. संन्यास

घेऊच नये कलियुगामधे, अग्निहोत्र घेऊच नये, संन्यास घेऊच नये असे म्हणतात म्हणाले. अशी एकंदर लोकांची वृत्ती झालेली आहे. म्हणून आपल्यासारखे अधिकारी महात्मे यांनी जर संन्यासदीक्षा घेतली तर लोकांचा आदर त्या संन्यासाश्रमाबद्दल वाढेल. कुणाला एखाद्याला वाटलं तर घेईल संन्यास म्हणाले. अशी तुम्ही विनंती करा त्या महात्म्याला. म्हणून ते कृष्णसरस्वती स्वामी महाराजांनी आपल्या सगळ्या शिष्यांना सांगितलं. ही सर्वही संन्याशी मंडळी आणि महाराजांच्या जवळ आलेली आहेत. ब्रह्मचारी आहेत अद्यापी महाराज. त्यांना यांनी विनंती केली की, ''महाराज आपण संन्यासाश्रम घ्या म्हणाले. संन्यासाश्रमाला आपण योग्य आहात.'' इतकं तीव्र वैराग्य ज्याच्याजवळ आहे तोच संन्याशी होऊ शकतो, आणि तोच आत्मचिंतन करू शकतो. मुख्य म्हणजे **ब्रह्मचिंतना करिता संन्यासाश्रम आहे.** कोणालाही त्यांनी नमस्कार करावयाचा नाही, कोणाचीही स्तुती करायची नाही, कांही नाही. **वाणी किंवा मन बाहेर जाऊच द्यायचं नाही.** साधन चतुष्ट्या मध्ये उपरती घातलेली आहे. व्यवहार उपरम – जो आहे, व्यवहार सगळा कमी कमी झाला पाहिजे. मनापासून कमी झाला तर बाहेरून कमी होणार, नाहीतर बाहेरूनच असेल तर काय करणार. संन्यास घेतलेला आहे आणि लोकांनी यावं, लोकांनी हे करावं ही मनात वासना असली की तो केवळ बहिरंग होतो.

तर आपल्याजवळ ही तीव्र विरक्ती असल्यामुळे आपण मोठे संन्यासी होऊ शकता, योग्यता आहे. तेवढा आपण संन्यासाश्रम घ्यावा अशी आमच्या गुरूमहाराजांची इच्छा आहे. ते आपल्याला संन्यास दीक्षा देतील म्हणाले. महाराजांनीही विचार केला, कांही हरकत नाही म्हणाले. म्हणून आले. कृष्णसरस्वती जे सद्गुरू, परंपरेने प्राप्त झालेले आहेत. अगदी ब्रह्मदेव आहेत, ब्रह्मदेवाची मुलं आहेत.

नारायणं पद्मभवं वशिष्ठं शक्तिं च तत्पुत्रपराशरं च ।
व्यासं शुकं गौडपदं महान्तं गोविन्दयोगीन्द्रमथास्य शिष्यम् ॥

(अद्वैत गुरूपरंपरेतील श्लोक)

वगैरे वगैरे ती परंपरा आहे ती. अगदी शंकराचार्यही त्याच परंपरेतले. त्यांच्यापासून कृष्णसरस्वती आलेले आणि त्यांच्या पासून मग त्यांनी संन्यास दीक्षा घेतली आणि नरसिंहसरस्वती असं यांचं नामाभिधान केलेलं आहे. मग सगळे संन्यासी पुरुष, आणखी महाराजांची पूजा अर्चा करताहेत. वंदन करताहेत आणि महाराजांच्या मुखातून वेदांचे श्रवण आणखी त्यांना घडतं आहे.

आत्मज्ञानी महात्मा आहेत. साक्षात भगवतस्वरूप आहेत, भगवानच साक्षात आहेत. त्यांच्या मुखातून आणखी वेदांत ऐकायला मिळणं म्हणजे त्यात कांही संदेह वगैरे कांही नाही. जे खरं

आहे, काय उपनिषदामधे सांगितलेलं आहे त्या त्या ठिकाणचं वर्णन, ब्रह्मलोकाचं वर्णन काय आहे ते सगळं पाहिलेलंच आहे यांनी. अशांच्या मुखातून आणि श्रवण करण्याचा लाभ मिळतो आहे त्या संन्याशी महात्म्यांना. त्यांनाही अत्यंत समाधान वाटतं आहे. सर्व एकंदर रहस्य, ज्ञानयोग काय आहे, कर्मयोग काय आहे, संन्यासयोग काय आहे, भक्तियोग वगैरे काय सर्व सगळंही आणखी सिद्धांत आणखी सांगून दिलेले आहेत. सगळ्यांचं स्पष्टीकरण केलेलं आहे. आणि तिथून मग यात्रा करण्याकरता ते बाहेर पडले आहेत. पुष्कळ संन्यासी शिष्यमंडळी वगैरे बरोबर आहेत. कांही गृहस्थही असतील. यात्रेकरता निघालेले असताना आणखी गोदावरीच्या तीरावरुन त्यांची यात्रा चाललेली आहे. गोदावरी नदीचेही महत्त्व त्यांनी वर्णन केलं, सिद्धांनी प्रसंगांनी. गोदावरी नदी म्हणजे साक्षात गौतम ऋषींनी भगवान शंकरांना प्रसन्न करून घेतलं आणि ही गंगा म्हणजे गोदावरीला खाली आणलं म्हणतात. त्यांनाही कांही गोहत्या घडली, त्या दोषातून मुक्त होण्याकरता गोदावरी नदीला खाली आणावं, ऋषींनी निर्णय दिला. त्याचप्रमाणे गौतमांनी तपश्चर्या करून, शंकरांच्या प्रसादाने ही गोदावरी आलेली आहे. त्या गोदावरीच्या तीरावरून आणखी महाराज चाललेले आहेत. एका ठिकाणी एका गांवामधे ते आलेले आहेत. तिथं आलेले असताना नदीतीरावरती एका मोठ्या झाडाखाली स्वस्थ विश्रांतीकरता सगळी मंडळी बसली. समोर नदी वाहती आहे आणि त्या गांवामधे एक ब्राह्मण रहात होता. अगदी पोटशूळाची व्यथा त्याला होती. जेवण केलं की पोट दुखायला लागायचं. नेहमी पोट दुखायचं नाही. म्हणजे जेवण केलं नाही म्हणजे पोट दुखायचं नाही पण भूक लागली, त्याची काय अवस्था. जेवणाशिवाय कसं रहायचं. त्यामुळे जेवावं, जेवण केलं की पोट, उदरव्यथा होती आहे. पूर्वीच्या दिवशी महाराज तिथे आले. म्हणजे हे नवरात्र संपलेलं असावं. महानवमी झालेली आहे. पुष्कळ अशी पक्वान्नच जेवण जेवला तो ब्राह्मण आणखी झालं, पोट दुखायला लागलेलं आहे. कांही त्याला उपायच नाहीये. शेवटी त्याला आणखी असं वाटलं की काय जिवंत राहून काय करायचं म्हणाला. पोट दुखू नये म्हणून जेवण बंद केलं तर भुकेने आणखी प्राण जायची वेळ. जेवण केलं तर आणखी पोट दुखून प्राण जाण्याची वेळ. त्यापेक्षा आपण आत्ताच प्राण देऊन मोकळं व्हावे म्हणजे झालं. कांही नाही. महाराज येऊन त्या ठिकाणी बसलेले आहेत, त्या झाडाखाली आणि हा ब्राह्मण तिथे प्राण देण्याकरिता आलेला आहे. गळ्यामधे धोंडा बांधलेला आहे आणि अनेक जन्माची पापं आपल्या हातून काय काय झालेली आहेत, दान धर्म झालेला नाही, कुणाला मी त्रास दिलेला आहे, कुणाला अन्नदान केलं नाही म्हणून माझी अशी दशा झाली, असं सगळं आणखी मनामधे विचार करीत करीत तो त्या पाण्यामधे देहत्याग करायला निघाला.

महाराजांची दृष्टी त्याच्यावर पडलेली आहे. शिष्यांना सांगितलं, अरे जा जा म्हणाले लवकर जा. त्याला घेऊन या. हा ब्राह्मण कांही नुसता नदीमधे चाललेला दिसत नाही. प्राण

देण्याकरता जातो आहे. लवकर त्याला सोडवून आणा म्हणाले. आली सगळी शिष्यमंडळी. त्याच्या गळ्यातला तो दगड काढून टाकला. चल म्हणाले, महाराजांनी तुला बोलावलंय. आला, नमस्कार करून एका बाजूला बसलेला आहे. कां रे म्हणाले, 'काय चांगला जन्म ब्राह्मणाचा मिळालेला आहे आणखी तू आणखी जीव द्यायला कां लागलास?' काय करू म्हणाला जीव द्यायला कां लागलो म्हणजे? जेवण केलं तरी अशी दशा आहे. पोट दुखतं म्हणाले. जेवण न करावं तर भूक लागून प्राण जाण्याची वेळ आहे. मग काय करू मग? थांब म्हणाले, तुझी आता ही पोटशूळाची व्यथा कायम गेली म्हणाले. कांही आता काळजी करण्याचं कारण नाही. समाधान वाटलं त्याला. थांबलेला आहे, इतक्यात त्या गांवचा एक अधिकारी, पुर्वी लहान लहान राज्य यवनांची, संस्थानं अशी पुष्कळ होती, या ठिकाणी भारतात सुद्धा पुष्कळ संस्थानं होती. कांही हिंदूची होती, कांही यवनांची होती. त्यापैकी एका लहानशा संस्थानापैकी हा गांव होता. आणि त्या गांवाचा अधिकारी हा सायंदेव ब्राह्मण हा गाणगापूरातच राहणारा पण इथं येऊन त्या यवनांच्या राज्यामधे त्याचे सबंध व्यवस्थापक म्हणून तिथं राहिला. चांगला आचारयुक्त होता. भगवत भक्त होता कर्मनिष्ठ. तोही स्नान करण्याकरिता नदीतीरावरती तिथे आलेला आहे. महाराज–स्वामीमहाराज कोणीतरी आहे, तेज:पुंज. आणखी अत्यंत बालवय आहे. कोणीतरी महात्मा आहे, येऊन साष्टांग नमस्कार केला त्यांनी महाराजांना. कोण, कुठले म्हणाला, मी इथेच रहातो. या सगळी गांवाची व्यवस्था म्हणाला, मी पहात असतो. बरं म्हणाले.

'या ब्राह्मणाला तुम्ही ओळखता कां?' होय म्हणाला, आमच्या गांवातच राहातो. असं करा म्हणाले याला आज तुमच्या घरी घेऊन चला म्हणाले आणि याला पोटभर जेवायला घाला म्हणाले. म्हणजे याला भूक लागलेली आहे. आता त्याला त्यांच्याच गांवात रहाणारा तो मनुष्य. आणि या ब्राह्मणाची अवस्था काय आहे, जेवण केलं की त्याचं पोट दुखायला लागायचं हे. त्याला माहिती आहे, सायंदेवाला. त्यांनी सांगितलं, ''महाराज, याला जेवायला घालायचं म्हणजे ब्रह्महत्या दोष माझ्या डोक्यावर येईल.'' म्हणाला, 'जेवण केलं की याला प्राण जाण्याची अशी उदर व्यथा होते म्हणाला. त्याला जेवायला कसं घालायचं?' ते म्हणाले, सांगतो मी, आमचं ऐका. तुम्ही आज घालून पाहा, याला जेवायला. इतके दिवस जेवला ना, पोट दुखलं ना? आजच्या दिवस तुम्ही करून बघा म्हणाले प्रयोग. बरं आहे, कबूल केलं त्यांनी. मग महाराज आपणही आमच्या घरी भिक्षेला यावं म्हणून त्यांनी त्यांना आमंत्रण दिलेलं आहे. बराय म्हणाले. सर्वांनी यायचं. स्नान वगैरे करून तो सायंदेव ब्राह्मण आपल्या वाड्यामधे गेलेला आहे. पत्नीला सांगितलं 'बाई ! आज मोठा महात्मा आपल्या घरी जेवायला येणार आहे, भिक्षेला येणार आहे, सगळी तयारी करा.' तीही मोठी पतिव्रता साध्वी स्त्री. आणि सगळ तिनं आणखी उत्तम तयारी केलेली आहे. पंचपक्वान्नाचा आणखी स्वयंपाक वगैरे तयार केलेला आहे.

महाराजांना बोलावून आणलं तिथं. आणि त्यांची यथाविधी पूजा केली. पाय धुतलेले आहेत, सर्वही देवाची पूजा जशी करावी तसे सर्व उपचार समर्पण केले. ते जे दिव्य चरणतीर्थ होतं त्या तीर्थाचीही पूजा त्यांनी केली आहे. सायंदेव ब्राह्मणही मोठा आणखी कर्मज्ञ होता. विधी सगळं जाणणारा होता. जरी व्यवस्थापक असला, मोठे ते यवनाचं राज्य सांभाळत असला, तरी त्याला सर्व शास्त्रीय प्रक्रिया सगळी माहिती होती. रांगोळ्या उत्तम काढलेल्या आहेत, पानं मांडलेली आहेत. सगळी मंडळी बसली, पात्रावरती. तो ब्राह्मण, त्याला सांगितलं, बसा, तुम्हीही जेवायला बसा. तुम्हीही कांही मनांत आणू नका म्हणाले. आज तुमचं पोट दुखणार नाही. बरंय. भूकही लागली होती. महाराज बसलेले आहेत. आणखी महाराजांना आणखी हस्तोदक वगैरे घातलेलं आहे. बाकीची सगळी मंडळी बसली. महाराज बसलेले आहेत. संकल्प सोडला. सगळ्या मंडळीचं जेवण चाललेलं आहे. त्या ब्राह्मणानेही अगदी निःशंकपणाने, महाराजांचं ते तेज आहे, त्यांची वाणी आहे. त्यांच्या वाणीतून निघालेलं की तुम्हाला पोट दुखणार नाहीये. विश्वास उत्पन्न झालेला आहे. आणखी यथेच्छ भोजन त्याने पोटभर केलेलं आहे. तरी काय होतंय कुणाला ठाऊक.

सगळी मंडळी आपल्या आपल्या घरी गेली. त्या दिवशी पासून त्या ब्राह्मणाचा तो पोटदुखीचा विकार कायमचा बंद झालेला आहे. जेवण केलं म्हणजे पोट दुखत होतं. जेवण करणं म्हणजे पोटदुखीला आणखी अगदी आमंत्रण देण्याप्रमाणे होतं. जो कार्यकारणभाव आणखी त्याच्या जीवनामधे निश्चित झालेला होता, जेवण हे पोट दुखण्याचं कारण आहे, पण तेच जेवण पोट दुखायला बंद करण्याचं कारण ठरलेलं आहे. याला काय, ईश्वराची इच्छा आहे.

स्त्रगियं यदि जीवितापहा हृदये किं निहिता न हन्ति माम् ।
विषमप्यमृतं क्वचिद्भवेदमृतं वा विषमीश्वरेच्छया ॥ (रघुवंश ८-४६)

तेच औषध झालेलं आहे, जे अन्न विषासारखं आणखी प्राण जाणारी पोटव्यथा. उदरव्यथा निर्माण करत होतं, तेच अन्न त्याची आणखी पोटव्यथा थांबविणार झालेलं आहे. ही त्या महात्म्याची इच्छाशक्ती आहे, संकल्पशक्ती आहे. त्यामुळे आणखी त्याचा रोग पूर्ण बरा झालेला आहे.

सायंदेवाचा विश्वास अधिक बसलेला आहे आणि दुसरे दिवशी त्याने विनंती केली. महाराज आपण आता आपल्याबरोबर मलाही आपण घेऊन चला. एक अडचण अशी आहे म्हणाला, हे जे आमचे या राज्याचे अधिकारी आहेत, एक यवन आहे म्हणाले. तो प्रतिवर्षी कोणीतरी व्यवस्थापक असा ठेवतो आणि शेवटी त्याचा प्राणनाश करतो म्हणाले. मारतो त्याला. असा तो अधिकारी आहे, मला त्याचं बोलावणं आलेलं आहे. येऊन भेटून चला म्हणून मला निरोप आलेला आहे. आता मला जाणं भाग आहे. आपली कृपादृष्टी असली म्हणजे माझी सुटका होईल म्हणाले. महाराजांनी सांगितलं, तुम्ही अगदी निर्भयपणाने जा म्हणाले. तुम्ही परत येईपर्यंत आम्ही

या ठिकाणी राहातो म्हणाले. जा, जाऊन या. तो गेला. सायंदेव ब्राह्मण आपल्या त्या आणखी मालकाला भेटण्याकरिता त्याच्या वाड्यामध्ये गेलेला आहे. या ब्राह्मणाला पाहिल्याबरोबर आणखी तो रागावला यवनराजा. पण त्या दिवशी काय झालं, रागारागाने आंत निघून गेला. आपल्या पलंगावर जाऊन पडला, झोप लागली. त्याला स्वप्न पडलेलं आहे, स्वप्नामधे कोणीतरी एक तेजःपुंज मनुष्य आलेला आहे, हातामध्ये शस्त्र घेऊन आणि आपल्याला तो मारणार आहे, मारायला लागलेला आहे. एकदम राजा जागा झाला भिऊन, आणि लगेच धावत धावत बाहेर आलेला आहे. सायंदेवाच्या पायावरती मस्तक ठेवलेलं आहे. त्याला आणखी वस्त्रबिस्त्र सगळं त्याची पूजा केली. जा महाराज, तुम्हाला कांही, भिऊ नका तुम्ही. आपलं काम सांभाळा म्हणून सांगितलं आणि पाठवून दिलं. आजपर्यंत कितीतरी लोकांना त्याने मारलं होते, पण हाच तेवढा मोकळा सुटला. सायंदेव जो आला गांवाबाहेर, महाराजांना वंदन करून सांगितलं महाराज आता मला नको, पुरे झाला संसार. आता खरं रक्षण आपलं आहे म्हणाले. आज याने सोडलं म्हणाला, पुन्हा पुढे तो काय करील याचा कांही नेम. तेव्हा मीही आपल्याबरोबर येणार आहे. महाराज म्हणाले, बाबा, कांही नाही. तुम्ही काळजी करू नका. तुमची सुटका झालेली आहे. काल त्या ब्राह्मणाची सुटका झाली ना रोगापासून, तशी आज तुमचीही सुटका झालेली आहे. तुम्हालाही अनुभव आलेला आहे. मग भिण्याचं कारण काय म्हणाले. त्यांनी एकदा जेवण केलं आणि एकदा मला माझं पोट दुखलं नाही म्हणून उद्यासुद्धा पोट दुखणार नाही कशावरून, म्हणून तो बसला कां म्हणाले ? आता रोज जेवायला लागलाय तो. कधी पोट दुखत नाही. तसं त्यांनी तुम्हाला सोडून दिलेलं आहे. पुढेही तुम्हाला कांहीही तो दुःख देणार नाही, त्रास देणार नाही. पुन्हा तुमची भेट होईल म्हणाले. तुमच्या गांवाजवळच आम्ही येऊन राहणार आहोत. त्या ठिकाणी तुमची भेट होईल. असं सांगून त्या सायंदेवाला आश्वस्त केलेलं आहे आणि महाराज तेथून पुढे निघालेले आहेत. जाताना त्यांनी असं केलं, सिद्धमुनी नामधारकाना सांगताहेत ही कथा. बरोबर पुष्कळ संन्यासी शिष्य होते आणि कांही गृहस्थाश्रमी मंडळी, कांही थोडे दिवस राहिली. आपल्या आपल्या घरी निघून गेली. पण संन्यासी सुद्धा पुष्कळ. त्यांना महाराजांनी सांगितलं की संन्याशाने असं नुसतं फिरणं चांगलं नाही म्हणाले. तीर्थयात्रा करा म्हणाले. सगळ्या तीर्थांला जाऊन, सगळ्या महानद्यांचं स्नान करा आणि सगळ्या तीर्थयात्रा करून शेवटी आमच्या भेटीला तुम्ही या म्हणाले. हे संन्याशाचे कर्तव्य आहे...

श्रीनारद उवाच

कल्पस्त्वेवं परिव्रज्य देहमात्रावशेषितः ।

ग्रामैकरात्रविधिना निरपेक्षश्चरेन्महीम् । (श्रीमद् भागवत ७.१३.१)

ही आज्ञा आहे शास्त्राची.

कोणच्याही गावामधे एका रात्रीशिवाय मुक्काम संन्याश्याने करू नये. ही आज्ञा आहे शास्त्राची. मुक्काम केला की संग उत्पन्न झाला.

ध्यायतो विषयान्पुंसः सङ्गस्तेषूपजायते ।

सङ्गात्सञ्जायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते । (भ. गी. २.६२)

त्याकरता एक रात्र फक्त गांवामधे मुक्काम करायचा. कोणी भाग्यवान, जिज्ञासु पुरूष आला, त्याला मार्गदर्शन योग्य करायचं आणखी पुढं दुसरीकडे दुसऱ्या दिवशी चालू लागायचं. असा सर्वही भूमिवरती संचार हा संन्याशाने केला पाहिजे आणि तसा संचार करीत भिक्षान्न आणखी सेवन करायचं, आणखी त्याप्रमाणे जेवढा एकांत मिळेल तेवढं आणखी ब्रह्मचिंतन करायचं आहे. अशा रीतीने त्यांना सर्वही समजावून सांगितलं. तीर्थक्षेत्रांची सगळी माहिती त्यांना करून दिलेली आहे महाराजांनी, आणि सर्वही संन्याशांना त्यांनी तीर्थयात्रेला पाठवून दिलेलं आहे. सगळे संन्यासी निघून गेले आणखी नंतर, सिद्धमुनी सांगताहेत, की महाराज आणखी मी म्हणाले, आम्ही दोघे परळी क्षेत्रामध्ये येऊन राहिलो.

इथं महाराज कांहीतरी वर्ष दीड वर्ष होते असं सांगतात. गुप्त. अगदी – प्रगट नाही, कांही नाही. केव्हांही प्रगट होणं, ते गुप्त राहिले कसे हेच आश्चर्य आहे. पण नाही, त्यांचीच इच्छा आहे. तेव्हा त्याप्रमाणे त्या परळी क्षेत्रामधे महाराज राहिलेले असताना एक घटना घडलेली आहे ती तेवढी ती कथा आता सांगताहेत, सिद्धमुनी नामधारकाला. तेही आणखी ज्योतिर्लिंग आहे. परळी वैद्यनाथ– महादेवांचं स्थान मोठं प्रसिद्ध स्थान आहे. तिथं महाराज असताना एक ब्राह्मण त्यांच्याकडे आला. अगदी शोक झालेला आहे, रडतो आहे, पाया पडतो आहे, महाराजांना विनंती करतो आहे, माझा उद्धार करा महाराज. मी पुष्कळ तपश्चर्या केली म्हणाला आजपर्यंत. कांही माझ्या मनाला शांती मिळाली नाही. कांही नाही. महाराज म्हणाले, बाबा तुला कोणी सांगितलं ही तपश्चर्या करायला? तुला कुणी गुरू, बिरु कोणी होता की नाही म्हणाले, मार्गदर्शन करणारा? तो म्हणाला, होता म्हणाले एक गुरू. काय वाटेल तसा रागवायचा काय, हे करायचा काय, तुझं अजून चित्त शुद्ध झालं नाही म्हणायचा, हे कर, ते कर. कांहीतरी म्हणाला, सांगायचा. मलाही एके दिवशी राग आला. कांही मला सांगत नाही कांही नाही उगीच रागावतो म्हणाले म्हणून मी ही रागाने त्या गुरूला सोडून दिलं आणखी निघून आलो. हे ऐकून घेतलं महाराजांनी. 'वा वा वा, तुला कांही ज्ञान कसं मिळेल ? एकटा तू ज्ञान मिळविणार? गुरूला सोडून देऊन आलास ?' गुरूंचे दोष पहातोस, तुला होईल कसं ज्ञान ? म्हणाले. गुरूभक्तीशिवाय ज्ञान उत्पन्न होणं कधीच शक्य नाही. आचारवान जो आहे त्यालाच ज्ञान होतं. राम कृष्णावतार घेतला भगवंतांनी, पण कृष्णावतारामधे त्यांना कांही ज्ञान मिळवायचय, काय नवीन मिळवायचंय काय ? सर्व विद्या ज्यांच्यापासून निघालेल्या आहेत. सर्वज्ञ परमात्मा

आहे, परंतु सर्व लोकांच्यापुढे त्यांना हे मांडायचं होतं की गुरूंच्याकडे जाऊन, त्यांची सेवा करून ज्ञान मिळविता येतं, त्याशिवाय ज्ञान मिळत नाही. म्हणून स्वतः आणखी भगवान त्या सांदीपनी गुरू महाराजांच्या आश्रमामधे जाऊन राहिले. सेवा केली. गुरूपत्नीने सांगितलें एके दिवशी की बाबा घरात लाकडं नाहीयेत. स्वयंपाक कसा करायचा संध्याकाळी. सुदामजींना त्यांनी गोष्ट सांगितली. स्वतः गोपालकृष्णानी. भागवतामध्ये ही कथा प्रसिद्ध आहे. आपण गेलो, अरण्यामधे गेलो. लाकडं गोळा केली. भारे बांधले. तिघांनी आम्ही आपले मी, राम आणखी तुम्ही, सुदामजी, तिघांनी भारे डोक्यावर घेतले आपण आणि घेऊन येऊ लागलो आश्रमाकडं. इतक्यात वारा सुटला, ढग आले, पाऊस पडायला लागला, अंधार पडला, आपण रस्ता चुकलो, रात्रभर फिरलो म्हणाले. सूर्योदयापर्यंत आपल्याला रस्ता सापडला नाही. मग गुरू महाराज सकाळच्या वेळेला शोध करीत आले आणि आम्हाला पाहून त्यांनाही मोठं वाईट वाटलं, ''काय म्हणाले, किती तुम्ही कष्ट घेतले आमच्याकरता'' असं ते बोलले आपल्याला. त्यांची कृपा आपल्यावरती झाली. त्यामुळे आपलं जीवन सुखी झालं अशी कथा श्रीकृष्णांनी सुदामजींना स्वतः सांगितली आहे. **तेव्हा गुरूसेवा करून ज्ञान मिळविलं तरच जीवन हे सुखी होऊ शकतं. संसारबंधनातून मुक्तता, ज्ञान हे त्याशिवाय मिळत नाही बाबा. महाराज त्या ब्राह्मणाला सांगता आहेत. तू स्वतःचा घात आपणच करून घेतला आहेस म्हणाले. तुझ्या तपश्चर्येचं काय फळ तुला मिळणार आहे ? मनाचा निग्रह तुला करता येणार नाहीये.**

इत्थंविधान्यनेकानि वसतां गुरुवेश्मनि ।

गुरोरनुग्रहेणैव पुमान् पूर्णः प्रशान्तये । (भा. १०.८०.४३)

हा सिद्धांत गोपाळकृष्णांनी सांगितलेला आहे. **गुरूचा अनुग्रह झाल्याशिवाय पूर्ण शांती, संसार विरक्ती होणं शक्य नाही.** तो म्हणाला, ब्राह्मण, की महाराज माझ्या हातून झाली चूक झाली पण आता कसं करायचं कसं? त्याला मग गुरूभक्ती कशी असते ते सांगितलेलं आहे. सद्गुरूंची कृपा संपादन करण्याकरता, कशी आणखी देहादिकाकडे सुद्धा लक्ष न देताना कशी गुरूसेवा करावी लागते, याकरता भारतातला एक कथा भाग आणखी त्याला सांगितला महाराजांनी. धौम्य ऋषींच्या आश्रमामधे त्यांचे तीन शिष्य होते. अरूण, बैद आणि उपमन्यू. अरूण जो आहे त्याला धौम्य ऋषींनी आज्ञा केली की, आमचं एक शेत गांवाबाहेर आहे म्हणाले. तिथून एक मोठा झरा वाहतो आहे. पाणी पुष्कळ आहे त्या झऱ्याला, ते झऱ्याचं पाणी आमच्या शेताकडे जाण्याची व्यवस्था तू कर. शेतामधे पाणी गेलं, म्हणजे मग तिथे पेरण्याची व्यवस्था करायची. तो गेला. मोठा आणखी झरा धो-धो, धो-धो वाहतो आहे. त्याने दगड आणले, इकडचा प्रवाह त्या शेताकडे न्यावा म्हणून त्याने प्रयत्न केला. ते दगडही वाहून जायला लागले. तो प्रवाह कांही शेताकडे जाईना. मग त्याने असं ठरविलं की त्या

प्रवाहामधे आपणच पडावं म्हणाले, म्हणजे एका बाजूला तो प्रवाह तिकडे त्या शेतामधे जाईल. म्हणून तो अरूण जो शिष्य होता, शेतामधे पाणी गेलं पाहिजे एवढी गुरूंची आज्ञा आहे, तेवढी पालन करायची आहे. स्वतःचं शरीरच त्याने त्यात टाकून दिलेलं आहे. वरून पाणी वहातय, आणि त्या प्रवाहाचा आणखी भाग जो दुसरीकडे होता तो इकडे वहायला लागला. आड त्याने शरीर टाकलं आणि त्या झऱ्याचं ते सगळं पाणी शेतामधे गेलेले आहे.

संध्याकाळपर्यंत तसाच पडून राहिलेला आहे. पाण्यातच. सबंध पाणी शरीरावरून जातंय. आता त्यालाही कांही विद्या असेल, प्राण संयमन करणं. नाही तर नाकातोंडात पाणी गेलं म्हणजे जिवंत कसा राहील. अशी कांही विद्या दिलेली असेल गुरूंनी म्हणा. त्याप्रमाणे संध्याकाळ झाली. धौम्य ऋषी, त्याचे सद्गुरू, त्याचा शोध करण्याकरता आले. हांक मारतायत. अरे अरुणा, अरुणा, कुठे आहेस तू ? हा उठला, आला गुरू महाराजांच्याजवळ– संबंध अंग भिजलेलं आहे. नमस्कार केला. काय झालं. पाहिलं त्यांनी. शेतामधे पाणी गेलंय म्हणाले. चांगलं झालं. पण हे झालं कसं? तो म्हणाला मीच पडलो होतो. सबंध माझ्या अंगावरून तो प्रवाह थांबला आणि शेताकडे वळला म्हणाले.

मग प्रसन्न झाले धौम्य मुनी आणि त्यांनी त्याला लगेच सांगितलं. तुला सगळ्या विद्या आणखी प्राप्त होतील म्हणाले. म्हणण्याचा अवकाश ! कांही शिकावं लागलं नाही. कांही नाही. पण, त्यांच्या आणखी प्रसन्नतेनं, त्यांनी सांगितलं की तुला विद्या प्राप्त होईल म्हटल्याबरोबर सर्व विद्या त्याला प्राप्त झाल्या. जा म्हणाले आता घरी. गृहस्थाश्रम कर वगैरे. सगळ्या लोकांनाही उपदेश कर, मार्गदर्शन कर, त्याला पाठवून दिलं.

दुसरा शिष्य बैद. त्याला धौम्य ऋषीं म्हणाले आता शेतामधे जाऊन धान्य वगैरे पेरा म्हणाले. चांगलं धान्य अगदी आलं पाहिजे. पाणी वगैरे आता पुष्कळ झालेलं आहे म्हणाले. तो आलेला आहे, पेरणी वगैरे त्याने केली. आणखी उत्तम धान्य आलेले आहे. येऊन सांगितलं गुरूमहाराजांना की महाराज, धान्य तयार आहे. जा म्हणाले. गाडी घेऊन जा. गाडीला एक रेडा फक्त बरोबर दिलेला आहे. दुसऱ्या बाजूला काय वगैरे त्यांनीही विचारलेले नाही आणि यांनीही सांगितल नाही, कांही. हे घेऊन जा म्हणाले आणि गाडीत सगळं धान्य भरुन घेऊन ये. गेला तो. धान्य वगैरे गाडीमधे भरलेलं आहे. एक फक्त रेडा होता. एका बाजूला रेडा जुंपला आणि दुसऱ्या बाजूला आपण स्वतः आपल्या मानेवरती ते जू घेतलेलं आहे. आणि ती मान त्याला बांधून टाकलेली आहे. आणि ओढायला लागला. आता त्या रेड्याची शक्ती किती आणि याची शक्ती किती. रेड्याबरोबर याला ओढता येईल कां? तो रेडा पुढे जातोय, याच्या गळ्याला फास पडतो आहे. पण गुरूमहाराजांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच धान्य त्यांच्या आश्रमात नेवून पोचवायचं, कर्तव्य आपलं आहे. झालं. मधेच चिखल आलेला आहे आणि त्या

चिखलामधे ते गाडीचं चाक रुतून बसलं. हा ओढण्याचा प्रयत्न करतो आहे तो. गळ्याला फास लागलेला आहे, प्राण जाण्याची वेळ आलेली आहे, तरी कांही ते चाक निघेना.

इतक्यात धौम्य ऋषी अकस्मात आले त्या रस्त्याला, पाहिले त्यांनी ही अवस्था. लगेच गेले जवळ, त्याचा गळा मोकळा केला. त्याला सोडून दिलेल आहे. काय म्हणाले हे, केवढं साहस केलंस तू. प्राण गेला असता म्हणाले. बरं, कांही हरकत नाही. तूही, सर्व विद्या तुला प्राप्त होतील. त्यालाही आशीर्वाद दिलेला आहे आणखी तत्काळ त्याला सर्व ज्ञान प्राप्त झालं. तोही आपल्या घरी निघून गेलेला आहे.

तिसरा शिष्य उपमन्यू. त्याची थोडीशी कथा हे सिद्धमुनी सांगताहेत. महाराज, त्या ब्राह्मणाला सांगतात. ते म्हणाले, उपमन्यू असा, त्याला खायला फार लागत होतं म्हणे. जेवायला, खायला जास्ती पाहिजे. त्याशिवाय त्याचं पोटच भरत नव्हतं. आता काय, त्याची सेवा कशी घ्यावी. त्याला सांगितलं धौम्य ऋषींनी, की उपमन्यू, उद्यापासून या आमच्या सगळ्या गायी तू रानामधे घेऊन जात जा. चरायला घेऊन जात जा. बरयं. दुसरे दिवशी सगळ्या गायी घेऊन तो निघाला. आता मध्येच भूक लागली. थोडसच गेला रानामध्ये. भूक लागल्याबरोबर गाई परत घेऊन आला. रागावले. ते म्हणाले, काय अशा गायी चरायला काय अशा घेऊन जायच्या आणि लगेच आणायच्या असतात काय ? म्हणाले. संध्याकाळपर्यंत तिथे राहिलं पाहिजे आणि संध्याकाळी गाईंना घेऊन येत जा. मधेच येऊ नको. पण गुरूंची आज्ञा मात्र तो पालन करणारा होता. जसं सांगतील तसं वागायचं. दुसरे दिवशी गेला, लांब गेलेला आहे गायी चरताहेत. कांही आणखी आश्रम आणखी मंडळींचे तिथं होते. त्या आश्रमामधे जाऊन त्याने मधुकरी मागून आणलेली आहे. तिथेही अन्न त्याला मिळालं. जेवण केलं. संध्याकाळी गायी घेऊन आला. आठ-पंधरा दिवस गेले. घरी कांही विशेष त्याला कांही जेवण-बिवण मिळत होत असं नाही. त्याचा आहार पुष्कळ होता. जेवढं कांही मिळेल तेवढं खायचं, पाणी पिऊन राहायचं. धौम्य ऋषींनी त्याला मुद्दाम विचारलं, काय रे म्हणाले, तू अरण्यामध्ये रोज जातोस. संध्याकाळपर्यंत तिथे रहातोस. संध्याकाळपर्यंत तुला जेवण नाही, संध्याकाळी इथे आल्यानंतर काय असेल ते जेवण करतोस म्हणाले. मग तुला अन्न जर भरपूर मिळत नाही तर तुझं शरीर इतकं चांगलं धष्टपुष्टं कसं राहिलं ? हा प्रश्न केला त्यांनी. त्यांना सगळंच त्याच काढून घ्यायचे होते. काय केलं त्यांनी. तो म्हणाला गुरूमहाराज सांगू मी तुम्हाला? आता तुम्हाला खरं सांगतो. तिथे कांही घरं आहेत, आश्रम आहेत म्हणाले. दुपारच्या वेळेला मला भूक सहन होत नाही. मी त्या आश्रमात जाऊन भिक्षा मागतो. तिथे अन्न मला मिळतं, आणि मी जेवण करतो. संध्याकाळी इथे आल्यानंतर मिळेल ते जेवण

करतो म्हणाले. धौम्य ऋषी म्हणाले आम्ही इथे उपाशी आणि तू तिथे जेवण करतोस काय म्हणाले? आम्हाला सोडून जेवण करतोस ! तिथे भिक्षा मागून ती सगळी भिक्षा इथे आणून देत जा म्हणाले. पुन्हा रानात जात जा आणि संध्याकाळी गाई घेऊन ये आणि मग जेवण कर म्हणाले. झालं, पण राग नाही. गुरूजी हे आपल्या पोटावर उठलेले आहेत अशी कल्पनासुद्धा नाही.

त्यांची अनुज्ञा, त्यांची आज्ञा जी आहे ती अवश्य पालन करायची आहे हा निर्धार मनामध्ये आहे. गेला दुसऱ्या दिवशी. दुपारी भिक्षा मागितली. ती आणून दिली घरात, म्हणाले. पण ती भूक कुठे राहातेय. पुन्हा एक दोन तीन तासांनी पुन्हा त्या आश्रमामधे गेला, लोकांना काय वाटलं, लहान मुलगा आहे म्हणाले भूक लागली असेल. घाला, आणखी काय, बाया-बिया होत्या. आणखी थोडं अन्न घातलं ते पोटभर जेवण केलं. संध्याकाळी आला. पुन्हा आठ पंधरा दिवस झाल्यानंतर पुन्हा तीच अवस्था. कां रे म्हणाले, तू भिक्षा मागतोस आणि आमच्या आज्ञेप्रमाणे इथे आणून देतोस. नंतर संध्याकाळी येतोस म्हणजे दिवसभर तुला कांही जेवण-बिवण मिळत नाही. मग पुन्हा तुझं शरीर असं चांगलं कसं? तो म्हणाला- खरं सांगू महाराज, मी आणखी एक वेळ भिक्षा मागतो. सांगितलं नाही त्यानी, पण आता विचारल्याबरोबर कबूल केलं. ते म्हणाले दोन्ही वेळेला भिक्षा इथे आणून देत जा किंवा संध्याकाळी येताना बरोबर घेऊन येत जा म्हणाले.

पण तिथे पुष्कळ गायी होत्या. वासरं होती. वासरं दूध प्यायला जायची. वासरांचं दुध पिऊन झाल्यानंतर राहिलेलं दूध बाकीच्यांनी प्यायचं असं आहे. वासराकरिता गाई दूध देतायत, आमच्याकरिता देत नाहीत. पण वासरांना फक्त गाईनं दूध द्यायला सुरूवात करेपर्यंत वासरं आणि तिचा संबंध. लगेच पुन्हा ओढून आम्ही बांधून टाकतो. तसं नाही. वासरं दूध पितायत आणि तो पान्हा गाईला इतका फुटलेला आहे की ते दूध खाली सांडतंय, वाया जातंय, याला वाटलं, दूध वाया जातंय. आपण गेला. हातात ते दूध घेतलं, ते प्याला. दुसऱ्या गाईजवळ गेला, ते दूध प्याला. ते प्यायला, झालं ! भिक्षा नाही, अन्न नाही, तर हे म्हणाला. तर हे ! कुणीकडून तरी आपली क्षुधा शांत झाली म्हणजे झालं. आला घरी आलेला आहे. पुन्हा चारआठ दिवस गेल्यानंतर काय करतोस रे म्हणाले. तो म्हणाला दूध पुष्कळ फुकट जातं म्हणाला, ते मी घेतो. अगदी उष्टं दूध पितोस म्हणाले तू? वासराचं उष्ट पितोस काय? कळत नाही. उष्ट दूध प्याला म्हणजे बुद्धी चांगली नाही. बुद्धी जाईल तुझी. म्हणजे तेही, त्यालाही प्रतिबंध झाला. सकाळची भिक्षा खायची नाही, दुपारची खायची नाही, दूध प्यायचं नाही. संध्याकाळपर्यंत रानामधे राहिलं पाहिजे. संध्याकाळ शिवाय घरी यायचं नाही. चांगलं आहे. कोणाजवळ, तक्रार कोणाजवळ करायची? तक्रार नाहीच आहे. गुरुमहाराजांच्या शब्दावर तक्रार कधीच नाहीये. छात्र छात्र जे म्हणतात-

गुरोर्दोषाणाम् आवरणं छत्रम् । तच्छीलमस्य छात्रः ।
(सिद्धांत कौमुदी तद्धिताधिकार ढगाधिकार प्रकरण छात्रादिभ्यो णः ।
(४.४.६२) या सुत्रावरील वृत्ति)

विद्यार्थी असा असला पाहिजे. गुरूचे जरी दोष असले तरी ते दोष झाकून ठेवणं म्हणजे हे छत्र आहे. **गुरूचे दोष झाकण्याची बुद्धी ज्याला आहे तो छात्र आहे आणि तोच छात्र म्हणून गुरु कृपेला पात्र आहे.**

दुसरे दिवशी आता काय करायचं. दुध समोर फुकट जातं आहे. भिक्षा सगळ्या झोळीमधे ठेवलेल्या आहेत. दोन्ही झोळ्या आपल्या घरी न्यायच्या आहेत. त्यातलं एकही शीत खायचं नाही. मग ते रूईचे झाड होत म्हणे, त्या झाडाची पानं त्याने तोडलेली आहेत. त्यातून तो रूईचा चीक आलेला आहे. हे बरं आहे दूध म्हणाला. एक द्रोण केलेला आहे त्यात तो चीक त्याने गोळा केला. डोळ्याला हात लागला. तो चीक लागला. डोळे गेले. आणखी जाता जाता एका आडामधे पडलेला आहे. पाणी थोडं असेल त्यामधे. काय करावं म्हणाला ? आता या गाई गेल्या, काय होईल आता ? आता गुरूमहाराजांना जाब देऊ, ही चिंता उत्पन्न झाली. अन्न नाही, दूध नाही, कांही नाही आणि अर्कक्षीर जे आहे, रुईचा चीक खाऊन आणखी खाता खाता डोळ्याला लागून डोळे गेलेत. आता गाई कशा सापडतील? संध्याकाळी गायींना घेऊन कसं जायचं. त्या विहिरीतून बाहेर आपण कसं पडायचं? डोळे नाहीत. गुरू महाराज संध्याकाळी तिथे येऊन पोचलेले आहेत. हांक मारतायत– उपमन्यू, उपमन्यू ! इकडे आहे म्हणाला महाराज, मी इकडे पडलो आहे आडात. आले जवळ. काय रे, काय झालं? असं असं सकाळी, म्हणाला, एका झाडाचे दूध मी काढलं आणि ते डोळ्याला हात लागल्यामुळे माझे डोळे गेले. बरं, अश्विनिकुमारांची स्तुती त्याला सांगितली. मंत्र त्याला येत असतील कदाचित, त्याप्रमाणे अश्विनिकुमारांच्या कृपेने त्याला दृष्टी उत्पन्न झालेली आहे. आधिदैविक विभाग जो आहे, त्या आधिदैविक विभागाचे पूर्णज्ञान आणि प्राचीन सगळ्या महर्षींना पूर्ण होतं. त्यांचे मंत्र सगळे माहिती होते आणि त्या मंत्रांची सिद्धी कशी करावी, देवतांचा आणखी कृपाप्रसाद कसा संपादन करावा, हे सगळंही त्यांना माहिती होतं. नुसत्या अश्विनीकुमारांच्या स्तुतीमुळे त्याला नेत्र उत्पन्न झालेले आहेत. गेलेले डोळे पुन्हा मिळालेले आहेत. हा चमत्कार नाहीये. हे शास्त्र आहे. त्या शास्त्रावरही आमचा विश्वास नाही. योगसामर्थ्य किंवा चमत्कार याच्यावर तर नाहीच, नाहीये. ज्याला कांही आणखी फळ मिळायचं असेल, ज्याचं भाग्य असेल त्याला ते फळ मिळतंय. तो सुखी होतो आहे. आम्ही सगळे, असेच चिकित्सेमधेच, आमचं सगळं आयुष्य निघून जाणार आहे, कांही त्याच. हे आम्ही ते ज्ञान घेवूही शकत नाहीत. कांही नाही. अविश्वासामुळे फक्त ते दूरच लोटून टाकतो आम्ही.

आला, बाहेर आलेला आहे. गाई वगैरे तिथेच थांबल्या होत्या आणि मग त्याच्यावरती गुरूप्रसाद झाला. त्याला सांगितलं, उपमन्यू, कृतार्थ झालास बाबा तू. त्याची भूक-बिक सगळी दूर झाली. ज्ञान झाल्यानंतर कुठली भूक आणि काय. **अशनया पिपासा धर्म (वेदान्तसार, परिच्छेद क्र. ३५) जन्मापासून लागलेलं दुःख आहे पण ते सगळंही दुःख दूर झालेलं आहे.**

असं तत्वज्ञान त्याला प्राप्त झालं. त्यामुळे सगळ्या विद्या, त्याला सर्व ज्ञान त्याला मिळालेलं आहे. तुझा शिष्य, मोठा प्रसिद्ध होईल म्हणाले. तुझ्यापासून अनेक शिष्य उत्पन्न होतील. तुझा मोठा उत्तंक नावाचा शिष्य सर्पसत्र करील, अनेक सर्पांचा आणखी संहार तो करील वगैरे. त्याला वर प्रदान केलं, आणि तो उपमन्यू आपल्या घरी निघून गेला. कृतार्थ झालेला आहे.

गुरू महाराज त्या परळी क्षेत्रामधे आणि त्या ब्राह्मणाला सांगताहेत बाबा, अशी गुरूसेवा करावी लागती. मनाचा पूर्ण निग्रह करावा लागतो. तहान नाही, भूक नाही, देहाकडे लक्ष नाही, कांही नाही, तिघेही शिष्य, अरूण काय, बैद काय आणि उपमन्यू काय, देहाची पर्वा नाही. पाण्यात पडला आहे. पाणी वरून धो-धो वहात जात आहे. दुसऱ्यानी गळ्याला फास लावून आणखी गाडी ओढतो आहे. देहाची पर्वा नाहीये. तिसरा तर काय आहे. खायचंच नाही. दूधही प्यायचं नाही. म्हणजे देहाकडे लक्षच द्यायचं नाही. अशी स्थिती, देहभाव, सगळा **देहासक्ती सोडून देऊन गुरु सेवेकडे ज्यांनी लक्ष दिलेलं आहे, त्यांच्यावरती सद्गुरूंचा प्रसाद, कृपा ही अशी होत असते म्हणाले.** तू तर गुरूवर रागावून आलायस म्हणाले. काय तुला मिळणार आहे? कशाला जिवंत राहिलास वगैरे म्हणाले. त्यालाही पश्चाताप झाला तो म्हणाला, गुरूमहाराज, चूक माझ्या हातून झालेली आहे.

युज्यते भिन्नधात्वैक्यं न मुक्तायास्तथा हृदः ।

तद्वद्भिन्नं न यास्येतः प्राणांस्त्यक्ष्यामि तेग्रतः **(द्विसाहस्त्री १०-३९)**

धातु हे भिन्न झालेले असतांना सोनं, चांदी, धातू तूटले, भिन्न झालेले असतानापण ते तापविल्यानंतर एकत्र जोडता येतात. पण मोती जर फुटला असेल तर तो जोडता येत नाही. तसं अंतःकरण जर भिन्न झालेलं असेल. गुरूमहाराजांची ही आणखी कृती पाहून मला राग आला, मी निघून आलो त्यांनाही राग आलेला आहे माझ्याबद्दल. त्यांचं मनच माझ्याबद्दल जर अगदी फुटून गेलंलं, मन मी फोडलं म्हणाला, ते मन जोडायचं कसं ? आता हा अपराध माझ्या हातून झालेला आहे आणि त्याचा पश्चाताप मला झालेला आहे. तेव्हा मला आता, या अपराधाचं शासन म्हणजे मी देहत्याग करतो आहे. प्राणत्याग करायला जातो म्हणाला. निघाला तो. त्याला बोलावून घेतलेलं आहे आणि त्याच्या मस्तकावर हात ठेवल्याबरोबर, ज्ञान उत्पन्न झालं त्याला.

आणखी शांती प्राप्त झाली आणि त्याला त्याच्या गुरूंच्या स्वरूपामध्ये आपण दर्शन दिलेलं आहे महाराजांनी. गुरूंकडे गेल्यासारखं झालं. त्यांचाही कृपाप्रसाद झाला. याप्रमाणे तो आणखी–

गुरौ रूष्टे न कश्चन । ...

याचा अर्थ असा नाहीये.....

शिवे रूष्टे गुरुस्त्राता, गुरौ रूष्टे न कश्चन । (गुरुचरित्र २.३३)

हा सिद्धांत कसा चुकला, असं कोणीतरी विचारील, त्याचा गुरू त्या ब्राह्मणावर रागावलेला असताना, यांनी त्याचं आणि सामरस्य कसं करून दिलं? यांनी गुरूच्या रागाचं उपशमन कसं केलं? तर त्यात असं आहे की, ती जी कथा दत्तमहात्म्यामधे महाराजांनी सांगितलेली आहे की एक पतिव्रता स्त्री, कौशिक ब्राह्मणाची स्त्री किंवा कोणाचे त्याचं नांव, तो ब्राह्मण म्हणा अगदी दुराचारी होता, वेश्या स्त्रीकडे जाणारा–येणारा, आणखी दुर्बल झालेला आहे. आणि त्यानी आपल्या पत्नीला एके दिवशी सांगितलं की अमुक–अमुक वेश्या स्त्रीकडे मला जायचंय, तुझे सगळे दागिने बरोबर घेऊन, मला खांद्यावर घेऊन तू तिच्या घरी घेऊन जा. ती पतिव्रता स्त्री सगळे दागिने घेऊन त्या आपल्या पतीला खांद्यावर घेऊन तिकडे गेली. जाताना आणखी रस्त्यामधे एक ऋषि, त्या ऋषिंना, राजाने कांही तरी, अपराधीपणाने सुळावर दिलं होतं.

आणि त्यांना धक्का लागला त्याचा. त्याला त्या सुळावर दिलेल्या आणखी ऋषी महात्म्यालाही व्यथा उत्पन्न झाली. त्रास झाला. त्यांनी सहज सांगितलं, की मला ज्यानी धक्का दिला तो सूर्योदय झाल्याबरोबर त्याचे प्राण जातील. ही सती स्त्री परत आली. आपल्या पतीचे प्राण जाणार आहेत. तिने सांगितलं सूर्योदय होणे शक्य नाही. सूर्य उदयाला जर आला तर त्याला मी शासन करीन. ती सती बोलून गेली. झालं, सूर्योदय बंद झालेला आहे. सूर्याला पतिव्रता स्त्रीची भीती वाटलेली आहे. कसं उदयाला यायचं. सगळी स्नान संध्या, सगळी यज्ञयागादी कर्म राहिली. सगळे देव आणखी शरण आले, ब्रह्मदेवाला. त्यांनी सांगितलं तुम्ही अनसूया पतिव्रतेकडे जा. त्या सतीचं सांत्वन करण्याला ती सतीच दुसरी तुम्हाला न्यावी लागेल, तर शांत होईल म्हणाले. मग, गेले सगळे अनसूयामातेकडे. अशी अवस्था झाली म्हणाले, तुम्ही तिचं सांत्वन करा. अनसूयामाता आलेली आहे, त्या सतीला तिने सांगितले, अनसूयेनं, की बाई सगळी आमची कर्म बंद पडली म्हणाले. सूर्योदय थांबलेला आहे. ती म्हणाली मला लोकांची जरूर नाही. सूर्योदय झाल्यानंतर माझ्या पतीचे प्राण जाणार आहेत. मी सूर्याला अनुज्ञा देणार नाही. अनसूया म्हणाली, बाई, सूर्योदय होऊ दे म्हणाले. सगळ्या लोकांची कर्म चालू होऊ देत. तुझ्या पतीला मृत्यू आला तर मी त्याला पुन्हा जिवंत करीन. तिच्यावर विश्वास बसला तिचा. देवांनी कोणी येऊन सांगितलं असतं तरी विश्वास नाही बसला असता. तीही त्यापैकीच

प्रभावी स्त्री होती. सती स्त्री होती. तिने सांगितलेलं आहे, सूर्योदय झाल्यानंतर प्राण गेला जरी, तरी पती तुझा जिवंत करीन मी. मग त्याला जिवंत केलेलं आहे त्याप्रमाणे

शिवे रूष्टे गुरुस्त्राता, गुरौ रूष्टे न कश्चन ।

तर ह्यांचे गुरु जे आहेत, ते सामान्य लौकिक गुरू होते, ते रागावले आहेत. पण लौकिक गुरूचा सुद्धा राग उपयोग नाही, म्हणून सांगताहेत शास्त्रकार. तेव्हा ते जरी गुरू रागावले असले तरी हे ही महागुरू आहेत, सर्वांचे गुरू आहेत. सद्गुरू आहेत. महाराज नरसिंहसरस्वती महाराज, त्यांनी तो राग शांत केला, त्यांच्या स्वरूपानी शांत केला. तिथे त्या सिद्धांताचा कांही भंग नाहीये.

शिवे रूष्टे गुरुस्त्राता । अशा कथा पुष्कळ प्रकारच्या आहेत.

याप्रमाणे गुरूभक्तीचे माहात्म्य हे ह्या गुरूचरित्रामधे वारंवार आणखी दाखवलं गेलेलं आहे. सद्गुरूस्वरूपाची उपासना करा. ईश्वराची उपासना म्हणजे गुरू स्वरूपाने जे कांही ईश्वर स्वरुपाचे अवतार झालेले आहेत, सद्गुरुस्वरुप, त्यांची उपासना करा.

आचार्यदेवो भव !

हा सिद्धांत समजून सांगण्याकरता गुरूचरित्र आहे. मातृदेवो भव, पितृदेवो भव, अतिथिदेवो भव. तसं आचार्य देवो भव. आचार्य हेच देव आहेत, गुरू हेच देव आहेत. **याप्रमाणे सद्गुरूंची उपासना करून आपण आणखी कृतार्थ व्हावं याकरिता हे चरित्र लिहिलेलं आहे.** अशा क्रमाक्रमाने आणखी अनेक कथा सांगितलेल्या आहेत, सद्गुरू नरसिंह सरस्वती महाराज यांच्या चरित्राला आता सुरूवात झालेली आहे.

या सगळया आता पुढच्या महाराजांच्या कथा नरसिंह सरस्वती सद्गुरू महाराजांच्याच आहेत. उद्यापासून आणखी ज्या ज्या कथा झालेल्या आहेत, क्रमाक्रमाने त्या कथांचं चिंतन आणि भगवंतांचं-सन्निध्य आपल्याला करता येईल.

॥ अवधूत चिंतन श्रीगुरूदेवदत्त ॥



॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे समश्लोकी गुरुसंहितेवरील प्रवचन
भगवंत मंदिर – बार्शी, जि. सोलापूर

तिसरा दिवस
अधिक श्रावण कृ. १०, शके १९०७, दि. ११ ऑगस्ट १९८५
दुपारी ४.३० ते संध्याकाळी ७

श्रीनृसिंह सरस्वती गुरुमहाराजांचे वास्तव्य औदुंबरला होते. तेव्हाची ही कथा आहे. कोल्हापूरच्या एका विद्वान ब्राह्मणाचा मुलगा अतिशय मंदबुद्धी होता. सिद्ध सांगताहेत, नामधारका प्रारब्धकर्म इतकं विलक्षण त्या द्विजकुमाराचं होतं. ज्ञानी पिता मिळालेला आहे. अनेक ज्ञानार्थी येऊन विद्या ग्रहण करून कृतकार्य होऊन गेलेले आहेत. त्या पित्यापासून आणखी ज्ञान मिळाले नाही. सर्व ब्राह्मण त्याची निंदा करीत, नावे ठेवीत. म्हणत – 'जन्माला कशाला आलास? पशूच तुला म्हटलं पाहिजे. फक्त शिंग आणि पुच्छ नाही, बाकी पशु आणि तू यांच्यात कांहीच अंतर नाही. भाग्य आहे. गाई बैलांचं तू गवत खायला लागला नाहीस. त्यांचे ते गवतही तू खाल्ले असतेस, म्हणजे त्यांना मिळाले नसते.' असे वाटेल तसे गांवातील ब्राह्मण त्याची निंदा करीत, त्यांना विद्या हा मोठा निधी आहे. चोरांनी तो कितीही हरण करण्याचा प्रयत्न केला तरी त्यांना तो मिळणार नाही. दुसरं धन दिल्यानंतर कमी होतं. पण विद्या हे

धन दुसऱ्याला–शिष्याला–दिल्यावर ते वाढत असतं. म्हणून ही विद्या परंपरा अखंड चालू आहे. या परंपरेमुळे वेदांचे, शास्त्रांचे, या विद्येचे संरक्षण झालेले आहे. जरी आपल्याजवळ योग्यता नसली तरी सुद्धा जर विद्या प्राप्त झाली तर ती योग्यता त्याच्यात उत्पन्न होते. तर अशा प्रकारची विद्या मिळविण्याकरिता तू कांहीच प्रयत्न केले नाहीस. किती तुझा पिता विद्वान होता. त्याला तरी विचारायचे. म्हणाले, कशाने माझी बुद्धी वाढेल? तू कांहीच प्रयत्न केला नाहीस. लक्ष दिले नाहीस. 'अशी पुष्कळ निंदा होऊ लागली. गांवात त्याला राहणे अशक्य झाले आणि तो गांव सोडून या भिल्लवडी क्षेत्रामध्ये आलेला आहे. तेव्हा प्राणत्याग करण्याच्या हेतूने तो कृष्णा नदीवर आला आहे. औदुंबर नदीच्या पलीकडे आहे आणि अलिकडे भुवनेश्वरीचं एक स्थान आहे. देवीचं स्थान. त्या मंदिरामध्ये जाऊन आपला स्वस्थ बसून राहिलेला आहे. देवीने कांहीतरी आपल्यावर कृपा करावी. विद्या द्यावी, ही इच्छा आहे. तळमळ आहे. तो दुसरीकडे कुठे गेला नाही. देवीच्या जवळ येऊन बसला, मंदिरामध्ये. आपली कार्यसिद्धी झाल्याशिवाय उठायचे नाही असे त्याने ठरविले. अन्न नाही पाणी नाही. कांही नाही हा एक निश्चयच आहे ना. आपल्याला देवीचे दर्शन झाल्याशिवाय तिची कृपा झाल्याशिवाय उठायचे नाही. एक पक्का निश्चय झाला. निश्चयानेच कार्य सिध्दी होते ना! अमुक एक करायचे असा निश्चय पाहिजे आणि मध्ये कितीही कठिण वेळ आली, तरीसुद्धा अनुत्साह नाही. निर्वेद नाही. उत्साह कायम आहे. या दोन गुणांनी कार्य सिद्धी होते आहे. त्यालाही, स्वत:लाही वाईट वाटत होत. आपण विद्वान व्हावं असं वाटतं आहे परंतु कांही इलाज नाही. बुद्धीच नाही जवळ. इच्छा असून काय उपयोग. संसारात अनेक इच्छा आपल्याला उत्पन्न होतात. पण त्या इच्छा पूर्ण होण्याकरिता योग्यताही असावी लागती. सगळेच कांही सत्ताधीश होत नाहीत, सगळेच कांही लक्षाधीश होत नाहीत. कारण की योग्यता, दृष्ट, अदृष्ट दोन्ही प्रकारची लागती आहे. दृष्ट योग्यता जरी असली कदाचित, पैसे मिळवणारा आहे, प्रयत्न करतो आहे, अहोरात्र आणखी सारखा प्रयत्न आहे, आळस नाही, असा जरी प्रयत्न करत असला तरी अदृष्ट जर अनुकूल नसेल तर कांही त्याच्या प्रयत्नाच यश मिळत नाही. तीही योग्यता असायला पाहिजे. त्याचप्रमाणे विद्या मिळविण्याची योग्यता सुद्धा पाहिजे आहे. **पूर्वी कांही जर विद्यादान घडलेलं असेल, ईश्वराची उपासना घडलेली असेल तर या जन्मामधे विद्या, लक्ष्मी ही सगळी प्राप्त होणं शक्य आहे.** हा बिचारा विद्यार्थी, कुणी नाही घरी, आई नाही, बाप नाही, बाकी कोणी विचारायला सुद्धा तयार नाही.

आला त्या कृष्णातीरावरती भुवनेश्वरीच्या मंदिरामधे, आणखी बसून राहिलेला आहे. अन्न नाही पाणी नाही, एक दिवस झाला, दोन दिवस झाले, तीन दिवस होऊन गेले. कांही नाही. त्या देवीनेही कांही लक्ष दिलं नाही, असं त्याला वाटलं. अन्न, पाणी सोडून, आपण या

जगदंबेच्या जवळ येऊन बसलेलो असतानासुद्धा जगदंबा लक्ष देत नाही, म्हणून त्याला जरासा राग आलेला आहे. श्रद्धा आहे, देवीवरती श्रद्धा, भक्ती आहे म्हणून तर येऊन बसला, अन्नपाणी सोडून दिलेलं आहे. तरीसुद्धा, तळमळ जरी असली, तरीसुद्धा देवीची कृपा होण्याला विलंब लागला खरा. त्या दिवशी रात्री त्यानी रागाने आणखी एक सुरी आणली कुठुन किंवा चाकू म्हणा काय असेल आणि देवीच्या समोर जाऊन आपली जीभ कापली, आणि देवीच्या चरणांवर अर्पण केली. सांगितलं देवीला, जर या पुढेही तुम्ही उपेक्षा कराल, तर मी माझं मस्तक तोडून आणि तुम्हाला अर्पण करीन, म्हणजे मी देहत्याग करीन. शरीर तुम्हाला अर्पण करीन. राग आहे थोडासा. पण विद्येची तळमळ आहे. विद्या मिळाली पाहिजे. त्याकरिता जीभ कापली गेली आणि मस्तकही कापून टाकायचं आहे, इतकी तयारी मनाची झाली. लगेच पहाटेच्या वेळेला जगदंबेनं दर्शन दिलं, त्याला. स्वप्नामधे सांगितलं, बाळ, नदीच्या पलीकडे जा म्हणाली, औदुंबर वृक्षाखाली एक महान तपस्वी पुरूष आहे. तो तुझी इच्छा पुर्ण करील. कांही काळजी करू नकोस, ईश्वराचा प्रसाद होण्यालाही वेळ लागला. **पण ईश्वराचा प्रसाद झाल्यानंतर सद्गुरूंचा प्रसाद होण्याला वेळ लागत नाही.** दोन्हीही आहे. ईश्वर प्रसन्न झाल्यानंतर सद्गुरूंचा प्रसाद लगेच होतो. सद्गुरूंची गांठ पडतेय आणि सद्गुरू प्रसन्न झालेले असतांना ईश्वराचा राग जरी असला, तरीसुद्धा तो राग शांत करण्याचं सामर्थ्य आणखी गुरूमुर्तीच्या ठिकाणी आहे. कारण, तीही मूर्ति ईश्वराचीच आहे ना? राग कसा दूर करायचा, काय करायचा हे सगळं त्यांनाही माहिती आहे. आचार्य महाराजांच्या चरित्रातली गोष्ट प्रसिद्धच आहे. शंकराचार्य महाराज, पांच-सात वर्षाचे होते. उपनयन झाल्यानंतर शिक्षणाकरता गुरूंच्याकडे राहिले. आणखी दुपारी भिक्षा मागण्याकरता घरोघरी जात असत. एका बाईंच्या वाड्यामधे गेले. मोठा वाडा आहे पण कांही कोणीही मनुष्य नाही. दारिद्र्य आहे. ती बाई आली आणि तिच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहताहेत, काय झालं आईसाहेब? शंकराचार्य महाराज विचारताहेत. पांच-सहा वर्षाचं वय आहे. काय बाबा माझं दुर्दैव आहे. माझ्या घरामधे, माझ्याजवळ कांहीही नाही, दरिद्री मी आहे. तुझ्यासारखा, सूर्यासारखा तेजस्वी महात्मा आज माझ्या दारामधे मध्यान्हकाळी आलेला असताना, त्याच्या झोळीमधे मी कांहीही घालू शकत नाही म्हणाले. म्हणजे इच्छा आहे, वासना चांगली आहे, अतिथी योग्य आलेला असताना त्याला द्यावं असं वाटताहे, पण काय, नाईलाज आहे.

अशाच कांही विलक्षण घटना सृष्टीमधे, ईश्वराच्या सृष्टीमधे पहायला मिळतात. पुष्कळ आणखी देण्यासारखं जवळ आहे, पण मन नाही. मनामधे तशा इच्छाच उत्पन्न होत नाहीत. द्यावं किंवा न द्यावं, या विचारातच तो सगळा वेळ निघून जातो. वेळेवर झालं पाहिजे. नंतर विचार ठरून काय उपयोग? तर ही स्त्री अगदी खरोखर सद्वासना होती, ईश्वराची, महालक्ष्मीची

ती एक कृपा होती. प्रत्यक्ष पैसा नाही जवळ. पण इच्छा मात्र उत्तम आहे की अशा प्रकारचा महात्मा, काय विद्यार्थी, सूर्यासारखा तेजस्वी आहे, आणि कांही त्याला आपण देऊ शकत नाही, म्हणून रडती आहे, दुःख झालेलं आहे, पूर्वकर्म माझं असं आहे बाबा ! थांबले भगवान शंकराचार्य महाराज, आणि भगवती लक्ष्मीदेवीची प्रार्थना केलेली आहे. स्तुती केलेली आहे. लगेच जगदंबा, महालक्ष्मी प्रगट झाली. काय बाळ, कशाकरता मला बोलावलंस म्हणाले– मी म्हणाले माझ्याकरता बोलावलेलं नाही. ही जी बाई आहे या बाईवर आपली कृपादृष्टी व्हावी अशी माझी प्रार्थना आपल्याला आहे. महालक्ष्मीला सांगताहेत आचार्य महाराज. जगदंबेनं सांगितल, या बाईवरती एक जन्म, दोन जन्म नाही, सात जन्म जरी गेले तथापि माझी कृपा हिच्यावर होणार नाही म्हणाले. तसच तिचं कर्म आहे म्हणाली. आत्ता रडली म्हणून काय झालं, पूर्वी केलेलं कर्म जाईल कुठं? **म्हणजे ईश्वर हा कर्माकडे बोट दाखवून, चांगलं कर्म असेल तर कृपा करायची, नाहीतर नाही करायची.** अगदी स्पष्ट, व्यवहारदक्ष आहे ईश्वर. पण सद्गुरूंमुर्ती ही थोडी व्यवहारामधे, इतकं आणखी **कडकपणा नाहीये सद्गुरूंच्याजवळ, दयाळू आहेत ते, मुख्य. कृपाळू ! पहिलं लक्षण आहे. संतांच. दया करायची आहे.** या स्त्रीवर दया झाली पाहिजे. महालक्ष्मीची. अशी इच्छा आहे. महालक्ष्मीने सांगितलं, नाही होणार माझी कृपा. सात जन्मसुद्धा मी कृपा करणार नाही. बरं. मग आचार्य महाराज म्हणाले, आईसाहेब, माझ्यावर तुमची कृपा आहे की नाही, दया आहे की नाही, माझ्याबद्दल प्रेम वाटतं ना आपल्याला ? 'हो, म्हणाली', तुझ्याबद्दल प्रेम नाही म्हणजे काय? तू बोलवल्या बरोबर मी आले म्हणाली. केव्हाही येईन मी, वाटेल त्या वेळेस येईल. माझ्यावर प्रेम आहे, तुमची कृपा आहे, आशीर्वाद आहे. मग भगवान शंकराचार्य म्हणताहेत महालक्ष्मीला, मी बोलावल्याबरोबर या ठिकाणी आपण आलात, आपण जगन्माता आहात, सगळी आपली लेकरं आहेत. पापी असो, पुण्यवान असो कोणीही असला तरी, त्याच्याकडे आई कधीही आणखी त्याला दोष देत नाहीये. कितीही अपराध पुत्राने केले,

कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ।

(देव्यपराध क्षमापन स्तोत्र) आद्य शंकराचार्य

जगाच्या इतिहासात कुपुत्र झालेले असतील, कृतघ्न होतील, पण कुमाता जगामधे पहायला मिळणार नाही. माता, ही मुलाबद्दल रागावली, त्याचं अहित चिंतन करती आहे. अशी माता जगामधे झाली नाही, आईसाहेब. तेव्हा तुमची कृपा माझ्यावर आहे म्हणजे मी सुद्धा पुण्यवान आहे असं म्हणायला हरकत नाही. त्या बाईनं, आपल्याजवळ एक वाळलेला आवळा होता तेवढाच त्यांच्या आणखी झोळीमधे टाकला होता. एवढंच मला देण्या येण्यासारखं आहे बाबा, माझ्याजवळ कांही नाही. मग भगवान शंकराचार्य म्हणाले देवीला, महालक्ष्मीला, की तुमची कृपा माझ्यावर आहे म्हणजे मी चांगला आहे, पुण्यवान आहे. माझ्यासारख्या पुण्यवानाच्या झोळीमध्ये

ज्या बाईने भिक्षा आज घातलेली आहे, तिची पापं शिल्लक राहू शकतात कां? **धर्मानी पापक्षय होतो ना? दान ज्याने केलेलं आहे, दान हे पापक्षयाचे साधन आहे** माझं नाही म्हणायचा, जो म्हणतो आहे तोंडानी, **'इदं न मम'.** फार त्याचा मोठा अधिकार आहे, सगळं आयुष्य, जन्मजन्म सुद्धा हे माझं आहे, हे माझं आहे, हे माझं, प्रत्येक ठिकाणी माझं माझं म्हणण्यात जन्मजन्म जाता आहेत. त्याच्या विरुद्ध आपली बुद्धी सुधारावी, सात्त्विक व्हावी **'न मम', 'न मम'** म्हणायची सवय व्हावी, आणखी बुद्धी मन तसं व्हावं, म्हणून दान हे कर्म सांगितलेलं आहे. आत्मस्वरूप असंग आहे. कशाशीही त्याचा संबंध नाहीये. कोणचही कर्म त्याला नाही आहे वस्तुतः. पण त्याला जो संग पडलेला आहे, माझ माझ म्हणून प्रत्येक ठिकाणी आणखी संग जो दाखिवतो, संबंध दाखवितो संसर्गध्यास जो त्याला झालेला आहे, तो संसर्गध्यास बाजूला होण्याकरता 'न मम न मम' म्हणायचा एक अभ्यास सांगितलेला आहे. हे आता मनापासून म्हटलं पाहिजे. हेही त्यात खरं आहे. मनापासून जर 'न मम' म्हटलं तर ते थोडं जरी दान केलं तरी ते सात्विक दान, उच्च दान होतं आणि दिलेलं आहे, मी पुष्कळ दिलेलं आहे, इतकं तरी कोण देणार आहे, म्हणजे उपकार करण्याकरता, उपकार दाखविण्याकरता, आपला स्वतःचा मोठेपणा जगामधे व्हावा म्हणून या उद्देशाने जर केलेलं दान, ते दान म्हणजे सात्विक कोटीमधे जाणारं नाही. ते 'न मम' ही सवय लागणार नाही उलट 'मम' म्हणजे मी दान करणारा आहे, मी इतका धर्मशील आहे म्हणजे माझ्याजवळ पुण्य फार आहे. **पुण्याचं ममत्व आपल्याकडे घेतो आणि पैशाचं ममत्व फक्त सोडतो आहे, ममत्व गेलं नाही.**

तर ही ममता म्हणजे संसर्ग जो आहे, संग कमी करण्याकरता दान आहे. **असंग आत्मस्वरूपी,** मी असंग आहे कशाशीही माझा संग नाही, हे आत्मज्ञान होण्याकरिता म्हणून हा कर्मयोग.

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।

यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् । (भ.गी. १८.५)

जगन्माता ऐकती आहे, महालक्ष्मी देवी, शंकराचार्य महाराज म्हणताहेत, की या बाईनं मला दान केलंय म्हणाले, तिला कांही फळ मिळायला नको? काय दान केलंय वगैरे हा कांही विचार ईश्वराजवळ नाही. कांहीही द्या, अल्प द्या, जास्ती द्या, जास्ती-कमी बाहेरच्या दृष्टीनं, बाहेरच्या, बहिरंग वृत्तीनं कमी जास्तीपणा आहे, आपण मोठे आहोत, हा अभिमान त्यात व्यक्त होतोय. मी जास्ती दिलं, म्हणजे माझ्याजवळ पुष्कळ आहे. **मी जास्ती देऊ शकतो हा अभिमान आहे.** कांहीही.

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः । **(भ. गी. ९.२६)**

भगवान इतके उदार आहेत. ईश्वराची उदारता इतकी आहे. किती दिलं भक्तानी हे पहात नाहीये, त्यानी मनापासून आणखी ममत्व सोडलेय की नाही, खरं दान आहे की नाही. एवढं पहायचय. ते कांहीही असो. भाजीचं पान आणखी द्रौपदीच्या संकटाच्या वेळेला त्या स्थाळीतलं भक्षण केलं म्हणे आणि त्याने सगळे भगवान तृप्त झालेले आहेत, सगळे ऋषी तृप्त झाले, दुर्वास ऋषी निघुन गेलेले आहेत. तर याप्रमाणे ईश्वराच्या दरबारामधे, ईश्वराचं अंतःकरण फार मोठं आहे, दयापूर्ण आहे. पण या वेळेला त्या बाईवरती दया होणार नाही म्हणून राग आलेला आहे जगन्मातेला. आचार्य महाराजांच्या सारखे वकील भेटलेले आहेत. त्या बाईंचा पक्ष त्यांनी घेतलेला आहे. देवीची कृपा होणार नाही, स्वतः देवी सांगते आहे, 'नाही माझी कृपा होणार.' हे म्हणताहेत, 'तुमची कृपा व्हायला पाहिजे. पाप, पापामुळे तुम्ही कृपा करत नाहीये ना, तुमच्या एकंदर व्यवहारामधे, सृष्टीकार्य जे चाललेलं आहे, **जीवांची पुण्यं पापं कशी आहेत ती पाहून त्याला कसं फळ द्यायचं, हाच तुमच्या सृष्टीतला एक नियम आहे.'** त्या नियमाप्रमाणे घडत असेल तर करायला काय हरकत आहे कृपा. या बाईनं मला आणखी भिक्षा दिलेली आहे दुपारच्या वेळेला. काय दिली वगैरे तुम्हीही विचार करायचा नाही आणि मी ही नाही. मलाही विचार नाही. पण तिच्या अंतःकरणापासून तिनं मला भिक्षा घातलेली आहे. वाळलेला आवळा कां असेना, दिलाय बिचारीनं. मग तिचं पाप राहिलं कसं म्हणाले. अत्यंत उत्कट पुण्य आहे. चांगला अतिथी घरामधे आलेला आहे. तुमची कृपा ज्याच्या वरती आहे तो अतिथी आलेला आहे आणि त्या अतिथीला, आणखी मनापासून, पश्चाताप होऊन, आपल्या हातून दान घडत नाही, एवढंच घडू दे, म्हणून अशा दृष्टीने, तळमळीनं तिनं भिक्षा घातल्यानंतर, या कर्माचं फळ तिला कां मिळू नये ? असं त्यांनी विचारलं.

कर्माकर्माचा विचार ईश्वराच्या दरबारामधे अत्यंत योग्य आहे. तो कधीही चुकत नाही. कांहीतरी आणखी शिक्षा केली पुन्हा हे झालं, बसला नाही, परीक्षेमधे नापास झाला, पुन्हा अर्ज केल्यानंतर पुन्हा गुणांची परीक्षा केल्यानंतर पुन्हा पास झाला असंही होतं पुष्कळ वेळा. नापासाचा पास होतो. पासचा नापास होतो असं चाललेलं आहे. आणि सगळेही बुद्धिमान आहेत. उत्तम अगदी, पुष्कळ त्यांना आणखी त्याबद्दल त्यांना वेतन मिळत असतं. म्हणजे बुद्धी स्थिर रहाण्याकरता म्हणून. पण ईश्वराच्या दरबारामधे असं कधीही अन्याय नाही. चूक नाही. बरोबर आहे कोणी, कोणाचं कर्म कसं आहे, कोणाचं कर्म काय आहे, ते बरोबर पाहून त्याप्रमाणे त्याला फळ दिल जातं. पण आचार्यमहाराज म्हणताहेत याच पाप असेल म्हणाले या बाईचं. मी नाकारत नाही. पण आत्ता राहिलेलं नाहीये. अजामिळाचा उद्धार करण्याकरता भागवतात कथा प्रसिद्धच आहे ना. त्यानी 'नारायणा' म्हणून हांक मारलेली आहे. मनामधे आहे मुलगा आणि वाणीमधे आहे ईश्वराचं नाम, पवित्र नांव आहे. अगदी मृत्यूच्या समयी, मुखातून आलेलं आहे. आले, लगेच विष्णुदूत आलेले आहेत आणि

यमदूतांचे पाश त्यांनी तोडून टाकलेले आहेत. त्यांना सांगितलं, या अजामिळाला तुम्हाला नरकाला नेता येणार नाही. ते म्हणाले, अहो यांनी पुष्कळ पापं केलेली आहेत. पापं केलेली असतील हो, पण राहिलीत कुठे म्हणाले. पापं झालेली असतील, तर ती जर गेली असली तर याला नरकाला तुम्ही कसे नेऊ शकता? तर गेली म्हणजे काय केलं यांनी, पाप जाण्याकरता. आता म्हणाला नाही का 'नारायणा' म्हणून त्याच्या मुखातून आणखी भगवंताचं पवित्र नांव निघालं नाही कां म्हणाले ? त्या नामाचं महत्व आहे. हे समजून सांगितलं आणि यमधर्मालाही ते पटलेलं आहे. कारण तोही त्याप्रमाणे भागवतधर्म जाणणारा होता. **भगवंताच्या नामाचं महत्व किती आहे, ते ज्ञानपूर्वक घेतलं किंवा अज्ञानाने जरी मुखातून आलं, तरी सुद्धा आणखी त्याच्या पातकांचा नाश होतो.** पाप झालेलं आहे. जीवांच्याकडून पातकं होतात, परंतु कांही कोणच्यातरी जन्माच्या सुकृतामुळे, पुण्यामुळे, असं जर एखाद्या वेळेला पुण्य घडलं, ईश्वराचं नांव आलेलं आहे त्या मुखाच्यातून, गेली सगळी पापं गेली. या जन्मात त्यानी काय काय पापं केली ही सगळी यमदूतांनी सांगितली त्या विष्णुदूतांना. विष्णुदूत म्हणाले, या जन्मातली तर पापं गेलीच म्हणाले, अनेक जन्माची पातकं याची नष्ट झालेली आहेत. **श्रद्धापूर्वक ईश्वराचं नामस्मरण हे सर्व पापक्षय करणारं आहे** अशी नामामधे मोठी शक्ती आहे.

नामसंङ्कीर्तनं यस्य सर्वपापप्रणाशनम् ।
प्रणामो दुःखशमनस्तं नमामि हरिं परम् ॥ **(भा.१२.१३.२३)**

ज्ञानपूर्वक, अज्ञानपूर्वक घडलेलं आणखी जे कांही नामसंकीर्तन आहे ते सर्वही पातकांचा, अनेक जन्मामधे केलेल्या सगळ्याही पातकांचा नाश ते करू शकतं. अशी एक वस्तुशक्ती आहे. वस्तुशक्ती मानण्याची बुद्धिवादामधे तयारी नाहीये. हा कसला बुद्धिवाद. वस्तुमधे शक्ती आहे. पाण्यामधे शक्ती आहे, अग्नीला आणखी शांत करण्याची. त्याच्यामध्ये शक्तीच आहे ती. पदार्थ दग्ध करून टाकण्याची अग्नीमधे शक्ती आहे. प्रत्येक वस्तुमधे शक्ती आहे. **तशी नामामधे सुद्धा शक्ती आहे की सर्व पापक्षय करण्याची नामामधे शक्ती आहे.** ही वस्तुशक्ती आम्हाला मान्य होत नाही, पटत नाही. पटत नाही, याचा अर्थ वस्तुशक्ती मानण्याची तयारी नाहीये. त्या वस्तुमधे शक्ती आहे हे, ज्ञान शास्त्र प्रमाणाने होत आहे. प्रत्येक वस्तुमधे असणारी शक्ती आणखी दृष्ट प्रमाण, प्रत्यक्ष प्रमाणानी दिसू शकत नाहीये. औषधामधे शक्ती आहे. अमुक रोग जाण्याची, घालविण्याची शक्ती औषधामधे आहे, हे औषध देणाऱ्याला माहिती आहे. आम्हाला नाही, समजणार नाही, दिसणार नाही ती. कुठाय शक्ती त्या औषधात, ते आम्हाला दाखवा म्हणून म्हटलं तर दाखवणार कसं? औषध देणाऱ्याच्या आणखी शब्दावर विश्वास आम्ही ठेवला पाहिजे आणि ते औषध घेतलं पाहिजे.

मग आपल्याला अनुभव येतो. कांही शक्तीचं ज्ञान हे प्रयोगानंतर मागाहून होणारं असतं. अगोदरच आम्हाला आणखी ती शक्ती समजली पाहिजे तर आमची श्रद्धा बसेल, नाही बसली तरी हरकत नाही. यात श्रद्धेचा-अश्रद्धेचा संबंध नाहीये. म्हणून, त्या विष्णुदूतांनी यमदूतांना ज्यावेळेला समजावून सांगितलं की भगवंताचं नामस्मरण त्याच्या मुखातून घडल्यामुळे सर्व पापक्षय त्याचा झालेला आहे. तो वैकुंठलोकात जाण्याचा अधिकारी झालेला आहे.

क्षिप्रं भवति धर्मात्मा, शश्वच्छान्तिं निगच्छति ।
कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥ **(भ.गी.९.३१)**

त्याचप्रमाणे या स्त्रीने केलेली जी पातकं असतील ती सगळी गेलेली आहेत म्हणतात महाराज. आता त्यांनी हमी घेतलेली आहे. आणखी तर्क ही जातीनं मांडलेला आहे. नुसतं मी सांगतो म्हणून पापं गेली असं म्हणत नाहीत. त्यांनी तसं म्हटलं असतं तरी देवीनं ऐकलं असतं, नाही असं नाहीये. तसेच पुण्यशील महात्मेच ते होते. प्रत्यक्ष भगवान शंकर ! तेव्हा स्त्री ची पापं राहिली कशी म्हणाले ते. हिने जर असं दान मला केलेलं आहे, तर त्या दानाने तिच्या सर्वही पातकांचा क्षय झालेला आहे आणि तुमची कृपा होणार नाही म्हणजे असं कसं म्हणता तुम्ही ? कांही बोलता आलं नाही. जगदंबेला, महालक्ष्मीला कांहीही बोलता आलं नाही. बराय बाबा, तुझ्या इच्छेप्रमाणे करीन आणि त्यावेळेला त्या बाईच्या वाड्यामधे सोन्याच्या आवळ्यांचा पाऊस पडला. वाड्यापुरताच पडला हं. सगळा वाडा सोन्याच्या आवळ्यांनी भरून गेला.

आचार्य महाराजांनी जगदंबेला नमस्कार केला आणि निघाले, त्यातला एकही सोन्याचा आवळा आपल्या झोळीमधे त्यांनी घेतला नाही. त्या बाईला सांगितलं, सांभाळा म्हणाले. पण तुमची बुद्धी मात्र सांभाळा हे बजावलं. तुमच्यावर जगदंबेची कृपा होणार नाहीये. तुमची पातकं होती म्हणून झाली नाही, पण आता ही कृपा झालेली आहे. ह्या कृपेचा आणखी सदुपयोग करा. नाहीतर बरं आहे, मिळालं आहे. पुन्हा आपलं दुवर्तनाकडे लक्ष, पापाकडे लक्ष देऊ नका असं तिला बजावलं. तिकडे या सोन्याच्या आवळ्याकडं पाहिलंही नाही आणि दुसऱ्या घरामधे ते भिक्षेकरीता आचार्यमहाराज निघून गेलेले आहेत.

ईश्वरशक्ती आणखी गुरुशक्ती या दोन जरी भिन्न भिन्न असल्या, तरीसुद्धा जीवांचा उद्धार होण्याकरता म्हणून गुरुशक्तीचा विशेष आणखी उपयोग आहे, महत्त्व आहे. कारण ईश्वराचं लक्ष इकडे आहे, काय केलय त्यांनी? पुण्य आहे का जवळ, त्याला द्या, सुख द्या. पाप असेल सुख मिळणार नाही. दुःख मिळेल. लगेच निर्णय करून टाकलेला आहे तो. त्यानेच केलेली कर्म, त्या कर्माचं फळ तुम्हाला आम्ही देतो. आम्ही काय आमच्या इच्छेप्रमाणे वागतो काय? आम्ही काय हुकूमशहा आहे काय? ईश्वराला हुकूमशहा म्हणता

येणार नाही. जीवांनी केलेली कर्म जशी असतील त्याप्रमाणे त्याला फळ मिळेल. हा उत्तम न्याय आहे. **ईश्वराला राग कधीही येत नाहीये. उपासकाच्या मनामधे ही धारणा पाहिजे ईश्वर कधीही, देव कधीही रागावत नाही.** ही बुद्धी म्हणजे खरी भक्ती आहे. देव रागावला हो आमच्यावरती आम्ही इतकं करतो. पुन्हा आपणच म्हणायचं. आम्ही इतकं देवाचं करतो. अमुक करतो तमुक करतो, आणखी देवाचं आमच्याकडं लक्षच नाहीये.

त्या प्रमाणे सद्गुरूंचं जे माहात्म्य आहे ते फार मोठं आहे. म्हणून या भगवती भुवनेश्वरी देवीनं त्या बाळाला सांगितलं, ''बाळ, जा पलीकडे जा. कृष्णा नदीच्या परतीरावरती एक महात्मा आहे, **औदुंबराचे वृक्षातळी, अवतारपुरूष चंद्रमौळी. तुझी वांच्छा पुरवील. जा.**'' म्हणाली.

तुला विद्या पाहिजे ना? ती विद्या देईल तो. आजपर्यंत तुला आलेली नाही विद्या. याच्या कारणाचा ते विचार करत नाहीत माहात्मे. कारण कांहीही असो. कार्य झालं पाहिजे. याला विद्या मिळाली पाहिजे, हा त्यांचा नुसता संकल्प झाल्याबरोबर सर्वही पातकांचा क्षय होऊन जातो. औदुंबर वृक्षाखाली आणखी एक महात्मा आहे. तपस्वी पुरूष आहेत. संन्यासी महात्मा, त्यांना शरण जा. जगदंबेनं सद्गुरूंची गांठ घालून दिलेली आहे. **ईश्वराची उपासना ही याकरता करायची आहे.** कशाला देवाची भक्ती करायची म्हणतात. तर देवाच्या भक्तीने असा उद्धार होतो आहे. आपली कर्म इतकी साठून आलेली असतात आणि त्यांचा प्रतिबंध आपल्याला अशाप्रकारचा होत असतो. **देवाची जर भक्ती केली तर देवच अशा प्रकारच्या महात्म्यांची गांठ घालून देतो आणि त्यांच्या कृपेने ती सगळी कर्म नाहीशी होऊन जातात. कितीही जन्माची कर्म साठलेली असली तरी सगळयाही कर्मांचा क्षय होऊन जातो आहे.**

तो आणखी प्रसाद या आणखी ब्राह्मणकुमारावर झालेला आहे. तो ईश्वरभक्त होता पूर्वी. पण कांही पूर्वीच्या पापामुळेच त्याची विद्या बंद झालेली आहे. आता तर वाणीही गेली. जीभही तोडून टाकलेली आहे. बोलताही येत नाही. अशा स्थितीमधे तो सापडलेला आहे. पण जगदंबेनं त्याला दाखविला, मार्ग दाखिवला. जा बाळ. तुझं भाग्य मोठं आहे. त्या महात्म्याला तू शरण जा. **अवतारपुरूष चंद्रमौळी तुझी वांछा पुरवील.** धावत धावत निघाला बाळ. तळमळ आहे. विद्या मिळावी, एवढी तळमळ आहे. आला नदीतून आलेला आहे.

आणखी महाराज, अजून पहाटेची वेळ आहे. औदुंबराच्या वृक्षाखाली महाराज बसलेले आहेत आणि येऊन साष्टांग नमस्कार आणखी नरसिंह सरस्वती महाराजांना त्या बालकाने घातलेला आहे. पाहिलं त्याच्याकडे. ये बाळ, म्हणाले. आणखी त्याच्या काय, नुसता हस्तस्पर्श केला आणि महाराजांनी त्याच्या मस्तकावर हात ठेवल्याबरोबर त्याची जीव्हा तर त्याला पुन्हा मिळालीच, परंतु परिसाचा स्पर्श झाल्याबरोबर ज्याप्रमाणे लोखंडाचे सुवर्ण होतं, तसा तो विद्वान झालेला आहे. दुरीतक्षय हा मानवाच्या प्रयत्नाने होणं कठीण आहे. प्रत्यक्ष सद्गुरुंची कृपा

त्याच्यावर झाली. त्यामुळे अत्यंत ज्ञान संपन्न तो झालेला आहे. ते सांगताहेत सिद्धमुनी – ईश्वराच्या दरबारामध्ये जीवांच्या कर्माप्रमाणे आणखी फल दिलं जात, हे त्यांनाही माहिती आहे. **तेही ईश्वरच आहेत ना. पण आता त्यांनी गुरुस्वरूप धारण केलेलं आहे. त्यामुळे त्यांचं कारूण्य हे विलक्षण आहे**. दृष्टांत नाहीये. **सद्गुरूंना दृष्टांत जगामधे सापडत नाही,** आचार्य महाराज म्हणताहेत. तुकाराम महाराजही म्हणतात.

लोह परिसाची न साहे उपमा । सद्गुरू महिमा अगाधचि । म्हणतात.

लोखंडाला परिस लागल्यानंतर लोखंडाचं सोनं होतं म्हणाले. चमत्कार आहे, सामर्थ्य आहे पण परिस त्याला नुसतं सोनं बनवील, पण परिस बनविणार नाही. परिसाला परिस बनविता येत नाहीये. 'आपणासारिखे करिती तात्काळ' म्हणतात. हे माहात्म्य सद्गुरूंचं तुकाराममहाराजही सांगताहेत, आचार्य महाराजही तसंच सांगताहेत.

दृष्टान्तो नैव दृष्टस्त्रिभुवनजठरे सद्गुरोर्ज्ञानदातुः
स्पर्शश्चेत्तत्र कल्प्यः स नयति यदहो स्वह्रतामश्मसारम् ।
न स्पर्शत्वं तथापि श्रितचरगुणयुगे सद्गुरुः स्वीयशिष्ये
स्वीयं साम्यं विधते भवति निरुपमस्तेवालौकिकोऽपि ॥

(आदि शंकराचार्य, शतश्लोकी-१)

ज्ञान दिलं त्या विद्यार्थ्याला, बालकाला ज्ञान दिलं. जा बाळ जा म्हणाले. पूर्ण ज्ञानसंपन्न झाला. अंतःकरणामधे शांती मिळाली. तळमळही निघून गेलेली आहे. कृतार्थ झाला आहे तो बालक. भगवतीचा भक्त झाला, भगवंतांचा आणखी सद्गुरूंचाही भक्त झालेला आहे. आणखी ज्ञानही मिळालेलं आहे. त्याची श्रद्धा अगोदर होती, पण तो परीक्षा पहाण्याकरिता म्हणून आलेला आहे असंही म्हणायला हरकत नाही. लहान बालक होता अद्यापि. देवी आपल्याला सगळं देऊ शकेल, अशा मोठया विश्वासाने आला होता. देवावर विश्वास होता त्याचा. पण देवीने अशा रीतीने सद्गुरूंची गाठ घालून दिली. गुरूप्रसाद झालेला आहे. गुरूप्रसादाने त्याचं कार्य होऊन गेलं. तत्त्वज्ञान जरी मिळालं नाही तरी हे ज्ञान, परोक्षज्ञान सुद्धा कांही कमी नाहीये. शब्दज्ञानाची अवहेलना कांही कांही ठिकाणी केली जाते. त्याचा उद्देश कांही तसा नाही. शब्दज्ञान हे अगदी कमी प्रतीचं आहे असं नाहीये. कांही कांही मंडळी, काय म्हणाले नुसतं शब्दज्ञान आहे, शाब्दिक आहे. व्याख्यान, प्रवचन, वाचन, अमुक तमुक हे नुसतं शाब्दिक आहे. असू दे हो. शाब्दिक जरी असलं तरी त्याला महत्त्व आहे ना. शब्दांनी जरी ज्ञान ते पक्कं झालं असेल त्याच्यावर जर विश्वास असेल त्या ज्ञानावरती.

नैनं छिन्दति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥ **(भ. गी. २.२३)**

हे आत्मस्वरूपाचं वर्णन गीतेमधे केलेलं आहे. हा श्लोक म्हणत कित्येक क्रांतिकारक आनंदाने हा गीतेचा श्लोक म्हणत फासाकडे गेलेले आहेत. फाशी त्यांनी आटकून घेतलेली आहे. त्यांना कांही त्याच्याबद्दल, मरण येणार आहे ही कल्पनासुद्धा, आम्हाला मरण येत नाही म्हणाले, हे परोक्षच ज्ञान आहे. साक्षात्कार कुठाय त्यांना. पण हे परोक्ष ज्ञान, जरी शाब्दज्ञान असलं तरी गीता हा ग्रंथ भगवंतांचा आहे. भगवंतांनी सांगितलंय की आत्मा मरत नाही. आम्ही मरणारे नाहीये. फाशी देहाला दिलेली आहे. देहाचा नाश होईल. फाशी कुणाला. **आत्म्याला फाशी नाहीये. हे ज्ञान, परोक्ष जरी असलं तरी दृढ आहे.** श्रद्धा आहे, विश्वास आहे, त्यामुळे व्यावहारिक सुद्धा लोकोत्तर पुरूष म्हणून ते ठरलेले आहेत. हे धैर्य, ज्ञानाने उत्पन्न झालं. तर सिद्ध सांगताहेत. नामधारका– ''भगवंताच्या या चरण कमलांचे जे ध्यान करतात, त्या ध्यानामुळे भगवंतांचा त्यांच्यावर प्रसाद होऊन धिजाड्य, प्रारब्ध कर्म हे सगळेही नाहीसे होते.' यात काही आश्चर्य नाहीये. आमची अशक्ती, आमच्या असमर्थतेमुळे आम्हाला याचे आश्चर्य वाटते. परंतु भगवंताच्या वस्तूशक्तीच्या दृष्टीने अशक्य कांही नाही. ब्राह्मण कुमार कृतार्थ झाला. माणसांनीही त्याची उपेक्षा केली. देवांनीही केली. परंतु महाराजांच्या कृपेने पूर्णज्ञान होऊन तो घरी गेलेला आहे. सर्वही ऐहीक सिद्धी त्याला मिळाल्या. सर्व मंडळी त्याला मान सन्मान देऊ लागली. या बालकाला परोक्ष ज्ञान मिळालं, परंतु सद्गुरू महात्म्यांच्या कडून मिळालं आहे ते सुद्धा कांही फुकट जाणारं नाहीये. पुढं त्याचा उद्धार झाला असेल. तेव्हा हे एक कार्य औदुंबर क्षेत्रामधे असताना महाराजांच्या हातून घडलेलं आहे. ही एक लीला आणखी सिद्धमुनींनी नामधारकाला सांगितली.

याच्यानंतर महाराज तिथून निघालेले आहेत. कृष्णा तीरावर संचार करता करता कृष्णा–पंचगंगा संगम ज्या ठिकाणी आहे, असं स्थान म्हणजे **सध्याचं 'नरसोबावाडी' क्षेत्र आहे. प्रसिद्ध दत्तक्षेत्रांपैकी 'औदुंबर' क्षेत्राचं एक स्थान आहे.** त्याची आत्ता कथा सांगितली.

त्यानंतर महाराज कृष्णा–पंचगंगा संगमावर येऊन राहिलेले आहेत. त्याठिकाणी अरण्य आहे. नदीच्या पलिकडे गांव आहे अमरापूर म्हणून. त्याला 'औरवाड' असं सुद्धा म्हणतात. **'अमरापूर' त्याचं नांव.** तिथं कांही वस्ती आहे. चांगली ब्राह्मणमंडळीही आहेत. स्नान, संध्या करणारी आहेत. सगळी मंडळी आहेत. शेतकरी आहेत, सगळी मंडळी होती. पण नदीच्या अलिकडे सबंध अरण्य आहे आणि त्या अरण्यामधे महाराज तिथं कृष्णातीरावरती राहण्याचं त्यांनी ठरविलं. अगदी गुप्तपणे. जगाचे अधिराजे आहेत. ते आता भीमा अमरजा संगमावर येऊन राहिले. सगळे त्यांचे घर आहे. कृष्णा–पंचगंगा नदीच्या संगमावर कांही वर्षे राहिले. सुरवातीला त्यांचा निवास गावापासून दोन–तीन मैलावर जो भीमा अमरजेचा संगम आहे तेथे

होता. भिक्षा घ्यायला महाराज गांवात येत. भक्तांचा उद्धार करण्यासाठी महाराज अवतार घेऊन आलेले आहेत. अदृष्य झाले तरी सुद्धा त्यांची कार्य चाललेलं आहे. त्या कृष्णा-पंचगंगा संगम स्थानामधे, संगम थोडासा एक अर्धा फर्लांग, म्हणा अगदी जवळच आहे, थोडा पलीकडे आहे. अलिकडे आणखी महाराजांच्या पादुका म्हणून आहेत, **मनोहर पादुका.** तिथं महाराजांचा मुक्काम झालेला आहे आणि नदीच्या पलीकडे एक क्षेत्र आहे. आता हे तिथे अरण्यामधे रहायचे नेहमी. नदीतीरावरती रहायचं, कुणाच्या घरी जायचं नाही. कांही नाही. आपल्या आपल्या स्थानावर बसून रहायचं. आता ही जी नदीच्या पलिकडे, गांवामधे कांही मंडळी होती त्यांनी एकदा, दोनदा पाहिलं. कोणीतरी आणखी संन्यासी पुरूष आहे आणि तो इकडं अरण्यामधे रहातो आहे म्हणाले. आपल्या गांवात कधीसुद्धा आलेला नाही म्हणाले. याची जेवणाची काय व्यवस्था होत असेल, जेवल्याशिवाय हा कसा रहात असेल, ते नुसती चौकशी सुरू केली. चिकित्सा करायची म्हणजे त्या चिकित्सेबरोबर कांही धर्मबुद्धी असावी, **क्रूर बुद्धी असू नये. आनृशंस्य ज्याला म्हणतात.** असे असावे. त्यांना जेवायला मिळत नाही तर जेवायला घेऊन कां गेले नाहीत? हे कुठे जेवत असतील? त्यांची परीक्षा पाहिली पाहिजे. जेवणाशिवाय कसे राहतील ही काय चिकित्सा झाली? आपण जेवतो पोटभर आणि त्या महात्म्याला जेवायला सुद्धा मिळत नाही. आपण जाऊन चौकशी करायला काय झालं. पण चौकशी नुसती लांबून करतायत. पाहूया, आड, कुठेतरी झाडाआड लपून बसू. पाहूया, काय करतात, कुठे जेवतात, काय खातात.

पण तिथे त्यांना अनुभव आलेले आहेत. घाबरलेत ते निघून गेले. परीक्षा सोडून दिली त्यांनी. अशा रीतीनं, महाराजांचा मुक्काम आणि त्या स्थानामधे बरेच दिवस झाले आहे. जंगलामधे अरण्यामधे आहे. तिथं अष्टतीर्थ आहेत. महाराजही जातात, संचार करतात किंवा कुठेही राहतात हे महात्मे ते स्वतःच्या मनाला आणखी समाधान व्हावं, स्वतःची कांही सोय व्हावी वगैरे कांहीही त्यांचा विचार नाहीये.

क्षुद्व्याधिश्च चिकित्स्यतां प्रतिदिनं भिक्षौषधं भुज्यतां ।
स्वाद्वन्नं न तु याच्यतां **विधिवशात्प्राप्तेन सन्तुष्यताम् ॥**
शीतोष्णादि विषह्यतां न तु वृथा वाक्यं समुच्चार्यता
मौदासीन्यमभीप्स्यतां जनकृपा नैष्ठुर्यमुत्सृज्यताम् ॥

(साधनापञ्चकम् ४ था श्लोक)

ही एक मोठी भूमिका त्यांची आहे. **'जैशी स्थिती आहे, तैशा परी राहे.'** ही भूमिका त्यांची अगदी स्थिर आहे. त्यामुळे आपली सोय झाली, कुठे होईल ती बघू या जागा, तिथे रहावं, ते कांही नाही. कांहीही मिळालं तर मिळालं, नाहीतर नदीचे पाणी आहे.

चीराणि किं पथि न सन्ति दिशन्ति भिक्षां
नैवाङ्घ्रिपाः परभृतः सरितोऽप्यशुष्यन् ।
रुद्धा गुहाः किमजितोऽवति नोपसन्नान् ।
कस्माद् भजन्ति कवयो धनदुर्मदान्धान् ॥ **(श्रीमद् भागवत २.२.५)**

इतके ते अहंकारी आहेत असंही म्हणायला हरकत नाही. वस्तुतः **'अहंकाराचा वारा न लागो राजसा'** अहंकाराचा संबंध नाही पण त्यांचा अहंकार असा आहे , कोणापुढेही हात पसरायचा नाही. देव देणारा समर्थ आहे. या विश्वासामुळे, जगामधे, कोणापुढेही ते हात पसरत नाहीयेत. देणाऱ्यांचं भाग्य असेल, पुण्य असेल तर त्याने द्यावं आणि आपलं पुण्य आणि कल्याण करून घ्यावं एवढं सांगतील ते. पण आम्हाला जरूर नाही. कांही जरूर नाही. असे महात्मे आहेत. तेव्हा हे महाराज आपले तिथ नित्य तृप्त आहेत. परमात्म्याला कांही लागत नाहीये. भूक नाही, तहान नाही. सगळ्याच्या पलीकडे गेलेले आहेत ना? ज्ञानी महात्म्याला भूक-तहान काहीच नाही म्हणाले. सगळं जिंकलेलं आहे. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय म्हणून जे पांच कोश सांगितलेले आहेत, सुक्ष्म देहामध्ये. **स्थूल देह म्हणजे अन्नमय कोश म्हटलेलं आहे.** या सगळ्यांनी त्या आत्मस्वरूपाला वेष्टन करून टाकलेलं आहे.

दिग्भिरवेष्टितमम्बरमेव प्रत्यग्ब्रह्मेति ।
खंब्रह्मेति श्रुतिरपि वदति खंब्रह्मेति श्रुतिरपि वदति दिगंबराचेति ॥
(आनंदलहरी भाग-५)

दिगंबरा, दिगंबरा याचा अर्थ सांगण्याकरिता महाराजांनी एक आरती केलेली आहे. त्यात पहिला जे दिगंबरा शब्द याचा अर्थ त्यांनी केलेला आहे.

दिग्भिरवेष्टितमम्बरमेव प्रत्यग्ब्रह्मेति ।
खंब्रह्मेति श्रुतिरपि वदति खंब्रह्मेति श्रुतिरपि वदति दिगंबराचेति ॥
(आनंदलहरी भाग-५)

हे जे अंबरासारखं, आकाशासारखं असंग आत्मस्वरूप आहे. जीवात्मा हा खरा म्हणजे असंग आहे. कांही संसारी नाही आहे तो. संसारी नसणारा जीवात्मा शुद्ध आणखी असा आकाशासारखा निर्लेप आहे. पण त्याला या सगळ्याही मूर्त पदार्थांनी वेष्टन करून टाकलेलं आहे. कोशामधे त्याला दडपून टाकलेलं आहे. त्यामुळे तो -

दिग्भिरवेष्टितमम्बरमेव ।

पण खरा तो आहे ब्रह्म आहे. आकाशाप्रमाणे आणखी सर्वव्यापी आहे. आणि शुद्ध अशा प्रकारचं नित्य शुद्ध बुद्ध मुक्त स्वभाव, हे प्रत्यग् ब्रह्म आहे, **'त्वम् पदार्थ ज्याला म्हणतात तो**

पहिला दिगंबरा याचा अर्थ लावलेला आहे.' प्रत्यग् ब्रह्म आणि पूर्ण ब्रह्म, जीवात्मा साक्षी आहे. पण साक्षी आहे असं आम्हाला वाटत नाही. मी संसारी आहे, मी अमक्या घराचा मालक आहे, अमक्याचा आणखी हे आहे, माझे इतके हे आहे. ममत्वामधे सापडलेला आहे. त्यामुळे जीवात्म्याचं जे प्रत्यग् म्हणजे प्रतिकूल एक प्रकारचं शरीर आहे. **प्रातिकूल्येन प्रकाशने.**

प्रतिकूल, बाहेर जे बहिरंग पदार्थ आहेत, त्यांच्या, प्रतिकूल म्हणजे ते सगळे अशुद्ध आहेत, हा शुद्ध आहे, ते विकारी आहेत, हा निर्विकार आहे. म्हणजे प्रत्येक पदार्थांच्या पेक्षा प्रतिकूल, विरुद्ध रीतीने प्रकाशित होणारा शुद्धबुद्धमुक्त स्वभाव असा हा प्रत्यग्-आत्मा आहे. पण तो या दिग्भी: म्हणजे मूर्तपदार्थांनी सगळ्यांनी वेष्टित झालेला आहे. तो प्रत्यग ब्रह्मात्वम् असा पदार्थ आहे. त्याचं ज्ञान कुठं होत आहे. आम्ही संसारी, आम्ही सुखी, आम्ही दुःखी वगैरे, मी स्त्री आहे, मी पुरूष आहे मी अमुक आहे, मी सत्ताधीश आहे, मी लक्षाधीश आहे अशाच वृत्तीने अहंकारामधे सापडलेला आहे. तर हे जे आणखी आत्मस्वरूप आहे, हे आत्मस्वरूप ज्यांनी जाणलेलं आहे, प्रत्यग् ब्रह्म-प्रत्यग् आत्मा जीवस्वरूप कसा आहे. मी साक्षी आहे, निर्विकार आहे ? निर्विकार म्हटल्यानंतर अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय किंवा स्थूल, सूक्ष्म, कारण हे तीन देह, या मूर्त पदार्थांच्या संबंधापासून, संबंध सुटलेला आहे ना ! त्यांच्याशी तादात्म्य ध्यास होणं किंवा संसर्गाध्यास होणं हे वेष्टनातून तो मोकळा झालेला आहे, ज्ञानी महात्मा. म्हणून त्याला तहान आणि भूक कुठली आहे. परीक्षित राजाला तहान लागली, शिकार करून आला, ऋषींच्या आश्रमामधे गेला. पाणी पाणी म्हणतो आहे, कोणीही तिथं पाणी दिलं नाही. कोणी नव्हतंच तिथे. ऋषी आपले समाधी लावून बसलेले आहेत. त्यांना कांही देहभानही नाहीये. राग आलेला आहे परीक्षित राजाला. अद्यापीही त्या वेष्टनामधे तो आहे. तो प्रत्यग आत्मा, जीवात्मा, तो अद्यापीही त्या अन्नमय, प्राणमय कोशाच्या वेष्टनामधे सापडलेला आहे. रागावला त्या ऋषींच्यावर. मला पाणीसुद्धा दिलं नाही, मी मोठा राजा आहे. पाणी मागतो, कुणी पाणी दिल नाही. एक मेलेला साप उचलला धनुष्याने आणि त्या ऋषींच्या गळ्यामधे अडकवला. खरी समाधी आहे की खोटी आहे ते पाहू या. **काय समाधी अवस्था म्हणजे काय आहे किती भाग्याचं, किती पुण्याने ती समाधी अवस्था ईश्वरप्रसादाने प्राप्त होणारी आहे, त्याची कांहीही कल्पना नाहीये आपल्याला.** समाधीचा खरे-खोटेपणा, पहायला आमच्याजवळ बुद्धी तरी आहे का अगोदर? पण त्याची बुद्धी सगळी आणखी त्या प्राणमय कोशामधे सापडलेली आहे. क्षुधा, तृषा हे प्राणधर्म आहेत आणि प्राण म्हणजेच मी आहे. स्थूलदेह म्हणजे मी आहे. बुद्धी म्हणजे मी आहे. इंद्रिय म्हणजे मी आहे हा सगळा तादात्म्य ध्यास किंवा त्यांच्या वेष्टनानी सापडलेला, कोशामधे सापडलेला जीवात्मा हा

असा बेभान झालेला आहे. ऋषींची परीक्षा पाहू लागला. त्या ऋषी कुमारांनी त्याला शाप देऊन टाकलेला आहे की सात दिवसात, सातव्या दिवशी तुला मृत्यू येणार आहे. मग सावध झालेला आहे. शुकाचार्य महाराज भेटलेले आहेत. पाप घडलेलं आहे. शाप झाला. परंतु पूर्वीचं कांही पुण्य आहे, त्या पुण्यामुळे ईश्वराचा प्रसाद आणि त्या प्रसादामुळे मृत्यूचा समय आलेला असताना, प्रत्यक्ष ब्रह्मनिष्ठ महात्मे शुकाचार्य महाराज त्याला उपदेश करण्याकरता येऊन पोचलेले आहेत आणि मग त्याला तिथून मोकळं केलं. कृष्णकथा श्रवण करण्याच्या वेळेला त्यानीच सांगितलं महाराज मला तहान–भूक कांहीही लागत नाही.

नैषातिदुःसहा क्षुन्मां त्यक्तोदमपि बाधते ।
पिबन्तं त्वन्मुखाम्भोजच्युतं हरिकथामृतम् ॥ (भा.१०–१–१३)

आत्मज्ञानाच्या भूमिकेपर्यंत चाललेला आहे महात्मा. एकेक कोशापासून त्याला आणखी बाजुला केलेलं आहे शुकाचार्य सद्गुरू महाराजांनी. तोच आणखी परीक्षित राजा, मला तहान,भूक लागत नाही म्हणायला लागला. तहान लागलेली असताना, पाणी दिलं नाही म्हणून रागावणारा, तो परीक्षित राजा, त्या ऋषीची परीक्षा पाहणारा आणि नंतर शुकाचार्यांची भेट झाल्यानंतर भगवत कथा ऐकतो आहे, त्यांच्या मुखातून त्यांच्या कृपेमुळे त्या सगळ्या कोशधर्मातून मुक्त झालेला आहे. तहानही नाही, भूकही नाही महाराज मला. मला आता सगळा वेळ तुमच्यापासून कथा, भगवंताच्या कथा ऐकायच्या आहेत. हा खरा श्रोता आहे. खरा श्रोता बनण्याला सुद्धा कितीतरी जन्म घ्यावे लागतील. परीक्षित राजासारखा अधिकार झाला पाहिजे तहान भूकही विसरली पाहिजे. सात दिवस एका आसनावर बसून राहिलेला आहे. अन्न नाही, पाणी नाही, कांही नाही. मलमूत्र विसर्जन नाही. लक्षच नाही. सगळे देहधर्म, सगळं कोशधर्म गेलेले आहेत. त्या कोशधर्मातून बाजूला झाला. **प्रत्यग आत्मा मी आहे हे समजून आलेलं आहे.**

त्यानंतर दुसर पूर्णब्रह्म म्हणून दुसऱ्या दिगंबरा याचा अर्थ केलेला आहे महाराजांनी.

दिग्वत् चाम्बरमेव व्यापक पूर्णब्रम्हेति ।
सच्चित्सुखघनमायातीतं सच्चित्सुखघनमायातीतं दिगंबरा वदति ॥
(आनंदलहरी भाग–५)

हे दिगवत् अंबरम्, परमात्मस्वरूप जे आहे हे दिकवत् आहे. दिक् म्हणजे हे सगळे जे पदार्थ आहेत, दिक् पदार्थ, तो व्यापी आहे, व्यापक आहे, हा एक आहे. त्या दिक् पदार्थाप्रमाणे हे सुद्धा अंबर म्हणजे शुद्ध आहे. पूर्णब्रह्म आहे. पूर्णब्रह्माची एक कल्पना एका शब्दाने येते. प्रत्यग ब्रह्म म्हणजे जीवात्म्याचं जे शुद्ध स्वरूप आहे, साक्षीस्वरूप जे आहे. तो प्रत्यगआत्मा आहे. त्याचंच ज्ञान करून दिलं आणि त्या दोघांचही ऐक्य आहे म्हणाले. हाही

व्यापक आहे तोही व्यापक आहे, तोही निर्विकार आहे हाही निर्विकार आहे, दोन्ही एक आहे, ही ओळखही करुन देतात सद्गुरू महाराज. त्यामुळे **जीवात्मा हा संसारी नाही हे अगोदर समजावून सांगायला पाहिजे. तू संसारी नाहीस. तू शुद्ध आहेस, आनंदरूप आहेस आणि तूच व्यापक आहेस हे नंतर समजून सांगायचंय, व्यापक परब्रम्हाचं स्वरूप म्हणजे तत् पदार्थ आहे. सर्वव्यापी ईश्वर आहे.** तू, तू मात्र यांच्यापेक्षा असंग आहेस. तुला कशाचाही संबंध नाही. संसार-धर्मातीत आहेस. देहत्रयातीत, कोशपंचकाच्या पलिकडचा तू आहेस. म्हणून दोघंही, तुम्ही एक आहेत, हे नंतर समजावून सांगतात.

तर असे महात्मे, महाराज तिथं राहिलेले आहेत. त्यांना कुठली तहान आणि कुठली भूक येणार? पण लोकांना, तहानभूकेमधे जे सापडलेले आमच्या सारखे जीव आहेत, त्यांना ते आश्चर्य वाटतंय. हे स्वामीमहाराज जेवत नाहीत आणि कांही करत नाहीत, रहातात कसे? पाहू या. पाहू या नाही तसं बनू या असं आम्हाला कां वाटू नये ? परीक्षा करा तुम्ही, पण त्यांची जर परीक्षा तुम्हाला पटली तर तुम्ही हे सगळं तहान, भूक सोडायला तयार आहात का? इतकी तयारी आमच्या मनाची आहे का? नुसती चिकित्सा, नुसती परीक्षा पाहून काय उपयोग आहे? पाप मात्र लागणार आहे. स्वत: त्यांच्याकडून कांही आपण घेऊ शकत नाही.

तिथे महाराज राहिलेले आहेत, त्याचा उद्देश असा आहे ते पवित्र क्षेत्र आहे.

स्वयं तीर्थरूपोऽपि तीर्थप्रकाशं करिष्यन्स्वगत्या जनानुद्धरिष्यन् ।
स सस्नौ सुरादेः करोति स्म तृप्तिं सुरर्ष्यादिवर्गः करोत्यस्य तृप्तिम् ॥

(त्रिशतीकाव्य-१ शतक ५४ श्लोक)

महाराजांनी आणखी नरसिंह सरस्वती महाराज, दत्तात्रेय प्रभु कां फिरतात म्हणाले. सगळ्या तीर्थयात्रा करतात, तीर्थयात्रा वगैरे **त्या पापक्षयाकरता करायच्या असतात,** यांना कसली पापं म्हणाले. परंतु, कुठे कुठे कोणची कोणची तीर्थस्थाने आहेत, याची माहिती कोणाला आहे ? कोण वाचतंय? आणखी त्याप्रमाणे आणि कोण समजून घेतंय? सगळ्या तीर्थांची माहिती दिलेली आहे, महाभारतामधे, वनपर्वामधे, तीर्थयात्रा पांडवांनी केल्या, काय काय केलं, सगळं दिलेलं आहे. पण आता त्यावेळची नावं कोणची, यावेळची नावं कोणची, कोणची तीर्थ कुठे आहेत हे समजायलाच अगोदर कितीतरी कठीण आहे. महानद्या आहेत. कांही ज्योतिर्लिंगादी स्थानं आहेत, कांही प्रसिद्ध स्थानं अद्यापी आहेत त्यांची माहिती लोकांना आहे. पण कोण जातो कोण तिथे ? तर अशी तीर्थक्षेत्रं जरी असली तरी पुष्कळ अज्ञात आहेत. कृष्णानदी नुसती वाहती आहे. गंगा नदी वाहती आहे. नर्मदा नदी वाहती आहे. पण तीरावरती सुद्धा फरक आहे ना? कोणच्या कोणच्या तीर्थ स्थानामधे कोणच्या महात्म्याने येऊन तपश्चर्या केली, तो कुठे राहिला, आणि कुठे त्या ठिकाणी विशेष आविर्भाव आणखी

ईश्वरतत्वाचा झालेला आहे, पावित्र्य अधिक कुठे आहे याची माहिती कुणाला आहे? ती माहिती करून देण्याकरता आणखी भगवान दत्तात्रेय, श्रीपाद वल्लभ, नरसिंह सरस्वती महाराज, स्वतः तीर्थयात्रा करतात आणि त्या त्या ठिकाणी राहतात.

कृष्णा–पंचगंगा संगमावरती येऊन राहिले. गाणगापूरामधे जाऊन राहिले. तिथंही अष्टतीर्थ आहेत. कृष्णा पंचगंगा संगमस्थान नरसोबावाडी, तिथंही अष्टतीर्थ आहेत. त्या तीर्थांचं माहात्म्य लोकांना कळावं याकरता तिथं महाराजांचा मुक्काम झालेला आहे.

त्यानंतरची हकीकत ते सांगताहेत, की पलिकडच्या तीरावरती एक गांव होतं. अमरापूर त्याचं नांव. तिथं केव्हातरी महाराजांनी भिक्षेला जावं. जवळच एक शिरोळ म्हणून गांव आहे दोन तीन मैलांवरती तिथंही एकदा गेंले होते महाराज. पण ती कथा कांही याच्यामधे गुरुचरित्रामध्ये नाही. या गुरूचरित्रामधे त्या कथेचा उल्लेख नाहीये. दुसऱ्या कथेचा उल्लेख आहे, शिरोळच्या. ही शिरोळ गांवामध्ये घडलेली कथा. ती सदगुरू वासुदेवानंदसरस्वती महाराजांनी **कुमारशिक्षा** म्हणून एक ग्रंथ लिहिलेला आहे. कुमारशिक्षा, युवशिक्षा आणखी वृद्धशिक्षा अशी त्यांची नांवे आहेत. कुमार म्हणजे बाल. अद्यापी मनामधे बालबुद्धी आहे, ज्ञान पूर्ण नाही, पक्कं नाही. कर्माधिकारी जे आहेत त्यांना कर्माचं महत्त्व समजून सांगण्याकरता **कर्मयोग सांगण्याकरता म्हणून कुमारशिक्षा केलेली आहे.** युव शिक्षेमधे सगळ्या उपासना प्रकट केलेल्या आहेत. वैदिक उपासना किती प्रकारच्या आहेत, पौराणिक उपासना कोणच्या कोणच्या आहेत? आकाराची सुद्धा उपासना करता येती, त्यानीसुद्धा फलप्राप्ती होती. परब्रह्माला, परब्रह्म निराकार आहे, निर्गुण आहे वगैरे वगैरे हे जरी असले सिद्धांत, तरी त्या सिद्धांतापर्यंत आमची बुद्धी अद्यापी गेलेली नाही, जाण्याला किती वेळ आहे हे आपल्याला कळत नाही. उगीच आग्रहाने, हट्टाने निर्गुण आहे, देवाला मूर्ति नाही देवाची कसली मूर्ति ? देवाला आकार नाही, काही नाही, नुसता विवाद करण्यात अर्थ नाहीये. **जे समोर दिसतं आहे ते सुद्धा ईश्वराचे स्वरूप आहे हे मुद्दाम महाराजांनी त्या युवशिक्षेमध्ये सांगितलेय.** उपासकाचा अधिकार, त्या त्या अधिकाराप्रमाणे रूपही ब्रह्माला आहे, गुणही ब्रह्माला आहे. परंतु ज्ञानी महात्मे मात्र आग्रह रहित असतात. **तुजं सगुण म्हणू की निर्गुण रे ! सगुण निर्गुण एकु गोविंदु रे,** ज्ञानेश्वरमहाराज सांगताहेत, एकच आहे बाबा, पण सगुणही त्याचं स्वरूप आहे, निर्गुणही त्याचंच आहे. निर्गुणच खरं आहे, सगुण खोटं आहे, सगुणच खरं आहे, निर्गुण खोटं आहे असे वादविवाद पुष्कळ आहेत. कितीतरी मतभेद आहेत. कितीतरी आणखीन चाललेलं आहे. ग्रंथरचना पुष्कळ झालेली आहे. **पण साधकांनी त्या ग्रंथरचनेमधे पडायचं नाहीये, वादविवादामधे आपली बुद्धी कलुषित करून घ्यायची नाही.**

तेव्हा शिरोळ गांवाची एक कथा ती निराळी– ती कुमारशिक्षेत सांगितलेली आहे. नरसिंह सरस्वती महाराज, त्या शिरोळ गांवामधे एक ब्राह्मण राहात होता. उत्तम अगदी अग्निहोत्री आहे,

कर्मनिष्ठ आहे. भिक्षा वगैरे मागून आणायची. आणखी त्याप्रमाणे नैवेद्य, वैश्वदेव करायचा. कोणी अतिथी आलेले आहेत काय ? वैश्वदेव करून बाहेर बली टाकण्याकरता गेल्यानंतर **'अतिथिम् आकांक्षेत्'** म्हणतात, कोणी पाहुणा येतोय कां पहावं वाट पहावी. या वेळेला गाडी आलेली आहे काय ? काय कोणी उतरलं आहे काय ? आमच्या घरी येताय काय ? याबद्दल त्यांची प्रसिद्धी असायची, की यांच्या घरी आपली सोय होतेय. निश्चित आहे, केव्हाही गेलं तरी. अशी अतिथीची वाट पहावी म्हणून सांगितलंय. तशापैकी तो ब्राह्मण होता. त्याची स्त्रीही मोठी पतिव्रता होती. तेव्हा एके दिवशी ब्राह्मण आणखी कुठेतरी बाहेर गेलेला आहे, तर महाराज जेव्हा या दरिद्री ब्राह्मणाच्या घरी आले तेव्हा तो भिक्षा मागायला बाहेर कुठेतरी गेला होता. त्याच्या बायकोने महाराजांना आसन देऊन बसायची प्रार्थना केली आणि यजमान घरी आले की भिक्षेची व्यवस्था करते असे म्हणाली. नरसिंह सरस्वती महाराज. कारण अरण्यामधेच राहात होते. कोणाची ओळख नाही, कोणाचं जाणं येणं नाही. कोणीतरी स्वामी आलेले असतील. कशाला त्या शिरोळ गांवात तरी चौकशी कोण करणार? बाईच्या तिथे आलेले आहेत. गरिबी आहे घरची. त्या बाईनं सांगितलं महाराजांना, या बसा म्हणाले, मी आत्ता हे करते म्हणून तिनं जोंधळ्याच्या कण्या, होत्या आपल्या कण्या भरडलेल्या, त्याचा आणखी स्वयंपाक केला. त्या कण्या तयार केल्या, पातळ कण्या केलेल्या आहेत, आणि थांबली बाई. काय म्हणाले, महाराज म्हणाले, काय झालं बाई तुमचं झालं ना कण्या ? मला वाढा म्हणाले. ती बाई म्हणाली घरात कांही ताटसुद्धा नाहीये, पात्र नाही, तुम्हाला कशावर वाढू मी ? म्हणजे अशी परिस्थिती आहे हं. **ईश्वराची कृपा होण्याकरिता संपत्ती लागत नाहीये. संपत्ती आली की अहंकार आलाच. मी देवाला देतोय, मी देवाला देतो म्हटलं की देव घेत नाहीये. ते समजुन असलं पाहिजे. मी कांहीच देऊ शकत नाही देवाचं देवानी घ्यावं असं समजलं तर देव घेतो आहे**. ती बाई म्हणते आहे महाराज, आता कशावर वाढू तुम्हाला? भांडं नाही, काय पातेल्यात वाढायचं? पात्र कुठाय? महाराज उठले तिथून, बाहेर आले, एक दगड होता असा, तो दगड उचलून आणला. त्याच्यावर पाणी घातलं, स्वच्छ तो दगड धुतला. वाढा म्हणाले या दगडावर हे पात्रच आहे. संन्याशाला काय ? अमुकच चांदीचं भांडं, चांदीचं ताट आणि सोन्याचं ताट लागत नाही. आणि त्या बाईनं त्या दगडावरच त्यांना ती यवागु, म्हणजे ती पेज वाढलेली आहे. महाराजांनी ती पेज भक्षण केली, पाणी प्याले. आणखी आशीर्वाद देऊन गेलेले आहेत. तर त्या ठिकाणी **'भोजनपात्र'** असं त्याचं नांव आहे, तो जो दगड आहे, तो तिथे आता बशिवलेला आहे. त्यावेळेला. त्याची पूजा, अर्चा वगैरे चालते. तिथे फक्त बोटं उठलेली आहेत. त्या दगडावरती बोटं उठलेली आहेत. पादुका वगैरे नाहीयेत. ते अद्यापि तिथं साक्षात आहे. **भोजनपात्रच** त्याचं नांव आहे. अशी कथा गुरूचरित्रात आलेली नाहीये. पण महाराजांनी परंपरेने ऐकून त्याचा उल्लेख त्या कुमारशिक्षेत केलेला आहे.

आता, अमरापूरामधे घडलेली गोष्ट सांगतायत सिद्धमुनी. एक दरिद्री ब्राह्मण होता. भिक्षा मागून उदरनिर्वाह करीत होता. एक दिवस महाराज त्याच्या घरी भिक्षा मागायला आले. त्यांना ह्याच्या घरी भिक्षेला जाताना पाहून गांवातील धनिक मंडळी हसून म्हणू लागली, ''स्वामी महाराजांना इथे काय भिक्षा मिळणार? भाकरीचा तुकडा जरी मिळेल की नाही कोणास ठाऊक.'' पण भगवंताला भक्ती प्रिय आहे. बाह्य धनाची अपेक्षा नाहीत. महाराजांची अजून ओळख पटलेली नाही. गांवात कधीकधी भिक्षेला येताना दिसणारे संन्यासी अशीच त्यांची समजूत होती.

सूर्यावरती जरी मेघ आले तरी सूर्याचे किरण ते रोखू शकतात कां? मेघांनी सूर्याला झाकले हे म्हणणे बरोबर आहे कां? सूर्य जर झाकला असता तर अंधार पडून मेघ तरी दिसला असता का? प्रकाश कोणाचा आहे?

तसे परमात्म्याला, आत्मस्वरुपाला पाहणारे जे भक्त आहे त्यांची बुद्धी, इंद्रिये आवृत्त झालेली आहेत. ती पाहूच शकत नाही. तो स्वयंप्रकाशित, सर्वव्यापी, सर्वज्ञ आहे. पण अशा रीतीने महाराज अद्यापि प्रगट झालेले नव्हते.

त्या ब्राह्मणाची आयचित वृत्ती आहे. एखाद्या वेळेला भिक्षेलाही जावं त्याने. काय मिळेल त्याच्यामधे आपला उदरनिर्वाह करावा. स्त्रीही अनुकूल मिळालेली होती. शांती घरामधे पूर्ण आहे. खरा परमार्थ घडतो आहे. त्या ब्राह्मणाच्या वाड्यामधे बाहेरच्या बाजूला दरवाजाजवळ एक घेवड्याच्या शेंगाचा वेल लावलेला होता. पाणी घालावं याने. तो वाढलेला आहे. त्याला शेंगाही वगैरे लागायच्या. त्यांनी शेंगा वगैरे काढून ठेवायच्या, वाळवून ठेवायच्या. ज्या दिवशी कांही भिक्षा मिळाली नसेल, त्यादिवशी त्या शेंगाचीच भाजी करायची. आणखी ती भाजीच देवाला नैवेद्य दाखवायची आणि आपण सर्वांनी मिळून ती नुसती भाजीच खायची, पाणी प्यायचं आणि रहायचं. तो एक आधार होता त्यांना, घेवड्याच्या शेंगाच्या वेलाचा. अशा त्या ब्राह्मणाच्या घरामधे एकदा स्वामिमहाराज, नरसिंहसरस्वती महाराज, मध्यान्ह काळी भिक्षेकरता आलेले आहेत. तो आपला, त्यानं कधी महाराजांचं दर्शन केलं नाही, कांही नाही, त्याला कांही माहितीही नाही. काय कुणी स्वामि महाराज पलिकडे रहातायत, ऐकलं असेल त्यानं. आले स्वामि महाराज, आणखी त्या ब्राह्मणाने त्यांची पूजा वगेरे केली. बसा महाराज. त्या दिवशी त्याच्या घरामधे कांहीही भिक्षा वगैरे कांही मिळालेली नसल्यामुळे त्या घेवड्याच्या शेंगांची भाजीच तयार केली होती. आता त्या भाजीत तरी तिखट मीठ होतं की नाही कुणास ठाऊक. घरात सगळी सामग्री होती की नाही, पण केली होती त्याने. बसा महाराज, आदराने आणखी त्यांची पूजा वगैरे करून महाराजांना पात्रामधे ती भाजीच वाढली त्यांनी, महाराजांनी सुद्धा उत्तम अगदी आनंदाने भाजी खाल्लेली आहे. आणखी पाणी पिऊन महाराज निघाले. आणखी

बाहेर जाता जाता, तो जो घेवड्याच्या शेंगाचा वेल होता तिथे, दारातच होता, सहज त्याला हात लावला अन् तो एकदम तो उपटल्यासारखा केला. उपटून टाकला अन् निघून गेले महाराज. हा ब्राह्मण बाहेर आलेला आहे, पोचवण्याकरिता म्हणून आलेले आहेत, दोघेही, बायकोही आली. जाता जाता यांनी आपला वेलाला हिसका मारला आणि तो उपटून फेकून दिलेला आहे. हे त्यांनी पाहिलं. महाराज निघून गेले. ब्राह्मण आपला, स्वस्थ ! पाहिलं त्याने, काय देवाची इच्छा समजत नाही म्हणाला. ती बाई मात्र बोलायला लागली. काय म्हणाली, आम्ही काय केलं होतं या संन्याशाला? आमच्या जवळ असलेली भाजी तेवढी आम्ही दिली. आम्हालासुद्धा आता पुरेल की नाही कुणास ठाऊक म्हणाली. आल्याबरोबर आदरसत्कार केला, नमस्कार केला. सगळं केलं. मिळालेलं आमच्याजवळ असलेलं त्यांना दिलं आणि जाता जाता हा वेलही तोडून टाकला म्हणाले. याचा एक आधार आम्हाला होता. भिक्षा मिळाली नाही तर याच्या शेंगा काढाव्यात, वाळवून ठेवाव्या, त्याची भाजी करावी. ती खाऊन आम्ही जीवन आणखी जगत होतो, कसेतरी राहात होतो. तेही तोडून टाकलं म्हणे. ती आपली जराशी रागानी बोलायला लागली. तो ब्राह्मण थोडा विचारी होता. तो म्हणाला, बाई, रागावून काय करणार ? आपलं अदृष्ट आहे म्हणाले. संन्यासी महात्म्यानं तोडलेला आहे म्हणून चूक झाली असं आपण म्हणू शकत नाही. आमच्या अदृष्टाप्रमाणे काय मिळायचं ते मिळेल. आहाराची व्यवस्था, इतक्या अनंत जीवांना, सृष्टी उत्पन्न करणारा परमात्मा आणि अनंत जीवांना निर्माण करतो. नुसता निर्माण नाही, त्यांच्या आहाराचीही व्यवस्था तो करतो. सिंहाला आणखी हत्तीचं मांस लागतं, रक्त लागतं. त्याकरिता हत्तीही आहेत, सिंह आहेत. सगळ्यांची व्यवस्था तो करतो ना? मुंग्यांच्या आहाराची ही व्यवस्था करतो तो. म्हणजे **जन्माला घालणारा जो आहे तोच संरक्षण करणारा आहे. ही मुख्य बुद्धी असली पाहिजे.** तो ब्राह्मण विचारी होता. तो स्त्रीला म्हणाला संन्यासाची, त्यांची निंदा तू करू नकोस. आमच्या अदृष्टाप्रमाणे आजपर्यंत या शेंगांचा आहार आपल्याला मिळत होता, वेळी अवेळी प्रसंगी, तो आता संपलेलं आहे. **काय दुसरी व्यवस्था देवाला करायची असेल, असं आपण कां समजू नये म्हणाले.** हे ज्ञान आहे. शेंगाचा वेल लावला तो सुद्धा देवांनी कृपा केली ना ! म्हणून शेंगाच्या आधारावर आपण जगत होतो म्हणाले, आजपर्यंत. आता हा तोडून टाकला, घेवड्याचा वेल, तरी सुद्धा दुसरी कांही तरी व्यवस्था देव करणार नाही, हे कां समजावं आम्ही? हा विश्वास कां असू नये? म्हणजे देवाला नावं आधी ठेवली त्या बाईनं किंवा आम्ही ठेवतो. संकटाच्या वेळेला देव लक्ष देत नाही. पण संकट दूर करायची आहेत दुसऱ्या प्रकाराने, देवाची इच्छा अशी असेल असं कां समजू नये? महात्मे मात्र या स्थितीमधे असतात. **ईश्वराला दोष कधीही देत नाहीत.** आपली कर्म जी आपल्या हातून घडलेली आहेत, त्या कर्माचं फळ

आपल्याला मिळतंय. देवांनीच दिलेले आहे. असू दे, पण देव त्यामध्ये दोषी नाही. कर्तृत्व आमचं आहे ना? आमचं कर्तृत्व असल्यानंतर देवाला दोषी धरण्यात काय अर्थ आहे? पुण्याचं फळ मिळाल्यानंतर सुख मिळायच्या वेळेला देवाची आठवण कुठे होतेय आम्हाला? त्यावेळेला देवाला आणखी देवाच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो का आपण? दुःख मिळाल्यानंतर, आमच्या कर्माचं फळ देवाने दिलेलं आहे. देवानी ही कर्म बाजूला करतो. पुण्याचं फल देवानी दिलेलं आहे. ही देवाची कृपा आहे अशी आमची समजूत होते कां त्या वेळेला? त्यावेळेला का होत नाही ? मी चांगला वागलो म्हणून मला सुख मिळालं. मग तेवढंच ठेवावं. देवाला मधे घेऊच नये. मी वाईट वागलो म्हणून मला दुःख मिळतंय. एवढं समजून रहावं. माझी बुद्धी किंवा मीच सगळं करणारा आहे, तर आपल्याच कर्माकडे पाहून आपणच सुखी किंवा दुःखी असणार असा विचार करून आनंदात राहिलं पाहिजे. ईश्वराला मधे आणायची जरूर काय? परंतु त्या बाईची समजूत, तिला या दुःखाचं काय करावं? घरात मुलं बाळं आणि आपली स्थिती. उद्या जर भिक्षा मिळाली नाही तर काय करायचं? नुसतं पाणी पिऊन राहयचं? अशी तयारी कशी असेल? पण ब्राह्मणाने तिचं समाधान केलं. बाई, दोष द्यायचा नाही. आपल्या कर्माप्रमाणे हे सर्व घडलेलं आहे. स्वामि महाराजांना तू कांही निंदा करू नकोस. पाहू आता आपण. आणखी दुसरी कांही भिक्षा मागू. कांहीतरी करू. वाटलं तर हे गांव सोडायचं तर सोडून देऊ, दुसरीकडे जाऊ, करायचं तस.

मग त्याने काय केलं, तो सबंध वेल पसरलेला होता तो सगळा गोळा केला एका बाजूला. आता ते मूळ सगळं उपटून टाकलं. ते मूळही एका बाजूला काढलेलं आहे. खाली आता कांही मूळ असेल म्हणून पहार आणली आणि पहारेनं सगळं मूळ त्याचं काढावं म्हणून तो काढायला लागला. आणि ते सबंध जमिन–आंतली मुळं उकरली त्याने आणि सबंध मूळ काढल्याबरोबर आंत एक मोठा हंडा आहे आणि त्याच्यामधे सोन्याच्या मोहरा भरलेल्या आहेत. त्याने बायकोला हांक मारली. ही पहा म्हणाले, ही व्यवस्था त्यांना करायची होती म्हणून वेल तोडलेला आहे. आता वेल तोडला हे चांगलं केलं कां वाईट केलं?

स्वामि महाराजांनी हे चांगलं केलं की वाईट केलं ? आता याचं उत्तर काय द्यायचं? याकरिता म्हणाले त्यांनी हे केलेलं आहे, पण हे अगोदर असं आम्हाला वाटत नाही. कांहीतरी आमचे कल्याण करायचं आहे. यातही देवाचा हेतू कांही चांगलाच आहे. जरी संकटं आली तरीसुद्धा हा कांहीतरी चांगला हेतू आहे, पुढे आमचं कल्याण करायचंय म्हणून ही संकटं आहेत. ही बुद्धी फक्त आणखी दैवी प्रकृतीचे जे महात्मे आहेत, खरे भक्त आहेत त्यांची बुद्धी अशी आहे.

ठेविले अनंते तैसेचि रहावे । चित्ती असो द्यावे समाधान ॥ (तुकाराम महाराज)

म्हणताहेत, तुकाराम महाराज. स्वतः समाधान मानतायत आणि सांगतायत. नुसतं सांगत नाहीत.

आनंद झालेला आहे. आणखी लगेच त्यांनी तो हंडा काढून घरात ठेवलेला आहे. दोघेही पति-पत्नी नदीतून, नदीच्या पाण्यातून अलिकडच्या तीरावरती आले. महाराजांना नमस्कार केलेला आहे. आणखी सांगितलं, महाराज असं असं झालं, आपण आला म्हणे त्यादिवशी, आमच्या घरी काल. आज सकाळी, आणखी आपण नुसती भाजी खाऊन गेला. म्हणाले, आम्हाला किती दिलं तुम्ही? महाराजांनी सांगितलं, हे सगळं गुप्त ठेवा म्हणाले बरं. कारण त्यांना तिथं गुप्त राहायचं होतं. या ब्राह्मणाला भाजीचं, भाजी नुसती खायला घातली स्वामिमहाराजांना त्यांनी आणि स्वामींनी त्याला आणखी सोन्याच्या मोहरांचा हंडा दिला. हे जर जगामधे प्रसिद्ध झालं तर स्वामिमहाराजांना कोणी इथे राहू देणार नाही. अगदी आम्ही पंच पक्वान्न घालतो म्हणून रोजची आमंत्रणं येतील. रांगा लागतील. ते नको व्हायला, म्हणून त्यांनी भीतीही घातलेली आहे. तुम्ही हे जर प्रगट कराल तर ती आलेली लक्ष्मी निघून जाईल म्हणाले. त्यांना काय करायचंय. स्वामी महाराज सांगतात तसं ऐकायचंय. लक्ष्मी प्रगट कशाला केली. त्यांनी प्रगट काय काय गोष्टी करू नयेत, हे सगळं सांगितलेलं आहे.

मंत्रा ग्रहणम्,

आयुर्वित्तं गृहच्छिद्रं मन्त्रमौषधमैथुने ।
दानं मानापमानौ च नव गोप्यानि कारयेत् ॥ (सुभाषितरत्नभांडार श्लोक १९७)

तर त्यापैकी 'श्री' मंत्र कधीही प्रगट करायचा नाहीये. आयुष्य किती आहे, सांगायचं नाही. ज्योतिषाला समजलं असलं तरी त्यानेही सांगू नये म्हणून सांगितलेलं आहे. मरण जवळ आलेलं आहे ज्योतिषाने सांगितलं तुमचा एक महिन्याने मृत्यू होणार आहे. महिना व्हायच्या अगोदर त्याच्या समक्षच त्याला मरण येईल, घाबरून आणि. सांगायचं नाही. गृहरंध्र कधीही सांगायचं नाही. आमच्या घरात मुलाचं आणि सुनेचं, सासवाचं पटत नाही. केव्हाही सांगू नये. ते ही सांगायचं नाही. औषधे सांगायचे नाही. मानापमान झाला आणि मान किती झाला, अपमान किती झाला कांही बोलायचं नाही आणि दान किती केलं, बोलायचं नाही. मुकाटयानं. आम्ही कांही नाही 'आम्ही इतकं दान केलं' 'आम्ही इतकं हे केलं- ते केलं-' अगोदर पासूनच जाहिराती होतात. 'आमचं नांव देत असला तर दहा हजार रूपये देतो'- म्हणजे पहिल्या पासूनच सांगायचं.

तर इतक्या गोष्टी प्रगट करायच्या नाही, शास्त्रकारांनी सांगितलेले आहे, म्हणून महाराजांनी सांगितलं, ''हे तुम्ही प्रगट करू नका. अुगीच लोकांची उपाधी नको.'' म्हणून त्यांना ताकीद केल. **'तुम्ही आपलं कर्मानुष्ठान करीत रहा. देव भक्ती करीत रहा - तुमचं कल्याण होईल.'** आशीर्वाद त्यांनी दिलेला आहे. ते निघून गेले. ते स्थान अजून आहे. ज्या ठिकाणी कुलकर्ण्यांचा तो वाडा आहे अजून. ज्या वाड्यामधे तो वेल होता - उपटलेला आहे. त्या जागी आता पादुका नवीन बसवलेल्या आहेत लोकांनी. ते स्थान अद्यापी आहे.

तर इथं महाराज येऊन राहिले, बारा वर्ष पर्यंत आणि त्या क्षेत्रामधे महाराजांचा निवास झालेला आहे.

नृसिंहवाटिकाक्षेत्रे द्वादशाब्दान्वसन्सुधी: ॥
तत्र स्थित्वापि गंधर्वपुरमेत्यावसन्मठे ॥
(स्तोत्रादिसंग्रह, नक्षत्र मालिका-२५)

हे महाराजांनी वर्णन केलेलं आहे. नृसिंहवाटिका क्षेत्र जे सध्याचं आहे, पूर्वी ते अरण्य होतं. त्या स्थानामधे नरसिंह सरस्वती महाराज बारा वर्ष पर्यंत राहिलेले आहेत. त्या आणखी ब्राह्मणाचा एक उद्धार केला. त्याला संपत्ती देऊन टाकली. 'महाराजांनी दिली!' असं कसं म्हणायचं- असे चिकित्सा करायची अशी करतात- मंडळी 'त्यांनी कशावरून दिले हो'? 'त्यांनी काय त्याला सांगितलं होतं काय, तू हे मूळ काढून टाक - हे मी, मूळ, उपटून टाकलेलं आहे, म्हणजे तुला आणखी संपत्ती' अस कायं सांगितलं होतं काय? त्यांना तरी माहिती होत काय? एकेकाचा विचार करायला लागला म्हणजे कशी बुद्धी आणखी काय! आमच्या बुद्धीचे कसे तारे तुटतील कांही सांगता येत नाही, पण त्यांना माहिती असल्याशिवाय त्यांनी 'हे तोडलं कशा करता !' सांगितलं नसेल, पण वेल-वेलाचं मूळ कां उपटलं त्यांनी? त्यांना माहिती आहे - इथं आहे खाली. तुम्ही त्यांनी दिली किंवा त्यांनी उत्पन्न केली- इतक्या पर्यंत तुमची बुद्धी जाऊ शकणार नाही - देव वाटेल त्यांना उत्पन्न करू शकतो - देऊ शकतो, 'तिथे असलेला हंडा दिला'- एवढं तरी म्हणा की ! पण तेही म्हणायची तयारी नाही. 'त्यांना कसं कळलं असेल?' नवीन त्यांनी निर्माण करून दिला. 'ईश्वराचं सामर्थ्य' तिथं आहे ! ही खरी श्रद्धा आहे. पण नाही आहे. ती श्रद्धा आमच्या भाग्यामधे नाहीये. पण त्या ठिकाणचा हंडा तो यांना माहिती आहे - याना बिचाऱ्यांना माहिती नाही ! बिचारे अन्नान्न दशा झाली आहे. वेलचं तोडून टाकला म्हणजे आपोआप त्यांना मिळेल अशा बुद्धीनं असलेला हंडा त्यांना कळवून दिला 'त्या रूपानं दिला' असं तरी म्हणावं निदान -- हे सुद्धा कांही कमी सामर्थ्य नाहीये !

वेद - वेद वाङ्मय जे आपल्यामधे आहे, हे वेद वाङ्मय ईश्वरांनी निर्माण केलेलं आहे अशी एक श्रद्धा आहे. एक दर्शनकार 'ईश्वरापासून सगळी सृष्टी झाली. वेद ही ईश्वरांनीच निर्माण केले असं म्हणतात.' परंतु वेदाबद्दल इतकी मोठी श्रद्धा आपल्या भारतामध्ये आहे. **'वेद हे तत: प्रमाण आहेत.'** म्हणाले ईश्वराने वेद केले- ईश्वर सर्वज्ञ आहे, आणि त्यांनी वेद निर्माण केले, म्हणून वेद हे आणखी चांगले प्रमाण बोध आहेत असे नाही. **वेदांचं प्रामाण्य दुसऱ्यावर- ईश्वरावर सुद्धा अवलंबून नाही. ईश्वर हा कर्ता नसून ईश्वर उपदेश करणारा आहे,** अशी एक सुधारणा केली. शास्त्रकार जे सगळे, वेदाची श्रद्धा कायम आहे - ते स्वयंभू

आहेत – वेद. तद्प्रमाण आहेत. 'ईश्वरांनी सांगितलं' असं तरी म्हणा– हो सांगितलं ! जशीच्या तशी सृष्टी केली–

धाता यथापूर्वम् अकल्पयत् । (ऋग्वेद १०.१९०.३)

सूर्य, चंद्र पूर्वी होते तसेच या सृष्टीमधे ही पुन्हा तसेच तयार झाले. पाणी जसं पूर्वी होतं तसं या सृष्टीमधे ही थंड झालं. नवीन केलं म्हटल म्हणजे पूर्वीच्या कल्पामध्ये पूर्वीच्या सृष्टीमधे पाणी ऊन असायचं – या सृष्टीमधे पाणी थंड आहे. पूर्वीच्या सृष्टीमधे अग्नी कांहीतरी थंड होता – आता उष्ण केला असं म्हणायचं कां?

तर सध्याच्या काळामधे सध्याच्या बुद्धीवादाला प्राचीन कांहीही पसंत नाही. 'पूर्वीचं जे आहे, ते कांही आहे ते कांही बरोबर नाही !' म्हणतात– आता काय सांगावं? लोक चंद्रावर चाललेले आहेत. अमूक केलेलं आहे. तमूक केलेलं आहे, कांही पूर्वीच जुनं कांही नाही– कांही पसंत नाही. सगळं नवीन आहे – तो शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवित असतो. की 'सगळं ही ज्ञान उत्तरोत्तर वाढत चाललेलं आहे,' 'कोणच्याही ज्ञानावर तुम्ही विश्वास ठेऊ नका!'– – 'जास्तीत जास्त ज्ञान पुढं होत चाललेलं आहे – म्हणजे मी तुम्हाला जे सांगतो, माझ्या ज्ञानावरही विश्वास ठेऊ नका!' असं सांगितल्या सारखंच झालं. बुद्धिवान विद्यार्थी तसं समजून घेईल, अशी स्थिती सध्याची झालेली आहे.

तर हे जे कांही प्रामाण्य आहे वेदांचं, ईश्वरानी उपदेश करीत – ईश्वर आहे, पण त्यातही त्याचही सर्वज्ञत्व आहे ना ! केवढं वेदवाड़मय आहे? त्या संपूर्ण वेद वाड़मय जसाच्या तसं ब्रह्मदेवाला ज्यांनी दिलं 'पूर्वी जसं होतं – त्यात कांहीही कमी जास्त नाहीये. किती छापखाने निघाले !' विस्तार चाललेला आहे, आणि प्रत्येक ठिकाणी मुद्रणाच्या वेळेला, मुद्रणदोष प्रत्येक वेळेला होतच असतो. कांहीही कोणताही प्रकार तुम्ही घ्या – अगदी शुद्ध लिहून आणखी छापलं, आणखी नुसतं फोटो काढले, तरी सुद्धा त्यात चुका रहातात – येतात दुकानात– आणखी संपूर्ण इतके अनंत मंत्र जे आहेत – ते जसेच्या तसे आणखी यत्किंचित सुद्धा त्यात बदल नाही. हा जसाच्या तसा उपदेश ज्यांनी केलेला आहे, त्यांच ज्ञान किती आहे? कर्तृत्व मानलं पाहिजे असं नाहीये. वेदवाङ्मयाचं संशोधन करताना त्यांचा कर्ता अमुक ऋषी आहे– तमुक ऋषी आहे– कांही मंत्राचे कर्ते अमुक आहेत – हे असं मानण्याची आवश्यकता नाहीये. त्यांच जे दिव्य ज्ञान आहे, त्या दिव्यज्ञानामुळे जसंच्या तसं वेद वाङ्मय त्यांनी ईश्वराने निर्माण केलेले आहे, हा सिद्धांत आणखी मीमांसाकार सांगताहेत– श्रुतीचं प्रामाण्यही आहे. ईश्वराबद्दलही पूर्ण श्रद्धा आहे. हे दोन्ही त्यांनी सुरक्षित ठेवलं आहे.

–– तर याप्रमाणे ब्राह्मणाची व्यवस्था झालेली आहे. त्यांची आणखी इच्छा म्हणा–सात्त्विक वृत्ती सगळं पाहून, त्याला ते देऊन टाकलेलं आहे आणि तो आनंदामधे ब्राह्मण रहातो आहे.

गांवातली मंडळी आणखी सारखी परीक्षा करण्याचा प्रयत्न करताहेत – पण त्यांना कुणालाही दर्शन नाही– त्यांच्या कुणाच्याही घरी जाणं नाही. कांही नाही ! आणि चमत्कार असा झालेला आहे की, एक शेतकरी त्या ठिकाणी आपल्या शेतात काम करीत होता– 'गंगानुज' असं म्हणतात नांव. आणि तो शेतकरी त्या नदीकडं पहायला लागलेला असताना, महाराज त्या ठिकाणी आलेले आहेत. आणि सगळ्या योगिनी, अशा सगळ्या सुंदर स्त्रिया, कन्या, त्या योगिनी, त्या महाराजांना घेऊन आलेल्या आहेत. अन् सगळी मंडळी नदीमधे गेली, पाण्यामधे. हे त्याने पाहिलं. आदले दिवशी पाहिलं. आश्चर्य वाटलं त्याला ! स्वामी महाराज तर तिथं झाडाखाली रहातात म्हणाले– हा पहात होता. एखादे दिवशी जातही असेल दर्शनाला आणि यांना घेवून त्या कुठल्या कन्या –– काय म्हणाले – त्या सगळ्या स्त्रिया आणखी नदीमधे गेल्या. काय आहे तिथे ? दुसरे दिवशी पुन्हा तिथंच तो बसून राहीला. दुसरे दिवशी सुद्धा त्याला ते दिसलं. तो ही त्यांच्याबरोबर आंत गेला. नदी दुभंग झाल पाणी–आंत गेलेला आहे. आंत मोठा प्रासाद आहे. सगळी व्यवस्था आहे. सगळी जेवणा–खाण्याची व्यवस्था आहे. सिंहासनावरती महाराजांना त्यांनी बसवलेलं आहे. आणखी पूजा वगैरे केली. आणखी उत्तम भिक्षा त्यांना दिलेली आहे. भोजन झालेलं आहे. सगळ्यांनी नमस्कार केला. या गंगानुजानही नमस्कार केला. महाराजांनी त्याच्याकडं पाहीलं, 'कां रे !' म्हणाले – 'इथं कशाला आलास तू ?'– नाही म्हणाला – 'महाराज आपल्या दर्शनाकरता आलेलो आहे.' 'हे 'म्हणाले' ! आधी इथं काय घडलेलं आहे, हे कोणालाही, सांगायचं नाही. सांगितल्याबरोबर तुला मृत्यु येईल' म्हणाले. 'बरंय ! कांही हरकत नाही. मला दर्शन झालं पुष्कळ झालं म्हणाला. मग तो मोठा भक्त बनलेला आहे– महाराजांचा.

पाण्यामधे कसे गेले? पाण्यामध्ये वाडा कसा असू शकतो. पाण्यामधे सगळी व्यवस्था कशी असेल? नाकातोंडात पाणी जाणार नाही ?–– हे सगळं खरं आहे. परंतु शास्त्र दृष्टीनं ही पुष्कळ – शास्त्राची प्रगती ही पुर्वी सुद्धा झालेली होती. दुर्वास ऋषींनी आणखी दुर्योधनाला जलस्तंभन विद्या शिकविली होती. शेवटच्या अठराव्या दिवशी सगळं सैन्य मारलं गेलं– सगळे सेनापती मारले गेले दुर्योधनाचा शोध सुरू झाला. कुठाय दुर्योधन? त्याला एकदा मारायचा म्हणजे संपलं सगळं. पांडव शोध करताहेत. हा दमला होता– पण दुर्वास ऋषींनी त्याला विद्या दिल्यामुळे एका मोठ्या तलावामधे आंत जाऊन तो स्वस्थ झोपलेला होता. पाणी जरी असलं, तरी ते पाणी त्या मंत्रप्रभावाने कसं दूर करावं, बाजूला करावं– मधे आपल्याला विश्रांती कशी घेता येईल, ते सगळं त्याच्या मधे आहे. हे सगळं शास्त्र आहे ना ! त्या शास्त्रदृष्टीनं हा कांही चमत्कार नाहीये. ते शास्त्र, आणखी मंत्र म्हणा किंवा त्याचा प्रयोग ज्यांनी केलेला आहे त्यांना ते सिद्ध होऊ शकतं. तर अशा दृष्टीनं महाराज गेले असतील ! चमत्कार म्हणण्याचं काय

जरूर आहे ? चमत्कार म्हटलं की, 'आम्हाला पसंत नाही. आम्हाला पटत नाही'– हे आलंच त्याच्या पाठीमागे. कधी दिसत नाही आम्हाला, म्हणून पटत नाही. दिसण्याची योग्यता पाहिजे. त्या शेतकऱ्याला दिसलं ते. त्याची बुद्धी आणखी सश्रद्ध आहे. त्याला दिसलेलं आहे, त्याच्यावर कृपा झाली महाराजांची – मग आणखी दुसरे दिवशी तो गेला. 'जा' म्हणाले, 'तुला संपत्ती मिळेल' तो गेला शेतामधे– सहज त्याला आणखी जमीन खणायला लागले असता त्यालाही धन मिळालेलं आहे. आनंदामधे राहिलेला आहे तो.

रोज त्याने आणखी यावं – महाराजांच्या दर्शना करता– अलिकडच्या तीरावरती– आणखी रहावं. बसावं. तिथं गोष्टी बोलाव्यात. एकदा तो म्हणाला– 'महाराज!' काशी–प्रयाग–गया वगैरे हे त्रिस्थळी यात्रा करावी म्हणून सांगतात. कुठं आहे त्रिस्थळी ? महाराज म्हणाले, 'तुला पहायची इच्छा आहे कां ? जाऊ या !' म्हणाले आपण. आपण बसले होते मृगाजिनावरती. 'घट्ट धर' म्हणाले 'डोळे झांक' म्हणाले. मग आले – तो प्रयाग कोल्हापूरच्या जवळ आहे. संगम आहे – नद्यांचा संगम आहे– पंचगंगा वगैरे. तिथे स्नान करायला सांगितलं. दुपारी काशीक्षेत्र म्हणजे हे कोल्हापुर हे काशीक्षेत्रच म्हणतात, तिथं ही पंचगंगा नदी आहे. तिथून आणखी जुगुळ म्हणून एक गांव आहे – त्या गांवामधे म्हणजे गया स्थान ते आहे म्हणाले– तिथं ही स्नान केलं. संध्याकाळी परत आले 'त्रिस्थळी यात्रा तुझी झाली' म्हणाले. तीन ठिकाणी आंघोळ करून तो आला.

आता हा अनुभव घेऊन जो आलेला आहे, त्याने जर अनुभव आपला सांगायला सुरूवात केला तरी कसं आम्हाला पटणार? –– हा खोटं सांगतो आहे –– नुसती भावना आहे, 'नुसत्या भावनेनं कसलं स्नान करून आलो म्हणाला.' अमक्या गांवाला गेलो – त्या गांवाला गेलो– इतक्या तीन गांवाला जाऊन यायला सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत, शक्य आहे काय? तो सांगतो आहे, कसा गेलो – काय गेलो मला माहित नाही– 'महाराजांनी मला नेऊन आणलं.' ही श्रद्धादान सुद्धा त्याच्या पुरतच आहे. चिकित्सा करणाऱ्यांना श्रद्धा भावना मिळणार नाही. चिकित्सेनं श्रद्धा उत्पन्न होते – वाढते म्हणतात. नाहीये– अशक्य आहे. **श्रद्धा सुद्धा त्या परमेश्वराचंच देणं आहे**, ईश्वरानं दिली तर श्रद्धा उत्पन्न होते, साधना मार्गामध्ये प्रवेश झालेला आहे. आणि नंतर त्या श्रद्धेनं साधना अनुष्ठान जर घडेल– तर पुढं त्याप्रमाणे त्याची योग्यता वाढत जाईल.

आणखी औदुंबराखाली रहात होते महाराज. औदुंबर वृक्षाचेही माहात्म्य सिद्धांनी सांगितलं की, पूर्वी नरसिंह अवतारामधे हिरण्यकश्यपूचं पोट फाडलं नरसिंहांनी– त्याची आंतडी काढली. तो विषारी सबंध दैत्य, सबंध विष त्या दैत्याच्या शरीरामध्ये, त्यांना अतिशय दाह व्हायला

लागला. नखं तापून गेलेली आहेत. मग लक्ष्मीदेवींनी ही औदुंबराची फळं आणली म्हणे. त्या फळामधे नखं रोवली त्यांनी – मग शांत झाले आहेत. विष शांत करण्याचं सामर्थ्य औदुंबरामधे आहे म्हणतात. दृष्टफल आहे, आयुर्वेदशास्त्राच्या दृष्टीने. अदृष्टफल फार मोठ आहे.

औदुंबराखालीच महाराजांचा मुक्काम आहे आणि त्या ठिकाणी अनेक चौसष्ठ योगिनी माता ज्या आहेत, अमरेश्वर – अमरापूर क्षेत्रामधे अमरेश्वराचं शिवलिंग आहे त्या ठिकाणी. त्या ठिकाणी चौसष्ठ योगिनी रहाताहेत. आणखी महाराज इकडं राहिलेले आहेत. त्यांचा त्यांचा समागम म्हणा – किंवा हे चाललेलं आहे. लोकांना कळायची जरूरी काय! 'योगिनी आमची पूजा करताहेत' म्हणून महाराजांना काय जाहिरात करायची नव्हती किंवा त्या योगिनींनाही सांगायचं नव्हतं– फक्त आणखी 'प्रत्यक्ष परमात्मा दत्तात्रेय आणखी या रूपाने इथे रहाताहेत आपल्याजवळ– त्यांची सेवा जितकी घडेल तितकी आपण करून घ्यावी' – अशी भावना त्या योगिनींची, मोठ्या योगिनी. योग सामर्थ्य मोठं आहे त्यांचं.

तर महाराजांनी असा विचार केला, की 'आपण इथून निघावं आता' –– गाणगापूर क्षेत्रामधे जाण्याचा त्यांचा संकल्प झालेला आहे. निघाले – त्या सगळ्या योगिनी आल्या– 'महाराज ! आपण निघाला आता – आजपर्यंत आपण बारा वर्ष इथे राहिलात– किती समाधान– आनंद – सुखामधे आम्ही होतो. आता आपण गेल्यानंतर आमची स्थिती काय होईल?' महाराजांनी सांगितलं– म्हणाले, 'इथंच, अन्नपूर्णेला मी ठेवणार आहे. सगळी अन्नपूर्णा या ठिकाणी राहील – पुष्कळ लोक येतील. आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी – सर्व प्रकारचे ज्ञानी सुद्धा– सगळेही आणखी या ठिकाणी जीवात्मे येतील. आणखी या ठिकाणी स्वतःच्या पादुका या ठिकाणी ठेवतो'– म्हणून त्यांनी सांगितले.

'मनोहर पादुका' – असं त्या नरसोबावाडी क्षेत्रामधे ज्या पादुका स्थापन केलेल्या आहेत, त्यांचं नांव **'मनोहर पादुका'** म्हणून आहे– गाणगापूर क्षेत्रामधे ज्या पादुका ठेवलेल्या आहेत– – गाणगापूरातल्या पादुका स्थिर नाहीत – चल आहेत. अुचलून ठेवता येतात– अुचलून घेता येतात. नरसोबावाडी क्षेत्रामधे असलेल्या **'मनोहर पादुका'** मात्र आणखी स्थिर आहेत. एका ठिकाणी आहेत. पुष्कळ पांचशे वर्ष होऊन गेलेली आहेत, आणि त्या ठिकाणी महाराजांच्या आणखी संकल्पाप्रमाणे हजारो लोक येताहेत – जाताहेत– चाललेलं आहे. पिशाच्च पीडा झालेले काय – रोगपीडा झालेले काय – अनेक प्रकारच्या संकटांनी आर्त झालेले लोक येताहेत– संकटातून मुक्त होताहेत. जिज्ञासू आहेत– अर्थार्थी आहेत– 'हे पाहिजे– ते पाहिजे' सगळ्या इच्छा धारण करणारे, ते महाराजांची सेवा करताहेत, गुरूचरित्र वाचन करताहेत. प्रदक्षिणा घालताहेत – महाराजांना, औदुंबर वृक्षाला आणि त्यामुळे त्यांची सगळी कार्ये पूर्ण होताहेत – असं कार्य अद्यापी चालू आहे, त्या ठिकाणी.

सगळ्याही योगिनींना महाराजांनी आश्वासन दिलेलं आहे, 'आणि तिथून मग भगवान, गाणगापूर क्षेत्रामधे जाऊन राहीले.' असा उल्लेख आहे. 'बारा वर्षानंतर गाणगापुरामधे त्यांचं वास्तव्य झाले म्हणजे नरसोबावाडी क्षेत्रात नाहीत'– म्हणायचं काय !– आम्ही तसंच म्हणणार ! इथून कोणीतरी मनुष्य बार्शीहून मुंबईला गेला म्हणजे बार्शीत नाही असं सिद्धच आहे की – सहजच आहे. इथे नाहीये – तो, मुंबईला गेलेला आहे. तसं महाराज नरसोबावाडीतून गाणगापूरामधे गेले म्हणजे नरसोबावाडीला नाहीत असंच कोणीही म्हणणार –– पण त्यांची शक्ती किंवा त्यांचं खरं स्वरूप ज्यांनी ओळखलेलं आहे असे महात्मे सांगताहेत –

नृसिंहवाटिकाक्षेत्रे द्वादशाब्दान्वसन्सुधी: ।

बारा वर्ष नरसोबावाडीच्या क्षेत्रामधे महाराज राहिले आणि गाणगापूरामधे गेले, कसे –

तत्र स्थित्वापि गंधर्वपुरमेत्यावसन्मठे ॥ (नक्षत्रमालिका स्तोत्र–२५)

वाडीतून गेले नाहीत म्हणाले – वाडीतच राहिले, 'आणि पुन्हा गाणगापूरामधे येऊन राहिले'– परस्पर विसंगती, बुद्धिवादी लोक दाखवितात. वाडीतही राहिले– गाणगापूरामधेही राहिले– 'हो' राहिलेले आहेत, कसे राहिले– काय राहीले––? हे आणखी कळणार नाही आपल्याला. 'परमात्मा दूर ही आहे आणि तो अंकीत ही आहे'– उपनिषदामधे सांगितले 'दूर आहे परमेश्वर आणि जवळही आहे' हे काय म्हणाले– 'काय उपनिषद म्हणजे काय, लांब ही आहे देव आणि जवळही आहे' हे कसलं उपनिषद वाङ्मय आहे?––'हो आहे'–

म्हणोनि थोरपण पन्हां सांडिजे । एथ व्युत्पत्ति आघवी विसरिजे ।
जैं जगा धाकुटें होइजे । तैं जवळीक माझी ॥ (ज्ञाने. ९.३७८)

ईश्वर जवळ आहे– कोणाच्या जवळ आहे? अगदी श्रीमान किंवा विद्वान वगैरे यांच्या जवळ नाहीये. थोरपण सगळं ज्यांनी विसरलेलं आहे, आपला 'मी मोठा नाही, मी लहान आहे– अत्यंत आणखी कमी आहे'– दीन आहे!

दैन्यं तत्रोक्त कारणम् ।

आपण दीन आहोत–देवा माझ्याजवळ कांही नाही. विद्या नाही– बुद्धी नाही – संपत्ती नाही – कांही नाही–– आपण किती मोठे आहात! ही जीव भावना–जगामधे आणखी लहानपणाने वागणारा जो आहे– त्याला देव जवळ आहे, अंकीत याचा अर्थ हा आहे. दूर आहे, दूर आहे म्हणजे जो आपलाच मोठेपणा जगामध्ये दाखविणारा– माझ्यापेक्षा मोठा कोणी नाही–

असौ मया हत: शत्रुर्हनिष्ये चापरानपि ।
ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी । (भ.गी.१६.१४)

हे जे वर्णन भगवंतांनी केलेलं आहे, या भूमिकेतून स्वतःचाच मोठेपणा जगापुढं मांडणारा जो आहे– त्याला ईश्वर दूर आहे. हा त्याचा अर्थ आहे. त्याची संगती अशी लावली पाहिजे. ती संगती समजून घेण्याकरता म्हणून असे जे ज्ञानी महात्मे, त्यांच्या जवळ जाऊन त्यांची सेवा केली पाहिजे. म्हणजे त्याचा अर्थ खरा त्याला कळून येतो. नुसतं आणखी कोष काढून त्याचा तो अर्थ पाहून आणखी अर्थ लावायला लागल्यानंतर, ते वाङ्मय चुकीचच आहे अशी भावना करून त्या वाङ्मयापासून तो बाजूलाच राहतो – त्याची बुद्धी तिथं राहणार नाही.

नरसिंहवाडी, क्षेत्रामधे राहून सुद्धा आणखी महाराज गंधर्वपुरामधे म्हणजे गाणगापुरामधे येऊन राहिले. असं आणखी ज्यांचं त्यांना दर्शन झालेलं आहे – ते सांगताहेत. आता वाडी क्षेत्र, त्यावेळेला अरण्य आहे – बारा वर्ष राहिले महाराज आणि गाणगापुरामधे गेले . काय– पुन्हा असं–– वाडी क्षेत्र इतकं प्रसिद्ध झालं कसं? म्हणाले– ते असेपर्यंत त्यांची इच्छा नाही– त्या ब्राह्मणाला धन मिळालं. त्याला सांगितलं 'हे कुणालाही सांगायचं नाही– संपत्ती जाईल'– त्या गंगानुजाला सांगितलं– 'हे प्रगट करशील तर तू मरशील!' त्या दोघांना समजलं होत. मग आता काय ! कोण सांगणार कोण? सांगितलं नाही– ते असेपर्यंत कांही प्रगट झालेलं नाही. मग एकदम इतकं क्षेत्र माहात्म्य वाढलं कसं? या करता महाराज अदृश्य झाले म्हणा– अदृश्य रूपाने तिथे रहायला लागले. आत्तापर्यंत दृश्य रूपामधे होते. आता अदृश्य रूपामधे रहायला लागले. त्यानंतर घडलेला एक कथाभाग सांगताहेत––

शिरोळ गांवातली कथा आहे. शिरोळ गांवामधे आणखी ब्राह्मण एक रहात होता. गरीब आहे. त्याची स्त्री आहे. अत्यंत दारिद्र्य घरामधे आहे. त्या ब्राह्मण स्त्रीला पांच मुलं झाली. आणि ती पांचही मुलं गेली. एक ही मुलगा जिवंत राहिलेला नाही. 'काय हे? असं कां होतं?' म्हणाले –

याच्याबद्दल विचारणा करण्याकरता, शास्त्रज्ञ जे पुरूष आहेत– ज्योतिषशास्त्र हे जे जसं आहे – या जन्मामधे काय काय घटना पुढं होणाऱ्या आहेत, हे ही ज्ञान ज्योतिषशास्त्रामधे मिळतं. पूर्वी काय काय घडलं आहे, ते ही ज्योतिषशास्त्रज्ञ सांगू शकतात. व्यवस्थित जर त्यांना आणखी आधारभूत अशा प्रकारचं त्यांचं जन्मकाळ वगैरे व्यवस्थित जर कळला तर तो ही पाहून सांगू शकतात. तो कळला नाही तरी सुद्धा आणखी तशी कुंडली निघू शकते अशा प्रकारचे हे आहे. तर त्या ज्योतिषशास्त्रावरून या जीवनामधे, इह ऐहिक – याच्या मधे काय काय होणार आहे? सुखदुःखाचे प्रसंग काय आहेत ! एवढं फक्त ज्ञान होतं. आता ते काय सुखदुःखाचे प्रसंग का येतात, याच ज्ञान करून देणारं दुसरं शास्त्र आहे. **'कर्मविपाक शास्त्र'**

म्हणून जे आहे – 'कोणच्या कोणच्या कर्मांनी आणि कोणतं कोणतं आणखी फळ मिळतं' 'काय दुःख, कोणचे रोग कोणच्या कर्मानी होतात' –– हे सगळं त्यात सांगितलं आहे.

'गणद्रव्य चोरी करी । गंडमाळा होती तया' म्हणून ते कर्मविपाक शास्त्रामधे महाराजांनी सांगितले आहे. सामुदायिक द्रव्य जे आहे, त्या द्रव्यातला जर भाग चोरीला गेला– चोरी केला गेला तर त्याला दुसऱ्या जन्मामधे 'गंडमाळा' रोग होतो. ते पूर्वीच्या पापाचं फळ म्हणून सांगितलं– हे आहे – कुणाच्या लक्षात रहातं का? विश्वस्त व्हायचं– ट्रस्टी व्हायचं म्हणजे किती कठीण आहे ? हे विश्वस्त यांचा अर्थ 'सांभाळायचं– वाढवायचं' फक्त – 'स्वतः करता त्याचा उपयोग नाहीये'– अशी प्रत्येक पातकं अन् त्या पातकांची फळं सांगितली आहेत. कोणच्या कोणच्या द्रव्याची चोरी केली असताना कोणतं कोणतं आणखी फळ मिळतं हे सगळं शास्त्रकारांनी सांगून ठेवलं आहे– आणि हे शिकवावं म्हणून सांगितलं आहे. लहान मुलगा जो आपला आहे, मुंज झाल्याबरोबर, किंवा त्याला विद्याभ्यास ग्रहण करायला लागल्या पासून त्याला सगळही शास्त्रांनी सांगितलेलं समजून सांगावं– 'आचार कसा ठेवला पाहिजे?' धर्माचा एक विभाग आहे आचार म्हणजे, तेव्हा आचार हा शिकवायला पाहिजे आणि त्या आचाराची व्यवस्था करणं हे ही अवताराचं कार्य आहे. – तर आचार कसा कसा ठेवावा? काय काय करावं?

एका ब्राह्मणाला ज्योतिष्य येत होतं– उत्तम ज्योतिष्य येत होत. त्याला एक मुलगा झाला म्हणाले– त्यांनी ती मुलाची कुंडली पाहिली. 'हा मुलगा विसाव्या वर्षी चोरी करणार आहे.' 'अमुक दिवशी', हे त्यांना कळलं. 'हरकत नाही' म्हणाले. 'विसाव्या वर्षापर्यंत आपण त्याला बरच शिकवून तयार करू. याची बुद्धी बदलली तर पाहू !' म्हणाले– म्हणून त्यांनी सगळं धर्मशास्त्र त्याला शिकवलं– सोन्याची चोरी केली म्हणजे काय होतं! चांदीची चोरी केली म्हणजे काय होतं! रत्नाची चोरी केली म्हणजे काय फळ मिळतं !

सगळं त्यांनी, त्याला आणखी शिकवलं. तो मुलगा आणखी उत्तम तयार झाला. अठरा एकोणीस वर्षे गेली. विसावं वर्ष त्याला लागलेलं आहे, अन् तो दिवस जवळ आला. या ब्राह्मणाला कळले आहे, की, उद्या चोरी करणार आहे. त्या ब्राह्मणाला राजवाड्यामधे रोज जाऊन पूजाअर्चा वगैरे करून येत होता. राजाचा आश्रय होता. त्या ब्राह्मणाने, तो त्या दिवशी राहिला नाही. आदले दिवशी दुसऱ्या गांवाला निघून गेला आणि त्या मुलाला सांगितलं की, 'उद्या तू जाऊन तेवढी राजवाड्यामधे पूजाबिजा करून ये, महाराजांना तीर्थ देऊन ये'.

'बराय !' याचा तो दिवस आला बरोबर. एकोणीस वर्षं त्याची ती बुद्धी कांही चोरी करण्याकडे गेली नाही. त्याला मात्र 'त्या दिवशी चोरी करणार आहे' हे यानी ओळखलेलं आहे. पण त्याला सगळं शिक्षण दिऊन ठेवल होतं. संस्कार बुद्धी मधे संस्कार करण्याचा प्रयत्न–

त्याचा काय उपयोग होतो-- नाही तर चोरी करणारच आहे बाबा. आता आपल्या हातून कांही होणार नाही ! काय करायचं याला शिकवून तरी काय होईल ! असं नाही. प्रयत्न केला पाहिजे. शास्त्राप्रमाणे त्याच्यापुढे योग्य अयोग्य किती काय सगळं ठेवलेले आहे त्यांनी. प्रयत्न केलेला आहे, कर्तव्य केलेलं आहे.

हा मुलगा गेला दुसरे दिवशी राजवाड्यामधे-आता हा विश्वासू, रोज येणारा आहे. सोन्याची भांडी काय! सोन्याचे दागिने, पुष्कळ देवाच्या अंगावर ते सगळे होते. आणि त्याला ती वासना निर्माण झाली. 'कांही तरी यातलं घेऊन जायला पाहिजे'- म्हणाला. समोर पदार्थ पडलेले आहेत. **'मनाच्या वासनांचा निग्रह करणं'- हे फार कठीण आहे. कनक आणखी कांता यांच्याबद्दल सर्वांच्याही अंतःकरणामधे वासना आहेत.**

वेधा द्रेधा भ्रमं चक्रे कान्तासु कनकेषु च ।
तासु तेष्वप्यनासक्तः साक्षाद्भर्गो नराकृतिः । (रुपकालंकारः)

ज्याला मोह उत्पन्न होत नाही, तो साक्षात शंकर परमात्मा आहे की, त्याच्या चित्तामधे कनक आणि कांता यांच्या बद्दल मोह कधीही निर्माण होत नाही. तो साक्षात शंकर आहे. **त्याला नमस्कार केला असताना शंकर दर्शनाचं पुण्य मिळतं.**

पूजा, वगैरे आटोपलेली आहे. घरी जायला निघाल्या नंतर सगळे पदार्थ जे चांदीची भांडी आहेत, सोन्याचे दागिने आहेत, कपडे उत्तमोत्तम सगळे पडलेले आहेत-- सोन्याचा दागिना घ्यावां असं त्याला वाटलं. परंतु 'सुवर्णस्तेय जे आहे फार महापाप आहे.'! म्हणाला तो. सुवर्ण चोरणं हे महापाप आहे. पंचमहापापापैकी सुवर्ण स्तेय हे - हे घातलेलं आहे. मद्यपान त्याचप्रमाणे ब्रम्हहत्या, सुरापान, सुवर्ण स्तेय आहे. अशी सगळी पातकं त्याला बापाने सगळं शिकवलं होतं. हे 'चोरी केली म्हणजे आणखी हे दुःख मिळणार आहे'-- प्रत्येक त्याला आणखी, अभ्यास केला होता- ते प्रत्येक आठवायला लागलं-- नको म्हणाला. 'ही चोरी नको, दागिने नको'- वस्त्र नको, कांही नको. भांडं घ्यायचं नाही.' शेवटी निघता निघता, तिथ साळी कांडल्या होत्या - म्हणे, आणि त्याचा आणखी कोंडा बाहेर टाकला होता. आता चोरीची वासना झालेली आहे. कांहीतरी घ्यायला पाहिजे. प्रत्येक वस्तू घ्यायला लागला. लगेच त्याला ते आठवलं 'बापानी असं सुचवलं - त्याच फळ हे मिळेल' - कोंड्याजवळ गेल्यानंतर मात्र त्याने विचार केला. 'याच्यात कांही दोष नाही' म्हणाले- 'कोंडा जर घेतला तर हे पाप नाहीये- याचं फळ कांही बापाने शिकविलं नाही'- पिशवीमधे तो कोंडा भरून घेतला आणि घरी आला. इतक्यात बाप संध्याकाळी आलेला - पोहोचलेला आहे. 'काय रे ?' म्हणाले- 'पूजा करून आलास का?' 'होय' म्हणाला. त्याची बुद्धी

निवळलेली आहे, तेवढ्या पुरती ती वासना–पापवासना भोगानी आलेली आहे. त्याला कर्म करायला लावलं, परंतु इतकी पापं त्याची आणखी वाचली.

चांगली बुद्धी आणखी चांगल्या योग्यतेला आल्याबरोबर त्याला शुचिता म्हणजे काय? आचार कोणचे आहेत? हे सगळं त्याला शिकवावं म्हणतात ! हे सगळे, हे आणखी संस्कार आपल्या बालकाच्या बुद्धीवर करण्याचा प्रयत्न सगळ्यांनी, पालकांनी केला पाहिजे – ही शास्त्रांची आज्ञा आहे.

शाळेमधे मुलं गेली म्हणजे संस्कार होतात असं नाहीये. हे संस्कार कोण शिकवणार? 'अमुक चोरी करू नये' 'अमुक हे करू नये' वगैरे हे कोण सांगणार आहे ? किती विषय आहेत, किती वह्या असतात ! ती बिचारी, ते ओझे घेऊन जायला रस्त्याने जाताना ती मुलं बघितली बिचारी – सायकलवर बसलेली असतात, पाठीला ते मोठ्ठं एवढं गाठोडं पुस्तकांचं, वह्यांचं घेतलेलं असतं. कसे जात असतात बिचारे कष्टांनी. पाहिलं म्हणजे अगदी वाईट वाटतं. हे कुठलं शिक्षण?

म्हणून आपल्या मुलांवरती संस्कार, बुद्धीवरचे चांगले झाले पाहिजेत. **लहानपणापासून चांगले संस्कार जर झाले तर त्याचा उपयोग असा होऊ शकतो.**

तेव्हा ती बाई– पांच मुलं गेलेली आहेत. मग गेली. विद्वान ब्राह्मणाच्याकडं जाऊन तिनं सांगितलं– 'महाराज माझी पांचही मुलं गेली !' म्हणाली, 'काय दोष काय आहे?' कांही दृष्टदोष दिसत नाही– काय कुणी मुलं मारली म्हणावं– तसं ही दिसत नाहिये ! मुलांना कोण मारेल ? काय कुणी इतके कांही निर्दयी माणसं नाहीयेत – अन् कशा करता मारायचे? यांनी काय कुणाचा अपराध केला? पण गेली कशी मुलं? काय दोष आहे? –– त्यांनी सगळं कर्मविपाक शास्त्र सगळं पाहिलेलं आहे. अभ्यास केलेली मंडळी ती होती– आणि त्या बाईला त्यांनी सांगितलं, 'पूर्वीच्या जन्मामधे एका ब्राह्मणाकडून तू शंभर रुपये कर्ज घेतलं होतस.' म्हणाले – 'ते कर्ज त्याला तू परत दिलेलं नाहीस – वारंवार तो ब्राह्मण मागत होता. लोभी होता मोठा. आणि शेवटी असं केलं, पैसा मिळत नाही– ही बाई देत नाही म्हणून त्याने आत्महत्या केली आणि तो पिशाच्च झालेला आहे, अन् तो तुझी मुलं मारतो आहे'––

हा मागचा खुलासा झाला. आरोप काय आहे! अपराध काय आहे! तो समजला. पण याच्यातून मुक्तता कशी व्हायची, हे ही शास्त्रकार सांगतात– 'हा दोष झालेला आहे– तो ब्राह्मण मरून गेला. पिशाच्च झालेला आहे, म्हणाले. त्याची क्रिया–कर्मांतर ही झालेले नाही. तेव्हा त्याच्यावर योग्य उपचार करून त्याला सद्गती मिळावी याकरता त्याचं सगळं और्ध्वदेहिक तुझ्या पतीला करायला सांग, म्हणजे त्याला गती मिळेल आणि त्याच्या नांवाने त्याच्या गोत्रातला कुणी

ब्राह्मण असेल त्याला शंभर रूपये तू देऊन टाक, म्हणजे झालं' म्हणाले– मग तुझी मुलं वाचतील. आता कुठले शंभर रूपये ! –– कुठले शंभर रूपये द्यायचे? हिच्याजवळ तर घरामधे गरिबी आहे– पैसा नाही– कांही नाही –– ते डोक्यावर ऋण कायम.

'मनोहर पादुका' रूपाने 'महाराज भगवान दत्तात्रेय पादुका रूपाने त्या ठिकाणी त्यांचा निवास आहे– तिथं जाऊन तू त्यांची पूजा कर– प्रदक्षिणा घाल' म्हणाले– आणखी 'त्यांची प्रार्थना कर. त्यांच्या कृपेने हा दोष तुझा सहज दूर होईल.' ––

भगवंताच्या कृपेनंही सर्व पातकांचा नाश होतोय – भगवद्भक्तीनं. **धर्मशास्त्राप्रमाणे जरी पापं घडलेली असली, तरी, सर्वही पातकांचा नाश भगवद्भक्तीनं होऊ शकतो.**

केचित्केवलया भक्त्या वासुदेवपरायणा: ।
अघं धुन्वन्ति कात्स्न्र्येन नीहारमिव भास्कर: ॥ (भा.६–१–१५)

हा सिद्धांत आणखी शुकाचार्य महाराजांनी मुद्याम सांगितलेला आहे. केवळ भगवंताची भक्ती करायची आहे. त्या भक्तीनं सगळी सुधारणा होती. सगळी पातकं नष्ट होऊ शकतील.

तेव्हा त्या विद्वान ब्राह्मणांनी त्या बाईला सांगितलं की 'जा – तिथं जा. दोन तीन मैल आहे. शिरोळपासून नरसोबावाडी–तिथं रोज जात जा' म्हणाले– 'स्नान करत जा– महाराजांच्या पादुकांना पाणी घालावं– पूजा करावी– आरती करावी– प्रदक्षिणा घालाव्या – १०८ म्हणा– जास्ती झालं तर जास्ती घालाव्यात – हे तू कर सुरू– देवावरती आणखी गाऱ्हाणं घाल. देवाच्या समोर जाऊन. सर्व भार देवावर टाक – 'माझा आता उद्धार तुम्हीच करणार ! दुसरा कोणी नाहीये' 'अशी प्रार्थना तू कर म्हणजे त्या दोषातून तू मुक्त होशील' असं सांगितलं.

'बरं आहे !' म्हणाली– जेवढं मला शक्य आहे– शरीराने जेवढं करता येईल तेवढं मी करू शकेन. प्रत्यक्ष पैसा माझ्याजवळ नाही. रोज ती बाई जाते आहे. कृष्णानदी मधे स्नान करून पाणी घालावं – पादुकांना पूजा करावी, प्रदक्षिणा घालाव्या– **नामस्मरण भगवंताचं 'दिगंबरा दिगंबरा' करावं. आणखी यावं.**

असे कांही दिवस गेल्यानंतर एके दिवशी तिला स्वप्न पडलेलं आहे. औदुंबर वृक्षाखाली महाराज बसलेले आहेत आणि एका बाजूला तो पिशाच्च झालेला ब्राह्मण– अंगावर धावून आलेला आहे– 'तुला मुलगा पाहिजे काय !' म्हणाले. 'माझे पैसे' म्हणाले तू दिलेले नाहीत– मी पिशाच्च झालो. तुझी सगळी मुलं मारली, तसं तुला ही आता मी ठार मारणार आहे !' म्हणून तो धावून आला–– घाबरली ही बाई ! महाराज बसले होते त्यांच्या पाठीमागे जाऊन उभी राहिली. तो कांही पुढं येऊ शकत नाही. महाराजांनी विचारलं– 'काय रे !' म्हणाले– 'काय ! या बाईला का त्रास देतोस?' तो म्हणाला 'माझे पैसे यांनी घेतले आहेत या बाईनं'

तुम्ही म्हणाले 'स्वामी महाराज ! आमच्या भांडणामधे तुम्ही पडू नका– तुम्ही संन्याशी आहात. तुम्हाला काय करायचय ?' ते म्हणाले, ''आम्ही संन्यासी असेना कां कांहीका असेना'' या बाईला तू त्रास देण्याचे बंद करणार आहेस कां नाही सांग?'' म्हणाले ''तर तुला चांगली गती मिळेल. या पिशाच्च योनीतून तू मुक्त होशील– मी सांगेल तसं जर ऐकशील तर तुझी मुक्तता होईल'' – मग तो जरासा नम्र झाला, ''सांगा महाराज ! तुमची आज्ञा मला मान्य आहे.''

त्या बाईलाही सांगितलं – बाई ! हा ब्राह्मण पिशाच्च झालेला आहे. याचं कांही कर्मांतर झालं नाही. तुझ्या पतीकडून याचं आणखी कर्म करीव – म्हणाले– यथा शक्ती कर – काय तुझ्याजवळ जेवढं द्रव्य असेल, ते द्रव्य या ब्राह्मणाच्या ऋणमुक्ती करता देऊन टाक, म्हणजे या दोषातून तू मुक्त होशील– त्या पिशाच्यालाही सद्‌गती मिळेल ! –– पिशाच्चाला सुद्धा आयुंष्य फार असतं. पिशाच्च योनी आहे – नाही म्हणणाऱ्या लोकांना सुद्धा अनुभव आला म्हणजे कबूल करतात ते. पण तसा अनुभव –– सगळ्यावरती ते आक्रमण करत नाहीत. पिशाच्च. त्यांचाही कांही संबंध असावा लागतो. या बाईने आपले पैसे घेतले होते म्हणून पिशाच्च लागला. वाटेल त्या बाईच्या पाठीमागे लागता येणार नाही पिशाच्चाला...

तर त्याप्रमाणे त्या बाईनं केलेलं आहे. **महाराजांनी नंतर पुन्हा एकदा दृष्टांत दिला.** आणखी तिच्या ओटीमधे दोन नारळ टाकलेले आहेत. फल तिला दिलेलं आहे. आणि पुढं तिला दोन मुलं झाली. त्यानंतर असा बराच काल गेला– ती मुलं वाचली आणि तिची जास्ती श्रद्धा महाराजांच्या वरती बसली आहे. श्रद्धा बसण्याचं कारण म्हणजे असं आहे– **शास्त्रामधे दोन मार्ग सांगितलेले आहेत– एक, कर्म जे कांही पाप झालं असेल ते पाप जाण्याकरता प्रायश्चित्त जसं सांगितलं तसं घेतलं पाहिजे, म्हणजे पापक्षय होतो. पाप रहात नाही–– हा ही मार्ग आहे, आणि ईश्वराची उपासना करूनही पापक्षय होतो.** म्हणजे प्रायश्चित्त करण्याला किंवा ते पापनाश करण्याला त्या बाईजवळ पैसा नव्हता, म्हणून त्याकरता देवाची अुपासना करायला तिला सांगितली. पैसा असता तर तेही करावं अन् तेही करावं. दोन्ही करावं– नाही कोणी म्हटलंय? पण कांही थोडसं आणखी पत्रं, पुष्पं, फलं, तोयं–– देव कांही जास्ती मागत नाही हो – आम्हाला तुळशीपत्र वाहिलं तरी पुष्कळ झालं म्हणाले – तोयं एक पळीभर पाणी जरी दिलं तरी आमचा संतोष आहे, हे भगवानच सांगताहेत स्वतः. पाहिजे कशाला देवाला नैवेद्य. आणखी हे काय करायचं जरूर आहे? देवाची भक्ती करायची आहे कां देवाला द्यायचंय ते ! नकोच म्हणण्याकडे प्रवृत्ती होती.

हे तत्त्वज्ञान आहे. देव नित्य तृप्त आहे. देव मानायची तयारी नाही आमची ! आणि तो नित्य तृप्त आहे, सांगायचं म्हणजे आमच्या, ह्याच्या करता, सांगतो आपण. आम्हाला करायची

इच्छाच नाही होत, त्याकरता सांगायचं फक्त, तर ते शास्त्राने दुसरा मार्गही सांगितला. 'जर सामर्थ्य नसेल– धन नाही जवळ, तर असं कर म्हणाले'–'ईश्वराच्या कृपेने सर्व तुझेही दोष दूर होतील'–– त्या प्रमाणे त्या बाईनं केलेलं आहे. पिशाच्च योनीतून तो ब्राह्मणही मुक्त झाला. पुष्कळ वर्ष पिशाच्च– दोन दोनशे, चार चारशे वर्ष रहातात म्हणे ! पिशाच्च योनीतून मुक्तता होत नाही.

थोरल्या महाराजांच्या वेळेला सावंतवाडीला एका माणसाच्या अंगात पिशाच्च होतं. दोनशे अडीचशे वर्षाचं तो अणावकरांचा समंध म्हणून त्या चरित्रात गोष्ट आहे. एकाला कुणाला मुलगा झाला– महाराज तिथं गेले घरी, माणगावहून सावंतवाडीला. ते ही ज्योतिषशास्त्रामधे उत्तम तयार होते. त्यांनी त्या मुलाची कुंडली मांडली, आणि त्या कुंडलीमधे त्यांना असं दिसून आलं की, या मुलाला आणखी एका महिन्यात मृत्यू येणार आहे. त्यांनी ती पाटी पालथी घातली. त्या माणसाच्या अंगात पिशाच्च – तो बोलायला लागला, ''काय शास्त्री महाराज! तुम्ही केलेलं गणित जरासं दुसऱ्या पद्धतीनं करून बघा.'' असं त्यांनी सांगितलं म्हणे– उत्तम ज्ञानी होता. ''तुम्ही जी पद्धती ज्या पद्धतीनं गणित केलेलं आहे, त्या दृष्टीनं तुमच्या डोळ्यासमोर हा अपघात होणार आहे असं तुम्हाला वाटतं– तसं नाही'' – म्हणाले– एक विशिष्ट निराळ्या पद्धतीनं अमुक त्यांनी सांगितलं कांही – 'या पद्धतीनं ते गणित करा म्हणजे या मुलाचं जातक तुम्हाला खरं कळेल' –– त्याप्रमाणे त्यांनी पुन्हा गणित करून पाहिलं, तर त्याला पुष्कळ आयुष्य आहे असं दिसलं.

म्हणजे पिशाच्याजवळ सुद्धा इतकं ज्ञान आहे. त्यांनी तसं गणित केलं– पाटी पालथी कां घातली – हे सुद्धा त्याला कळून आलेलं आहे आणि त्याप्रमाणे त्यांनी सांगितलं आहे. पण त्यांचा काळ अडीचशे वर्षांचा तो समंध होता–सध्या त्या माणसाच्या अंगात होता– त्याच्यापूर्वी आणखी कोणाच्या तरी असणार आहे. पण त्याला तिथं राहावं लागलं. त्या जन्मातून मुक्त व्हायचंय– अन्न नाही– पाणी नाही– वायूचा आहार करून राहायचं म्हणजे काय कठीण आहे काम?

तर त्या बाईला दोन मुलं झाली म्हणतात– तेव्हा आता अुपनयन वगैरे करायचं ठरलेलं आहे. इतक्यात दुसरा जो मुलगा होता– चौल करायचं ठरलं अगोदर आणि त्या वेळेला त्या मुलाला ताप आलेला आहे. धनुर्वात झाला अन् तो मुलगा गेला –– झालं ! आता काय म्हणायचं या बाईनं? भगवंतावरती पूर्ण विश्वास सगळा तिनं ठेवलेला आहे– भक्ती आहे मनामधे. धर्मशास्त्राप्रमाणे आपण वागू शकत नाही. शास्त्रीय जे कर्म आहे ते आपण करू शकत नाही. **पण देवाने जबाबदारी माझी घेतली आणि देवाने मला याच्यातून मुक्त केलं.** मला दोन मुलं झाली, त्यातला एक मुलगा गेला–– काय करायचं आता ! देवावर विश्वास

ठेऊन आपण वागलो हे योग्य आहे की अयोग्य आहे? चिकित्सा करायची झाली तरी तितक्या निग्रहाने करावी, तर त्याचं फळ मिळतं. नुसती आपली चहा पिता पिता चिकित्सा करायची हे खरं आहे– हे खोटं आहे– नुसता निर्णय द्यायचा – निघून जायचं. यात कांही अर्थ नाही.

त्या बाईनं निग्रह असा केलेला आहे की, 'देवाने माझी उपेक्षा कां केली?' देवाला ती विचारते आहे, मनाने. 'मी, माझ्या जवळ सामर्थ्य नाही,' हे सांगितलेलच होतं. मी त्याचं कर्ज देऊ शकत नाही– पांच मुलं गेली– मला ही मरावं लागल असतं तर मराव लागलं असतं. तुम्हाला उपेक्षा करायची नसती तर मला तरी जिवंत कशाला ठेवलं? त्या पिशाच्चाला तरी कशाला मुक्त केलं तुम्ही? हा तिचा प्रश्न आहे. मनामधे आहे. रडती आहे सारखी– पुष्कळ दुःख करती आहे. गांवातल्या लोकांनी येऊन आणखी तिची समजूत करण्याचा प्रयत्न केला. पण ते दुःख जात नाही. मग आणखी दुपारची वेळ झालेली आहे. माध्यान्हकाळ झालेला आहे. ते मुलाचं प्रेत पडलेलं आहे. ही बाई सारखी रडते आहे.

एक ब्रह्मचारी वेषामधे महाराज तिथं आले आणि त्यांनी तिला उपदेश केला – 'बाई ! मृत्यू आणखी जन्माला आल्यानंतर त्याला मृत्यू ठरलेला आहे बाई. सगळ्यांनाच मृत्यू आहे. त्याप्रमाणे हा तुझा मुलगा जन्माला आला, याचा मृत्यू लिहिलेला आहे, ठरलेला आहे– आयुष्याप्रमाणे मृत्यू होणार ! असा कुणी नाही– चिरंजीव कोण आहे? म्हणाले– **'चिरंजीव याचा अर्थ अधिक आयुष्य आहे. देवांना अमर म्हणतात. अमर म्हणजे मृत्यू केव्हाही नाही असा अर्थ नाही, माणसापेक्षा जास्ती काल जिवंत रहाणारे, इतकाच त्याचा अर्थ आहे.** तर असा कोणीही अमर नाही म्हणाले आणि असा हा नियम आहे, सृष्टिचक्र आहे. ज्या जीवांनी जशा प्रकारची कर्म केलेली असतील, त्या कर्माप्रमाणे कोणाला जास्ती आयुष्य मिळतं– कोणाला कमी आयुष्य मिळतं. **देहाचा संबंध त्याला कर्माने आलेला आहे. तो देह संबंध किती दिवस राहायचा किंवा किती दिवसांनी सुटायचा हे सुद्धा त्याच्या कर्माने ठरविलेलं आहे म्हणाले.** असा आणखी सृष्टिचक्रातला नियम आहे. कोणीही शेवटपर्यंत चिरंजीव राहू शकत नाही. तेव्हा हे दुःख कशाला करतेस? म्हणाले. 'मेलेला आहे–प्रेत किती वेळ ठेवायचे?' म्हणाले– 'जाऊ दे. याची उत्तर क्रिया होऊ देत. सगळी मंडळी खोळंबलेली आहेत. रडून कांही उपयोग नाही.'

ऐकून, घेतलं बाईनं, आणि त्या बाईनं विचारलं – 'महाराज ! आपण कोण आहात मी कांही जाणू शकत नाही, पण आपण हे तत्त्वज्ञान मला सांगितलं – पण मी असं विचारते तुम्हाला'–

''प्रारब्ध प्रमाण म्हणू जरी । तरी का भजावा श्रीहरी?'' (गुरुचरित्र २१.३१)

हा मोठा प्रश्न आहे. जीवांनी केलेली कर्म त्या कर्माप्रमाणे फळ जीवांना भोगलं पाहिजे हे खरं आहे. त्यांनी कर्म करावीत. त्यांनी आपलं आयुष्य वाढवावं– नाही तर मरावं. **जीवांच्या**

वरतीच सगळी जबाबदारी आहे न. ईश्वराची जरूरी काय? -- हा तिचा प्रश्न आहे. ही खरी चिकित्सा आहे. ईश्वराची जरूरी नाही असं मी म्हणणारी नाही. ईश्वराचं भजन कशा करता करायचं? तो सर्व समर्थ आहे. सगळ्या जीवांची कर्म जाणणारा तो आहे. कर्मातून त्यांना बाजूला कसं करावं? **त्यांची सगळी कर्म नाहीशी कशी करावीत? हे सुद्धा तो जाणतो आहे. त्याची कृपा झाल्यानंतर एका क्षणाचा सुद्धा विलंब नाही. संसारामधे आसक्त झालेला जीवात्मा एकदम संसारातून बाजूला होतो आहे. हीच कृपा त्याची आहे.** त्याची शक्ती आहे. म्हणून तर ईश्वराचं भजन सगळे ब्रम्हादिक देव सुद्धा करीत आलेले आहेत. त्याच्यावरती मी विश्वास ठेवला आणि त्या ईश्वराचं भजन केलं मी– आणि त्यांनी मला शेवटी तोंडघशी पाडलं. माझा विश्वासघात ईश्वराने केलेला आहे, असं मी कां म्हणू नये?' फिर्याद करायची झाली तर ईश्वराजवळच केली पाहिजे. नुसती बुद्धीची चिकित्सा कांहीही उपयोगाची नाही.

ही मोठी भक्त आहे. महान भक्त ईश्वराची आहे. ती सांगते आहे. 'नाही !' 'नाही!' – मी जिवंत रहाणार नाही. ह्या मुलाला आणखी चितेमधे घालताना मी सुद्धा माझा देह ह्या मुलाबरोबरच आणखी अर्पण करणार आहे. संपलं– ईश्वराचा संबंध सोडायचा आहे ना ! देहाचा संबंध ही मी सोडून देईन. ईश्वर वाईट आहे मला म्हणायचं नाही. पण ईश्वराची इतकी पूर्ण शक्ती असताना त्यांनी त्या शक्तीचा उपयोग कां करू नये? हे सामान्य भक्त किंवा संसारी आमच्या सारखे अज्ञानी विचारू शकत नाहीत. जर याचं उत्तर मिळालं नाही तर मी देह ठेवणार नाहीये. देह सुद्धा या मुलाबरोबर अर्पण करीन. देह ईश्वराला अर्पण करीन. माझी कर्म, पुन्हा जन्माला येऊ दे, काय ते होईल !

ब्रह्मचारी वेषामधे महाराज आलेले आहेत. 'बाई ! झालेलं आहे असं खरं आहे. असं करा तुम्ही आता विचार करीत इथं थांबू नका. तुम्हाला ज्या ठिकाणी वर मिळालेला आहे –त्या गुरू स्थानामधे तुम्ही जा. तिथं रहा– तिथं देवाला विचारा' म्हणाले, एवढेच त्यांनी सांगितले.'

ती लगेच उठलेली आहे. मुलाचे प्रेत वगैरे घेऊन निघाली. सगळी ब्राह्मण मंडळी निघाली. 'कांही समजूत तिची होते कां बघू या!' म्हणाले ती आलेली आहे. डोकं आपटती आहे– त्या पादुकावरती 'याचा निर्णय मला पाहिजे आहे, नाहीतर मी जिवंत रहाणार नाही. मुलगा गेला याचं दुःख नाहीये– पण हा निर्णय ईश्वराने दिला पाहिजे'– **ईश्वराची भक्ती, ईश्वराची शक्ती कशी आहे! वात्सल्य किती आहे, हे भगवानच सांगताहेत –**

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ।
सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति ॥ (भ. गी. ५.२९)

भगवान सांगताहेत, सर्व ही कर्मांचा भोक्ता परमात्मा आहे किंवा कर्ता ही तोच आहे- भोक्ता म्हणजे कर्ता असल्याशिवाय भोक्ता कसा होईल ! परिणाम प्रवर्तक तो आहे ना? **म्हणजे तोच खरा कर्ता आहे ! जीव निमित्त मात्र आहे –** हे ईश्वर स्वरुपाचं ज्ञान ज्याला झालेलं आहे इतकच नव्हे तर 'सर्व लोक महेश्वरं' परमात्मा सर्व ही लोकांचा नियामक आहे- – ब्रम्हादिक देवांचं सुद्धा नियमन करणारा परमात्मा आहे- एवढं ईश्वर स्वरुपाचं ज्ञान आपल्या चित्तामधे पाहिजे आणि यापेक्षाही पुढं 'सुहृदम् सर्व भूतानाम्'. ईश्वर हा कसा आहे ? – सर्व भूतांचा तो सुहृद आहे. सुहृद याची व्याख्या आचार्य महाराज करताहेत – **'प्रत्युपकार निरपेक्षतया उपकारीणम्'–** परमात्मा कसा आहे? त्याला कुणाच्याही, कुणावरही प्रत्युपकार करण्याची इच्छा नाही म्हणे- 'कुणी माझी पूजा करावी ! मला कांहीतरी आणखी अर्पण करावं म्हणजे मी त्याला देईन' असं नाही, हा सुहृद शब्दाचा अर्थ आहे. लोकांच्या – भक्तांच्या पूजेची कांही इच्छा नाही. आपण उपकार करणार आहे – कारण पूर्ण शक्ती आहे ना? पूर्ण शक्ती असणारा असा कधीच – **'मला काय दिलंय यांनी'– हा विचार कोणाच्या मनात येतो – जो अपूर्ण आहे. मनाने, धनाने, अपूर्ण जो आहे, त्याच्या मनात हा विचार येतो,** की 'मला कांहीतरी मिळायला पाहीजे. त्याशिवाय याच्यावर काय उपकार ?' ईश्वराजवळ ते नाही. पूर्ण शक्ती आहे. **संपूर्ण भक्तियोग जो निर्माण झालेला आहे, तो या एका वाक्यातून भगवंतांनीच सर्व सांगितला आहे. मी सुहृद् – सर्व भूतांचा सुहृद् आहे.**

अशोकस्तारणस्तार: शूर: शौरिर्जनेश्वर: ।

अनुकूल: शतावर्त: पद्मी पद्मनिभेक्षण: । (विष्णू सहस्त्रनाम-५०)

अनुकूल नांव आहे देवाचं. हे ज्याला समजलेलं आहे, अस ईश्वर स्वरुप जो जाणणारा आहे, त्याला पूर्ण शांती आहे. संसारातून आणि तो मुक्त झालेला आहे.

भगवान असं सांगताहेत- 'मी सगळ्यांचा सुहृद आहे, आणि ते देवांच वाक्य खोटं मानायचं काय?' म्हणाले. ''नको ! 'नको! नको !'' थोडी नास्तिक्य बुद्धी माझ्या मनात उत्पन्न झाली. माझ्या मुलाला आणखी मला माझी मुलं दिली आणि **मुलांना मारलं ईश्वराने' – असं मी जर सांगायला लागले तर किती माझ्या सारखी पापी होईल-- ते पाप माझ्या हातून घडायला नको- मी त्याला देहच अर्पण करणार आहे.**

संध्याकाळ झाल्यामुळे सगळी ब्राह्मण मंडळी निघून गेली. म्हणाले, 'उद्या सकाळी आपण येऊ'. ती काय म्हणाले, इतकी हट्टी बाई, कांही ऐकायला तयार नाही. माझ्यासकट जाळा म्हणते- आता काय करायचं? उद्या सकाळी येऊन आपण काही हिचं परिवर्तन मनाचं-- बुद्धी बदलली तर करू म्हणाले.

सगळी मंडळी निघून गेली. ते मुलाचं प्रेत पडलेलं आहे, पादुकांच्या समोर– औदुंबर वृक्षाखाली. ते दोघेही पती पत्नी आणि ती शोक करती आहे– आक्रोश करती आहे. अन्न नाही, पाणी नाही– शोक झालेला आहे. पतीलाही झोप आली अन् तिलाही झोप आलेली आहे. झोप आल्या बरोबर, एकदम आणखी स्वप्नामधे महाराज आलेले आहेत – 'काय बाई ! काय झालं तुमच्या मुलाला बघू या !' म्हणाले– 'काय झालं?' वगैरे विचारलं, 'कुठे गेला तो प्राणवायू?' म्हणाले. मरण याचा अर्थ काय? प्राणाचा आणि शरीराचा संबंध म्हणजे मरण आहे.

आद्यप्राणसंयोगः ।

जन्म. जन्म याचा अर्थ हा आहे. आणखी **अन्तिमप्राणवियोगः**– प्राणाचा संबंध सुटला शेवटचा. रोज प्राणाचा शरीराशी संबंध आणि वियोग चाललेला आहे. श्वास बाहेर जातो आणि आंत ही येतो आहे. बाहेर गेलेला श्वास बाहेरच राहिला तर काय होईल? कोण आणतो त्याला. आम्ही आणतो. आमची शक्ती आहे, आमच्या सामर्थ्यांने सगळं आमचं संरक्षण होतं हे याचं उत्तर काय द्यायचं? आमच्या सामर्थ्यांने बाहेरचा गेलेला श्वास आम्ही आणू शकतो काय? आंत गेलेला श्वास आंतच राहिला तर काय होईल? काय उत्तर द्यायचं याचं? नास्तिकांना उत्तर देता येईल का?–– इतर कुणीतरी दुसरा आहे– बाहेर जायचं, आंत यायचं हे सारख नजर ठेवणारा– त्या दोघांचं आणखी प्राणापानांचा नियंत्रण करणारा, एक दुसरा आहे. त्यामुळे जीवन चाललेलं आहे.

महाराज म्हणाले 'बाई, तुमच्या मुलाच्या शरीरातील प्राणवायू कुठे निघून गेला – पाहू या बरं !' ते मुलाचं प्रेत पडलेलं आहे. तिथे आले महाराज, बाई ही स्वप्नातून जागी झालेली आहे, पाहती आहे ते सगळं – आणखी त्याच्या मुखामधे कांही भस्म टाकलं म्हणा – कांहीतरी केल्यासारखं. झालं, आला म्हणाले, 'अहो ! प्राणवायू दुसरीकडं कुठंतरी गेला होता' 'आला', म्हणाले 'प्राणवायू आला. तुझ्या मुलाच्या शरीरात'– 'कुठे मेला' म्हणाले मुलगा. उगीच रडत बसतीस म्हणाले. आणि तो मुलगाही उठून बसला. आई – आई म्हणाला. 'मला भुक लागलेली आहे'– तीन चार वर्षांचा मुलगा आहे. स्तनपान केलेलं आहे. आश्चर्य झालेल आहे. तिला आश्चर्य वाटलेलं आहे. मग पश्चात्ताप झाला. 'देवाला किती बोललो,' म्हणाले, आम्ही काय वाटेल ते बोललो, 'विश्वासघात केला –अमुक केलं – तमुक केलं – असं केलं' म्हणाले. वाईट वाटलेलं आहे.

पहाटेची वेळ झाली. स्नान केलेलं आहे. डोकं आपटलं होतं, त्या पादुकांवरती. रक्तस्त्राव सगळा झाला होता. डोकं फुटलं होतं. पाणी आणून त्या सगळया पादुका स्वच्छ धुतलेल्या आहेत. आणखी पूजा वगैरे केली. आरती वगैरे करायला लागलेली आहे. पतीनही सांगितलं की, परमेश्वराची शक्ती आहे– आपल्या कर्माचा दोष – हा नियमाने मान्य करावा, असा हट्ट ही करून उपयोग नाही. इतक्यात गांवातली सगळी मंडळी आली. 'काय झालंय बघू या!'

म्हणाले, 'त्या मुलाची विल्हेवाट कांहीतरी लावायला पाहिजे ना!' म्हणाले. तर ते तिघेही तिथे तो मुलगाही टाळ्या वाजवतो आहे असे त्यांना दिसले त्यांनाही आनंद झालेला आहे.

ही कथा ज्या वेळेला सगळीकडं पसरली की, बाईचा, मेलेला मुलगा – तिने मनोहर पादुकांची पूजा केली. तिला पुन्हा मुलगा मिळाला. जिवंत झाला– त्या वेळेपासून नरसोबावाडी क्षेत्र नवीन तयार झालं, गांव घरं झाली, लोक रहायला लागले, पूजा अर्चा सुरू झाली. पांचशे वर्ष होऊन गेली. आता चाललंय –– अखंड चाललेलं आहे– हे नित्य **'श्रीनित्य मंगलम्'** हे त्या ठिकाणी भक्तांचं कार्य चाललेलं आहे. उपेक्षा नाहीये.

ध्यानयोगाचा अभ्यास सांगताना कपिल मुनीनी भगवंतांचं दिव्य चरणकमल, साक्षात्कार संपन्न अशा प्रकारच्या महात्म्यांनी ध्यानयोगाचं वर्णन केलेल आहे. संपूर्ण अवयवांचं ध्यान त्यांनी केलेलं आहे. म्हणून प्रत्येक अवयवांचे त्यांनी वर्णन केलेल आहे. श्रीकृष्णांच्या चरणावर व्रज, अंकुश, ध्वज, कमळ ही चिन्ह होती. अक्रूरजी जेव्हा गोकुळात गेले तेव्हा तिथे भगवंतांची उमलेली पाऊले त्यांनी पाहिली आणि या चिन्हांवरुन त्यांनी ती ओळखली. कृष्णाचे भक्त ते होते. रथातून उडी मारुन त्या रस्त्यावरच्या धुळीमध्येच ते लोळू लागले. गोपींना कृष्णाचा निरोप देण्यासाठी ते आले होते.

'कृपाळूपणे अल्प धारिष्ट्य पाहे'–– अशा रीतीने, सात्विक राग आहे. भक्ताला सुद्धा राग येतो. गोपी सुद्धा रागावत होत्या. उद्धवजींना आणखी बोलल्या त्या, कशाला त्या, भ्रमर गीत आहे, भ्रमराला बोलल्या 'कशाला बाबा आमच्याकडे तू येतोस? तिथं जा' म्हणाल्या. 'आता–– त्याला सगळ्या नगरीच्या राजकन्या मिळाल्या असतील ! त्यांची स्तुती कर, म्हणजे तुझं आणखी कल्याण होईल. तुझ्याकडं लक्ष राहील त्याचं–– आम्ही आपल्या रानावनात रहाणाऱ्या– कशाला आला आमच्याकडं?'–– उद्धवजींनाही त्या बोललेल्या आहेत. याचा अर्थ कृष्णाबद्दल राग आलेला आहे असं नाही. राग जो आहे तो आणखी खरं प्रेम आहे अंतःकरणामधे– ईश्वराने कां दूर रहावं? दूर आम्हाला कां ठेवावं? तत्त्वज्ञानाचा सुद्धा कांही उपयोग नाही. भगवंतांनी संदेश पाठिवलाय– 'मी दूर कुठाय?' म्हणाले–'मी सर्वांतर्यामी आहे–

ईश्वर: सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति । (भ.गीता १८.६१)

'सर्वांच्या हृदयात मी आहे की !' म्हणाले 'दूर कुठे गेलो?' छे ! छे ! छे ! हे तत्त्वज्ञान ज्ञान नाही.

'उद्धवजी ! हे आम्हाला – सांगू नका' म्हणाल्या. 'आमचं प्रेम कमी करणारं तत्त्वज्ञान आम्हाला नको !' म्हणाल्या. 'शुद्ध प्रेम ! हे आम्हाला मिळाव' असं त्यांना सुद्धा गोपींनी सांगितलं.

त्याप्रमाणे ही स्त्री खरी मोठी भक्त आहे. **अनंत जन्माचं आणखी पुण्य तिचं होतं. महाराजांनी स्वतः तिची जबाबदारी घेतली.** त्या पिशाच्चालाही मुक्त केलं, तिचा ही आणखी संसार सुखी केला. गेलेला मुलगा सुद्धा जिवंत केलेला आहे पुन्हा. कर्म परिहार ही परमात्मा करू शकतो आहे. **त्याच्या संकल्पाने कर्मपरिहार होऊ शकतो,** त्याचं हे अुदाहरण आहे. आणि त्यावेळेपासून 'नरसोबावाडी क्षेत्र' मोठं प्रसिद्ध झालं.

यानंतर आता गाणगापूर क्षेत्रातल्या लीलांचा आणखी विचार. – त्या लीला **सिद्धमुनी नामधारकाला सांगताहेत**– 'बाबा! अशी श्रद्धा ठेव तू –– **आमचे पूर्वज तुमचे आणखी सेवक होते.** भक्त होते. त्या दृष्टीनं आमच्याकडे पाहा –– **नाही– तसं पाहिलं जाणार नाही. तुही त्या पूर्वजांच्या प्रमाणे संशय सोडून दृढ श्रद्धा धारण कर.** दृढभक्ती मनामधे ठेवा. **भक्ती करावी. दृढतर– अत्यंत दृढभक्ती झाली पाहिजे. आणखी ती दृढ भक्ती होण्याकरता आपली पापं दूर झाली पाहिजेत आणि ती पापं दूर होण्याकरता सत्कर्म आचरण केलं पाहिजे.'**

येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रता: ॥ (भ.गी. ७.२८) म्हणतात.

भक्ती करण्याचा अधिकार सुद्धा सोपा नाहीये. आम्ही भक्ती करतो– समजतो आम्ही. ही बाहेरची भक्ती आहे. टाळ्या वाजवणं, नमस्कार करणं– प्रदक्षिणा घालणं– वारी करणं– हे झालेलं आहे– पण **खरी भक्ती केव्हा सुरू होते? सगळी पातकं आणखी बुद्धीतील गेली पाहिजेत.** पुण्यकर्म केल्याने पापक्षय होतो आणि पापक्षय झाल्यानंतर खरी भक्ती सुरू होती.

भजन्ते मां दृढव्रता: । (भ.गी. ७.२८)

सुरुवात केलेली भक्ती त्यातून माघार नाहीये. स्वतःचा आणखी देहत्याग करायला ती तयार झालेली आहे. देवाच्या बद्दल मला कांही– माझ्या तोंडातून आणखी अयोग्य उद्गार निघू नयेत. देवाची निंदा घडू नये म्हणून मी देहार्पण करणार आहे– अग्नीमधे जाणार आहे– मला आता जिवंत रहायचं नाही. ही भक्ती, ही पापक्षया नंतर होते आहे. **खरी भक्ती उत्पन्न होण्याला ईश्वराची कृपा पाहिजे.** तशी भक्ती दृढ होण्याकरता म्हणून वेगवेगळी आख्यानं आहेत. ज्ञानयोग म्हणून हा झालेला आहे. आता कर्मयोग ही सांगताहेत. त्याच्यानंतर शेवटी शेवटी भक्ती योगाची उदाहरणं त्यांनी दिली आहेत.

गाणगापूर क्षेत्रामधे आणखी नरसिंह सरस्वती महाराज येऊन पोहोचलेले आहेत. भीमा अमरजा संगम आहे. आणि त्या संगमावरती महाराज राहतात. मल्लिकार्जुन, त्याठिकाणी शिवलिंग आहे. मोठा अश्वत्थ वृक्ष आहे, तिथं आपलं रहायचय. तिथं कांही विशेष मंडळी कशाला असणार? गांवापासून दोन तीन मैल लांब आहे तो संगम. झाडाखाली यांनी रहावं– यांना कांही

गांवातच रहायला पाहिजे– निवाऱ्याची जागा पाहिजे, कांही लागत नाही– मनाची तयारी असली म्हणजे झालं. **इथे आता एक गृहस्थ रहाताहेत ना ! बाहेरच बसताहेत. संध्याकाळ पर्यंत. चाललेलं आहे !** मनाचा एक निग्रह पाहिजे आहे. होतं सगळं, तेव्हा तिथे रहावं. संगमावरती अनुष्ठान वगैरे करायचंय. चाललेलं आहे सगळं. लोकसंग्रह आहे– नाहीतर त्यांना कांही अनुष्ठान करायचं नाही, कांही करायचं नाही म्हणजे लोकही तसंच वागायला लागतील.

महाराज जर कांही करत नाहीत तर आपल्याला करायचं काय काम आहे? कसंही वागलं तरी चालतं ! महाराजांच्याकडे बोट दाखवून आपणही तसं वागायला सुरुवात करायची. म्हणून तशी लोकांची बुद्धी होऊन, लोकांनी या मार्गाकडे लागलं पाहिजे. आपलं आपलं कर्तव्य कर्म अनुष्ठान केलं पाहिजे– याकरता महाराजांनी स्नान संध्या वगैरे सगळं आणखी जपजाप्य, योगाभ्यास, ध्यानाभ्यास, ध्यान सगळं करावं तिथं. आणखी मध्यान्हकालच्या वेळेला गांवामधे यावं. भिक्षेकरता म्हणून यायचं. कारण भिक्षा-- ज्ञानी माणसाला सुद्धा आणखी भिक्षा मागायला हरकत नाही म्हणून भगवंतानीच सांगितलेलं आहे.

निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः ।

शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ (भ.गी. ४.२१)

कोणचंही कर्म नाही त्यांना. कर्मबंधन नाहीये. सगळ्या कर्मांचा संन्यास मनापासून झालेला आहे. सर्व संन्यस्त आहेत. फळच जिथं नको आहे तिथं साधन कशाला पाहिजे मग? ऐहिक किंवा आंशिक फळाकरता कर्म करायचेत ना– **यज्ञयागादी, फळाचीच इच्छा जिथं बंद झालेली आहे, तिथं साधन कशाकरता?** तरी सुद्धा **शरीर राहीलं पाहीजे**, मध्यान्हकालच्या वेळेला तो जो 'अहं वैश्वानरो भूत्वा' 'वैश्वानर' आहे 'त्याला कांही आहुति दिली पाहिजे. त्याकरता आणि चार घरं भिक्षा मागायची – संन्याशाने सुद्धा. त्यात कांही दोष नाही,' म्हणाले, 'शरीरस्थितीहेतु । शारीरम् याचा अर्थ शरीरस्थिती हेतुम् ।. नुसत्या शरीरानी काम केलं,' असा याचा अर्थ नाही. शरीर स्थिती रहावी, शरीर चांगलं रहावं म्हणजे विचार करता येतो– भक्ती करता येते– ज्ञान मिळवता येतं– नामस्मरण करता येतं'–'भूक लागलेली आहे–तळमळ लागलेली आहे. नुसतं पडून राहायचं !' काय, काय होणार? कांही भक्ती नाही– ज्ञान विचार नाही– कांही होणार नाही -- म्हणून शरीर चांगलं व्यवस्थित रहाण्याकरता जे मिळेल ते कांहीतरी घ्यायचं. मध्यान्हकाली. त्याला अनुज्ञा आहे शास्त्राची. **ज्ञानी महापुरूषांनी सुद्धा आणि भिक्षेला जायला हरकत नाही म्हणतात. त्यामुळे गृहस्थाश्रमी लोकांचं कल्याण होतं आहे. ज्ञानी महात्मे जर तसे सारख्या समाधीमधे बसले–भिक्षेला कुठं जायचंच नाही म्हटलं म्हणजे, भिक्षा कुणाला घालायची?** भिक्षेला येणारे लोक सगळेच कांही ज्ञानी

असतात असं नाही. भावनेनं, कल्पना करून परमेश्वर म्हणून घालायचं आपण. त्याचही कांही पुण्यांश मिळत असेल, नाही असं नाही. पण खरा महात्मा ज्ञानी– घरामधे केव्हा येऊ शकेल, त्यावेळेला त्याला जर अर्पण केलं तर ते मोठं पुण्य आहे. म्हणून महाराज आणखी येत असत. मध्यान्हकाळच्या वेळेला गाणगापूर क्षेत्रामध्ये त्यांनी भिक्षे करता यावं– ही जी कथा आता सिद्धमुनी सांगताहेत– पहिलीच कथा आहे. गाणगापूर क्षेत्रामध्ये महाराज आल्यानंतर घडलेली पहिली गोष्ट आहे. **'श्रद्धावाँन् लभते ज्ञानं'** सर्वही साधनामधे, श्रद्धा हे मुख्य साधन आहे. ज्ञानाची साधना भगवंतांनी आरंभाला सांगितली.

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिन: । (भ.गी. ४.३४)

तर याप्रमाणे सद्गुरू महाराजांनी संन्यास दीक्षा धारण केल्यानंतर सगळीकडे संचार करण्यास आरंभ केलेला आहे. त्यानंतर नृसिंहसरस्वती त्यांचं नामाभिधान झालेलं आहे. त्यांच्याबरोबर पुष्कळ गृहस्थाश्रमी संन्यासी शिष्य होते. तीर्थयात्रा वगैरे केल्या. नृसिंहवाडी येथील लीलांमुळे जास्तीत जास्त महिमा वाढत चालला आहे. मग महाराजांनी विचार केला आपल्याकडे जसे सज्जन येतील तसे दुर्जनही येतील. आपण आता इथे जास्त दिवस राहणं बरं नाही. इथून दुसरीकडे जावे कुठेतरी.

थोरल्या महाराजांनी याचा उल्लेख एका स्त्रोत्रामध्ये केलेला आहे. नरसिंहवाडी क्षेत्रामध्ये बारा वर्षे महाराज राहिले आणि गाणगापूरला गेले म्हणजे ते वाडीत नाहीत असा त्याचा अर्थ नाही. वाडी क्षेत्रात राहूनच ते गंधर्वपूरात म्हणजे गाणगापूरात येऊन राहिले आहेत. ते स्वयंप्रकाशित, सर्वव्यापी, सर्वज्ञ आहेत. पण अशा रीतीने महाराज अद्यापी प्रगट झालेले नव्हते. आता श्रद्धा कशी पाहिजे याचे उदाहरण म्हणून एक कथा सांगितलेली आहे. तेव्हा उद्या या कथेपासून नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या गाणगापूर क्षेत्रातील लीलांचे चिंतन आपल्याला सुरू करता येईल.

॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त ॥



॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे समश्लोकी गुरुसंहितेवरील प्रवचन
भगवंत मंदिर – बार्शी, जि. सोलापूर

चौथा दिवस
अधिक श्रावण कृ. ११, शके १९०७, दि. १२ ऑगस्ट १९८५
दुपारी ४.३० ते संध्याकाळी ७

भगवान नरसिंह सरस्वती महाराज गाणगापूर क्षेत्रामध्ये येऊन पोचलेले आहेत. कृष्णा–पंचगंगा संगम निवासी किंवा भीमा–अमरजा संगम निवासी अशी त्यांची बिरूदावली प्रसिद्ध आहे. त्या दोन्हीही संगमावर त्यांचे वास्तव्य आहे. कायमचं वास्तव्य आहे. महाराज राहात होते असं नाही, राहत आहेत, सध्या राहताहेत. तेव्हा त्या ब्राह्मणाच्या घरी असणारी वांझ म्हैस– वंध्या महिषी त्या महिषीला दुध आणखी मिळू लागलं, ती दुध द्यायला लागली. महाराज ते दुध पिऊन गेले. संगमावर राहायला गेले. गांवात कांही अद्यापी आले नव्हते ते. दुसरे दिवशी कांही मंडळी आपल्या कामाकरिता ती म्हैस मागण्याला आले. कामाला ती म्हैस देत होते. कांही मजुरी घ्यायची आणि ती म्हैस द्यायची. दुसरे दिवशी मंडळी आल्यानंतर त्या बाईनं सांगितलं, म्हणाली ही म्हैस तर दुध द्यायला लागलेली आहे. ही कांही आम्ही आता कामाला देणार नाही. त्या

मंडळींना आश्चर्य वाटलेलं आहे. दुध केव्हा, कसं दिलं म्हणाले. गांवामधे सर्वत्र ती बातमी पसरली. ज्या म्हशीला वासरू कधीच झालेलं नाही, आजपर्यंत कधी तिनं दुध दिलं नाही, त्या म्हशीचं दुध आणखी मिळू लागलं. सर्वत्र आणखी सगळे लोक आश्चर्यचकित झाले.

राजाच्या कानावर ही बातमी गेली. आणि राजा त्या ब्राह्मणाच्या घरी आलेला आहे. नमस्कार केला. काय महाराज, काय खरं सांगा. एकदम काय ? परिवर्तन झालं कसं हे? कांही कोणचाही याला उपाय नाहीये ना. लौकिक उपाय कांहीच दिसत नाही. दुध निर्माण करण्याची शक्ती, ही कांही वेगळी आहे म्हणाले. मानवाची शक्ती नाहीये. प्रसूत झालेली आहे माता आणि मुलाला ते दुध आपोआप मिळू लागतं. तशा रीतीने हे म्हशीला दुध कसं मिळालं? आश्चर्य आहे, **अघटित घटना आहे ही.**

मग त्याने सांगितलं, 'राजेसाहेब, संगमावर एक स्वामी महाराज आलेले आहेत. केव्हांतरी गांवात येतात म्हणाले. काल असेच आले आमच्या घरात. मी नव्हतो म्हणाले. आणि त्या स्त्रीला, आमच्या स्त्रीला, त्यांनी सांगितलं की आम्हाला दुध द्या, तुमच्या म्हशीचं, म्हणजे झालं. अन्न नसलं तरी चालेल. दुध देणारी म्हैस नाही, असं ही बोलली म्हणाले आमची स्त्री. ते म्हणाले खोटं बोलता तुम्ही. दुध देणारी आहे. झालं, त्यावेळेपासून दुध निघालं म्हशीचं म्हणाले, त्यांचा जो शब्द आहे, दृष्टी आहे, तो दृष्टिपात त्या म्हशीवर झाल्याबरोबर आणि त्यांचा शब्द संकल्पपूर्वक शब्द आहे. म्हैस दुध देत्येय, देऊ लागलीय म्हणाले दुध, हे पहा. आम्ही आजही दुध काढलं. तेवढ्यापुरतं दुध दिलं आणखी बंद झालं असं नाहीये. सुरुवात झालेली आहे. वासराशिवाय दुध मिळू शकतं. कधीही न मिळतानाही मिळू शकतं. कार्यकारण भावाचा यात कांहीही संबंध नाहीये म्हणतात. द्रौपदीला जी वस्त्रं मिळाली, सारखी वस्त्रं सुरू झालेली आहेत, तो दुःशासन ओढतो आहे, एक संपलं, की दुसरं, कोणच्या कोष्ट्याच्या मागावरती तयार झाली हे सांगता येईल का? तो माग नाही, ती सुईही नाही, फणी नाही, ती स्तंतु नाही, कांही नाही.

चिकीर्षिते कर्मणि चक्रपाणेर्नापेक्ष्यते तत्र सहायसम्पत्

पाञ्चालजायापटसंविधाने न तंतवो नैव तुरी न वेमा ॥ (श्रीगुरुसंहिता निवेदन)

कांही नाही म्हणाले. तिथे सामग्री कांही लागत नाही. जगामधे जे पदार्थ निर्माण होतायत, दिसतायत, त्याला कार्यकारण भाव आहे. त्याची कारण सामुग्री सगळी पाहिजे तर आणखी वस्त्र निर्माण होईल. तो कोष्टी पाहिजे तयार करणारा. सगळं ते सूत एकत्र जुळवून घेतलं पाहिजे. मधे ते आणखी धोटा पाहिजे. तो आणखी माग विणायला बसला पाहिजे. आडवे उभे तंतू कसे करायचे हे सगळं त्याला माहिती आहे. तसं झालं तर वस्त्र तयार होणार. इथे कांही संबंध नाही. भगवंताची फक्त इच्छा आहे. ही पांचाली, इची अब्रू जाऊन उपयोग नाही. सुरक्षित राहिली पाहिजे, त्याची इच्छा आहे. दुःशासन काय करणार? दमून गेला बिचारा.

दुर्जनांची शक्ती अहंकाराने वाढल्यासारखी दिसती, पण शेवटी संपून जाते. टिकणारी नाहीये. किती टिकणार? अनंत शक्ती ज्या परमेश्वराची आहे, त्या शक्तीशी टक्कर कोण देणार आहे या जगामधे? असं आहे कोणी? त्याप्रमाणे ही स्थिती झाली, म्हणाले. इथं कार्यकारणभाव कांही सांगता येत नाही. महाराजांची इच्छा आहे. त्यांचा संकल्प आहे आणि म्हैसही दुध देऊ लागलेली आहे. हे खरं आहे म्हणाले. राजाला आणखी अत्यंत आनंद झाला. सगळं सैन्य, वाजंत्री, सगळं घेऊन तो आणखी संगमावर गेलेला आहे. महाराजांना नमस्कार करून आणि उभा राहिला. मोठा भक्त होता तो राजा. महाराज आलेले त्याला कांही कळलेलं नव्हतं आणि असलं तरी कोणीतरी एक संन्यासी आहे. असे येतात, पुष्कळ संन्यासी. फिरत असतात. त्यापैकी कोणीतरी संन्यासी आले असतील. एवढीच कल्पना आहे. कोण आहे संन्यासी? काय त्यांची योग्यता आहे? आपल्याला त्यांच्याजवळ घेता येण्यासारखं काय आहे, ही जिज्ञासा पाहिजे, आदरबुद्धी पाहिजे. उपेक्षाबुद्धीनं सगळं काम चाललेलं आहे ना.

संसारात संकटं प्रत्येकावर येतात आणि अशी मंडळी संकटं दूर करणारीही, प्रत्येक ठिकाणी ही अशी फिरत असतात. पण एकमेकांची गांठ पडली पाहिजे. आदर बुद्धी त्याच्या मनात उत्पन्न झाली पाहिजे. त्यालाही प्रेम निर्माण झालं पाहिजे. तो जो योग्य अधिकारी पुरूष आहे, त्यालासुद्धा आत्मीयता वाटली पाहिजे. त्यांनी तर सगळं जगच सोडून दिलेलं आहे. तो कशाला जगाची चौकशी करेल? चौकशी आम्ही केली पाहिजे. ते कधीही महात्मे चौकशी करत नाहीयेत, प्रत्येकाच्या घरोघरी जाऊन. काय हो तुम्हाला काय दुःख आहेत, संकटं आहेत, यादी करून द्या, अमुक तारखेला आम्ही त्याचा निर्णय देऊ, असं ते कधीही सांगू शकत नाहीत. काय जरूर आहे त्यांना ? आपल्या आनंदामध्ये निमग्न आहेत. कोणी जो आनंद मागायला आला, तर देऊ शकतात. सांसारिक इच्छा जी असेल ती कितीही कठीण असू देत ती इच्छा पूर्ण करून त्याला आनंदाच्या मार्गाकडे ते नेऊ शकतात, पण गांठ पडली पाहिजे, भाग्य पाहिजे.

तो मोठा भक्त राजा आणखी आला. ''महाराज,'' नमस्कार केला. डोळ्यातून अश्रुधारा,– प्रेमाश्रु–चाललेल्या आहेत.

तमेत्य प्रणिपत्योचे दण्डवद्गद्गदाक्षरः ।
पुलकाङ्कितदेहो राड् **दीनं माम्पाहि किङ्करम् (द्विसाहस्त्री १३.१३)**

शरण आलेला आहे. आपलं, मी राजा आहे ते विसरून गेला तो. महाराज मी दीन, जीवात्मा आहे, जन्माला आलेलो आहे म्हणाला आणि या जन्मातून कसं बाहेर पडायचं हे मला कळत नाहीये. चक्रव्यूह आहे. सारखा त्याच्या मधेच सापडलेलो आहे. बाहेर जाण्याचा रस्ताच सापडत नाहीये. **'पुनरपि जननं पुनरपि मरणं । पुनरपि जननीजठरे शयनम्'** सारखं चाललेय

रहाट गाडगं. जन्माला यायचं. त्याच्यानंतर मृत्यू आहे. त्याच्यानंतर पुन्हा गर्भवास आहे, पुन्हा जन्म आहे, पुन्हा मृत्यू आहे. सारखं चालू आहे. रोज तरी काय चालू असतं, काय आपण नवीन काय करतो, हा विचार आपण करत नाही. कार्तवीर्य राजा किंवा बलीराजा याला, विचार केल्यानंतर असं वाटायला लागलं, की काय म्हणाले इतकं आयुष्य फुकट गेलं. पंच्याऐंशी हजार वर्षे कार्तवीर्याजुनाने राज्य केलं या ठिकाणी. सर्व सत्ता ताब्यामध्ये आहे. एकटाच तो राज्य करीत होता. ज्या ज्या ठिकाणी आणखी कांही दुर्जनांचा विचार चालू झालेला असेल, कांही दुष्कर्म करायचा विचार चालू झालेला असताना हा धनुष्यबाण घेऊन त्यांच्या समोर हजर होत असे. याला समजत होतं आणि जाण्याचीही शक्ती होती. सैन्य नको, कांही नको. आणि त्यांना लगेच विचारतो आहे, काय हाच तुमचा विचार चाललेला आहे ना? अमक्याच्या घरावर दरोडा घालायचा, अमक्याला मारायचं हांच चाललाय की नाही विचार? करणार काय तसं? कां आत्ताच तुम्हालाच मारून टाकू? म्हणजे ही भीती दुष्कर्म होण्याच्या पूर्वीच तो त्यांना आणखी सांगत होता. त्यांच्या समोर उभा राहून, त्यांचा कबुलीजबाब घेऊन, आणखी लगेच निर्णय करीत होता. अशी भीती सर्व लोकांमधे उत्पन्न झालेली आहे.

अकार्यचिन्तासमकालमेव प्रादुर्भवंश्चापधरः पुरस्तात् ।
अन्तःशरीरेष्वपि यः प्रजानां प्रत्यादिदेशाविनयं विनेता ॥

(रघुवंश कालिदास विरचित् ६.३९)

मनामधे उत्पन्न झालेली दुर्वासना, ती लगेच याने जाऊन दूर करावी. कर्म झाल्यानंतर आणखी शासन करायचं ही शक्ती कमी आहे. झाल्यानंतर सुद्धा विचारात पुष्कळ वेळ जातो. खून झालेला आहे, केलेला आहे, सगळे अगदी सुप्रीम कोर्टापर्यंत निर्णय झालेला आहे, याला फाशी द्या. त्यातही विचार चाललाय. फाशी, फास लावला म्हणजे म्हणे, त्याला अगदी फार त्रास होतो, कशी फाशी द्यायची यातच चार दोन महिने निघून जातात. हा विचार आहे फक्त. इथं तसं नाहीये. हुकूमशाही जरी असली तरी प्रजाजनांच्या मनामधे सुद्धा दुर्वासना उत्पन्न होऊ नये, ही शक्ती ज्याने संपादन केलेली आहे, तो हुकूमशहा असला तरी चांगला आहे. एकटा अधिकारी आहे, एकटा सगळं कार्य करतो आहे. कोणच्याही खात्यावरती जास्ती खर्च त्याचा पडत नाहीये. लष्कराला इतका खर्च आहे, लोकांनी कांही कमी खाल्लं तरी हरकत नाही. उपाशी राहिलं तरी हरकत नाही असं होणार नाही. एकटा सगळं राज्य करतो आहे. पण त्यालाही शेवटी वैराग्य उत्पन्न झालं. सारखं सकाळपासून संध्याकाळ पर्यंत मी काय करतोय म्हणाले हे. लोकांची बुद्धी सुधारती आहे कां? त्या वासना ज्या मनातल्या आहेत, त्या अशा दमनाने, किंवा हटानी, बलात्काराने वासना दमन करणं फार कठीण आहे. त्याकरीता सद्गुरूंची आवश्यकता आहे. हळू-हळू **'अनेकजन्मसंसिद्धः'**..... हे खरं आहे. जरी तो राजा मनांत आणखी दुर्विचार आल्याबरोबर, समोर उभा राहात होता. अनेक

रूपं घेत होता, एका ठिकाणी असं नाहीये. ज्या ज्या ठिकाणी हा खल, कट चाललेला आहे, त्या प्रत्येक ठिकाणी तो जाऊ शकत होता. त्याला दत्तात्रेयांनी तसं योगसामर्थ्य दिलेलं होतं. त्याचा सदुपयोग तो करत होता. लोकांची सुधारणा करायची आहे. त्यांच्या मनात सुद्धा दुर्विचार, दुर्वासना येऊन उपयोग नाही. हा प्रयत्न करण्याचा त्याचा प्रयत्न आहे. तशी शक्ती त्याला देवाने दिलेली आहे. शेवटी त्यालाच कंटाळा आला. काय म्हणाला हे शक्य आहे कां? ईश्वराने सुद्धा हात टेकलेले आहेत. याचा अर्थ ईश्वराला सुधारणा करता येणार नाही असं नाही.

रामचंद्र आणखी निघालेले आहेत आपल्या लोकाला, सगळ्या अयोध्यावासी, सगळ्याही जीवांना बरोबर घेऊन गेलेच की नाही ? त्यांच्या मनाची सुधारणा सगळी होऊ शकते, करू शकतात ते. परमात्म्याची इच्छा झाल्यानंतर कांही अशक्य नाहीये. परंतु त्यांनी जे कर्मचक्र सुरु करून दिलेलं आहे, त्यातूनच येऊ दे, फिरुन फिरून येऊन एखाद्या वेळेला चांगली कर्महीं घडतील. जन्माला आल्यापासून काय सगळीच पापं घडतात असं नाहीये. चोरांचा सुद्धा आपल्या देवावर विश्वास असतो. ते अगदी पूजा–अर्चा करून नवस वगैरे आपलं हे, मुहुर्त वगैरे विचारून निघतात म्हणे चोरी करायला. अशी कांही ठिकाणी पद्धत आहे. ब्राह्मणाला दक्षिणा देऊन सांगा महाराज, चांगला लाभ आम्हाला झाला पाहिजे. त्याप्रमाणे हे सगळं आहेच की त्यांच्या मनात. नंतर आल्यानंतर पुन्हा सत्यनारायण करायचा वगैरे हे सगळं आहे. आता ही कर्म, यांचा उपयोग त्यांच्या मनाच्या शुद्धीला होईल किंवा नाही, हा विषय वेगळा आहे. पण कांही तरी वासना, चांगली वासना, चांगलं करावं असं वाटतं त्यांनासुद्धा. तेव्हा संपूर्ण विश्वातले जीव जे आहेत, ते एकदम या सृष्टीमधे पडलेले आहेत. त्यांच्या कर्मानी पडलेले आहेत. त्यांची व्यवस्था मात्र लावायचं काम देवाने आपल्याकडे घेतलंय. ते सुद्धा त्यांच्या कर्माप्रमाणे. व्यवस्था करायची म्हणजे कुणाला पक्षपात नाहीये. कुणालाही उगीच आपलं सुखी करायचं कुणाला दुःखी करायचं. तर हे जे सगळं कर्मचक्र सुरू करून दिलेलं आहे, सृष्टिचक्रामधे सगळे जीवात्मे फिरताहेत. कधीतरी सकाम कर्म करणं हा स्वभाव आहे प्रत्येकाचा. ईश्वरावर विश्वास कोणाचा नाही असं नाही. श्रद्धा प्रत्येकाच्या मनांत आहे. नास्तिक मनुष्याच्या मनातसुद्धा श्रद्धा आहे, ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. परंतु प्रत्येकाची श्रद्धास्थानं वेगळी वेगळी आहेत. श्रद्धा नाही असा मनुष्य नाही. तर अशा जन्मामधे किंवा सृष्टीमधे, एखाद्या वेळेला कोणातरी संतांची, महात्म्यांची भेट होऊन आणखी सन्मार्ग त्याला पटलेला आहे, त्याप्रमाणे तो वागलेला आहे. त्याच्या हातून पुण्यकर्म होतं आहे, आणि त्या पुण्याचा उपयोग म्हणून कोणत्यातरी जन्मामधे जास्ती–जास्ती त्याची वासना कमी–कमी होत जाते आहे. अशुभ वासना कमी, शुभ वासना वाढीला लागेल, हळूहळू आणखी त्याचा उद्धार होईल. मुद्दाम त्याचा आणखी उद्धार करायचा, मुद्दाम होऊ शकत नाही उद्धार. कार्तवीर्य अर्जुनानी जरी आणखी बलात्काराने, अगदी योगसामर्थ्य प्राप्त करून घेऊन अनेक रूपं धारण करून, प्रत्येक दुर्जनांच्या कटाच्या वेळेला

तिथे हजर राहून आणखी त्यांना बजावून त्यांचं आणखी तेवढ्यापुरतं मन हे, मनातले दुर्विचार थांबिवलेले आहेत, पण गेले नाहीत.

वासनाक्षय जो आहे तो अत्यंत कठीण आहे. ईश्वरकृपेशिवाय नाही आहे. दुसऱ्यांनी आणखी भीती दाखवून, राजशासनाने समाजाची सुधारणा पूर्णपणे होणार नाही. कायदा केला पुष्कळ झाला. पण कायद्यातूनही पुष्कळ मार्ग काढणारी बुद्धी आहे ना लोकांना. त्यांची जी बुद्धी आणखी वाममार्गाकडे गेलेली आहे, तो आपला वाममार्ग कायद्यामधे बसणार नाही अशा रीतीने, बुद्धीनं ते करू शकतात. त्यांना सल्लागार आणखी बुद्धिवादी लोकं भेटतात. असं करा म्हणजे कायद्याचा विरोध नाही. असं चाललेलं आहे पुष्कळ. तेव्हा मनाची शुद्धी, मनातल्या सगळ्या वासनांचा क्षय हा क्रमानेच होणार आहे. एकदम होऊ शकत नाहीये. **अनेक जन्म संसिद्धः..... मुद्दाम भगवान सांगताहेत किती वेळ लागेल, देवाचं दर्शन होण्याला, किती वेळ सांगता येत नाही.** तुमच्या मनाची जितकी शुद्धी होऊन जाईल, तितकी आणखी देव जवळ जवळ आहे. तुम्ही देवाच्या जवळ जाल. एवढंच सांगितलेलं आहे. मनाच्या शुद्धीचे प्रकारही अनेक सांगितलेले आहेत.

निर्मानमोहा जितसङ्गदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ।
द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःखसञ्ज्ञैर्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत् ॥ (भ.गी. १५.५)

ही इतकी तयारी झाली पाहिजे. म्हणजे त्या अव्ययपदापर्यंत, भगवतपदापर्यंत, पोचता येतं. जीव जाऊ शकतो. ही सगळी मनाची योग्यता, ही कांही अभ्यासाने होते. तशी संगती चांगली पाहिजे. त्याप्रमाणे मनामध्ये आपला स्वतःचा विचार रोज चालू पाहिजे. आज सकाळी उठल्यापासून संध्याकाळपर्यंत आपण पशुप्रमाणे वागलो कां संतांप्रमाणे वागलो याचा विचार आपला आपण करायला नको ? कां दुसरा कोणी आपल्याकरता विचार करणार आहे? ज्याचे त्याला आहेच की, प्रत्येकाने आपल्या-आपल्या सुख-दुःखाचा, आपल्या एकंदर योग्य अयोग्य कर्माचा विचार ज्याचा त्यानी करायचा आहे, आणि तो विचार जसा जसा आणखी सुरू होईल, वाईट कर्म जास्त होतात, चांगली कर्म कमी होतायत, होतच नाहीत, हे त्याला कळून ज्यावेळेस येईल, लाज वाटायला लागेल, दुःख व्हायला लागेल, आपली वाईट कर्म कमी झाली पाहिजेत, असं वाटायला लागेल, मग त्याला कोणीतरी मार्गदर्शक भेटेल. ईश्वराच्या प्रसादानी, आणि मग हळुहळू तो मार्गाला लागणार आहे. तोपर्यंत नाहीये. असे अनेक जन्म जाणारेत. पैसा मिळेल, संपत्ती मिळेल, चांगलं आणखी व्यावहारिक ज्याला सुख आपण ज्याला समजतो ते मिळेल, पण टिकाऊ सुख नाहीये. सुखाच्या वेळेलासुद्धा दुःखाचा प्रसंग संसारात असतो.

भागवतातली जी, गोष्ट आहे, तो चित्रकेतू राजाची कथा सांगितली त्यांनी. त्या राजाला पुष्कळ स्त्रिया होत्या, पण मुलं नाहीत. दुःखी होता. अंगीरा ऋषि आले. त्यांना त्यानी हाच प्रश्न

केला. सकाम मनुष्य आहे. राजा झाला काय, आणखी रंक झाला काय. आपल्याला पुष्कळ वासना मनामधे असतात. इच्छा असतात, त्या इच्छा पूर्ण व्हाव्यात असं त्याला वाटतं म्हणून ईश्वराची भक्ती करायची. संतांची संगती त्याकरिता करायची, असंच त्याला वाटतं प्रथम आरंभाला. त्यांनी विचारलं मला मुलगा नाही म्हणाले, हे एक दुःख आहे. केवढी संपत्ती आहे, केवढं साम्राज्य आहे, पण मूल नाही. ते आत्मज्ञानाचा उपदेश करण्याकरिता अंगिरा ऋषि आलेले आहेत. घरी. पण हा, याची वासना तशी नाही. आत्मज्ञान कुठलं ? तिकडं कसं लक्षच नाही? संसारामधे सुख मिळालं पाहिजे हीच इच्छा आहे. **संसारात सुख नाही अशी मनाची पक्की कल्पना झाल्याशिवाय ज्ञानाचा उपदेश कोणीही साधू पुरूष करीत नाहीत.** संसार पाहिजे, बाबा कर कांही. देवाला शरण जा. देवाचे हे करत जा. असेच उपाय सांगतात. शास्त्रानी, वेदशास्त्रांनीही तेच सांगून दिलेलं आहे. अनेक सकाम कर्म आहेत. उपासना, निरनिराळ्या प्रकारची साधनं, अशी अनेक सांगितलेली आहेत. मग अंगीराऋषींनी त्याच्याकडून एक लहानसा यज्ञ करिवला. त्याला यज्ञप्रसाद दिला, त्याच्या स्त्रीला मुलगा झाला. आनंद झालेला आहे. संसारात आता कांहीही कमी नाही, मुलगा एक तो नव्हता तेव्हढा, मुलगा मिळाला. संसार म्हणजे अगदी पूर्ण झाला असं त्याला वाटतं आहे. पण त्याच वेळेला आणखी दुःखाचा संबंध सुरू झाला. ज्या राणीला मुलगा झालेला आहे तिला तर आनंद आहे. राजालाही आनंद आहे. सगळ्या प्रजाजनानांही आनंद आहे. त्या राजाच्या दुसऱ्या स्त्रिया ज्या होत्या, त्यांना काय वाटलं असेल? त्यांनाही मुलगा-बिलगा नाही. या राणीला मुलगा झाला आणि आम्हाला मुलगा झाला नाही. या राणीवर जास्ती राजाचं प्रेम आहे. प्रजाजनांचं प्रेम आहे. जास्ती सुखी ही राणी आहे. आम्हाला हे सुख नाही आहे. बरं नसलं तरी तो मुलगा आपला समजून प्रेमाने वागल असलं तरी सुद्धा सुख मिळतय. तो अभ्यास पाहिजे मनाला. आपला मुलगा नापास झाला आणि दुसरा पास झाला म्हणजे कुणी पेढे वाटत नाहीये. पण ते वाटले पाहिजेत. म्हणजे मनाची तयारी होते. आपल्या मुलाला आणखी जास्ती मार्क मिळाले नाहीत, गुण मिळाले नाहीत, तो नापास झाला तरी दुसरा जो त्याच्याबरोबर अभ्यास करणारा त्याचा मित्र आहे तो पास झालाय ना? त्याच्याकरता सुद्धा पेढे वाटायला पाहिजेत. म्हणजे मनाला तसं शिकवलं पाहिजे. तो आपला नाहीये तो पास झाला म्हणून काय करायचं? आनंद मिळवता येत नाहीये. नापास झालेल्या मुलाला पास करता येत नाही आपल्याला, आनंद मिळवायला. आपलाच मुलगा पास झाला पाहिजे तर पेढे वाटायचे म्हटलं तर त्या वर्षी होणार नाहीये. पुढच्या वर्षी तो जर चांगला अभ्यास करून पास झाला तर पेढे वाटता येतील. तो आनंद नंतर मिळेल. आज आनंद घ्यायचा असेल तर मनाची अशी तयारी केली पाहिजे. हाही आपल्या मुलाबरोबर अभ्यास करणारा आपलाच

आहे, चांगला गुणी आहे, उत्तम विद्यार्थी आहे. त्याच्या करिता आनंद म्हणून पेढे वाटले पाहिजेत, तर मनाला तो अभ्यास होतो आहे, नाहीतर होणार नाहीये. तर या स्त्रियांच्या मनामधे आणखी मत्सर उत्पन्न झालेला आहे. दुसऱ्याचं सुख पाहिलं आणि आपल्याला ते सुख नसलं म्हणजे त्याचा द्वेष मनामधे उत्पन्न होतो, हा एक मोठा भयंकर विकार आहे.

संपूर्ण आणखी कौरवांचा विनाश या दोषामुळे झालेला आहे. पांडव हे चांगले म्हणताहेत, सगळे लोक पांडवांना चांगले म्हणतात, पांडवांना चांगले म्हणतात. आम्हाला कां म्हणत नाहीत. त्यांच्याशी मैत्री केल्यानंतर पांडव आपलेच आहेत ही जर समजूत झाली असती तर आपला म्हणून जो आहे त्याला जर चांगलं म्हटलं तर आपल्याला बरं वाटतं. तो दुसरा आहे, आपला नाही म्हटलं की बरं वाटत नाहीये. तेव्हा दुसऱ्याचं जरी सुख असलं, मुलाला पगार मिळतो आहे. आपली नोकरी संपलेली आहे. मला आता पगार नाहीये. पण मुलाला पगार मिळतो आहे आनंद वाटतो की नाही? त्याला नोकरी लागलेली आहे त्यालाही पगार सुरू झालेला आहे. काय स्वतःला याला झालाय पगार सुरू? याचा बंद झाला पगार. त्याला दुःख व्हायला पाहिजे. म्हणजे दुसरा जरी असला तरी तो आत्मीय म्हणून मानला गेला, माझा मुलगा आहे. एवढी समजूत फक्त मनाची आहे. मनाने ठरवलेलं आहे की हा माझा मुलगा आहे. मग त्याचं सुख सुद्धा आपलं सुख ठरतंय, त्याबद्दल मनामधे कांहीही राग किंवा द्वेष हे कांहीही विकार उत्पन्न होत नाहीत. हे मनाची सुधारणा करण्याकरता हा अभ्यास आहे.

मैत्रीकरुणामुदितोपेक्षाणां सुखदुःखपुण्यापुण्यविषयाणां भावनातश्चित्तप्रसादनम् ।

(पतंजली योग, समाधिपाद १.३३)

प्रसन्न अंतःकरण आहे, पण नाही. हे होत नाहीये. उलट दुसऱ्याचं हे सुख, दुसरा हा आहे, माझा नाही असं अगोदरच ठरवायचं. पण त्याला सुख झालेलं आणि आपल्याला नाही की त्याचा द्वेष करायचा, म्हणजे मन अशांत आहे. नेहमी मनामधे अशांती आहे. शांती नाही. त्या स्त्रियांच्या अंतःकरणामधे द्वेषबुद्धी निर्माण झाली. पण बाहेरून त्यांनी दाखवली नाही. त्या मुलाला घ्यायचं, दूध पाजवायचं, खेळवायचं वगैरे बाहेरून जास्ती प्रेम दाखवलं त्यांनी. त्याच्या सख्ख्या आईला वाटलं की या सुद्धा, आपल्या सवती जरी असल्या तरी, चांगल्या मनाच्या दिसतायत. त्यांना कांही आपल्याला मुलगा नाही आणि मलाच मुलगा झाला म्हणून कांही यांच्या मनामधे कांही मत्सर वगैरे नाही काही. चांगलं आहे बुवा. असंच ती समजती आहे. **सुख ज्या वेळेला मिळालेलं आहे त्या वेळेपासूनही दुःखाचे बीजही पेरलेलं आहे. संसार असा आहे. केवळ सुख नाही, कधीही नाही. दुःख दिसणार नाही पण त्याच वेळेला दुःखाचं बीज पेरलेलं आहे हे इथं सिद्ध झालेलं आहे.** त्या मुलाला मारायचंय, हे त्या सगळ्या स्त्रियांच्या आणखी मनामधे आहे आणि एके दिवशी त्यांनी त्या मुलाला पाजलं विष.

दुधामधे आणखी विष घालून, त्याला दूध पाजिवलेलं आहे आणि पाळण्यामधे निजवून त्या स्त्रिया निघून गेल्या. दासीला सांगितलं या राणीनं, की मुलगा निजलाय म्हणाले, बाळ बराच वेळ झाला. उठीव त्याला, घेऊन ये. भूक लागली असेल. ती दासी गेली. पाहाते आहे तो मुलगा गतप्राण झालेला आहे. ती ओरडली, धाड्दिशी खाली पडलेली आहे. राणी धावत गेली. तिनंही ते पाहिलं आणि तिलाही मूर्च्छा आली. राजाला समजलं, राजाही अगदी दुःखी झालेला आहे. त्या स्त्रियाही जास्ती रडायला लागल्या म्हणे. कारण प्रेम, दाखवायचं प्रेम, हे खरं वाटतं लोकांना. खरं प्रेम कोणच, आणखी खोटं प्रेम कोणतं हे समजूनच येत नाही. त्यामुळे प्रेम दाखविण्याचे जे परिणाम आहेत, अगदी हात जोडलेत, डोकं टेकलं, अगदी साष्टांग नमस्कार घातला म्हणजे हा चांगला आहे बाबा. आपल्याबद्दल आदर आहे, पण काय त्याच्या मनात आहे, कुणास ठाऊक? एकूण, गेला तो मुलगा. शेवटी उपदेश केला नारदांनी.

आणि मग त्या चित्रकेतू राजाला संसार कसा आहे ते समजून आलेलं आहे. सुख मिळालेलं आहे, पण त्या वेळेलाही दुःख पाठीमागून येतंय. पण समजत नाही आम्हाला. अगदी पूर्ण सुखी, आपल्यासारखा सुखी कोणीच नाही. अशाच आनंदामधे निमग्न असतो आपण सगळीच तशी आहेत, कोणीही असो.

तर ही स्थिती जी आहे, त्याची सुधारणा कशी करायची? सुख मिळालेलं असताना सुद्धा त्यावेळेला अगदी निरंहकार राहता आलं पाहिजे. आहे, देवाच्या कृपेने मिळालेले आहे. हे त्याच्या कृपेने राहायचं तितकं राहील, जायचं तर जाईल. अशी समवृत्ती, निर्विकार वृत्ती ही ज्या वेळेला साध्य होईल, मनामधे कोणच्याही प्रकारचा, कोणाबद्दलही द्वेष नाही, मत्सर नाही, कांही नाही. शांत अंतःकरण आहे, शांत अंतःकरणानी, परिस्थितीचा, आणखी जीवनाचा उपभोग घेतो आहे. चाललेले आहे, चांगलं चाललेलं आहे जीवन ! चांगले जीवन असतं, मान मिळाला नाही हरकत नाही, अपमान झाला तरी हरकत नाही चाललंय. दोन्ही जाणारच आहे. असा अभ्यास ज्याला करता आलेला आहे, तसा मार्गदर्शक महात्मा ज्याला भेटलेला आहे त्याच्या कृपेनं, ईश्वराच्या कृपेनं, ही मनाची सुधारणा करण्याची वृत्ती ज्याला निर्माण झालेली आहे, तो त्या मार्गाने जातो. असा अनेक जन्म अभ्यास करता करता आणखी परमेश्वराजवळ जाऊन तो पोचतो आहे. मध्ये मध्ये सहाय्य ईश्वराचं किंवा ईश्वराच्या विभूति असलेल्या महात्म्यांचं सहाय्य त्याला अनेक जन्मामधे मिळतं आहे. एकदम कायद्याने किंवा एकदम आणखी बलात्काराने कोणाच्याही मनाची सुधारणा होऊ शकत नाही आहे.

येथे तुका म्हणे नाही चालत तांतडी । प्राप्त काळ घडी आल्या विण ॥

(तुकाराम गाथा-१५०४)

तर हा राजा जन्माला आलेला आहे. दुःखी आहे बिचारा, म्हणजे त्याला खरं सुख किंवा असं कांही पाहिजे आहे. तळमळ आहे मनामध्ये. महाराजांचं हे सामर्थ्य त्याने ऐकल्याबरोबर तो धावत धावत आणखी त्या संगमावर गेला, नमस्कार केला.

तमेत्य प्रणिपत्योचे दण्डवद्ददक्षरः ।

पुलकाङ्कितदेहो राड् **दीनं माम्पाहि किङ्करम् ॥ (द्विसाहस्त्री १३.१३)**

अश्रुधारा डोळ्यातून वाहताहेत. हात जोडून, महाराज माझा उद्धार करा. कृपा करा माझ्यावर. संरक्षण करा माझं. चाललेलो आहे, या काळाच्या मुखामधे सापडलेलो आहे मी, या काळाच्या मुखातून मला निघता येत नाहीये. चाललेलं आहे. आयुष्याचा रथ चाललेला आहे. तो रथ कुठे बंद पडणाराय, केव्हा बंद पडणार आहे कांहीही कोणाला सांगता येत नाही, पण त्याचा विचार पाहिजे. गेलेलं आयुष्य गेलं, संपलेलं आहे, पुन्हा एक आयुष्य आणखीन् थोडसं वाढवून मिळावं. कांही अर्ज कोणाला करता येत नाहीत, अर्ज केला तरी ते मिळणं शक्य नाही. अशी स्थिती जर आहे, तर त्या स्थितीमधे आपला आपल्याला कांहीतरी आणखी समाधान आपल्याला मिळेल, आपल्या बुद्धीमध्ये आणखी चांगली वृत्ती उत्पन्न होईल याकरता प्रयत्न करायचाय. म्हणून तो राजा खरा अधिकारी होता आणि त्यानी महाराजांची प्रार्थना केली असताना महाराज म्हणाले, 'बाबा, अरे तू राजा म्हणाले. सैन्य आणखी घेऊन आमच्यासारख्या संन्याशाकडे येण्याचं तुला कारण काय आहे ? म्हणाले.'

दण्डी वनचरोऽस्म्यङ्ग भिक्षुस्त्वं सेनया सह । (द्विसाहस्त्री १३.१४)

मी तर, म्हणाले, 'भिक्षा मागणारा एक संन्यासी मनुष्य आहे, दंड-कमंडलू घेणारा. तू राजा आहेस मोठा. आणि इतक्या उत्कंठेनं, आणि धावत धावत म्हणाले सगळं सैन्य घेऊन इथं येण्याचं कारण काय आहे? त्यांनी विचारलं. पण राजाने सांगितलं, आपला मोठेपणा ते कधीही दाखवित नाहीत. अमानीत्व अमत्सरः वगैरे सांगतात ना !

अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् ।

आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥ **(भ.गी. १३.७)**

हे जे काही भगवंतांनी ज्ञानस्वरूप गुण आहेत म्हणाले, ते गुण म्हणजेच ज्ञान आहे. त्यातलं अमानित्व म्हणजे या महात्म्यांचं अगदी मुरलेलं आहे.

पूज्यता डोळां न देखावी । स्वकीर्ति कानीं नायकावी ।
हा अमुका ऐसी नोहावी । सेचि लोकां ॥ (ज्ञाने. १३.१८९)

काय अमानित्व आहे, ज्ञानेश्वर महाराजांनी अमानित्वाचं स्पष्टीकरण किती करून मांडलेलं आहे त्यांनी. इतकं अमानित्वाचं हे जर, ज्याला मिळालेलं आहे त्याला काय दुःख कसलं आहे.

कुठला अपमान आणि कुठले काय, कांही तिकडे लक्षच नाहीये. हत्ती, अगदी रानातला हत्ती आहे. आणखी अत्यंत मत्त झालेला आहे. त्याच्या गंडस्थळावरती आणखी मध वाहतो आहे. रानातल्या त्या मधमाशा त्याच्या गंडस्थळावर येऊन चावताहेत, हे करतायत, त्याला, त्याचं लक्षच नाही. कितीही माशा चावल्या अन् काय. केवढा मोठा आहे. त्याचच सामर्थ्य आहे. कुठलं माश्याकडे लक्ष जाणार, तसे जे कांही आणखी दंशमक्षिकासारखे असणारे दुर्जन भवाटवीमध्ये असतात, त्या दुर्जनांनी कितीही जरी अपमान केला तरी हा जो आत्मानंद यांनी मिळिवलेला आहे, महात्म्यांनी, त्याचं अमानित्व इतकं सिद्ध आहे. की त्याला याची कांही कल्पनाही नाही. कोण दुःख देतय, कोण टोचून बोलतय, कोण निंदा करताय, निंदा-स्तुती हा शब्द सुद्धा त्याला माहिती नाहीये. इतक्या भूमिकेवर गेलेल्या महात्म्याला त्रास कोण देऊ शकणार आहे?

अतृणे पतितो वह्निः स्वयमेवोपश्याम्यति ।

अक्षमावान् परं दोषैरात्मानं चैव योजयेत । **(महाभारत, विदुरनीति-१.५६)**

त्याने स्वतःच गप्प राहिलं पाहिजे. तेव्हा स्वतःचं महत्त्व कधीही मुखाने उगाळू नये. मी म्हणाले, सामान्य संन्यासी आहे बाबा. कशाला आलास आमच्याकडे? नाही, महाराज आपण सामान्य नाही आहात.

भवान्मायानरो भिक्षुर्नैवास्ति परमेश्वर ।

हित्वारण्यविहारं भो पावनं कुरु मे पुरम् ॥ (द्विसाहस्त्री १३.१५)

महाराज, आपण जरी हे आणखी सगळं सोंग घेतलं, आम्ही संन्यासी आहोत, फिरणारे आहोत, वनात राहाणारे आहोत, भिक्षा मागणारे आहोत, नाही म्हणाले. आपण साक्षात परमेश्वर आहात. मायानरः. नर दिसता तुम्ही, मनुष्य दिसता पण मायेनं आहे, खरे मानव नाही आहात. खरे परमेश्वर आहात. तेव्हा मी हीच प्रार्थना करण्याकरिता आलेलो आहे की, आपण अरण्यात आता राहू नका महाराज. आमच्या नगरामधे या, आमच्या आणखी गांवामधे येऊन आमच्या गांवाला पवित्र आपण करा. अशी अगदी, खरी मनापासून, प्रार्थना राजाने केलेली आहे. आता त्याचंही भाग्य होतं. तोही मोठा, मनामधे आणखी त्याची शुद्धीही पुष्कळ झालेली होती असं मानायला हरकत नाही. स्वतःचे राजेपण सोडून दिलं आहे त्याने. नम्र होऊन महाराजांच्या जवळ आलेला आहे. हट्ट घेतला त्याने. या महाराज चला, तुम्हाला नेण्याकरिता आलेलो आम्ही. विचार केला महाराजांनी, जाऊ या म्हणाले, काय? बारा वर्षे आपण आता तिथे नरसोबावाडीला जंगलामधेच राहिलो. कोणी मनुष्य नाही. कांही नाही. आता इथे सगळ्या मंडळींमधे राहण्याची पाळी आलेली आहे. येऊ दे, कांही हरकत नाही. जीवात्मे बिचारे किती दुःखी आहेत काय दुःखी आहेत त्यांची दुःखं कशी दूर करायची हा विचार करायला लागेल. करता येईल. जाऊ या. बरयं चला. राजाची इच्छा पूर्ण करायचं ठरलं. चला राजेसाहेब, म्हणाले.

पालखीमधे महाराजांना बशिवलेलं आहे, वाद्यं वाजताहेत, सैनिक पुढे निघालेले आहेत. ब्राह्मण मंडळी वेदमंत्र पठण करताहेत. भजन चाललेलं आहे. अशा आनंदामधे महाराजांना घेऊन आणि तो राजा गाणगापूरामधे आलेला आहे. गांवात. गांवाच्या बाहेर एक अश्वत्थ वृक्ष होता. महाराजांनी सांगितलं ही जागा बरी आहे म्हणाले. इथं तू मठ बांध. इथं राहू आम्ही. त्याच वेळेला त्या बाजूला कोणीही माणसं जात नव्हती. गांव जरासं बाजूला होतं आणि हा अश्वत्थ वृक्ष आणि किंवा हे सगळं, लोकांनी ते सोडून दिलेलं होतं. कारण तिथे एक ब्रह्मराक्षस रहात होता, अशी लोकांची कल्पना होती. आणि तिकडे कोणी गेलेला मनुष्य पुन्हा जिवंत यायचाच नाही. असेही प्रसंग आलेले आहेत. आणि त्याचप्रमाणे झालं ! महाराज तिथं, त्या अश्वत्थ वृक्षाखाली गेल्याबरोबर. तो ब्रह्मराक्षस खाली उतरून आलेला आहे. नमस्कार केला. महाराज माझा उद्धार करा. किती काळ माझा या जन्मामधे गेलाय, राक्षस, ब्रम्हराक्षस योनी जन्मामध्ये. यातून माझा उद्धार आपण करा महाराज, दुसरा कोणीही समर्थ नाहीये. जन्मातून त्याचं परिवर्तन करायचंय. त्याच्या कर्माप्रमाणे त्याला ब्रह्मराक्षसाची योनी प्राप्त झालेली असताना, त्याही योनीतून तो मुक्त होऊ शकतो हे सामर्थ्य आहे. संतांचं, ईश्वराचं सामर्थ्य आहे. बराय, त्याला सांगितलं, जा म्हणाले, संगमावर जाऊन भीमा– अमरजा संगमावर जाऊन स्नान कर म्हणजे तू मुक्त होशील. हेच फक्त साधन आहे. ब्रह्मराक्षसाप्रमाणे, सगळ्यांनाच असं होत नाही. महाराजांनी साधन सांगितलं, स्नान केल्याबरोबर मुक्त होणार आहे, आणि झाला तो मुक्त ! पुन्हा ब्रह्मराक्षस दिसला नाही त्या झाडावरती.

गेला. त्याला मुक्ती मिळालेली आहे. तत्काळ मुक्ती आहे. त्या जन्मातून त्याला काढून पुन्हा चांगल्या जन्मामध्ये, चांगल्या देहामधे त्याला ठेवलेलं आहे. देहामधे सुद्धा चांगले वाईट देह आहेत. यंत्र आहे ते. शरीर हे यंत्र आहे. कोणच्या शरीरामधे मन बुद्धी, इंद्रिय वगैरे ठेवायचे हे देवाला माहिती आहे, त्याच्या कर्माप्रमाणे. म्हणून त्याच्या देहाचा संबंध आल्यानंतर तशा प्रकारची आणखी सत्कर्म घडतात. **तसा जर आणखी सत्संग झाला तर, नाहीतर चांगल्या देहात येऊन सुद्धा आणि सत्कर्म घडत नाहीत. फुकट जातो तो देह.**

त्या ब्रह्मराक्षसाचा उद्धार केला महाराजांनी. नंतर तिथे राजाने मोठं हे बांधले आहे रहायला, राहू लागले महाराज. आणि राजाही मोठा भक्त बनलेला आहे. राजाला आणखी वनामधे जाण्याची इच्छा उत्पन्न झाली. कांही शिकारीला जाण्याची इच्छा उत्पन्न झाली, मठामधे यावं, महाराज, चला आपण जाऊ या वनामधे, तिथं शिकार करायचीय आम्हाला. आपणही बरोबर असलं तर चांगलं होईल. बराय, चला म्हणाले. पालखीतून बसून यांनी जावं, वनामधे, राहावं, पुन्हा गावामधे यावं. असं सुरू झालं. ही बातमी सगळीकडे पसरली. कोणीतरी एक स्वामी गाणगापूरामधे आलेले आहेत आणि राजेसाहेब त्यांचे भक्त बनलेले

आहेत आणि त्या भक्ताच्या इच्छेप्रमाणे हे स्वामिमहाराज त्याच्याबरोबर कुठेही जातात. रानामधे, वनामधे जातात. दुसऱ्या कुठंही गांवामधे जाणं, फिरायला जाणं, सगळं कांही राजाबरोबर चाललेलं आहे. अशी बातमी जिकडे तिकडे पसरली. बरं. त्यांनी वंध्या महिषीला आणखी दुध दिलेलं आहे. ब्रह्मराक्षसाला मुक्त केलेलं आहे, असे श्रेष्ठ पुरूष आहेत. ही ही बातमी पसरलेली आहे. कोणीतरी सिद्ध महात्मा आहे. पण ते असे करायला लागले. त्या राजाने आपलं त्यांना आपल्या हातातलं बाहुलंच बनिवलय म्हणाले. केव्हाही घेऊन जातो, केव्हाही आणून सोडतो. तर, तिथूनच जवळ एक कुमसी नांवाचं गाव होतं. त्या गांवामधे एक त्रिविक्रमभारती नांवाचे मोठे संन्यासी रहात होते. हेही अधिकारी आहेत, **तीन वेदांचा अभ्यास त्यांनी केलेला होता**. ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद. असा तीन वेदांचा अभ्यास केला होता.

वेदानधीत्य वेदौ वा वेदं वाऽपि यथाक्रमम् ।
अविप्लुतब्रह्मचर्यो गृहस्थाश्रममावसेत् ॥ (मनुस्मृति ३.२)

स्मृतिकार सांगताहेत, वेदांचा अभ्यास करा म्हणतात. म्हणजे तीन वेद. निदान वेदौवा, दोन वेदांचा तरी करा. किंवा अगदीच नसेल तर वेदोवा आपला स्वतःचा वेद, त्याचा तरी अभ्यास करा. कांही ज्ञान मिळवा. गुणदोष कोणते आहेत, सुधारणा कशाने होईल, काय ईश्वर म्हणजे कोण आहे, सर्व नियामक कोण आहे ते निदान समजून तरी घ्या म्हणतात. आचरण करणं, त्याचप्रमाणे भगवत भक्ती घडणं वगैरे हा पुढचा मार्ग आहे. तर हे त्रिविक्रमभारती, त्रिवेदी होते. पूर्वी असे द्विवेदी, त्रिवेदी, चतुर्वेदी अशी आडनांव होती. त्यांच्या एकंदर ज्ञानावरून. नुसतं आडनांव नाहीये. वाघमारे आडनांव असतं, पण काय आता सध्या वाघ पाहिल्यानंतर काय करतात कोणाला ठाऊक. तर तस एकंदर मोठे ज्ञान आहे त्रिविक्रमभारतींचं आणि त्यांच्या कानावरती या स्वामीमहाराजांचा वृत्तांत पडलेला आहे. कोण एक स्वामी कोणी तरी आलेले आहेत बुवा. गाणगापुरामधे राजा त्यांच्या नादी लागलेला आहे आणि त्यांना हे समजल्याबरोबर त्यांनी सर्व लोकांना सांगायला सुरूवात केली, की, काय म्हणाले बुवाबाजी चालली आहे? आत्ताच लोक बोलतायत असं नाहीये. कुठंही एखाद्या ठिकाणी कांही सत्कर्म चाललेलं आहे, यज्ञयाग चालू आहे. अन्नदान चालू आहे तिथं आपलं पहिल्या प्रथम हे आहे. काय म्हणाले हे सगळं अगदी ही बुवाबाजी काय म्हणे ! अग्नीमधे तूप काय घालतात, तांदूळ काय घालतात, भात काय घालतात, तीळ काय घालतात. किती लोकं उपाशी आहेत. हाच जर खर्च कमी झाला म्हणजे केला नाही यज्ञ, तर तिकडे म्हणाले इतक्या लोकांना अन्न मिळेल. कितीतरी धान्य आणखी स्टेशनवर म्हणा किंवा पाऊस पडला भिजून गेलं, वाया गेलं अशा सुद्धा वर्तमानपत्रामधे गोष्टी आपण आणखी ऐकतो. त्यावेळेला कोणी बोलत नाही की फुकट गेलं अन्न. आणि हे फुकट गेलं

असं ठरवलं कोणी? अग्नीमध्ये अर्पण केलेलं फुकट जातं असं आम्ही डोळ्यांनी पाहून सांगतो का? फुकट गेलं म्हणून? अग्निनारायण म्हणजे सर्व देवतांचं मुख आहे. देवतांच्या मुखामध्ये घातल्यानंतर सगळ्या देवतांना तो भाग मिळणार आहे. अशा दृष्टीनं विधीप्रमाणे ते कर्म चाललेलं आहे. तर हे सर्वही एकंदर ज्ञान जे आहे ते ज्ञान मिळवलेलं आहे, त्रिविक्रमभारतीनी. तीन वेदांचा अभ्यास केलेला आहे. सर्व शास्त्रांचा अभ्यास झालेला आहे आणि त्याच्यानंतर त्याच्यापेक्षाही मोठं म्हणजे सर्वसंग परित्याग केलेला आहे. इतक्या ज्ञानी माणसाला. राजा, विद्वान सर्वत्र पूज्यते म्हणतात, स्वदेश असो परदेश असो. विद्वान, खरा जर विद्वान असेल, ज्ञानी असेल, तर त्याला मान हा मिळालाच पाहिजे. प्रांतभेदाचा त्या ठिकाणी संबंध नाहीये. हा आपल्या प्रांतातला आहे आणि दुसऱ्या प्रांतातला आहे ही समजूत उत्पन्न झाली आणि अनादर जर मनामधे उत्पन्न झाला, केला गेला, तर तो कांही खरा हे नाहीये.

प्रांताचा अभिमान असावा, नाही असं नाही, पण त्या प्रांतामधे कोणीही दुसऱ्या प्रांतातला जरी विद्वान आला, त्याचाही आदर केला पाहिजे. करावा लागतो, करतात. जरी कांही अभिमान असला तरी. तर अशा प्रकारचे त्रिविक्रमभारती. उत्तम ज्ञान मिळालेलं आहे. परंतु....

नवल अहंकाराची गोठी । विशेषें न लगे अज्ञानापाठीं ।
सज्ञानाचे झोंबे कंठीं । नाना संकटीं नाचवी ॥ (ज्ञाने. १३.८२)

ज्ञानराज म्हणताहेत, काय अहंकार केवढा मोठा आहे. अज्ञानी माणसाला अहंकार कांही त्रास देत नाही. त्याला कांही कळतच नाही. तोही मान्य करतो मला कांही कळत नाही. **कळत नाही हे मान्य करणं हेच ज्ञान आहे खरं.** पण कळत नाही हेच कोणी मान्य करीत नाहीये. मी मोठा आहे, मला सगळं कळतं. काय कळतं, कुणाला ठाऊक. पुष्कळ चुका होतात. नंतर पुन्हा छापायचं की आमच्या हातून अशा चुका झाल्या, तशा चुका झाल्या, काय उपयोग काय. सांगून? किती हानी झाली काय झालं. तर हा अहंकार इतका विलक्षण आहे. नामदेवरायांनी मुद्दाम पांडुरंगाजवळ प्रार्थना केली.

अहंकाराचा वारा न लागो राजसा ।
माझिया विष्णुदासा, भाविकासी ॥ (नामदेव गाथा)

त्याला अहंकाराने, त्याने तरी त्यांना त्रास देऊ नये देवा एवढा तरी बंदोबस्त करा तुम्ही. **भाविक विष्णुदास त्याला अहंकाराने आणखी त्रास देवू नये.** आणखी गाठू नये. तर त्याच्या भक्तीचं चीज होईल, त्याला शांती मिळेल. त्याच्या द्वाराने सर्वांना शांती मिळेल.

त्रिविक्रमभारतींच्या जवळ उत्तम ज्ञान आहे, मार्गदर्शन करण्याची शक्ती आहे. अन् सर्व संग परित्याग केलेला आहे. नुसतं ज्ञान, शाब्दिक ज्ञान नाहीये ! सर्वही एकंदर विश्वाचं स्वरूप

ओळखलेलं आहे. नित्यानित्य विवेक आहे. अनित्याकडे लक्ष नाहीये. सगळं टाकून दिलेलं आहे आणि नित्य जे परमात्म्याचं स्वरूप, त्यांचे चिंतन करतायत. परंतु त्यांच्याही चित्तामधे अशा प्रकारचा एक अहंकार निर्माण झाला. तो समजत नाही. **अहंकार कसा गाठतो, कसा एकंदर आणखी आपल्याला अधःपाताला नेतो हे शेवटपर्यंत कळत नाहीये. मी मोठा आहे, मला सर्व समजतं आहे, हा दोष आहे म्हणून कल्पनाच येत नाही मनामधे** आणि त्यामुळे राग द्वेषादिक विकार अनेक उत्पन्न होतायत. **जास्ती जास्ती अधःपात त्याचा होत जातो. शेवटपर्यंत कळत नाहीये.** तेव्हा, एवढे त्रिविक्रमभारती; नरसिंहांचे उपासक होते मोठे. नरसिंहांची भक्ती करणं, ध्यान करणं, रोज त्यांचं कार्य चाललेलं आहे आणि वैराग्य पूर्ण आहे नं. संन्यास म्हणजे कांही सोपी गोष्ट नाहीये. सर्व संन्यास, मनापासून संन्यास झालेला आहे. सगळे असे आणखी दोष सगळे लक्षात आहेत म्हणून मन जातच नाही तिकडं. अशी इतकी तयारी आहे. परमार्थमार्गामध्ये उत्तम तयारी आहे. पण तो मधे आला, अहंकार आड आला. ते स्वामि कुठले म्हणाले असे कसे वागतात? हे काय संन्याशाने असं वागायचं काय? राजा आला म्हणे, पालखीत बसून घेऊन गेला, म्हणे, रानामधे शिकारीला जायचं ? त्यांना काय जरूर पडली. राजवाड्यामध्ये जायची जरुर काय यांना. असं कांही निंदा त्यांनी सुरू केली. ती महाराजांना समजली. किती आणि परमार्थ यांनी आत्मसात करून घेतला आहे आणि आता बाजूला जाणार परमार्थापासून. याची सुधारणा अवश्य केली पाहिजे. म्हणून आणखी महाराजांनी राजाला एके दिवशी सांगितलं. राजेसाहेब, आपल्याला कुमसीला जायचंय म्हणाले. त्रिविक्रमभारती कोणी मोठे संन्यासी आहेत म्हणे. जाऊ या, भेटून येऊ या आपण.

आणखी ठरलं, दुसरे दिवशी सैन्य वगैरे बरोबर घेतलं राजांनी. आणखी महाराज पालखीमधे बसलेले आहेत. निघाली सगळी मंडळी. गांवाजवळ आलेले आहेत. नदीतीरावरती येऊन पोचलेले आहेत. त्रिविक्रमभारती पूजा समाप्त करून नरसिंहांचं ध्यान करण्याकरिता आणखी अभ्यास करीत होते. पण त्यांच्या मनामधे नरसिंहांची मूर्ति कांही आली नाही. हे नरसिंह प्रत्यक्ष बाहेर आलेले आहेत ना आता ! मनात कुठले नरसिंह येणार. कांही चैन पडेना. उठले त्रिविक्रमभारती आणि नदीवर येण्याकरता निघाले. आणि नदीवर येऊन पहातायत, ते सगळे जे सैन्य होतं बरोबर, ते सगळेही संन्यासी त्यांना दिसू लागले. सगळे संन्यासी ! कोण लहान, प्रत्येकाच्या हातात दंड-कमंडलू आहे. महाराज एक संन्यासी, त्यांच्यासारखेच सगळेही संन्यासी आहेत. हे दर्शन त्याला झालं आणि एकदम आपण कोणाला बोललो, काय बोललो हे त्रिविक्रम भारतींच्या लक्षात आलं. महाराजांनी त्यांना विचारलं, काय हो, त्रिविक्रमभारती, आम्ही खरोखर चुकतो आहोत ? काय चूक आहे आमची? कशी सुधारणा करावी, ते

विचारण्याकरिता तुमच्याकडे आलो म्हणाले. दांभिक आम्ही आहोत ना? बुवाबाजी आमची चाललेली आहे ना? असं तुम्हाला वाटतं ना? याची सुधारणा करायची कशी सांगा ना तुम्ही. हे विचारण्याकरिता आलो म्हणाले.

पश्चाताप झालेला आहे, सगळं सैन्य आणखी सगळेच संन्यासी दिसताहेत, कोणाला नमस्कार करायचा? तटस्थ उभे राहिले त्रिविक्रमभारती आणि महाराजांची ही वाणी ऐकल्याबरोबर जास्तीच खजिल झाले. कोणाला आपण बोललो. साक्षात परमेश्वर आणखी संन्यासी वेष घेऊन आलेले आहेत. त्यांची सुधारणा आपण करायची आहे. हे चुकताहेत असं आपण म्हणायचं.

मधुराधिपतेरखिलं मधुरम् । (मधुराष्टकम्)

ही दृष्टी पाहिजे भगवत भक्ताची, तर भक्तिमार्ग आपला एक, श्रेय जे आहे, फल, ही भूमिका गाठता येईल. चुका जर आम्हाला देवामधे दिसायला लागल्या तर, देवाची भक्तीचा मार्ग बंद झालेला आहे. पाठीमागेच राहावं लागेल. दाराच्या बाहेर जावं लागेल, आंत जाता येणार नाही. चुका म्हटल्यानंतर प्रेम कसं राहील मनामधे? आणि प्रेम, जर शुद्ध प्रेम, राहिलं नाही तर कशी भक्ती ? काय त्याला भक्ति कशी म्हणायची.

म्हणून त्रिविक्रमभारती आणखी खजिल झालेले आहेत. पश्चाताप झाला. चूक झाली म्हणाले आणि मग एकदम ते दृष्य बदललं, एकटे महाराज आहेत. बाकी सगळं सैन्य आहे. संन्यासी वगैरे जे अनेक दिसत होते ते बंद झालं. आणि म्हणाले, ''काय खरं, खोटं आहे ते तुम्हाला विचारण्याकरता आलो.'' तो म्हणाला, ''महाराज चूक झाली, मीच चुकलो,' म्हणाला. माझ्या अहंकाराने आणि माझ्या मनाची स्थिती अशी झाली.'' **बाहेर चूक दिसणं हाच अहंकार आहे.** स्वतःची चूक दिसली पाहिजे. ते उलट होतंय. अहंकारानी स्वतःची चूक म्हणजे स्वतःचा दोष असताना सुद्धा माझ्याजवळ दोष नाही, मी गुणी आहे असं वाटतं आणि बाकीचे जगामधे कितीही गुणी असले तरीसुद्धा हे सगळे दोषी आहेत, सगळे चुकताहेत, आपण तेवढे बरोबर वागतो आहोत. हे अहंकाराचं विलक्षण कार्य आहे. कशी, सुधारणा कशी करायची? कोण सांगणार त्याला, तुम्ही चुकताय म्हणून. तो कबूल करायला तयार आहे काय मी चुकतो म्हणून ? **तर महाराजांनी येऊन याप्रमाणे सगळं अगदी त्यांची बुद्धी बदलून टाकलेली आहे. ईश्वराचे अवतार हे याकरताच आहेत. जे कांही अशा प्रकारचे चांगल्या मार्गाला लागलेले लोक आहेत, किती आणि अनेक जन्मांनी चांगल्या मार्गाला मनुष्य लागतो. नाहीतर अर्थकामाशिवाय दुसरं त्याला कांहीही आणखी दिसत नाही. पैसा मिळवायचा. विषयभोग घ्यायचे. संपलं. याशिवाय दुसरं कांहीही या संसारात नाहीये. हेच सुख आहे,** एवढीच समजूत झालेली आहे. पण त्यांना ती दृष्टी त्या संत महात्म्यांकडून जर मिळाली की हेच सुख नाहीये. हे टिकाऊ नाही आहे. यातही पुष्कळ

दोष आहे. पैसा मिळविण्याकरिता सुद्धा कितीतरी पापं करावी लागतात. संरक्षण करण्याकरिताही पापं करावी लागतात. मिळवितानाही दुःख आहे, गेल्यानंतरही दुःख आहे, अशा प्रकारचा हे ''अर्थ'' आहे, हे समजून सांगणारा जर भेटला आणि ते जर पटलं मनाला, तर तो लगेच या मार्गाकडे लागतो. परमार्थ – मार्गाकडे ! त्यागबुद्धी त्याची होते आणि कितीतरी जन्मातून अशा प्रकारचं आणखी आपल्या मनाचं, बुद्धीचं परिवर्तन होऊन या मार्गाकडे वळलेला मनुष्य, त्याला जर अहंकाराने गाठून पुन्हा जर तिकडेच त्याला न्यायला सुरूवात केली तर काय करायचं? पुन्हा केव्हा येणार. असा प्रसंग? पण अशा वेळेला जर सद्गुरूंची, महात्म्यांची गांठ पडली, तर सुधारणा होवू शकते. हे सुद्धा अनेक जन्मांचं सुकृत पाहिजे.

त्रिविक्रमभारती त्यागी आहे, ज्ञानी आहे, **परंतु त्या अहंकाराच्या कचाट्यात सापडलेले आहेत.** परमेश्वराला सुद्धा आणखी मानायला ते तयार नाहीयेत. इतका ज्ञानी, संन्यासी महात्मा, ईश्वराची ओळख त्यांना पटलेली नाहीये. हे कुठले तरी संन्यासी आलेत म्हणाले म्हणे. पण ज्यावेळेला महाराजांनी येऊन त्यांना आणखी विचारलं, काय हो, काय चुकलं आमचं? हे दृश्य दाखविलं. एकदम त्यांची बुद्धी, तो अहंकार सगळा विलीन झालेला आहे. अन मग मात्र ते शरण आलेले आहेत. पुन्हा त्यांच्या पूर्वभूमिकेवर त्यांना आणून ठेवलेलं आहे. खरा मोठेपणा हा यात नाहीये, **दुसऱ्याची निंदा करण्यामधे खरा मोठेपणा नाहीये.** दोष पाहण्यामध्ये मोठेपणा नाहीये. दोषज्ञ असावं, दोष जाणावेत, फक्त, पण बोलून दाखवायचे नाहीयेत. हे मोठेपणाचं लक्षण आहे. विद्वांनांची जी व्याख्या, विद्वानांची नांव अनेक सांगितली आहेत. **.....विद्वान्, विपश्चित्, दोषज्ञः, कोविदो, बुधः** कोषकारांनी ही इतकी विद्वानांची नांव सांगितली आहेत त्यात दोषज्ञः असं एक विद्वानाचं नांव आहे, दोषज्ञ म्हणजे विद्वान. दोष जाणणारा, बोलणारा नाहीये. कारण बोलायची सवय झाली की नसलेला दोषही तो बोलून जातो. सवयच आहे वाणीला. खरं–खोटं काय, कोण विचार करणार?

तर ही सुधारणा महाराजांनी त्यांची आणखी, त्रिविक्रमभारतींची केली. एवढा मोठा महात्मा समाजामधे आदर्शभूत ज्याचं चरित्र आहे, त्याग आहे, विद्या आहे, आणखी उपासना आहे. सगळं आहे जवळ आणि हा का आणखी रसातळाला जाणार. लोकही निंदा करायला लागले. त्यांनी निंदा मोठ्या माणसांनी करायला सुरवात केली. कुठला संन्यासी आलाय, काय वाटेल तसा वागतोय. पालखीत बसून शिकारीला काय जातो राजाबरोबर. ते बोलायला लागले, बाकीचे लोकही बोलायला लागले. म्हणजे स्वतःही आणखी अशा प्रकारचा दोष घडला, पाप घडलं आणि लोकामधे सुद्धा जास्ती पापाचा प्रसार केला तो एक दोष. आणि स्वतःचा एक दोष. हे आपल्या भूमिकेवरती राहतील काय? कसे राहतील? गोवर्धनधारी परमेश्वराची जी लीला, शुकाचार्य महाराजांनी भागवतामधे वर्णन केलेली आहे. तेही असंच

आहे. श्रेष्ठ आहे. इंद्र हा श्रेष्ठ आहे. देवांचा राजा झालेला आहे. शंभर अश्वमेध यज्ञ केल्यामुळे तो देवराज बनलेला आहे. किती पुण्य आहे त्याचं. पण ज्यावेळेला इंद्रयाग बंद केला, त्या गोपालानी, त्यावेळेला तो रागावलेला आहे. आणि मेघ त्यांनी मुक्त केले. सांगितलं पाऊस पाडा, सगळं गोकुळ अगदी बुडवून टाका. गाई–गोपाल सगळ्यांना आणखी नाश करा. त्यावेळेला गोपालकृष्ण तिथे होते म्हणून सगळे वाचले. अहंकार झालेला आहे इंद्राला. मी सत्ताधीश आहे, त्रैलोक्य माझ्या ताब्यात आहे. त्या मानवांनी माझ्या विरूद्ध जाऊन उपयोग नाही. माझी पूजा याने बंद केली.

अहो श्रीमदमाहात्म्यं गोपानां काननौकसाम् ।

कृष्णं मर्त्यमुपाश्रित्य *ये चक्रुर्देवहेलनम् ॥* **(भा.१०.२५.३)**

हा कोण मनुष्य जन्माला आलाय. यशोदेचा मुलगा नंदाचा कृष्ण, मानव मनुष्य आहे ना? त्याचं ऐकलं यांनी? आणि माझी पूजा, माझा यज्ञ बंद केला? ह्या अहंकाराने पछाडलेला इंद्र आणखी पर्जन्यवर्षाव करतो आहे. सगळे गोकुळातले आणखी गाई, गोपाल सगळे भयग्रस्त झालेले आहेत. शरण आले भगवान श्रीकृष्णाला. त्यावेळेला इंद्राचा गर्वपरिहार केला पाहिजे असं भगवंतांनी ठरविलं आणि तो गोवर्धन पर्वत उचलून धरलेला आहे. त्याच्या खाली रहावा म्हणाले तिथे कांही पाऊस लागत नाही, वारा नाही, पडेल माझ्या हातातून म्हणून भीती बाळगण्याचं कारण नाही. ज्याने उचलून धरलेला आहे तो पडू कसा देईल म्हणाले. त्याला तीही शक्ती आहे. सात दिवस तसं उभं राहून त्याने संरक्षण सर्वांचं केलेलं आहे. मग इंद्राचा गर्व दूर झाला. आपलीच शक्ती मोठी आहे सर्वांपेक्षा, ही समजूत त्याची, घालवली. अहंकार गेला. आपल्यापेक्षाही सुद्धा ही शक्ती मोठी आहे, कृष्ण म्हणजे मानव नाहीये. देवाचा राजा असताना त्याला सुद्धा कृष्णांच काय स्वरूप आहे, कृष्ण कोण आहेत हे समजू शकलं नाही. कारण अहंकार आहे मनामधे. **अहंकार जोपर्यंत असेल तोपर्यंत ईश्वरस्वरूपाचं ज्ञान होणार नाहीये.** जवळ जरी ईश्वर असला तरी कळत नाही म्हणे. म्हणून इंद्राचा गर्वपरिहार झाला, अहंकार दूर झालेला आहे, आणखी अशा रीतीनं गोवर्धन पर्वत धारण करून, काय ईश्वराची शक्ती आहे त्याला दाखवली. आणखी त्याला ताकीद केलेली आहे, तुम्हाला देवांचं राज्य दिलं म्हणजे कांही ह्याकरिता दिलेलं नाहीये. ईश्वराने दिलेलं आहे. शंभर अश्वमेध यज्ञ केले म्हणून देवांचा राजा कोणी, केलं कोणी? पुण्यकर्म केलं, मी केलं म्हणून केलं, असा अभिमान चालणार नाही. मी इंद्र आहे. मी शंभर अश्वमेध यज्ञ करणारा आहे. माझ्या हातात सगळी सत्ता आहे. नाही, तुमच्या सत्तेचा जर असा दुरूपयोग केला जाईल तर, या गोपालांचा किंवा गाईंचा तर नाश होणारच नाही, पण तुमचं स्थानसुद्धा शिल्लक राहील की नाही कुणाला ठाऊक, याचाही विचार केला पाहिजे. इंद्रादिक देवांनासुद्धा भीती आहे ना? ते जरी पुष्कळ पुण्यकर्म करून आणखी स्वर्गलोकामधे रहायला गेले, इंद्र बनला, बाकीचे देव

मोठे मोठे अधिकारी जरी झाले, तरी, दैत्यही त्यांचे प्रतिस्पर्धी तसेच आहेत. ते कांही कमी नाहीयेत. त्यांनीही (दैत्य) स्वर्गाचं राज्य हिसकून घेतात, यांना निर्वासित करतात मग पुन्हा देव शरण जातात देवाला. अहंकार सोडून शरण गेल्यानंतर पुन्हा देव अवतार घेतात आणि पुन्हा त्यांचं राज्य त्यांना पुन्हा देतात. अहंकार सोडल्याशिवाय नाही. हे जसं भागवतामधे आणखी हे चरित्र सांगितलेलं आहे, इंद्रादिक देव जे मोठ्या पदावर गेले, त्यांची अगोदर सुधारणा केली पाहिजे. लहानांची सुधारणा काय सहज होईल.

त्याप्रमाणे त्रिविक्रमभारतींच्या बुद्धीची सुधारणा भगवंतांनी केलेली आहे. एवढा ज्ञानी महात्मा. समाजाला आणखी उत्तम मार्गदर्शन करण्याची ज्यांनी शक्ती मिळिवलेली आहे, ही शक्ती मिळवायला अनेक जन्म घालवावे लागतायत. किती ईश्वराची उपासना केली असेल आणि अशा प्रयत्नानी, अशा तपश्चर्येनं इतक्या योग्य भूमिकेवरती गेलेला हा ज्ञानी महात्मा आणि अहंकारात सापडला ! आणखी आज आम्हाला बोलला, उद्या कोणालाही बोलेल, कुणालाच जुमानणार नाही. म्हणजे शेवटी त्या उच्च पदावर जाऊन त्याचा अधःपात होणार आहे. त्याला वाचविलं पाहिजे. ही दया आहे. आमची निंदा केली, काय करायचं त्याला, जाईना वाटेल तिथे. असं नाही. त्याला वाचवलं पाहिजे. उपेक्षा केली नाही. तेव्हा

स्वतनुं यतये व्यदर्शयद्-द्विजगर्वं बुरुडाद्व्यनाशयत् ।
स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान्मेऽस्ति परा वरा गतिः ॥ (श्रीनृ.स.प्रार्थनाष्टक-४)

आपलं स्वरूप काय आहे ते महाराजांनी त्याला दाखवलेलं आहे, त्रिविक्रमभारतींना. अन् त्यांच्या मनातला अहंकार तो दूर केला. संपल, दुसरं कांही नाही. सुधारणा करायची म्हणजे काय करायचं? बुद्धीमधे आणखी तशा प्रकारची एक समर्थ शक्ती त्यांच्यापुढं उभी केली. आपल्या ज्ञानशक्तीपेक्षा आपल्या सगळ्याही तपः शक्तीपेक्षा मोठी एक शक्ती कोणची तरी आहे. आणि ती हीच शक्ती आहे अशी त्यांना कल्पना आल्याबरोबर तो अहंकार गेला. हे सामान्य संन्यासी आहेत. दांभिक आहेत, ढोंग करणारे आहेत, अशी कल्पना जी अहंकारामुळे झाली, मी मोठा आहे म्हणून हे दोषी आहेत. आपला मोठेपणा सिद्ध करण्याकरता किंवा आणखी राखण्याकरिता म्हणून लोकाची निंदा करायची. आणि लोकांचं तिकडून त्यांचं जे लोक अनुसरण करत असतील ते बंद करायचं, म्हणजे समाधान नाही. तर मोठेपणा हा अशा रीतीनं सिद्ध होत नाही आहे.

म्हणौनि थोरपण पर्‍हां सांडिजे । एथ व्युत्पत्ति आघवी विसरिजे ।
जैं जगा धाकुटें होइजे । तैं जवळीक माझी । (ज्ञाने. ९.३७८)

लहान झालं पाहिजे, निरहंकारी झालं पाहिजे. त्याशिवाय ईश्वरप्राप्ती झाल्याचं ते एक मुख्य चिन्ह आहे. तो ज्ञानी आहे. तेव्हा त्रिविक्रमभारतीचा उद्धार महाराजांनी केला मुद्दाम.

बाकीच्या लोकांचाही उद्धार चाललेलाच आहे. कार्य चालूच आहे. पण हा समाजामध्ये श्रेष्ठ जो आहे पुरुष, त्याची सुधारणा अगोदर केली पाहिजे, हे अवताराचं प्रयोजन आहे. **'परित्राणाय साधूनाम्'**.... म्हणतात. साधूकडे लक्ष आहे देवाचं, श्रेष्ठ पुरूष, हे साधू असताना, असाधू होण्याचा प्रसंग येतो आहे. साधूंचं संरक्षण करायचं म्हणजे त्यांना दुर्जनांचा त्रास वाचवायचा, त्यांचा आणखी त्रास करुन द्यायचा नाही एवढा असा अर्थ नाही. बाह्य दुर्जनांचा त्रास होत असेल तर त्याचीही व्यवस्था करतील ते, पण हे जे अंतःकरणामधे जे दैत्य आहेत, **असे अहंकारादिक दैत्य हे मनामधेच आहेत ना. ह्या दैत्यांपासून जर त्रास व्हायला लागला, तर त्याला काय बाहेरचं सैन्य किंवा काय बाहेरचां कोणी त्या दैत्याला मारू शकेल का, तुरूंगात टाकू शकेल का?** शक्य आहे काय? ही जी आणखी दैत्यांची आणखी स्थिती आहे. **मनामधे दोन्हीही आहेत. दैत्यही आहेत आणि देवही आहेत. शुभवासना म्हणजे देव, अशुभवासना म्हणजे दैत्य आहेत. मनामधे देव दैत्यांचं युद्ध, रोज आपलं चाललेलं आहे, ते पाहिलं पाहिजे.** त्यापैकी दैत्यांना कमी करायचा प्रयत्न केला पाहिजे. देवांची शक्ती वाढिवली पाहिजे. त्याकरिता परमेश्वराला प्रार्थना केली पाहिजे, संतांची संगती केली पाहिजे, त्यांच्यापासून उपाय विचारले पाहिजेत. हे सगळं करायला पाहिजे.

बाहेरचे दुर्जन जातील, पण मनातले हे जे दुर्जन बसलेले आहेत ते जाऊ शकत नाहीयेत. **त्यांना घालविण्याचा प्रयत्न करायचा म्हणजे ईश्वरानीच करायचाय.** म्हणून ईश्वराचे अवतार होतात, संत– महात्म्यांचं ते कार्य आहे, सद्गुरूंचं ते कार्य आहे. मानसिक, मनातले, दैत्य दूर करू शकतात ते. त्याप्रमाणे त्रिविक्रमभारतींचा उद्धार झालेला आहे. नुसत्या ज्ञानाने अगोदर उद्धार झालेला नव्हता, तो आता त्यांना शिकिवल त्यांनी. खरा संन्यास कोणता आहे, हे त्यांनी शिकवलं. महाराजांच्या कृपेनं ते पूर्ण भक्त महाराजांचे झाले. ती निंदा बंद झाली. सगळं झालेलं आहे.

हा एक प्रकार झाला. ही एक कथा सांगितलेली आहे. याच्या विरूद्ध दुसरी कथा आहे. कोणाचा अहंकार देव दूर करतो. हा एक प्रश्न आहे. प्रत्येकाचा अहंकार दूर करण्याचा प्रयत्न करत नाही. तुमच्या कर्माप्रमाणे तो अहंकार तुमच्या मनामध्ये निर्माण झालेला आहे. तो अहंकार जास्ती आणखी आपल्याला त्रास देतोय असं तुम्हाला वाटत नाहीये. जास्ती जास्ती आणखी मीच मोठा असा तो वाढत चाललेला आहे. त्या प्रत्येकाच्या अहंकाराकडे लक्ष देवाला देता येत नाहीये, घालवता येणार नाही असा अर्थ नाहीये. **पण तो अहंकार आपला आपल्याला कळला पाहिजे.** तो ज्याला कळलेला असेल, कोणच्याही प्रकाराने का होईना, ते संपूर्ण विश्वरूपदर्शन झालं, सगळे संन्यासी दिसायला लागल्याबरोबर यांचा अहंकार गेलेला आहे. आणि ते शरण आलेले आहेत त्रिविक्रमभारती. म्हणून त्यांच्यावरती कृपा केलेली आहे.

पुन्हा अहंकाराने येऊ नये म्हणून सगळी व्यवस्था करून ठेवली, की, ईश्वरशक्ती मोठी आहे. तिचं चिंतन करायला लागल्यानंतर तो अहंकार कशाला येईल? मी मोठा नाहीच आहे. सर्वात महत्त्व, श्रेष्ठ म्हणजे परमेश्वर आहे त्याची शक्ती मोठी आहे. ही जर निरंतर मनामधे जाणीव राहिली तर मी मोठा कशाला म्हणेल तो ? स्वतःचा मोठेपणा त्याच्या मनातसुद्धा येणार नाही.

पण हा दोष आपल्या मनातला गेला पाहिजे. आपल्यापेक्षा मोठी शक्ती आहे, याची कल्पना आल्यामुळे दोष गेला. पण ज्याला त्याची कल्पनाच नाहीये, शेवटपर्यंत येत नाही. अहंकार जरी आणखी आपलं पुष्कळ नुकसान झालेलं असलं तरी सुद्धा नाही, कल्पना येत नाही. दुर्योधनाच्या अहंकाराचं वर्णन महाभारतकारांनी केलेलं आहे. इतका अहंकारी तो होता, माझं कांहीही चुकलेलं नाही असं शेवटपर्यंत तो समजत होता. कपटानी, वनवासात गेले पांडव– खेळले कशाला ते ? ते खेळायला आले म्हणून त्यांचा पराजय.! आलेच नसते तर कशाला पराजय झाला असता? याला काय उत्तर देणार? कपटाने केलं, अमुक केलं, हे म्हणाले, तुमच्याजवळ शक्ती नाही म्हणून तुम्ही म्हणता. कपटाचा काय संबंध आहे ? खेळामधे आणि कपट आणखी चांगलं आणि वाईट असतं काय म्हणाले. तुम्हाला जर चांगलं खेळता आलं नाही तर धर्मराजाने खेळायला कशाला यावं? याच्यावर काय उत्तर देणार? दुर्योधनाने काय घालवून दिलं काय? तुम्हीच खेळलात, तुम्हीच पणाला लावलं, सगळी आपली बायको पणाला. वाटेल ते आणखी तुम्ही अगदी, तुम्हाला मन आवरता आलं नाही, तुमचा दोष आहे तो. असा अहंकाराने त्याने जबाब द्यावा, उत्तर द्यावं, शेवटी सुद्धा, सगळं आणखी अगदी अठरा दिवस युद्ध झालेलं आहे, पण शेवटी माझाच पक्ष बरोबर आहे असंच तो समजतो आहे.

गते भीष्मे हते द्रोणे कर्णेच विनिपातिते ।
आशा बलवती राजन् शल्यो जेष्यति पाण्डवान् । (वेणीसंहार ५.२३)

भीष्माचार्य पडले दहा दिवस झाल्यानंतर. पांच दिवस द्रोणाचार्यानी सेनापत्य केलं, तेही पडले. कर्ण दोन दिवसात पडलेला आहे. तरीसुद्धा आशा आहे. अजून शल्य आहे आपल्या बाजूला. तो जिंकेल पांडवांना, नाही तोही गेला. सगळे गेले, एकटा दुर्योधन उरलेला आहे. भीम दुर्योधनांचं गदायुद्ध झालेलं आहे आणि त्यातही गदाप्रहार दुर्योधनाच्या मांडीवर बसला आणि तो दुर्योधन खाली पडलेला आहे.

प्राण जाण्याच्या वेळेलासुद्धा त्यांनी आपली चूक कबूल केलेली नाहीये. तो म्हणतो आहे, पांडवांना, आता करा राज्य तुम्ही. कोणीही जिवंत राहिला नाही. तुमचाही नाही आणि आमचाही नाही. मी मात्र माझ्या भावासहवर्तमान मी आता स्वर्गलोकाला जाणार आहे.

आनंदात राहाणार आहे. रणांगणामधे युद्ध करताना मला मृत्यू आलेला आहे. ते पुण्य मोठं आहे. मी आता स्वर्गलोकामधे जाणार आहे. तुम्हाला जिवंत असेपर्यंत अगदी सुईच्या अग्रावर राहील इतकी मातीसुद्धा मी दिलेली नाहीये. माझंच आणखी खरं झालेलं आहे. म्हणजे मृत्यूच्या वेळेला सुद्धा त्याची ती अहंकाराची भाषा कांही बदललेली नाहीये. म्हणून तो अहंकार ज्यांचा शेवटपर्यंत जाणार नाही, त्यांना मात्र पुन्हा दुसऱ्या जन्मामधे काय व्यवस्था करायची, व्हायची ती होईल म्हणाले, त्यांच्या कर्माप्रमाणे. इथं कांही देवाचा हस्तक्षेप नाहीये.

वाटेल त्याची सुधारणा देव कां करत नाहीये? याचं कारण हे आहे. अर्जुनानी आरंभाला अगदी आपल्या बुद्धीनं, आपल्या अहंकाराने, हे सगळं बोलून गेला, हे सगळं चुकीचं आहे. युद्ध करणं फार चूक आहे ही. केवढी हानी आणि हिंसा होणार आहे. अहिंसा मोठा धर्म आहे वगैरे वगैरे, सगळं सांगितलं आणि मी मुद्दाम म्हणाला युद्ध करणार नाही, मी युद्धात जर भाग घेतला, तर सगळे मरतील' म्हणाला. अहंकार आहे तो. मी मोठा वीर आहे. आणि मीच बाजूला झालो तर, सगळे जिवंत राहतील. म्हणजे लोकांना जिवंत ठेवणं किंवा मारणं हे काय माझ्याच ताब्यात आहे असं तो समजतो आहे. अहंकाराने तो पुष्कळ बोलून गेला. धनुष्यबाण टाकून दिलेलं आहे. स्वस्थ बसून राहिला आणखी रणांगणावरती. भगवान कांही बोलले नाहीत. मग शेवटी त्या अर्जुनालाच वाटलं आणि शेवटी मग तो शरण आलेला आहे.

कार्पण्यदोषोपहतस्वभाव: पृच्छामि त्वां धर्मसम्मूढचेता: ।
यच्छ्रेय: स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥ (भ.गी. २.७)

माझ्या बुद्धीमधे असलेल्या दोषांनी, मला चांगला मार्ग कोणता, कल्याणाचा मार्ग कोणचा, अकल्याणाचा मार्ग कोणचा याचं ज्ञान नाही, देवा मला कळत नाहीये हे कबूल केलं त्यांनी. श्रेय म्हणजे माझं कल्याण कोणत्या दिशेनं होईल, कसा मी वागलो असताना माझं कल्याण होईल हे आपण मला समजावून सांगा. मी तुमचा शिष्य आहे. माझं कल्याण करा. अशी प्रार्थना केल्याबरोबर गीताज्ञानाच्या उपदेशाला आरंभ झालेला आहे. तोपर्यंत नाहीये. गेलास तर जा, राहिलास तर राहा, कांही जरूर नाहीये. अर्जुन नसला तर दुसरे पुष्कळ आहेत.

मूकं करोति वाचालं, पङ्गुं लङ्घयते गिरीम् ।
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ॥ **(भ.गी. ध्यान श्लोक)**

ही शक्ती ज्या परमेश्वराची आहे. त्याला अर्जुनावरती काय ते विसंबून राहिलेत का? आयत्या वेळेला अर्जुन राहणार नाही म्हणून त्यांना काय भिती वाटणार आहे काय? कौरव राहाणार नाहीयेत. हे ठरलेलं आहे त्यांचं. पण तो ज्यावेळेला, आपला दोष त्याने कबूल केला, मला समजत नाही, महाराज. माझं कल्याण करा. मी समजू शकत नाही. माझी बुद्धी आणखी दोषांनी भरलेली आहे. हे कबूल केल्यानंतर त्याचा उद्धार केला. त्याला ज्ञान

सांगितलं, कर्मयोगाचं महत्त्व सांगितलं, विश्वरूप दाखवलं. सगळ्या प्रकारांनी प्रयत्न करून आणि त्याला, त्याची बुद्धी तयार केलेली आहे, निर्मोह केलेली आहे आणि त्याचा कबुलीजबाब शेवटी त्याच्याकडून घेतला आहे.

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ।
स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव ॥ (भ.गी. १८.७३)

आपली आज्ञा मला मान्य आहे. घेतलं धनुष्यबाण आणि बसला रथात. चला म्हणाला, कांही मोह नाही, माझा गेला मोह. माझं कर्तव्य काय आहे, तुमची आज्ञा मला कळलेली आहे, ती आज्ञा पालन करणं हे माझं कल्याण आहे म्हणाला. हे त्याला पटवून दिलं, आणखी त्याच्याकडून युद्ध करविलेलं आहे. विजय त्याला मिळाला. सगळं यश त्याला दिलेलं आहे**. तर अहंकार हे उत्पन्न झालेला असताना कोणाचा अहंकार दूर करायचा? दूर करायची शक्ती आहे त्यांच्यात. पण वाटेल त्याचा नाही.** जे अशा प्रकारचे आग्रही असतील, याचा अर्थ अनेक जन्मांची पापं अद्यापी ज्यांच्याजवळ आहेत. ती गेलेली नाहीत. **माझी बुद्धी सदोष आहे असं अर्जुनाने कबूल केलेलं आहे. म्हणजे पाप गेलेलं आहे त्याचं. पुण्य आहे. म्हणून भगवंतांनी गीतेचा उपदेश केला. नाहीतर रणांगणावर त्यांना हे तत्वज्ञान सांगण्याची काय जरूरी होती?** दुसरा कोणीही वीर त्यांनी गाठला असता. त्याच्या रथावर जाऊन बसले असते. त्याच्याकडून लढाई करवून घेतली असती, काय वाटेल ते केलं असतं त्यांनी. जातोस तर जा म्हणाले असते. पण अर्जुन हा एक समाजातला मोठा नेता होता. श्रेष्ठ पुरूष आहे, अर्जुन. मोठा ईश्वरभक्त आहे, मोठा गुरूभक्त आहे. सर्व गुरूजनांचे द्रोण, भीष्म, सगळ्यांच त्याच्यावर प्रेम आहे. असा समाजातला नेता आणि व्यर्थ त्याचा अधःपात होतो आहे, हे बरं वाटलं नाही देवाला, म्हणून त्याची सुधारणा भगवंतानी केली.

गुणाधिकैर्हि गृहीतोऽनुष्ठीयमानश्च धर्मः पचयं गमिष्यतीति ।
(भ.गी. श्रीमच्छांकरभाष्य उपोद्घातः)

आचार्य महाराज सांगताहेत.

अर्जुनाला उपदेश कां केला? तर श्रेष्ठ, गुणी जे पुरूष समाजातले आहेत. त्यांनी जर धर्माचं आचरण व्यवस्थित केलं, धर्म समजून घेतला आणि त्याप्रमाणे ते जर वागले तर त्या धर्माचा प्रसार होतो आहे. धर्माची वृद्धी होते. म्हणून श्रेष्ठ, गुणसंपन्न जे समाजातले महात्मे आहेत, त्यांचा अगोदर उद्धार केला पाहिजे. ते उद्धाराचं कार्य देवाच्यापुढे आहे. इतक्या श्रेष्ठतेला चढलेले लोक, त्यांचा अधःपात होऊ नये, त्यांची सुधारणा थोडी करावी लागते. पहिल्यापासून ज्यांना सगळं ज्ञान द्यायचं, पहिल्या इयत्तेतलं सुद्धा ज्याला समजत नाही,

त्याला एम.ए. चे विषय कसे शिकवून होतील. त्याला कळेल कां ते सगळ? जो एम.ए. मधे गेलेला आहे अन् त्याला त्यातलं, पुष्कळ समजलेलं आहे पण थोडंसं समजलेले नाही. थोडसं अज्ञान आहे, ते दूर करणं सोपं काम आहे. त्याची बुद्धी आणखी शुद्ध करणं, त्याला ज्ञान देणं हे शक्य आहे. म्हणून त्रिविक्रमभारतीची सुधारणा भगवंताने केली.

दुसरा एक कथाभाग आहे. तो सांगताहेत, सिद्धमुनी नामधारकाला. त्या भागामध्ये एक यवन राजा होता. पुष्कळ यवनांची लहान लहान राज्य होती त्यावेळेला. असा एक यवन राजा होता. आता तो बोलून चालून यवन आहे. वैदिक धर्माबद्दल त्याच्या मनांत आदर वगैरे कांही नाहीये. पण त्यानी काय योजना केली, की, ब्राह्मण मंडळींना आणखी दक्षिणादान करावे. राजेसाहेब पुष्कळ संभावना देतायत, दक्षिणा देतायत. पुष्कळ लोक जायला लागले. परिग्रह करावा किंवा नाही याचाही विचार आहे ना. पाप, **परिग्रह म्हणजे पाप आहे. दान घ्यायचं दुसऱ्याचं, म्हणजे पापच आहे ते.** परंतु ते पाप घालविण्याकरता जे कांही उपाय ईश्वरानी, शास्त्रांनी सांगितले ते करून तो पापदोष जो दूर करू शकतो, तो परिग्रह घेऊ शकतो. पण तरीसुद्धा नकोय, आम्हाला कांही नकोय असे अयाचित वृत्तीनं राहणारे मोठे मोठे ऋषी अरण्यात पूर्वी रहात होते. मिळेल त्याच्यावरती निर्वाह करणारे. कंदमुळं, फळं खाणारे, कांही जे कांही भगर, वरई वगैरे जे काय धान्य रानामधे पिकेल त्याच्यावरती निर्वाह करणारे असे संतोषाने राहात होते. परंतु सार्वत्रिक अशी स्थिती नाहीये. निर्वाह झाला पाहिजे ना. प्रपंचामधे द्रव्याशिवाय काय होणार ? म्हणून यवनराजा द्रव्य देतो आहे, त्यांनी घ्यायला जावं आणि यवनांनी त्यांच्याबरोबर, राजानी, आणि चर्चा करावी. काय म्हणाले. तुमच्या वैदिक धर्मात काय सांगितलेलं आहे? यज्ञयाग म्हणजे काय आहे? त्यात पशुहिंसा कां करता तुम्ही? हिंसा हा दोष नाही कां? वगैरे पुष्कळ विचार करावा. तेव्हा यानी आपल्या धर्माचं स्वरूप त्यांना सांगावं. त्या यवन राजानी यांची निंदा करावी. काय म्हणाले, कसला धर्म आहे यात? सगळी हिंसा वगैरे सगळी आहे, कसली यज्ञकर्म वगैरे कांही नाही. अशी उलट निंदा करावी. पण पैसे दिल्यामुळे आणखी कोणीही कांही बोलू नये.

राजा आणखी पुष्कळ द्रव्य देतो आहे, अशी बातमी सगळीकडे पसरली. आणि एके दिवशी, दोन ब्राह्मण राजसभेमधे येऊन पोचलेले आहेत. त्यांनी सांगितलं, राजेसाहेब, आम्ही सर्वही, चारही वेदांचा अभ्यास केलाय म्हणाले. तुमच्या नगरात कोणी असेल तर बोलवा त्याला. आम्ही त्याच्याबरोबर आणखी वादविवाद करतो. काय आहे आमचं ज्ञान हे प्रत्यक्ष आम्ही सिद्ध करून दाखवतो म्हणाले. राजालाही वाटलं असे कसे, हे म्हणाले अभिमानी, अगोदर वाटलं त्याला. आपल्या नगरातल्या आणखी उत्तम ज्ञानी माणसांना त्यांनी बोलावून

आणलं. हे असं म्हणतायत म्हणाले. आम्हाला सर्वज्ञान आहे, तुम्ही करा यांच्याबरोबर, चर्चा करा. वादविवाद करा. यांना जिंका. पण ते खरे विचारी पुरूष होते, ते म्हणाले, महाराज हे मोठे आहेत. द्या त्यांना, सन्मान करा त्यांचा. आमची कांही शक्ती नाही म्हणून त्यांनी सांगून दिलं. आपल्या घरी निघून गेले. म्हणजे त्यांच्या बरोबर वाद-विवादालाही कोणी आलेले नाही. म्हणजे त्यांचा अभिमान आणखी वाढलाय जास्ती. राजाचा आश्रय मिळालेला आहे, राहण्याची व्यवस्था, खाण्यापिण्याची व्यवस्था, नोकरचाकर आहेत, चाललेलं आहे.

परंतु इतकंही करून त्यांचा अभिमान थांबला नाही. एके दिवशी राजेसाहेबांना त्यांनी विनंती केली. पुष्कळ आम्ही शिकलो म्हणाले, कांही तुमच्या नगरातले कोणी विद्वान आमच्याकडे येत नाहीत, बोलत नाहीत, वादविवाद करत नाहीत. काय करायचं म्हणाले. तेव्हा आम्ही आता म्हणाले, या तुमच्या सगळ्या प्रांतामधे गांवोगांवी आणखी फिरून पाहणार आहोत. कोण विद्वान आहे, आमच्याबरोबर टिकणारा कोण आहे, कोण खरा ज्ञानी आहे. आमच्यापेक्षा मोठा जरी भेटला तरी हरकत नाही, आम्ही कबूल करू म्हणाले, पण पाहिजे, भेटला पाहिजे. त्याकरिता आम्ही आता सर्वत्र संचार करणार. जो आमच्यासमोर आणखी बोलू शकणार नाही, त्याच्याकडून अजिंक्यपत्र घेणार, की आम्ही हरलेलो आहोत, तुम्ही विद्वान आहात. आणि असं आम्ही निघालो. त्याला ते बरंच आहे, तुमचं तुम्ही भांडत बसा, तुमचं तुम्ही एकमेकांबरोबर. निराळ्या संस्कृतीतला आहे ना राजा, त्यांनी मान्य केले ते, पुष्कळ आणखी नोकर चाकर बरोबर दिले. पालखीमधे बसून दोघे ब्राह्मण निघालेले आहेत.

गांवोगांवी त्यांनी जावं आणखी कोण विद्वान आहेत या गांवात? बोलवावं, आणि त्यांना काय, यांच्यापुढे काय टिकणार? मूर्ख आहात तुम्ही, कशाला हे करता वगैरे त्यांची निंदानालस्ती करावी. आणखी त्यांच्याकडून अजिंक्यपत्र लिहून घ्यावे आणि तिथून जावं. गांवोगांव अशा रीतीनं त्यांचं आणखी अभिमानाचं कार्य चाललेलं आहे. पण त्यालासुद्धा कांही काळ आहे. सर्वकाळ टिकत नाही. कितीही उंच गेला मनुष्य तरी शेवटी तो पडणार आहे म्हणतात. संग्रह कितीही केला तरी क्षयच.

सर्वे क्षयान्ता निचया: पतनान्ता: समुच्छ्रया: ।
संयोगाश्च वियोगान्ता मरणान्तं च जीवितम् ॥ **(महाभारत, आश्वमेधिक पर्व ४४.१९)**

विदुरांचं सांगणं आहे. धृतराष्ट्राला सांगताहेत. कितीही साठा केला तरी शेवटी नाश आहे. कितीही उंच मनुष्य गेला तरी शेवटी तो पडणार आहे. जाऊ शकत नाही. शेवटपर्यंत उंची टिकत नाही म्हणाले. तर अशा रीतीनं जास्ती जास्ती मोठेपणा मिळवायला लागले. अहंकार त्यांचा जास्ती वाढत चाललेला आहे. गांवोगांवी सगळ्या विद्वान लोकांची आणखी

विटंबना त्यांनी केली, निंदा केली, तुम्ही मूर्ख आहात, तुम्हाला अक्कल नाही, वाटेल तसं बोललेले आहेत. आणि यांच्या कानावर बातमी आली की, कुमसी गांवामधे एक त्रिविक्रमभारती नांवाचा मोठा विद्वान मनुष्य आहे. तीन वेदांचा अभ्यास त्यांनी केलेला आहे. ज्ञानी महात्मा आहे. बराय म्हणाले, जाऊ या त्यांच्याकडे, आले. कुमसी गांवामध्ये आलेले आहेत. कुठे आहेत ते स्वामीमहाराज? त्या मंदिरात आहेत म्हणाले. गेले हे दोघेही. पालखीतून उतरलेले आहेत. तिथे जाऊन नमस्कार नाही, कांही नाही, काय हो स्वामिमहाराज तुम्ही काय तीन वेदांचा अभ्यास केलाय असं आम्ही ऐकलं म्हणाले. काय काय केला अभ्यास तुम्ही, सांगा म्हणाले. आम्ही तुम्हाला जिंकण्याकरिता आलेलो आहोत. असं असं जिंकून आलेलो आहोत. ही पहा इतकी अजिंक्यपत्र आम्ही मिळवली आहेत. सगळ्या लोकांकडून लिहून घेतलेलं आहे की तुम्ही श्रेष्ठ आहात, आम्हाला कांही ज्ञान नाही. सगळ्यांनी आम्हाला लिहून दिलेलं आहे. तुम्हाला जर सामर्थ्य असेल तर वाद–विवाद करा, नाहीतर लिहून द्या आम्हाला, की आम्हाला कांही वाद–विवादाचं सामर्थ्य नाहीये.

त्रिविक्रमभारतींनी त्यांची एकंदर ही परिस्थिती पाहिली, म्हणाले, हे अहंकाराने अगदी ग्रस्त झालेले आहेत. काय उत्तर द्यायचं? त्यांनी सांगितलं नम्रपणाने, की, बाबांनो, तुम्ही विद्वान आहात. त्याशिवाय राजाचा सन्मान तुम्हाला कसा मिळाला? राजेसाहेबही तुमच्यावर प्रसन्न आहेत. मी जर विद्वान असतो म्हणाले तुमच्यासारखाच पालखीत बसून हिंडलो नसतो कां? अर्थात माझ्याजवळ कांहीही ज्ञान नाहीये. संन्यासी मी. साधा. भिक्षा मागतो, राहातो आपल मंदिरात. तेव्हा अजिंक्यपत्र वगैरे आमच्यासारख्या संन्याशाकडून घेऊन काय करणार तुम्ही म्हणाले. तुमच्या बरोबरीचा जो असेल त्याला जिंका आणि त्याच्याकडून घ्या की अजिंक्यपत्र. नाही. ते ऐकेनात. ते म्हणाले, काय अजिंक्यपत्र द्यायला तुम्हाला काय झालं म्हणाले. तुम्हाला कशाला अभिमान पाहिजे? म्हणजे इतका अभिमान यांच्याजवळ आहे आपल्या स्वतःच्या अभिमानाचा कांही विचारच नाही. असला कसला अभिमान म्हणाले. तुम्हाला जर नाही ना ज्ञान, तर लिहून द्या, आम्हाला ज्ञान नाही, तुम्ही श्रेष्ठ आहात. मग, हे लोक जाऊन सांगतील ना, राजाचे सगळी नोकर–चाकर आमच्या बरोबर आहेत. एका संन्याशाने यांना अजिंक्यपत्र लिहून दिलं नाही, अर्थात तो मोठा असला पाहिजे यांच्यापेक्षा. असं जर यांनी जाऊन सांगितलं तर? तेव्हा तुम्हाला लिहून द्यावं लागेल म्हणाले.

मग त्रिविक्रमभारतीने विचार केला, की यांना आपल्या गुरूमहाराजांच्याकडे घेऊन जाऊ या, गाणगापुरामध्ये. ईश्वरशक्ती आहे. परमेश्वर साक्षात् आहेत. ते यांची सुधारणा करायची असली तर करतील, यांना शासन करायचं असेल तर करतील. म्हणून त्यांनी सांगितलं,

आमचे गुरूमहाराज गाणगापूर क्षेत्रामधे राहतात म्हणाले, तिकडे तुम्ही या, चला आपण जाऊ या. त्यांनी जर सांगितलं तर वाद-विवादही करता येईल म्हणाले. मी करणार आहे वगैरे सांगितलं नाही. त्यांची इच्छा असेल तर वाद, विवादही होईल म्हणाले. नाहीतर त्यांच्या इच्छेप्रमाणे काय होईल ते पाहू. तुम्हाला अजिंक्यपत्र द्यायचं कां काय करायचं, तिथे ठरवू म्हणाले. चला. निघाले, दंड-कमंडलू घेऊन. त्रिविक्रमभारतींच्या जवळ काय, संग्रह कांहीच नाहीये. एक छाटी, वस्त्र अंगावरती टाकलं, दंड, कमंडलू घेतलं आणि निघाले, गाणगापूरच्या रस्त्याला. हे दोघेही ब्राह्मण पालखीमधे बसून निघालेले आहेत. काय चार वेदांचं ज्ञान संपादन काय उपयोग आहे? सर्वसंगपरित्याग करणारा एक संन्यासी महात्मा चालत निघालेला आहे आणि आपण आपलं पालखीमधे बसून जातो. पण कांहीही मनावर परिणाम नाहीये. किती आपल्या हातून अपराध होतायत, तो अहंकार त्यांना, कळूच देत नाहीये.

आले, मठामधे गेले. महाराजांच्या चरणावरती त्रिविक्रमभारतींनी मस्तक ठेवलेल आहे. प्रेमाश्रु नेत्रातून निघताहेत. उठीवलं त्यांना, काय म्हणाले, काय, त्रिविक्रमभारती कशाकरिता तुम्ही आलात? त्यांनी सांगितलं, महाराज हे दोघेही आणखी विद्वान ब्राह्मण म्हणवितात आपल्याला. गांवोगांवी जाऊन सगळ्या ब्राह्मणांचा यांनी अपमान केलेला आहे. सगळ्यांना आणखी रागानं म्हणा, वाटेल तसं बोललेले आहेत. आणि हे वाद-विवाद करा म्हणतायत, नाहीतर अजिंक्यपत्र लिहून द्या म्हणतायत. बसा म्हणाले, सगळी मंडळी बसल्यानंतर, महाराजांनी त्यांना विचारलं, त्या विद्वान ब्राह्मणांना, काय म्हणाले, तुम्ही चारही वेदांचा अभ्यास केलाय, वा वा उत्तम आहे म्हणाले. आणि आमच्यासारख्या संन्याशाजवळ अजिंक्यपत्र कशाला मागता म्हणाले. तुम्ही श्रेष्ठ आहात, मानसन्मान तुमचा होतोय, जा की म्हणाले. कशाला पाहिजे आमचं अजिंक्यपत्र? आणखी म्हणतायत. की सर्व वेदांचं ज्ञान कोणालाही होणं शक्य नाही, म्हणाले. काय वेद किती अनंत आहेत, किती त्यांच्या शाखा आहेत, किती मंत्र आहेत. कांही कल्पना नाहीये. सगळे मंत्र कंठस्थ ठेवायचे, एकही मंत्र चुकायचा नाही आहे. मंत्राभ्यास करणारी जी वैदिक मंडळी आहेत, त्यांच्या कंठामधे सगळी विद्या आहे. पुस्तकी विद्या नाहीये. वेदविद्या ही पुस्तकी नाहीये. पुस्तक छापायला सुरूवात झाल्यानंतर त्या वेद-विद्येचा लोपच होत चाललेला आहे. त्या उलट कमी कमी होत चाललेल्या आहेत. पुस्तकातून वाटेल त्या वेळेला, वाटेल तो मंत्र पाहून आणखी सांगता येतो. ती सोय झाल्याबरोबर आपल्या बुद्धीमध्ये तो मंत्र धारण केला पाहिजे. त्याकरता पाठांतर केलं पाहिजे, स्मरणशक्ती वाढवली पाहिजे, हे कोण करणार प्रयत्न? कोणच्याही वेळेला पुस्तक काढायचं. सूची सगळ्या लिहिलेल्या असतात. अमक्या पानामधे अमुक मंत्र आहे. तेवढ्यापुरतं ते करायचं, काम भागवायचं, झालं सगळं. बुद्धी कमीच झालेली की नाही. तर असे अनंत वेद आहेत म्हणाले. हे तुम्ही काय

अभ्यास केलाय म्हणाले, केवढं तुमचं आयुष्य आहे आणि एवढ्या आयुष्यामधे इतका अभ्यास शक्य आहे काय, असं त्यांनी सांगितलं.

वेदव्यास महर्षींनी आणखी वेदाचे विभाग केलेले आहेत. आपल्या चार शिष्यांना शिकवलेलं आहे. तरीसुद्धा पूर्ण नाही म्हणाले. संपूर्ण वेद विस्तार किती आहे ही कल्पना कुणालाही येत नाही. शब्दब्रह्म आहे ते. परमेश्वराचं स्वरूप आहे वेद म्हणजे. याकरिता तुम्ही अभिमान करू नका म्हणाले. अभिमानाने सगळ्यांचा नाश झालेला आहे. रावण गेला, बलीराजा गेला सगळे गेले म्हणाले, अभिमानामुळे कोणीही राहिला नाही. हे सगळं सांगितलं त्यांना, सर्व वेदविभाग सांगितला. तरीसुद्धा त्यांच्या मनावर कांहीही परिणाम नाही. **त्रिविक्रमभारतीप्रमाणे इथं कांही चमत्कार किंवा विश्वरूप कांहीही महाराजांनी दाखवलेला नाहीये. कारण यांचा अहंकार हा यांना शिक्षा करणार आहे.** हेच त्या अहंकारामुळे संकटात पडणार आहेत. संकटात पडल्यानंतर पुढे केव्हा सुधारणा होईल त्या वेळेला पाहता येईल. आज यांच्याकडे लक्ष देण्यासारखी यांची स्थिती नाही. इतके ते हट्टाने, आग्रहाला आणखी हे आलेले आहेत.

वाद-विवाद करा नाही, तर लिहून द्या. आम्हाला कांही कळत नाही तुम्हीच श्रेष्ठ आहात. याशिवाय आम्ही जाणार नाही म्हणाले. बराय. त्यांचा संकल्प आहे. बाहेर पाहिलं महाराजांनी. एक आणखी हरिजन निघाला होता तिथून. हल्लीचा शब्द आहे तो. तो तिकडून निघालेला असताना त्याला बोलवा म्हणाले. महाराजांनी बोलावलंय तुला. आला तो. नमस्कार करून बाहेर उभा राहिला. आपला दंड त्यांनी शिष्याच्या हातामध्ये, महाराजांनी, दिला आणखी सात रेघा क्रमाने ओढ म्हणाले त्याला सांगितल. सात रेघा ओढलेल्या आहेत दंडाने. त्याला सांगितलं, त्या हरिजनाला, एक रेघ ओलांडून आंत ये. आला तो. कोण आहेस तू? तो म्हणाला, मी आणखी अरण्यात राहणारा एक आणखी व्याध आहे, शिकारी आहे, भिल्ल आहे. म्हणजे या जन्मात तो आणखी हरिजनाच्या स्वरूपात होता. एक रेषा ओलांडून आल्याबरोबर मागच्या जन्मात तो गेलेला आहे आणि त्या जन्माचं स्मरण होऊन तो सांगतो आहे मी असा आहे. दुसरी रेषा. असाच एक वनैचर आहे वनात राहणारा. मी क्षुद्र आहे, मी वैश्य आहे, मी क्षत्रिय आहे आणि शेवटी आल्यानंतर मी ब्राह्मण आहे म्हणायला लागला तो. आणखी उत्तम संस्कृत भाषा, वेदमंत्र म्हणायला लागला. ती जी दोन ब्राह्मण मंडळी बसली होती ती, आम्ही चारही वेदांचा अभ्यास करणारे, त्यांनासुद्धा याची भाषासुद्धा समजेना. उत्तम अगदी अस्खलीत संस्कृत बोलायला लागलेला आहे. आणि सगळे आणखी निर्णय करतो आहे, वेदमंत्र म्हणतो आहे. त्याला म्हणाले बाबा, हे दोघे पंडीत इथे आलेले आहेत. यांच्याबरोबर कांही तू वाद-विवाद कर, यांना कांही प्रश्न विचारायला सांग. तू त्यांना प्रश्न विचार, कांहीतरी चर्चा कर की म्हणाले. त्याने कांही विषय काढल्याबरोबर त्यांना त्याचं उत्तरही देता आलेले नाही. चूक झाली म्हणाले. हे आमचं ज्ञान कमी आहे ! हे आत्ता पटलं त्यांना. **त्यांच्यापेक्षा मोठं ज्ञान जगामधे असू**

शकतं एवढच महाराजांनी दाखवलं. हे ज्ञान कोणाचं आहे, कोणत्या वेळेचं आहे, तो प्रश्न अजून विचारार्ह आहे. पण त्यांना ज्यावेळेला आपल्यापेक्षाही आणखी अधिक ज्ञान आहे हे दिसल्याबरोबर त्यांचा अहंकार कमी झाला. पण आता उपयोग नाही. शरण आले महाराजांना. क्षमा करा म्हणाले. महाराज म्हणाले; तुम्ही किती विद्वानांची अवहेलना, किती लोकांचा अपमान केलेला आहे म्हणाले. गांवोगांवी हिंडून आम्ही मोठे पंडित आहोत, आमचं ज्ञान खरं, तुम्ही सगळे खोटे आहात, तुम्ही सगळे मूर्ख आहात, त्रिविक्रम भारतींसारख्या संन्याशाच्याही मागे लागलात तुम्ही. सर्व ब्राह्मणांचा, विद्वानांचा धिक्कार केलात. अपमान केलात. या कर्माचं फळ तुम्हाला याच जन्मात भोगलं पाहिजे. या तुमच्या पापकर्माचं फळ म्हणजे तुम्ही ब्रह्मराक्षस व्हाल. बारा वर्षे तुम्हाला त्या योनीत राहावे लागेल. नंतर एक ब्राह्मण येईल तो तुम्हाला काही मंत्र विचारील, तो त्याला उपदेश केल्यावर मग तुम्ही या जन्मातून मुक्त व्हाल.

कर्माचा परिपाक त्वरित होतो. किंवा पुष्कळ काळानेही होतो. तसे जर भयंकर कर्म असेल तर विचार नाही, लगेच त्याचा निर्णय होऊन फळ भोगावे लागते, तेही सांगितले. ते ब्राह्मण नदीतीरावर जायला निघाले आणि जाता जाता एकदम त्यांना हृदयशूळ उठून त्यांचं प्राणोत्क्रमण झालेलं आहे आणि ते ब्रह्मराक्षस झाले. बारा वर्षानंतर वेदाभ्यास करणाऱ्या एका ब्राह्मणाला मंत्राचे कांही विस्मरण झालं. तो यांच्याकडे आला आणि यांनी त्याला तो मंत्र सांगितल्यावर हे मुक्त झाले म्हणे.

इकडे त्या पतिताला आपल्या सातव्या मागच्या जन्माचे ज्ञान झाल्यावर त्याच्याही बुद्धीत अभिमान निर्माण झालेला आहे. तो अभिमान वास्तविक दूर व्हायला पाहिजे, कारण त्या गर्विष्ठ ब्राह्मणांची काय अवस्था झाली ते त्याने डोळ्याने पाहिले आहे, परंतु त्यांच्याशी वादविवाद करायला तयार झाल्यावर ह्या पतिताला आपल्या सातव्या मागच्या जन्माचे ज्ञान झाल्यावर त्याच्याही बुद्धीत अभिमान निर्माण झालेला आहे.

पण ते ज्ञान या देहातले नाहीये, हा देह वेगळा आहे. बुद्धीचा संबंध वेगळा आहे. तेव्हा बुद्धीच्या संबंधाने तसा देहही जर असेल तर त्या देहाला विशेष महत्व आहे. मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. पण शास्त्र सिद्धांत समजून घेतले पाहिजेत. तेव्हा याने महाराजांना विचारले, ब्राह्मण असताना माझा अधःपात का झाला? ज्ञानामुळे आत्ताही तो ब्राह्मण आहोत आपण असे समजतोय. त्या जन्मातली स्मृती आहे ती. तो देहाभिमान उत्पन्न झाला त्याला. आणि त्या ब्राह्मणदेहात असताना ज्ञान मिळविल्याचाही अभिमान त्याला उत्पन्न झाला. मी असा जर ज्ञानी आहे मग हे ज्ञान गेले कसं? आता मिळाले पण मध्येच कसं गेलं?

तर त्या पतिताला सांगताहेत, महाराज – कर्म हे कारण आहे. ईश्वराच्या सृष्टीमध्ये जी कर्मशक्ती मानली आहे तिच्यामुळे जीवाला जन्म मिळतो. प्रत्येकाची वेगवेगळी कर्तव्ये

वर्णाश्रमाप्रमाणे शास्त्राने नेमून दिली आहेत. त्यात पुण्यकर्म आहेत, पापकर्म आहेत, त्या सर्वही कर्माचं फल म्हणजे सृष्टीची रचना आहे. या सृष्टिरचनेची मूलतत्त्व, पंचभूतं आहेत, पण त्याच्यामध्ये कमी जास्तीपणा कसा करायचा आणि कसा केला गेलेला आहे प्रत्येकाच्या शरीरात हे कोणाला सांगता येत नाही. हे भगवंतांच्या गीता, गीता शब्द त्यांचाच शब्द आहे, त्या गीतेवरूनच मान्य करावं लागतं की प्रत्येकाच्या शरीरामधे सुद्धा कांही फरक आहे. बाह्य शरीराचा सुद्धा आणखी उपयोग आहे. या बाह्य शरीरामध्ये, मन, बुद्धी, इंद्रिय–प्रायवायू सगळं हे बाह्य शरीरामध्ये आहेत. या बाह्य शरीरामधे ही सगळी बुद्धी असतानासुद्धा, त्या बुद्धीमध्ये असलेले ज्ञान कुठे उपयोगी पडतं कुठे उपयोगी पडत नाही हा सुद्धा विचार आहे. तेव्हा त्याला समजावून सांगितलं, तुझ्या हातून आई–बापांचा छळ झालेला आहे, मागच्या सातव्या जन्मामधे, त्यामुळे तू या जन्माला आलेला आहेस. तुझं सगळं ज्ञान क्रमा–क्रमाने गेलेलं आहे. तू मिळिवलेलं आहेस ज्ञान, ते तुला आता दिसतंय, पण हे ज्ञान त्या जन्मातलं आहे. या जन्मातलं नाहीये. तेव्हा यावेळेला तुला जर आणखी चांगला देह मिळायचा असेल, चांगलं हे करायचं असेल तर भीमा–अमरजा संगमवार एक महिनाभर तू आणखी नित्य स्नान कर, श्रद्धेनं, सगळी पापं तुझी जातील, हा देह जाईल, नवीन देह, उत्तम देह तुला प्राप्त होईल आणि त्याप्रमाणे तू ब्राह्मण म्हणून, म्हणायला हरकत नाही. आणि त्या वेळेला तुला जे ज्ञान मिळेल, त्या ज्ञानाचा तुला उपयोग त्या वेळेला होईल असं महाराजांनी सांगितलं.

पण याचाही अहंकार आड आलेला आहे, तो म्हणाला, मला सगळं ज्ञान झालेलं आहे तर त्यात शरीर–बिरीर कुठला विचार करायचा? प्रत्येकाचा विचार करायचाय. शरीराचा विचार केला पाहिजे, इंद्रियांचा विचार केला पाहिजे. मनाचा विचार केला पाहिजे. ही जी साधनं आपल्याजवळ आहेत, आपण जी वापरतो त्या प्रत्येकाचा विचार केला पाहिजे. काय गुण आहेत, कोणचे दोष आहेत, हा सगळा विचार करायला नको कां ? शास्त्र हे त्याकरिता भगवंतांनी सांगितलं आहे. शास्त्रामधे हा सगळा सूक्ष्म विचार आहे. **विश्वामित्रऋषि क्षत्रिय होते.** त्यांनासुद्धा ब्रह्मर्षि होण्याची इच्छा झाली म्हणाले. देवांनी सांगितलं, 'वसिष्ठ महाराज आमचे गुरू आहेत. त्यांनी जर तुम्हाला ब्रह्मर्षि म्हणून कबूल केलं तर आम्ही तुम्हाला ब्रह्मर्षि म्हणू, नाहीतर मानणार नाही.' ब्रह्मर्षि म्हणून म्हणा, विश्वामित्रांनी वसिष्ठांना आणखी सांगितलं. ते म्हणाले, ती तुझी अजून योग्यता यायचीय म्हणाले. ऐकलं नाही, पुष्कळ त्यांची मुलं मारली विश्वामित्रांनी, त्याला ब्रह्मर्षि व्हायचंय आणि अहंकारानी असा वागला. त्यांची मुलं मारली आणि त्यांनाही मारण्याकरता आणि हातामधे मोठा दगड घेऊन आलेला आहे आणि मग त्याला पश्चात्ताप झालेला आहे. वसिष्ठांना मारल्यानंतर तर मग आपल्याला कोण म्हणणार

ब्रह्मर्षि ? ब्रह्मर्षि व्हायचं झालं तर किती तरी जन्म आपण आपली योग्यता वाढवायला पाहिजे. **ब्रह्मज्ञान म्हणजे पूर्ण आणखी शांती आहे, कुणीही शत्रु नाही, कुणाचाही द्वेष करायचा नाही.**

कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे । (श्री तुकाराम महाराज)

ही मनाची भूमिका तयार झाली पाहिजे. शत्रू, शत्रुत्वाने वागणाऱ्याचा सुद्धा व्देष मनामधे उत्पन्न होऊन उपयोग नाही, इतकी तयारी झाली म्हणजे तो ब्रह्मज्ञानी आहे. तो ब्रह्मर्षि होऊ शकतो. नुसतं ब्रह्मर्षि कांही पदवी नाहीये, छापून आपलं त्याचं हे करून द्यायचं, पदवी प्रमाणपत्र दिलं म्हणजे ब्रह्मर्षि होत नाही तो. नुसतं म्हणण्यामधे नाहीये.

म्हणून वसिष्ठ ऋषींनी त्यांना सांगितलं की तू ब्रह्मर्षि व्हायचं झालं तुला तर हा देह सूर्यकिरणांनी जाळून टाक म्हणाले. दुसरा नवीन देह धारण कर. तुझ्याजवळ शक्ती आहे, मान्य आहे आम्हाला. पण ती शक्ती जरी असली तरीसुद्धा तुला या देहाचा संबंध सोडावा लागेल. देहाबरोबर सगळं येतं असं नाहीये. देहाच्या आंत मन, बुद्धी वगैरे जी तत्त्व आहेत, त्या बुद्धीमधे, मनामधे काय काय गुण दोष आहेत, कोणच्या देहामधे कमी असतात, कोणत्या देहामधे जास्ती असतात. हा सगळा सुक्ष्म विचार केला पाहिजे. तो शास्त्रकारांनी केलेला आहे.

विश्वामित्रांनी त्याप्रमाणे, आपला तो देह जाळून टाकलेला आहे. नवीन देह धारण केलेला आहे. ब्रह्मर्षि झाला तो. होत नाहीये असं नाही. ब्रह्मर्षि कोणीही होतंय. वैदिक संस्कृतीचा सिद्धांत आहे,

अमन्त्रमक्षरं नास्ति । नास्ति मूलमनौषधम् ।

अयोग्य: पुरुषो नास्ति । *योजकस्तत्र दुर्लभः ॥* **(सुभाषितरत्न भाण्डागारम् श्लोक १५८)**

हा मोठा सिद्धांत आहे. जगामधे अयोग्य कोणीही मनुष्य नाही, पण त्याची योग्यता कोणच्या कामावर सध्या आहे, हे पाहिलं पाहिजे. उत्तम आणखी दुकान आहे, कापडाचं दुकान आहे, सगळं आहे पुष्कळ लोक येतायत, गिऱ्हाईक येतायत, सगळे येतायत, आणि त्या दुकानामधे मुख्य जो मुनीम आहे, त्याची बसायची गादी वेगळी आहे. तो तिथे बसतो आहे, तो सगळ्यांच्याकडून काम करवून घेतो आहे आणि ते दुकान झाडून काढणारा, गाद्या वगैरे टाकणारा मनुष्य जो आहे, तो जर म्हणाला की मला त्या मुनिमाच्या जागेवर – गादीवर नेऊन बसवा, म्हणजे, बसवेल का कोणी तरी ? तो सगळा पैसा मी जमा करणार, मी हे करणार, त्यांनी जरी म्हटलं, तरी शक्य आहे का ते? व्यवहारात तरी ही विषमता मान्य करावी लागते की नाही? तो झाडझूड करणारा, गाद्या टाकणारा मनुष्य त्यालाही तुम्ही पगार देता की, त्यालाही पगार द्यायचा. त्याच्याकडून, पण कोणतं काम कोणाकडून करून घ्यायचं हे सुद्धा

तुमच्या व्यवहारात व्यवस्थित होण्याकरिता मान्य करावं लागतं की नाही ? कां मुनिमाच्या जागेवर त्या झाडणाऱ्याला बसवायचं आणि मुनिमाला झाडून काढ म्हणून म्हणायचं, चालेल कां दुकान ते? तो जर तिथे जाऊन बसला तर हा सगळही अर्थार्जन होईल का? त्याला बुद्धी आहे कां तितकी? म्हणून हा सगळाही सर्वांगीण विचार, अंतर्बाह्य विचार करून, अनेक जन्म आहेत, त्या त्या जन्मामधे उन्नती क्रमा-क्रमाने मिळवायची असती. एकदम कोणाचीही उन्नती एकदम, कोणीही करू शकत नाही. राजशासनाला सुद्धा करता येणार नाही.

मंदिरप्रवेशाचा कायदा झाला पण कायद्याप्रमाणे कोण मंदिरात जातंय, कोण चोखामेळा बनलेले आहेत. हे सांगू शकतात काय ? चोखामेळ्याचं इतकं प्रेम आहे की त्याच्या अस्थी नामदेवाने आणल्याबरोबर-पांडुरंग आंतून आलेत, टाक बाबा माझ्या पितांबरामधे त्याच्या अस्थी. ज्याच्या अस्थितून पांडुरंग पांडुरंग असा ध्वनी येत होता तो चोखामेळा आहे, तो सगळ्यांना सर्वांना वंद्य आहे. इतकी प्रेममय अवस्था निर्माण करण्याकरिता प्रयत्न केला पाहिजे. नुसता प्रवेश करून कुणालाही देव दिसणार नाही आणि कोणी जाणारही नाही. अधिकार-अनधिकार हा विचार, केवळ अहंकाराने चाललेलं आहे, आणि अहंकाराने हे केलंच पाहिजे म्हणून कांही त्याचा उपयोग होत नाही. बुद्धीची सुधारणा- **भूता परस्परो पडो मैत्र जीवाचे !** ज्ञानेश्वर महाराज प्रार्थना करतात देवाजवळ, पांडुरंगाजवळ, हे काय राष्ट्राला उपयोगी नाही काय हे ? हे नुसतं आपलं पसायदान म्हणण्याकरता आहे काय? सर्वभूतांची परस्पर मैत्री असावी. देवा तुम्ही एवढं करा, अशी देवाला प्रार्थना त्यांनी केली. ते राष्ट्राचं कल्याण नाही कां ? कोणाची मैत्री आहे आज? प्रत्येकाचं तोंड एका बाजूला, याच तोंड एका बाजूला, वेगळ्या बाजूला, भाऊ भावाला विचारणार नाही. एक गांव-घरामध्ये राहणारी मंडळी या घरात कोण आहेत कां ? आम्हाला माहीत नाही म्हणतात. त्यांच्या जवळच खोली असती ! ही राष्ट्राची उन्नती आहे कां ही? स्वातंत्र्य मिळवून काय उपयोग झालेला आहे ?....

तर अशा दृष्टीनं, हे मोठे महात्मे आहेत, **'शास्त्रं प्रमाणं ते'** शास्त्राप्रमाणे वागा म्हणतात भगवान. तुम्ही आपली बुद्धी अहंकारानी ही आणखी अशी, दुरुपयोग तिचा करू नका एवढंच त्यांचं सांगणं आहे.

ऐकलं नाही त्यांनी. आता काय करायचं? हा जो अहंकारी बनला, हरीजन, मी ज्ञानी आहे, ज्ञान मिळालं त्याला, मिळालं म्हणजे मागच्याच जन्मात त्यानी मिळिवलेलं, त्याच्याजवळ आणून दिलेलं आहे भगवंतांनी. महाराजांनी. तो होताच, एकदा ज्ञानी होता. आत्ता तु मिळवलेलं नाही ज्ञान हे. पण त्याला कल्पना नाही, मग कुणाला एका शिष्याला त्यांनी सांगितलं, की एका मनुष्याला, कुणीतरी व्यापार करणाऱ्या मनुष्याला घेऊन या म्हणाले. घागरभर पाणी आणायला सांगा. पाणी आणल्याबरोबर याच्या सबंध डोक्यावरून ते पाणी ओत म्हणाले.

पाणी ओतलं त्यांनी. आणखी सबंध पाणी ओतल्याबरोबर त्याची सगळी बायका-मुलं, सगळी त्याच्या जवळ आली होती. चला घरी चला म्हणतायत. तो मारायला लागला, तुमचा माझा काय संबंध म्हणाला. हे ज्ञानाचा उपयोग हा झाला. जे नसताना, म्हणजे योग्यता नसताना जे ज्ञान मिळालं त्याचा अहंकार इतका उत्पन्न झाला, की त्याचीच बायकामुलं, त्याला घरी जाण्याकरता रडतात हे करतायत, पण तो कांही त्यांच्याकडे जायला तयार नाही. मी ब्राह्मण आहे, मी अमुक आहे. ते सबंध पाणी त्याच्या अंगावरून गेल्याबरोबर, सबंध हे धुऊन गेलं भस्म, आणि एकदम त्याचं ज्ञान गेलेलं आहे.

सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ॥ **(भ.गी. १५.१५)**

ज्ञानही देणारा मी आहे आणि काढून घेणाराही मी आहे, सगळं विसरून गेलेला आहे. त्या बायका-मुलांना म्हणाला चला चला म्हणाला, कुठं मी इथे आलो, किती वेळ झाला कांही नाही ? जाऊ या. त्यांना घेऊन घरी गेला तो. हे त्रिविक्रमभारतींनी पाहिलं. त्यांना आश्चर्य वाटलं. महाराज, तुम्ही आता इतकं दिव्य ज्ञान याला दिलं होतं की ते जे विद्वान ब्राह्मण जे आलेले होते, चार वेदांचा आम्ही अभ्यास केलेला आहे वगैर वगैरे म्हणणारे ते ब्राह्मण, परंतु हा बोलायला लागला. मलासुद्धा आश्चर्य वाटलं म्हणाले, काय संस्कृत ग्रंथातले उतारे काय, तोंडातून उच्चार तो काय ? तो उत्तम संस्कृत भाषा तो बोलतो आहे. वेदमंत्र किती उत्तम बोलतो आहे. तेव्हा इतकं दिव्यज्ञान याला दिलेलं असताना नुसतं पाण्याचा घडा त्याच्या अंगावर टाकल्याबरोबर दिव्य ज्ञान गेलं म्हणाले. आता काय सांगणार ? महाराजांनी आपला निराळाच विषय काढला. होय बाबा, त्याच्या अंगावर विभूती टाकली होती आम्ही म्हणाले. भस्म टाकलं होत, ते भस्म टाकल्यामुळे त्याला ते दिव्य ज्ञान होतं म्हणाले ते. पाणी घातल्याबरोबर त्याचं ते भस्म अंगावरचं सगळं धुऊन गेलं. त्यामुळे, त्याबरोबर ते ज्ञानही गेलेलं आहे. जास्ती काय आता महाराजांना विचारायचं? तुम्हीच दिलं आणि तुम्हीच काढून घेतलं असं म्हणता येईल कां तिथे ?

एक महिनाभर तू आणखी संगमावर स्नान करशील तर हे ज्ञान तुझ्याबरोबर कायमचं राहील. तू ब्राह्मण होशील म्हणून सांगितलं. हा देह जाईल, नवीन देह येईल. पण नाही, ऐकलं नाही. ते ज्ञानही गेलं. अन सगळंच गेलं. पुन्हा आता किती जन्म जाणार कुणास ठाऊक? **पण महाराजांनी कारण मात्र हे सांगितलेलं आहे, की भस्माचा महिमा असा आहे म्हणाले. त्यांना एक नवीन साधन सांगायचं होतं. त्याकरता हा एक विषय त्यांनी काढला.** त्या भस्म त्याच्या अंगावर टाकलं होतं आम्ही म्हणाले. त्यामुळे ते दिव्यज्ञान त्याठिकाणी आलं. पण सगळ्या रेघा

ओलांडून कसं आलं ? काय आलं? हे कसं सांगणार ते? आणि सांगितल्यानंतर कुणाला खरं वाटेल कां? प्रत्यक्ष गोष्ट आहे. अगदी त्या गांवात राहाणारा आणखी कांही ज्याला ज्ञान नाही, तो एकेक रेघ ओलांडून येताना, एकेक ज्ञान त्याचं वाढत गेलेलं आहे, सगळ्या लोकांनी पाहिलं. महाराजांच्या आज्ञेनं ते काम झालं आहे. पण महाराज सांगतायत, भस्मामुळे झालं म्हणून. त्या रेघातून अलिकडे आल्यानंतर त्याला ज्ञान झालेलं आहे, तुमच्या जवळ जवळ जसा येत गेला एकेक रेघ ओलांडून, तसा तो ज्ञानी बनलेला आहे. पण हा विचार ऐकणं, सांगणं हे फार कठीण आहे. सगळ्या शक्तींचं वर्णन करणं किती कठिण आहे. योगसामर्थ्याने कुठेही आणखी कांहीही चाललेलं असेल ते सगळं समजतं म्हणतात. हे कळतं म्हणतात. दुसऱ्यांच्या मनातलही असलेल कळतं म्हणतात. क्षुद्र सिद्धी आहे. अगदी सामान्य सिद्धी. अगदी सामान्य. **परचित्त ज्ञानम्** ही जी सिद्धी आहे ही अगदी सामान्य मानलेली आहे त्यांनी. पण दुसऱ्याच्या चित्तातलं बरोबर, तो आलेला, आणि तुम्ही असं तुमच्या मनांत आहे तुम्ही असं सांगू शकतात कांही लोक. पण ही अगदी सामान्य सिद्धी आहे. मुख्य मुख्य, मोठया मोठया कितीतरी सिद्धी आहेत. किती अलौकिक शक्ती आहेत त्या. **मानसिक शक्तीचा विकास म्हणजेच योगसिद्धी आहेत.** अष्ट महासिद्धी काय किंवा लघुसिद्धी काय, योगाचं फळ म्हणून ज्या सिद्धी दिलेल्या आहेत, योग–शास्त्रकारांनी, **त्या सर्व सिद्धींचा अर्थ इतकाच आहे की मानसिक शक्तीचा विकास त्या योगाभ्यासाने त्या पुरूषाने करून घेतलेला आहे.** त्याच्या मनाची शक्ती इतकी वाढलेली आहे, की तो देह वाटेल तितका मोठा करू शकतो, देह लहान करू शकतो; जड होऊ शकतो, अगदी हलका होऊ शकतो. वाटेल ते होऊ शकतो. अणिमा, गरिमा, महिमा वगैरे. लंकेला जाताना मारूतीरायांनी केवढं मोठं स्वरूप धारण केलेलं आहे. महेंद्र पर्वतावरून उड्डाण केले आणि पलिकडे गेले ते. किती विलक्षण मोठं शरीर होतं म्हणतात. लंकेत गेल्याबरोबर अगदी लहान झाले. कारण तिथे एवढं मोठं शरीर धारण केल्यानंतर ते रावण वगैरे येणारच की नाही, हा कोण आलाय म्हणून. म्हणून सीतेचा शोध बाजूलाच राहील. म्हणून गेल्याबरोबर संध्याकाळी अगदी लहान रूप धारण केलं बालरुप आणि त्या रूपामधे शोध सुरू केला. हे लहान होणं, मोठं होणं वगैरे ही सगळी मानसिक शक्ती आहे. मनामधे संकल्प उत्पन्न होण्याबरोबर त्याप्रमाणे होणं, हा मानसिक शक्तीचा विकास त्या योगाभ्यासी पुरूषांनी करून, हे जे प्रयोग आहेत ते केले आहेत. प्रयोगशास्त्र, प्रयोगशास्त्राप्रमाणे कशी कशी फल सिद्धी होते ते सगळं सांगतां येणं, शब्दानी सांगता येणं शक्य नाही. म्हणून तो विषय तसाच बाजूला राहिलेला आहे.

त्रिविक्रमभारतीही कांही बोलू शकलेले नाहीत. तो आला, ज्ञानी झाला, काट्यानी काटा काढायचा त्याप्रामणे त्यांना, त्या दोघांही, अहंकारी ब्राह्मणांना शासन झालेलं आहे. यालाही आणखी याचंही ज्ञान काढून घेऊन, याला लावून दिलं आहे. उद्धार– बिद्धार नाही, या वेळेला

नाही. उद्धाराचा सुद्धा समय आहे म्हणाले. 'अहिंसा परमो धर्मः' अर्जुन सांगतोय. नाही यावेळेला नाही म्हणाले. अहिंसा परमो धर्मः आत्ता नाही. यावेळेला सगळं हे सैन्य नाहीसं होणार आहे. **विश्वरूप दाखवून ते सांगतायत.**

कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो लोकान् समाहर्तुमिह प्रवृत्तः ।

ऋतेऽपि त्वां न भविष्यन्ति सर्वे येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः । **(भ.गी. ११.३२)**

मी, कालरूपी मी आहे. माझा संकल्प झालेला आहे. हे भीष्म, द्रोण, कर्ण कोणीही असतील दुर्योधन, सगळे जाणारेत म्हणाले. तू त्यांना वाचवू शकणार नाहीस. तू जन्माला घातलेलं नाहीयेस, तू मारणारा नाहीयेस. व्यर्थ माझ्यामुळे मरतील, हा तुझा अहंकार आहे हे सगजून घे. तुझं कर्तव्य तुला करायचं तर कर, नाहीतरी हे जाणार आहेत. तू गेलास तरी हरकत नाही. असं स्पष्ट त्याला सांगितलं.

तर याप्रमाणे दिव्य ज्ञान जे आहे, ते मिळालं म्हणाले. मिळेल. त्यानी मिळवलेलंच होतं ज्ञान. त्याचंच ज्ञान त्याला फक्त दाखिवलं, महाराजांनी. तुझ्याजवळ ज्ञान आहे, पण हा अहंकार सोडून दे. सांगतो त्याप्रमाणे वाग म्हणजे ते ज्ञान तुला कायमचं तुझ्याजवळ राहील. त्यामुळे ते सगळं गेलं पुन्हा, आणि नंतर मग भस्माचं माहात्म्य हे महाराजांनी आणखी सांगायला सुरूवात केलेली आहे. भस्मामुळे असं झालं, असा एक नवीन विषय त्यांनी काढलेला आहे.

आपल्या वैदिक धर्मामधे किती प्रकारची साधनं सांगितलेली आहेत, हे पहाणारा कोणी नाहीये. **आपला स्वतःचा उद्धार, आपल्या सगळ्याही समाजाचा उद्धार करण्याची ज्याला तळमळ असेल त्यांनी अगोदर आपला स्वतःचा उद्धार करून घेतला पाहिजे आणि नंतर इतरांचा, लोकांचाही उद्धार करण्याचा प्रयत्न त्याला करता येतो, तो यशस्वी होतो.** साधारण भस्म महात्म्य म्हणून सांगतायत महाराज. त्रिविक्रमभारती ऐकतो आहे. त्यालासुद्धा कांही उत्तर देता आलं नाही. दिव्य ज्ञान मिळालं कसं, अन् गेलं कसं, विचारतोय महाराजांना. महाराजांनी, तो विषय तसाच बाजूला ठेऊन टाकला. कसं आल आणि कसं गेलं हे काही सांगता येणार नाही म्हणाले. तुला समजणार नाही. कारण विश्वास कुठे बसणार? महाराजांनी ज्ञान दिलं असं सांगितलं असतं, त्यानी स्वतः, तर कोणी ऐकलं असतं का? उगीच आपलं कांहीतरी म्हणतायत महाराज. तेव्हा तो विषयच राहू दे म्हणाले. भस्माचं माहात्म्य आहे एवढं त्यांनी सांगितलं, आणि त्याप्रमाणे ते माहात्म्य सांगायला सुरुवात केलेली आहे.

वामदेव नांवाचे महर्षि, मोठे शिवभक्त आहेत आणि मोठे ज्ञानी आहेत. गर्भामधे असतानाच त्यांना दिव्यज्ञान झालं म्हणतात. सर्वात्मभाव त्यांना गर्भात असतानाच झालेला

आहे. सर्वच मी आहे, सूर्य-चंद्र सगळच मी आहे, ते आत्मज्ञान त्यांना गर्भात असताना झालं होतं. असे मोठे अधिकारी वामदेव ऋषी, सगळ्या अंगाला भस्म लावलेलं आहे. भगवान शंकराला प्रिय विभुती आहे ती. तेव्हा ते भस्म अंगाला लावून आणखी पृथ्वीवर संचार करतायत. जाणे-येणं चाललेलं आहे. फिरतायत सबंध भूमंडलामधे. काय कुठे, अमुक ठिकाणीच रहायला पाहिजे वगैरे कांही हे नाही. ओढा कांहीच नाही ना. ममता कुठेच नाही. असली तर सर्वत्र आहे, नाहीतर कुठेही नाही. दोन्हीही त्यांचं आहे. सर्व - संकल्प संन्यासी म्हणून त्यांना म्हणतात भगवान. कांहीही संकल्प नाही. **संकल्प केव्हा उत्पन्न होतो? हा माझा मुलगा आहे, माझी स्त्री आहे, माझं शेत आहे, माझं दुकान आहे, माझी सत्ता आहे, हे मंत्रीपद माझं आहे, ही ममता दृढ झाल्यानंतर, मग त्याच्या संरक्षणाकरता म्हणा, टिकवण्याकरता म्हणा, मग चांगले वाईट वगैरे प्रयत्न करावे लागतात.** ते होतात. परंतु ज्यांच्या मनामधे ममता कुठेच नाहीये, आहे जग आहे, ईश्वराने निर्माण केलेलं आहे. हे माझं आणि ते माझं म्हणण्याची काय जरूर आहे? सृष्टीमधे ईश्वराने निर्माण केलेली सृष्टी वेगळी आहे आणि जीवाने आपल्या मनाने निर्माण केलेली सृष्टी वेगळी आहे. **'मानसद्वैत' जे म्हणतात ते फार घातक आहे.** घरामधे असलेली स्त्री, त्या स्त्रीला आणखी कितीतरी लोकांनी त्या स्त्रीच्या बद्दल वेगवेगळे आणखी संकल्पांनी निराळी स्त्री निर्माण केली आहे. ती मुलगी घरामधे लग्न होऊन आल्याबरोबर आणखी सासू म्हणाली माझी सून आहे. सून म्हणून कांही देवाने निर्माण केलेली नाही. नुसतं पांचभौतिक शरीर निर्माण केलेलं आहे देवाने. स्त्री शरीर निर्माण केलेलं आहे. फक्त स्त्री आहे. पण ती स्त्री घरामध्ये लग्न होऊन आल्याबरोबर सासू म्हणायला लागली माझी ही सून आहे. पती म्हणायला लागला माझी ही भार्या आहे, ती स्त्री आहे माझी. त्यानी आपल्या मनानी त्या स्त्रीच्या ठिकाणी कामिनी अशा प्रकारची कल्पना निर्माण केली, सासूने आपली सून म्हणून एक प्रतिमा निर्माण केली. त्याचप्रमाणे आणखी तिला मुलगा बिलगा झाल्यानंतर तो मुलगा म्हणाला, ही माझी आई आहे, म्हणून त्याची स्त्री ही निराळी राहील, त्याची आई म्हणून ती स्त्री निराळी झालेली आहे. अशा वेगळ्या वेगळ्या आणखी जीवांच्या बुद्धीनं ईश्वराने निर्माण केलेल्या एका स्त्री शरीरामधे वेगळी वेगळी रूपांतर झालेली आहेत. **मानसद्वैत** याला म्हणतात. ईश्वराने निर्माण केलेलं एकच शरीर आहे. त्यात कोण सून आणि कोण मुलगी, आणि कोण हे, जाऊ कोण, कांही संबंध नाहीये. **तरी प्रत्येकाच्या मनानी वेगळं वेगळं निर्माण केलेलं जे द्वैत आहे, ते द्वैत आणखी जायचं कसं?** म्हणून **ईश्वराने निर्माण केलेली सृष्टी आहे, ती जशी आहे तशी पहाणारे हे महात्मे आहेत.** त्यात आपल्या मनाने ही माझी आहे, आणखी माझ्याकडे सेवा करणारी आहे, माझ्यावर प्रेम करणारी आहे, कांही नाही. सर्वही एकंदर विश्व, हे पंचभूतात्मक आहे म्हणजे पंचमहाभूतापासून

निर्माण झालेलं आहे किंवा सर्वही विश्व ईश्वराचे स्वरूपच आहे. पंचभूतंही त्याचंच स्वरूप आहे. त्याच्यापासून निर्माण झालेलं सर्व चेतन, अचेतन विश्व हे त्याचं रूप आहे. ही एकच दृष्टी त्यांची असते, महात्म्यांची. त्यामुळे त्यांना कांही मोह नाही, कांही नाही.

अशा रीतीनं वामदेवांच्या सारखे महात्मे कुठेही फिरतात. कांही त्यांना भीती नाहीये, अरण्यात जातात, वाटेल तिकडे जातात. पशु-पक्षी, हिंस्त्र, सिंह, वाघ वगैरे क्रूर आहेत कांहीही कल्पना नाही. चेतन अचेतन कांही कल्पना नाही. निर्विकल्प मन झालेलं आहे. आणि अशा रीतीने ते अरण्यातून संचार करीत असताना, एक त्या ठिकाणी मोठा राक्षस राहात होता. क्रौंचारण्य म्हणतात. अरण्यही पुष्कळ सांगितलेली आहेत. पुराणामध्ये समुद्र किती आहेत, पर्वत किती आहेत, महानद्या किती आहेत, द्वीपं किती आहेत, सगळं वर्णन आलेलं आहे. एकंदर सृष्टीची रचना कशी कशी आहे हे सगळं, भूगोल आहे सगळा. परिक्षित राजाला तो भुगोल सगळा सांगितलाय शुकाचार्य महाराजांनी. सांगणारे, ऐकणारे यांची दृष्टी अशी आहे. **परमार्थामधे भूगोल कशाला समजायला पाहिजे? समजायला पाहिजे ! हे ईश्वरानं धारण केलेलं स्वरूप आहे.** हिमालय म्हणजे परमेश्वराचं रूप आहे ते. **'स्थावराणां हिमालयः'** भगवान सांगतायत, हिमालय म्हणजे माझी विभुती आहे, ती भारताला मिळालेली आहे, ती भारतातून गेली तरी हरकत नाही, लोकांनी कोणीही, पर शत्रूंनी नेली तरी हरकत नाही. तिथे काय गवतसुद्धा उगवत नाही. गेला तर गेला तो देश. असं म्हणायचं काय सत्ताधीशांनी? संतोष मानायचा या ठिकाणी? आपलं म्हणूनही, ममता म्हणूनही खरी नाही. माझं राज्य आहे, माझ्या राज्याचा हा भाग आहे, जाऊ देणार नाही मी, असं क्षत्रियाला वाटलं पाहिजे. तोच खरा क्षत्रिय आहे. संतोष क्षत्रियांनी दाखवायचा नसतो कधी. ब्राह्मणांनी संतोषाचा अभ्यास करायचाय आणि संतोषाचा अभ्यास करणारा क्षत्रिय, त्याचं कधीही आणखी कल्याण होत नाही, संतोष गुण आहे आणि संतोष दोष आहे. ब्राह्मणांना संतोष हा गुण आहे आणि क्षत्रियांना संतोष हा दोष आहे. त्यांचं राज्य सबंध नाहीसं होईल. जाऊ दे की, एवढं गेलं तर काय झाल, अजून पुष्कळ आहे, असं नाहीये.

तर ही यांची दृष्टी आहे. ममता नाही. हिमालय म्हणजे परमेश्वराची विभुती आहे आणि ती आमच्या राष्ट्रामधे आहे. आम्ही आणखी त्यांचं संरक्षण करण्याकरिता प्राणही देणार आहोत. पगार घेणारे सैनिक असे लढणार नाहीयेत. आमचा हा हिमालय आहे. आमचा हा परमात्मा, परमेश्वरस्वरूप, अशा भावनेनं प्राणत्याग सुद्धा करणारे लोक, ते खरे आहेत, युद्ध करणारे. या भावनेनं वागणारे महात्मे आहेत. **सर्वत्र ईश्वर रूप पाहणारे, ते वामदेव मुनी** क्रौंचारण्यातून चाललेले आहेत. आणि त्याच अरण्यामधे एक मोठा राक्षस रहात होता. काय कितीही त्यांनी माणसं काय, पशु-पक्षी काय वाटेल ते मारावं, खावं, मांस वगैरे कधीही तृप्ती

नाही, अतृप्त स्थिती आहे आणि त्याच्या दृष्टीला हे वामदेव ऋषी पडले. भूक लागली होती त्याला. बरं झालं म्हणाला, आपल्याला आज पुष्कळ मांस खायला मिळेल. धावत धावत आलेला आहे. आणि त्यांना धरलं त्याने नुसतं. यांच्या सर्वांगावरती आणखी भस्म होतं. ते भस्म त्याच्या शरीराला ते लागल्याबरोबर, त्याचं अज्ञान एकदम नाहीसं झालं आणि पूर्वी आपल्या एकंदर पंचवीस जन्माचं त्याला स्मरण झालेलं आहे.

अज्ञानामुळे पापं घडतात. पण ते अज्ञान दूर केलं किंवा ते जर झालं, तर पाप हे कमी होतय. ज्ञानामुळे पाप कमी होतय. वासना ह्या कमी कमी करण्याचा प्रयत्न, ज्ञान जसं जसं वाढत जाईल तशा कमी होतायत. आपण कोण आहोत, हे त्या राक्षसाला कळलेलय, की आपण एक पंचविसाव्या जन्मापासून, पंचवीस जन्म माझे हे असे असे गेले. तो पडला पाया पडला त्या वामदेवऋषींच्या आणि म्हणाला, महाराज, काय सांगू म्हणाला. आपल्याला मारण्याकरिता मी आलो, परंतु एकदम माझी बुद्धी अशी बदलली आणि माझ्या पंचवीस जन्मांचं स्मरण मला झालेलं आहे. म्हणून त्याने हकिकत सांगितली. पंचविसाच्या जन्मापासून म्हणजे पंचविसावा जन्माला सुरूवात झाली असा अर्थ नाहीये. त्याच्या पूर्वी किती तरी जन्म झाले. सांगता येत नाही आपल्याला अज्ञान आहे. म्हणून आपण नाही म्हणतो. सृष्टी किती अनादी आहे. केव्हा सृष्टी सुरु झाली, कोणीही सांगू शकत नाहीये. नुसतं आपला इसवी सनापूर्वी इतकं, इसवी सनापूर्वी तितकं एवढं म्हणायचं, दुसरं काय? त्याच्या पूर्वी काय काल नव्हता काय? त्याच्यापूर्वी कांही नव्हतं का सृष्टीत? कळत नाही आपल्याला एवढाच त्याचा अर्थ आहे. अज्ञेय आहे पण अनादी आहे. सृष्टी केव्हापासून सुरु झाली याचं उत्तर देता येत नाही. त्याचा आदी लागत नाही. आदी सापडत नाही केव्हापासून, हेच उत्तर खरं आहे. आपल्या बुद्धीनं वेद अमुक वेळेला पाच हजार वर्षापूर्वी उत्पन्न झाले. अमुक उत्पन्न झाले वगैरे हे नुसतं आपलं संशोधन चाललेलं आहे फक्त. या संशोधनामधे सुद्धा पुष्कळ मतभेद आहेत. त्यामुळे एकही संशोधन खरं नाही, असं म्हणावं लागतं. कांही थोडक्यात काल मानतात, कांही पाच हजार वर्षापूर्वी झालं म्हणतात, कांही त्याच्यापूर्वी झालं म्हणतात. म्हणजे या संशोधनामधे सुद्धा बुद्धीमध्येसुद्धा मतभेद आहेत. त्यामुळे कोणतं संशोधन खरं मानायचं? म्हणून अनादी, सृष्टिप्रवाह अनादी चालू आहे. केव्हा सुरू झाला हे सांगता येत नाहीये.

न रूपमस्येह तथोपलभ्यते **नान्तो न चाऽऽदिर्न च संप्रतिष्ठा ।**
अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा ॥ **(भ.गी. १५.३)**

आदी सापडत नाही, अंत केव्हा आहे हे सापडत नाही. सांगता येत नाही. कोणाच्या आधाराने राहिलाय हेही सांगता येत नाही म्हणतात भगवान. असा हा अश्वत्थ वृक्ष आहे.

तो सांगतो आहे राक्षस – ब्रह्मराक्षस. पंचविसाव्या जन्मापासून मला माझ्या जन्माच स्मरण आहे म्हणाला. पंचविसाव्या जन्मी मी राजा होतो, उत्तम मोठा राजा आहे. संपन्न आहे, सत्ता मोठी आहे, पराक्रमी आहे, सगळं आहे. परंतु आणखी अत्यंत, स्त्रियांच्या ठिकाणी आसक्त माझं चित्त होतं म्हणाला. पुष्कळ स्त्रिया द्रव्य देऊन अधिकारानं आणल्या. हे आणलेल्या त्या सगळ्या स्त्रिया त्या अशा प्रकारच्या विषयभोगामधे सगळं माझं आयुष्य गेलं म्हणाला. त्याने किती स्त्रिया केल्यात त्या गुरूचरित्रामधे वर्णन केलेलं आहे. कोणच्या कोणच्या जातीच्या किती स्त्रिया मी आणल्या होत्या बलात्काराने किंवा द्रव्य देऊन वगैरे, हे सगळं त्याने सांगितलं, तर शेवटी काय म्हणाले, पण शेवटी सबंध आयुष्य आणखी संपत आलेलं आहे, मग इथे जे राजे लोक होते ज्यांचा मी पराजय केलेला होता, त्यांनी सर्वांनी मिळून आणखी माझ्यावर हल्ला केला, माझं राज्य घेतलं, माझा नाश झाला आणि मी नरकामधे गेलो. यमधर्माने मला शासन केलेलं आहे आणि असे क्रमाक्रमाने, हत्ती झालो. त्याचप्रमाणे निरनिराळ्या पशूंच्या जन्माला गेलो, त्याचप्रमाणे वाघ झालो. शेवटी या जन्मामधे ब्रह्मराक्षस हा माझा पंचविसावा जन्म आहे.

आणि मला यमधर्माने, प्रथम ज्या वेळेला मी नरकामधे गेलो त्यावेळेला यमधर्माने सांगितलं मला की, मी त्या राज्य करीत असताना, पापं पुष्कळ केली म्हणाले. पण एके वेळेला पाऊस पडला नाही. मोठा तलाव खोदलेला आहे मी. सगळ्या लोकांची पाण्याची व्यवस्था केली, कांही शेती वगैरे दान केली. शेतं वगैरे दान केलेली आहेत. असं कांही पुण्य थोडं घडलं, यमधर्माने मला सांगितलं होतं, या तुझ्या पुण्याचं फळ तुला पंचविसाव्या जन्मामधे मिळेल. एवढंच सांगितलं. ते म्हणाले हे माझं पुण्याचं फळ म्हणजे तुला पंचविसाव्या जन्मामध्ये मिळेल एवढंच सांगितलं. ते म्हणाले हे माझं पुण्याचं फळ म्हणजे आपलं दर्शन झालं मला, आपली भेट झाली. आपल्या नुसत्या शरीराचा स्पर्श होण्याबरोबर मला माझ्या सगळ्या पंचवीस जन्माच्या अनंत पापाचं, सुख–दुःखाचं सगळंही ज्ञान मला आत्ता झालेलं आहे. आता माझा उद्धार कसा करायचा, हे ज्ञान झालं कसं? मग वामदेवांनी त्याला सांगितलं, बाबा, माझ्या अंगाला हे भस्म लावतो मी, मंत्र करुन, अभिमंत्रण करून, भगवान शंकरांच्या आज्ञेप्रमाणे हे भस्म मी लावतो. त्या भस्माचा स्पर्श तुझ्या शरीराला होण्याबरोबर तुझं सगळं अज्ञान आणखी पातकांचा नाश झालेला आहे आणि तुला तुझ्या अनेक जन्मांचं स्मरण झालेलं आहे. कर्माचं आणि जन्माचं. सगळं स्मरण झालंय. असं हे म्हणाले भस्माचं माहात्म्य भगवान शंकरांनीच सांगितलेलं आहे.

म्हणुन मंदार पर्वतावरती भगवान शंकर परमात्मा असेच बसलेले असताना सगळी देव मंडळी, ऋषिमंडळी तिथे आलेली असताना, सनत्कुमारांनी, आणखी भगवंतांना, शंकरांना विचारलं की साधन सोपं पाहिजे महाराज. सगळे जीव आणखी कल्याणाची इच्छा करणारे

आहेत. कल्याण याचा अर्थ काय? **सर्वेऽपि सुखिन:सन्तु सर्वे सन्तु निरामयाः । सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चित् दु:खमाप्नुयात् ! या इतक्या गोष्टी म्हणजे कल्याण आहे,** सुख प्राप्त होणं. निरामय: म्हणजे आरोग्य असणं, रोग कोणताही नाही. त्यानंतर सर्वही आपल्या याच्यामधे अमंगल कांहीही घडू नये. भद्राणि पश्यन्तु– मंगल गोष्टी पाहायला मिळाव्यात, चांगलं, आणि दु:खं कोणतीही होऊ नयेत याचं स्मरण, कल्याण, यापेक्षा कल्याण आणखी काय आहे. तर हे जे कल्याण आपलं व्हावं, आपल्याला सुख व्हावं, आरोग्य मिळावं, मंगलमय गोष्टी आपल्या जीवनामधे घडाव्यात, दु:खं कोणती येऊ नयेत ही प्रत्येकाला इच्छा आहे म्हणाले. पण त्या इच्छेप्रमाणे साधना करण्याची इतकी तयारी नाही किंवा योग्यता नाही, शक्ती नाही, धैर्य नाही, तेव्हा सुलभ असं एखादं साधन आपण सांगा ना देवा. आपण एकदा संकल्प करून ते साधन सांगून दिलं, म्हणजे, सुलभ असलं म्हणजे त्याचा उपयोग होईल. सुलभ असलं तरी सुद्धा विश्वास बसत नाही अशीही मोठी गोष्ट आहे. **नामसंकीर्तन साधन पै सोपे, जळतील पापे जन्मांतरीची,** आणखी सांगतायत ज्ञानेश्वर महाराज किंवा संतमहात्मे. अगदी सोपं साधन आहे म्हणतात. पण फल केवढं मोठं आहे. अनंत जन्माच्या पातकांचा नाश त्या नामसंकीर्तनाने होतो आहे. पण याच्यावरही विश्वास नाही. औषध दिलं डॉक्टरांनी, हे औषध घ्या दोन दिवसात तुम्हाला बरं वाटेल. अहो नाही, इंजेक्शन करा तुम्ही. त्याला दहा रुपये पडतील. देतो मी दहा रूपये. तो सांगतोय. डॉक्टर, इंजेक्शन नको, कशाला दहा रूपये खर्च करता? पण कळायला पाहिजे. तिकडे विश्वासच नाही ना ! एवढ्या औषधांनी, थोडंसं एक पुडी बांधून दिलं किंवा कांहीतरी घ्यायला दिलं बाटलीतून, एवढ्याने कसं जाईल हो? इंजेक्शन करा. यानेच आग्रह करायचा. तो ज्ञाता मनुष्य म्हणतोय जरूर नाही. हा अज्ञानी म्हणतोय तेच खरं. त्याला काय करायचं आता.

साधन सोपं पाहिजे. अशा प्रकारचं कठिण साधन करण्याची शक्ती जवळ नाही म्हणून सोपं साधन सांगितलं. त्याच्यावरती विश्वास नाहीये. अशी काही विलक्षण चित्तवृत्ती आहे. अस्थिर बुद्धी आहे जीवांची. स्थिर बुद्धी करण्याकरता प्रयत्न आहे, दुसरं काय. स्थित प्रज्ञावस्था म्हणजे अगदी स्थिर बुद्धी आहे. काय, खरं काय, खोटं काय, योग्य–अयोग्य सगळं पक्क मनाने ठरवलेलं आहे त्यांनी. कधीही त्यांच्या बुद्धीमध्ये अस्थिरता नसते स्थितप्रज्ञांच्या. म्हणून सनतकुमारांनी आणखी विचारलं, शंकराना, असं एक सुलभ साधन सांगा म्हणाले. त्यावेळेला त्यांनी, शंकरांनी, हा भस्मधारण विधि म्हणून सांगितलेला आहे आणि भस्मामधे सुद्धा प्रकार आहेत म्हणाले. पुरातनकालामधे, जिथं यज्ञकर्म झाले त्या ठिकाणी असतील त्या यज्ञभूमीमधे असलेलं भस्म हे जास्ती पवित्र आहे. गाणगापुरामधे त्या संगमाच्या जवळ एक मोठा भस्माचा डोंगर म्हणतात अगदी डोंगरासारखं नाहीये, पण तिथलं भस्म पुष्कळ लोक

आणतात, नेतात आपल्या **आपल्या गावाला. अजून ते विकतायत. रामाने यज्ञ केला होता. कोणी यज्ञ केला होता म्हणून सांगतात.** असं पुष्कळ ठिकाणी आहे. जुनी जी यज्ञस्थानं आहेत बऱ्याच ठिकाणी, पुष्कळ गावामधे, क्षेत्रामधे असतात, तिथले भस्म आणखी घेऊन जातात. धारण करतात.

तर ते भस्म, भस्मधारण करताना पुरातन यज्ञस्थानाची जी भूमी असेल तिथलं भस्म घ्यावं असं आरंभाला भगवान शंकरांनी सांगितलंय. किंवा नवीन अशा प्रकारचं अग्निहोत्र वगैरे असणं, ते अग्निहोत्री त्या ठिकाणी आणखी अग्निमधे होम करून जे भस्म असतं तेही भस्म घ्यायला सांगितलेलं आहे. आणि अशा भस्माचं विधिपूर्वक, मंत्रपूर्वक धारण करणं किंवा श्रद्धा भक्तीनं धारण करणं दोन्ही त्यांनी प्रकार सांगितले आहेत. त्या **भस्म धारणाच्या योगाने ज्ञात- अज्ञात सगळ्याही पातकांचा नाश होतो.** हे त्याचं फळ सांगतायत. साधन अगदी, हे साधन अगदी साधं आहे. भगवान शंकरांनी सनतकुमार महर्षी मोठे ब्रह्मज्ञानी त्यांना सांगितलेलं आहे. सर्व लोकांच्या कल्याणाकरता, त्यांच्या आणखी शक्तीप्रमाणे सांगितलेलं आहे. त्यांना फक्त श्रद्धेची आवश्यकता आहे, विश्वास पाहिजे. म्हणजे पापक्षय होतो. **पाप-पुण्य नाही तरी विश्वासाने, श्रद्धेनेच मानावे लागतात की नाही. पाप नाही, पुण्य नाही, जरी आम्ही समजत असलो तरी त्याचं फळ आम्हाला भोगावं लागतं ना? पाप, पुण्य हे कांही दिसणारे पदार्थ नाहीयेत. ते मूर्त पदार्थ नाहीत. पण पाप किंवा पुण्य यांचं फळ जे आहे, दुःख किंवा सुख, ते मात्र अनुभवाला प्रत्येकाच्या येतं. सुख नाही, किंवा दुःख नाही असा कोणी म्हणत नाही.** पुण्य नाही, पाप नाही, धर्म नाही, अधर्म नाही असं मात्र आम्ही म्हणतो. कारण दिसत नाही. तसं सुख अनुभवाला येत नाही किंवा दुःख अनुभवाला येत नाही असं कोणीही म्हणू शकणार नाही. मग हा जर अनुभव येतो मग या अनुभवाचं मूळ काय? येथून विचार करायला सुरूवात होते. सुख नाही आणखी दुःख नाही, म्हटल्यानंतर पाप-पुण्याचा संबंध संपलेला आहे. मला सुखही नाही आणि मला दुःखही नाही असं जो म्हणणारा आहे त्याने पुण्य-पाप मानले नाही तरी चालेल. धर्माधर्म मानत नाही. त्याला काही संबंधच नाही. पण तो सुखदुःखही विसरून गेलेला आहे. **''सुखदुःखे समे कृत्वा''** इतकी त्याची अवस्था, भूमिका झालेली आहे. पण तितकी आमची भूमिका नाहीये. सुख मिळाल्यानंतर आनंद आहे आणि दुःख मिळाल्यानंतर उद्वेग आहे हा जर अनुभव आहे तो त्याच्या कारणाची मीमांसा कां करू नये? आमच्या बुद्धीनेच ते करायचंय. कां आलेलं आहे? शास्त्र प्रमाण त्याकरता सांगतायत, यामुळे सुखं होतं, यामुळे दुःख होतं, पुण्याचं फळ पाहिजे आम्हाला. सुख पाहिजे, पण पुण्य करण्याची इच्छा नाही. दुःख नको आहे पण दुःखाचं कारण पाप मात्र करण्याची इच्छा आहे. पाप करणार आम्ही, मग दुःख नको आहे हे कसं होईल? जे नको आहे तुम्ही म्हणता, त्याचं जे

कारण आहे, ज्यामुळे ते दुःख निर्माण होतं, ते करण्याची इच्छा तरी कमी झाली पाहिजे. तो तरी मनाचा निरोध केला पाहिजे. पुण्याचं फळ सुख पाहिजे आहे ना? मग पुण्यच केलं पाहिजे. ते करण्याची इच्छा नाही. अशी कांही विचित्र मनःस्थिती आहे. त्या सगळ्या मनाला आणखी बोध करून, मन मार्गावरती आणण्याकरता हे सगळं शास्त्र आहे किंवा शास्त्रज्ञ महात्मे तो प्रयत्न करीत असतात. समजावून सांगून, त्याप्रमाणे त्यांचं आचरण होण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून चाललेला असतो.

तर आणखी, भगवान शंकरांनी अशाप्रकारचा भस्मधारण विधी सांगितलेला आहे. वामदेव महर्षी तर सर्वांगालाच भस्म लावत होते. कांही कांही स्थानाला, भस्मधारण विधी कसा आहे तो शास्त्रकारांनी सांगितलेला आहे. आणखी स्नान संध्या करणारे जे कांही विप्र असतील त्यांना प्रथम भस्मधारण करायला सांगितलेलं आहे. ते भस्म धारण करून, पवित्र होऊन मग संध्या, पूजा वगैरे कर्म त्यांनी करावीत. असंही त्यांनी सांगितलेलं आहे.

याप्रमाणे वामदेव महर्षींनी त्या राक्षसाला सांगितलं. राक्षसाला आपण केलेल्या पापाचं सगळं आणखी स्मरण झालेलं आहे. कबुली दिलेली आहे. मी पापं केलेली आहेत. त्याचं फळ मी हे भोगत आलेलो आहे. दोन्ही समजल्यामुळे त्यात कांही विश्वासाचा किंवा अविश्वासाचा प्रश्नच नाहीये. आत्तापर्यंत जितके जन्म आले, जितकी दुःख झाली त्याचंही स्मरण झालेलं आहे आणि ती दुःख कशामुळे झाली ती पापंही त्याला सगळी आठवलेली आहेत. ते आठवत नाही आम्हाला. आपण सकाळी कुणाला बोललो, कोणाची निंदा केली, कुणाला आणखी त्रास दिला त्याची आठवण आम्हाला एक तासाने राहात नाही. मागची पापं किती झाली, वाचिक, कायिक, मानसिक किती पापं झालेली आहेत. स्वतः कडून. दुसऱ्याकडून, आपण किती करिवलेली आहेत. पापाचे अनेक प्रकार आहेत. दुसऱ्याला पुढे करून तू त्याला बोल, तू त्याची निंदा कर म्हणुन सांगतो आपण, पण हा मोकळा राहिलेला नाहीये, हा सुद्धा त्यात वाटेकरी झालेला आहे. कायिक पाप आहे. नुसतं नाही, अनुमोदन दिलंय. बरं केलं तू त्याला बोललास ते तू. त्याचा अपमान केलास, तू बरं केलसं, तू चांगलं केलंस, हा सुद्धा त्यात भागीदार झालेला आहे.

ही सगळी सूक्ष्म आणखी विचारशक्ती त्याच्यामधे धरली, ही सगळी शास्त्रकारांनी पुढ मांडल्यानंतर त्याचा कांही आपला संबंधच नाहीये. हा विचार करण्याची सवयच आमची मोडलेली आहे ना. कलियुग, कलियुग आपण म्हणतो त्या कलियुगाचं जे आणखी हे, अशा प्रकारचीच अवस्था आहे. ही इतक्या प्रकारची पातकं आपल्याकडून होतायत, त्याची कल्पनाही आपल्याला नाही. म्हणून पूर्वीचा कृतयुगाचा काळ, त्रेतायुगाचा काळ, द्वापारयुगाचा काळ, त्याच्यामधे मनाची स्थिती कशी कशी होती आणि ती कशी कशी कमी कमी होत चाललेली आहे, म्हणून त्याला कलियुग म्हणायचं असं आहे. या युगामधेही चांगली वासना

असलेली लोकंही आहेत, पुष्कळ आहेत, नाही असं नाहीये. एकाने घर विकलं म्हणे, जागा विकली आपली दुसऱ्या माणसाला. एका कशात पुस्तकात गोष्ट आलेली आहे. ती जागा विकत घेणाऱ्याने आणखी ती खणून काढून तिथे आपल्याला घर बांधायचं आहे. खणता खणता त्याला त्याच्यामधे त्याला एक हंडा लागला, हंड्यामधे कांही सोन्याचे, चांदीचे दागिने होते. तो हंडा घेऊन तो मनुष्य ज्याने ती जागा विकली होती त्याच्या घरी गेला हे म्हणाला हा तुमचा पैसा आहे. ते द्रव्य कांही मी घेणार नाही. मी फक्त जमीन विकत घेतलेली आहे तुमची. जमिनीमधे सापडलेलं द्रव्य तुमचं आहे. तो मालक म्हणाला, विकणारा म्हणाला, मी सगळं तुम्हाला जमीन, जमिनीच्या वरची झाडं बीडं आतलं काय सगळं तुम्हाला विकलंय. मी हे द्रव्य घेणार नाही. राजाकडे गेले म्हणे दोघे. न्यायाधीशाकडे, काय निर्णय द्यायचा. असा खटला आज, आजच्या काळात केंव्हातरी कोणाला तरी, ऐकायला मिळेल का? हे भांडण हे कोणाला शक्य तरी आहे का? म्हणजे अशी बुद्धी त्या वेळेला होती पूर्वीच्या काळी. रामराज्य, रामराज्य म्हणजे असं आज इच्छा करतात माणसं. रामराज्य झालं पाहिजे. म्हणजे रामराज्य चांगलं आहे एवढं तरी मानतात हे कबूल आहे. चांगलं आहे म्हणाले. हे रामराज्य म्हणजे असं आहे. त्याग म्हणजे त्याग, त्यात कांही नाही, पुन्हा लोभ नाहीये. माझं नाहीये. तोही माझं म्हणायला तयार नाही. हाही माझं म्हणायला तयार नाही दोघांचंही विधान न्याय्य आहे ते. निर्णय न्यायाधीश काय देणार?

तर अशा रीतीनं वामदेवानी त्या राक्षसाला सांगितलंय. राक्षस कबूल झाला. त्याला ज्ञान झालेलं आहे ना? भस्माचा स्पर्श होण्याबरोबर दिव्यज्ञान झालेलं आहे. त्या **ज्ञानामुळे सगळी पातकं समजली. सगळे जन्म समजले. आणखी पुन्हा आपला उद्धार कसा होईल याची तळमळ निर्माण झाली आहे. हे ज्ञानाचं कार्य आहे.** असेच जन्म आता किती घ्यायचे ही तळमळ लागली पाहिजे ना? इतके जन्म मी घेत आलो आहे, आणि इतकी दुःख भोगत आलेलो आहे, असेच जर पुढे मला जन्म घ्यावे लागतील तर त्यातून माझी सुटका कशी होईल. अनायासे वामदेवांच्यासारखे महात्मे भेटलेले आहेत. त्यांनी जर कृपा केली तर मी पुढच्या दुःखातून मुक्त होईन. पुढच्या दुःखाची कल्पनाच येत नाही आपल्याला. आज सुखी आहोत आपण, आपल्याजवळ सगळी आणखी समृद्धी आहे, माझ्यासारखा कोण आहे? पण पुढे काय दुःख होणारेय काही कल्पना नाहीये. म्हणून पुढे येणाऱ्या दुःखाचा विचार अगोदर केला पाहिजे. श्रेष्ठ पुरूष दीर्घ दृष्टीनं विचार करीत असतात. पुढं किती भावी सुखी आपण राहिलं पाहिजे, सुखं टिकलं पाहिजे हा त्याचा अर्थ आहे. टिकणारं सुख कोणतं आहे याचा विचार करून ते प्रवृत्त होतात. म्हणून महात्म्यांनी सर्वसंग परित्याग केला. म्हणून त्यांनी व्यवहार सोडला असा त्याचा अर्थ नाहीये. व्यवहारांचं स्वरूप काय आहे ते ओळखून ते

व्यवहारातून बाजूला झालेले आहेत. व्यवहार सोडत नाहीत, घरदार सोडत नाहीत. कांही करीत नाहीत.

म्हणून तो राक्षस वामदेवाला शरण गेला, महाराज, आता असाच मी किती वाहात जाणार आहे? आज आपली गांठ पडलेली आहे. माझा उद्धार आपण करा. ही तळमळ उत्पन्न झालेली आहे. केलेल्या कर्माचा पूर्ण पश्चाताप झालेला आहे, गेलं पाप गेलं ते. मनाची तयारी झालेली आहे. हे कर्म चुकीचं आहे, पुन्हा कधीही तो करणार नाही. **पश्चातापाचं हे लक्षण आहे की पुन्हा त्या आणखी पापाकडे त्याची प्रवृत्ती होणारच नाहीये.** पण तो पश्चातापही होत नाही. अपराध घडलेला आहे, याची कबुलीच नाहीये. उलट दोष त्यालाच गुणरूप मानण्याची बुद्धी आमची झालेली आहे. याला राक्षस जन्मामधे जरी आलेला असला तरी वामदेवांच्या संगतीने याला अनेक जन्मांच्या पातकांचं सगळं स्मरण झालं आणि भीती उत्पन्न झाली आणि ती भीती दूर करणारा हा महात्मा आहे. ही श्रद्धा, हा विश्वास निर्माण झालेला आहे. संपूर्ण 'भवरोग वैद्यम्' भवरोग दूर करणारा हा आहे. भव, संसारातल्या एखाद्या जन्मात एखाद्या वेळेला येणारा रोग दूर करणाराही आणखी डॉक्टर, वैद्य त्याचे उपकार आम्ही मानतो. संपूर्ण असे रोग किती जन्माचे असतील, सगळे जन्म, **सर्वच जन्म बंद करणारा जर वैद्य भेटला तर ! किती त्याचे उपकार मानायला पाहिजेत?** ती उपकाराची जाणीव आणि त्याबद्दल श्रद्धा, विश्वास त्या राक्षसाच्या मनामधे उत्पन्न झालेला आहे. आणि त्याचा अधिकार पाहून वामदेवांनी अभिमंत्रण करून सर्व भस्म आणखी त्याला लावायला दिलं. लगेच शंकरांचे दूत विमान घेऊन आलेले आहेत. त्याला विमानात बसवून कैलासपर्वताला वामदेवांनी पाठवून दिलेलं आहे. पुन्हा आपले अरण्यात निघाले, संचार करायला. कांही त्याच्याबद्दल नाही. राक्षसाचा उद्धार झालेला आहे. शिवलोकाला पाठवलं म्हणून वर्तमानपत्रात जाहिरात देण्याचीही इच्छा नाही. तसे आहेत लोक. जीवाचा उद्धार झाला, बरं झालं ! देवाची कृपा आहे, देवाने सांगितलेली साधना, ज्याला इच्छा असेल त्याच्यापुढे मांडायची. त्या साधनाचा त्याने उपयोग करून घेतला. त्याच्या पूर्वकर्माचं त्याला जर फळ मिळालं तर चांगलं आहे. संपलं, ते विसरून जायचं. पुन्हा कांहीही नाही. केलेलं कर्म, आपण कांहीही करत नाहीये. ही त्यांची बुद्धी आहे, महात्म्यांची. अन तेच सद्गुरू अशा प्रकारचं जगाचं कल्याण करीत असतात.

याचप्रमाणे इथंपर्यंत हे चरित्र आलेलं आहे. सद्गुरू माहात्म्यच सांगितलेलं आहे गुरूमहाराजांनी. त्रिविक्रमांना हे सगळं समजून सांगितलं आणि त्रिविक्रमभारती आपल्या कुमसी गांवामधे गेलेले आहेत. एवढा आणखी चरित्रविस्तार झालेला आहे.

आता याच्यानंतर सद्गुरू नरसिंह सरस्वती महाराजांच्या कृपेची आणखी पुष्कळ उदाहरणं आहेत. त्यापैकी एक सतीचं चरित्र आहे. त्याकरिता त्याला बराच वेळ लागेल. आज

आता इथेच थांबायला हरकत नाही. उद्या ते सतीचं चरित्र. आणखी पुढं आणखी कांही. कर्मयोग जो आहे, कर्म हे एक साधन आहे. शास्त्राने सांगितलेली कर्म, स्त्रियांची कर्मं निराळी, पुरूषांची कर्मं निराळी, ब्रह्मचर्यांची निराळी, गृहस्थांची निराळी, वानप्रस्थांची, संन्याशांची निराळी, प्रत्येकाची वेगळी वेगळी कर्म आहेत. ती कर्म समजून घ्यायची आणि त्याप्रमाणे आचरण करायचं– **आचार, व्यवहार आणि प्रायश्चित्त** हे तीन विभाग आहेत धर्मशास्त्राचे. आचरण कसं करायचं ते अगोदर समजून घेतलं पाहिजे. आणि त्याप्रमाणे आचरण करायला पाहिजे. व्यवहार कसा आहे, बोलणं चालणं इत्यादी हा सगळा व्यवहार आहे. या व्यवहारातही कसं वागायचं? एकमेकाशी संबंध कसा ठेवायचा? त्यात कांही आणखी कमी जास्ती झालं तर काय करायचं हा प्रायश्चित्त विभाग म्हणून निराळा आहे. **आचारात कांही चूक झाली, व्यवहारामधे कांही वागण्यात चूक झाली,** तर ती चूक किंवा ते पाप नाहीसं करण्याकरता काय करायचं तो **प्रायश्चित्त विभाग आहे**. धर्मशास्त्राचे हे तीन विभाग आहेत. ते सगळे विभाग समजून सांगण्याकरता अवतार होतो आहे. तुमचा आचार कुठे चुकलेला आहे, तुम्ही, त्यात कशी सुधारणा केली पाहिजे, तुमचा व्यवहार कुठे चुकलेला आहे, कुणाला काय बोललेला आहे, तुम्ही. त्या शिरोळच्या बाईंची गोष्ट नाही कां, तिनं मागच्या जन्माचे शंभर रूपये घेतले होते त्यांनी आत्महत्या केली **तो पिशाच्च झाला. हा व्यवहाराचाच भाग आहे. व्यवहारातच चूक झालेली आहे. ऋण घेतलं** आणि दिलं नाही तिने. **ते समजावून सांगून त्याचा आणखी परीमार्जन करणे हे कार्य आणखी परमेश्वराला अवतार घेऊन करावं लागलं.** आणखी केलेले जे दोष आहेत, पापं घडलेली, त्याचं प्रायश्चित्त म्हणून हे विभाग धर्मशास्त्रकारांनी सांगितले आहेत. हे सगळे विभाग आहेत. कसं वागावं, म्हणजे शास्त्राप्रमाणे आचरण कसं करावं, व्यवहारामधे एकमेकाबरोबर वागताना कसं वागावं, आणि झालेले अपराध किंवा झालेले दोष कसे घालवावे, हे सगळं मांडून ठेवलेलं आहे. हे सगळंही सांगणारे महात्मे आहेत. कांही त्याच्याकरिता पुस्तकं वाचायला नकोत, अभ्यास करायला नकोत, कांहीही नको. संतांच्या जवळ राहिलं म्हणजे आपोआप सगळे शास्त्रसिद्धांत समजून येतात आणि त्याचप्रमाणे आपल्याला वागण्याची बुद्धीही देतात.

तर हे सगळं आणखी कर्मयोग मोठा फार आहे. **आचार, व्यवहार आणि प्रायश्चित्त हा कर्मयोगामधे घातलेला आहे.** त्याकरता एका पतिव्रता स्त्रीचे चरित्र आणखी सिद्धमुनींनी नामधारकांना सांगितलेलं आहे. **कर्मयोग आणि भक्तियोग हे दोन्ही मिळून असावेत असाही शास्त्राचा सिद्धांत आहे.** नुसता कर्मयोग नाहीये. कारण तो कर्मयोग, कर्माचं आचरण करीत असताना आपल्या मानवाच्या बुद्धीमधे कांही इतकी क्षमता नाहीये, सामर्थ्य नाहीये, काय चुका होतात, काय कुणाला ठाऊक. म्हणून **यज्ञयाग झाल्यानंतर प्रायश्चित्तात्मक कांही हवन करावं**

लागतं. ज्ञात-अज्ञात दोष आहेत, कांही आम्ही टाकताना कांही कमी जास्ती झालेलं असेल. आहुती टाकताना, असे अनेक दोषांचा उच्चार करून त्यांचं परिमार्जन करण्याकरता कांही आणखी हवन सांगितलेलं आहे. तसं आपण देवकर्म केल्यानंतर सुद्धा शेवटी

यस्य स्मृत्या च नामोक्त्या तपोयज्ञक्रियादिषु ।
न्यूनं संपूर्णतां याति सद्यो वन्दे तमच्युतम् । (संध्या समालोचन)

म्हणून त्या भगवंताला नमस्कार करायचा. आमच्याकडून आणखी पुष्कळ शरीरानं, वाणीनं, मनानं कांही दोष झालेले असतील, देवा, या कर्मामधे, त्याकरिता मी आपल्याला नमस्कार करतो आहे, आपल्या कृपेने त्याची पूर्णता आपण करा हे मोठं प्रायश्चित्त आहे. यज्ञामध्ये प्रायश्चित्त विधी निराळा आहे. पण हा एक मोठा, प्रत्येक कर्माच्या शेवटी आणखी भक्तीचा संबंध आहे. भगवंतांची प्रार्थना करूनच आपलं कर्म हे सफल करायचं असतं हे सगळं. तेव्हा तो कर्मयोग कसा आहे हे सांगण्याकरता आणखी सती धर्म आणखी सांगितलेले आहेत. सिद्धमुनींनी आपल्या नामधारकाला. महाराजांनीच त्या सतीला, सर्व स्त्रियांचा आणखी पतिव्रता स्त्रीचे सगळे धर्म उपदेश केलेले आहेत. तो प्रसंग, त्या सतीची कथा, त्या कथेचं चिंतन आपल्याला उद्या करायचं आहे. त्या पतिव्रता स्त्रीची भक्ती कशी होती, कर्मनिष्ठा किती होती, महाराजांच्या सांगण्याप्रमाणे, आणखी ती सहगमन करायला सुद्धा तयार झालेली आहे असं आणखी अलौकिक चरित्र आहे सतीचं. म्हणून पतिव्रता स्त्रियांचं सुद्धा आणखी नामस्मरण करावं म्हणून आपल्या धर्मामध्ये सांगतात. अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी वगैरे. ज्या पतिव्रता स्त्रिया आहेत, त्यांचेही स्मरण प्रातःस्मरणामधे घातलेलं आहे. चांगलं पुण्यकर्म करणारे आणखी, श्रेष्ठ गृहस्थाश्रमी.....राजे, महाराजे.....

पुण्यश्लोको नलोराजा, पुण्यश्लोको युधिष्ठिरः ।
पुण्यश्लोको विदेहश्च, पुण्यश्लोको जनार्दनः ॥

यांचंही स्मरण करायचं आहे. म्हणजे त्यांच्या चरित्राचं स्मरण केलं म्हणजे त्यांच्या आचरणाप्रमाणे आपण आचरण करावं, अशी बुद्धी उत्पन्न होती, श्रद्धा वाढती म्हणून त्या सगळ्यांचे, ही स्मरणीय आहेत त्यांचे स्मरण करायचे आहे. तेव्हा या पतिव्रता स्त्रीचं चरित्र आणखी महाराजांनी तिचा उद्धार कसा केला तेही आता सिद्धमुनी सांगणार आहेत. उद्या आणखी त्याचं चिंतन आपल्याला करायचंय....

॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ॥



॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे समश्लोकी गुरुसंहितेवरील प्रवचन
भगवंत मंदिर – बार्शी, जि. सोलापूर

पाचवा दिवस
अधिक श्रावण कृ. १२, शके १९०७, दि. १३ ऑगस्ट १९८५
दुपारी ४.३० ते संध्याकाळी ७

शृण्वेको माहुरे विप्रो गोपीनाथो धनी मृताः ।
तत्पुत्रा बहवोऽथैको जीवितो दत्तसेवया ॥ (द्विसाहस्त्री १६.४)

भगवान नृसिंहसरस्वती महाराजांचं चरित्र सिद्धमुनी नामधारकांना सांगतायत.

गाणगापुरामधे वास्तव्य झाल महाराजांचं. कोण कोण शिष्य भाग्यवान, हे येत आहेत, त्यांची सर्वही कामना पूर्ण करायची म्हणून, महाराज राहिले. कोणीही शिष्य असो, संकटग्रस्त आहे, आर्त आहे, रोग आहे, किंवा कांही भीती आहे, क्लेष आहेत, सगळे, किंवा जिज्ञासू आहेत शिष्य, संसार खरा की परमार्थ खरा, कोणीकडे आपण जावं, कांही निश्चय होत नाहीये. पाळणा हलायला लागला की, इकडे एकदा येतो, तिकडे एकदा जातो, तशी मनाची स्थिती आहे.

यदृच्छया मत्कथादौ जातश्रद्धस्तु यः पुमान् ।

न निर्विण्णो नातिसक्तो भक्तियोगोऽस्य सिद्धिदः । (श्रीमद्भागवत ११.२०.८)

भगवान सांगताहेत.

वैराग्यही होत नाही, दुःख भोगून, पुरे संसार, असंही वाटत नाही. मग संसारच करायचा, देवधर्म नको, तसेही होत नाही. काय करावं? ही जिज्ञासा मनामधे धारण करून, ही कांही शिष्य मंडळी येत असत. आणखी अर्थार्थी म्हणजे आपल्याला जे जे पाहिजे ते परमेश्वर, परमात्मा देईल, त्यांच्या कृपेने आपली इच्छा पूर्ण होईल, म्हणून अनेक इच्छा धारण करणारी मंडळीही येत असत. हे तिन्ही समजून येणं शक्य आहे. कोणाला आणखी रोग झालेला आहे, कोणाला काय भीती आहे, कळून तरी येईल, दिसतंय. पण चौथा जो भक्त आहे, **ज्ञानी तु आत्मैव मे मतम्** असं ज्याच्याबद्दल भगवान म्हणतायत. ज्ञानी आणि मी, याच्यामधे कांही भेद नाही. ज्ञानी हा ईश्वरस्वरूप झालेला असतो. तत्त्वज्ञान संपन्न, पण त्यालाही मार्गदर्शनाची अपेक्षा असते. तत्त्वज्ञान जरी झालं, तरीसुद्धा वासनाक्षय, आणखी मनोनाश, याचा एक अभ्यास त्यांना करावा लागतो. तत्त्वज्ञान दृढ करावं लागतं. पुनःपुन्हा समाधी अवस्थेतून त्याचं कर्म त्याला बाहेर आणतं. बाह्य सुखदुःखांचा संबंध त्याला घडतो आहे. अशा स्थितीमधे काय करावं? त्यालाही आणखी चिंता निर्माण होती. म्हणून तत्त्वज्ञानी माणसाला, भक्ताला सुद्धा मार्गदर्शन करायचंय ! भगवंतांचा, श्रीकृष्णांचा अवतार कां झाला? याबद्दल कुंतीनं स्तुती केलेली आहे, त्यात वेगळे वेगळे आणखी प्रकार दाखवलेले आहेत. भूभार हरण करण्याकरता भगवान अवतीर्ण झाले, कृष्ण परमात्मा, असं कांही म्हणतात म्हणाली. वसुदेवांनी तपश्चर्या केलेली होती. वसुदेव देवकीनी, त्यांनाही सुख द्यावे म्हणून अवतार झाला. आणखी एक प्रकार सांगितलाय.

तथा परमहंसानां मुनीनाममलात्मनाम् ।
भक्तियोगविधानार्थं कथं पश्येम हि स्त्रियः ॥ (भा. १.८.२०)

कुंती वर्णन करती भगवान श्रीकृष्णाचं, श्रीकृष्ण प्रत्यक्ष परमेश्वर आहेत ही भावना कुंतीच्या मनामधे पक्की आहे, आपल्या भावाचा मुलगा अशी कल्पना आहे, भाचा आहे हा, ही दृष्टी नाही. साक्षात परमेश्वर आहे. तेव्हा भगवंताचा अवतार या कार्याकरता झालेला आहे, असंही कांही लोक सांगतात. **भक्तियोगविधानार्थम् ....।** भक्ती योग कसा आहे, भक्ती कशी करावी हे शिकवण्याकरता अवतार झाला. कोणाला शिकवायचं, परमहंसानाम्, मुनीनाम्. अमलात्मनाम् म्हणतात. परमहंस परिव्राजकाचार्य, पूर्ण आणखी संन्यासी, सर्व ज्यांनी त्याग केलेला आहे. मनामधे कांहीही वासना राहिलेली नाही आणि मुनींनाही, मननशील आहेत. भगवंतांच्या स्वरूपाचं, नामाचं, गुणांचं, कर्माचं चिंतन सारखं चाललेले आहे, मनामध्ये, त्यामुळे अमलात्मनाम्, अगदी निर्मळ आत्मा म्हणजे, चित्त–अंतःकरण ज्यांचं झालेलं आहे,

असे आणखी जे आहेत मोठे, ऋषी, ज्ञानी त्यांना सुद्धा भक्तियोग विधानार्थम्.....। कशी भक्ती करावी, हे सांगायचं आहे, मार्गदर्शन करायचंय. उद्धवजींना गोकुळामध्ये जायला सांगितलंय. याप्रमाणे श्रेष्ठ होते, मुनी होते, अमलात्मन् होते, पण त्यांना सुद्धा भक्तियोग शिका, तुम्ही जाऊन पहा, गोपींची भक्ती कशी आहे म्हणून त्यांनाही लावून दिलं, ते गेले, राहिले गोकुळामधे. गोपींचीही मनोवृत्ती प्रेममय कशी आहे, हे सगळं त्यांनी अवलोकन केलं, खात्री झाली त्यांची आणि निघताना त्यांनी, त्या गोपींना नमस्कार केलेला आहे.

वन्दे नन्दव्रजस्त्रीणां पादरेणुमभीक्ष्णशः ।
यासां हरिकथोद्गीतं पुनाति भुवनत्रयम् ॥ (भा. १०.४७.६३)

या ज्या नंदाच्या व्रजात राहाणाऱ्या स्त्रिया आहेत, त्या स्त्रियांना नमस्कार. त्यांच्या पादरेणू **अभिक्षजाः वंदे** म्हणताहेत उद्धवजींसारखे ज्ञानी महात्मे,उत्तम राजकारण जाणणारे, राजनीतिज्ञ, बृहस्पतींचे शिष्य असणारे उद्धवजी, त्यांना सुद्धा ती भक्ती पाहून आणखी उत्तम मार्गदर्शन झालं, नम्र झाले, आणखी त्यांच्या चरणाच्या रजःकणाला मी नमस्कार करतो म्हणाले. भुवनत्रयाला पवित्र करण्याचं सामर्थ्य या गोपींच्या गीतांमध्ये आहे, हे त्यांनी कबूल केललं आहे.

तर असे सर्व प्रकारचे भक्त. परमेश्वराकडे येत असतात. आणखी आपला फायदा करून घेतात, मार्गदर्शन मिळताहे, तसं कार्य चाललेलं आहे, गाणगापुरामधे. आता या पुढची कथा सिद्धमुनी सांगणार आहेत. **कर्मयोग आणि भक्तियोग या दोघांचाही समन्वय कसा असावा?** परमेश्वराची भक्ती मनामधे तर आवश्यक आहे. कर्तव्यकर्मही केलं पाहिजे. तीसुद्धा ईश्वराची आज्ञा आहे. कर्मयोग म्हणजे दास्यभक्तिमध्ये त्याचा अंतरभाव होऊ शकतो. **आज्ञापालन म्हणजे दास्यभक्ति आहे.**

तर कर्तव्यकर्म हे कसं केलं पाहिजे, त्याबद्दल कशी आणखी बुद्धी पाहिजे, धारणा, निष्ठा पाहिजे आणि भगवंतांची भक्तीही कशी पाहिजे, कर्तव्य-कर्म करणारा जीवात्मा, हा आपल्या कर्तव्यकर्माच्या पालनानी, आचरणानी किती समर्थ होतो, आणि त्याच्या जोडीला जर भगवत्भक्ति असेल त्याला मिळालेली असेल, ईश्वराच्या कृपेनं, तर तो कसा कृतकार्य होतो, त्याची कार्यसिद्धी कितीही कठीण असली तरी कशी होती, याबद्दलची कथा आणखी सिद्धमुनी सांगताहेत.

शृण्वेको माहुरे विप्रो गोपीनाथो धनी मृताः ।
तत्पुत्रा बहवोऽथैको जीवितो दत्तसेवया ॥ (द्विसाहस्त्री १६.४)

माहूर क्षेत्र म्हणून जे आहे, भगवान दत्तात्रेयांचं निद्रास्थान ते आहे. अत्रिमुनींचा आश्रम तिथे आहे, अनुसूयामाता-अत्रिमुनींचा आश्रम आणि त्या आश्रमामधे ही दत्तात्रेयांची बालमूर्ती

आहे. कृष्ण पाषाण, पाहिल्याबरोबर आणखी, तहान नाही, भूक नाही, कांही नाही, असे भगवान तिथे राहिलेले आहेत. भगवती जगत्जननी, रेणुकामाता ही त्या ठिकाणी आहे. तिचं वास्तव्य आहे. सती गेलेली आहे ती, त्या स्थानामधे. जमदग्नींचा नाश आणखी क्षत्रिय राजांनी केल्यामुळे परशुरामजी त्या आपल्या मातेला, आपल्या पित्याचं ते शव एका बाजूला, माता एका बाजूला अशी कावड करून तिथे घेऊन आले. आकाशवाणी झाली की या ठिकाणी सहगमन करायला हरकत नाही. मग तिथे थांबले. आता ते सगळं और्ध्वदेहिक विधि कोण सांगणार? परशुरामजी आलेले आहेत, तयार आहेत. पण काय काय करायचं, त्याचं सगळंही कृतकृत्य करायचं आहे, आणखी त्या जमदग्नींच्या शरीराबरोबर रेणुकामाता सती जाणार आहे, हे सांगणारं कोण आहे? जगदंबेनं सांगितलं, रेणुकादेवीनं, की, इथं भगवान दत्तात्रेय आहेत. त्यांना जाऊन प्रार्थना कर बाबा, आता परशुरामजींना सांगितलं. गेले परशुरामजी. आणि पाहताहेत ते काय विलक्षण आहे. एक स्त्री आहे मांडीवर बसलेली, बोलताहेत, मद्यपान करण्याचं कार्य चाललेलं आहे आणि सांगताहेत, माझ्याजवळ येऊ नकोस म्हणाले. मी भ्रष्ट आहे. कांही माझ्याजवळ येण्याचं कारण नाही. निराश झाले. परंतु भगवती रेणुकामातेनंच त्यांची स्तुती केली, की भगवंता, आपण भ्रष्ट म्हणजे काय म्हणाली. कांही अति वर्णाश्रमी आपण आहात, चार वर्ण चार आश्रम जरी जीवात्मांच्या करता, ईश्वरानी आपण निर्माण करून दिलेले आहेत, पण त्याच्याही पलिकडे आपण आहात. कांही नाही. कोणचाही वर्ण, कोणचाही आश्रम कांहीही ओळखू येत नाहीये, अशी आपली स्थिती आहे. कुठली भ्रष्टता आणि कुठली शुद्धता म्हणाले. द्वंद्वातीत अवस्था आपली आहे. द्वंद्वामधे चांगलं किंवा वाईट हे द्वंद्व आहे. चांगलंही म्हणायचं नाही आणि वाईटही म्हणायचं नाही. आपण साक्षात परब्रह्म आहात, सच्चिदानंद– घन आहात आपण. या मुलाची इच्छा पुर्ण करावी.

मग भगवान दत्तात्रेयांनीही रेणुकामातेची स्तुती केली. आदिशक्ती तू आहेस. तुझ्या योगाने सर्व जगत् चाललेलं आहे, प्रकृती अधिष्ठात्री देवता तू आहेस. मग सगळं कार्य, स्मशानविधी, सगळा त्यांनी सांगितलेलं आहे. आणि, रेणुकामाता, जगदग्नी महर्षिंच्या बरोबर तिनं सहगमन तिथे केलेलं आहे. असं ते माहूर स्थान, त्या माहुरक्षेत्रामधे गोपीनाथ नांवाचा एक ब्राह्मण राहात होता. अतिशय श्रीमंत आहे, पुष्कळ द्रव्य आहे, कांही कमी नाही. त्याला मुलं झाली आणि गेली. कांही नाही. शिल्लक राहिल नाहीये. मग भगवान दत्तात्रेयांची सेवा तो करू लागला. आणि दत्त सेवेनं त्याला एक मुलगा झाला. राहिला. आणखी दत्तात्रेयांच्या सेवचं फल मिळालं म्हणून त्या मुलाचं नांवही त्यानी दत्त असंच ठेवलेलं आहे.

दत्तप्रसादाच्चिरजीवितं सुतं **नाम्नाकरोद्दत्तमिति द्विजातिजः ।**
कान्तः सुलक्ष्मा मतिमान्सुसात्त्विकः पित्रोर्मृताभ्यविनाश्यवर्धत ॥ **(द्विसाहस्त्री १६.५)**

अत्यंत सुंदर मुलगा आहे. सुंदर लक्षणांनी युक्त आहे. बुद्धिमान आहे आणि सात्त्विक बुद्धि आहे, त्यातल्या त्यात. माता-पित्यांची जी मुलं गेली होती त्याचं दुःख त्यांनी आणखी दूर केलेलं आहे. त्या मुलाने. जन्माला आल्यापासून. अत्यंत सुलक्षणसंपन्न, बुद्धिमान शुद्धबुद्धि आहे. देवाधर्माकडं बुद्धि आहे. पुनः त्याचं उपनयन झालेलं आहे. बारा-चौदा वर्षाच्या वेळेला त्याचा विवाहही करून टाकला त्या ब्राह्मणाने. उत्तम आणखी सून मिळाली त्याला. श्रीमंत कुळातली आहे. नुसत्या द्रव्याने श्रीमंत नाहीये. लक्ष्मी म्हणजे साक्षात् लक्ष्मी आहे. पतिसेवा करण्याकडे आणखी लक्ष पूर्ण आहे. या घरामधे आपण पतिसेवा करण्याकरता आलेलो आहोत. ही सेवा कशी करावी हे शिकण्याकरिता आणि आपलं, आपल्या कुळाचं, नुसत्या नाही, माहेरचं कुळ एवढंच नाही, माहेर आहे, सासर आहे, दोन्हीही कुळांचा उद्धार करण्याची जबाबदारी आपल्यावरती आहे आणि ती आपल्या कर्तृत्वाने आपण करू शकतो, पाळू शकतो. अशा निश्चयाने ती साध्वी स्त्री आलेली आहे. **सावित्री तिचं नांव,** दोघेही सुंदर आहेत. मुलगा, सून. संपत्ती दोन्ही बाजूला आहे. त्या स्त्रीचं माहेरही श्रीमंत आहे. सासरही श्रीमंत आहे. कांहीही चिंता नाहीये. अशा रीतीनं त्यांचा संसार सुरू झालेला आहे.

दोन-तीन वर्ष झालेली आहेत. आणि इतक्यात , काय पूर्वीचं कर्म, त्या कर्मामुळे, तो जो मुलगा आहे, तो आजारी पडलेला आहे. उपचार सुरू झाले, औषधोपचार हे प्रथम केले जातात. देह हा पांचभौतिक देह आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश या पंचभूतांपैकी काय कमी जास्ती काय झालेलं आहे, या देहामधे तशाच प्रकारची पांचभौतिक औषधं निर्माण करून आणखी त्या त्या रोगांचा परिहार करावा म्हणून शारिरशास्त्र आहे. या शारिरशास्त्राला अनुसरून उत्तम उत्तम वैद्य आणखी औषधं देताहेत. पण नाही, परिहार नाही. क्षयरोग झालेला आहे त्याला. काय करायचं आता? हळुहळू दिवसेंदिवस आणखी शरीर कृश होत चाललेलं आहे. त्याची स्त्री जी आहे, त्या मुलाची, म्हणजे ही सून-सावित्री नांवाची धैर्यानी आणखी वागती आहे.

त्याला कांही अन्न जात नाही, अन्न खात नाही पती, म्हणजे आपणही अन्न वर्ज्य केलं. मनोनिग्रह मोठा पाहिजे ! प्रपंचातही मनोनिग्रह लागतो ना? दुकान घातलेलं आहे, कांही विक्री व्हायला पाहिजे. आले गिऱ्हाईक , त्याला सगळं कापड चोपड सगळं काढून दाखवावं लागतं. कंटाळून उपयोग नाही. त्याच्या बरोबर अगदी शांतपणाने, आनंदाने, त्याचं मन प्रसन्न होईल असं वागावं लागतं. मालक आहे हा. पण मालकाला सुद्धा कोणीही खेड्यापाड्यातला जरी आला तरी त्याच्याबरोबर प्रेमाने, त्याच्या मनाला युक्त होईल, अशा रीतीनं वागावं लागतं की नाही. **प्रपंच चांगला होण्याकरताही मनोनिग्रहाची जरूरी आहे. परमार्थामधे तर त्याची खरी आवश्यकता आहे.**

ही साध्वी स्त्री, **सावित्री,** मनाचा निश्चय करूनच आलेली आहे. श्रीमंत घराण्यातली मुलगी आणि इथंही श्रीमंती आहे. म्हणजे कमी कांही नाही. बाहेरचं कोणतंही आणखी कमी नाही, सुख कमी नाही. सगळं सुख आहे. परंतु, पती असा आणखी आता आर्त झालेला आहे, रोगी झालेला आहे. आणखी तो रोग कांही बरा होण्याचं चिन्ह दिसत नाही आहे. वैद्यांनी उत्तमोत्तम औषधं देऊन पाहिलं, पण औषधांचा कांहीही उपयोग होईना आणि शेवटी त्यांनी सांगितलेलं आहे, त्या गोपीनाथाला, की हा जो तुमचा मुलगा आहे, याचा रोग आता कांही बरा करणं आमच्या हातात नाही. आमच्या शक्तीच्या बाहेर आहे. औषधाची शक्ती आता संपलेली आहे. त्यांना सगळी, रोगाची चिन्हं वगैरे सगळी समजलेली आहेत. रोग आता वाढत चाललेला आहे आणि हा या आता मुलाला जिवंत ठेवणार नाही. म्हणून त्यांनी निराळ्या पर्यायानी सांगितलं, आमच्या औषधामधे आता शक्ती राहिली नाही म्हणाले. आमच्या बुद्धीमधे शक्ती नाही. काय द्यावं औषध हे समजत नाही. परमेश्वराने जर आणखी कृपा केली तरच हा वाचेल म्हणाले. नाहीतर वाचणं शक्य नाही. हा रोग याचा बळी घेणार.

ऐकलं, त्या स्त्रीने ऐकलेलं आहे. त्या मुलानेही ऐकलेलं आहे. त्याच्याही कानावर ही बातमी गेली. सेवा करते आहे सावित्री. अन्न नाही, पाणी नाही, कांही नाही. औषध देणं, हे करणं. अत्यंत आणखी आदरबुद्धीनं सेवा चाललेली आहे. साक्षात् भगवान आहेत, हे पती म्हणजे भगवान आहेत, अशी भावना आहे. आणि आज या स्थितीमध्ये भगवान आहेत. आमचे भगवान हे आहेत. मंदिरात भगवान आहेत. नाही असं नाही. पण घरामधे असलेले हे आमचे भगवान आहेत. मूर्त, बोलणारे, चालणारे हे आहेत, ही भावना आहे तिची. निराश झाला तो आणखी मुलगा आणि त्याने एके दिवशी आपल्या आई–बापांना सांगितलं की, तुम्ही आता कांहीतरी आत्महिताचा विचार करा. माझ्यामधे मन आता गुंतवून ठेवू नका म्हणाले. कारण माझं आता आयुष्य थोडं राहिलेलं आहे, सगळे जाणते लोक जे आहेत, औषध देणारे ते ही सांगताहेत, तेही निराश झालेले आहेत. तुम्ही आता आत्महित करून घ्या. काय मी रहाणार नाहीये आता म्हणाले, आणि आपल्या स्त्रीलाही त्याने सांगितलं, की तूही आता कांही दुःख करू नकोस म्हणाले. पूर्वकर्म माझं असं आहे की जास्ती काळ या देहाचा संबंध मला होऊ शकत नाहीये. आयुष्य संपत आलेलं आहे. तेव्हा तुला जर इच्छा असेल तर तू माहेरी निघून जा किंवा इथे राहिलीस तरी हरकत नाही, यांची सेवा करून राहा. **परमेश्वराचं नामस्मरण करीत जा, तीर्थयात्रा करा, सत्कर्म करा आणखी आपला उद्धार तुम्ही करून घ्या.** हे आपल्या पत्नीला त्यांनी सांगितलेलं आहे. कारण त्याला कळून चुकलं सगळं, की आपलं कांही आता आयुष्य नाहीये, संपलेलं आहे. पण त्या सावित्रीने त्याला उत्तर दिलं, महाराज, मी कुठे जाणार कुठे म्हणाले. आपल्या बरोबरच मला यायचंय.

सहधर्मचारिणी म्हणजे इथं असेपर्यंतच धर्म करायचा असं नाहीये. पतीच्या उपदेशाने आणखी धर्माचरण करणारी ईश्वर-प्रीत्यर्थ सेवा करणारी स्त्री, पती मृत झालेला असतानाही त्याच्याबरोबर जाऊ शकते. हा एक मोठा आणखी, सिद्धांत आहे, पतिव्रताधर्मामधे हे फार महत्त्वाचं हे आहे. भारतामधेच फक्त पाहायला मिळतं. आता आपलं स्वातंत्र्य मिळाल्यानंतर घटस्फोटाचे कायदे केलेत, केलेले आहेत म्हणतात. काय त्याचा उपयोग आहे, स्त्रियांना आणखी स्वातंत्र्य द्यायला पाहिजे, आणखी कोणाकोणाला स्वातंत्र्य द्यायला पाहिजे, की मग ते सगळे संप करून घ्यायचे, डोक्यावर घ्यायचे. हा स्वातंत्र्य याचा अर्थ आहे काय? धर्माचरण करणं म्हणजे स्वातंत्र्य नसतं अशी कल्पना करून देऊन कायदे केले जातात. पण धर्माचरणामधे किती स्वातंत्र्य आहे. ह्या साध्वी स्त्रीचं, सावित्रीचं चरित्र सांगताहेत सिद्धमुनी. तिने सांगितले आपल्या पतीला, की महाराज, मी तुमच्याबरोबर इथं रहाणार आहे. मी कुठंही जाणार नाही. कांही काळजी करण्याचं कारण नाही. परमेश्वर आहे. त्याची आपण सेवा करू आणि हेही संकट दूर होईल.

सोळा वर्षाची मुलगी आहे. कुठंही आणखी विद्यापीठात जाऊन शिक्षण वगैरे कांहीही घेतलेलं नाहीये. संकटाचा ...भयंकर संकट आलेलं आहे की, पती आता रहाणार किंवा जाणार अशा प्रकारची स्थिती आलेली आहे. पण धैर्य आहे मोठं, धर्मधैर्य आहे. तिनं आपल्या सासु-सासऱ्यांना सांगितलं, की एखाद्या सत्पुरूषांची जर कृपा झाली तर आपल्या पतीला, आणखी हे संकट जाईल, रोग बरा होईल. आयुष्य वृद्धी होईल, तेव्हा कुठेतरी आम्हाला पाठवा म्हणाली. मी जायला तयार आहे. त्यावेळेला गाणगापुरामधे महाराज येऊन राहिलेले आहेत. आणखी अनेक लोकोत्तर लीला चालू आहेत. साक्षात परमेश्वर आहेत. हजारो शिष्यमंडळी येतात. त्यांची कार्यसिद्धी होती आहे, अशी सर्व ठिकाणी वार्ता पसरलेली होती. तिच्याही कानावर आलं होतं. गाणगापुरामधे महाराज आहेत म्हणाली, तिथं आम्हाला दोघांना तुम्ही पाठवून द्या. मी घेऊन जाते. धैर्यानी आपण रहा. आणि त्या महात्म्याची कृपा झाल्यानंतर या संकटातून आपण मुक्त होऊ निश्चित. कांही काळजी करण्याचं कारण नाही. हे तिनं बाहेरून दाखवलेलं आहे., सांगितलेलं आहे आपल्या माता पितरांना, पतीच्या समक्ष सांगितलेलं आहे, पतीलाही जराशी आशा निर्माण झाली.

सर्व निराश झालेले आहेत, वैद्य, औषध देणारे, आणि तिलाही परिस्थिती दिसतीच आहे. तीन वर्षपर्यंत क्षयरोग आणखी त्याच्या शरीरामधे आहे. शरीर अत्यंत कृश झालेलं आहे. परंतु मनामधे एक मोठा विश्वास आहे. निराशा नाहीये. महात्म्यांची शक्ती फार मोठी आहे. भगवान, परमेश्वराने जरी बाजूला टाकलं म्हणा, तरी सुद्धा हे सद्गुरू जे आहेत, संतमहात्मे, ते आणि त्या जीवाचं कल्याण करू शकतात, असा मोठा विश्वास तिच्या मनामधे उत्पन्न झालेला आहे.

नरसिंह सरस्वती महाराजांचं अद्यापी दर्शन सुद्धा नाहीये. कीर्ति ऐकलेली आहे आणि नैसर्गिक बुद्धीही तशी, सात्त्विक बुद्धी आहे, दोघाही पती-पत्नींची. त्या सात्त्विक बुद्धीला अनुसरून आणखी आपण गेलो म्हणजे आपलं कार्य होईल, पण तिथंपर्यंत जायला पाहिजे. कसं जायचं, काय जायचं, काय अगदी, सूक्ष्म प्रकृती झालेली आहे. माहुर कुणीकडं आणि गाणगापुर कुणीकडं, किती लांब आहे, अशा रोगी माणसाला घेऊन जायचं. मधेच कांही झालं तर काय करायचं, वगैरे काहीही विचार तिच्या मनामधे आलेला नाहीये. आणखी महाराजांच्यावर विश्वास ठेवून तिनं आपल्या सासु-सासऱ्यांना विनंती केली. त्यांनीही ती मान्य केली. दहा-वीस माणसं बरोबर दिली. एक मेणा चांगला केला मोठा, गादी-बिदी त्याच्यामधे घातलेली आहे. त्या रोग्याला त्या मेण्यामधे निजवलेलं आहे. आणि हळू हळू प्रवास करीत सगळी मंडळी निघालेली आहेत. सासु-सासऱ्यांनीही तिला सांगितलं बाई, तुझ्या पातिव्रत्य धर्मानी आमच्या मुलाला जीवन मिळेल, असं आम्हालाही वाटतं आहे. तू मोठी पतिव्रता आहेस.

प्रवास करीत करीत, कारण एकदमही वेगाने प्रवास करता येत नाही. हळुहळू प्रवास करीत, थांबत आणि गाणगापुरामधे येऊन पोचली ती सगळी मंडळी. थांबलेली आहेत. वेशीमधे, गांवाबाहेर, आणखी विचारलं, महाराज कुठे आहेत? मंडळींना विचारलं. ते म्हणाले, महाराज आहेत, संगमावर आहेत म्हणाले. गांवात नाहीयेत. केव्हा येतील त्याचा कांही नेम नाही. मग तिला वाटलं की आपण संगमावरच जाऊया. मंडळी पुष्कळ, नोकर-चाकर बरोबर आहेत, चला, म्हणाले. पाहू या म्हणून. तो मेण्याचा पडदा दूर करावा आणि आपल्या पतीलाही सांगावं आलेल आहे गाणगापूर, आपण दर्शनाला जाऊ. तो पडदा दूर केल्याबरोबर, त्या पतीचं सगळं आयुष्य संपलेलं आहे. गतःप्राण झालेला आहे. अरे, अरे, अरे, झालं, केवढा धक्का बसला तिला, निराश झालेली आहे, रडती आहे ती. कुणाचा आधार आता आहे. इकडे कोणी सासरची माणसं नाहीत, माहेरची माणसं नाहीत. देवाच्या आणखी आशेवर आपण आलो. देवानीही आपल्याकडे लक्ष दिलं नाही. काय झालं म्हणाली. **व्याघ्रभये पळे धनु ।** वाघ येतो आहे, खाईल म्हणून ती गाय पळायला लागली, तर तिथे खाटकानं तिला गाठलं आणि तिला मारलेलं आहे, तसंच झालं नाही कां म्हणाली. काय करायचं? मंदिरामधे जावं, विश्रांती घ्यावी, देवाचं नाम घ्यावं म्हणून मंदिरात गेल्यानंतर ते मंदिरच एकदम कोसळून अंगावर पडावं, तसं झालं म्हणाले. दुःख आहे, असह्य दुःख आहे, आणखी अत्यंत प्रिय अशा प्रकारच्या पतीचे प्राण गेलेले आहेत. यामुळे कांही चैन नाहीये. पुष्कळ आणखी देवालाही दूषण देते आहे. दुःखाच्या वेळेला मनुष्याचं मनही हे कांही स्थिर रहात नाही. काय बोललं जाईल, वाणीनं, मनानी, हे कांही त्यावेळेला विचारच नाही ना. मारीच राक्षस एकदम ओरडला लक्ष्मणा, सीते म्हणून रामाच्या आवाजात ओरडला. आणि सीतेला वाटलं रामावरतीच प्रसंग आलेला आहे.

लक्ष्मणाला म्हणाली, अहो जावा तुम्ही. कांहीतरी रामानेच हांक मारली. लक्ष्मण म्हणाला, 'हा कांही रामाचा आवाज नाही. रामावर संकट येणं हे शक्य आहे कां? तुम्हाला रामाच्या शक्तिची कल्पना नाही कां ? तुम्ही तर त्यांच्या अर्धांगी आहात. तुम्हाला असली पाहिजे कल्पना. नाहीये' आपला प्रिय पती आहे, आणि त्याच्यावरच हा प्रसंग आलेला आहे. मनानीच आता हे झालं, दुःख झालं. लक्ष्मणाला ती बोलली म्हणे. वाटेल तसं बोलली, लक्ष्मणजी निघून गेले. मोकळं आहे, कोणी नाही, रामही नाही, लक्ष्मणही नाही, रावण होता गुप्तपणाने आला आणि घेऊन गेला. तर दुःखाच्या वेळेला माणसाचा तोल सुटतो आहे. मनही ताब्यात नाही, वाणीही ताब्यात नाही.

तसं देवालाही पुष्कळ ती बोलू लागली. काय तुमच्या या दरबारामध्ये काय न्याय काय आहे म्हणाली. किती लांबून मी घेऊन आलेली आहे आणि माझ्या पतीला आरोग्य प्राप्त होईल, आयुष्य वाढेल अशी मोठी आशा धारण करून मी आले, तुमच्या दरबारात, आणि तुम्ही कांही नाही, लक्ष बिलकूल दिलं नाही. ईश्वरावर विश्वासही आहे म्हणायचं. आणखी रागही आहे. तुम्ही सगळं करणारे आहात असंही म्हणते आहे. आणि असं कां केलं? शेवटी आपला प्राण द्यावा म्हणून सुरी बिरी घेऊन आणखी भोसकून घ्यावी. आपलाही प्राण द्यावा, मग बायका बियका होत्या तिथं. त्यांनी हात धरला, बाई, असं करू नको. समजावून सांगितलेलं आहे. सांत्वन करताहेत पुष्कळ ! आणखी इतक्यात मध्यान्हकाल झालेला आहे. एक तपस्वी महात्मा, भस्म वगैरे लावलेलं आहे, रूद्राक्ष माळा गळ्यामधे घातलेल्या आहेत. ते तिथे येऊन पोचले आणि त्यांनी तिला उपदेश केलेला आहे.

सावित्रीला उपदेश करण्याकरिता, महाराज स्वतःच आलेले आहेत. त्या वेषामध्ये, वेषांतर करून आलेले आहेत. त्यांनी सांगितलं, काय झालं बाई ? पती गेलेला आहे. पती काय अमर आहे कां बाई? जायचंच आहे, आयुष्य असेपर्यंत आणखी उपचार करायचे, उपाय जे आहेत, या मृत्यूलोकामधे, उपाय आहेत, **रोग बरे करण्याची सगळी साधनं, औषध-बिषौध आहेत म्हणाले. पण आयुष्य असेल तर त्याचा उपयोग होतो. आयुष्य वाढवण्याचा उपाय नाही म्हणाले. आहे, हे ही उपाय आहेत. पण तो सुद्धा अपमृत्यू , गंडांतर वगैरे कांही जर असेल तर ते चुकिवता येतं म्हणाले, महामृत्यू म्हणजे ठरलेलं जे आयुष्य आहे ते कांही वाढू शकत नाहीये.** या मुलाच्या बापाने, गोपीनाथाने सुद्धा पुष्कळ उपाय केले. होम हवन केलं, मृत्यंजय जप वगैरे केलेले आहेत. ग्रहजप केले, ग्रहमंत्रांचे. सगळे दानधर्म पुष्कळ केलेला आहे, संपत्ती आहे आणखी. आपल्या मुलाचं एकंदर आयुष्य वाढावं म्हणून प्रयत्न केला पण कशाचाही उपयोग झाला नाही. अनेक पुण्यकर्म आणखी करणं, किंवा एकच पुण्यकर्म

अधिकाधिक रीतीने करणं असे प्रकार सगळे शास्त्रकारांनी सांगितल्याप्रमाणे सगळे केलेले आहेत. पण त्याचाही उपयोग झाला नाही.

तेंव्हा ते तपस्वी पुरूष त्या स्त्रीला सांगताहेत, सावित्रीला, हे सगळं, सृष्टीचा हा एक नियमच आहे, म्हणाले. **औषधाचा आणि, उपयोग फक्त आणखी मृत्यूची वेळ आलेली नाही तोपर्यंत औषधाचा उपयोग आहे.** ती वेळ आल्यानंतर कांही उपयोग नाही. पंचभूतापासून तयार झालेलं शरीर पुन्हा पंचभूतात जाणार आहे म्हणाले. शरीरात राहाणारा जीवात्मा मात्र अजरामर आहे. त्यांनी आपले जीवन असेपर्यंत, जन्म आपल्याला आयुष्य लाभलेलं आहे तोपर्यंत लक्षपूर्वक **जर आणखी ईश्वराची भक्ति केली, सत्कर्माचरण केलं तर तो या देहातून जरी दुसऱ्या देहात गेला तरी सुद्धा त्याचं तेच कर्म चालू राहतं.** त्या संस्कृत बुद्धीच्या, मनाच्या सहाय्याने त्याची ईश्वरभक्ती पुढे उत्तरोत्तर वाढत जाती आणि तो या कर्मबंधनातून मुक्त होण्याला योग्य होतो. ईश्वरकृपा त्याच्यावरती होती. जीवात्मा ज्याला म्हणतात, पण त्या जीवात्म्याचा आणि या शरीराचा संबंध मात्र कायमचा नाहीये. हेच शरीर राहिलं पाहिजे, असा मात्र आग्रह कुणाचाही चालत नाही. यमधर्माला नेमलेलं आहे, मृत्युलोकामधे जे कांही जीव पाप करणारे असतील त्यांना आणखी आणायचं, त्यांना शासन करायचं, अनेक प्रकारचे नरक आहेत. पण यमधर्म जरी झाले तरी ते सुद्धा काही अमर नाहीत म्हणाले. तो नचिकेता तिथे गेला आणि त्याला त्यांनी सांगितलं, बाबा आत्मज्ञान मला पाहिजे म्हणाला तो, यमधर्माला सांगितलं की मला आत्मज्ञान सांगा. कशाला म्हणाले या भानगडीत पडतोस तू? त्याची परीक्षा पाहिली त्यांनी. तुला पुष्कळ संपत्ती देतो. उत्तम स्त्रिया वगैरे देतो, सगळी सत्ता देतो म्हणाले, आणि मी असेपर्यंत तुला, मृत्यू येणार नाही अशी व्यवस्था करतो. हेही त्यांनी सांगितलं. मी असेल या अधिकारावर असेपर्यंत तुला मृत्यू येणार नाही. म्हणजे यमधर्मांना सुद्धा शेवट आहे. सगळ्या मृत्यूलोकातल्या जीवात्म्यांना आणून हे करणारे त्यांना सुद्धा आपण असेपर्यंत आपल्या शक्तीने मृत्यू येवू न देणारे, पण मी असेपर्यंत तुला जिवंत ठेवीन म्हणाले. कायमचं जिवंत ठेवीन असं म्हणाले नाहीत.

तर, याकरिता, आता झालेली गोष्ट कांही येत नाही. या पतीचा आणि तुझा संबंध कांही कालापुरताच होता, कर्माचा भाग आहे तो. कर्मामुळे आणि तो संबंध आता तुटलेला आहे, सुटलेला आहे, आता तुझं कल्याण कसं करून घ्यायचं याचा विचार तू कर म्हणाले. मानव जन्म प्राप्त झाल्यानंतर, इतकं आणखी त्याला कल्याण साध्य करून घेता येतं, तशी बुद्धी, मन तयार पाहिजे. क्रियमाण कर्म जर उत्तम त्यांनी ठेवली, सत्कर्मच करायची, दुसरी कर्म करायचीच नाहीत. **मागं होऊन गेलेली कशीही जरी पापं-पुण्यात्मक-कर्म असली, तरी जन्माला आल्यानंतर**

या ठिकाणी जर चांगली कर्मं त्याच्या हातून झाली, तर सर्वही बाकीची कर्म अगदी नाहीशी होतात, पाप नष्ट होत. आणि ईश्वरकृपेनं त्याचं पूर्ण कल्याण होतं.

तेव्हा महाराजांनी सांगितलं सावित्रीला, 'बाई, तू आता स्वतःचं कल्याण कांही करून घे. स्वतःचं कल्याण म्हणजे काय हेही सांगितलंय ! पती गेला त्याचं और्ध्वदेहिक करणं हा एक मार्ग आहे. मुलबाळ कांही नाही. पतीचं आणखी शरीर अग्नीमधे आणखी विसर्जन करून टाकायचं, स्त्रियांचे सगळे धर्म, त्या वेळेला, महाराजांनी त्या सावित्रीला सांगितलेले आहेत. पती असताना कोणतं कर्तव्य आहे, पती गेल्यानंतर काय काय कर्तव्य आहे, ते सगळं समजावून सांगितलेलं आहे, आणि तो प्रसंग म्हणजे, विंध्याचल नांवाचा जो पर्वत आहे भारतामधे. नारद महर्षि एकदा विंध्य पर्वतावर गेले होते. त्यांनी सगळं पाहिलं. उत्तम आहे बुवा, तुझं हे मोठं आणखी स्वरूप आहे, मोठा आहेस तू फार. सगळी आणखी समृद्धी आहे म्हणाले. पण मेरू पर्वताइतका तू काही उंच नाहीस, असं नारद बोलून गेले. झालं, कांहीतरी कमीपणा त्यांनी दाखवला की नारदांनी. तो त्या विंध्य पर्वताला कांही सहन झाला नाही. तो विंध्य पर्वत एकदम उभा रहायला लागला. इतका उंच झाला की सूर्यमंडळाचे किरणसुद्धा या ठिकाणी बंद झालेले आहेत. त्या बाजूला सूर्य राहिला, इकडच्या बाजूला अंधार झाला, मधे तो सबंध विंध्य पर्वत आणखी उभा राहिलेला आहे. सगळे देव गेले, ब्रह्मदेवांना सांगितलं, असं असं झालंय म्हणाले, हा विंध्य पर्वत असं करतो आहे. पर्वत सुद्धा आणखी जीवात्मे आहेत. पर्वत हे त्यांचं बाहेरचं शरीर आहे, स्वरुप आहे. वृक्षसुद्धा जीवात्मे आहेत. अशा अनेक योनी आहेत. मग ब्रह्मदेवांनी सगळ्या देवांना सांगितलं की काशी क्षेत्रामधे अगस्ती मुनी राहताहेत. त्यांची पत्नी लोपामुद्रा पतिव्रता आहे. त्या अगस्ती ऋषींना तुम्ही शरण जा. त्यांची प्रार्थना करा. त्यांना बरोबर घेऊन आणखी त्या विंध्य पर्वताकडे चला. तो विंध्याचल हा त्या अगस्ती ऋषींचा शिष्य आहे म्हणाले. गुरुमहाराज आल्याबरोबर तो नमस्कार करायला लागेल. नम्र होईल. त्याला हे अगस्ती ऋषी आज्ञा करतील, की तू आता वाढू नकोस. लहान रूप घेऊन रहा. मुकाट्याने तो राहील म्हणाले. तुमचं काम होईल. मग सर्व देव, देवगुरू बृहस्पती ही सगळी मंडळी काशीक्षेत्रामधे अगस्ती ऋषींच्या आश्रमामधे येऊन पोचलेली आहेत. त्यांनीही त्यांचा सत्कार केला आणि मग देवगुरूंनी त्यावेळेला लोपामुद्रेचंही वर्णन केलं. पतिव्रता स्त्री मोठी आहे म्हणाले. पतिव्रतेचं माहात्म्य फार मोठं आहे. पंचमहाभूतं काय, सूर्य-चंद्र, यांनासुद्धा आणखी भीती वाटते आहे पतिव्रता स्त्रीची.

तिची आज्ञा सर्व देवांनासुद्धा मान्य करावी लागती म्हणाले. त्या दत्तमाहात्म्यामधे विष्णुदत्तांची कथा सांगितली आहे. त्यांना आणखी दत्तात्रेयांचं दर्शन झाल्याबरोबर, काय

पाहिजे, ते म्हणाले त्या पिशाच्चाने सांगितले होते, काय पाहिजे म्हटल्याबरोबर माझ्या घरी श्राद्धाला तुम्ही या, ब्राम्हण म्हणून या, असं सांग त्यांना. त्यांनी सांगितलं. श्राद्ध आहे म्हणाले, उद्या. तुम्ही या. तुम्ही माझ्या घरी या. पण दत्तात्रेय म्हणाले, माझ्या बरोबरीने जे ब्राह्मण असतील ते माझ्यासारखे आणखी श्रेष्ठ पाहिजेत म्हणाले. तर येईन मी. उगीच, गांवातले कोणी ब्राह्मण-ब्रिह्मण चालणार नाहीत. मी येणार नाही. हो, कांही व्यवस्था करतो म्हणाले आणि आपल्या पत्नीला सांगितलं, की अशी अशी त्यांची अट आहे म्हणाले.

मध्यान्हकाळी दत्तात्रेय आलेले आहेत श्राद्धाला. ही पतिव्रता स्त्री, ब्राह्मण कुठायत ? म्हणाले. आता येताहेत म्हणून तिनं सांगितलं. बाहेर गेली, सूर्यनारायणांना नमस्कार केला की भगवान दत्तात्रेय आलेले आहेत, आपणही या महाराज. लवकर या. ब्राह्मणवेष घेवून तेही आले. आंत अग्निनारायणाची उपासना तर चालू होतीच. रोज. अग्निनारायणांनाही प्रार्थना केली. आपणही या महाराज. दत्तात्रेयांच्या बरोबर आलं पाहिजे. त्यांची इच्छा आहे. असे तीन ब्राह्मण जमले. श्राद्ध झाले म्हणतात. म्हणजे त्या पतिव्रता स्त्रीचं इतकं माहात्म्य आहे. तिच्या मनामधे, शब्दामधे इतकी शक्ती आहे की देवतांना आवाहन केल्याबरोबर त्यांनीसुद्धा लगेच यायला पाहिजे. असं सामर्थ्य पतिव्रता स्त्रियांच्या ठिकाणी असतं. देवगुरू बृहस्पतींनी पुष्कळ स्त्रीधर्म सांगितलेले आहेत. कसं वागावं, घरामधे कसं राहावं, बाहेर जावं किंवा नाही, किती तरी आहे. हे सगळे स्त्री धर्म वगैरे, ऐकणं, त्याप्रमाणे वागणं, अशा रीतीनं वागणाऱ्या या **पतिव्रता स्त्रिया आहेत, त्यांच्यावरती ईश्वराची, भगवंतांची पूर्ण कृपा असते.** दीपकाला प्रसन्न होऊन भगवान महाविष्णू आलेले होते. दीपकाने विचारलं मी काय तुमची सेवा करत नाही, तुमचं नांवसुद्धा घेत नाही, माझ्याकडे कसे आलात तुम्ही? ते म्हणाले माझं नांव घेतलं पाहिजे असं नाही. गुरूची सेवा करणारा जो सत्शिष्य आहे, तो आमचीच सेवा करतो आहे. गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णु: ही बुद्धी त्याची आहे, तो आमचीच सेवा आम्हाला पावलेली आहे. पतिव्रता स्त्री आणखी आपल्या पतीची सेवा, परमेश्वरबुद्धीनं करती आहे. तिला कांही भगवंताची निराळी सेवा करण्याचं कारण नाही. घरातच ही भगवंतांचीच सेवा करती आहे. ती आम्हाला पोचते आहे म्हणाले. म्हणून आमची कृपा आहे.

तर अशा रीतीनं कसं वागावं, वाणीचा निग्रह किती पाहिजे, पती बरोबर कसं बोलावं, इतर आप्तबांधव जे आहेत त्यांचं आणखी हे, कसं करावं, ते सगळेही प्रकार त्यांनी समजावून सांगितलेले आहेत. आता यानंतर त्या पातिव्रत्याचा प्रभाव कसा असतो किंवा त्या पतिव्रता स्त्रीला आणखी एक त्यांनी मोठा धर्म सांगितला. कदाचित पती जर मृत झालेला असेल तर तिला सहगमनही करता येतं म्हणाले. पतीबरोबरच, पतीच्या शरीराबरोबर अग्नीमधे आपलाही देह विसर्जन करू शकते ती. पण तितकं मात्र प्रेम पाहिजे की गेल्यानंतरसुद्धा पतीबरोबर

आपल्याला दुसरा देह मिळेल, पतीलाही चांगला देह मिळेल आणि जितके शरीरावरती आणखी रोम आहेत तितके कोटी वर्षे आपल्याला आणखी उत्तम स्वर्गादिक लोकामध्ये निवास करायला मिळेल. या शास्त्रप्रमाणावरती विश्वास पाहिजे आणि तसा मनाचा निग्रहही पाहिजे. पतीचं शरीर तर प्राण गेलेले आहेत. ते शरीर कांही अग्नीमधे ठेवल्यानंतर त्याच्यावर त्याच्यापासून त्याला कांही दु:ख नाही. पण त्याच्याबरोबर आपल्याला जायला मिळावं, परलोकामधे, ही इच्छा एक आहे. आणखी पतीबरोबर रहायला मिळावं, हे प्रेमही आहे. त्या प्रेमामुळे आपला सजीव देह, जिवंत देह अग्नीमध्ये अर्पण करणे हे किती कठीण काम आहे. थोडसं आणखी कांही प्रात:स्नान करायचं, माघस्नान करायचं, कार्तिक स्नान करायचं म्हणजे लवकर उठायला लागतं, स्नान करावं लागतं. तर त्यावेळेलासुद्धा किती मनाची आणखी तारांबळ उडून जाते. काय आहे बुवा, महिनाभर करायचं आहे, एक दिवस दोन दिवसात भागत नाहीये. करायचं झालं तर मग सगळं केलं पाहिजे. तीन दिवस केलं तरी चालतं, म्हणजे ही, कांही सोय नाहीये आपल्या बुद्धीने ठरवायची. तर असं सामान्य जे कष्ट आहेत शरीराला होणारे, झोपमोड होणं, थंडी लागणं, हे सुद्धा आम्ही सहन करू शकत नाही. करतात तशा प्रकारचे निग्रह करणाऱ्या स्त्रिया–पुरूष वगैरे अशी माघस्नानं, कार्तिक स्नानं करणारे आहेत. रोज आणखी काकडआरतीला येणारी मंडळीही आहेत. अगदी प्रातःकाळी येऊन आणखी चार वाजता येऊन बसतायत, म्हणतायत भूपाळ्या, काकडा आरती चाललंय सगळं. त्यांच्या मनामधे आणखी जास्ती विलक्षण प्रेम आहे, भगवंताची सेवा कांहीतरी घडली पाहिजे. तर सामान्य कष्टसुद्धा आपल्याला सहन होत नाहीयेत. इतकं शरीर आणखी अत्यंत कमकुवत झालेलं आहे. कलियुगामधे जे कांही ऱ्हास सारखा होत चाललेला आहे. **शरीरशक्ती कमी झाली. मनाची, बुद्धीची, शक्ती कमी झाली. कमी कमीच सगळं होत चाललेलं आहे. म्हणून व्यासांना दया येऊन, त्यांनी हे सगळं भगवंताच चरित्र, भागवत काय, हे काय, सगळं लिहून ठेवलेलं आहे. हे ऐका तरी निदान, श्रवण करा, त्यांची भक्ती करा, नामस्मरण करा. त्यांनी तरी आपला उद्धार करून घ्या, म्हणून त्यांनी हे करून ठेवलेलं आहे.**

तर देवगुरू, आणखी सगळ्या देवांना उपदेश करता आहेत, आणि महाराज त्या सावित्रीला, सोळा वर्षांची मुलगी आहे ती, तिला सांगता आहेत, सहगमन तू कर. सहगमनसुद्धा स्त्री करू शकते, असं म्हणाले. हा ही तिचा धर्म आहे, कर्तव्य आहे. जर कदाचित गर्भिणी असेल, लहान मूल असेल तर मात्र करू नये म्हणाले. तसंच सांगून, आणि तोही धर्म आहे, पती गेल्यानंतर जे कर्म सांगितलेलं आहे, त्याग, त्यागमय जीवन आहे. स्त्रियांच्या जीवनामधे जास्तीत जास्त त्यागाचा अभ्यास आहे. **सर्वांबरोबर आणखी प्रेमानी वागण्यामधे त्याग आहे. आपल्या मनाच्या विरूद्ध होत आहे, होऊ दे, जी गृहिणी आहे, जिच्या आणखी**

ताब्यामध्ये सगळे घर आहे, पती ताब्यात आहे, त्याचप्रमाणे सासू आहे, सासरा आहे, दीर आहे, सगळे अगदी प्रेम करतायत म्हणजे त्याकरिता तिला किती त्याग करावा लागला असेल. स्वतःच्या मनाप्रमाणे झालं पाहिजे असं कधीही म्हणायचं नाही, सर्वांच्या आणखी मनाला संतोष होईल असे वागून, मार्गदर्शन शांतपणाने करून, काम करवून घ्यायचं, म्हणजे किती त्याग आहे, किती निग्रह आहे मनाचा. सहनशीलता किती असावी लागते स्त्रियांच्याजवळ ! श्वशुरांची तू सम्राज्ञी हो, सासुची सम्राज्ञी हो, दिराची सम्राज्ञी हो, असे आणखी मंत्रामध्ये, आशीर्वाद दिलेले आहेत. म्हणजे सर्वांच्या वरती सत्ता, तुझी राहू दे असा आशीर्वाद दिलेला आहे. अन् ती सत्ता आपल्या मनोनिग्रहाने स्त्री ही संपादन करू शकते.

शेवटी, आणखी सहगमंनही तिला करायला सांगितलेलं आहे. आग्रह नाहीये मात्र कोणचा. सहगमनाची चाल आता बंद केली इंग्रज सरकारचं राज्य आल्यानंतर. त्यालाही कांही कारणं घडलेली आहेत. उगीच कांही कायदे त्यांनी केलेले नाहीत. सहगमन कोणीही स्त्री करायची. लहान, लहान मुली असायच्या आणि पुष्कळ संपत्ती घरी असायची. हा मुलगा गेला की त्या मुलीला अगदी धरून, आणखी त्या चित्तेवर घालून टाकायचं अन् ती संपत्ती मिळवायची, असे प्रकार सुरू झाले, धर्माच्या नांवाखाली ! प्रेमाने जी ही स्त्री हे करणार आहे तिला कोणीही रोखू शकत नाही. कायदा कांही करू शकत नाही. अजूनसुद्धा कांही कांही गोष्टी छापून येतात. अमक्या गांवामधे सहगमन केलं अमुक स्त्रीनं, कायद्याचा काय उपयोग आहे ?

तर महाराजांनी त्या स्त्रीला सांगितलं, असं सहगमन सुद्धा ती करू शकते. आपला जिवंत देह अग्नीमधे अर्पण करणं, पतीकरता, पती बरोबर जायला मिळेल आपल्याला, ह्या उत्साहाने आणि आपल्या इच्छेनं आपला देह अर्पण करणारी स्त्री, पतीला बरोबर घेऊन जाते आहे. पतीचीही आणखी बुद्धी शुद्ध करती आहे. पाप करणारा पती जरी असला तरी त्यालाही पापातून मुक्त करून, ती त्याला घेऊन जाती आहे. स्वर्गलोकामधे तिला निवास करायला मिळेल. हे ही सांगितलं. आणि जर मुलगा लहान असेल, गर्भिणी असेल तर मात्र कसं जगावं आणि ते आपले वैधव्यपालन जे आहे, तेही त्यागमयच आहे सगळं. सुखाची इच्छा आता बंद झालेली आहे. भगवंताचं स्मरण करायचं आहे. आणखी आपण आता आयुष्य असेपर्यंत सत्कर्म करून आणखी पतीलोकांमधे जायचे आहे आपल्याला. हे दोन्हीही प्रकारचे धर्म त्यांनी सांगितले. आणि तिला सांगितलं, तुला जर राहयचं असेल, तर रहा म्हणाले. पतीला स्मशानामधे सगळी मंडळी घेऊन जातील. त्यांचं और्ध्वदेहिक सगळं होऊन जाईल, तू आपल्या माहेरी रहा, सासरी रहा, कुठेही रहा. **भगवंतांचं नामस्मरण करीत रहा. तीर्थयात्रा वगैरे करणं, दानधर्म करणं, पुष्कळ तुला आणखी आत्मोद्धाराकरिता, संपत्ती**

आहे. त्याचा उपयोग स्वतःच्या उद्धाराकरिता तुला करता येईल. धैर्य जर असेल, तर पतीबरोबर सहगमनही करून आत्ताच्या आत्ता तुला पतीबरोबर जाता येईल, असं त्या तपस्वी पुरूषांनी, म्हणजे महाराजांनी तिला सगळं समजाऊन सांगितलं.

शोक कमी झालेला आहे तिचा. विचार सांगणारा महात्मा भेटल्यानंतर शोक कमी होतो. कारण आता शोक करून काय करायचं? पती कांही जिवंत होणं शक्य नाही, अशीच तिची भावना झालेली आहे. महाराजांची परीक्षा चाललेली आहे. काय करते आहे ही पोरगी. तिच्या पतीला जिवंत करायचंय, महाराजांचा संकल्प आहे. इतक्या लांबून ही बिचारी, सोळा वर्षांची ही मुलगी, इतक्या विश्वासाने, श्रद्धेने माझ्याकडे आलेली आहे आणि तिला दुःखी ठेवायचं नाही. दुःख झालेलं आहे. पण धैर्य किती आहे हे पहायच आहे. दुःखाच्या वेळेला सुद्धा धैर्य धारण करून ही धर्माचरण करणारी आहे काय, याची परीक्षा चाललेली आहे. ती म्हणाली, महाराज दोन्ही धर्म मला सांगितले आपण. जिवंत राहिलं तरी हरकत नाही, सत्कर्म कराव, दानादिक करावं हे सगळं खराय, आणि सहगमनही करावं असं दोन्ही करावं असं आहे. मी म्हणाले तरूण वयामधे आहे. काय माझ्या मनाचा, नियम काय म्हणाली. जिवंत मी जर राहिले, तर काय मन हे कुठं जाईल, केव्हा जाईल, विषयाकडे, संबंध नको आहे, त्यापेक्षा पतीबरोबर सहगमन करण्याचा निश्चय मी केला आहे. मी आता आपल्या पतीबरोबर जाते म्हणाली. आपला आशीर्वाद असावा म्हणाली. बरायं म्हणाले, कांही हरकत नाही, तिला रूद्राक्ष दिले, पतीच्या गळ्यामध्ये, आपल्या कानामध्ये बांध म्हणाले, भस्म लाव म्हणाले. तीर्थ, गुरूमहाराजांच्या चरणांचं तीर्थ आणून त्याच्यावर शिंपड वगैरे, तिला कांही सांगितलं आणि महाराज निघून गेले.

बारा-एक वाजून गेलेला होता आणि तिचा निश्चय झाला. शोक सर्व सुटलेला आहे. शोक नाही, कांही नाही. पतीबरोबर पतीला भेटायला जायचंच आहे आता. शरीर टाकल म्हणजे आपण पतीच्या बरोबर जाणार. दुसरं शरीर घेऊन जाणार. त्यामुळे शोक नाही. कांही नाही. तयारी चाललेली आहे. सगळी सामुग्री तयार केलेली आहे. सुवासिनी स्त्रियांना बोलावून ती वाणं देते आहे. पतिव्रता स्त्री, सुवासिनी, तिचं वाण मिळणं कठिण आहे फार **! बुध्याच वाण धरिले करी हे सतीचे !** हे वाण म्हणून जे सांगितलेलं आहे, प्रसिद्ध आहे ती कविता. ते सतीचं वाण आहे सतीची इतकी तयारी केली पाहिजे, त्याशिवाय वाण घेता येत नाही. त्याचप्रमाणे आणखी वायनदान करते आहे, ब्राम्हणांना, सगळयांना. चार-पांच वाजायची वेळ आलेली आहे. एकदा तिच्या मनामध्ये इच्छा उत्पन्न झाली. आता देह तर अर्पण करायचाच आहे, आपलं कर्तव्य कर्म जे आहे, त्या कर्माचं आचरण करून आपला उद्धार करून घ्यावा, अशी देवाची इच्छा आहे. कांही हरकत नाही.

महाराजांच्यावर विश्वास ठेवून आपण आलो. त्यांनी आपल्या शक्तीनं आमचं प्रारब्ध हे दूर करावं, या संकटातून मुक्त करावं याकरिता, ते करतील अशा निश्चयाने इथं आले आहे. परंतु त्यांची इच्छा अशी दिसते आहे की तुझा तू उद्धार करून घेण्याला समर्थ आहेस की. तू इतकी श्रेष्ठ आहेस, तुझं कर्तव्यकर्म जर तू केलंस तर तू स्वतःच आपला उद्धार करून घेशील. नवीन देह तुझ्या पतीला मिळेल. तुलाही मिळेल. आणखी पूर्ण सुखी तुम्ही व्हाल. म्हणजे कर्मयोगानीच, आमचा उद्धार आम्ही करून घ्यावा जीवानी, अशी देवाची इच्छा आहे असं दिसतंय. **भक्तियोगापेक्षा कर्मयोग श्रेष्ठ आहे असं त्यांना म्हणायचंय काय. निदान माझ्या बाबतीत तरी तसं दिसतंय,** कांही हरकत नाही. हींही माझी तयारी आहे म्हणाली. सहगमन करण्याची माझी पूर्ण तयारी आहे. मनापासून मी माझा देह विसर्जन करणार आहे.

ब्राह्मण मंडळींना विचारलं, महाराज, इतक्या लांबून मी आलेली आहे, महाराज तर संगमावर आहेत. आत्ता मी या संकटात सापडलेली, एकदा माझी एवढी एक इच्छा आहे. की संगमावर जाऊन महाराजांचे एकदा शेवटचे दर्शन करून मला यायचंय. मी आणखी लगेच देह अर्पण करण्याला तयार आहे. प्रेत नेलेलं आहे, त्या स्मशानामधे नेलेलं आहे, सगळं अग्नी घेऊन ती स्वतःच गेली, आता दुसरं कोण करणार? आणि सगळी तयारी झालेली आहे. ब्राह्मण मंडळी म्हणाली, बाई लवकर ये, सूर्यास्ताच्या आंत या ठिकाणी आलं पाहिजे. निघालेली आहे पतिव्रता स्त्री. आणि भगवंताचं स्तुती, प्रार्थना करते आहे. काय देवा, इतक्या लांबून मी आले, त्याचप्रमाणे इतक्या लांबून हा देश झाला, परंतु किती काल मी या संसारात पडले असेन. अशी किती संसार दुःखं मी भोगली असतील. आपल्या चरणाजवळ आल्यानंतर सर्वही संसार दुःखातून मी मुक्त होईन, सगळी संकटं माझी जातील, आपल्या कृपेनं, अशी मोठी आशा धरून मी आलेली आहे. पण आपल्याला इच्छा नाहीये, शरण आलेल्याचाच त्याग आपण केला. आपल्या एकंदर शक्तीला किंवा महत्त्वाला हे योग्य दिसत नाही आहे. पहा. आपण माझ्यावरतीच सोपवलेलं आहे. तुझा तूच उद्धार करून घेऊ शकतेस. बरायं, मी चालले म्हणाली आता. मी आता माझ्या पतीलाहि घेऊन जाणार आहे, स्वर्गलोकामध्ये तर जाणारच आहे म्हणाले मी. परंतु तुमची कीर्ति मात्र तिथं मी सांगणार आहे, तुमची कीर्ति या जगामधे वाढलेली असेल, कार्य करू शकता तुम्ही. हे मलाही मान्य आहे. पण माझ्याबद्दल मात्र अशा प्रकारचं एकंदर परिस्थिती, मला मात्र अनुभव असा आलेला आहे, की, तुम्ही माझ्या एकंदर परिस्थितीकडे लक्ष दिलं नाहीत. तू आणि तुझं कर्म. बरायं, कांही हरकत नाही. मागच्या कोणत्यातरी पापकर्मानी हा मला प्रसंग आला. पतिवियोग झालेला आहे. पण तो वियोग झालेला असतानासुद्धा क्रियमाण कर्म इतकं माझ्या वाट्याचं आलेलं आहे. की, मला सहगमन करून पुन्हा पतीची प्राप्ती आणखी मी करून घेऊ शकते हे माझं आणखी शास्त्रोक्त कर्म

आहे. शास्त्रप्रमाणावरती विश्वास ठेवून वागा म्हणून तुमच सांगणं आहे. तसं वागेन मी. माझी तयारी आहे. अशी प्रार्थना करीत आलेली आहे. महाराज तिथे बसलेले होते.

येऊन नमस्कार केला. सौभाग्यवती भव ! महाराज म्हणाले. काय म्हणावं, पुन्हा नमस्कार केला. अष्टपुत्रा भव ! ती मंडळी म्हणाली, महाराज, ही माहुरहून आलेली स्त्री आहे. तिचा पती मृत झालेला आहे. स्मशानामधे प्रेत नेलेलं आहे. ही आपली आणखी अनुज्ञा घेण्याकरिता आलेली आहे. हा आशीर्वाद काय या जन्मातला, की पुढच्या जन्मात फळ मिळायचं तिला? थांबा म्हणाले, बाबा, भगवान शंकरही आमची वाणी सत्य करतील म्हणाले, घेऊन या, प्रेत घेऊन या, म्हणाले. आज्ञा केली. ती स्त्री तिथंच थांबलेली आहे. भगवंताबद्दल राग आला असला तरीसुद्धा तो राग कांही खरा नाही. सात्त्विक कोप आहे. देवाने आणखी आपली म्हणून माझा स्वीकार केला. मला इथंपर्यंत बोलावलं, इथं आले मी. इथं आल्यानंतर हे कसं झालं? असं वाटतय मनात, पण आत्ता मात्र त्यांनी आज्ञा केली, कुठयं ते प्रेत स्मशानातून घेऊन या. दहन करायचं नाही. मंडळी गेली आणायला. इतक्यात कांही मंडळी आली. महाराजांची पाद्यपूजा सुरू झालेली आहे. रूद्राभिषेक सुरू झाला. आणखी पायांवरती अभिषेक करताहेत.

इतक्यात ते आणखी प्रेत आणखी घेऊन आली मंडळी. सोडा म्हणाले, त्या दोऱ्या-बिऱ्या सोडा म्हणाले. मोकळं करा. सगळं अंगावरचं वस्त्र काढून टाका. हे तीर्थ शिंपडा त्याच्या अंगावर. तीर्थ शिंपडलेलं आहे. आणि नुसता दृष्टिक्षेप करण्याबरोबर तो उठून बसलेला आहे. दत्त त्याचं नांव होतं. अंगावर वस्त्र नाही, इकडं तिकडं पहायला लागला. त्याची स्त्री दिसली. तिला बोलावलं, वस्त्र तिने आणून दिलं. उठा हो म्हणाले आपण. काय हे ? सगळा वृत्तांत तिने सांगितलेला आहे. मग दोघांनीही महाराजांना नमस्कार केलेला आहे.

प्रददौ हि मृतप्रियस्त्रिया अपि सौभाग्यमु यन्नमस्क्रिया ।
स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान्मेऽस्ति परा वरा गतिः ॥ (नृ.स. प्रार्थनाष्टक ५)

त्या स्त्रीने नमस्कार नुसता केल्याबरोबर आणखी त्या स्त्रीला सौभाग्य मिळालेलं आहे. नमस्कारामधे इतकं सामर्थ्य आहे. **अन् तो नमस्कार म्हणजे माझं कांही सामर्थ्य नाहीये, तुम्ही समर्थ आहात, ही भावना म्हणजे नमस्कार आहे,** तेव्हा तो नमस्कार तिने केल्याबरोबर तिच्या पतीला आणखी जिवंत केलं महाराजांनी, सौभाग्य तिला मिळालेलं आहे. आनंद झाला, सगळी बरोबरीची मंडळी होती. पुष्कळ मग महाराजांची पूजा दोघांनीही केलेली आहे. आणखी पुष्कळ अन्नदान वगैरे केलं, ब्राह्मणभोजन वगैरे झालेलं आहे, आनंद झाला.

राहिली तिथं कांही दिवस. गांवाकडे बातमी कळवलेली असेल. कोणाला तरी पाठवलं असेल. तीही मंडळी नंतर आली. आई-बाप, दोघांचीही आले.

तर मृत्यू झालेला असतानासुद्धा त्याला जिवंत केलं महाराजांनी आणि त्याच्यामधे कांही नाही. काय केलं अन् काय नाही हे काय सांगणार काय? आहे एक शक्ती आहे, गुप्त शक्ती आहे, इच्छाशक्ती परमात्म्याची फार मोठी आहे. **जी इच्छा झाल्याबरोबर जग जिथं निर्माण होतं, प्रलय झालेला आहे, कांहीही नाही जागेवरती. पण लगेच, संकल्प झाल्याबरोबर बहुस्याम. आपण बहुरूप व्हावं, संकल्प झाल्याबरोबर आकाशादी, पंचमहाभूत झाली निर्माण झाली. एवढी आणखी पंचमहाभूतं त्याच्या नुसत्या संकल्पाने निर्माण होतात, सत्य संकल्प परमात्मा आहे ना !**

आणखी त्यामुळे तो गेलेला, मृत झालेला, तो जिवंत झाला यात आश्चर्य ते काय? दोघांनाही, त्या पतीव्रता स्त्रीला आणि तिच्या पतीला आनंद झालेला आहे. मग सगळे, महाराजही गांवामध्ये आले, मठामधे आले. सर्व मंडळी मठामधे आलेली आहेत. आणि दुसरे दिवशी ती स्त्री आपली आता अगदी जवळचीच झालेली आहे, तिच्याबद्दल किती प्रेम महाराजांचं, किती आत्मीयता, तिलाही ती आत्मीयता होतीच पहिल्यापासून, ती वाढलेली आहे.

त्या स्त्रीनं विचारलं– सावित्रीनं, महाराज, आम्ही ज्या दिवशी इथं आलो, यांचा जेव्हा मृत्यू झाला, त्यावेळेस एक तपस्वी पुरूष आले होते, त्यांनी मला उपदेश केला, म्हणाले स्त्री धर्म सर्व सांगितले आणि सहगमन करण्याची तुझी इच्छा किंवा धैर्य असेल तर कर म्हणून सांगून, ते गेले. त्यांनी मला रुद्राक्ष दिले, म्हणाले. कंठामधे बांधले, दोन्ही कानामध्ये रूद्राक्ष घातलेले आहेत आणि तीर्थ दिलं. हे तीर्थ प्रक्षेपण, त्यांच्या अंगावर करायला सांगितलं. ते कोण होते ते ? ते महात्मे कोण होते? हसले महाराज. आम्हीच आलो होतो म्हणाले. तुला अत्यंत दुःख झालेलं आहे, कुणाचंही ऐकेना, कांही, सुरी घेऊन कांही, आपला प्राण द्यायला काय तयार झालीस तू. म्हणून तुला शांत करावं, मार्गदर्शन करावं, कर्माचं तुझ्या कर्तव्यकर्माचं दर्शन केलं तरी तुझं दुःख शांत होईल, भक्तिप्रभावानेही दुःख शांत होईल, दोन्ही तुझ्याजवळ योग्यता होती म्हणून तुझं कर्तव्यकर्म तुला समजावून सांगितलं. तूही आणखी देहत्याग, देहाचं विसर्जन करायला तयार झालीस. ही कांही आत्महत्या नाहीये. मनानी, आणखी आपला देह पतीकरिता अर्पण करायचाय. शास्त्र म्हणजे ईश्वराची ही आज्ञा आहे. ईश्वराची आज्ञा म्हणजे सक्ती नाहीये. स्त्रियांनी आणखी देहविसर्जन केलंच पाहिजे असं शास्त्र नाहीये. पण जर केले, इतक धैर्य असेल तर त्याचं फल मात्र अनंत त्यांना मिळतं आहे. तेही सांगून दिलं. तर ते तुला दाखवायचं होतं म्हणाले. तो शोक तुझा दूर करायचा होता.

शोकामधे मनुष्य सापडला की संसारही गेला आणखी परमार्थही गेला म्हणाले. तो शोक दूर करण्याकरता तुला उपदेश करण्याला आम्ही स्वतःच आलो होतो म्हणाले, आणि हे रूद्राक्ष तुला मुद्दाम दिले. रूद्राक्षाचं माहात्म्य फार मोठं आहे म्हणाले. मग तेही त्यांनी सांगायला

सुरूवात केली. काश्मीर देशाचा राजा, मोठा शिवभक्त होता. प्रजापालनदक्ष होता आणि सगळ्या आनंदामधे त्याची प्रजा वगैरे होती. त्याला आणि त्याच्या प्रधानाला अशी दोघांना दोन मुलं झाली. जन्मापासून शिवभक्ती त्यांच्या मनामध्ये आहे. जशी जशी मोठी मोठी होत चालली ती मुलं, तसं गळ्यामधे रूद्राक्षाच्या माळा धारण करणं, भस्म लावणं, शंकरांची पूजा वगैरे करणं, सोमवार वगैरे व्रत करणं, म्हणजे इकडेच त्यांचं लक्ष आहे. राजपुत्र असूनसुद्धा आणखी या विषयाकडं, सांसारिक सुखाकडे कांहीही लक्ष नाहीये. आईनं म्हणा किंवा इतर मंडळींनी, त्यांच्या गळ्यामध्ये सोन्याचे दागिने घालावे, अंगावर सोन्याचे दागिने घालावेत. यांनी ते दागिने काढून कोणाला तरी देऊन टाकावेत, पुन्हा गळ्यामध्ये रूद्राक्षाच्या माळा घालून आणखी शंकरांचं नामस्मरण करीत बसावं. काय झालंय काय या मुलांना? सांसारिक जीवांना असं वाटणार की यांना कांही वेड लागलेलं आहे. कारण संसारामधे हे जे बाह्य सुख आहे, त्या बाह्य सुखांकरता सर्वांचे प्रयत्न चाललेले आहेत.

ही बाह्य सुखं मिळायला पाहिजेत. समृद्धी, ही बाहेरची समृद्धी आहे आणि इथे तर ही मुलं, तिकडे ढुंकूनही पहायला तयार नाहीत. कांही जरूर नाही आम्हाला. रूद्राक्षमाळा, देवाला प्रिय आहेत, भगवान शंकराला प्रिय आहेत. त्याचप्रमाणे तेच आमचे अलंकार आहेत, आम्ही दुसरे घेणार नाही. लोकांच्या दृष्टीनं किंवा आईबापांना ही आपली मुलं कांहीतरी वेडगळ आहेत, अशीच कल्पना झाली. शिवभक्तीने इतकं वैराग्य उत्पन्न होतं, विषयांचा त्याग होणं, मनाला विषय न आवडणं, हे वेड समजतो आम्ही. आम्ही स्वतःला शहाणे समजतो. सगळा संग्रह करणं, सगळया धनाचा, कनकाचा, सगळ्याचा संग्रह करणं हे, हे शहाणपण आहे, आमचं, पण तिथं ते शहाणपण नाहीये. देवाच्या दरबारात किंवा महात्म्यांच्या दृष्टीनं ते खरं शहाणपण आहे, ते समजून घेणारा, समजून सांगणारा अजून भेटला नाही यांना, म्हणून वाटतंय, की मुलांना कांही वेड लागलंय काय? दाग-दागिने कांही घालत नाहीत.

एके दिवशी पराशर महर्षि राजवाड्यामधे आलेले आहेत. अधिकारी महात्मे, **वसिष्ठांचे पुत्र, पराशर म्हणजे, ब्रह्मदेवांचे नातू.** राजेसाहेब उठून उभे राहिले. आपल्या सिंहासनावर त्यांना बशिवलेलं आहे. त्यांची यथाविधी पूजा त्यांनी केली. मुलंही आली होती तिथे. प्रधानाचा मुलगा आणि राजाचा मुलगा. सगळं गळ्यात रूद्राक्ष घातलेले आहेत. भस्म लावलेलं आहे, राजपुत्र कोण म्हणेल, मुलांनी आणखी दागदागिने घालावेत म्हणजे बरं, असं जे आईबापांना वाटतं, त्यांनी जर रूद्राक्षाच्या माळा घातल्या म्हणजे, सगळ्या लोकांमध्ये हे राजपुत्र, हा प्रधानांचा मुलगा, हा राजाचा मुलगा, म्हणजे यांना आपली अब्रू गेल्यासारखं वाटतं. म्हणून आपली अब्रू जाऊ नये म्हणून मुलांनी दागदागिने घालावेत असं वाटतं. ते कांही मुलांना सुख नाहीये कांही. पराशर महर्षींना त्या मुलांनीही वंदन केलेलं आहे. आणि राजेसाहेब हात जोडून

विनंती करताहेत की ऋषिमहाराज, ही मुलं, जन्मापासून अशा वृत्तीची आहेत. रुद्राक्षमाळाच गळ्यामध्ये घालतायत. भस्म लावतायत. शंकरांची पूजा करतायत. कांही कुठंही लक्ष नाही. खेळाकडे लक्ष नाही. दागदागिन्यांकडं लक्ष नाही, खाण्यापिण्याकडेही लक्ष नाहीये. आता याला वेडं म्हणायचं काय? खाण्या-पिण्याकडे सुद्धा लक्ष न जाणं, हे किती ज्ञान मोठं आहे. पण हे ज्ञान आमच्याजवळ नाही, म्हणून याला आम्ही ज्ञान म्हणू शकत नाही. तो राजा तक्रार करतो आहे, ऋषिमहाराज, असं काय करावं आता ? हे राजपुत्र राजकुळामधे जन्माला आलेले आहेत आणि यांची अशी स्थिती, पुढे कसे वागतील हे? त्यागबुद्धीनं वागणारा राज्य करू शकणार नाही काय? स्वतः कांहीच नाही,भोग नाही, सर्व प्रजाजनांच्या करता, द्रव्याचा, सगळ्याचा उपयोग करणारा, काय राजा हा चांगला राजा होणार नाही कां? उत्तम राज्य करील. स्वार्थ कांहीच मनामध्ये नाहीये. तो चांगला राजा होईल. पण याला काळजी आहे. भोग कांहीच जर घेत नाहीत, तर राज्यवैभवाचा उपयोग काय? संपत्तीचा उपयोग काय? **संपत्ती ही केवळ भोगाकरिताच आहे अशीच भावना आहे.** त्याग झाला तर करायचा आपला, थोडासा, त्यातल्या त्यात. मनालाही बरं वाटावं, लोकांनीही बरं म्हणावं, लोकांनी बरं म्हणावं याकरिताच त्याग होत असतो. मनापासून किंवा याच्याकरिता होतो की नाही, कुणाला ठाऊक. बुद्धिसाक्षी परमात्मा आहे. तेव्हा अशी यांची स्थिती झाली म्हणाले. तेव्हा सर्व लोकांना, सगळ्यांना आम्हाला वाटतं, की यांना कांही वेड लागलेलं आहे की काय? पराशर ऋषी हसले, काय म्हणाले राजा, तुम्हाला कल्पना नाहीये, तुमचं शहाणपण निराळं आहे, व्यवहारातलं शहाणपण वेगळं आहे आणि हे शहाणपण फार मोठं आहे. यांच्यासारखं ज्ञान किंवा वैराग्य प्राप्त करून घेण्याला कितीतरी आणखी जन्म घालवावे लागतील. त्याशिवाय आणखी विषय नको म्हणणार नाही. कितीही आणखी संग्रह झाला तरी आणखी पाहिजे, आणखी पाहिजे असं आपण म्हणत असतो. संग्रहाकडे इतकं लक्ष आपलं असतं.

धनत्तनादि निसत्वं लाभे लोभो महत्चमूम् ।
निर्धनोऽपि सदा तुष्टोऽप्यसहायो महाबलः ॥

आचार्यमहाराज सांगताहेत.

कांही पैसा हातामध्ये नाही हो, कांही मला पैसा-बिसा नाही, खायलां घेता येत नाही. कांही चुरमुरे फुटाणे घेण्यालासुद्धा माझ्याजवळ पैसा नाहीये. वाईट वाटतं, दुःख होतं. ते बरोबर तरी आहे. कांही एकसुद्धा पैसा नसलेल्या माणसांनी काय खावं? त्याचं दुःख म्हणा किंवा त्याचं हे म्हणणं आणखी बरोबर आहे. पण ज्याला पैसा मिळतो आहे, भरपूर पैसा मिळतो आहे, लक्षावधी रूपये जवळ आहेत, संग्रह चाललेला आहे, त्यालाही दुःख आहे म्हणतात. आचार्य सांगतात ते कसं काय? **'लाभे लोभो महत्चमूम्'** म्हणतात. जास्ती जास्ती

लाभ व्हायला लागला, मिळायला लागलं की आणखी मिळायला पाहिजे. याच्यापेक्षा जास्ती आणखी नफा झाला पाहिजे. याच्यापेक्षा जास्ती पगार मिळायला पाहिजे. म्हणजे जवळ मिळालेलं जे आहे त्याचं सुख असूनसुद्धा तेही गेलं. आणखी कां मिळत नाही म्हणून, लोभामुळे जास्तीत जास्ती दुःख प्राप्त होतं. आणि लोभामुळे ती आपली लोभवृत्ती आणखी शांत करण्याकरिता, नीती-अनीतीचा विचार मनातून निघून जातो, जास्ती संग्रह होतो आहे,

लोभमूलानि पापानि *रसमूलाश्च व्याधय:*
इष्टमूलानि शोकानि त्रीणि त्यक्त्वा सुखी भव ॥ **(सुभाषित)**

ती सगळी पापं त्यामुळे घडतात.

पराशर, मुनी सांगताहेत, बाबा तुझ्या मुलावरती आणखी भगवान शंकरांची पूर्ण कृपा आहे, म्हणून त्यांना अशी बुद्धी झालेली आहे, इतक्या लहान वयामधे. तुम्हाला त्यांची कल्पना नाही, म्हणून पराशर ऋषींनी त्यांच्या पूर्वजन्माचा वृत्तांत सांगितलेला आहे. शिवलीलामृतामधे ही कथा आलेलीच आहे. महाराजांनीही त्या ठिकाणी, कांही शिवव्रतं सांगितलेली आहेत. कांही विष्णुव्रतं सांगितलेली आहेत. गुरूचरित्रामधे मार्गदर्शन पुष्कळ आहे. सर्वजीवांना हे व्रत करा, ते व्रत करा, ह्या तीर्थयात्रा करा, हे करा असा पुष्कळ उपदेश आहे. पराशर ऋषी सांगताहेत, एका नगरामधे, एक वेश्या स्त्री रहात होती म्हणे. मोठी शिवभक्त आहे, तिचा धंदा जरी आणखी निंद्य असला, पण तो सुद्धा तीचं कर्तव्य आहे. ते कर्तव्य शास्त्राधिष्ठीत आहे. परंतु मोठी शिवभक्त, धर्मशील, दानधर्म करणारी, नित्य आणखी मंदिरामधे जाऊन दर्शन करणं, हे करणं अशी धर्मबुद्धी धारण करणारी ती स्त्री होती.

भगवान शंकरांनी तिची परीक्षा पाहण्याकरिता एक व्यापाऱ्याचा वेष धारण केला आणि तिच्या वाड्यामधे आलेले आहेत. कोणीतरी श्रीमंत मनुष्य आहे. तिनं जाणलं ते. त्यांचा आदर-सत्कार केला. ते बसलेले आहेत. त्यांच्या जवळ एक रत्नलिंग होतं शंकरांचं. रत्नलिंग. ते शिवलिंग पाहिल्याबरोबर ही शिवभक्त होती, स्त्री, तिला इच्छा उत्पन्न झाली की हे शिवलिंग जर मला मिळालं तर बरं होईल. आपल्या मैत्रिणीला सांगितलं की यांना विचारा तुम्ही शिवलिंग जर मला तुम्ही द्याल तर मी तीन दिवस तुमची स्त्री होऊन राहण्याला तयार आहे. अथवा तुम्हाला विकत द्यायचं असेल तर मागेल तितकं द्रव्य मी तुम्हाला द्यायला तयार आहे. लक्ष मागा, कोटी मागा. वाटेल ते. काय तिला कांही कमी नव्हतं. त्यांनी सांगितलं, त्या वैश्यानी, मला म्हणाले पैशाबिशाची जरूर नाही. पैसा पुष्कळ माझ्याजवळही आहे. पण ही तुमची मालकीण माझी स्त्री होऊन राहायला तयार आहे म्हणता तुम्ही, कशावरून ? बोलून चालून ही म्हणाले वेश्यावृत्तीची आहे, स्वातंत्र्य आहे, वारांगना म्हणतात हिला. कुठलं तीन दिवस पतिव्रता स्त्री. कधी शक्य आहे काय म्हणाले. मला कांही विश्वास वाटत नाही. मग

तिनं सांगितलं, महाराज मी अगदी सूर्य चंद्र साक्षीला ठेऊन तीन दिवस पर्यंत पतिव्रता धर्मानी वागणारी आहे. तुम्ही अगदी निश्चिंत रहा. बराय, शिवलिंग दिलं तिच्या ताब्यामध्ये. ते म्हणाले, जपून ठेवलं पाहिजे. जर याला धक्का लागला तर मी जिवंत राहणार नाही म्हणून तिला बजावलं आहे, आणि संध्याकाळी आपल्या शयनागारात गेले. इतक्यात तिकडे, त्या स्त्रीनं वारांगनेनं, वेश्या स्त्री होती, तिथे एक मोठा मंडप घातलेला होता आणि तिथं तिनं नृत्य, गायन वगैरे करावं रोज आणि त्या ठिकाणी एक कुक्कुट आणखी मर्कट, कोंबडा आणि माकड असे दोन तिनं पाळलेले होते. त्यांच्या गळ्यात रूद्राक्षमाळा घातल्या होत्या. त्यांनीही नाचावं, त्यांनीही हे करावं अशा प्रकारचं. तिच्या संगतीमधे ते राहिले होते. त्यांच्याही मनामधे आणि शिवप्रेम, शिवभक्ती निर्माण झाली होती.

ते शिवलिंग तिच्या हातामधे दिलेलं आहे. आणखी शयनागारामधे जाऊन पोचतात न पोचतात, इतक्यात एकदम बाहेर आग लागली. सगळा आरडाओरडा सुरू झाला. त्या मंडपालाही आग लागली. तो सबंध मंडप जळून गेला, ते शिवलिंग तिथेच, मंडपातच ठेवलं होतं तिन, पूजा बिजा नंतर आपण करावी, ते शिवलिंगही अग्नीमधे भस्म होऊन गेलेलं आहे. तो जो वैश्य आणखी डोकं आपटत आलेला आहे. माझं शिवलिंग गेलं, माझं शिवलिंग गेलं. अगोदर त्याने बजावलं होतं याचं संरक्षण कर म्हणून. अग्नीमधे गेलेलं आहे. तो अग्नी पेटलेला होताच, त्यानी त्या अग्नीमधेच उडी मारली आणि तोही अग्नीमधे मिळून गेलेला आहे.

ही वेश्या स्त्री अत्यंत दुःखी झालेली आहे. यांच्याबरोबर तीन दिवस आणखी स्त्री भावाने रहायचंय, पतिव्रता म्हणून रहायचंय अशीच तीनं प्रतिज्ञा केली होती. मनाने ठरिवलं होतं. तेव्हा यांनी जर अग्नीमधे प्रवेश केला तर आपणही पतिव्रता धर्माला अनुसरून आपणही सहगमन करायचं, तिनं ठरिवल. आता तीन दिवसाचा प्रश्न होता. तीन दिवसामधे काय, त्यात आणखी उपास करून राहिली असती तरी झालं असतं. हे आमच्यासारखे जे कांही अधर्माकडे ज्यांची प्रवृत्ती अधिक आहे आपद्धर्म, आपद्धर्माकडेच जास्ती आमची बुद्धी सारखी वळते आहे. तेवढ्यापुरतं धर्माचरण करायचं, आणखी खरं धर्माचरणापासून बाजूला व्हायचं. पण तशी ती स्त्री नाहीये. मुख्य धर्म आहे. तीन दिवसामधे आपल कसंही राहवं आपण आणि नंतर आपला आपला धंदा पुन्हा करता येईल. नाही म्हणाली. तीन दिवस यांची स्त्री म्हणून मी कबूल केलेलं आहे. मी पतिव्रता आहे, आणखी म्हणून मला माझा देह या अग्नीमधे अर्पण करायचा आहे. काय भारताचं सौभाग्य होतं? **भारतामधे जन्माला आलेल्या वेश्या स्त्रिया सुद्धा पतिव्रता होत्या, हे कोण ऐकायला तयार आहे आज? हे सगळं खोटं आहे. लिहून ठेवणारेही खोटे, सगळेच खोटे म्हणायचे आणि अशी आमची बुद्धी चाललेली आहे. ती बुद्धी चांगली आहे की वाईट आहे ते सुद्धा आम्हाला कळत नाहीये.** ठरिवलं तिनं. सगळी तयारी केली, ब्राह्मण मंडळींना

बोलावलेलं आहे, पुष्कळ त्यांना आपलं वैभव वगैरे सगळं द्रव्यं वगैरे वाटून टाकलेलं आहे. तिची सगळी मंडळी तिला सांगतायत की तुला हा धर्म नाही म्हणाले. पातिव्रत्य हा इतरांचा धर्म आहे. तुझं काय लग्न झालय काय याच्याबरोबर? लग्न ज्यांचं झालेलं आहे, त्यांनी शेवटपर्यंत पतिव्रता धर्माने राहवं अशा प्रकारचा धर्म आहे. ते कांही नाही, मी कबूल केलेलं आहे, त्यांचा स्वीकार मी केलेला आहे पती म्हणून. तेंव्हा मला आता देह ठेवायचा नाही. हा जो निर्धार तिनं दाखिवलेला आहे, इतकी संपत्ती जवळ आहे, इतकं सगळं जवळ असतानासुद्धा आपल्या धर्माकरता, धर्मो नित्यः, **म्हणून महाभारतकार जे सांगतायत.**

न जातु कामान्न भयान्न लोभाद्धर्मं त्यजे जीवितस्यापि हेतोः ।
धर्मो नित्यः सुखदुःखे त्वनित्ये जिवो नित्यो हेतुरस्य त्वनित्यः ॥
(श्रीगुरुचरिते सटीक, कर्मयोग अ. १८, श्लोक टीका २७)

जिवंत रहाण्याकरतासुद्धा धर्म सोडायचा नाहीय. जीव गेला तरी हरकत नाही. प्राण गेला तरी हरकत नाही. परंतु धर्माचं पालन करायचं असा निश्चय करणारे स्त्रिया किंवा पुरूष आणखी पुष्कळ होऊन गेलेले आहेत भारतामधे. अजूनही असतील कुठे, देवाची दया कुणावर आहे, ते अजूनही असू शकतील, नाही असं नाही. आमची दृष्टीच बदललेली आहे. त्यामुळे कोण धर्मशील आहे किंवा धर्मशील नाहीये. बहुमताने निर्णय करायचा, जो धर्म म्हणून लोकानी सगळ्यांच्या मतांनी ठरला तो धर्म. खरा धर्म बाजूलाच राहतो. तो धर्म म्हणजे बंधन आहे, धर्मातीत राज्य आमचं आहे., आमच्या राज्यामधे धर्म, धर्माच्या पलिकडे गेलेलं राज्य आहे, काय त्याचा अर्थ काढायचा कुणाला ठाऊक?

तर त्या स्त्रीनं ठरवलेलं आहे. कुणाचंही ऐकलं नाही, तिच्या मनावरती कशाचाही मोह झालेला नाहीये. हे आणखी खरी ईश्वराची कृपा आहे. पराशर ऋषी सांगतायत, त्या वेश्या स्त्रीची हकीगत सांगतायत. तो मंडप जळून गेलेला होता, अग्नी पेटलेला आहे आणि त्यामधे त्या प्रतिव्रता स्त्रीनं, अग्नीनारायणला, भगवान शंकराला नमस्कार करून अग्नीमधे उडी मारलेली आहे. भगवान शंकर प्रगट झाले, तिला वरच्या वरती धरून बाजूला ठेवलेलं आहे. काय म्हणाले, काय तुला पाहिजे माग म्हणाले. तुझी परीक्षा पाहयची होती म्हणून मीच आलो होतो. देवानी परीक्षा पाहण्याकरता येणं, यालासुद्धा योग्यता पाहिजे. कोणीही परीक्षा देऊ शकणार नाही. त्या वेश्या स्त्रीनं परीक्षा पूर्ण दिलेली आहे की परमेश्वर शंकर सुद्धा तिची परीक्षा घेऊ शकले नाहीत. ही मोहामधे सापडते की काय पहायचंय, नाही मोह नाही. मी कबूल केल्याप्रमाणे, प्रतिज्ञा केल्याप्रमाणे आणखी माझा देह अर्पण करीन पण धर्म सोडणार नाही. तीन दिवसाचा धर्म तिनं ठरवलेला आहे आपल्या बुद्धीनं, तरी सुद्धा त्या धर्माचं तिनं

पालन केलेलं आहे. मग आपल्या जन्मापासून आपलं कर्तव्यकर्म कोणतं आहे शास्त्राने सांगितलेलं असताना, ते सुद्धा आपल्या हातून पालन केलं जात नाहीये. कारण बुद्धीच, आमची मनं कमकुवत आहेत, धैर्य नाही मनामध्ये, यज्ञ करताना धैर्य नाही, दान करताना धैर्य नाही, तपश्चर्या करताना धैर्य नाही. कोणत्याही कर्माच्या वेळेला धैर्य नाही. काय पाहिजे म्हणाले तुला, तो यज्ञमंडप जळून गेलेला होता सगळा. तिनं सांगितलं मला कांही नको म्हणाली. तुमच्याजवळ येऊन राहयचंय, कैलासपर्वतावरती. हे सगळे माझे नोकर चाकर, सगळ्या मंडळींसह तुमच्या जवळ यायचंय. एक स्त्री जी आहे, पुण्यशील, त्या एका स्त्रीच्या पुण्यामुळे सगळया जीवांचा उद्धार झालेला आहे, सगळ्यांना घेऊन आणखी भगवान शंकर कैलास पर्वतावरती निघून गेलेले आहेत. अक्षय्य काल तिथं ती राहिलेली आहे.

म्हणजे सामुदायिक धर्म चांगला, की वैयक्तिक धर्म चांगला, हाही विचार करण्यासारखा प्रश्न आहे. सामुदायिक धर्माचं पालन व्यवस्थित होणं शक्य आहे काय, कांही नियम करून घ्यावे सगळयांनी मिळून उठावं, सगळ्यांनी मिळून कवायत करावी, सगळ्यांनी मिळून अमुक करावं, करतील, परंतु त्यांची मनाची भूमिका जी आहे, मनाची तयारी जी आहे, ती कोणाची जास्ती आणि कोणाची कमी ते कसं सांगायचं? म्हणून **आपल्या या वैदिक धर्मामधे प्रत्येक जणाला, व्यक्तीला वैयक्तिक दृष्टीनं धर्माचरण करण्याला सांगितलेलं आहे** ज्याचा त्याचा जो धर्म आहे, जे कर्तव्य आहे ते त्यानं समजून घ्यावं आणि त्याचं पालन त्याने अगदी नि:सिमपणाने, श्रद्धापूर्वक आणि ईश्वर प्रार्थनापूर्वक त्याने करावं. त्यानी आमची योग्यता वाढेल. **लोकांचं कल्याण कसं, लोकांचं कल्याण कुणी करू शकत नाहीये. मोठा राष्ट्रपती असला किंवा पंतप्रधान जरी असला तरी लोकांचं कल्याण करू शकत नाहीये. ते ज्याचं त्यानीच करायचं आहे.** हे लोकांच कल्याण केवढं झालं. एक वेश्या स्त्री जन्माला आलेली, भगवान शंकरांच्या भक्तीमुळे आणि स्वकर्तव्य पालन करण्याच्या धैर्यामुळे तिनं आपला देह अर्पण केला. शंकर प्रसन्न झाले असताना, स्वतः तर ती, कैलास पर्वतावर गेलीच, पण आपल्या बरोबर सेवेकरी म्हणून राहणारे, सगळ्या लोकांना घेऊन ती कैलास पर्वतावर गेली. हे शक्य आहे कुणाला? मला एकट्याला, तुला एकट्याला नोकरी मिळेल म्हणे. तुझ्या बरोबरच्या माणसांना नोकरी-बिकरी, आमच्याकडे जागाच नाहीये. हे सगळं अपूर्ण आहे जग. इथं जागा-बिगा नाही असं कधीच नाही. ईश्वराच्या दरबारात जेवढ्या जागा आहेत तेवढेच अर्ज किंवा त्यातले सुद्धा आपल्याला अनुकूल किंवा कुणाची शिफारस आली तेवढेच पसंत केले जातात. कारण पूर्णतः नाही, पूर्ण शक्तीच नाहीये. येतील त्या अर्जदारांना आणखी नोकरी देण्याचं सामर्थ्यच नाहीये, जगामधे कोणालाही नाहीये. कोणच्याही राष्ट्रात नाही. परीमित जागा ठरलेल्या आहेत. त्या वेळेवर अर्ज आले त्यातून पुन्हा परीक्षा होऊन त्यांची निवड होते. इथं तसं नाहीये. वाटेल ते येऊ दे आणि जो एखादा असेल,

समर्थ भक्त, त्याने जर प्रार्थना केली तर त्यांचाही, इतरांचाही उद्धार होतो. त्याने अर्ज करायची जरूर नाहीये. कैलास पर्वतावर त्यांनी कशाला, त्यांची योग्यता होती काय?

तर त्या स्त्रीची इच्छा आहे, महाराज, यांचाही उद्धार करा. केला देवानी भगवान शंकरांनी उद्धार केलेला आहे.

तर अशा रीतीनं, पराशर महर्षींनी त्या राजाला सांगितलं बाबा, तिचा जो नाट्यमंडप जो होता, नृत्य-गायन करण्याचा मंडप, तो तर जळून गेला. तिथं बांधलेले ते कुक्कुट आणि मर्कट दोघेही जळून गेलेले आहेत. आणि ते तुझे पुत्र झाले. तुझा एक मुलगा आणि प्रधानाचा मुलगा. पूर्वजन्मामधे, त्यांना काय पशूजन्मामधे ते होते, त्या स्त्रीने त्यांच्या गळ्यामधे आणखी रुद्राक्ष माळा घालाव्यात, भस्म लावावं वगैरे. परेच्छेनं त्यांना सगळं घडलं. ते संस्कार, पण त्यांच्या मनामधे तसेच संस्कार राहिले. तीच शिवभक्ती त्यांच्या बुद्धीमधे उतरलेली आहे. **आणि या जन्मामधे ते कायमचे शिवभक्त झालेले आहेत. ज्ञानपूर्वक भक्ती आता ते करताहेत.** पूर्वी अज्ञानाने त्यांची भक्ती झाली म्हणा किंवा शिवव्रताच पालन अज्ञानानी झालेलं आहे. पण त्यांचही फळ त्यांना मिळालं.

ही तुझ्या मुलाची हकीगत आहे. आता ही मुलं, यांना वेडं म्हणायचं कां शहाणं म्हणायचं आता तुझं तू ठरीव, म्हणाले. पशुपक्ष्याच्या जन्माला गेलेले असताना सुद्धा ते जर या जन्मात आलेले आहेत, राजपुत्र होऊन आलेले आहेत, म्हणजे ते केवढं त्यांचं पुण्य आहे आणि ते पुण्य टिकाऊ आहे. अजून त्यांची बुद्धी त्या विषयाच्या मोहात सापडलेली नाहीये. वाटेल तितके दागदागिने यांना मिळणं शक्य आहे. आणून देता तुम्ही. नाही, पहात सुद्धा नाहीत त्या दागदागिन्यांकडे. ही त्यांची बुद्धी ही जी इतकी स्थिर झालेली आहे, भगवान शंकर कसे वागतायत, त्याप्रमाणे आपण वागायचं म्हणून यांनी ठरविलेलं आहे.

एकैश्वर्ये स्थितोऽपि प्रणतबहुफले यः स्वयं कृत्तिवासाः ।
(मालविका अग्निमित्र मंगलाचरण)

काय भगवान शंकरांचं आणखी माहात्म्य सांगताहेत पराशर महर्षि. संपूर्ण नियामक शक्ती आहे, पूर्ण शक्ती आहे. ऐश्वर्य पूर्ण आहे, भगवान शंकरांना काय कमी आहे? काय वस्त्रं कमी आहेत, कां दागदागिने कमी आहेत कां त्यांना. पण कांही नाही, जवळ कांही संग्रह नाहीये. कृत्तिवासः ! एक व्याघ्रजिन पांघरून घेऊन स्वस्थ बसलेले आहेत. हा झाला संग्रहरहीत. त्याचप्रमाणे

कान्तासंमिश्रदेहोऽप्यविषयमनसां यः परस्ताद्यतीनाम् ।
(मालविका अग्निमित्र मंगलाचरण)

पार्वती माता अर्ध देहामधे आहे, म्हणतात. शंकरांचा अर्धा देह म्हणजे पार्वतीमाता अन् अर्धा देह म्हणजे शंकर. इतकं त्या स्त्रीला, इतक्या आपल्या अर्ध्या शरीरामधे त्यांनी समावेश केलेला आहे. परंतु.

अविषयमनसां यः परस्ताद्यतीनाम् । (मालविका अग्निमित्र मंगलाचरण)

स्त्रीसंग, स्त्री इतकी जवळ असतानासुद्धा, अर्ध्या शरीरात असतानासुद्धा अंतःकरण निर्विषय आहे. मोठे–मोठे जे निर्विषय योगी पुरूष त्यांचे अग्रगण्य भगवान शंकर आहेत. हा संयम आहे. स्त्री इतक्या सन्निध असताना सुद्धा मन त्या मोहामधे सापडत नाहीये, लक्षच नाहीये, आत्मानंदामधे निमग्न आहेत. भगवान शंकर परमात्मा यांचा संयम केवढा आहे.

अष्टाभिर्यस्य कृत्स्नं जगदपि तनुभिर्बिभ्रतो नाभिमानः । (मालविका अग्निमित्र मंगलाचरण)

म्हणतात.

भगवान शंकर हे प्रलय करणारे आहेत. त्यांचं रूप निराळं असेल. प्रलयाच्या वेळची ती एकंदर व्यवस्था असेल. पण आज भगवान शंकर हे सगळ्या जगाचं संरक्षण करतायत. पंचमहाभूतं, त्याचप्रमाणे आणखी सूर्य, चंद्र आणखी अग्निहोत्री, सोमयागी जो आहे, ही आठ रूपं धारण करून सर्व विश्वाचं पालन करण्याचं कार्य भगवान शंकर करतायत. तरीसुद्धा नाभिमान: कोणावर, थोडासा उपकार केला की मी इतका उपकार केलेला आहे, मी इतकं दान केलेलं आहे, मझं नांव छापून आलं पाहिजे, वृत्तपत्रामधे त्याचं आणखी वर्णन झालं पाहिजे, काय किती अभिमान आहे आपल्याला. इथं एवढ्या सगळ्या जगाचं संरक्षण करण्याचं कार्य ते अखंड चाललेलं असतानासुद्धा अभिमान नाहीये. हे भगवान शंकरांचं स्वरूप आहे.

सन्मार्गालोकनाय व्यपनयतु स वस्तामसीं वृत्तिमीशः । (मालविका अग्निमित्र मंगलाचरण)

कालिदास सांगतायत– सर्वाचा असा विचार करण्याकरता, आमची बुद्धी तयार व्हावी, आमच्या बुद्धीतली तमोगुण जो आहे, तामसी वृत्ती आमच्या बुद्धीची दूर झाली म्हणजे सन्मार्गाचा आम्ही विचार करण्याला योग्य होतो. सन्मार्गाचं आचरण करण्याची योग्यता अजून पुढे आहे, पण विचारसुद्धा आणखी करायला आमची योग्यता नाही, इतकी तामसी वृत्ती आमच्या बुद्धीची बनलेली आहे, की आम्हाला कांही माहितीसुद्धा नाही. शंकर कोण आहेत, त्यांची योग्यता काय, कांही कल्पना आहे काय? बाह्यवृत्ती कशी असली तरीसुद्धा त्या बाह्यवृत्तीतून त्यांचा आणखी परिग्रह नाही. पूर्ण संयम आहे. निरभिमान वृत्ती आहे. कार्य अखंड चाललेलं आहे. कर्तव्यकर्म करण्यामधे आणखी पूर्ण निमग्न आहेत. कांही अभिमान नाही. कांही नाही. हे शंकरांचं स्वरूप ज्यांना समजलेलं आहे, त्यांची भक्ती शंकरांच्यावरती बसली आहे आणि ते त्याप्रमाणे वागायला लागताहेत. तुझी मुलं खरी शहाणी आहेत म्हणाले, बाबा. तू त्यांना वेडा समजतो आहेस.

शंकरांचं हे जे बाह्य वर्तन आहे, कसे वागतायत, ते नाही, वेड्यासारखं नाहीये, असं समजावून सांगितलेलं आहे. राजाचंही समाधान झालं. असू देत, म्हणाले. आता या माझ्या मुलाचं आयुष्य किती आहे सांगा म्हणाले. गप्प बसले पराशर ऋषी. कांही नाही. किती वर्ष याच आयुष्य आहे?

आयुष्यवृद्धी असणं किंवा आयुष्य पुष्कळ असणं हे एक संसारातलं समाधान आहे की नाही? सगळं आहे, सगळं आहे आणि आयुष्यच कमी आहे म्हटल्यानंतर काय करायचं? पराशर ऋषीं म्हणाले, बाबा, तुझ्या मुलाचं भविष्य तुला जर सांगितलं, तू ऐकलंस की तुला अत्यंत वाईट वाटेल म्हणून सांगू नये असं वाटतं म्हणाले. राजा म्हणाला, महाराज, कांही हरकत नाही. जे असेल ते सांगा. कारण आपण आता सन्निध आहात. कोणचाही प्रसंग जरी येणार असला पुढं, तरी त्या प्रसंगातून आम्हाला मुक्त करणं, आमच्या संकटाचा परिहार करणं, त्याला समर्थ आपण आहांत. खात्री आहे आमची. मग सांगायला काय हरकत आहे. त्या वेळेला त्यांनी सांगितलं, तुझ्या पुत्राचं एकंदर आयुष्य बारा वर्षाचं आहे म्हणाले. जास्ती नाही, मग. फक्त सात दिवस त्यातलं आयुष्य शिल्लक राहिलेलं आहे. आजपासून सातव्या दिवशी आणि तुझ्या मुलाला मृत्यू येणार आहे, आयुष्य संपणार आहे. ऐकल्याबरोबर राजाला मूर्च्छाच आलेली आहे. थोड्या वेळाने सावध झाला. कांहीतरी करा महाराज, आपण समर्थ आहात. शास्त्रज्ञान आपल्याजवळ आहे, शास्त्रही मोठं आहे. आयुष्य वाढवणं, कमी असलेलं जास्ती आयुष्य करणं, हे सगळं शास्त्रामधे सांगितलेलं आहे, मार्ग सगळे सांगितलेले आहेत. ते जाणणारे मात्र पाहिजेत आणि समजल्यानंतर विश्वास ठेवणारी माणसं पाहिजेत आणि त्याप्रमाणे प्रयोग करणारी माणसं पाहिजेत. नुसता जाणणारा असून काय उपयोग? त्यांनी नुसतं सांगून दिलं आणि काय करायचं? केलं नाही तर काय? असं असं करा, दानधर्म करा, होम हवन करा, अमुक करा सांगितलं. आमच्याच मनात जर अविश्वास उत्पन्न झाला, तो सांगणाऱ्याबद्दलही अविश्वास आणि जे शास्त्र आहे त्याच्याबद्दलही अविश्वास उत्पन्न झाला तर बंदच झालं ते. तेही प्रारब्धच मानायचं. आयुष्य वाढणारच नव्हतं त्याचं. त्यामुळे तशी बुद्धी होतच नाही.

पराशर महर्षी म्हणाले, राजा, घाबरू नकोस, भगवान शंकर परमात्मा, मृत्युंजय म्हणतात ना त्यांना, मृत्यू जिंकलेला आहे त्यांनी. आपल्या भक्तालाही मृत्यंजयी बनवू शकतात ते. त्याकरिता रूद्राध्यायाचं माहात्म्य त्यांनी सांगितलेलं आहे. रुद्राभिषेक भगवान शंकराना करतात, तो रुद्राध्याय किती महत्त्वाचा आहे, आणखी त्याचं वर्णन केलेलं आहे. आणि यांनी शंकरांना अतिरूद्राभिषेक तू कर, म्हणून सांगितलेलं आहे. आणि त्या जलानी तुझ्या मुलाला स्नान घाल. स्वतः पराशर महर्षी तिथे राहिले. राजाचं तो होता. त्याने लगेच तयारी केली, ब्राह्मण

मंडळी बोलावलेली आहेत. आणि भगवान शंकरांना संततधार अभिषेक सुरू झाला. मुलाला आणखी गंडांतर जे आलेलं आहे, मृत्यू येणार आहे ते आता टाळायचं आहे, त्याकरता. पूर्ण विश्वास आहे मनामध्ये, विश्वास असल्यानंतर भगवानही जवळ आहेत, पराशर महर्षींसारखे ज्ञाते आहेत. अनेक ऋषीमंडळी, सर्व आणखी विधी जाणणारी तिथे बोलावलेली आहेत आणि त्यांचही कार्य चाललेलं आहे, अभिषेक चालू आहे. त्या तीर्थांनी त्याला रोज स्नान घालायचं, त्या राजपुत्राला, पराशरांनी सांगितल्याप्रमाणे. सातवा दिवस आणखी आलेला आहे. अभिषेक वगैरे, अतिरूद्राभिषेक सगळा पार पडला. आणखी ब्राह्मणांनी सगळ्या मंत्राक्षता वगैरे दिलेल्या आहेत.

त्या मुलाला नेण्याकरिता यमधर्माचे दूत आलेले आहेत. पण तिथे कांही येऊ शकत नाहीत. मंत्र म्हणतायत सगळी ब्राह्मण मंडळी. नुकताच हा अभिषेक झालेला आहे. हे मोठं कर्म मोठं पुण्यकर्म, सात दिवसपर्यंत अहोरात्र शिवलिंगाला अभिषेक झालेला आहे. रूद्राध्यायाचा. त्यामुळे जवळ कांही येण्याचं त्यांचं सामर्थ्य नाहीये. तो मुलगा मूर्च्छित पडला मात्र, त्यावेळेला. पराशरांनी लगेच तीर्थ प्रोक्षण करून त्याला सावध केला. उठून बसलेला आहे आणि शेवटी त्या यमाच्या दूतांनी आणखी त्याला नेण्याकरिता प्रयत्न केला, इतक्यात शिवदूत त्या ठिकाणी आले, आणि दोघांचं आणखी युद्ध झालेलं आहे. यमदूत सगळे आपल्या वाटेने निघून गेले. तो मुलगा सावध झालेला आहे. मग सगळं ब्राम्हणांचं भोजन वगैरे आटोपलेलं आहे, सर्वांची संभावना, वस्त्र, पात्र काय असेल ते सगळे देऊन आणखी हे केलं राजाने. पराशर महर्षींचीही पुष्कळ आणखी पूजा-अर्चा वगैरे त्यांनी केली. इतक्यात राजसभेमधे नारद महर्षी येऊन पोहोचलेले आहेत. त्यांनाही सिंहासनावर बसवून, राजानी पूजा केली. काय महाराज, कुठून आला तुम्ही? काय नवीन कांही गोष्ट पाहिली असली किंवा, सांगा तरी. सगळीकडे तुमचा संचार असतो. ते सांगण्याकरताच आलो म्हणाले मी.

आज तुझ्या मुलाला नेण्याकरता यमाचे दूत आले होते आणि ते कुणाला दिसले नाहीत. पण मुलगा मूर्च्छित पडला होता तुझा. पराशरांनी त्याला वाचवलं म्हणाले. त्याला नेण्याकरता यमदूत आलेले असताना शिवदूत आले, वीरभद्र वगैरे त्यांचा अधिपती ते सगळे आले, त्यांचं युद्ध झालं, इतक्यात त्यांनी यमाला जाऊन सांगितलं आणि यमधर्म आला. त्यांनी वीरभद्राला विचारलं, याचे आयुष्य संपल्यानंतर आमचे दूत याला नेण्याकरता आलेले असताना तुम्ही आमच्या दूतांना प्रतिकार कां केला? आयुष्य असताना तर आलो नाही आम्ही म्हणाले. वीरभद्र म्हणाले तुमच्या त्या चित्रगुप्ताला बोलवा म्हणाले. याची काय एकंदर चोपडी आहे, आयुष्याचा जमाखर्च कसा आहे पाहू या म्हणाले. बोलावलं त्याला. पहायला लागल्यानंतर बारा वर्षे आयुष्य असं प्रथम लिहिलं होतं. पण पुढंही पुन्हा दहा हजार वर्ष आयुष्य याला वाढणार आहे, हेही

लिहिलेलं आहे. यमानी पाहिलं, होय म्हणाले हे अगोदर कांही आमच्या लक्षात आलं नाही. म्हणजे तिथेसुद्धा अशा कांही चुका होतात असं दिसतंय. सुधारणा करणारे असतात ते पराशर महर्षि किंवा शंकरांचे दूत वगेरे. शंकर आहेत म्हणून चाललेलं आहे. आणि मग त्यांनी सांगितलं, पराशर ऋषि तुला भेटले राजा, त्यांची संगती, त्या सद्गुरूंनी मार्गदर्शन तुला केलं म्हणून तुझा मुलगा वाचलाय म्हणाले. नाहीतर कांही नाही. बारा वर्षे ठरलेलंच आहे. जास्ती कशाने मिळणार? जास्ती वाढीवता येतं म्हणाले.

मनुष्याला, आपली उन्नती आपल्या इच्छेप्रमाणे करून घेता येती, हे त्याचं आणखी निदर्शन आहे. पण ती सगळी साधनं समजली पाहिजेत, सांगणारा कोणीतरी महात्मा भेटला पाहिजे. त्याच्या नेतृत्वाखाली ते आणखी घडलं पाहिजे सगळं व्यवस्थित यथासांग ते कर्म कांही घडेना म्हणतात. काय उन्नतीची साधनं हे देणं घेणं किंवा कांही घेतलं असेल, परंतु स्वतःचा देह अग्नीला, जिवंत देह अर्पण केलेला असताना सुद्धा स्वर्गलोक प्राप्त होतो आहे. अशी उन्नतीची साधनं आहेत. याला कोण मानेल तरी कां? ज्याच्या मनात धैर्य नाही, धर्माबद्दल कांही कल्पना नाही तो म्हणणार, हे काय, उगीच बायकांना जाळायचं कांहीतरी काढलेलं आहे. कांहीतरी स्त्रियांच्या पाठीमागे लावून दिलेल आहे, प्रसंग चाललेलेच आहेत. स्त्री–मुक्ती झाली पाहिजे, अमुक झालं पाहिजे, प्रसंग चाललेले आहेत. त्यात त्यांनी जास्तीच आपलं सांगून द्यायचं, काय देह जाळायचा असतो काय, आत्महत्या करायची काय? याला आत्महत्या म्हणतात. नाही. तसं नाही. स्वतःच्या इच्छेनं देह अर्पण केल्यानंतर ती आत्महत्या कशी म्हणणार? पतीच्या बरोबर आपल्याला जायचंय. ध्येय काय आहे, म्हणजे अशी जरी दिसायला आणखी अयोग्य वाटणारी कर्म जरी असली तरी, त्यांनीही उन्नती होती.

प्रयागक्षेत्रामधे गंगा, यमुना, सरस्वतींचा तो त्रिवेणी संगम आहे, त्या त्रिवेणी संगमामधे जर देह अर्पण केला तर तो मुक्त होतो म्हणे. सित आणखी असित सरिता आहे, एक काली आहे एक निल वर्णाची सरिता आणि एक शुभ्र वर्णाची आहे, गंगा आणि यमुना. त्या दोनही या ठिकाणी मिळालेल्या आहेत. त्या ठिकाणी आपलं शरीर अर्पण ज्यांनी केलेलं आहे तो आणखी जन्ममरणातून मुक्त होतो. म्हणजे किती उन्नती आहे. शरीर, सजीव शरीर अर्पण केलेलं असताना, परंतु त्यातही अत्यंत विचार करण्यासारखी गोष्ट आहे. संगमामधे आपलं शरीर अर्पण करायचं आणि आपला उद्धार करून घ्यायचा म्हणून प्रयागला जातात, पण नदीमधे गेल्यानंतर जर मनामधे असं वाटलं, काय बाबा इथं बुडून मरायचं आपण? बुडून मरायचं म्हणल्यानंतर त्याचा देह गेला तरी त्याला मिळणार नाहीये. त्याने अर्पण करूच नये. शेवटपर्यंत आपली बुद्धी जर आणखी स्थिर राहीली, हा धर्म आहे, हे उन्नतीचं एक साधन आहे, ते साधन मी आणखी करतो आहे, मनामधे त्याच्याबद्दल अविश्वास यत्किंचित जर

नसेल तर फळ मिळेल. दान करायच आहे, तयारी आहे, सगळं करायचय, आपल्याला पुण्य मिळावं म्हणून. आणखी दान द्यायला लागलेला आहे, ठरल्याप्रमाणे सगळ्यांच्यापेक्षा जास्ती दान त्यानी आणलेलं आहे, पण द्यायच्या वेळेला मनामधे जर, एक थोडासा विचार आला, काय हो, थोडसं कमी केलं असतं तर बरं झालं असतं. इतकं कशाला द्यायला पाहिजे? आणखी पुन्हा केव्हातरी दिलं असतं. आजच कशाला द्यायला पाहिजे. हे झालं की तितकं देऊन सुद्धा सगळं फळ मिळणार नाही. मिळेल कांही मिळेल, नाही असं नाही. दिलंय त्याने. परंतु पूर्ण फळ मिळणार नाही.

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ।
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम् ॥ (भ.गी. १७.२०)

हे सात्त्विक दान होणार नाही. फळ कांहीतरी देतोय, परमेश्वर, घ्या तुम्ही, इतकं तरी द्यायला लागला तुम्ही. बराय !

तर अशा रीतीनं, नारदांनी सांगितलं, पराशरांची भेट तुला झाली, म्हणून तुझा मुलगा जिवंत राहिला म्हणाले. नाहीतर जिवंत राहिला नसता. तू राजा असशील. पण राजाची शक्तीसुद्धा मर्यादित आहे. मृत्यूवरती राजा आणखी कांहीही, ताबा करू शकत नाही. स्वतःचा मृत्यू ज्या राजाला वाचवता येत नाही तो मुलाचा मृत्यू काय वाचवू शकणार आहे? तेव्हा राजा जरी असला तथापि त्याची शक्ती आणखी मर्यादित आहे. हे जे सद्गुरु, ज्ञानी महात्मे आहेत त्यांची मात्र शक्ती मोठी आहे. स्वतः ही ते आणखी मृत्युंजय आहेत. आणि दुसऱ्यालाही मृत्युंजय करू शकतात. म्हणून तुझा मुलगा आज जिवंत राहिलेला आहे. आनंद झाला राजाला. हे चरित्र आणि महाराजांनी, त्या पतिव्रता स्त्रीला, त्या आणि सावित्रीला, सांगितलेलं आहे. **तीर्थजलाचं माहात्म्य आहे याच्यामधे.** रुद्राक्षाचं माहात्म्य, आणखी पूर्वीच्या वेश्या स्त्रीच्या कथा सांगून, सांगितलं, ते रूद्राक्ष माला धारण करणारे कुक्कुट, मर्कट ही आणखी पुन्हा राजपुत्र झालेले आहेत. आणि **हा जो आणखी राजपुत्र, त्याला मृत्यू येणार होता, अतिरूद्राभिषेक सारखा चाललेला आहे, त्या तीर्थजलानी त्याला अभिषेक केला, स्नान केलं. त्या तीर्थजलाच्या प्रभावाने तो आणखी जिवंत राहिलेला आहे, त्याला अपमृत्यू आलेला नाही. हे तीर्थजलाचं माहात्म्य आणखी महाराजांनी त्या सावित्रीला सांगितलेलं आहे.** क्षेत्रामधे जाऊन, ईश्वराचं तीर्थ म्हणा, अंगारा म्हणा हे जे घ्यावं म्हणून सांगतात, भस्मधारण विधी सांगितलेला आहे. तर तीर्थ, अंगारा, नरसोबाच्या वाडीला वगैरे महाराज नेहमी सांगायचे, देवाला जाऊन संध्याकाळी पालखी झाली, तीर्थ अंगारा सर्वांना देतात, गाणगापूरलाही देतात, तीर्थअंगारा घ्या, हे औषध आहे, खरं औषध हे आहे, असं सांगायचे सर्वांना ते ! ते माहात्म्य महाराजांनी त्या सती स्त्रीला सांगितलेलं आहे. आनंद झाला तिला.

राहिली ती तिथे. पती-पत्नी राहिले. त्यांचे माता-पिताही तिथे येऊन राहिलेले आहेत. त्यांनाही आनंद झालेला आहे. आपला मुलगा मिळाला, आपली सून म्हणजे भाग्यवान आहे. मोठी पुण्यशील आहे. तिच्यामुळे आपला मुलगा आणखी जिवंत राहिला वगैरे. सगळ त्यांना आनंद झालेला आहे.

यानंतर, आणखी एक कथा, सांगताहेत, त्या स्त्रीबद्दल. सतीचरित्र चार-पांच अध्याय, जवळ जवळ हे, ह्या सतीचंच चरित्र चाललेलं आहे. पूर्वी कोणत्या संकटामधे ते होते, त्या संकटातून त्यांची मुक्तता कशी झाली. हे सगळं त्यांच्या एकंदर मनोधैर्यामुळे, धर्मशील वृत्तीमुळे सगळं झालेलं आहे. बाहेरचं सहाय्य याच्यामधे कांहीही दिसत नाहीये. म्हणून आम्हाला हे खरं वाटत नाही. औषध पाण्याकरिता कांही खर्च झाला, दहा हजार रूपये खर्च झाले, म्हणजे समाधान वाटतं. अहो, इतके खर्च केले आम्ही, आत्ता बरं वाटायला लागलं. आणि औषध कांहीही घेतलं नाही, केवळ देवाला आणखी शरण गेलेला आहे. आणि त्या योगाने जर कांही झालं तर खरं वाटेल? त्यांनीही बरं होतात लोक. नाही असं नाही. कांही कांही महात्मे, सद्गुरू वासुदेवानंद स्वामी महाराजांच्या चरित्रामधे कथा आहे, कांहीही झालं तरी औषध कधीही ते घेत नव्हते. कितीही आणखी कष्ट असो, कांही नाही. शौचाला गेले, याला गेलं की स्नान करायचं लगेच. ब्रह्मावर्त क्षेत्रामधे त्यांचा मुक्काम होता, दोन वर्षे राहिले होते ते. त्या क्षेत्रामधे गंगा नदीचा प्रवाह, अलिकडे जिकडे ते राहिले होते तिथे वाळू, वाळवंट पुष्कळ होतं, उन्हाळ्याचे दिवस, आणि पलिकडे त्या बाजुला तो गंगाप्रवाह. उन्हाळ्यामध्ये वाहायला लागला. शौचाला जाऊन आल्यानंतर यांनी तितकी वाळू आणखी दुपारी बारा काय, दोन वाजता काय, त्या वाळूतून जावं आणखी स्नान करून पुन्हा यावं, काय आहे, हे किती, पायात कांही नाहीये. तितिक्षा केवढी मोठी आहे.

नाहं देहो नेन्द्रियाण्यन्तरङ्गो *नाहङ्कारः प्राणवर्गो न बुद्धिः ।*
दारापत्यक्षेत्रवित्तादिदूरः साक्षी नित्यः प्रत्यगात्मा शिवोऽहम ॥

(अद्वैत पञ्चरत्न श्लोक १)

कोणी म्हणायचं हे, मी देह नाही, हे त्यांनीच म्हणावं. देहाची पर्वा नाही, शास्त्र कसं सांगताय, विष जरी घ्यायला सांगितलं शास्त्रांनी, तरी घ्यायला हरकत नाही, ज्ञानेश्वर महाराज सांगतायत. वेदमाऊलीने विष घ्यायला सांगितलं तरी घ्यावं, राज्य सोडा म्हणून सांगितलेलं आहे, शास्त्रांनी, सोडलं, रामचंद्रांनी सोडून दिलं राज्य, त्यांना कांही आसक्ती वाटली नाही. माझं राज्य गेलं, कधीही वाटलं नाही, म्हणून भरतासारखा बंधु त्यांना मिळाला की त्यांनी चौदा वर्षे त्यांचं म्हणून राज्य केलं आणि ते आल्याबरोबर त्यांना अर्पण करून दिलेलं आहे. अगोदर त्याग केला, त्याग केल्यानंतर जात नाही. तर ही उन्नतीची साधनं त्या आपल्या

शास्त्रकारांनी अशी सांगितलेली आहेत. अन् त्याप्रमाणे **विश्वासाने, धैर्याने जर तसं साधना अनुष्ठान झालं तर त्याचं फळ कलियुग कां असेना, कलियुगात सुद्धा मिळू शकतं. या कलियुगातल्याच गोष्टी आहेत सगळ्या !** श्रीपाद वल्लभ अवतार, नरसिंहसरस्वती अवतार, कलियुगातच झालेले आहेत. पूर्वीच्या युगामधेच तेवढ फळ मिळतं, आत्ता मिळणार नाही काय? आमची बुद्धीच इतकी तयार झाली पाहिजे. हे मन किंवा बुद्धिला तयार करण्याकरता सगळी साधनं आहेत, हा विचार करून त्याप्रमाणे वागल पाहिजे.

पूर्वीच्या युगामधे काय अशा गोष्टी घडत नव्हत्या काय? रामावताराच्या वेळेलाच कैकेयी होती ना? आपल्या मुलाला राज्य पाहिजे आणि या मुलांनी चौदा वर्षे वनामधे गेलं पाहिजे, हा वर तिनं मागून घेतला की नाही, हट्टाने पाठवलं की नाही मुलाला, चौदा वर्षे वनामधे ! स्वतःच्या मुलाला राज्य मिळावं ही इच्छा कोणचीही आई करू शकते. हल्ली असलेल्या आया म्हणा किंवा पूर्वी सुद्धा, आईनं मुलाला राज्य मिळावं अशी इच्छा कांही वाईट नाही. तो वर मागितला तिने. पण रामाने चौदा वर्षे वनात जायला पाहिजे कशाकरता मागितल? नको, त्याच्याबद्दल प्रेम नाहीये. ही घटना पुर्वीच्या युगातच, त्रेतायुगातच घडली आहे की, म्हणजे आत्ताच काय असा स्वार्थ आहे काय? पुर्वीही स्वार्थ आहे. मन हे काय आत्ता कलियुगामधेच आहे. पुर्वीच्या युगामध्ये मन नाही काय? मन असलं की त्याच्यामधे सात्त्विक, राजस, तामस सगळे प्रकार आहेत. कोणच आणखी सात्त्विक वृत्ती वाढवायच्या. सात्त्विक आणखी संस्कार वाढवायच्या, सात्त्विक आणखी संस्कार वाढवायचे राजस, तामस संस्कार कमी करायचे हा प्रयत्न शास्त्रानी, महात्म्यांनी करायला सांगितलेला आहे. दुसरं काय करायचं? ते मन आपलं सुसंस्कृत बनवल्यानंतर कांहीही आणखी अशक्य नाहीये. सर्वही आणखी सुख प्राप्त होत. अशा रीतीनं आता आणखी एक चरित्र सांगतायत.

ती सावित्री आणि तिचा पती, आणखी आई-बाप वगैरे त्यांचे आप्तेष्ट मंडळी, तिथंच येऊन राहिली, गाणगापूर क्षेत्रामधे राहिलेली आहेत. रोज महाराजांच्या जवळ जाऊन बसावं, बोलावं, विचारावं. काय भाग्य होतं तिचं. आणि ती भाग्याला उतरलेली आहे. खरोखर उत्तम भाग्य आहे. महाराजांनी सुद्धा आणखी तिची प्रशंसा केली, महाराजांनी तिची काळजी घेतली. अशी आणखी उत्तम भक्त ही होती, आणखी कर्मनिष्ठही होती. एके दिवशी तिनं विचारलं, महाराज, तुमच्या पासून मला कांही तरी मंत्रोपदेश करा तुम्ही मला. तुम्ही मला मंत्र दिला म्हणजे मी जप करीत जाईन. आणखी कांही उद्धार होईल. आता ही स्त्री, पतीची सेवा करणारी, पतिव्रता, पतीची सेवा हेच मुख्य कर्तव्य आपलं आहे, अशी आणखी एकनिष्ठ वृत्तीची असताना, मंत्रग्रहण करावा आपण अशी इच्छा हिला कां उत्पन्न झाली? हा एक मोठा प्रश्न आहे, विचारणीय प्रश्न. महाराजांनी मुद्दाम त्या दृष्टीनेच सांगितलं, तुम्हाला मंत्र नाहीये म्हणाले.

स्त्रियांना मंत्र नाही, याचा अर्थ स्त्रियांना द्यायचा नाही असा नाही. त्यांची जी एकनिष्ठ वृत्ती आहे ती एकनिष्ठ वृत्ती यत्किंचितही बदलू नये म्हणून शास्त्राने दुसरं कांही साधन त्यांना सांगितलंय. निषेध केलेला आहे. मंत्रजप काय, कोणीही केला तरी होऊ शकेल की, परंतु, स्त्रियांची एकनिष्ठा ही वाढीला लागली पाहिजे. कायदे किंवा काय असतील ते त्या, त्यांच्या वृत्तीला अनुसरून, त्यांना कोणतं शिक्षण द्यायचं, काय शिक्षण द्यायचं, त्यांच्या बुद्धीला कोणच्या शिक्षणामधे त्यांची आणखी बुद्धी चांगली राहू शकेल हा सगळा विचार केला पाहिजे ना? कां स्त्री आणि पुरूष सगळ्यांना एकत्र शिक्षण द्यायचं?

एका ठिकाणी आहे, ही पुण्याला घडलेली गोष्ट आहे, ही आता एकंदर सहअध्ययन, सगळ्याबरोबरीने सगळया मुले-मुली सगळ्यांना बरोबर अभ्यास करायचा, सगळ्यांनी एका ठिकाणी रहायचं, काय झालं असेल, काय होतंय सगळ्यांना माहिती आहे. स्वयंवर प्रत्येक ठिकाणी चाललेलं आहे, कांही कोणाच कांही नाही, कांही नाही. मग म्हणे काही लोकांना, विचारी लोकांना इच्छा उत्पन्न झाली. की आपण स्त्रियांचे महाविद्यालय काढावे. निराळं काढू मुलींचं आणि मुलांचं निराळं काढू. हे नंतर डोक्यामधे विचार आले. त्या मुलीने स्वच्छ सांगितलं, आम्ही तुम्ही मुलींकरिता केलेल्या कॉलेजमधे आम्ही येणार नाही. अगोदर तुम्ही सवय लावून ठेवलेली आहे. असाच अभ्यास झाला पाहिजे असा कायदा करून टाकला. आणि आता नवीन कायदा बदलला तर तो कोण मान्य करणार आहे? अशी स्थिती होऊन जाईल. म्हणून स्वतःच्या बुद्धीनं कांही कार्य करायचं नाही, भगवान अर्जुनाला बजावतायत. **'शास्त्रं प्रमाणं ते'.** शास्त्रामधे सगळे विचार आहेत. तिकडे बुद्धी तुम्ही चालवा. हे योग्य कां अयोग्य आहे, हे योग्य कसं आहे, हे आपल्या बुद्धीनं तुम्ही तपासून घ्या आणि त्याप्रमाणे वागा. राजनीती केवढं मोठं शास्त्र आहे भारतामधे. चाणक्यासारखे मोठे-मोठे शास्त्रज्ञ होऊन गेलेले आहेत. कोणी कसं वागावं, काय वागावं, कोणाचे धर्म कसे आहेत, शत्रुपक्ष कसा असावा, शत्रुपक्षाचा विचार किती करावा, सगळं त्यांनी लिहून ठेवलेलं आहे ना ! त्याचा अभ्यास कोण करतयं? अभ्यास कांही करायची जरूरीच नाही सध्या. केवळ मतांनी आणखी सत्ता प्राप्त झाली की आपण राहू शकतो त्या सत्तेवरती. कुठला अभ्यास आहे, कुठलं ज्ञान, ज्ञानाला महत्त्व नाहीच राहिलेलं.

तेव्हा त्या स्त्रीनं आणखी मांडलं, आपली इच्छा व्यक्त केली की, महाराज, मला मंत्र द्या ना ! मंत्र सांगा आपण, आपल्यासारख्या सिद्ध पुरूषांनी जर मंत्र सांगितला तर चांगलं होईल. त्यांनी सांगितलं, महाराजांनी, की स्त्रियांना म्हणाले मंत्र सांगता येत नाही. आता इथे बुद्धिभेद होण्याचा संभव आहे. चिकित्सावादी सगळं जग सध्या झालेलं आहे. स्त्रियांना मंत्र द्यायचा नाही. स्त्रिया म्हणणार, हा पक्षपात आहे. पुरूषांना मंत्र देतात आणि स्त्रियांना देत नाहीत. त्यातही प्रकार आहेत पुष्कळ. मंत्रशास्त्रकारांनी निरनिराळ्या प्रकारचे अपवाद वगैरे

करून ठेवलेले आहेत, संतांनी सुद्धा सांगून ठेवलेलं आहे. नामसंकीर्तन हे सर्वांना अधिकार वगैरे आहे म्हणाले. तो प्रकार वेगळा आहे. **परंतु मुख्य शास्त्रसिद्धांत महाराजांनी सांगितला आणि त्या स्त्रीला मुद्दाम सांगितला. ती स्त्री इतकी एकनिष्ठ होती आपल्या पतीशी, की पतीची सेवा करणं हा मुख्य आपला धर्म आहे. मंत्र नको. तंत्र नको, देवाची पूजा, कांही नाही. कोणीकडे लक्ष नाही. हा खरा धर्म आहे. हा धर्म तिचा आणखी कायम राहिला पाहिजे. त्या उद्देशाने तिला महाराजांनी उपदेश केलेला आहे की मंत्र देता येणार नाही तुला. म्हणून कथा सांगितली आहे.**

कोणाला कसा उपदेश करायचा, काय करायचा हे सगळं समजून असलं पाहिजे ना. त्यांनी सांगितलं की शुक्राचार्य, दैत्यांचे गुरू होते. त्यांच्याजवळ एक सिद्धमंत्र होता. संजीवनी विद्या ! मेलेल्या दैत्यांना सुद्धा त्यांनी पुन्हा जिवंत करावं, त्यामुळे दैत्यांचा सुद्धा विश्वास त्या गुरूमहाराजांच्यावरती होता. त्यांचा फायदा होता ना? मृत्यू आला तरी हे आमचे गुरू आम्हाला जिवंत करतात, मग त्यांच्या पाया पडायला किंवा त्यांची सेवा करायला काय हरकत आहे? फायदा होता म्हणून शुक्राचार्यांना मान होता. तशी कांही जर विद्या नसती त्यांच्याजवळ तर दैत्यांनी मानलं असतं की नाही कुणाला ठाऊक? ती मंत्रसिद्धी त्यांना होती. देवांच्या जवळ तो मंत्र नाहीये. काय कोणाजवळ कशी विद्या असेल, कोणी कसा अभ्यास केला असेल, तपश्चर्या केलेली असेल, कोणी काय सामर्थ्य मिळविलेलं असेल, बहुरत्ना वसुंधरा, अनेक लोक जगामधे आहेत. एका पेक्षा एक अधिक आणखी श्रेष्ठ असे दिसतात आपल्याला.

तेव्हा देवदैत्यांचं युद्ध व्हायचं. देवांचाही नाश व्हायचा, दैत्यांचा ही नाश व्हायचा. दैत्य मंडळींना पुन्हा या शुक्राचार्यांनी जिवंत करायचं, पुन्हा त्यांनी युद्धाकरिता यायचं. काय म्हणाले, देवांना चिंता उत्पन्न झाली आणि बृहस्पतीला त्यांनी सांगितलं, महाराज, आपण देवगुरू आहात, बुद्धिमान आहात, कांहीतरी उपाय काढा आता. शुक्राचार्यांच्या जवळची जी ही संजीवनी विद्या आहे ती आमच्याकडे नाही आहे. आमचा पक्ष दुर्बल झालेला आहे त्यामुळे ! मग त्या देवगुरू बृहस्पतींनी, आपल्या मुलाला म्हणजे, कचाला सांगितलं, तू म्हणाले, शुक्राचार्यांच्या आश्रमामधे जाऊन रहा. एक ब्राह्मणकुमार असं आणखी रूप घेऊन रहा. मी विद्या शिकण्याकरिता आलोय म्हणून सांग. शुक्राचार्य जरी दैत्यगुरू होते, ज्ञानी होते, कोणाला मृत्यू आलेला आहे हे त्यांना कळत होतं आणि जिवंत करत, कळल्याशिवाय जिवंत काय करणार? रोग कोणता झालेला आहे, ज्ञान झाल्याशिवाय औषध काय देणार तू, म्हणून ज्ञानही पक्कं पाहिजे आणि योजनाशक्तीही उत्तम पाहिजे. तेव्हा त्यांच्या जवळ तू जाऊन रहा म्हणाले. धोका आहे, सगळे बाजूला दैत्य आहेत, त्यांचे हेर वगैरे असणार, ते तुला त्रास देणार, हे सगळं गृहीत धरून तू जा. पण विद्या तेवढी, तो मंत्र तेवढा मिळवून ये.

आणि तोही कच, मोठया धैर्यानी, विद्या मिळाली पाहिजे, संजीवनी विद्या आपल्याला मिळावी, हीच इच्छा धारण करून शत्रुच्या, शत्रुपक्षामधे जाऊन तो राहिलेला आहे. शुक्राचार्यांच्या जवळ आला, नमस्कार केला, महाराज, मी एक ब्राह्मणकुमार आहे, आपणाजवळ विद्या शिकण्याकरिता आलेलो आहे. त्यांनी कांही त्याला ओळखलं नसेल काय? आपल्या ह्या शत्रुपक्षाचा आहे. पण ते कांही बोलत नाहीत. व्यवहारात तुमचं तुम्ही पाहून घ्या. दैत्यांना त्यांनी असलं सहाय्य केलं नाही. ह्या राजकारणात ते पडले नाहीत. फक्त त्यांच्या आश्रयाला रहायचंय. त्यांना मृत्यू आला तर जिवंत करायला, आपल्या विद्येचा तेवढा उपयोग करायचा. हा कोण आहे लगेच त्यांनी कांही सांगितलं नाही. रहा म्हणाले बाबा, कांही हरकत नाही, शिकायला रहा. पुष्कळ विद्यार्थी आहेत, तूही राहा. शुक्राचार्यांची कन्या देवयानी, तिची आई कांही जिवंत नव्हती, आई गेली होती, त्यावेळेपासून शुक्राचार्यांचं तिच्याकडे जास्ती लक्ष होतं. प्रेम जास्ती होतं. एकुलती एक मुलगी आहे. ती देवयानी म्हणाली, पिताजी या विद्यार्थ्याला तुमच्याजवळ तुम्ही ठेऊन घ्या. त्याला विद्या द्या म्हणाली, ज्ञान द्या त्यांना. कारण तो अत्यंत सुंदर होता. कच, तीही आणखी देवयानी, तिच्या मनामधे मोह उत्पन्न झाला. हा जर आपल्या पित्याजवळ राहिला तर पुढंमागं प्रसंगाने आपण याच्याबरोबरच विवाह करून पित्याजवळच आपल्याला रहायला मिळेल, अशी कांही तिची इच्छा होती. आता देवयानीचीच शिफारस झालेली आहे. मग आता कोण पाहिजे, शुक्राचार्य कांही नाही म्हणणार नाहीत.

कच अभ्यास करण्याकरिता राहिलेला आहे. विद्यार्थी पढतायेत, शिकतायेत. बाकीचे पुष्कळ कितीतरी शास्त्र होती, शुक्राचार्य हे पूर्ण ज्ञानी होते. आणखी अभ्यास चाललेला आहे. पण संजीवनी मंत्र कसा मिळायचा? त्याकरता तो आलेला आहे. आता हा कच आल्यापासून त्या दैत्यांची दृष्टी त्याच्यावरती होती. आणि त्यांनी, हा म्हणाले शत्रुपक्षाचा, देवपक्षाचा कोणीतरी मनुष्य आपल्या गुरुजींच्या जवळ आलेला आहे आणि त्यांची विद्या घेऊन हा जाणार आहे. याला जिवंत ठेऊन उपयोग नाही. ठरलं त्यांचं. आणि एके दिवशी रानामधे रोज जावं, समिधा काय, फुलं काय, सगळं आणावं त्यांनी, दर्भ वगैरे, त्याकरिता रानात जाऊन यायचं. त्याला त्या दैत्यांनी रानामधे गाठलं तिथं आणि त्याला ठार मारलेलं आहे. संध्याकाळ झाली. कच आला नाही, देवयानी गेली आपल्या पिताजींच्या जवळ. सांगितलं, पिताजी, अजून कच कसा आला नाही? पहा बरं कुठं आहे तो. त्यांनी पाहिलं ध्यानानी, मृत्यू आलेला आहे. बराय. मंत्र सिद्धच आहे. त्या मंत्रप्रभावाने तो लगेच जिवंत झाला आणि आलेला आहे. परत आश्रमामधे येऊन पोचलेला आहे. दैत्यांनी हे पाहिलं, की मंत्राने हा पुन्हा जिवंत झाला म्हणाले. बराय. पुढे आता यापेक्षा जास्ती आपण हे करू. मंत्राची शक्ती जास्ती आहे का आपली शक्ती जास्ती आहे. हट्टाला पेटले ते. पुन्हा एकदा रानामधे गेल्यानंतर त्याला त्यांनी

ठार मारलं, त्याचे तुकडे तुकडे केले, दाही दिशांना तुकडे सगळे टाकून दिलेले आहेत शरीराचे, आणि आले परत. आता काय होणार ? आता कसलं शरीर म्हणाले जिवंत होणार ? तुकडे करून ते एका दिशेला पडलेत काय? पुन्हा देवयानींनं आणखी सांगितलं, पिताजी अजून कसा आला नाही. बराय, येईल बाई. काही काळजी करू नकोस. पुन्हा मंत्र जप केलेला आहे आणि तो मंत्र सामर्थ्य म्हणजे, इतकं विलक्षण आहे, दहा दिशेला टाकलेले सगळे तुकडे एकत्र आणखी जमा झाले, सगळं शरीर पुन्हा तयार झालं. जसाच्या तसा कच पुन्हा आणि आश्रमामधे येऊन पोहचलेला आहे.

आता आणखी परीक्षा पाहयची म्हणाले, परीक्षा याचा अर्थ आपला पक्ष बळकट झाला पाहिजे ना? राजनीतीच्या दृष्टीने हे कांही पाप वगैरे कांही ठरत नाही. असंही आहे.

सत्यानृता च परुषा प्रियवादिनी च ।
हिंस्रा दयालुरपि चार्थपरा वदान्या ।
नित्यव्यया प्रचुरनित्यधनागमा च ।
वाराङ्गनेव नृपनीतिरनेकरूपा ॥ (नीतिशतक–भर्तृहरिकृत श्लोक ७०)

कसंही करा, खोटे बोलायला लागलं तरी बोलायचं, राजनीतीला सगळं क्षम्य आहे. आपल्या पक्षाचं वर्चस्व असलं पाहिजे. देवांचा पक्ष दुर्बल झाला पाहिजे. या रीतीनं त्यांचे प्रयत्न चालू आहेत. कच कोण आहे, काय आहे, कांही कल्पना नाही. शत्रुपक्षाचा आहे, त्याला जिवंत ठेवायचा नाही, मंत्रांचं सामर्थ्य काय बघू या म्हणाले आपणही. शुक्राचार्य तरी काय करणार? शेवटी तिसऱ्या वेळेला त्यांनी कचाला मारलं, जाळलं आणि ती जी रक्षा आहे राख ती कशात तरी घालून मधामध्ये किंवा मद्यामध्ये म्हणा, ती शुक्राचार्यांना पाजली. इतकी व्यवस्था केली. पुनः आणखी ती देवयानी आली कुठाय, कच कुठाय?

त्यांनी सगळीकडे आणखी आपल्या ध्यानदृष्टीनं पाहिलं आहे. संयम जो सांगितलेला आहे, ध्यान, साधना, समाधि एकाच वस्तुवर झाल्यावर त्या वस्तुचा साक्षात्कार होतो म्हणतात. ध्यानाचा परिपाक म्हणजे समाधि. इतकी जर मनाची अवस्था एकत्र करता आल्या, तर, ती वस्तु कुठ आहे, कोणच्या स्थितीत आहे, त्याचा साक्षात्कार होतो. सर्वत्र चौकशी केली, कुठं नाही म्हणाले बाई. कच कुठ दिसत नाही. पुन्हा प्रयत्न करताहेत. ध्यानस्थ बसलेत. आणि स्वत:च्या शरीरामध्ये कच आहे, हे त्यांना समजून आलेलं आहे. त्यांनी सांगितल, ''देवयानी– आता कच कांही येण शक्य नाहीये. ह्या दैत्यांनी म्हणजे हे इतके दुर्जन आहेत, की त्या कचाला त्यांनी माझ्या शरीरात यानी आणून ठेवल आहे. त्याला कसं काढायच. त्याला जिवंत करायच म्हणजे मला मृत्यु येणार आहे म्हणाले.'' ती म्हणाली, **तुम्ही**

सगळ्यांना, मेलेल्यांना जिवंत करता, मग तुम्हाला मृत्यु कसा येईल म्हणाले. होय म्हणाले. माझ्याजवळ जो मंत्र आहे, त्या मंत्राचे सामर्थ्य आहे. त्या मंत्राने कच जिवंत झाला तर माझे पोट फाडून येणार. मला मृत्यू आल्यानंतर मला कोण उठवणार म्हणाले. देवयानी म्हणाली मला सांगा की तो मंत्र. तुम्ही म्हणला काय, मी म्हटला म्हणून काय हरकत आहे. नाही म्हणाले, तुला सांगता येणार नाही. सांगायच्या वेळेस कचालाही तो ऐकायला मिळणार. तुलाही ऐकायला मिळणार आणि मला तर आहेच आहे, मीच सांगणार आहे. तीन-सहा कर्णांनी जर तो मंत्र ऐकला गेला तर त्या मंत्राचं सामर्थ्य संपलेलं आहे. त्याकरता, मंत्र आणखी जपणारे किंवा हे करणारे, ते फार जपत असतात. सर्पदंश झाल्यानंतर सुद्धा कांही मंत्र आहेत, जाणणारे लोक आणि लोक अभ्यास केलेले जप करणारे आहेत. लगेच आणखी मंत्र उच्चारण करून त्याचा सर्पदंश कमी होणं, विष कमी करणं, पण त्यांचे नियम असतात. वाडीला, नरसोबाच्या वाडीला एक असेच मंत्रज्ञ होते, सर्पदंश झाल्यानंतर मंत्रप्रयोग करणारे. जेवताना इतक्या गडबडीने जेवत होते आणि जेवता जेवता शेवटच्या वेळेला सहज आमच्या मुखातून आणि कांही नाग म्हणा किंवा अशा कांही गोष्टी निघाल्या, तो शब्द ऐकल्या बरोबर ते मधूनच पात्र सोडून उठायचे. कांहो म्हणाले, ते म्हणाले, हा शब्द आम्हाला ऐकायचा नाही. हा शब्द ऐकला की आम्ही जेवण बंद करतो त्या दिवशी जेवण नाही. म्हणजे इतक्या रीतीनं, कष्टाने सगळं मंत्र जपावा लागतो आणि तो सांभाळावा लागतो ना? नुसता मंत्र जपला म्हणजे सिद्धी होते असं नाही. ती देवयानी म्हणते, काय त्यांच्यात काय, तुम्ही म्हटला काय मी म्हटला काय? नाही. असं नाही, म्हणाले, बाई, त्याचे पुष्कळ नियम आहेत. तुम्हाला तर मंत्र सांगायचा नाहीच आहे, पण जरी आता तू घेतलास, हट्टाने, तरी त्याचा उपयोग कांही होणार नाही.

ती म्हणाली, माझ्या कांही इच्छा तुम्ही पूर्णच करत नाही. माझी आई असती तर काय तिनं असं करू दिलं नसतं तुम्हाला, असं बोलायला लागली. करा, तुमचा तुम्ही मंत्र करा, तुम्ही रहा, मी कांही जिवंत रहात नाही वगैरे. बोलायला लागली. हट्टी होती थोडी. बरं बाई म्हणाले, काय आता प्रारब्ध आहे. जाण्याची, मंत्र जाण्याची वेळ आलेली आहे. तो कच होताच. त्याने तीन वेळा प्राणही दिलेले आहेत. तो मंत्र मिळण्याकरिता. म्हणून त्या देवयानीला मंत्र त्यांनी सांगितला. एखाद्या वेळेला त्याचा प्रयोग सिद्ध होईल पण तो कायमचा टिकणार नाही आणि कचाला जिवंत करण्याकरिता आणखी मंत्रप्रयोग केल्याबरोबर, कच जिवंत झालेला आहे. तो मंत्र त्याला ऐकायला मिळाला, त्यांच्याच मुखातून त्याचा उच्चार झाला. त्यांच्या त्या शरीरातच तो होता. तो मंत्र त्याला अवगत झालेला आहे. बाहेर आला. शुक्राचार्यांचाही देह, देहावसान झालं. देवयानीनं मंत्र प्रयोग करून उठवलं त्यांना. तेवढ्यापुरती सिद्धी मिळाली तिला. आणखी कचाने प्रार्थना केली गुरुमहाराज, मला आता विद्या मिळाली म्हणाला. मी आता आपल्या

स्थानाकडे जातो. जा बाबा, म्हणाले. म्हणजे त्यांना असं वाटलं नाही, आपल्याला अशा संकटात टाकून हाही मेला, मलाही मारलं आणि मंत्र घेऊन चालला पुन्हा आणि माझा मंत्र फुकट गेला. संपलं, कांही नाही, पण त्या बद्दल कांहीही मनाला खेद नाही. सिद्ध महात्मे, काय आलं काय, गेलं काय, दैत्यांचं नशीब म्हणाले. त्यांचं आत्तापर्यंत नशीब होतं, बरं होतं. त्यांना उपयोग झाला. आता नाहीये त्यांचं नशीब. जायला सांगितलं. कच निघाल्यानंतर देवयानीनं विनंती केली की आता तुम्ही जाऊ नका म्हणाली. तुम्हाला मी जिवंत केलंय तीन वेळा. माझा स्वीकार करा, माझ्याबरोबर तुमचा विवाह व्हावा अशी माझी इच्छा आहे. कचानी सांगितलं, बाई, गुरुकन्येबरोबर आणखी विवाह करता येत नाही म्हणाले. गुरुकन्या म्हणजे बहीण आहे, म्हणाले. ब्रह्मचर्य वगैरे ही सगळी साधनं असली पाहिजेत. त्याशिवाय मंत्र हा सिद्ध होऊ शकत नाही, राहू शकत नाहीये. नुसतं मंत्र म्हणजे अक्षरं नाहीयेत. पुस्तकातली अक्षरं वाचून आणखी जप केल्यानंतर फळ मिळणार नाहीये. तो कसा यथाविधी आला पहिजे. तो सांभाळायचा म्हणजे ब्रह्मचर्यादिक सगळी साधनं पाहिजेत. कुणाचाही आणखी उपमर्द करायचा नाही, हिंसा करायची नाहीये. ही सगळी व्रत सांभाळली पाहिजेत.

तेव्हा कचाने सांगितलं, तू देवयानी, तू आमच्या गुरुमहाराजांची कन्या म्हणजे माझी भगिनी नाहीस कां? म्हणाले. तुझ्याबरोबर विवाह केला म्हणजे? आणि मोठी मोठी ऋषी मंडळी काय म्हणतील मला? आणि दुसरी गोष्ट, तू मला तीन वेळा जिवंत केलंयस म्हणजे माझी माता झालीस म्हणाले. तुझ्याबरोबर मी विवाह कसा करु? नाही, शक्य नाही. तिनं शाप दिला, तुझी विद्या तुला मिळणार नाही. नको म्हणाला, मला मिळाली नाही तरी तुझ्या बापाजवळची विद्या गेलेली आहे. त्यालाही नाही, माझं काम झालंय म्हणाला आणि तुला सुद्धा ब्राह्मण पती मिळणार नाही. सांगून निघून गेला तो कच. मी शास्त्राप्रमाणे वागायला गेलो, तू जर आत्ताच लग्न होण्याच्यापूर्वी इतकी हट्टी दिसतेय तर पुढं तुझ्याबरोबर काय संसार करायचा? हा त्याने मनातल्या मनात विचार केला असेल. प्रत्यक्ष कांही बोलून दाखवलं नाही. गुरू महाराजांच्या समोर तो कशाला बोलेल? निघून गेलेला आहे कच. कार्य सिद्धी झालेली आहे देवांची. शुक्राचार्यांचा मंत्र संपलेला आहे.

हे गुरुमहाराजांनी त्या सावित्रीला सांगितलं. असा प्रसंग म्हणाले पूर्वी होऊन गेलेला आहे. म्हणून तुम्हाला मंत्र नाहीये. उद्देश त्यात असा आहे की **मंत्रसिद्धी जर झाली आणि त्या मंत्रप्रभावाने जर कांही चमत्कार व्हायला लागले, तर त्याचा अभिमान त्या स्त्रीच्या अंतःकरणामधे उत्पन्न होईल. पतीची अवज्ञा सुद्धा होण्याचा संभव आहे.** कारण असं होतंय ना, कांही स्त्रियाही पुष्कळशी कामं करतात, कांही करतात त्यांनाही पैसे मिळतात, आणखी त्या पैशातून त्या देवधर्म करतात, दानधर्म करतात. तर पुण्याला एक अधिकारी, चांगल्या धर्मशील,

पतिव्रता चांगल्या होत्या. त्यांनाही पैसा मिळायचा, त्यांच्या त्यांच्या कामामुळे. त्यांनी दानधर्म करायचा. एकदा त्यांच्या पतीने, 'अग इतके इतके पैसे तू त्याला दिले?' विचारल्यावर त्यांनी सांगितलं मी स्वतः कमवून दिलेत म्हणाले. तुम्ही कशाला मला बोलता? म्हणजे जरी **गोष्ट सहज झाली तरी अशी अवज्ञा करण्याची प्रवृत्ती होते की नाही?** मी मिळविलेलं आहे, मी दान करणार. **तेव्हा ही जी स्त्रियांची नैसर्गिक सहनशीलता आहे, नैसर्गिक विनय त्यांच्या ठिकाणी आहे, त्या विनयाची अभिवृद्धी होण्याकरिता शास्त्रीय आणखी व्यावहारिक सगळे नियम त्यांच्याकरता आणखी केले गेलेले आहेत.** त्यांच्या शिक्षणाकरता विद्यापीठाची योजना नाही..

स्त्रीणामशिक्षितपटुत्वममानुषीषु सन्दृश्यते किमुत या: प्रतिबोधवत्य: ।

प्रागन्तरिक्षगमनात्स्वमपत्यजातमन्यैर्द्विजैः परभृताः खलु पोषयन्ति ॥

(अभिज्ञानशाकुंतल ५ वा अंक, श्लोक २२)

द्रौपदी कांही कुणाच्या विद्यापीठात जाऊन बी.ए., एम.ए. झालेली नव्हती. पण संपूर्ण आणखी राजकारण तिच्या हातामधे होते. धर्मराज आणखी सभेमधे बसून किती विद्यार्थी आलेले आहेत. किती विद्वान लोक आलेले आहेत, या जेवायला महाराज आमच्या वाड्यात, ऐशी ऐशी हजार लोक त्यांच्या आश्रयाला आणखी विद्यार्थी किंवा साधक लोक राहात होते, ऋषिमंडळीही होती, पण राजसभेमधे किती लोकांना सांगितलंय जेवायला याची नोंद लगेच त्या द्रौपदीला मिळायची. तिचे नोकर तिथे असायचे, आज किती लोकांना, अतिथीना बोलावलेलं आहे जेवायला, हे लगेच कळायचं. स्वयंपाक तयार आहे. नाहीतर आयत्या वेळेला, दुपारच्या वेळेला ही सगळी मंडळी आल्यानंतर काय करायचं तिनं? तुम्ही अगोदर कां सांगितलं नाही ? काय भांडायच काय तीनं ? अगोदर सूचना कां तुमची आली नाही? थांबा, आता बसायला सांगा त्यांना. स्वयंपाक झाल्यानंतर वाढता येईल. हे काय असं बोलायचं? अगोदर इंगित जाणून, काय आहे पतीचं मनोगत ते जाणून, त्याप्रमाणे वागणं ही जी काही लीनवृत्ती आहे, ह्याला अनुसरून अभ्यास झाला पाहिजे. स्त्रियांची ती वृत्ती, ते गुण वाढवलं गेलं पाहिजे. ते गुण टिकले गेले पाहिजेत. याकरिता या सगळ्या योजना आहेत. स्वयंपाक करायला सांगितला नुसता असं नाहीये. बुद्धिभेद करतात सगळे लोक. इंग्रजांनी आणि त्याच्या आधीचे लोक बुद्धिवादी, स्त्रियांना नुसतं चूल आणि मूल ठेवलेलं आहे, बाकीचं कांही नाही. पण त्याचं कारण आहे. अन्न जे आहे. हे अन्न स्त्रियांनी तयार कां करावं, तर धर्माचरण जे आहे, घरातला कुलधर्म, कुलाचार ते सगळ्या धर्माचं ज्ञान त्यांना असलं पाहिजे, ते सगळे कुलधर्म कुलाचार त्यांनी करवून घेतले पाहिजेत. करवून घेतायत त्या. स्मृतीकारांनी मुद्दाम सांगितलय.

आणि पाक जो करायला सांगितलाय, स्वयंपाक, अन्नमय, मन हे जे आहे, उपनिषदामधे वर्णन केलेलं आहे, **अन्नमयं मनः !** अन्नातला सात्त्विक भाग जो आहे, शुद्ध आणखी सात्त्विक

अन्नाचा रस, त्या रसाने मन तयार होतं आहे. मन हे अन्नापासून तयार होतं. म्हणून सात्त्विक अन्न पाहिजे, चांगलं पवित्र अन्न पाहिजे, देवाला अर्पण केलेलं अन्न पाहिजे ते ह्याकरता आहे.

आता ते अन्नच निर्माण करण्याची जबाबदारी स्त्रियांच्यावर टाकल्यानंतर, त्या स्त्रिया सुद्धा पवित्र मनाने आपल्या पतीचं, आपल्या मुलांचं, आपल्या आप्तबांधवांचं मन त्यांच्या अन्नाने तयार होत आहे. ही केवढी मोठी जबाबदारी आहे. चांगले, सात्त्विक पती राहिले पाहिजेत, मुलगा चांगला सात्त्विक बनला पाहिजे, शुद्ध संस्काराचा, राष्ट्राला उपयोगी पडणारा, धैर्यशाली बनला पाहिजे. इतके मनातले गुण तयार करण्याकरता ते मूळ अन्न तयार झालं पाहिजे. ते काय बाजारातल्या हॉटेलमधला डबा आणून त्यातलं अन्न त्यांनी खावं काय ? ते काय पवित्र असतं? त्याने मन तयार होईल कां? हा विचार कुणी करीत नाही. स्वयंपाक करायचं काम बायकांवर ठेवलेलं आहे, पुरूषांनी तेवढं बाहेर ऑफिसमध्ये जावं. मग बदला तुम्ही, तुम्ही करा स्वयंपाक, बायकांना जाऊ दे ऑफीसमधे. करू शकता कां तुम्ही स्वयंपाक? म्हणजे ही त्यांची सहनशीलता आहे. त्याचप्रमाणे त्यांच्यावरती पवित्र मनं तयार करण्याची, म्हणजे **संबंध राष्ट्र स्त्रियांच्यावरती आधारित आहे. मनामधेच जर अशा प्रकारची आणखी सात्त्विक वृत्ती त्यांच्यामुळे जर राहिली, तर राष्ट्राचं कल्याण होणार आहे.** पण हे कोणी विचारत नाहीये. बुद्धिभेद, जिकडे-तिकडे बुद्धिभेद चाललेला आहे. आणखी धर्म सगळा गळून गेलेला आहे. धर्माचा ऱ्हास हा सगळा होतो आहे. अशा रीतीनं हे चाललेलं आहे. महाराजांनी त्याकरता सावित्रीला समजावून सांगितलेलं आहे. मग एखादं व्रत तरी सांगा, कोणाची पूजा करू ? बरं, कर म्हणाले, कांही हरकत नाही. मग सोमवार व्रत तिला सांगितलेलं आहे त्यांनी. भगवान शंकरांची सेवा करणारं पुष्कळ आणखी, शनिप्रदोष व्रत काय, सोमवार व्रत वगैरे काय, हे सगळं आणखी, शिवव्रत महाराजांच्या उपदेशामध्ये बरीच व्रतं आलेली आहेत. 'अनंत' व्रत एक त्यांनी सांगितलं. विष्णुव्रत वगैरे. त्यात कांही शिवव्रतच पाहिजे असं नाहीये. सोमवार व्रत करीत जा म्हणाले. आणखी त्याकरिता एक कथा म्हणजे सीमंतीनीचं आख्यान त्यांनी सांगितलेलं आहे.

शिवलीलामृतामध्येही आहे ही कथा सगळी. महाराजांनी तीच सांगितली आहे. **मूळ पुराणामधे सगळ्या कथा आलेल्या आहेत. वेदव्यास मुनींनी सगळी व्रतं, सगळी एकंदर साधनं मार्ग, सगळी सांगितलीत. कोणी कोणी ही साधना केली, ह्या सगळ्या कथा, आख्यानकं सांगून सगळ्या साधनांचा उपदेश केलेला आहे.** तर सीमंतीनीचं आख्यान आता महाराज सांगतायत. सोमवार व्रतं कस करायचं.

तो जो चित्रांगद राजा, मोठा चांगला धार्मिक होता आणि त्याला एक मुलगी झाली म्हणे. बरेच दिवसांनी एक मुलगी झाली. पुष्कळ आणखी विद्वान, ज्योतिषी मंडळी आली होती आणि त्यांनी सांगितलं ही मुलगी चांगली आहे. म्हणाले. अगदी पतीबरोबर, दहा हजार वर्षांपर्यंत राज्य

करणार आहे. चांगली सुखी होणारी आहे वगैरे वगैरे सगळं ज्योतिष सांगितलं, जातक सांगितलं. पण त्याही ज्योतिषामध्ये स्पष्ट कोणतं बोलायचं आणि स्पष्ट कोणतं बोलायचं नाही हा ही एक नियम आहे ना सांगणाऱ्याला. जरी आणखी आयुष्य कमी होत असलं, समजलं तरी ज्योतिषांनी सांगायचं नाही. वैद्यांना समजलेलं आहे नाडी पाहून दोन महिने हा जिवंत राहणार आहे, त्यांना समजतं सर्व नाडीवरून. ही नाडी किती दिवस चालणार आहे, हे सुद्धा त्यांना कळू शकतं. ते बौद्धिक शक्तीचं कार्य आहे. पण त्यांनी ते सांगायचं नाही. औषध द्यायचं, इलाज करू या म्हणायचं, त्याचा उत्साह वाढवायचा, त्याला निराश करायचं नाही. तेव्हा या मुलीच्या जातकामध्ये सुद्धा, आणि एक जातक असं होतं. कोणतं जातक त्यांनी सांगितलं, दहा हजार वर्ष राज्य करणार वगैरे वगैरे ज्योतिष सांगितलं. तोही एक भाग तिच्या याच्यात होता. पण **अगोदर एक भाग जो होता तो मात्र आपला बाकीच्या लोकांनी कांही बोलून दाखवला नाही.** एक स्पष्टवक्ता आणखी ज्योतिषी होता तो उठून उभा राहिला आणि राजेसाहेबांना त्याने सांगितलं, ही मुलगी, या मुलीला चौदाव्या वर्षी वैधव्य येणार आहे म्हणाला. हिच्या पतीला मृत्यू येणार आहे. स्पष्ट बोलून टाकलं आणि तो निघून गेला. त्याला दक्षिणा कोण देणार ? राहिलाच नाही तिथे. वाईट वाटलं सगळं. गेली ब्राह्मण मंडळी निघून. आणखी चिंताग्रस्त माता-पिता वगैरे सगळे झालेले आहेत.

सीमंतिनीचं आख्यान, या आख्यानामध्ये, प्रयत्नवाद आणखी दैववाद दोन्हीही आहेत. दैवही आपल्या जीवनामध्ये, प्रयत्नही पाहिजे आणि देवाचीही अनुकूलता आहे की नाही, याचाही विचार केला पाहिजे. केवळ दैववादही आहे. पण त्याचे अधिकारी फार मोठे असावे लागतात. मनाची स्थिरता पक्की ज्यांच्या झालेली आहे, अवधूत दत्तात्रेय यांनी हे दाखवलेलं आहे. अजगरांना गुरु केलं आहे.

मी म्हणाले स्वस्थ पडून राहातो, कांहीही इच्छा नाही, मिळालं, मिळालं खायला, कांही नाही, मानाने मिळालं, अपमानाने मिळालं, कांही लक्ष देत नाही.

ग्रासं सुमृष्टं विरसं महान्तं स्तोकमेव वा ।
यदृच्छयैवापतितं **ग्रसेदाजगरोऽक्रिय: ॥ (११.८.२ भागवत)**

तर या वृत्तीचा अभ्यास करून आणखी ते राहतात. परंतु त्यांचं केवल आपलं जे कर्म असेल पूर्वीचं, त्या कर्माप्रमाणे सुख किंवा दु:ख हे कर्मानीच मिळतं. प्रयत्नाची जरूर नाही. प्रल्हादजींनीही तेच सांगितलं.

सुखमैन्द्रियकं दैत्या देहयोगेन देहिनाम् ।
सर्वत्र लभ्यते दैवाद्यथा दु:खमयत्नत: ॥ (भा.७.६.३)

हा तर्कही त्यांनी मांडलेला आहे, अवधूतांनी. अजगर कांहीही काम करत नाही म्हणाले, प्रयत्न करत नाही, जवळ कोणी आला म्हणजे तेवढ्यापुरतं त्याला आहार मिळतो. त्याचप्रमाणे दैवावरती म्हणजे आपल्या पूर्वकर्मावरती विश्वास ठेवून, आणखी आपण स्वस्थ रहावं. जास्ती आणखी समाधानी रहावं. असमाधान करून घेऊ नये. **चित्ती असो द्यावे समाधान । तुकाराम महाराजही सांगतायत.** आणि दैव दैव याचा अर्थ तरी कर्मच आहे, प्रयत्नच आहे, **पूर्वजन्मामधे पूर्वी केलेलं जे कर्म आहे त्यालाच दैव असं म्हणतात. आत्ता केला जाणारा प्रयत्न क्रियमाण कर्म आहे. पूर्वी होऊन गेलेला जो प्रयत्न आहे त्याला दैव किंवा संचित किंवा प्रारब्ध असं म्हणतात.** म्हणजे ते आपलंच कर्म आहे, आपलाच प्रयत्न आहे पण नांव, मात्र दैव, प्रारब्धाचं दिल्यामुळे, दैववाद बरोबर नाही, प्रयत्न केला पाहिजे असं काहीतरी आपल्या बुद्धीला वाटतं.

तर वस्तुस्थिती अशी आहे, पूर्वीचं कर्म आपलं काय आहे, याचाही विचार केला पाहिजे. आत्ता काय करायला पाहिजे, कर्तव्य कोणतं आहे, त्याचाही विचार केला पाहिजे. दोन्हींचा समन्वय करून आणखी कार्य होत असतं. तेव्हा या दोन्हींचाही समन्वय सीमंतिनीच्या आख्यानामध्ये आहे. सातवं वर्ष तिला लागलेलं आहे आणि राजवाड्यामधे एकदा, याज्ञवल्क्यांची पत्नी, ज्ञानी अशा प्रकारची, ज्ञानसंपन्न, **मैत्रेयी** म्हणून आलेली आहे. याज्ञवल्क्यांनी आणखी संन्यासदीक्षा धारण करून बाहेर पडायचं ठरिवलं. त्यांना दोन स्त्रिया होत्या. कात्यायनी आणि मैत्रेयी. काय असेल ते घरात सगळी वाटणी दोघींना करून द्यायची आणि आपण जायचं. ती मैत्रेयी म्हणाली, महाराज, हे मला धन बिन घेऊन काय करायचं म्हणाली. जे मिळालेलं असताना, मला मी अमर्त्य होईन, माझा मृत्यू चुकला पाहिजे, **जन्म-मृत्यू चुकला पाहिजे** असं कांहीतरी मला द्या म्हणाली. या धनाने मला तसं होता येईल का, नाही म्हणाले. धनाने मृत्यू चुकण्याची आशा सुद्धा करणं शक्य नाही. धनही जाणार आणि तोही, घेणाराही जाणार. मग म्हणाली मला हे धन नको. हे सगळं या स्त्रीला तुमच्या त्या कात्यायनीला देऊन टाका. मला कांही पैसा नको. मला अमर्त्य व्हायचंय, मृत्यूतून आणखी बाहेर पडायचंय, इतकी उत्कंठा मनामधे आहे. नित्यानित्यविवेक पूर्ण आहे, वैराग्य आहे. तिला त्यांनी उपदेश केलेला आहे. अशी ज्ञानसंपन्न स्त्री ती होती. ती राजवाड्यामधे आलेली आहे.

ही सीमंतिनी सात वर्षाची झाली आणि लोकांच्या तोंडातून हिला कळलेलं आहे मुखातून, की आपल्याला चौदाव्या वर्षी, आणखी आपला पती जाणार आहे. तिनं जाऊन विनंती केली, आईसाहेब, असं माझं प्रारब्ध आहे म्हणाली. दैव माझं असं आहे. या दैवातून आणखी मुक्त होण्याकरिता, सौभाग्यसंपन्न मला होण्याकरता, कांही उपाय असेल तर सांगा म्हणाली. कांही हरकत नाही, ती ऋषिपत्नी ज्ञानसंपन्न होती. सर्व मार्गांच ज्ञान तिला होतं. सर्वज्ञ अशा प्रकारचे याज्ञवल्क्य महर्षि तिचे पती होते. त्यांच्यापासून तिला खरं ज्ञान मिळालेलं आहे. त्या मैत्रेयीनं

हिला सांगितलं, बाई, सीमंतिनी, की, तू शंकरांची उपासना कर. सोमवारव्रत करीत जा. उपोषण वगैरे करणं, सायंकाळी पूजा वगैरे करणं, आणखी अशी शंकरांची भक्ती तू केलीस, म्हणजे, त्यांच्या प्रसादाने तुझं हे संकट दूर होईल. आशीर्वादही दिला. उत्तम श्रद्धा उत्पन्न झाली, आपलं नशीब असं आहे, हेही डोळ्यापुढे आहे, भीतीही आहे. पण मैत्रेयीनं, या साक्षात् आणखी सर्वज्ञ अशा प्रकारच्या ब्रह्मज्ञानी स्त्रीनं आपल्याला हा मार्ग दाखिवलेला आहे, भगवान शंकर परमात्मा पूर्ण समर्थ आहेत, त्यामुळे हे जरी दैव असलं, तरीसुद्धा याचा परिहार होईल, हा ही विश्वास मनामधे आहे. त्याप्रमाणे आणखी व्रताचरण तिचं चाललेलं आहे.

झालं, विवाहाला योग्य झाल्यानंतर, राजानी विचार केला आता काय हिच्या नशिबात असेल तर नशीब कांही कोणी चुकवीत, कांही शक्यच नाही म्हणाले. एक चांगला, नलाचा आणखी नातू, पाहिला त्यांनी **चंद्रांगद.** ते सगळं वऱ्हाड आपल्या गांवी, राजधानीमध्ये बोलावल, विवाह उत्तम झालेला आहे आणि जावई वगैरे इथेच राहिला, बाकी सगळं वऱ्हाड निघून गेलं. आणि तो चंद्रांगद एकदा नदीमधे स्नान करण्याकरता, पोहण्याकरता गेलेला आहे. बरीच मित्र–मंडळी बरोबर आहेत आणि पोहता पोहता तो एकदम दिसेनासा झाला, बुडाला. बुडाला–बुडाला म्हणून सगळे लोक आणखी आरडाओरडा करू लागले, नावाडी आहे, पाणबुडे लोक आहेत. कुठे शोध घेणार, एवढा मोठा नदीचा प्रवाह, सापडणार कुठं? निराश झालेले आहेत.

सीमंतिनीला समजलं, तिच्या पित्याला समजले, तोही आणखी दुःख करतो आहे. नदीतीरावर सगळे आले आहेत. चंद्रांगदाचा पिताही आलेला आहे. तोही दुःख करतो आहे. माता–पिता, त्यांना कांही हे नाही. तो गेला आपल्या घरी, राजधानीमधे. त्याच्या आणखी शत्रूंनी, आप्तबांधवांनी त्याला तुरूंगामधे ठेवलेलं आहे आणि आपण राज्य ताब्यामधे घेतलं. तरी तिकडे त्याचं लक्ष नाही. पुत्रशोकांनी व्याकुळ झालेला आहे. सीमंतिनी अत्यंत शोक करू लागली. भगवान शंकरांची आराधना मला करायला सांगितलं मैत्रेयीनं, भगवान शंकरांनी असं कां केलं म्हणाली. वाटायचंच, मनाला वाईट वाटणार. ही कांही अश्रद्धा नाहीये. श्रद्धेनं आजपर्यंत इतकी उपासना झालेली आहे. एकदम अश्रद्धा कशी होणार ? पण जीवनामध्ये शोक हा जो आहे, हा विकार हा इतका विलक्षण आहे, की **शोक आणि मोह हे दोन संसाराचे कारण म्हणून सांगितलेले आहेत**. अर्जुनाला, **शोक आणि मोह झाले. त्यामुळे तो स्वधर्म त्याग करायला प्रवृत्त झाला.**

परधर्मं च भिक्षाजीवनादिकं कर्तुं प्रववृते ।

(भ.गी. शांकरभाष्य अ. २, १० व्या श्लोकावरील व त्यानंतरचे भाष्य)

स्वधर्म त्याग करणं आणि परधर्माचं आचरण करण्याला मनुष्य प्रवृत्त होतो ह्याला कारण म्हणजे शोक आणि मोह हे होत. त्यामुळे त्या बिचारीला, चौदाव्या वर्षाची मुलगी आहे, तिच्या मनावर परिणाम होणारच आहे. काय करावं? आता आपणच देहत्याग करावा. पाण्यामधे जर आपले पती गेले तर आपणही पाण्यामधे शरीर अर्पण करावं, म्हणून ती निघालेली आहे. त्या पित्याने तिला आवरण्याचा प्रयत्न केला. ब्राम्हण मंडळींनी सांगितलं, हिचा पती मेलेला आहे म्हणून कशावरून ? त्याचं काय शरीर सापडलेय काय तुम्हाला? काय, त्याची, तुम्हाला वाट पहावी लागेल, शरीर जर सापडलं तर निश्चय होऊन मग सहगमन हिला करता येईल, तोपर्यंत करता येणार नाही. त्याप्रमाणे राहिली ती बिचारी. सोमवार व्रत करती आहे, दुःख करती आहे, तेंव्हा पती आहे की नाही, जिवंत आहे की नाही कुणाला ठाऊक? अशा निराश स्थितीमधे राहिलेली आहे.

इकडं तो जो आणखी तिचा पती होता, तो गेला, पाण्यामधे गेलेला आहे. पाताळ लोकातल्या आणखी नागस्त्रिया तिथे आलेल्या होत्या, नागकन्या, हा कुणीतरी चांगला मनुष्य आहे असं वाटलं, अमृत शिंपडून त्यांनी त्याला सावध केलं आणि पाताळलोकामधे त्याला घेऊन गेल्या. 'पुरुषस्य भाग्यम्' म्हणतात. हे असं आहे. पाण्यात बुडून गेलेला आहे, पण पाताळलोकामधे त्याला सर्वही सर्पांचं, नागांचं, सर्पराजाचं, तक्षकाचं दर्शन झालेलं आहे. म्हणून **सत्कर्मयोगे वय घालवावे,** म्हणून जे सांगतायत महात्मे. सगळी सत्कर्म आपल्याकडून घडली पाहिजेत आयुष्य असेपर्यंत. आज केले की पुष्कळ झालं, आता किती पुण्य करायचं, किती दान करायचं, काय करायचं कशाला आता ? एवढं पुरे झालं आता. इतके दिवस केले ना ! असे नाही. **संपूर्ण आयुष्य असेपर्यंत, लहान मोठी अशी पुण्यकर्म झाली पाहिजेत, त्याचं फळ एकदम असं मिळतं म्हणाले. एकदम त्या पुण्यकर्माचं फल एकदम आपल्याला मिळतं.**

पाताळलोकामधे आणखी त्याला घेऊन गेल्या त्या नागकन्या, सबंध आणखी सर्पांची, नाग मोठे मोठे आहेत. एक, दोन, पांच, दहा, शंभर, हजारापर्यंत फणा आहेत. प्रत्येकाच्या फणावरती मोठे मोठे रत्नं आहेत, त्यांचा प्रकाश सगळीकडं पडलेला आहे, अंधार नाही कांही नाही. पाहतो आहे, आश्चर्याने पाहतो आहे. तो नागराज, त्याने विचारलं बाळ, त्या नागकन्यांना, कुठला हा मुलगा आणलात म्हणाले. त्या म्हणाल्या, 'वहात आला होता, आम्ही याला आणलं' म्हणाल्या. कोण बाळ तू ? कोणाचा मुलगा आहे तू ? कोणच्या वंशात जन्माला आला बाळ तू ? कोणाचं, कोण तुमचं उपास्य दैवत कोण आहे? त्याने सांगितलं, नल राजा जो आहे, त्यांचा पुत्र. आणि त्यांच्यापासून माझा जन्म आणि नलराजाचा मी नातू आहे. नलराजाची कीर्ति सगळीकडे त्रैलोक्यामधे पसरलेली आहे. धर्मशील महात्मा, धर्मानी वागणारा, त्याची कीर्ति

देवलोक काय पाताळलोक, सगळीकडे पसरलेली आहे. आणि आमचं उपास्य दैवत म्हणजे भगवान शंकर परमात्मा आहेत म्हणाले. सर्वही नाग वगैरे ज्यांची सेवा करतात वगैरे, सगळं त्रैलोक्यामधे सर्वही, ज्यांची सेवा करून आणखी कृतार्थ होतात असे भगवान शंकर आमचे आणखी दैवत आहेत. मग त्याला त्या नागराजानी सांगितलं की तू आमच्या नागलोकातच रहा की म्हणाले. इथं पुष्कळ अमृत आहे. पुष्कळ आणखी समृद्धी, विषय वाटेल तितके आहेत म्हणाले. कांही कमी नाही, सगळं सौख्य आहे. त्यांनी सांगितलं, महाराज, कांही हरकत नाही. परंतु माझा नुकताच विवाह झालेला आहे म्हणाले आणि मी असा पोहण्याला आलो आणि बुडून गेलो. तिकडं काय झालं असेल, हाहाःकार, दुःख? पत्नीला किती दुःख झालेलं असेल, माझे आई-बाप किती दुःखी असतील? त्यांना एकदा भेटावं अशी माझी इच्छा आहे म्हणाले. बराय. त्यांनी सांगितलं, जा म्हणाले तू. त्याच्याबरोबर अमृत दिलेलं आहे, त्याच्या पत्नीला वस्त्र, अलंकार दिलेले आहेत. आणि आपला मुलगा स्वतःचा, त्याला संरक्षण करण्याकरिता त्याच्याबरोबर दिलेला आहे. आणि ते दोघेही घोड्यावर बसून पाण्यातून वर आले. नदीतीरावरती आणखी घोडे सोडले त्यांनी.

त्या दिवशी सोमवार असल्यामुळे सीमंतिनी स्नान करण्याकरता नदीतीरावरती आलेली होती. तिच्याबरोबर तिच्या मैत्रिणीही होत्या. तो चंद्रांगद तिच्याकडे पहातो आहे, ही आपल्या स्त्रीसारखी दिसते आहे म्हणाला. वर्ष-दोन वर्ष होऊन गेली होती, पण पहिल्यासारखं स्वरूप नाहीये. कंठामधे कांही मंगल अलंकार नाहीत, काय आहे हे ? ही, ही पाहते आहे, पतीसारखे असावेत असं वाटतंय म्हणाली, पण कुठले पती? पाण्यात बुडून गेलेला पती कधी मिळणं शक्य आहे काय? निराशाही होती आहे. तो आणखी जवळ आलेला आहे. कोण आहेस बाई तू ? तुझं नांव काय? वगैरे त्याने विचारलं. तिनं आपल्या मैत्रिणीला सांगितलं, तुम्हीच सांगा काय ते. त्यांनी सांगितलं ही सीमंतिनी हिच नांव आहे. चंद्रांगदाची ही पत्नी आहे. हिचा पती आणखी दोन वर्ष होऊन गेली, बुडून गेला, ही बिचारी सोमवार व्रत करते आहे. आज स्नान करून जावून, आणखी पूजा वगैरे त्याप्रमाणे ही करणार आहे. अत्यंत दुःख झाल्यामुळे हिचं लावण्य सगळं गेलेलं आहे.

म्हणजे आपली पत्नीच आहे अशी याची खात्री त्याची झाली. हिनं विचारलं, महाराज, आपण कोण आहात? आपलं नांव काय आहे, सांगा. चौकशी करतेय सीमंतिनी. काय सांगायचं, रडायला लागली. असं म्हणाली माझे सबंध आणखी पती गेले त्या वेळेपासून निराश मी झालेली आहे. आता देहत्यागही मला करता येत नाही, असा काही निर्णय शास्त्राचा आहे म्हणाली. त्यांनी सांगितलं. आहे, तुझा पती जिवंत आहे बरं. तो माझा अगदी परममित्र आहे. तीन दिवसांनी तुला भेटेल. एवढं आश्वासन दिलं. आणखी तो निघालेला आहे. त्याला समजलं

की आपल्या माता–पित्यांना तुरूंगामधे शत्रूनं ठेवलेलं आहे. त्यांची अगोदर मुक्तता करायची आहे. सीमंतिनीलाही आश्वासन दिलेलं आहे की, मी पाहिलेलं आहे तुझ्या पतीला, मिळेल, तुला तीन दिवसांनी भेटेल.

आली घरी, काय, म्हणाली, कसला भेटतो आहे, शंकरांच्या कृपेनं कांहीही होणं शक्य आहे, भेटेलही, म्हणाली. पण मेलेला कसा भेटणार तो? पुन्हा वाटावं. आलेली आहे, पूजा वगैरे झाली त्या दिवशी. इकडे हा जो आहे चंद्रांगद, हा आपल्या राजधानीमधे गेला आणि त्या नागपुत्राला त्याने पाठवलं. शत्रुला जाऊन सांग मुकाट्याने. तो आला तिथ नागपुत्र. चंद्रागद म्हणाले– पाताळ लोकामध्ये आणखी शेषांच्या दर्शनाकरता गेला होता. त्याच्या माता–पितरांना मुक्त करुन त्यांच त्यांना राज्य द्या. तो आलेला आहे. नाहीतर मी आता तुमचा नाश करतो म्हणाला. त्यांनाही भिती उत्पन्न झाली. शत्रूला जाऊन सांग, मुकाट्याने शरण या व माझ्या माता–पित्यांची सुटका करून त्यांना त्यांचे राज्य सन्मानाने पुन्हा परत करा. नागकुमाराने राजधानीत जाऊन शत्रूला सांगितलं. हे सगळं, त्यांना बाहेर आणलं तुरूंगातून, त्यांना राज्य दिलं. नागकुमाराने सांगितलं, आपला मुलगा आलेला आहे म्हणाले, महाराज, आता आपल्या दर्शनाला येईल. अतिशय हर्षाने म्हणा, कांही त्याला मूर्च्छा आली. त्याला पुन्हा सावध केलं. सगळं आणखी नगर सगळं ध्वजपताका वगैरे लावलेल्या आहेत, चंद्रांगद भेटीकरीता आलेला आहे. माता–पितरांचं दर्शन घेतलेलं आहे. मग या शेषांचे उपकार, नागराजांचे माझ्यावर उपकार आहेत म्हणाले. त्यामुळे मी जिवंत राहिलो, इथंपर्यंत आलो. त्या नागपुत्राचाही सत्कार वगैरे राजाने केला आणि त्याला पाठवून दिलेला आहे.

आणि आपल्या सुनेनं जे कांही सोमवार व्रत केलं म्हणाले, त्याचं हे फळ मिळालं. क्रियमाण कर्म जे आहे ते सुद्धा फलद्रूप होतं.

त्रिभिर्वर्षैस्त्रिभिर्मासैस्त्रिभि: पक्षैस्त्रिभिर्दिनै: ।
अत्युत्कटै: पापपुण्यैरिहैव फलमश्नुते । (हितोपदेश मित्रलाभप्रकरण)

सामान्य नियम आहे, की कर्माचं फल हे लगेच मिळत नाही. आंब्याचं झाड लावलं की लगेच आंबे लागतात काय दुसऱ्या दिवशी? किती तरी दिवस जावे लागतात. काल आहे, कालाची प्रतिक्षा प्रत्येक कर्मामधे आहे. व्यावहारिक कर्मांमधे सुद्धा आहे. चुलीवरती भांडं ठेवलं की लगेच कांही भात शिजत नाही, वाट पाहिलीच पाहिजे. कितीही जरी भूक लागली तरी थांबलंच पाहिजे ना, शिजला पाहिजे ना भात, काय तसेच तांदूळ वाढायचेत काय? कालाचं सहाय्य, कालाचं एकंदर हे प्रत्येकाला जरूरी आहे. त्याप्रमाणे कर्मापासून जे फल प्राप्त होतं त्याला विलंब आहे. परिपक्व जे कर्म, योग्य फलोन्मुख व्हायला पाहिजे. त्याची फलोन्मुख

अवस्था कोणची आहे, अद्यापी अपरिपक्व आहे हे सगळं, सर्वज्ञ परमात्म्याच्या आणखी ज्ञानातून ज्ञात होत आहे. पण त्यातही उत्कट कर्म, अत्यंत आणखी श्रेष्ठ कर्म, शुद्ध कर्म जर झालं, तर मात्र लगेच फळ मिळतं आहे त्याला. त्याप्रमाणे आणखी सुनेच्या पुण्यामुळे, पुण्याईमुळे आपला पुत्र आपल्याला मिळाला असं त्याला वाटलं, सगळं वऱ्हाड वगैरे घेऊन तो राजा आलेला आहे. त्यालाही आनंद झाला. पुन्हा सीमंतिनीचं ते मंगल कार्य झालेलं आहे. चंद्रांगदाची तिची भेट झाली, तिला वस्त्र दिली, अमृत दिलेलं आहे, कल्पवृक्षाची फळ दिली होती, तिला अर्पण केलेली आहेत. म्हणजे दैव आणखी प्रयत्न, पूर्वकर्म जे आहे, पूर्वजन्मामधे केलेलं कर्म म्हणजे दैव आहे.

पूर्वजन्मकृतं कर्म तद्दैवमिति कथ्यते ।

तस्मात्पुरुषकारेण यत्नं कुर्यादतन्द्रितः ॥ **(हितोपदेश श्लोक-३३)**

तेव्हा जीवाकडून, आपल्याकडूनच झालेली कर्म असतात. पूर्वी, ती जर फलोन्मुख झालेली असतील, प्रारब्धरूपाने परिणत झालेली असतील तर त्याचे फल आणखी भोगावं लागतं. ते दैव आहे. तथापि, क्रियमाण कर्म जर एखाद्या उत्तम आणखी ज्ञात्याकडून कर्म समजली, त्याचा विधी समजला, त्याबद्दल श्रद्धाही मनामध्ये उत्पन्न झाली तर तीच उत्कट कर्म होतात. कर्माची उत्कटता म्हणजे काय आहे ? क्रियाच आहे ती, क्रिया ही चांगली, श्रेष्ठ आणि कमी हे समजायचं कसं. देवाची पूजा अर्चा करणं, आणखी स्तोत्र पठण करणं, कांही शरीराने, वाणीनं, मनाने, ही क्रियाच आहे सगळी. पण त्या क्रियेमधे जी उत्कटता उत्पन्न होते, जास्ती आणखी महत्त्व जे श्रेष्ठ उत्पन्न होतं ते कर्म, ते कर्म म्हणजे अंतःकरणामधे असणारी श्रद्धा. त्याच्या प्रमाणावर श्रद्धा, ते शब्दप्रमाण शास्त्र असो किंवा महात्म्यांचा शब्द असो, त्या शब्दावर श्रद्धा असणं, हे एक औत्कटय आहे, त्या **श्रद्धेमुळे ते कर्म उत्कट बनतं.** जसा विधी आहे त्या विधीप्रमाणे ते कर्म होणं, **त्यामुळेही ते कर्म तत्काळ फलदायी होतं आहे.** आणि ईश्वराची कृपा, त्यामुळे होती आहे. म्हणून दैव जरी या सीमतिनीचं होतं पूर्वी, ज्योतिषांनी सांगितलेलंच आहे, दोन्ही सांगितलंय, **दहा हजार वर्ष राज्य करणार आहे असंही दैव आहे, पण ते दैव म्हणजे क्रियमाण रूपाने आहे. क्रियमाण कर्म जे सोमवार व्रत तिच्या हातून घडलेलं आहे,** ती आलेली आहे, मैत्रेयी आली, तिनं हे करायला सांगितलं आणि शास्त्राने जरी चौदाव्या वर्षी वैधव्य सांगितलेलं असलं, तरी त्या शास्त्रप्रमाणापेक्षा या स्त्रीने, आणखी या ब्रह्मवादिनी स्त्रीने, आपल्याला सांगितलेलं आहे. ते आणखी जास्ती योग्य आहे, अशी जास्ती श्रद्धा तिची बसून, तिच्या हातून क्रियमाण कर्म सुरू झालं. हा प्रयत्न सुरु झाला आहे. त्यामुळे या प्रयत्नाला, ते जे पूर्वीचं दैव प्रतिकूल होतं, तरीसुद्धा या आणखी प्रयत्नाने

प्रतिकूल दैव समजलेलं आहे, समजलं म्हणून नवीन क्रियमाण कर्म करण्याची प्रवृत्ती झाली, तिला सदगुरू भेटले, ती स्त्री भेटली आणि त्या प्रयत्नांमुळे क्रियमाण कर्माने नवीन दैव तिनं आपलं बनिवलेलं आहे म्हणाले. तत्काळ फल मिळणं म्हणजे हेच प्रारब्ध झालं ना? **क्रियमाण कर्मात तत्काळ फल मिळतं याचा अर्थ, क्रियमाण कर्मच प्रारब्धात रुपांतरीत होत आहे, तेव्हा हे तिचं सोमवार व्रत, हेच तिचं दैव बनलं,** उत्कट दैव, दहा हजार वर्ष तिच्या पतीला आयुष्य मिळालं, उत्तम समृद्ध राज्य केलेलं आहे. असेपर्यंत सोमवार व्रत कधीही तिनं सोडलेलं नाहीये. तेव्हा महाराजांनी आणि त्या सावित्रीला सांगितलं हे तू करीत जा. उपासना करावी म्हणाले.

कर्म आणि उपासना या दोन्ही बरोबर करत असाव्यात. त्यात कांही अंतर नाहीये. म्हणजे पतिव्रता स्त्रियांनीसुद्धा उपासना करू नये असं नाही. प्रत्येक स्त्रियांचे आणखीन संस्कार असतात. सदगुरूंच्या आज्ञेने साधनानुष्ठान व्हावे. आपल्या इच्छेने करणं बरं नाही. जबाबदारी सद्गुरुंची आहे. आपली स्मृती निरंतर राहावी अशा प्रकारचे व्रत हवे. महाराजांनी तिला सोमवार व्रत करून शंकरांची उपासना करायला सांगितली आहे. यानंतरच्या कथेमध्ये महाराजांनी कर्म उपासनांचं महत्त्व सांगितलं आहे. ज्यात आचारधर्माचं आकलन करून दिलेलं आहे. उद्यापासून आपण त्यांचे चिंतन करणार आहोत.

॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ॥



॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे समश्लोकी गुरुसंहितेवरील प्रवचन
भगवंत मंदिर – बार्शी, जि. सोलापूर

सहावा दिवस
अधिक श्रावण कृ. १३, शके १९०७, दि. १४ ऑगस्ट १९८५
दुपारी ४.३० ते संध्याकाळी ७

नामधारक सिद्धमुनींच्या मुखातून भगवान नरसिंह सरस्वती दत्तात्रेयांचं चरित्र पुष्कळ ऐकलं. नरसिंह सरस्वती महाराजांनी अनेक भक्तांचा उद्धार कसा केला, **कर्मयोग म्हणजे कसा आहे, हे सांगायला सुरूवात केलेली आहे.** वेदाभ्यास करणारे त्रिविक्रमभारती किंवा ते जे दोन ब्राह्मण होते, अहंकारयुक्त झालेले, त्यांना कर्मज्ञान आहे, परंतु त्याप्रमाणे, कर्मानुष्ठान व्यवस्थित होत नाहीये. कर्मानुष्ठान म्हणजे ज्या कांही क्रिया सांगितलेल्या आहेत, स्नान–संध्यादिक क्रिया, जप–जाप्य वगैरे. या सर्व क्रिया शरीराकडून, मनाकडून होतील. अगदी यथाविधी होतील. कारण ज्ञान आहे. **ज्ञानी मनुष्य जो आहे तो कर्म करतो, परंतु ते कर्म करीत असताना, मनाची स्थिती कशी पाहिजे आहे. त्या मनाच्या स्थितीवरून ते कर्म आणखी उत्कृष्ट आहे की कमी प्रकारचं आहे असं ठरतं.** त्रिविक्रमभारतींनी सर्व ज्ञान संपादन करून संन्यासदीक्षा धारण केलेली आहे. कांही नाही, त्याग आहे. **त्यागानेच मोक्ष**

प्राप्त होतो असाही सिद्धांत उपनिषदामधे सांगितला आहे. असंग आत्मस्वरूप जे आहे ते त्यागाने कळून येतं. **ममता सुटली की, आणखी असंग आत्मस्वरूपाचं ज्ञान झालं म्हणायला हरकत नाही. निर्ममो निरहङ्कारः स शान्तिमधिगच्छति ।** शांतीचं साधन ममत्वत्याग आहे. **माझं माझं म्हणायचं बंद झालं, की शांती मिळाली** आणि **अहंकार सुटला पाहिजे.** त्रिविक्रमभारतींनी संन्यासदीक्षा धारण केली होती. ज्ञान चांगलं आहे, **परंतु अहंकार निर्माण झाल्यामुळे त्यांचं कर्म हे कांही इतकं उत्कृष्ट झालं नाही.**

मन्त्रस्य च परिज्ञानं कर्मशुद्धिर्मदर्पणम् ।
धर्मः सम्पद्यते षड्भिरधर्मस्तु विपर्ययः (भा. ११.२०.१५)

मला अर्पण केलेलं कर्म शुद्ध होतं. अर्पण करणं याचा अर्थ कर्तृत्व ईश्वराच आहे. आपण फक्त निमित्तमात्र आहोत. ही बुद्धी म्हणजे ईश्वरार्पण बुद्धी आहे. ते जे दोन ब्राह्मण, हे गर्विष्ठ आहेत. त्यांना तर अहंकारांने पछाडले आहे. त्यांना शेवटी शासनच करावं लागलं. म्हणजे कर्मयोग कसा आणखी असावा, हे दाखिवण्याकरता म्हणून आणि या कथा सांगितलेल्या आहेत.

त्यानंतर **सतीचं चरित्र संपूर्ण सांगितलेलं आहे. कर्मयोग काय आहे. साध्वी, पतिव्रता स्त्रीचं कर्तव्यकर्म कसं असतं, त्या कर्तव्यकर्मांनी तिला काय फल मिळतं हे दाखिवलेलं आहे.** तिचा पती जिवंत केला. यानंतर आता एक कथा सांगताहेत. नामधारकाला या कथा ऐकण्याविषयी अत्यंत आणखी प्रेम निर्माण झालेलं आहे. अत्यंत प्रीति, प्रेम निर्माण झालेलं आहे. सद्गुरूंचं चरित्र ऐकावं, आणखी सिद्धमुनींनाही मोठा संतोष झालेला आहे. त्यांनी सांगितलं, बाबा,

शृण्वेको ब्राह्मणस्तत्र त्यक्तान्यान्नप्रतिग्रहः।
दैवाप्तभुगृती शान्तोऽसक्तः कर्मपरो गृही ॥ (द्विसाहस्त्री १८.३)

कर्मयोगच चाललेला आहे. उत्कृष्ट कर्मयोगाचं उदाहरण म्हणून ही कथा सांगतायत.

गाणगापुरामधे एक गरीब ब्राम्हण राहतो आहे. कुणाचही परिग्रह नाही, दान घ्यायचं नाही आणि अन्नही घ्यायचं नाही. परान्न नाही. फार धैर्य असलं पाहिजे. धैर्यावाचून कांही अशी वृत्ती ही होऊ शकत नाहीये. **अयाचित वृत्ती म्हणजे अमृतवृत्ती** म्हणतात. **अमृतोस्यात् अयाचितम् !** अशा वृत्तीनं राहतो आहे. त्यामुळे घरामध्ये व्यावहारिक दृष्टीनं, कांही सौख्य नाहीये. त्याच्या स्त्रीला ते पसंत नाहीये. रोज आणखी अनेक भक्त गाणगापुरामधे यायचे. महाराजांना भिक्षा करावी, सगळ्या ब्राह्मणांना भोजनाला बोलावं, त्यांच्यासह ब्राह्मणांना भिक्षान्न द्यावं. पक्वान्न रोज सर्वांना मिळतं होती. आणि हा ब्राह्मण कुठेही जेवायला जात नाहीये. त्यामुळे ही त्याची स्त्री ही नेहमी दुःखी होती. चांगलं अन्न पाहिजे. चांगली भूक लागलेली

असली म्हणजे कसलंही अन्न असलं तरी ते चांगलंच वाटतं. **अन्नाचा दोष किंवा गुण पहायला लागलं म्हणजे भूक चांगली लागली नाही असं समजायला हरकत नाही.**

अर्थातुराणां न गुरुर्नबन्धुः । कामातुराणां न भयं न लज्जा ॥
*विद्यातुराणां न सुखं न निद्रा । **क्षुधातुराणां न रुचिर्न वेला ।***

(सुभाषितरत्न भाण्डागारम् श्लोक ८४५)

कोणच्याही वेळेला, थोडं कांही मिळालं, की तृप्ती होते. तर या स्त्रीच्या मनामधे आणखी असं आहे, अन्न मिळेल, पक्वान्न मिळेल, आदरानी देतील ते. वस्त्र वगैरे मिळतील अशी इच्छा आहे, वासना आहे. रसनेंद्रिय ज्याला म्हणतो आपण, रसासक्ती ही उत्पन्न झालेली आहे. जोपर्यंत रस जिंकलेला नाही, तोपर्यंत जितेंद्रिय त्याला म्हणता येत नाही. अवधूतांनी आपल्या चोवीस गुरूंच्या कथेमधे सांगितलंय, **जितं सर्वं जिते रसे !** डोळे, कान, नाक वगैरे इंद्रिय जिंकली तरी त्याला जितेंद्रिय म्हणता येणार नाही. रसनेंद्रिय ज्यांनी जिंकलेलं आहे.

मूलं तरोः केवलमाश्रयन्तः पाणिद्वयं भोक्तुममन्त्रयन्तः ।
कन्थामिव श्रीमपि कुत्सयन्तः कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः ॥ (यति कौपीन पंचक-२)

आचार्य महाराज सांगताहेत, हे भाग्य मोठं आहे म्हणाले. कांही परिग्रह नाही, घर नाही, पात्र नाही, संपत्ती नाही. कांही नाही. पण संतोष आहे, अंतःकरण समाधानाने भरलेलं आहे. भिक्षान्न जे मिळेल त्याच्यामधे समाधान आहे.

भिक्षौषधं भुज्यताम् साधनापंचकामधे आचार्य सांगतायत,
संन्यासदीक्षा धारण केल्यानंतर

क्षुद्व्याधिश्च चिकित्स्यतां प्रतिदिनं भिक्षौषधं भुज्यतां ।
स्वाद्वन्नं न तु याच्यतां विधिवशात्प्राप्तेन सन्तुष्यताम् ॥

(साधन पञ्चकम्) ४ था श्लोक

क्षुधा हा एक मोठा रोग आहे म्हणाले. संन्याशानी कशी वृत्ती ठेवावी त्याबद्दल सांगतायत, संन्यास एकदा घेतला, त्याग घेतल्यानंतर कोणच्याही सुखाची अभिलाषा मनांत असून उपयोग नाही. हे मिळालं पाहिजे, ते मिळालं पाहिजे, कांही नाही. भूक हा एक रोग आहे, आणि शेवटपर्यंत राहणार आहे, अशी भावना धारण करून त्याला औषध काय? **भिक्षौषधं भुज्यताम् !** जी भिक्षा मिळेल, ते औषध आहे म्हणून घ्यायचं. आता औषध घेताना ते कडू आहे, किंवा गोड आहे वगैरे, याचा विचार करता येतो कां आपल्याला? औषध वेळच्या वेळेला घ्या म्हणून वैद्यांनी, डॉक्टरांनी दिलं ते घ्यायचं. कडू असलं तरी घ्यायचं. त्याप्रमाणे भिक्षान्न हे औषध आहे अशा दृष्टीनं आणि त्या संन्याशाने त्या अन्नाचा स्वीकार करावा.

तर ही वृत्ती असल्यामुळे रसनेंद्रियाचा काय संबंध?

पुण्याच्या महाराजांच्या मठामधे, काशीचे एक स्वामी येऊन राहतात. आता पुन्हा महाराज काशीला गेलेले आहेत, चातुर्मासामधे. त्यांचा नियम असा आहे की, जेवायला बसायच्या वेळेला त्याचं एक लहानसं पात्र आहे, त्याच्यामधे सगळं वाढा म्हणतात. सगळं म्हणजे काय असेल ते, भाजी, चटणी, भात, पोळी, लाडू काय तुमचे असेल श्रीखंड, बासुंदी, सगळं त्यात घाला म्हणतात ते आणि ते सगळं एकत्र केल्यानंतर नैवेद्य दाखवून ते जेवण करतात. रसनेंद्रियाला अमुकच रस पाहिजे असं कांही नाही. अन्न सगळं एकत्र करून ते घेतात. हा एक अभ्यास आहे. तर अशा प्रकारचा अभ्यास करून रसनेंद्रिय ज्यानी जिंकलं तो खरा जितेंद्रिय आहे म्हणतात. मनांची अशी आणखी अवस्था झाली पाहिजे. **अमुकच एक मला खायला मिळालं पाहिजे अशी वासना, अशी इच्छा जर मनांत राहिली, तर परमार्थ मार्गामधे पुष्कळ अडचण आहे ती.**

हा ब्राह्मण जो होता, गाणगापुरामधे राहणारा, त्याने नियम केला होता. कुठेही जेवायला जायचं नाही. कांहीही परिग्रह घ्यायचा नाही. वस्त्र नाही, पात्र नाही, कांही दान घ्यायचं नाही.

शृण्वेको ब्राह्मणस्तत्र व्यक्तान्यान्नप्रतिग्रहः ।

दैवाप्तभुगृती शान्तोऽसक्तः कर्मपरो गृही ॥ (द्विसाहस्त्री १८.३)

गृहस्थाश्रमी होता. तो चालत करता होता, दैवात्तभुक, दैवाने घरी जे आणखी मिळेल, कुणी आणून देतील, त्याच्यामधे आणखी संतोषाने आपला गृहस्थाश्रम चालवीत होता. आणखी अत्यंत सत्यवादी, सत्यवर्तन करणारा, असक्त आहे, कुठेही आसक्ती नाही. हे पाहिजे, ते पाहिजे. कांही नाही. मन गुंतलं नाही कुठे. कर्मफलः आपण ब्राह्मण जन्म घेतलेला आहे. देवानी आपल्याला ब्राह्मण केलेलं आहे. ती ब्राह्मणाची जी कर्तव्यकर्म आहेत ती सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्याच्यामध्ये त्याचा काळ जातो. जेवायला ताटामधे काय आहे, काय वाढलेलं आहे किंवा काय, तिकडे लक्षच नाहीये. असा तो गृहस्थाश्रमी ब्राह्मण, आणखी याला भेटलेली जी स्त्री होती, ती मात्र अगदी विरुद्ध विचार आहे. याची एक वृत्ती, तिची एक. अनेक ब्राह्मण मंडळी आणि त्यांच्या स्त्रिया रोज मठामधे महाराजांच्या जाऊन, जेवण करून येत होत्या. त्यांनी सांगावं, आज श्रीखंड पुरी केलं होतं, आज लाडू केले होते, गुलाबजाम होते, जिलबी होती, रोज त्यांनी वर्णन करावं. आम्हाला असं वस्त्र मिळालं आणि ते ऐकल्याबरोबर, तिच्या मनाची अगदी अस्वस्थ स्थिती व्हायची. काय बाबा, आपणही गेलो असतो, आपल्यालाही मिळालं असतं.

पतीची निंदा करायला लागली ती. काय म्हणाली तुम्ही असल कसलं व्रत घेतलेलं आहे, तुम्हालाही नाही आणि आम्हालाही नाही. त्यांनी सांगितलं, मी तुला कुठे नको म्हणतो, जा तू आपली. तुला बोलावलं तर जाईनास तू.

एकदा एक श्रीमंत मनुष्य गाणगापुरामधे आलेला आहे. महाराजांना भिक्षा करावी, पूजा करावी, अशा इच्छेने, त्यानी सर्वही ब्राह्मणांना, आणखी स्त्रियांना, दंपतीभोजन घालायचं ठरवलं. मेहुण, सगळी मेहुणं बोलावली. तो ब्राह्मण यांच्या घरी सांगायला आला. ब्राह्मणाने विशेष कांही नाही, तो बोललाही नाही. ही स्त्री आपण होऊन म्हणाली, कांही हरकत नाही म्हणाली. मी जेवायला येते. त्यांनी सांगितलं, मी कांही एकट्याच सुवासिनी, एकट्या स्त्रीला सांगणार नाही. दोघांना, दंपतीला मला सांगायचंय. तुम्ही आणि तुमचे पती, दोघेजण जेवायला या, तर मला आणखी मी निमंत्रण करण्याकरता आलेलो आहे. आता आली अडचण, पतीला कांही इच्छाच नाहीये. जेवायला गेलो असतो तर मला आणखी हे मिळालं असतं, उत्तम पक्वान्न मिळालं असतं, वस्त्र-पात्र, दक्षिणा वगैरे मिळाली असती. हे विचारच मनामधे नाहीयेत. मन हे इकडे वळलेलं आहे. कर्मानुष्ठान. सकाळपासून सायंकाळपर्यंत जे सांगितलेलं आहे, संध्या काय, पूजा काय, वेदपठण, उपनिषद वगैरे, तर्पण वगैरे सगळी कर्तव्यकर्म व्यवस्थित झाली म्हणजे समाधान. कमी जेवायला मिळो, न मिळो, कांही त्याच्याबद्दल तक्रार नाही.

तेव्हा त्या स्त्रीला मोठी अडचण पडली. आता काय करावं? एवढा श्रीमंत मनुष्य आलेला आहे, आपल्याला चांगली दक्षिणा म्हणा, वस्त्रं, पात्रं म्हणा, लुगडी काय मिळतील सगळ. हे तर ऐकत नाहीत. ती आणखी आपल्या घरातून बाहेर पडली. आणखी मठामधे आली. महाराजांना नमस्कार करून विनंती केली, महाराज, आमच्या यांना सांगा तुम्ही, पतीमहाराजांना. काय जेवायला सांगायला हे लोक येतात, गांवातल्या सगळ्या स्त्रिया आपल्या पतीबरोबर जातात आणि मला कांही जाता येत नाही. आमचे हे यजमान, आणखी म्हणाली, कुठेही जात नाहीत. कांही नाही. मला एकटीला कोण सांगणार? ही त्या स्त्रीची एकंदर वृत्ती पाहिली महाराजांनी, आणि तिच्या नवऱ्याला बोलावून घेतलं, कुणालातरी पाठवून. आला ब्राह्मण. आणखी नमस्कार करून उभा राहिला, काय महाराज? तुम्ही म्हणाले या स्त्री बरोबर आज जेवायला जा म्हणाले. तो म्हणाला, महाराज, अन्न घेऊ नये कुणाचंही, असा माझा नियम आहे. अन्नदोष फार आहे. सगळं दान घ्यावं पण अन्नदान कधीही घेऊ नये शास्त्र सांगतय, आपणही सांगता. मग मी तर नियम केलेला आहे. कितीतरी दिवस झाले मी जेवायला कुठेही जात नाही. सगळ्यांना माहिती आहे म्हणाले. ते म्हणाले बाबा, तुझ्या घरामधे जी स्त्री आहे, तू हिच्याबरोबर विवाह, अग्निब्राह्मणांच्या समक्ष केलास, तिचं जर असमाधान नेहमी घरात राहील तर काय उपयोग म्हणाले, गृहस्थाश्रम

धर्माचा. तिच्या समाधानाकरता तुला जाणं भाग आहे. काय आता महाराजांची आज्ञा झाली. बराय, गेले दोघेही जेवायला, बाकीचीही ब्राह्मण मंडळी गांवातली आपल्या स्त्रियासह तिथं आलेली होती. संकल्प सोडून आणखी आपल्या पितरांच्याकरिताच तो अन्नदान करीत होता, जेवायला सगळी मंडळी बसल्याबरोबर, या स्त्रीला असं दिसायला लागलं, की अनेक कुत्री आलेली आहेत तिथं, डुकरं आलेली आहेत. त्या पंक्तीमधे हिंडतायत. प्रत्येकाच्या पानामधे जाऊन आणखी खातायत. बाकी कुणालाच दिसलं नाही, या स्त्रीला दिसलं. तिच्याही पानामधे, बाकी सगळ्यांही स्त्री-पुरूषांच्या पानामधे, श्वान आणखी सुकर, दोघेही आणखी जेवताहेत, खातायत, ते लोकही जेवतायत, त्यांना ते दिसतच नाहीये.

एकदम तिच्या मनामधे, आणखी नको हे अन्न नको, उठली पानावरून, आपल्या पतीला सांगितलेलं आहे की, असं असं झालं म्हणाली. उच्छिष्ट अन्न. श्वान, सुकरांचं उच्छिष्ट खावं लागलं. सगळी खातायत म्हणाली. वाईट वाटलं. तिलाही वाईट वाटलं. तिची मनोवृत्ती आणखी बदललेली आहे आणि महाराजांनी हे दाखवून तिला हे केलं, की परान्न कां घ्यायचं नाही, त्याच्यामधे काय दोष आहे. ब्राह्मणाला अत्यंत पश्चाताप झालेला आहे. आला महाराजांच्या जवळ. काय करू महाराज, केवढा दोष लागला. ही स्त्री, या स्त्रीशी गाठ पडली म्हणून मला आजचा हा दोष लागला म्हणाले. श्वान, सुकरांचं उच्छिष्ट खावं लागलं. असू दे म्हणाले, बाबा, तिची इच्छा पूर्ण झालेली आहे. आता मात्र तुझ्याजवळ ती हट्ट करणार नाही, तुझ्या सांगण्याप्रमाणे आणखी ती व्यवस्थित वागणारी आहे, हे सांगितलं. आणखी जेवायला जाऊ नये हा जरी नियम असला तरी सुद्धा ज्याच्या घरी अशा प्रकारचं कांही कर्म आहे, दैव किंवा पितरांचं, त्याला कोणीही ब्राह्मण मिळत नाहीये, अशा अवस्थेमधे तिथे जायला पाहिजे म्हणाले. त्याने निमंत्रण केल्यानंतर जाऊन त्याचं कर्म हे पार पाडलं पाहिजे, नाहीतर दोष आहे. म्हणजे जायचं नाही हा नियम सुद्धा कांही वेळ बाजूला ठेवावा लागतो. दुसऱ्याचं जर कर्म बंद पडत असेल तर त्याकरता जायचं, उद्देश हा आहे. मनामधे, कांही आपल्याला लाभ होईल, **लाभ होण्याकरिता आणखी प्रतिग्रह घ्यायचा नाही.** पुष्कळ मग त्यांनी कुणाच्या घरी जेवायला जावं, कुणाच्या घरी हे करावं, हे सगळे प्रकार सांगितले. कुठे जेवायचं नाही, पुष्कळ विस्तारानी ते वर्णन केलेलं आहे.

त्या ब्राह्मणाने ते सगळं ऐकलं. आणखी मग त्यानी विनंती केली की, ब्राह्मणाचा आचार धर्म मला सांगा म्हणाला. आपल्यासारखे गुरु महाराज, आणखी माझ्या भाग्याने भेटलेले आहेत, साक्षात परमेश्वर आपण आहात. ज्यांच्या मुखातून हे सगळं वेदशास्त्र निर्माण झालेलं आहे, ज्यांनी हे सगळं एकंदर निर्माण केलं, तेच आपण आहात. शास्त्र सगळंही निर्माण करणारे, वेद निर्माण करणारे आपणच आहात. तेव्हा ब्राह्मणांनी कसं वागावं हा आचारधर्म सांगितलेला आहे. छत्तीस आणि सदतीस हे दोन अध्याय, सातशे आठशे ओव्या

जवळ जवळ आहेत. ते संपूर्ण अध्याय दोन्ही, ब्राह्मणधर्म सांगितलेला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत किती ब्राह्मणावर जबाबदारी आहे. त्यांनी जेवायला मिळालं नाही किंवा कांही मिळालं, त्याच्याकरिता कांही नाही, लक्ष द्यायचं नाही. त्यातही आचारधर्मामधे कांही थोडासा काळ, अपराण्हकाळी इतिहास पुराणं वगैरे वाचावीत, सांगावीत कुणी जिज्ञासू आला तर, तेही एक आणखी अध्ययन !

परिग्रह ही आणि उपजिविके करिता म्हणूनही ब्राह्मणाला अनुज्ञा आहे शास्त्राची ती करायला हरकत नाहीये. परंतु संग्रहाकडे दृष्टी उत्पन्न झाल्यानंतर मात्र ते विकारी मन होत आहे. आवश्यक इतकं घ्यायचं आहे. म्हणून तो संपूर्ण ब्राह्मणधर्म त्याला सांगितलेला आहे. उठावं केव्हा, नामस्मरण कसं करावं.....! त्यानंतर आणखी उपमार्जन आहे, स्नान आहे, नदीमधे स्नान करताना कोणत्या दिशेला स्नान करावं, उभं राहून वगैरे सगळे प्रकार सांगितलेत. त्यानंतर नित्यपूजा आहे, देवतांची पूजा आहे, संध्या, संध्योपासनाच, किती तरी प्रकारांनी संध्योपासनेचंच महत्व पुष्कळ वर्णन केलेलं आहे. गायत्री मंत्रांचं किती महत्व आहे. त्या मंत्रातल्या प्रत्येक अक्षरांच्या देवता, ऋषी वगैरे सगळेही त्यांनी प्रतिपादन केलेले आहे, महाराजांनी. सर्वज्ञच ते आहेत. हा ऐकणारासुद्धा फार मोठा आणखी जिज्ञासू होता. याला करायचं होतं, आचारधर्म ऐकून त्याप्रमाणे वागायचं होतं. महाराजांनी आता स्त्रीचा बंदोबस्त संपूर्ण करून टाकलेला आहे. पुन्हा तिला दुसऱ्याच्याकडे जेवायला जायची इच्छासुद्धा होणार नाही. हे पहा अशी स्थिती आहे. रोज उच्छिष्ट तुला खावं लागेल, खा, खायचं असेल तर. तोही बंदोबस्त करून टाकलेला आहे. म्हणजे हे सगळंही, त्रिकाळ संध्याकर्म, कशी करावी हेहि त्यानं दिलेल आहे. कोणच्या वेळेला प्रातःकालची संध्या, मध्यान्हकालची केव्हा, सायंकाळची केव्हा, त्यानंतर पूजेचाही प्रकार सांगितलेला आहे. पूजा करताना कोणच्या कोणच्या देवाला कशी कशी फुलं वहावीत, कोणची वाहू नयेत, हे सगळं निवेदन केलंय. त्याच्या नंतर ब्रह्मयज्ञ आहे. तर्पण वगैरे आहे. आणखी नंतर मग अतिथी, वैश्वदेव वगैरे आहे. अतिथी वगैरे यांचीही सेवा वगैरे आहे. त्यांनाही अन्नदान करायला सांगितलेलं आहे. आणि नंतर वेदाध्ययन वगैरे केलेलं असेल त्याचं पुनः धारणाध्ययन करायचं, कर्णाध्ययन झालेलं आहे, वेदाग्रहण झालेलं आहे, धारणाध्ययन, वेद राखण्याकरिता म्हणून अध्ययन शेवटपर्यंत करायचं. ब्रह्मयज्ञ. दुपारी १२ च्या वेळेला.

आणि अशा रीतीनं भोजन करण्याच्या वेळेचे सुद्धा नियम सांगितलेले आहेत. कसं भोजन करावं, कोणत्या दिशेला तोंड करावं, कसं, त्याचप्रमाणे काय काय आहुती वगैरे कशा द्याव्यात, काय करावं हे सर्वही वर्णन केलेलं आहे. प्रत्येक आहार-विहार या प्रत्येक याच्यामधे आणखी धर्मशास्त्रकारानी हे सगळेही नियम सांगून दिलेले आहेत. त्यामुळे पूर्ण आरोग्य आहे. पवित्र अन्न.

यज्ञशिष्टाशिन: सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषै: ।

भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात् ॥ **(भ.गी. ३.१३)**

पंचमहायज्ञ करून अवशिष्ट जे अन्न आहे ते ग्रहण करणारा जो आहे, धर्मशील महात्मा, त्याला कांहीही पाप लागत नाहीये. सर्वही पातकांचा, आणखी पतिग्रह जरी घेतला तरीसुद्धा तो दोष जातो त्याचा. **प्रतिग्रह घेणं याचा अर्थ दुसऱ्याचा दोष घेणं आहे ना?** दान घ्यायचं म्हणजे त्याचे सगळे दोष घ्यायचे. तर त्याही दोषातून मुक्त होण्याकरिता ही सगळी नित्य कर्म सांगितली आहेत. नित्यकर्मांचं स्वतंत्र व संध्योपासना, देवपूजा, वगैरे जी कर्म आहेत त्याचं स्वतंत्र आणखी फलनिर्देष कांही वेदवाक्यामधे, विधिवाक्यामधे नाही. संध्या उपासीत ! एवढंच फक्त सांगितलेलं आहे. परंतु त्याचा फलनिर्देष जरी नसला तरी ते निष्फळ नाही. **सर्वही दुरीतक्षय होण्याकरता त्याचा उपयोग होतो. त्या नित्यकर्मानुष्ठानानी जी कांही घडलेली दुरितं आहेत ती सगळी दुरीत किंवा घडणारी, या सर्वांचाही क्षय होतो आहे. म्हणून संध्योपासना ही अत्यंत महत्त्वाची ब्राह्मणाला सांगितलेली आहे.**

ऋषयो दीर्घसन्ध्यत्वाद्दीर्घमायुरवाप्नुयु: ।

प्रज्ञां यशश्च कीर्तिं च ब्रह्मवर्चसमेव च ॥ **(मनुस्मृति अ. ४, श्लोक ९४)**

म्हणतात. दीर्घकाळपर्यंत संध्योपासना ते करीत होते. प्राणायाम, त्यात सगळा योगमार्गही आलेला आहे. प्राणायाम आहे, त्याचप्रमाणे ध्यान आहे, सूर्य उपस्नान करावयाचाय म्हणजे हे सगळं ध्यान करावं लागतं म्हणजे मनाचा निग्रह करायला पाहिजे. मन सगळं आणखी परावृत्त म्हणजे प्रत्याहार आला, म्हणजे इंद्रियांना परावृत्त करून मनालाही परावृत्त करायचं आणि ध्येय वस्तुकडे लावायचं ते मन. संध्योपासने मधे सुद्धा प्राणायाम आहे, प्रत्याहार आहे, ध्यान आहे. हे सगळं करायचं म्हणजे किती काळ लागत असेल सांगता येत नाही. परंतु दीर्घसंध्या अशा प्रकारचे ऋषी दीर्घ आयुष्य त्यांना मिळालेलं आहे, चिरंजीव झालेले आहेत, किती काळ त्यांचा गेला, त्या काळाची मर्यादा त्यांच्यावरती नाही.

त्यानंतर हे सगळं पूजा वगैरे प्रकार म्हणजे भक्तिमार्गही त्यात आहे. गृहस्थाश्रम धर्मामधे नुसता कर्ममार्गच आहे असं नाही, कर्ममार्गातच नित्यकर्मामधे पूजाही आलेली आहे, देवपूजा, तीही पूजा त्याने करायची आहे. सायंकाळी झोप लागेपर्यंत सगळी कर्म सांगितली आहेत. अशा रीतीने, सर्वही कर्मयोग त्यांना सांगून दिलेला आहे, त्या ब्राह्मणाला. त्यालाही मोठा आनंद झाला. पराशरांनी हा सर्व विधी सांगितलाय म्हणाले, करुन. पराशर मुनींनी सर्व ऋषिमंडळींच्या प्रार्थनेवरून आणि कसा कसा आचार धर्म ब्राम्हणांचा आहे तो पराशरांनी समजावून सांगितलाय.

वेदवाङ्मय इतकं मोठं आहे आणखी इतकं गूढ आहे, कळायला अत्यंत कठीण आहे. त्याच्यामधे कोणची विधिवाक्य आहेत, कोणचे अपूर्व विधी आहेत, यम विधी आहेत, प्रतिसंख्या विधी आहेत. अनेक प्रकार आहेत. कोणची नुसती अनुज्ञा आहे, प्रत्यक्ष विधी नाही, अनुज्ञा आहे. तर अशा रीतीनं, सत्यमेव वदेत् जरी सांगितलेलं असलं तरी सत्य बोलावं असा हा विधीचा अर्थ नाहीये. परिसंख्याविधी, असत्य बोलू नये हा विधी आहे. निषेध विधी आहे. म्हणजे प्रत्येक विधीचे अर्थ कसे करायचे, काय करायचे. हे सुद्धा संपूर्ण वाङ्मयाचं आलोचन, समालोचन ज्यांनी केलेलं आहे, ते ऋषीच त्याप्रमाणे सांगू शकतात. **तुम्ही बोलायचं असेल तर असत्य बोलू नका, सत्य बोलायचं नसेल तर गप्प बसा म्हणतात. सवय लागेपर्यंत हे कठीण आहे. म्हणून त्याचा सत्यमेव वदेत् वगैरे जो आलेला आहे, याचा अर्थ म्हणजे 'असत्यम् न वदेत्' हा करायचा आहे. असत्य बोलायचं नाही, हा नियम आहे म्हणाले.**

असे प्रत्येक वाक्याचे अर्थ कसे आहेत. वाक्यशास्त्र, मीमांसाशास्त्र म्हणून जैमिनी महर्षिंनी तयार केलेले आहे. वेदवाक्यांचा अर्थ कसा करावा? आणि ते सगळे नियम, व्यवहारामधे सुद्धा उत्तम लागू पडणारे आहेत. मोठा विषय आहे तो. तर याप्रमाणे पराशर महर्षि सर्वज्ञ अशा प्रकारचे आहेत. सर्व ऋषींच्या इच्छेप्रमाणे त्यांनी सर्वही ब्राह्मणधर्म सांगितला, आचारधर्म सांगितला.

महाराजांनी या ब्राह्मणाला सांगितलं. मोठा धर्मशील ब्राम्हण आहे. आपल्या हातून धर्माचरण व्हावं. जन्म चांगला आलेला आहे, क्षेत्रामध्ये गाणगापुरामधे आपण जन्माला आलेलो आहोत, महाराजांची संगती आहे, दर्शन आहे, अशा स्थितीमधे आपल्या हातून धर्माचरण नित्य व्हावं, कांहीही, केव्हाही चुकू नये अशी तळमळ आहे. त्यामुळे महाराजांनी, आणखी त्याला सर्वही समजावून सांगितलं आणि त्याला आशीर्वाद दिला. जा म्हणाले, तुला कांहीही कमी पडणार नाही. न मागणाऱ्याला कसा चालायचा संसार अशी भीती वाटते, पाहणाऱ्यालाच भीती वाटते. तो पाळणारा जो आहे त्याला सगळं माहिती आहे. त्याचं धैर्य किंवा त्याची ईश्वरनिष्ठा कशी असेल, ईश्वर तशी प्रेरणा करतो. कार्य त्याचे चालवितो आहे.

त्या काशी क्षेत्रामधे असेच एक ब्राह्मण होते, अग्निहोत्री. चांगले उत्तम, आणखी, कर्मानुष्ठान करणारे, त्यांच्या घरी कोणी आलं तर त्यांची व्यवस्था त्यांनी करावी, अतिथीला सहाय्य करायचं. क्षेत्रामधे बिचारे लांबून येतात, आपण होईल तेवढं सहाय्य करायचं. एके दिवशी काय झालं, त्यांची स्त्री म्हणा कुठे गेली होती, कांहीतरी, घरी कांही मंडळी आली त्यांना नैवेद्य करायचा होता. मग आता घरात स्वयंपाकाला कोणी नाही. हे बाहेर पडले कोणी मिळतंय कां बघायला. इतक्यात एक स्त्री त्यांना भेटली मधे. साधारण बरंच वय झालेलं होत. काय अहो, गुरूजी महाराज, म्हणाले, काय कुठे चाललात? काय काम आहे? मला म्हणाले स्वयंपाकाला

आमच्या घरी कोणी नाही. मी येते म्हणाली. ती स्त्री आलेली आहे. स्वयंपाक वगैरे केलेला आहे. सगळ्या मंडळींचा तो नैवेद्य वगैरे विश्वेश्वराला अर्पण केला, त्यांनाही प्रसाद मिळाला आणि ती मंडळी निघून गेली. ती स्त्रीही निघून गेली. इकडे अन्नपूर्णेच्या मंदिरामधे अन्नपूर्णेच्या मूर्तीची नाकात असलेली नथ नाहीशी झाली. झालं. पोलीस आलेले आहेत, चौकशी करायला लागले. अगोदर धरायचं म्हणजे त्या पुजाऱ्यालाच धरायचं. तो म्हणाला, मी आणखी व्यवस्थित सगळं, पूजा करून आणखी दार झाकून, कुलूप लावून गेलो होतो. मला काय माहीत? नाही म्हणाले, तूच चोरी केलेली आहेस. आता काय करायचं? मग, शेवटी काय झालं, त्या अधिकाऱ्याला आणखी दृष्टांत झाला. अन्नपूर्णा देवीनं सांगितलं, माझी नथ, अमुक आणखी अहिताग्नी अग्निहोत्री जे गुरूजी आहेत, त्यांच्या स्वयंपाक घरातल्या कोनाड्यामध्ये माझी नथ आहे, ती घेऊन या म्हणाली आणि गेले मिळाली नथ. तिथच ठेवली होती. तो बिचारा पुजारी सुटला. आणि हे जे दीक्षित होते, अहिताग्नी दीक्षित, काय त्यांचं पुण्य आहे, **आपल्या हातून आणखी योग्य कर्म घडावं एवढी नुसती सद्वासना पाहिजे माणसाला. ती वासना अशुद्ध उपयोग नाही, शुद्ध वासना पाहिजे. प्रत्यक्ष देवी अन्नपूर्णेनं त्यांच्या घरी येऊन स्वयंपाक करून सगळं आणखी नैवेद्य, वैश्वदेव हे सगळं झालं. आणखी प्रसाद मिळाला.**

तर अशा गोष्टी आहेत, पुष्कळ. श्रद्धा ज्यांच्या मनामधे आहे, त्याप्रमाणे त्यांना सहाय्य ईश्वराचं होतं आहे वेळोवेळी. हा ब्राह्मण त्यापैकी भाग्यवान होता मोठा. तळमळ आहे, आपलं धर्माचरण झालं पाहिजे.

ब्राह्मणस्य हि देहोऽयं क्षुद्रकामाय नेष्यते ।
कृच्छ्राय तपसे चेह प्रेत्यानन्तसुखाय च । (भा. ११.१७.४२)

अनंत सुख मिळवायचंय आपल्याला, इच्छा करताना सुद्धा स्वान्त सुखाची इच्छा कशाला करायची? क्षुद्र काम म्हणाले. क्षुद्र आहे ही इच्छा. धन मिळावं, **मान मिळावा, हे सगळ आपलं कीर्ति आपली व्हावी ही इच्छा क्षुद्र आहे, कांही त्यात अर्थ नाहीये. आपल्याला जे ब्रह्मसुख आहे, अनंत सुख आहे, ब्रम्हानंद जो आहे तो मिळवायचाय आपल्याला. तो शेवटी आपल्याला निश्चित मिळणार आहे.** जर आपण जन्मभर, आयुष्य असेपर्यंत आपलं कर्तव्यकर्म करुन ईश्वरार्पण बुद्धीनं जर आपण केलं, तर आपल्याला ते निश्चित मिळणार आहे. थोरले महाराज नेहमी संचारात असताना आणि असे सांगायचे, ब्राह्मणांना मुद्दाम उपदेश करायचे. संध्या तरी करीत चला. निदान देवाची भक्ती वगैरे करा तुम्ही, भक्ती करू नये, असं नाही पण संध्या केल्याशिवाय कशाचाच अधिकार नाही ब्राह्मणांना.

संध्याहीनोऽशुचिर्नित्यमनर्हः सर्वकर्मसु ।
यदन्यत् कुरुते कर्म न तस्य फलभाग्भवेत् । (दक्षस्मृति २.२७)

आहे. संध्या ज्यांनी केली नाही त्यांनी बाकी वाटेल ती पूजा अर्चा केली किंवा दानधर्म केला तरी कांही त्याचा उपयोग नाही. ब्राह्मणांना मोठी जबाबदारी आहे. तर असं नेहमी सांगायचे. आणखी सुधारणा, कुणाला येत नाही, आम्हाला, संध्या शिकवायचे स्वतः. संध्या, वैश्वदेव, पूजा सगळं शिकवायचे, लिहून द्यायचे. असा धर्मप्रचार आणखी त्यांनी केलेला आहे. सांगितलेला आहे सर्वांना. याप्रमाणे, स्नानसंध्यादिक हे जे नित्यकर्तव्य कर्म आहे, ती करून व्यवहारही करता येतो, नाही असं नाहीये. करायची ज्याला तळमळ आहे, उत्कट इच्छा आहे, तो सगळं करू शकतो.

तेव्हा ब्राह्मणाची सगळी इच्छा पूर्ण झाली, महाराजांचा आशीर्वाद मिळाला, त्याच्या इच्छेप्रमाणे त्याला संपूर्ण दिवसभर तो आणखी कर्मानुष्ठान करतो आहे आणि जो आनंद आहे तो घेतो आहे, सगळे देवसुद्धा आणखी त्याचं यश चिंतन करतायत. याप्रमाणे कर्मयोग म्हणून जो आहे तो कसा असावा, शुद्ध कसा असावा या बद्दलची ही कथा सिद्धाने नामधारकांना सांगितलेली आहे.

याच्यानंतर आणखी भक्तियोगाच्या कथा सुरू झालेल्या आहेत. गाणगापुरामधे, आणि महाराजांचा मुक्काम नित्य आहे, तिथंच आहे, कुठं जाणं नाही, येणे नाही. कांही नाही. एकदा त्या कुमसी गांवाला गेले होते फक्त, त्यांची वृत्ती सुधारायची होती त्रिविक्रमभारतींची म्हणून, बाकी कुठं जाणं नाही, येणं नाही. भक्तांचं आणखी भाग्य आहे, सकाम भक्त जरी असले तथापि त्यांना प्रत्यक्ष परमेश्वराची आणखी भेट होती, दर्शन होतं, त्यांच्याकडून मार्गदर्शन होतं आहे, तेव्हा असे सकाम भक्त सुद्धा, जास्तीत जास्त तेच असायचे आणि त्यांनी येऊन महाराजांची पूजा, नैवेद्य, भिक्षा वगैरे करावी. रोज असे श्रीमान लोक पुष्कळ येत असत. प्रत्येकाचा दिवस ठरलेला आहे. आज अमक्याची भिक्षा, उद्या तमक्याची भिक्षा, महिना महिना, कांही वेळ नाही.

एके दिवशी, जवळच्याच गांवातला एक ब्राह्मण, **भास्कर भटजी** त्याचं नांव, महाराजांना भिक्षा घालायची आहे, स्वयंपाक करून, अशी मनांत इच्छा आहे. प्रेम आहे, भक्ती आहे. एका गाठोड्यामधे कांही तांदूळ, डाळ म्हणा, कणिक म्हणा असं काही सगळं शिधा बांधून घेतलेला आहे. तीन ब्राह्मण, तीन माणसांना पुरेल, इतकं अन्न तयार होईल. तीन माणसांचा शिधा बांधून घेऊन ते गाठोडं घेऊन तो गाणगापुरात आला एके दिवशी. दुपारी बारा वाजलेले होते, तिकडे आणखी सर्व सुरु झालेल होतं. अन्न संतर्पण होतं त्या दिवशी, कोणीतरी आलेला होता. पानंबिनं मांडण्याची गर्दी, गडबड चाललेली होती, या ब्राह्मणाला लोकांनी सांगितलं, जा हो म्हणाले लवकर आंघोळ करून या, जेवायची वेळ झाली, पानं मांडतायत, चला लवकर. हा आला स्नान-संध्या करून आला. पानावर बसलेला आहे, जेवणं झालेलं आहे आणि ते गाठोडं उशाला घेऊन निजून

राहिला, विश्रांती म्हणून. एक दिवस गेला, दोन दिवस गेले, तीन दिवस गेले, तीन महिने गेले. त्याला कांही तिथे शिरकाव नाही. लोकांना समजलं, त्यांनी त्याचं गाठोडं पाहिलं होतं. महाराजांना भिक्षा घालायची आहे. त्या तीन महिने याचा प्रवेश नाही. महाराजांना भिक्षा कितीतरी लागलेल्या आहेत म्हणाले, एकापाठीमागे एक. तुला कुठे वेळ आहे? आणि तू काय एकट्या महाराजांना घालणारेस काय? आम्ही सगळे, बाकीच्यांचं काय करणार? पण हा अत्यंत ऋजू स्वभावाचा आहे. सरळ वृत्ती आहे, कांही त्याच्यामधे वाकडेपणा कांही नाही. तीन माणसांना पुरेल इतकी सामुग्री, इतका शिधा माझ्याजवळ आहे. सरळ सांगितलं त्याने. आणि मला महाराजांना भिक्षा घालायचीय.. लोक जास्तीच निंदा करायला लागले. काय म्हणाले सांगतोय महाराजांना भिक्षा घालायची आहे, हे नुसतं ढोंग आहे. यथेच्छ जेवणाची व्यवस्था इथे आहे. याला समजलं असेल. रोज पंचपक्कान्नाचं जेवण मिळतंय, बराय. सांगायचं तेवढं हे की, महाराजांना भिक्षा करण्याकरता मी आलेलो आहे. लोकांमधे आपला मोठेपणा दाखिवण्याचा प्रयत्न करायचाय. काया, वाचा, मनाने हे करायचंय. खरा मोठेपणा नाही. खरी इच्छा याला जेवणाची आहे, उत्तम जेवण मिळतंय, चांगलं आहे, म्हणाला. इथं मठात राहू या, असं बोलायला लागले.

एकदा महाराजांच्या कानावरती ही गोष्ट गेली. स्नान करून यायचा नमस्कार करायचा, बसायचा, बाजूला जेवण करायचा, राहायचा, निजायचा, तिथं सगळी व्यवस्था होती. हा बिचारा ब्राह्मण. याला कोणीच येऊ देत नाही म्हणाले. म्हणून एके दिवशी सकाळी उठल्याबरोबर त्याला बोलावलं. काय भास्कर भटजी, आज तुम्ही म्हणाले स्वयंपाक करा. तुम्ही आणलेला आहे ना शिधा, आणि आज तुमची भिक्षा आम्ही घेणार. सगळ्या लोकांमधे हे समजलं की महाराजांना हा आज भिक्षा घालणार आहे. जी कांही श्रीमंत मंडळी आली होती त्यांना थांबाव लागल. आज नाही, म्हणाले. आज कोणाची, दुसऱ्याची भिक्षा नाही म्हणाले. हे भास्कर भटजी भिक्षा घालणार आहेत आम्हाला. बराय, म्हणाले, त्यानी कबूल केलं, करतो म्हणाला. ब्राम्हण मंडळी सगळी आलीच होती. या सगळयांना निमंत्रण द्या म्हणाले की आज आपण महाराजांच्या बरोबर आणखी प्रसादाला या. महाराज जसं सांगतील तसं वागायचं. बराय. ब्राह्मण मंडळींना नमस्कार करून, या महाराज, आज आपण या, मठामधे, भिक्षेला. आज भिक्षा मला करायची आहे. कांही बोलले नाहीत ते बिचारे. काय भिक्षा करणार ? हा काय करणार ? लवकर स्नान संध्या वगैरे करून या म्हणाले महाराज. ते लगेच गेले नदीवर स्नानाला.

त्यांना वाटलं, आज याची भिक्षा आहे, याच्याजवळ तर धान्य अगदी थोडं आहे, तीन माणसाशिवाय जास्ती माणसांना, एकाही माणसाला, याचा शिधा पुरणार नाही. महाराजांनी याला सांगितलं, हाही आम्हाला बोलला, या महाराज, जेवायला या म्हणाला. काय नुसतं जेवायला या म्हणून सांगून काय तिथे जेवण काय मिळणार आहे? तरी म्हणाले, मठामधे

पुष्कळ धान्य आहे, पोतीच्या पोती आहेत, महाराज म्हणाले, त्या धान्याचा स्वयंपाक करिवणार असतील आणि म्हणून त्यांनी आम्हाला जेवायला बोलावलं, याला सांगून अशी कदाचित व्यवस्था करण्याची त्यांची इच्छा असेल. कांही का असेना, आपण स्नान-संध्या सगळ आटोपून जायचं म्हणाले.

झालं. यांचा तीन माणसांचा स्वयंपाक होण्याला किती वेळ लागणार आहे? स्वयंपाक तयार झालेला आहे. कांही भाजी वगैरे आणली. तूप, साखर काय आणायचं ते आणलं त्यानी तेव्हढ्यापुरतं, स्वयंपाक तयार झालेला आहे. आणखी महाराजांना सांगतो आहे. स्वयंपाक तयार आहे. मग ब्राह्मणांना बोलावून आणा म्हणाले. म्हणजे याच्या मनावरती कांहीही परिणाम नाहीये. ब्राह्मणांनी विचार केला, मठातली सामुग्री असेल त्याचा स्वयंपाक करत असतील, त्यांचे विचार, याला कांही नाही आपण जेवायला बोलावलेलं आहे, आणि आपण आता स्वयंपाक आपल्याजवळ इतकाच आहे, इतक्या ब्राह्मणांना बोलवायला सांगतात महाराज. जेवायची वेळ झालेली आहे. या वेळेला इतक्या लोकांना जेवण कसे घालायचं? **आपल्याजवळ सामर्थ्य नाही याचीही जाणीव नसली पाहिजे. सामर्थ्याची तर जाणीव नसलीच पाहिजे पण असामर्थ्य आहे, अशक्ती आहे आपली, याचीही जाणीव नको. ईश्वराची इच्छा जशी असेल तसं होईल.** त्यांची आज्ञा ज्याप्रमाणे आहे, बोलवायला, बोलावून आणा, ब्राह्मणाला, बराय, निघालेला आहे. जेवायला बोलवायला निघालेला आहे हा ब्राह्मण. स्वयंपाक तर तीन माणसापुरताच तयार झालेला आहे. पण कांहीही नाही, भीती नाही, आपल्याला आणखी सबंध अपमान होईल आपला, कांही कां होईना.

नमस्कार केला, चला महाराज लवकर. महाराजांनी बोलावलंय तुम्हाला जेवायला. आता तिथं काय समोर महाराज नव्हते, कांही नव्हतं. ते लोक उलट बोलायला लागले. म्हणाले काय जेवायला घालणार आम्हाला तू ? तुझ्याजवळ किती धान्य आहे आम्हाला माहितंय ! एकेका माणसाला एक एक शीत जरी वाटायचं म्हटलं तरी इतक्या लोकांना वाटण्याला इतकी शितं तरी आहेत का तुझ्याजवळ? आणि जेवायला बोलवायला येतोस, कांही वाटत नाही म्हणाले. कांही विचारी ब्राह्मण होते, ते म्हणाले, अरे, महाराजांनी सांगितल्यावरून तो आलेला आहे, तुम्ही त्याला कां बोलता म्हणाले. महाराजांची आज्ञा आहे, म्हणून आलेला आहे, चला, लवकर चला म्हणाले. अशी त्यांची बोलाचाली झाली. त्यांनी आधी सांगितलं, जा म्हणाले, तू पुढं. महाराजांसाठी तू स्वयंपाक केलायस ना, महाराजांना जेवायला वाढ, आम्ही येतो सावकाश. इतक्या लवकर स्वयंपाक कसा होईल म्हणाले. आला बिचारा ब्राह्मण. सांगितलं महाराजांना, की महाराज, ते म्हणतात की आम्ही सावकाश जेवू, म्हणतात, रात्री जेवू, आपल्याला भिक्षा करायला सांगतायत. महाराज म्हणाले, नाही म्हणाले, त्यांना घेतल्यावाचून

आपण कांही भिक्षा करणार नाही. आता मोठी अडचण आली. मग त्यांनी सांगितलं की, उगीच माझी थट्टा मस्करी करतात म्हणाले, कांहीही बोलतात. माझं कांही ऐकतच नाही ते. म्हणाले मग आपल्या दुसऱ्या शिष्याला पाठवलं, महाराजांनी, जा म्हणाले, लवकर बोलावून आण त्या सगळ्या ब्राह्मणांना. त्यांनी जाऊन सांगितलं, तुम्हाला लवकर यायला सांगितलंय. चला म्हणाले, त्या ब्राह्मणाची थट्टा कशाला करता? म्हणाले. आली, सगळी ब्राह्मण मंडळी आली. पत्रावळी करा म्हणाले. त्यावेळेला पत्रावळी करण्याची पद्धत असे. पळसाची पानं रानातून आणायची, ताज्या पत्रावळी करायच्या, सगळंच ताजं होतं.

सगळ्या पत्रावळी वगैरे तयार झाल्यायत, घाला म्हणाले, पानं घाला. पानं वाढलेली आहेत. आणखी ते अन्न आमच्याजवळ आणून ठेवा म्हणाले. ती भांडी काय चार पांच भांडी असतील, पातेली, काय, आमटी काय, वरण काय, कांही भाजी म्हणा. भात म्हणा. कांही असेल, तेवढी भांडी आणून ठेवली, आपल्या अंगावरची छाटी दिली. त्याच्यावर झाकून ठेवा म्हणाले, आणि कमंडलूतलं पाणी घेऊन त्याच्यावर आणखी प्रोक्षण महाराजांनी केलं आणि ते वस्त्र न उघडताना, खालूनच अन्न तुम्ही काढा म्हणाले. मोठ्या, मोठ्या पराती आणलेल्या आहेत, त्यातून अन्न काढतायत. त्या पराती भरल्या, भाताने परात भरली, वरणाचं पातेलं भरलेलं आहे सगळं, भाजी पुष्कळ झाली. छाटी उघडू नका म्हणाले. आणि वाढायला लागले. उठा म्हणाले सगळे लोक, सगळ्यांनी ती पात्र मांडलेली आहेत. गांवातले सगळी ब्राह्मण मंडळी, सगळी जेवायला बसलेली आहेत. संकल्प सोडायला सांगितला. त्याने संकल्प सोडलेला आहे. **काय संकल्प सोडायचा आता. ब्राह्मणभोजनं करिष्ये !** मी करतो ब्राह्मणभोजन. कसं त्याला वाटेल. पण महाराज सांगतात तसं बोलायचं. बसा म्हणाले, जेवायला. आणखी वाढायला लागलेली आहेत मंडळी, जेवणं चाललेली आहेत. तेही आणखी वाढताना आग्रह करून वाढतायत, तूप आहे, साखर आहे, काय असेल ते सगळं वाढतायेत. पुरे पुरे म्हणतायत, आकंठ अगदी तृप्त झाले भोजन करून. उठून गेली मंडळी. जेवण झाल्यानंतर पुन्हा ती पात्र जेवण झाल्यावर काढलेली आहेत. सगळया बायकांना बोलवा म्हणाले. बायका जेवून गेल्या. इतर सर्वही मंडळी गांवातली, त्या सगळ्यांना बोलवा म्हणाले. त्यांची जेवणं झाली. अजून ती कांही छाटी वर काढलीच नव्हती. आणखी जे कांही बाकीचे लोक राहिलेले आहेत त्यांना वाटेल तितकं अन्न वाढून द्या म्हणाले. त्यांनाही वाढून दिलेलं आहे. मग त्याला सांगितलं, त्या ब्राह्मणाला, गांवामधे कोणी जेवायचं राहिलं नाही ना, उपाशी नाही ना, बघा म्हणाले. दवंडी पिटून, सगळीकडे अगदी जिकडे तिकडे, कोणी जेवायचं राहिलं असेल, भुकेलं असेल तर या जेवायला मठात, अन्न घेऊन चला वाटलं तर. कुणीही नाही. सगळे तृप्त आहेत. चार हजार मंडळी ! लहान गांव होतं ते. आताही लहानच आहे. सगळ्यांचं भोजन झालेलं आहे. मग त्या

भास्कर भटजींना महाराज म्हणाले, तुम्ही आता जेवण करा. महाराजांची तर भिक्षा झालेलीच आहे पूर्वी. त्याचंही जेवण झालं. आता म्हणाले, किती अन्न राहिलेलं आहे पहा एकदा. छाटी उघडली, ती भांडी तशीच भरलेली आहेत. स्वयंपाक जसा केला होता तसंच्या तसं शिल्लक आहे. बरं. ते सगळं अन्न घेऊन नदीमधे आणखी टाका म्हणाले. मासे वगैरे असतील, जलचर प्राणी, त्यांनाही मिळू दे. याप्रमाणे हे अन्नदान झालं त्या दिवशी. महाराजांनी त्यांनाही आशीर्वाद दिलेले आहेत. अखंड आणखी तुम्हाला संपत्ती, ऐश्वर्य तुम्हाला लाभेल आणि स्वतःच्या निर्गुण पादुकांची पूजा तुम्ही करत चला म्हणून त्यांना सांगितलं.

आज गाणगापुरामधे जे पुजारी आहेत, ते या भास्कर भटजींच्या वंशातले आहेत. काश्यप गोत्र त्यांचं आहे. त्या भास्कर ब्राह्मणावरती महाराजांची कृपा **इतकी अशी झाली. याचं कारण अत्यंत शुद्ध बुद्धी आहे. विकल्प नाही मनामधे. सगळ्यांना जेवायला सांगा. अहो, कसं सांगू महाराज, माझ्याजवळ कुठाय इतकं? तू करणार आहेस कां? याच्या मनात कांही नाही. मी कांहीच करत नाहीये. हे नुसतं म्हणणं सोपं आहे, देवाने सगळं करायचं, देवच सगळं करता करविता आहे, नुसतं आम्ही कितीतरी वेळा म्हणतो, घोकतो, परंतु बुद्धी मात्र मी केलेलं आहे. माझं लोकांनी पहावं, मला माझं वर्णन करावं, ही वासना मात्र मनांतली कांही जात नाही.** यांच्या अंतःकरणामधे मात्र सर्व कर्तृत्व हे परमेश्वराचं आहे. महाराज हे सगळं करणारे आहेत ते करवून दाखवलं महाराजांनी. पण त्याला सुद्धा निमित्त याची बुद्धी झाली. अंतःकरणातला अभिमान, कर्तृत्व अभिमान संपूर्ण नाहीसा झाल्यानंतर देव सगळं करतो आहे, नाही असं नाही. नेहमीच देवच सगळं करतो आहे. आम्ही करतो म्हणजे काय करतो आम्ही? आमच्या मनाने, बुद्धीने विचार करतो, निश्चय करतो, त्याचप्रमाणे वाणीनं बोलत, याला बोलाव, त्याला बोलाव सहाय्याला, पैसा असेल तर पैसा खर्च करतो, सगळी सामग्री जमा करतो. हे जे सगळं आमच्याकडून चाललेलं आहे, असं जे आम्ही समजतो, आमची इंद्रियं आहेत, आमचं मन आहे, आमचं धन आहे, सगळी मंडळी आम्ही जमवलेली आहेत, आमचं ते ऐकतायत आणि सगळी आमच्या इच्छेप्रमाणे काम करतायत, म्हणजे मी मोठा आहे. वस्तुतः म्हणजे इंद्रियं काय आमची आहेत कां? आमची इंद्रियं, आमचं मन म्हणायचं झालं तर त्यांच्यामधे जर कांही बिघाड उत्पन्न झाला तर ते आपण सुधारू कां शकत नाही? डोळे बिघडले, कान बिघडले, अमुक झालं, तमुक झालं, **स्वतःची मालकी ज्या वस्तुवरती आहे, त्या वस्तुमधे आणखी कांही जर बिघाड झाला तर दुरुस्त आपल्याला कां करता येत नाही?** प्रत्येक इंद्रियांच्या वेगळ्या वेगळ्या देवता सांगितल्या आहेत. त्या त्या देवतांशी त्या त्या इंद्रियांचा संबंध जोडून दिलेला आहे. तो संबंध जोपर्यंत असतो तोपर्यंत त्या इंद्रियांचं कार्य चाललेलं आहे, आपण फक्त म्हणायचं माझे

डोळे, माझे कान, माझं मन, माझी बुद्धी, नुसतं म्हणायचं. म्हणजे हे सुद्धा कार्य जे चाललेलं आहे, नेहमी, ते कार्यसुद्धा ईश्वराने जे कांही नेमून दिलेलं अधिकारी जीवात्मे आहेत, त्या जीवात्म्यांचा संबंध, शरीरांतर्गत सर्वही आणखी ज्ञानेंद्रियं, कर्मेंद्रिय वगैरे सर्वाशी असल्यामुळेच ते कार्य होत आहे. प्राणवायू बाहेर गेलेला आंत कसा येतो, आंतला पुन्हा बाहेर कसा जातो, याचंसुद्धा तो उत्तर देऊ शकत नाही. ती सुद्धा व्यवस्था ज्यांनी लावलेली आहे, तोच खरा कर्ता आहे. संरक्षक तोच खरा आहे. ही बुद्धी आणखी संत महात्म्यांची निश्चित आहे, म्हणून त्यांना कोणत्याही प्रकारची चिंता नाही. मान होईल, अपमान होईल कांही नाही. भास्कर भटजींना कांही वाटलं नाही. इतक्या लोकांना जेवायला मी कसं सांगू? त्यांना काय वाढू? **माझ्याजवळ काय आहे? माझं कांहीच नाही, माझ्याजवळ कांहीच नाही. माझं शरीर सुद्धा माझं नाहीये.**

बलीराजाने मोठं दान केलं. चांगलं आहे. गुरूचंही ऐकलं नाही. शुक्राचार्यांनी ठरवलंय म्हणाले, एकदा ब्राह्मणाला वचन दिलंय, मी देणार. तु एकदा त्याच्या हातावर पाणी सोडलं की हा किती मोठ रुप धारण करणार आहे तुला कल्पना नाही. दोन पावलामध्येच तुझी सगळी मृत्युलोक आणि स्वर्गलोक सगळा व्यापून जाईल तिसरा पाय यानी कुठे ठेवायचा हा विचार तू केला नाहीस, नाही. कबूल केल म्हणतोय. काय होईल ते होईल. मी माझी आणखी प्रतिज्ञा पूर्ण करण्याला समर्थ आहे. म्हणून सांगून–सगळ दान केल आणि ते वामनानी ज्यावेळेस मोठं विश्वरुप धारण केलं, सगळं त्याच राज्य व्यापलं दोन पावलांनी आणि तिसरा पाय कुठ ठेवायचा. तू तीन पावलं भूमी देतो म्हणून आणखी कबूल केलेलं आहे, दान करण्याचं कबूल केलेलं आहे, ते जर दान तू आता पूर्ण करू शकत नाही या वेळेस, या व्यतिरिक्त तुझ्याजवळ भूमी नाही, मी तुला जर सांगितलं आमच्या जागेत रहायचं नाही तर तुला बाहेर जावं लागेल. इथं तुला राहाता येणार नाही. हे सगळं आणखी तुझं राज्य माझं झालेलं आहे. पण ब्राह्मणाला एकदा देतो म्हणून विश्वास दाखवून तू फसविणार आहेस. तिसरा पाय कुठे ठेवायचा सांग, नाहीतर चल नरकाला चल म्हणाले. बांधून टाकलं त्याला. तो ही म्हणाला, मी ठेवतो, माझी प्रतिज्ञा पूर्ण करतो. माझं शरीर अद्यापी शिल्लक आहे की, म्हणाला.

यद्युत्तमश्लोक भवान् ममेरितं वचो व्यलीकं सुरवर्य मन्यते ।
करोम्यृतं तन्न भवेत् प्रलम्भनं **पदं तृतीयं कुरु शीर्ष्णि मे निजम् ॥ (भा.८.२२.२)**

तुमचा तृतीय पाद माझ्या शरीरावरती, मस्तकावर ठेवा की, माझं शरीरही मी तुम्हाला दिलेले आहे, आत्मनिवेदन भक्ती त्यानी केलेली आहे. शरीरही अर्पण केलेलं आहे. याप्रमाणे तीन पावलं भूमी दिली की नाही म्हणाले. माझी प्रतिज्ञा खरी झाली की नाही? असं तो अभिमानानी बोलतो आहे. त्याची स्त्री म्हणाली, त्या वेळेला, वामनाला, काय महाराज, दान

केलं यांनी, सर्वस्व दिलं आपलं. हे बाहेरून सगळं झालेलं आहे. परंतु यांच्या मनामधे मात्र अद्यापी 'मी मोठा', समर्थ आहे म्हणून मी ही त्रिपाद भूमी दान करू शकलो हा अभिमान अद्यापी याच्या मनामधे आहे. **हे सगळं माझं आहे, असं हे समजतायत.** सर्व राज्य माझं होतं, दोन पावलं त्या राज्यानी व्यापली. त्यानंतर शरीर माझं आहे. हे मी देतो तिसऱ्या पावलाला. म्हणजे **दान करताना हे राज्य आणि हे शरीर माझं आहे असं समजून यांनी दान केलेलं आहे, दाता मी आहे अशी त्यांची समजूत आहे. त्यामुळे या दानामध्ये महत्त्व नाहीये.**

क्रीडार्थमात्मन इदं त्रिजगत् कृतं ते स्वाम्यं तु तत्र कुधियोऽपर ईश कुर्युः ।
कर्तुः प्रभोस्तव किमस्यत आवहन्ति त्यक्तह्रियस्त्वदवरोपितकर्तृवादाः **(भा.८.२२.२०)**

संपूर्ण विश्वाचे मालक आपण आहात महाराज. हे विश्व निर्माण कोणी केलं? **शरीर यांनी निर्माण केलंय काय? की माझं शरीर आहे म्हणायला यांना अधिकार काय? शरीर उत्पन्न कोणी केलेलं आहे?** राज्य उत्पन्न, सृष्टी उत्पन्न कोणी केलेलं आहे ? तो बाजुलाच राहिला आणि मी राजा आहे. माझं शरीर आहे समजून आणि अर्पण करतायेत. त्यापेक्षा हे सर्वही आपलं आहे महाराज, मी काय देणार? **माझं स्वामित्वच नाहीये. स्वामी आपण आहात, हे आपलं आपण घ्या, एवढंच सांगितलं असतं तर हे दान अत्यंत उत्कृष्ट ठरलं असतं. माझ्या राज्याचं दान मी केलं, माझ्या शरीराचं दान मी केलं, या दानाला महत्त्व नाहीये. अंतःकरणामधे आणखी निर्मोह अवस्था आहे. विवेक पूर्ण आहे, अविवेक नाहीये. हा विवेक जर अंतःकरणामध्ये उत्पन्न झाला तर तेच खरं दान आहे.**

दानाची व्याख्या भगवान गोपालकृष्णांनी निराळी केलेली आहे.

दण्डन्यासः परं दानं कामत्यागस्तपः स्मृतम् ।
स्वभावविजयः शौर्यं सत्यं च समदर्शनम् ॥ (भा.११.१९.३७) म्हणतात.

उद्धवजींना उपदेश करीत असताना, खरं दान, मुख्य दान कोणतं ? **दंडत्यागः । दंडःभूत द्रोहः ।** अशी व्याख्या श्रीधारस्वामींनी केलेली आहे. कोणच्याही भूताचा द्रोह न करणं, द्रोह सोडणं, **'कोणाही भूताचा नघडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे'** ईश्वराची पूजा, किंवा **खरं दान म्हणजे हे आहे, की कोणाचाही द्रोह करायचा नाही. हे खरं दान आहे.** पैशाचं, वस्त्राचं वगैरेही दानं ही आहेत. नाही असं नाही. परंतु अंतःकरण वृत्ती जर व्देषरहित झाली **''अद्वेष्टः सर्वभूतानाम्''** हे मोठं दान आहे. हा ज्ञानी महात्मा आहे. त्या ज्ञानी महात्म्याच्या अंतःकरणामधे कोणाबद्दलही द्वेष नाही. निंदा करणारा असो, अपमान करणारा असो, मारणारा असो, कोणाबद्दलही मनामधे द्रोह नाहीये. **अकृतद्रोहः ही एक व्याख्या आहे.** संतांची व्याख्या, संतांच्या लक्षणामधे कृपाळू

आणि अकृतद्रोहः. कुणाचाही द्रोह नाही. हे दान आहे आणि तप म्हणजे कामत्यागः तपः स्मृतम् म्हणतात भगवान. मनामधे ज्या अनंत इच्छा आपण करतो, मनोरथ करत असतो, मनोरथ कधीही थांबत नाहीयेत. हे पाहिजे, ते पाहिजे, हे मिळवायचं, ते मिळवायचं, **ह्या इच्छा जर कमी करता आल्या तर तीच तपश्चर्या आहे.** रानात जाऊन आणि अन्न सोडा, पाणी सोडा, अमुक करा, याला तपश्चर्या नाही म्हणत. **खरी तपश्चर्या म्हणजे कामत्यागः !**

तर अशा रीतीनं, महात्मे लोक जे आहेत, ज्यांच्याजवळ पैसा नाहीये, ते सुद्धा दान करू शकतात. सुदामजीनी पोहे नेले होते, बायकोने दिले होते बांधून, कोरडे पोहे. भगवंतांनीच आपण घेतले, मुठभर खाल्ले, काय यांना लाज वाटली. काय द्यायचं देवाला आपण. काय देवाचं ऐश्वर्य किती आहे, मोठे वैभव केवढं आहे, केवढा श्रीमंत परमात्मा आहे आणि हे पोहे द्यायचे? ते सुद्धा दुसऱ्याकडून मागून आणलेले. माझं कुठाय, माझे कुठले पोहे आहेत. दुसऱ्याच्या घरातून मागून आणलेले पोहे देवाला द्यायचे? हे, कसलं दान हे, नको, दान नको, देवाला मी दान कांहीही देऊ शकत नाही. त्यानेच उत्पन्न केलेले सगळे पदार्थ त्याच्या त्या पदार्थांनीच त्याची पूजा करायची ना ? **कासयाने पूजा करू देवराया । तुकाराम महाराज म्हणाले, देवा, तुझी पूजा मी कुठं, कशी करायची कशी ? तुमचंच सगळं आहे ना ? तुमचंच तुम्हाला द्यायचं, मी पूजा केली, असं म्हणायचं म्हणजे, किती द्रोह झाला नाही कां हा.** पण, ही अशा प्रकारची अंतःकरण वृत्ती जर ऋजु झाली.

स्वाध्यायस्तप आर्जवम् । (भ.गी. १६.१)

हा मोठा दैवीसंपत्तिपैकी गुण आहे. अगदी शुद्ध वृत्ती आहे, सरळ वृत्ती आहे, महाराजांनी सांगितलं बोलवा, बोलवा, जेवायला बसवा, कांही हरकत नाही. स्वयंपाक तयार करा, करा, झाकून ठेवा, झाकून ठेवला. काय चाललेलं आहे, हे ईश्वराचं सामर्थ्य, ईश्वरशक्ती कशी आहे, ती त्याला पहायला मिळाली, सगळ्या गांवातल्या लोकांनासुद्धा पहायला मिळाली. प्राकाम्य सिद्धि ज्याला म्हणतात, **प्रकामम् म्हणजे जो पदार्थ आहे, तो संकल्पाने परिपूर्ण वाटेल तितका व्हावा. याला प्राकाम्य सिद्धी म्हणतात.** अन्न अगदी थोडं आहे. तीन पात्रांचच अन्न आहे. तीन माणसांला पुरेल इतकं अन्न आहे, पण हे अन्न सर्वांना पुरलं पाहिजे, हा त्यांचा संकल्प झालेला आहे, मानसिक शक्ती इतकी मोठी आहे महात्म्यांची की त्यांचा संकल्प झालेला आहे की हे अन्न सगळ्यांना पुरलं पाहिजे. ते तसंच शिल्लक, सगळंच राहिलं, पण सगळ्यांना पुरलं म्हणाले. कांही त्यातलं खर्च झालं नाही.

ब्राह्मणांनी तीन पात्रांची सामुग्री आणलेली तेही तसंच राहिलेलं आहे. महाराजांना भिक्षा कोणच्या अन्नाने घातली त्याने, तीन माणसाचं अन्न त्यांनी आणलं होतं, शिधा आणला होता ना? त्या शिध्याचा तो स्वयंपाक केलेला आहे, तो शेवटी तसाच्या तसा, भांडी तशीच राहिली.

यानी भिक्षा कोणच्या अन्नानी घातली भास्कर भटजींनी? याचं काय उत्तर आहे. म्हणजे **त्यानी केलेले अन्न, त्या अन्नाला निमित्त करून महाराजांनी, त्यातूनच अनेक लोकांना पुरेल अशा प्रकारचं अन्न निर्माण केलेलं आहे. सगळ्यांना पुरलेलं आहे ते अन्न.** नुसत्या या कथा नाहीयेत. सगळे जेवलेले आहेत. अन्न निर्माण केले म्हणजे नुसता चमत्कार नाही. प्रत्येक सगळे, गांवातली सगळी मंडळी जेवलेली आहेत, तृप्त झालेली आहेत, कुणीही भुकेला राहिलेला नाही. हे ज्या अन्नाचं सामर्थ्य आहे, ते अन्न म्हणजे नुसती आणखी हातचलाखी कशी होईल. ही काय नुसती धूळफेक नाही. घडलेली हकीकत आहे. आणि त्यामुळे आरंभापासून हा सात्त्विकवृत्तीचा, दैवीप्रकृतिचा जो तो आहे ब्राह्मण, त्याला ते सगळं मिळालेलं आहे. पहायला मिळालं सगळं आणि त्या वृत्तीनेच तो आलेला आहे.

महाराज, दयाळू आहेत, आपल्याकडून हे करवून घेतील. ही सगळी त्याला खात्री आहे. त्याप्रमाणे त्यांच्या आज्ञेनं वागताना त्याच्या मनाला कांही चिंता वाटली नाही, भीती वाटली नाही. हे कसं सांगायचं जेवायला, कसं वाढायचं, इतकं अन्न कसं पुरणार? हे आमच्या चर्मचक्षुंना हे दिसतंय. **कारण ईश्वराची शक्ती आमच्या चर्मचक्षुंना दिसू शकत नाहीये. ईश्वरही दिसत नाही आणि ईश्वराची शक्तीही दिसत नाही. ती अचिंत्य आहे. केवळ मनानी विचार केला तर कांही ना कांही त्याच्यामधे आपल्याला उत्तर मिळतं, नाही असं नाही.** अशा अनेक कथा घडलेल्या आहेत आणि त्या कथांचं चिंतन केलेलं असताना, जे कांही दैवीप्रकृती संपन्न महात्मे आहेत, त्यांची इच्छा आणखी भगवंतांनी पूर्ण केली. हे आपण पुष्कळ ऐकतो, वाचतो, परंतु डोळ्यांनी दिसलं पाहिजे. नाही, नाही दिसणार नाही. डोळ्यांनी पाहून या कथेचा निवाडा कोणीही करू शकणार नाही. इतक्या तीन माणसाच्या अन्नामधे इतकी माणसं जेवली कशी? त्याला उत्तर म्हणजे हे आम्हाला मान्य नाही, पटत नाही, एवढं एकच उत्तर. सगळ्याही अशा कथेला एकच उत्तर आहे. हे कसं झालं? ते कसं झालं? त्याचा गर्व कसा गेला. त्याचं हे कसं झालं? याचा अहंकार, हे सगळं खोटं आहे हो. कांहीतरी लिहलेलं आहे. ठराविक उत्तर द्यायचं. दुसरं उत्तर नाहीये, चिकित्सकांच्याकडे ! परंतु अशा दृष्टीने भक्तिमार्ग जो आहे त्या **भक्तिमार्गाचं हे पहिलं उदाहरण आहे.** कशी भक्ती आहे? भक्तियोग कसा असतो, **अगदी शुद्ध बुद्धी आहे. कर्तृत्व आपलं नाहीच आहे. ईश्वराचं कर्तृत्व आहे ना.** ही बुद्धीची धारणा इतकी निश्चित आहे की त्यामुळे घडून गेलं सगळं.

याप्रमाणे याच्या पुढची दुसरी कथा आहे. सोमनाथ नांवाचा एक ब्राह्मण त्या गांवातच रहात होता. आणि त्याची पत्नी गंगा नांवाची. संतती नाहीये. ती आपली रोज मठामधे जात होती. निरांजन घेऊन जावं तिनं. महाराजांना नमस्कार करावा, निरांजन ओवाळावं महाराजांना आणखी यावं घरी. कांही बोलत नव्हते महाराज. बरेच दिवस गेले. एके दिवशी ती बाई

निरांजन घेऊन आली आणि ओवाळायला लागली. काय गंगाबाई, म्हणाले, काय तुम्ही रोज रोज आरती करता म्हणाले आमची, आणखी ओवाळता, काय तुमची इच्छा आहे? काय सांगा तरी. ती म्हणाली, महाराज, काय सांगायचं तुम्हाला. माझ्या घरामधे मुलगा नाही म्हणाली. **ग्रहरत्नानि बालकः।** बालक घरामधे फिरणं, आणखी, हे घरातलं खरं रत्न आहे, घरातलं खरं रत्न आहे ते, म्हणाली. ते माझ्या घरात नाहीये, दुर्देवी मी आहे. स्नानाला गेले किंवा कुठेही बाहेर गेले म्हणजे बायका आपल्या आपल्या मुलांना कडेवर घेऊन येतात आणि मला खाली मान घालावी लागते, मला मुलगा नाही, कडेवर मुलगा नाही. अपमान माझा होतो आहे, जाता येत नाही बाहेर कुठेही. अशी स्थिती आहे. मी, मला कुणी सांगितलं, म्हणाले, अश्वत्थ वृक्षाची उपासना तुम्ही करा. अश्वत्थ हे परमेश्वराचं स्वरूप आहे.

अश्वत्थः सर्ववृक्षाणां *देवर्षीणां च नारदः* / **(भ.गी. १०.२६)**

मूलतो ब्रह्मरूपाय मध्यतो विष्णुरूपिणे ।
अग्रतः शिवरूपाय अश्वत्थायनमो नमः ॥ (पूजासमुच्चयः)

त्रिमूर्तीस्वरूप अश्वत्थ आहे. त्याची पूजा करावी, ते व्रत सांगितलं कोणी, त्यामुळे पुष्कळ दिवस मी पूजा केली, प्रदक्षिणा पुष्कळ घातल्या म्हणाली. कांही मला उपयोग झाला नाही. माझा काळ फुकट घालिवला, मी माझं आयुष्य फुकट घालवलं असंही तिनं बोलून दाखिवलं. काय करायची सेवा अश्वत्थाची? काय उपयोग नाही, कांही नाही. स्वतःचं जे कांही कर्म आहे, त्या कर्माची आठवण ही आपल्याला नसते. आपण अगदी निष्पाप आहोत, कांही आपल्या हातून पाप घडलेलं नाहीये, म्हणून पुण्यकर्माचं फळ मिळालं नाही की मी इतकं पुण्यकर्म केलंय, हेच चुकीचं आहे. अश्वत्थाची प्रदक्षिणा अश्वत्थाला घातल्या, अश्वत्थाची सेवा केली, हे चुकीचं आहे, असंच ती सांगायला लागली आहे. स्वतःला नास्तिक वृत्ती उत्पन्न झाली, आणि दुसऱ्यालाही नास्तिक बनवायचा प्रयत्न चाललेला आहे. **याचं कारण काय आहे, की स्वतःच्या एकंदर पापपुण्याचं ज्ञान नाही. अज्ञान,** हा मोठा दोष आहे. **'अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ।'** हे तीन दोष मुद्दाम भगवंतानी सांगितले आहेत. अज्ञान हे गेलं पाहिजे, काय आहे, अश्वत्थ वृक्ष म्हणजे कोण आहे? त्याची सेवा म्हणजे काय आहे? हे जसं ज्ञान पाहिजे, तसंच आपल्याकडूनही कांही तरी कर्म घडली आहेत. आजपर्यंत आपल्याला मुलगा झाला नाही, याचं कारण, अश्वत्थ वृक्षाची सेवा केली, त्याचा कांही उपयोग नाही, हे आत्ता म्हणायला लागली. आत्तापर्यंत कां झाला नाही? आत्तापर्यंत काय अश्वत्थ वृक्षाची सेवा केली होती, आत्तापर्यंत कां झाला नाही मुलगा? म्हणजे कांहीतरी पूर्वीचं मानायला पाहिजे की नको, मग तेच अजून शिल्लक आहे असं मानायची

तयारी नाही. थोडंसं कर्म चांगलं झालं की लगेच अभिमान उत्पन्न होतो, मी इतक्या चांगलेपणानी चांगलं आणखी पुण्य केलं असताना झालं नाही, अर्थात ते सगळं खोटं आहे. अशी नास्तिक वृत्ती उत्पन्न होते आणखी आस्तिक्य बुद्धी संपून जाते, कांही नाही, याचं कारण अज्ञान.

आमच्या पूर्वकर्माचं अज्ञान. आम्हाला, सगळ्या जीवांना, पूर्वकर्माचे ज्ञान नाहीये. कुणी महात्मा भेटला एखादा, तर तो कारण सांगू शकतो. त्याचा परिहार कसा करावा, हा उपायही तो सांगू शकतो. म्हणजे आपण पूर्वी कांहीतरी पाप केलेलं आहे, दुष्कर्म केलेलं आहे, हे अगोदर कबूल केलं पाहिजे. तो एक विश्वास आहे. ते जाण्याचा उपाय त्या महात्म्यांनी सांगितलेला आहे, तो करायचा, म्हणजे त्याच्यावरही विश्वास पाहिजे. हे सगळं जर ज्ञान असेल; विश्वास असेल, तर कर्म केल्यानंतर त्याचं फळ मिळत नाही, असं कधी होत नाही.

म्हणून, ती सांगायला लागली, काय महाराज, म्हणाली, व्यर्थ माझा जन्म आणखी ! आत्तापर्यंत अश्वत्थाची पूजा केली. मूर्खपणा केला म्हणाली. महाराज म्हणाले, ''गंगाबाई, असं बोलू नका, अश्वत्थ वृक्ष काय आहे, तुम्हाला कल्पना नाहीये, तुमच्या दोषाची तुम्हाला कल्पना नाही. पण शास्त्राने सांगितलेले जे कर्तव्यकर्म आहे, त्यालाही तुम्ही दोष द्यायला लागलात, काय म्हणायच''. अश्वत्थ वृक्षाचं सर्व विधान त्यांनी समजून सांगितलेलं आहे. नारदमहर्षींनी, सर्व ऋषिमंडळींना आणखी अश्वत्थाची सेवा कशी करावी, काय त्याचं फल आहे, प्रदक्षिणा कराव्यात, हे करावं, उद्यापन करावं, दानधर्म करावा, सगळा विधी सांगितलेला आहे, आणखी हे महाराजांनी, या गंगादेवीला सांगितलं. गंगाबाई, तुम्ही आता असं करा, सोडू नका म्हणाले, निंदा करू नका. फल तुम्हाला आत्तापर्यंत मिळालं नाही, कांही आहे पूर्वीचं कर्म, अवशेष असेल. तुम्ही उद्यापासून असं करा, रोजच्याप्रमाणे संगमावर जाऊन अश्वत्थाची पूजा करून त्याला प्रदक्षिणा वगैरे रोजच्याप्रमाणे घालून या, बंद करू नका.

महाराजांची आज्ञा झालेली आहे. महाराजांच्यावरती तिचा विश्वास होता. दुसरे दिवसापासून पुन्हा पूर्वीप्रमाणे अश्वत्थवृक्षाच आणखी अर्चन ती करू लागली. तीन दिवस फक्त झाले. तिसऱ्या दिवशी रात्री तिच्या स्वप्नामधे एक ब्राह्मण आलेला आहे. त्यानी सांगितलं, तुमचं कार्य झालेलं आहे, तुम्ही उद्या सकाळी, मठामधे महाराजांच्या दर्शनाकरता चला. ते तुम्हाला प्रसाद देतील, फळ वगैरे, ते तुम्ही भक्षण करा, म्हणजे तुम्हाला संतती होईल, म्हणाले. स्वप्नामधे सांगितलेलं आहे. उठली, जागी झाली, स्नान वगैरे करून, दुसरे दिवशी निरांजन वगैरे घेऊन रोजच्याप्रमाणे, तिचा नियम होता रोजच्या रोज निरांजन घेऊन जायचं, महाराजांना ओवाळायचं, आरती करायची. काही बोलले नाहीत महाराज. आणखी ओवाळल्यानंतर, तिला, त्यांनी फळं आणखी तिच्या ओटीमधे टाकलेली आहेत. घ्या म्हणाले, हा प्रसाद घ्या.

घरी आलेली आहे. आणखी ते फलभक्षण केलं. साठ वर्षाचं वय तिचं होऊन गेलं. काय आता, मुलाबाळाची कांही आशा तरी राहिली होती? कांही नाही. सगळीही मासिक पाळी, सगळं बंद झालेलं आहे. परंतु विश्वास मनामधे आहे. ज्ञान झालेलं आहे. महाराजांच्या आणखी मनिषानी ते ज्ञान झालं, त्यामुळे तो विश्वासही पक्का झाला. तीन दिवसामधे तिला फळ मिळालं. पाळी उत्पन्न झाली, नंतर चौथ्या दिवशी आणखी दर्शनाला ती आलेली आहे, पुढे ती गर्भिणी झाली आणि याप्रमाणे गर्भिणी झालेली आहे. तिला वायनदान करायला सांगितलं महाराजांनी. सगळे आणखी ते करायला लागली आहे. वाणं वगैरे तिने दिलेली आहेत. सगळ्या लोकांमधे, काय म्हणाले, इतकी म्हातारी स्त्री, हिला आता मुलं होणार? काय महाराजांची इच्छा आहे समजत नाही.

आणि नऊ महिने पूर्ण झाल्यानंतर, तिला मुलगी झालेली आहे. असे ना कां, मुलगी तरी कुठे होती? मुलगाच पाहिजे, मुलगी नको हे कांही सगळ्यांनाच असं असतं असं नाहीये. कांही मंडळींना, बायकांना, मुलंच झाली. अशी कांही आम्हाला भेटलेली आहेत मंडळी. त्या बाई म्हणाल्या, की मला पांच मुलगेच झाले हो, मला मुलगी होण्याकरिता काहीतरी सांगा. आता काय सांगायच ? **कन्यारत्नं खलु नाम च कष्टम् ।** की ती मुलगी झाल्याबरोबर. की ती, काय बुवा, कसं वाढवावं, हिला कोणता चांगला वर मिळतो की नाही, काय होतं की नाही, ही काळजी असती. त्या बाई म्हणाल्या, मला मुलगी पाहिजे, सगळी मुलंच झाली मला. म्हणजे माणसाला काय पाहिजे कांही सांगता येत नाही.

मुलगी झाली तरी हिला थोडसं हे वाटलं मनाला. दहा दिवस पूर्ण झाले. शुद्ध झाल्यानंतर, त्या मुलीला घेऊन त्या गंगाबाई मठामधे गेल्या. महाराजांच्या समोर ती मुलगी ठेवलेली आहे. आपल्या कृपेनं म्हणाले झाली मुलगी. मग त्यांनी तिच्या त्या मुलीचंही आणखी भविष्य सगळं सांगितलं आहे. ही मोठी पतिव्रता स्त्री होणारी आहे. हिचा पती मोठा यज्ञयाग करणारा, सर्वमान्य अशा प्रकारचा होणार आहे. या तुमच्या मुलीच्या दर्शनाकरिता एक मोठा राजा स्वतः येणार आहे, असं तिचं भविष्य सांगितलं. ती म्हणाली, महाराज, असू दे. कांही हरकत नाही. पण ही मुलगी शेवटी दुसऱ्याच्याच घरी जाणार ना? माझ्या घरात कोणीच नाही. आमच्या कुळामधे कोण राहाणार आहे. दुसऱ्याच्याच कुळात जाणार ! एखादा मुलगा तरी मला व्हावा अशी इच्छा आहे.

आता जास्ती जास्ती हे झालेलं आहे ना? महाराजांची कृपा व्हायला लागली. कांही, आत्तापर्यंत कांही नव्हतं, मुलगी झाली. मुलगी झाली तरी मुलगा अजून व्हायला पाहिजे ही इच्छा आहे, ती दाखवितीच आहे इच्छा. महाराज म्हणाले, ''कसा मुलगा पाहिजे तुम्हाला? विद्वान पाहिजे की मूर्ख पाहिजे. विद्वान मुलगा पाहिजे असेल तर त्याला आयुष्य कमी आहे म्हणाले

आणि जास्ती आयुष्याचा मुलगा जर पाहिजे असेल तर तो अगदी मूर्ख मुलगा मिळेल. तुम्हालाच त्याचं सगळं पालन पोषण करावं लागेल.'' ही बाईही मोठी चतुर असली पाहिजे. तीस-पस्तीस वर्षाचा मुलगा होईल म्हणाले. या बाईनं सांगितलं, महाराज, मुलगा व्हावा अन् त्याला पांच मुलगे व्हावेत. ही आणखी एक इच्छा आहे. नुसती मुलगी, कांही, कांही का होईना, कांहीतरी माझ्या घरात पाहिजे म्हणणारी ! मुलगी झाली. मुलगी झाल्यानंतर, मुलगा पाहिजे म्हणाली. आणि तो मुलगा, त्यालाही पांच मुलगे व्हावेत. बराय, म्हणाले. कांही हरकत नाही. मूर्ख मुलगा मला नको. माणसांचे मनोरथ, **''मनोरथानामगतिर्न विद्यते'' (कुमारसम्भव ५.६४) म्हणताहेत कालिदास. काय संपत नाही कधी ते.**

त्यामुळे देवांनासुद्धा वाटतं, किती लोकांचं हे करायचं आपण? महाराज अजून आहेत, गाणगापुरात आहेत. नरसोबा वाडीत आहेत. प्रगट कां नाहीत? प्रगट म्हणजे या अशा गोष्टी होतात. भक्ती असती, पण त्या भक्तीच्या पाठीमागे किती आहे? मुलगी पाहिजे, मुलगा पाहिजे. अमुक पाहिजे, त्याला मुलगा पाहिजे. संपतच नाही कधी. हेच सबंध संध्याकाळपर्यंत करीत बसायचं? एखादाच ज्ञानी महात्मा किंवा एखादा भक्त जर असेल, त्याला भेटायचं, हे करायचं, त्याची कांही इच्छा, त्याला अवसरच मिळत नाही. भास्कर भटजी आलेले आहेत. त्यांना मध्ये कोणी अवसर दिलाच नाही. आज नाही, आज ठरलेलं आहे. उद्या, उद्याचं सुद्धा आणखी ठरलेलं आहे. आणखी तीन तीन महिनेपर्यंत त्याला दाद लागू दिली नाही लोकांनी. अशी स्थिती होती ना. त्याकरता ते अदृष्य झालेले आहेत. कुणाची खरी भक्ती आहे, त्याचं त्यानी ठरवावं आणि दर्शन आहे, सगळं आहे, वाटेल ते मिळेल. दर्शन होणार नाही असं नाही आहे. **पण आमची भक्ती जर शुद्ध असेल तर दर्शन होईल. नाहीतर होणार नाही.** सोपं नाहीये. रामकृष्ण, सगळेही आणखी आपल्या निजधामाला निघून गेलेले आहेत. तसे महाराजही अदृष्य झालेले आहेत. याचं कारण हे आहे. आपली योग्यता, अयोग्यता, कांहीही विचार न करताना, आहेत महाराज, चला त्यांच्यापुढं मांडूया, आली कामना, आपली इच्छा पूर्ण करून घेऊ. ते करतातच आहेत. एक इच्छा पूर्ण झाली, पुन्हा दुसरं कांही असलं, पुन्हा जायचं महाराजांच्याकडे. म्हणजे हेच उद्योग काय त्यांनी करायचेत काय? **जगाचं कार्य याचा अर्थ जगामधे उत्पन्न होणाऱ्या जीवांना जितक्या इच्छा उत्पन्न होतील तितक्या पूर्ण करायच्या म्हणजे काय नोकर आहे काय ईश्वर?** त्यांनी आपलं काम करावं.

म्हणून **खरी आणखी योग्यता निर्माण झाली पाहिजे म्हणून अदृष्य आहेत.** परमात्मा दिसत नाही म्हणून नाही म्हणा तुम्ही आणि बाजूलाच रहा तुम्ही. तुमचं नशीबच तस आहे. किती जन्म बाजूला राहातात. रहा. पण दिसत नाही, याचं कारण काय आहे? गोपाळकृष्ण

मथुरेमधे येऊन गेलेले आहेत, गोपींच्या समोर नेहमी राहिलेले नाहीत. याचं कारण त्यांनी संदेशात सांगितलेलं आहे, तुमच्यापासून मी दूर राहिलो याचं कारण तुमचं अंतःकरण माझ्याकडे नेहमी राहिलं पाहिजे म्हणून मी दूर राहिलो आहे. परमेश्वर आहे, मथुरेत गेला, तरी कसा असेल तो. कसा वागत असेल, नेहमी हेच विचार तुमच्या मनामधे येतील. मी जर समोर गोकुळामधे नेहमी राहिलो तर मला विसरुन जाल तुम्ही म्हणाले. तुमचं प्रेम हे शुद्ध आहे. ते वाढलं पाहिजे, याकरता, या हेतूने मी बाजूला झालेलो आहे. तुम्हाला दुःख देण्याकरता बाजूला झालो नाही, हे त्याचं कारण त्यांनी सांगितलं.

ईश्वर अदृष्य कां आहे? एक तर आमची शक्ती, अगदी अल्प आहे. आमच्या इंद्रियांना, ते सामर्थ्य नाहीये. पाहू शकत नाही आम्ही. वर्तमानकाळातले पदार्थच डोळ्यांनी दिसू शकतात., पण ते सुद्धा सर्व दिसू शकत नाही. मधे प्रतिबंध आला की बंद झाले ते. अव्यवहित पाहिजे. व्यवधान उपयोग नाही. तर डोळे पाहू शकतील. **अशी इंद्रियांची शक्ती आमची कमी आहे. म्हणून एक परमात्मा दिसत नाही.** दुसरा एक हेतू आणखी भगवंताचा असा आहे की **अदृष्य रूपाने रहाण्यामधे या जीवांची आणखी तळमळ वाढली पाहिजे ना. देव दिसला पाहिजे, अशी खरी तळमळ आहे कां?** कां देव दिसत नाही म्हणून नाही, बाजूला टाका. एक निवड झाली पाहिजे. देव दिसत नाही म्हणून नाही, म्हणणारे लोक बाजूला होऊ देत. **खरे जे देवाजवळ येणारे लोक आहेत, ते खरे किती आहेत, ही निवड अगोदर होऊ देत. खरे ईश्वर मान्य करणारे, दिसत नसला तर तो दिसू शकेल म्हणणारी आहेत.** नाही म्हणणारे बाजुला पडलेच ते आपोआप. पण आहे म्हणणारे, पण दिसला पाहिजे, त्याच्याकरिता अन्न–पाणी– सोडणारे, देहाकडे सुद्धा लक्ष न देणारे, असे किती तयार आहेत ? ही त्यांची तळमळ वाढली पाहिजे. त्याकरिता अदृष्य आहे भगवान. **अदृष्य नाही. अदृष्य राहून काय त्याला खेळ करायचाय?**

गोपींच्या रासक्रीडेच्या वेळेला अदृष्य राहिले. अहंकार झाल्याबरोबर अदृष्य झाले. अहंकार गेला, अत्यंत शोक झाल्याबरोबर प्रगट झालेले आहेत. तेव्हा तशी तळमळ जीवांची वाढावी, याकरता भगवान अदृष्य आहेत. त्याचा अर्थ असा नाहीये, देव आम्हाला दिसत नाही म्हणजे आम्ही सगळं पाहू शकतो कां ? फाजील विश्वास इंद्रियांबद्दल व्यक्त करणं म्हणजे किती चूक आहे ते. हा काय बुद्धिवाद आहे? डोळ्यांनी दिसत नाही, डोळ्यांनी काय दिसतं म्हणाले? असलेले पदार्थसुद्धा डोळ्यांनी दिसत नाहीत. भूतकाळातले, भविष्यकाळातले तर नाहीच नाही, डोळ्यांचं ते सामर्थ्य नाहीच आहे. पण वर्तमान काळातले पदार्थसुद्धा, भिंतीच्या पलीकडे काय आहे ते आम्ही डोळ्यांनी पाहू शकत नाही. इतकी डोळ्यांची शक्ती अल्प असताना त्या डोळ्यांवरती आम्ही इतका विश्वास ठेवतो की ईश्वर ज्याअर्थी आमच्या डोळ्यांनी दिसत नाही

त्याअर्थी ईश्वर नाही, असा निर्णय करून टाकतो आम्ही. म्हणजे डोळे हे मोठं प्रमाण आहे. ईश्वराच्या शक्तीची कांही कल्पनाही आम्हाला येत नाहीये.

म्हणून अदृष्यत्व जे आहे परमेश्वराचं, परमेश्वर अदृष्य कां आहेत त्याचं हे कारण आहे. त्यांनी सांगितलेलं आहे गुरुचरित्रात, वाटेल ते लोक यायला लागले म्हणाले नास्तिकही यायला लागले. पाहू या. आपलं काय स्वामीमहाराज, बराय, आपल्याला चांगलं मिळतय. त्याचं काम झालं आमचंही काम करून घेऊन जाऊ. पुन्हा त्यांचं नांव नाही, पुन्हा आठवण नाही, कांही नाही. आपलं काम झालं की झालं. काम झाल्यानंतर तरी देवाची आठवण राहिली पाहिजे की नको? अगदी देव बोलतो आहे, करतो आहे, दृष्य स्वरूपात इथे आहे, वाटेल ती कामं त्यांच्या कृपेनं होतात. पण काम झाल्यानंतर तरी आठवण ठेवणारे किती आहेत? पुन्हा, ज्या वेळेला दु:ख येईल, पुन्हा संकट येईल, त्यावेळेला मग देवाची आठवण व्हायची. त्यावेळेला मग देवाला जायचं. देवाला नवस करायचे. काय वाटेल ते प्रकार करायचे, तर ही जी मनाची स्थिती आहे ती बदलली पाहिजे. मन हे संसारामधे किती गुंतून राहतंय, त्यातून किती बाहेर पडू शकतय, देवाच्याकडे ते किती मन लागतंय, अदृष्य आहे, दिसायला पाहिजे, दिसायला पाहिजे. तळमळ लागली पाहिजे.

कदा वाराणस्याममरतटिनीरोधसि वसन्
वसान: कौपिनं शिरसि निदधानोऽञ्जलिपुटम् ।
अये गौरीनाथ त्रिपुरहर शम्भो त्रिनयन
प्रसीदेत्याक्रोशन्निमिषमिव नेष्यामि दिवसान् । (शिवध्यान)

हे तळमळीचं उदाहरण सांगितलय. तो भक्त म्हणतोय, हे गौरिहरा, विश्वनाथा, ही मला आणखी अवस्था केव्हा प्राप्त होईल? कौपीन धारण केलंय फक्त शरीरावरती, लंगोटी फक्त घातलेली आहे, आणखी आपला नामस्मरण घोष चाललेला आहे मुखानी आणि अशा स्थितीमधे निमिषमिव नेष्यामि दिवसान्, अनेक दिवस, अनेक काळ, गेला तरी एक निमिषभरच माझ्या हातून गेलेलं आहे. एक निमिष गेलेला आहे. डोळ्याची उघडझाप करण्याइतका वेळ माझा गेला, अनेक दिवस जरी अशा या तळमळीमधे मी राहिलो तरी ते एक निमिष वाटलं आहे मला. त्याला ही वृत्ती उत्पन्न झाली, त्या वृत्तीतच ते देवाच स्वरुप आहे. म्हणून परमात्मा अदृष्य आहे. **त्याचं स्वरूपही सूक्ष्म आहे. ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिय अत्यंत अल्प आणखी त्यांची शक्ती आहे. त्यामुळे अदृष्य वाटतो आपल्याला. परंतु तो अदृष्य होऊ शकत नाही.**

तेव्हा या गंगा नांवाची जी पत्नी, सोमनाथ ब्राह्मणाची, तिची इच्छा पूर्ण झालेली आहे. मुलगाही नंतर तिला झालेला आहे. महाराजांच्या कृपेनं, वंध्या असलेली साठ वर्षाची स्त्री,

ऋतूही जीला होत नाहीये, त्या स्त्रीलाही मुलगी, मुलगा दोन्ही झालेले आहेत. गाणगापुरातच राहणारे ते होते. महाराजांचे परमभक्त झालेले आहेत. आणि नंतरही तिची आरती कांही चुकली नाही. झालं आपलं काम, रोज आपलं निरांजन महाराजांना, देवाला करायचं, देवाला ओवाळायचं. पण शेवटपर्यंत चाललेलं आहे. काय त्यांची शक्ती आता कळून आली आहे ना? महाराजांचं सामर्थ्य काय आहे, याचा अनुभव तिला आलेला आहे. साठ वर्षपर्यंत घरामधे कांही नाहीये, मुलगी नाही, मुलगा नाही. पण अशा स्थितीमधे मुलगीही झाली, मुलगाही झाला म्हणून ते साक्षात परमेश्वर आहेत ही भावना दृढ झाली आणि ते अर्चन तीच पुढंही चालू राहिलेल आहे.

हा एक भक्तियोगाचा कथाभाग त्यांनी सांगितला. याच्यानंतर आणखी कथा सांगतायत. अनेक भक्त येतायत, नित्य भक्त आहेत. सगळ्या भक्तांच्या कथा यात कांही घेता आल्या नाहीत. किती मोठं झालं असतं गुरूचरित्र. भागवत तितकं सात दिवसात सांगावं म्हणून आणखी शुकाचार्य सांगतात, कांही दहा दिवसात, पंधरा दिवसात, मासिक म्हणतात, करतात कांही नाही असं नाही. परंतु त्यात सुद्धा कितीतरी कथा आलेल्या आहेत, किती भक्तांच्या आहेत, किती अवतार झालेले आहेत, त्या त्या अवतारांच्या कथा कितीतरी आलेल्या आहेत. आणि अशा जर कथा जास्ती असल्या, सगळ्या कथांचा समावेश करायचा असं व्यास मुनींनी ठरिवलं, तर ते करू शकतील. पण त्यालाही पुष्कळ काळ लागणार. त्या कथा सांगणारे मिळणं हेही कठिण आहे. इतक्या सगळ्या कथा सांगायला किती काळ पाहिजे आणि ऐकायलाही इतके मिळणं कठिण आहे. (परीक्षित राजाला आणखी अन्न, पाणी कशाची आठवणच नव्हती. तशी.) तो सुद्धा स्वयंपाक तयार करायचा, जेवायचा, विश्रांती आहेच आहे. जेवल्याबरोबर लगेच कुणी काय तिथे मंदिरामधे येऊन बसायला तयार होणार नाही. सांगणाराही तयार होणार नाही आणि ऐकणाराही तयार नाही. थोडी मधे विश्रांती पाहिजेच, म्हणणार. कारण त्याशिवाय कसं व्हायचं म्हणून सगळ्या कांही भगवंताच्या लीला याच्यामधे आलेल्या नाहीयेत. अनेक भक्तांच्या कथा आहेत. कांही कांही अशा अत्यंत श्रेष्ठ भक्तांच्या कथा तेवढ्या निवडून काढून सिद्धांनी नामधारकांना सांगितल्या. **नामधारकांनी एकत्र संकलन करून ते गुरूचरित्र तयार केलेलं आहे.**

एके दिवशी, आणखी गाणगापुरामधे महाराजांच्या दर्शनाकरता एक ब्राह्मण आलेला आहे, कुष्ठी ब्राह्मण. शरीराला कुष्ठ रोग झालेला आहे. नरहरी त्याच नांव. लांबून नमस्कार केला, महाराजांना विनंती करतो, की, महाराज, सगळं माझं आयुष्य, जन्म हा फुकट गेलेला आहे. विवाह झाल्यानंतर हा व्याधी निर्माण झाला म्हणाले. सगळ्यांनी मला सोडून दिलेलं आहे. कोण रहाणार अशा स्थितीमधे. **जो पर्यंत शरीर स्वास्थ्य आहे, चांगलं आहे शरीर,**

त्या शरीराकडून काही कामं-बिमं होतायत, धनार्जन जोपर्यंत होतं आहे, तोपर्यंत सगळ्यांचं प्रेम आहे. वृद्धावस्था प्राप्त झाली की गेलं.

एवं स्वभरणाकल्पं तत्कलत्रादयस्तथा ।

नाद्रियन्ते यथा पूर्वं कीनाशा इव गोजरम् ॥ (भा.३.३०.१३)

जड भरताने सांगितल्याप्रमाणे, बैल जोपर्यंत शेतामधे गाडी वगैरे ओढतो आहे तोपर्यंत त्या बैलापुढे अगदी कोवळं कोवळं गवत, खाण्याला त्याला व्यवस्थितपणाने हे सगळं त्याची व्यवस्थित बडदास्त ठेवली जाते. तो जर म्हातारा बैल झाला, तर त्याला कांही चांगलं गवत मिळणार नाही, दुसऱ्या बैलानी खाऊन राहिलेलं त्याच्यापुढे टाकायचं, खा नाहीतर उपाशी रहा. तशी स्थिती आणखी संसारी जीवाची होते, हे त्यांनी प्रत्यक्ष सांगितलेलं आहे. पण त्याची कांही आपल्यांला कांही आठवणही नाही. मनामधे त्याचा परिणामही नाही. साहजिक आहे. जोपर्यंत त्यांचा फायदा होतो आहे, काम धाम करणारा आहे, हात पाय हलतात तोपर्यंत कांही पैसा मिळतो. कांहीतरी करतो. तोपर्यंत सगळं आमचं लक्ष जाणं शक्य आहे. प्रेम जरी आणखी अशा प्रकारचं हे, सापेक्ष प्रेम आहे, तरी सुद्धा प्रेम आहे असं म्हणतात. सापेक्ष प्रेम अर्थात जाणारं आहे. आपल्यावरती आपला उपयोग कांही या माणसांपासून होत नाही, अर्थात आता याची जरूरी काय ? सध्या तेच फार चाललेलं आहे. आमच्या आईला, आमच्या वडिलांना, तुमच्या वृद्धाश्रमामधे ठेवून घ्या म्हणून सांगतो मुलगा. शंभर नाही, पांचशे, हजार रूपये मागितले तरी मी महिना पाठवून देईन, पण माझ्याजवळ नको. हजार रूपये इथं करायला काय हरकत आहे. इथं एखादी बाई, किंवा नोकर चाकर घरात ठेवणं आणि त्यांची सुश्रुषा करणं आणि त्यांची तयारी आहे वाटेल तितके पैसे देण्याची तयारी आहे. हा आदर आहे मनात. हजार रुपये मागितले तरी देईन पण तुमच्या आश्रमात. ही स्थिती चाललेली आहे. भारतीय संस्कृतीमधे हे दृश्य कधीही नाही. माता-पिता, मातृदेवः पितृदेवः हे सांगताहेत, कुठलं देव अन् काय, म्हातारा झाला की देव गेला तो. त्याला दुसरीकडं कुठेतरी नेऊन टाकतील.

तर अशा प्रकारची स्थिती झाली महाराज माझी. सगळे स्त्री-पुरूष वगैरे, सगळे आई-बाप सगळे बाजूला झालेले आहेत. सगळे लोक माझ्यापासून बाजूला झाले. कुठतरी निर्जन स्थानामधे मला राहावं लागतं, लोकांमधे मी वावरू शकत नाही. शरीराला रोग आहे. बरं याकरिता, सर्व तीर्थामधे जाऊन स्नान करून आलो म्हणाले. गंगा वगैरे नद्या, गंगा आहे, नर्मदा आहे, गोदावरी आहे, सगळ्या नद्यांचं आणखी स्नान केलेलं आहे. तीर्थदर्शन केलं, सगळ्या आणखी तीर्थयात्रा केल्या. पण कांहीही नाही. रोग शांत नाहीये. आता शेवट आपल्याजवळ आलेलो आहे. आपली कृपा झाली तर हा रोग शांत होईल, अशी पूर्ण आणखी आशा आहे, विश्वास आहे, आणि त्या विश्वासाने आपल्याकड आलेलो आहे.

महाराजांनी सांगितलं, बाबा, पुष्कळ तुझ्या हातून मोठं पाप घडलेलं आहे, पूर्वी. त्यामुळे तुला हा रोग झालेला आहे. तीर्थ, देवता वगैरे सगळ्या, त्यांनाही इतकी दया नाही. देवाचा अवतार कां होतो, **दत्तात्रेय अवतार कां झाला, हे सांगताना महाराजांनी सांगितलेलं आहे. परमेश्वराने सर्व देवांना सृष्टिकार्य करण्याकरिता नेमलेलं आहे. सगळे मोठे मोठे, इंद्र आहेत, यमधर्म आहे, वरुण आहे, हे सगळे अधिकारी ईश्वराच्या सृष्टीतले अधिकारी आहेत. पण त्यांनीही सांगून ठेवलेलं आहे,**

देवान्भावयतानेन ते देवा भावयन्तु वः ।
परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ ॥ (भ.गी. ३.११)

हे ही त्या सृष्टिकर्त्यांनी सांगून ठेवलं. मानवांना सांगितलं, तुम्ही या देवांची पूजा-अर्चा करत चला, सगळे देव आणखी सृष्टीमधले अधिकारी आहेत. तुम्ही त्यांची पूजा वगैरे करा. मान-सन्मान करा, म्हणजे देव तुमच्याकडे लक्ष देतील. तुमचं काय, तुम्हाला काय पाहिजे, नाही, ते तुम्हाला पुरवतील. तुम्ही यांचा मान, सन्मान करावा, पूजा करावी, देवांनी सुद्धा तुमच्या एकंदर तुमच्यावर उपकार करावे, तुमचं संरक्षण करावं, असं सगळं सांगून दिलेलं आहे. पण सांगून दिलेल असलं **तरीसुद्धा देव झाले तरी ते जीवच आहेत. दया दया जरी म्हटली तरी त्या दयेला सुद्धा कांही अर्थ आहे की नाही.** डॉक्टर आहे, वैद्य आहे, त्याच्यात दया नसते असं नाही. पैसाही मिळतो, दयाही होती, भूतदयाही होती.

पण काय, त्या दयेला कांहीतरी अंत आहे की नाही? झोप लागलेली आहे, त्या डॉक्टरला. दिवसभर काम केलंय, पुन्हा बेल वाजली, चला डॉक्टर, अमुक आजारी आहे, अत्यवस्थ आहे. झोप सुद्धा घेऊ द्यायची नाही, काय त्या डॉक्टरांची दया राहील कां शिल्लक त्याच्या मनात? त्यांनी अगोदरच सांगून टाकलंय, डॉक्टर घरात नाहीत, परगांवी गेलेले आहेत. रात्रीच्या वेळेला कुणालाही डॉक्टर घरात नाहीत असंच सांगतात. करावं लागतं, काय करणार? **शक्तीच तितकी नाहीये. दया दाखिवण्याकरता अशी एक शक्ती पाहिजे.** निद्रा नाही, अन्न नाही, पाणी नाही. **तृप्त आहे परमात्मा. त्याची दया खरी आहे.** कुणीही, कोणाच्याही वेळेला हांक मारू दे, रात्री, दिवसा, जेवायच्या वेळेला, वाटेल त्या वेळेला जरी हांक मारली त्या भक्तांनी, तरी परमात्मा आहे. नाही असं नाही. आमची ऑफिसची वेळ अमुक आहे, यावेळेलाच यायचं. नाही, वाटेल त्या वेळेला या. ही खरी दया आहे. कारण खरं सामर्थ्य आहे. आमच्याजवळ तसं सामर्थ्यच नाही. जरी मनामधे असलं उपकार करावे, तरी शक्ती नाही. दमून गेलेला आहे बिचारा, श्रम झालेले आहेत, तो केव्हा एकदा पडतो आणि झोप लागते असं झालंय त्या डॉक्टरला, वैद्याला, तो काय, करणार काय?

त्याप्रमाणे सगळ्याही देवता, यांची दया कमी कधी होती म्हणाले मधे. नीट लक्ष देऊ शकत नाहीत, **या देवता. विकारी आहेत**. त्या इंद्राला राग आला नाही कां ? त्याची गेली दया. यज्ञ करीत होते गोकुळात ते लोक, तोपर्यंत दया होती, प्रसाद होता. यज्ञ बंद केल्याबरोबर गेली दया. एकदम आणखी तिथं राग उत्पन्न झाला आणि त्यांचा नाश करण्याचंच त्याने ठरवलं. असे हे सगळेही अधिकारी पुण्यशील आहेत. **पुण्यामुळेच त्यांना ईश्वराच्या सृष्टीमधे अधिकाराची स्थानं मिळाली आहे.** अधिकारी जीव म्हणतात त्यांना. पुण्यकर्म करून ते ईश्वरसृष्टीमधे अधिकार स्थानं त्यांना मिळालेली असतात. परंतु यांच्या मनातली दया मानवाच्याबद्दलची कायम राहू शकत नाही. ती जाते मधे मधे, मानवाविषयी. म्हणूनच परमेश्वरानी अवतार घेतलेला आहे. दत्तात्रेय काय, कोणचे काय, **अवतार घेण्याचं हे एक कारण आहे. हे सगळे सृष्टीतले नेमलेले अधिकारी किती समर्थ आहेत. योगसामर्थ्य आहे त्यांना. कुठे असतील तिथून, कोण कसा वागतंय, सगळं समजतं त्यांना. यमधर्माला साक्षीदारही आहेत,** त्यांचे पुष्कळ. पण त्या साक्षीदारांच्या द्वारानी म्हणा किंवा आपल्या योग शक्तिच्या प्रभावानी, आपल्या योगशक्तीच्या प्रभावाने सगळं त्यांना कळतय. पण त्यांच्याही मनाची स्थिती अशी आहे की नको बाबा, आता या मानवांचा संबंध नको. देवाची पूजा करत असताना, देवाला इतका मानवांचा तिरस्कार वाटतो. **मनुष्य गंध निवारणे विनियोगः,** करावा लागतो, तो मंत्र म्हणावा लागतो. मनुष्यांचा गंधसुद्धा त्यांना सहन होत नाही. आता ते समर्थ आहेत, सात्त्विक आहेत. पुण्यशील आहेत. **त्यांना कशाला माणसाचा गंध सहन होईल. म्हणून त्या मंत्राने प्रार्थना करुन मनुष्य गंध दूर झाला म्हणजे**, देव येतायत. पूजा घेतात म्हणाले. अशी स्थिती आहे. तेव्हा ही देवांची वृत्ती पाहिली. नेमलेले अधिकारी जर असे बाजूला बाजूला व्हायला लागले, तर मानवांची एकंदर अवस्था काय होणार? म्हणून परमेश्वर स्वतःच मृत्यूलोकामधे अवतार घेऊन येतात. **देवलोकामधे तो एक वराह अवतार झालेला आहे.** त्याचं वर्णन आहे, ब्रह्मदेवांना कांही सुचेना, कुठे पृथ्वी गेली, काय करावे. मनू राजा विचारायला लागला, महाराज आम्ही राहायचं कुठे? आमच्या प्रजाजनांनी. त्यावेळेला ती पृथ्वी आंत गेली. तिथे वराह उत्पन्न झाला. तो एक अवतार तिकडं झाला असेल **परंतु बहुतेक सगळे अवतार मृत्यूलोकावर झालेले आहेत. मृत्यूलोकावरतील असलेल्या जीवांच्या बद्दल दया परमेश्वराला यायची सार्थ वेळ आहे.** कधीही कंटाळा नाही. अमुक वेळेला देवाची पूजा केली पाहिजे. असं नाहीये. आता जे कांही स्थानविशेष असेल, त्या विशेषस्थानामधे व्यवहार करणारे किंवा पूजा करणारे लोक आहेत किंवा सर्व लोकांनाही व्यवस्था करण्याच्या दृष्टीनं अमुक वेळेला शेजारती झाली की दरवाजा बंद आहे. याच्यापुढे कांही नाही, दर्शन नाही. बाह्य गोष्टीही आहेत. परंतु याही मूर्तीचे दर्शन करू शकतात ते भक्त. ते उदयनाचार्य म्हणून एक होऊन गेले. मोठे पंडित आणि मोठे कृष्णभक्त होते. ते एकदा मथुरेला गेले म्हणे. आणि वेळ होऊन गेली होती. दरवाजा झांकला

गेला. झाकला गेल्यानंतर, बराय, बाहेरूनच नमस्कार केला, निघाले आणि सांगतायेत, त्याला सांगितलं, काय म्हणाले.

ऐश्वर्यमदमत्तोऽसि मामवज्ञाय वर्तसे ।

मी इतक्या लांबून तुझ्या दर्शनाला आलो, तुला आपल्या ऐश्वर्याचा मद आलाय काय, अहंकार आला काय ? मी देव आहे म्हणून असं समजतोस तू. पण लक्षात ठेव, पुन्हा

पुनर्बौद्धे समायाते मदधीना तव स्थितिः । (उदयनाचार्य)

बौद्ध जर पुन्हा भारतात येऊन, आक्रमण करू लागले, तर देव आहे असं सिद्ध करणारा मी फक्त एकटा आहे म्हणाले. देव नाही म्हणणारे जर इथे आले तर, देवाचं, तुझं अस्तित्व सिद्ध करणारा मी आहे. आणि मी आल्यानंतर दरवाजा लावून बसतोस तू ? एकदम दरवाजा उघडला, तो पुजारी गेला होता कुठे दरवाजा झाकून, पण आपोआप उघडला. म्हणजे कांही अहंकार नाहीये हा. हा भक्तीचा, प्रेमाचा आवेश आहे. भावावेश. तर, जरी व्यवहाराकरता व्यवस्था करण्यात आली, तिथं सुद्धा दर्शन करणारी लोकं आहेत. पण सर्वसामान्य म्हणजे जीव हे असमर्थ आहे. मोठे मोठे सत्ताधीश हे **देवांसारखे, इंद्रासारखे त्यांच्याकडून हे कार्य होणार नाही, खरी दया होणार नाही, खरं जीवांचं संरक्षण होणार नाही म्हणून भगवंतांना वारंवार अवतार घेऊन या ठिकाणी यावं लागतं.**

तेव्हा तो नरहरी ब्राह्मण प्रार्थना करतो आहे, महाराजांनी सांगितलं, बाबा, पुष्कळ दोष तुझे झालेले आहेत. दोष झाले म्हणून उपेक्षा नाहीये. आलेला आहे आपल्या दाराशी. शरण आलेला आहे. **'शरणागतसंत्राणम्'** हे कांही कर्मामधे त्यांनी सांगितलेलं आहे, शरणागताचं संरक्षण करणं, हेही मुर्त कर्म किंवा अशी कर्मामधे, इष्टकर्म, पूर्तकर्म, दत्तकर्म असे कर्माचे विभाग केलेले आहेत. त्या कर्मामध्ये,

शरणागतसंत्राणं भूतानां चाप्यहिंसनम् ।
बहिर्वेदि च यद्दानं दत्तमित्यभिधीयते ॥

(श्रीमद्भगवद्गीता अध्याय ४, श्लोक २८
यावरील मधुसूदनी टीका)

म्हणतात.

तर शरणागत जो आहे, आपल्याला शरण आलेला आहे. महाराज, माझं एवढं दुःख दूर करा, मला सल्ला द्या. सहाय्य करा. त्याचं अवश्य संरक्षण केलं पाहिजे. सामान्य मानवाचा हा धर्म आहे. पूर्ण सामर्थ्य त्या परमेश्वराजवळ आहे, त्याच्या जवळ उपेक्षा नाहीये, **ईश्वराच्याजवळ उपेक्षा कधीच नाही. पापी येवो, पुण्यवान येवो, कुणीही आला तरी त्याला आणखी मुक्त द्वार आहे,** या तुम्ही. ईश्वर आहे असं माना. म्हणजे पुष्कळ झालं. भगवान शंकराचार्यांच्या

चरित्रामधे, सर्वत्र त्यांनी संचार करून, दिग्विजय मिळविलेला आहे. सगळ्या लोकांचं, नास्तिक वगैरे लोक जे होते, वेदाचा अर्थ भलताच लावला, आणि त्यांचं खंडन करून टाकलं, सगळे चुकलेले आहात तुम्ही म्हणाले. खरा अर्थ हा आहे.

एक आणखी मांत्रिक मनुष्य **उग्रभैरव** नांवाचा, कापालिक, **भैरवाची उपासना करणारा,** मांस वगैरे, मद्य-मांस वगैरे अस सगळं त्यांच्या याच्यामध्ये आहे. पूजेमध्ये आहे. पुजेमधे, त्याचाही आणखी मार्ग चुकलेला आहे, हे जाणताहेत. हा बरोबर नाहीये. ही पूजा बरोबर नाहीये. खंडन झालं, चार लोकामधे त्याला कांही उत्तर देता आलं नाही. कबूल करावं लागलं. बरोबर आहे महाराज, तुम्ही सांगितला हाच मार्ग आहे. आणखी त्यात आचार्यांचा विजय झाला. परंतु हा जो होता मांत्रिक मनुष्य, कापालिक आहे, त्याला तेवढ्यापुरतं कबूल करावंच लागलं. सर्व लोकांच्या समक्ष तो निरूत्तर झालेला आहे, तो उत्तर कांही देऊ शकला नाही. परंतु मनामधे मात्र ह्या संन्याशाला जिवंत ठेवायचा नाही. हा जर जिवंत राहिला तर आपला सगळा मार्ग, सगळा आपला पक्षच्यापक्ष सगळा खलास होऊन जाईल. पक्षाभिमान आहे ना? पक्षाभिमानामुळे माणसाकडून काय होईल कर्म काही सांगता येत नाही.

आपल्या पक्षाला, आणखी आपल्या पक्षाच्या विरूद्ध असणाऱ्याला जिवंत ठेवायचा नाही. झाली इच्छा उत्पन्न. काय करायचं कसं ? मग त्यानी असं केलं, आचार्य महाराजांना तो शरण गेला म्हणे. नमस्कार करून बसलेला आहे. महाराज, एक प्रार्थना माझी आहे. काय बाबा? आदले दिवशी त्याचा पराजय झालेला आहे. पण यांच्या मनात कांही नाही. जय पराजयाची कल्पनाच नाही. जे सत्य असेल ते सांगायचं निर्भयपणाने. त्यात जय कसला आणि पराजय तरी कसला? त्याप्रमाणे तो म्हणाला, मी एक यज्ञ सुरू केलेला आहे. भैरवलोकाला मला जायचंय, आमची उपास्यदेवता भैरव आहे म्हणाला. आता त्या यज्ञाची पूर्णाहुती होणार आहे, सातवे दिवशी. त्या सातवे दिवशी पूर्णाहुतीला, आमच्या शास्त्राप्रमाणे एक सार्वभौम राजा, त्या राजाचं तरी मस्तक आम्हाला मिळालं पाहिजे. म्हणजे ते पूर्णाहुतीला आम्ही अर्पण करू. आता सार्वभौम राजाचं मस्तक पाहिजे, हे बोलल्याबरोबर आमचं मस्तक जाईल म्हणाले. तुमचं शास्त्र असू दे वाटेल ते असू दे, ते कांही मिळणार नाही. दुसरी गोष्ट म्हणजे, एक सर्वज्ञ जो आहे जगामधे, त्या सर्वज्ञ पुरूषाचं मस्तक जर आम्हाला मिळालं, तर ते पूर्णाहुतीला मी अर्पण करीन. आणि मी या देहानीच आणखी भैरवलोकाला जाईन. हा उपकार तेवढा तुम्ही करा म्हणाले.

तुम्ही सर्वज्ञ आहात. तोंडाने बोलतोय, बाहेरून सगळ. तुमचं मस्तक जर मला मिळालं, तर ते पूर्णाहुती होईल आणि मला या देहानी भैरवलोकाला जाता येईल. आचार्यमहाराजांना काय, शरीराची तर आस्थाच नाहीये, शरीर हे केव्हातरी पडणारच आहे.

वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥

(भ.गी. २.२२)

त्याप्रमाणे जुनी वस्त्रं टाकून देतो आपण नवीन वस्त्रं घेतो, त्याप्रमाणे तथा शरीराणि विहाय जीर्णानि, न्यनाति संयाति नवानि देही ॥ जुनी वस्त्रं टाकणं नवीन वस्त्र घेणं त्याप्रमाणे हे आहे म्हणाले. म्हणून शरीराबद्दल कांही आस्था नाही. शरीर अभिमान नाहीये. क्षेत्र, क्षेत्रज्ञ विवेकपूर्ण आहे.

इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते ।
एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ॥ (भ.गी. १३.१)

शरीरात राहणारा मी एक आहे. शरीर म्हणजे मी नाही, हे पक्क ज्ञान आहे. विवेकज्ञान पूर्ण आहे. शरीर पाहिजे तुला, मस्तक पाहिजे, घेऊन जा म्हणाले. कांही हरकत नाही. लगेच, त्यात विचार नांही कांही. पण म्हणाले, सगळी शिष्यमंडळी असताना तू जर आलास तर तू जिवंत राहाणार नाहीस. हे संन्यासी जरी असले, 'अहिंसा परमो धर्मः' सांगतायत म्हणाले, वागतायत, पण असं भलतं जर तू करायला जाशील तर तो धर्म-बिर्म ते मानणार नाहीत. तू जिवंत राहाणार नाहीस. तेव्हा मी असा एका डोंगराच्या गुहेमधे अमुक ठिकाणी जाऊन बसतो समाधी लावून. तिथे उद्या तू दुपारच्या वेळेला ये, आणि माझं मस्तक घेऊन जा म्हणाले. सांगितलं त्यांनी. आता हे काय झालं? एवढं कार्य आणखी धर्माचं कार्य आहे, भक्तिमार्ग आहे, कर्ममार्ग आहे, ज्ञानमार्ग, सगळया मार्गाची घडी ज्यांनी व्यवस्थित बसवली आहे. कांही कशाचा विरोध नाहीये. पूजा तुम्हाला करायचीय, पूजा करा, निर्गुण, निराकार ब्रम्हतत्व आहे, परमात्म्याला. गुण नाही, आकार नाही, तो असा आहे, तरीसुद्धा तुला पूजा करायचीय, करू, चला म्हणाले. अधिकाराप्रमाणे तुम्ही पूजा करू शकता. मूर्तिमधेही देव आहे. सर्व ठिकाणी देव आहे म्हणायचं, तत्त्वज्ञान सांगायचं आणि मूर्तिपूजा नको म्हणायचं ? मूर्तिमधे देव नाही म्हणायचं काय? सर्वत्र कसा आहे मग. म्हणून सर्वत्रही ईश्वर आहे हे जे तत्त्वज्ञान आहे, याला विरोध नाहीये. मूर्तीमधे, सर्वत्र ईश्वर आहे. म्हणून आणखी, आचार्य महाराजांनी, त्याला सांगितल. याचा अभिप्राय असा आहे की तो जो आहे, नास्तिक आहे. आचार्यांची हत्या करण्याकरिता आलेला आहे. हे आचार्यांना माहिती आहे. परंतु ईश्वर मानतोय. ईश्वराचं कोणतं स्वरूप मानावं, त्याचा पूजा विधी कसा असावा, हे समजून सांगितलं त्यांनी. त्याची तामसी वृत्ती आहे, त्याप्रमाणे भैरव म्हणून कां होईना, ईश्वराला मानतो आहे. भैरवलोकाला जाणार आहे म्हणतो आहे. त्याकरिता त्याच्या विधीप्रमाणे मस्तक पाहिजे. घेईना कां म्हणाले. ईश्वर मानतो आहे ना ? जाऊदे. तो नास्तिक आहे, आस्तिक आहे, खरा भक्त आहे, खोटा भक्त आहे हा विचार हे महात्मे, तत्त्वज्ञानी महात्मे करत नाहीत. आज आहे, उद्याला चांगल्या मार्गानी येईल हा, हा विश्वास त्यांना आहे. म्हणून त्यांनी आणि त्याप्रमाणे त्याला

सांगितलंय, जा म्हणाले, उद्या त्या गुहेमधे मी बसतो, समाधी लावून, तिथे येऊन तुझ तू माझं मस्तक घेऊन जा. त्याला सांगितलं त्यांनी.

आणखी झाल, ठरलं. याला आनंद झाला की झालं, आपलं काम झालं म्हणाले. हा जो आपला शत्रु आहे, आपल्या पक्षातल्या, सगळ्या लोकांची मनं आणखी आपल्या बाजूला करून घेणारा, याला जिवंत ठेवलं नाही की आपला पक्ष बळकट होईल. हे शेवटचं शस्त्र वापरतात लोक. पापाचा अगदी शेवटचा कळस आहे. शत्रूला मारलं म्हणजे ज्ञान जात नाही. गीता अग्निमध्ये जाळली म्हणजे ते गीता ज्ञान जाणं शक्य नाहीये. हे गीताज्ञान जिवंत ज्ञान आहे. भगवंताच्या मुखातून निघालेलं आहे**. तुम्हाला गीतेतलं पसंत नसलं म्हणून गीतेचं पुस्तक तुम्ही जाळून टाकाल.** पुस्तक म्हणजे गीता नाहीये. पण हे सांगायचं कोणाला? अज्ञानी आहे, मस्तक मागतोय. जाऊ दे, घेऊन जाऊ दे , पण ते जाऊ देणार नाहीये. त्यांचे भक्त जे होते, पद्मपादाचार्य म्हणून नरसिंहांचे भक्त होते मोठे. दुसरे दिवशी ठरल्याप्रमाणे हा कापालिक उग्रभैरव मांत्रिक, निघालेला आहे. शस्त्र घेऊन आचार्याचं मस्तक तोडून घेऊन जायचं आहे. आणखी आपल्याला सदेह जायच आहे. कांही खरं खोटं सांगितलं त्याने. एकदा त्यांचा नाश झाला म्हणजे झालं. पद्मपादाचार्य नरसिंहाची आणखी मानसपूजा आटोपतायत. अंतःकरणामधे नरसिंहमूर्ती आलेली आहे. आणखी पूजा चालू असताना, त्यांना एकदम ते दृष्य दिसायला लागलं, मनामधे. आचार्यमहाराज गुहेमधे समाधी लावून बसलेले आहेत आणि हा मांत्रिक मनुष्य तलवार उपसून घेऊन त्यांना मारण्याकरता निघालेला आहे. हे दृष्य दिसल्याबरोबर, त्या ध्यानयोगाच्या समाधी अवस्थेमधे, ध्यानसमाधी त्यांचा होता, नरसिंहांचं ध्यान करता करता एकदम ते नरसिंहरूप झाले म्हणतात. ध्यानाचा प्रभाव असा आहे, की ज्या मूर्तीचं ध्यान आणखी सिद्ध झालं, म्हणजे तसं स्वरूप प्राप्त होतं. सरूपता मुक्ति जशी सांगितलेली आहे, शास्त्रकारांनी, ती भक्ताला देवांच स्वरूप प्राप्त होतं. जय विजय हे चतुर्भुज शंख चक्र गदा पद्म हे धारण करून देवाच्या जवळ रहात होते. तशी सरूपता प्राप्त झाली म्हणजे उपासना सिद्ध झाली असं आहे. नरसिंहांचं ध्यान करता करता ते गुरूमहाराजांना मारायला चाललेला आहे म्हणून एकदम ते नरसिंहरूप झाले. पद्मपादाचार्य दिसेनासे झाले आणि तिथे नरसिंह दिसायला लागले. आणि एकदम गर्जना करीत धावत धावत निघालेले आहेत. त्या मांत्रिकाला गाठलं, पाडलं खाली, पोट त्याचं फाडलेलं आहे, नरसिंहांनी जसं हिरण्यकश्यपूला फाडलं, तसा त्याचा नाश केलेला आहे. आचार्यमहाराजांनी आणखी थोड्या वेळाने, समाधी उतरली, डोळे उघडले, पाहिलं, समोर नरसिंहांची मूर्ती आहे.

श्रीमत् पयोनिधिनिकेतन चक्रपाणे भोगीन्द्रभोगमणिरञ्जितपुण्यमूर्ते ।
योगीश शाश्वत शरण्य भवाब्धिपोत **श्रीलक्ष्मीनृसिंह मम देहि देवी करावलम्बम् ।**

(श्रीलक्ष्मीनृसिंह स्तोत्र, आद्यशंकराचार्य विरचित)

प्रार्थना त्यांची केली आणि मग तो आणखी आवेश, भावावेश कमी झाला. नरसिंह दिसायचे बंद झाले आणि पद्मपादाचार्य त्या ठिकाणी दिसू लागलेले आहेत. त्यांनाही काय झालं कांही माहिती नाही. आचार्यमहाराजांना, गुरुमहाराजांना, वंदन केलं. गुरुमहाराजांना आम्ही देणार नाही म्हणाले. जरी अद्वैत भक्ति असली तरी सुद्धा हे गुरुमहाराज आमचे आहेत, त्यांना तू मारू शकणार नाहीस.

तस्यैवाहं ममैवासौ स एवाहमिति त्रिधा ।
भगवच्छरणत्वं स्यात् साधनाभ्यासपाकत: ॥ (न्यायरत्नावली श्लोक ८)
(आनन्दगिरिव्याख्यासंवलित-श्रीमच्छांकरभाष्ययुता-श्रीमद्भगवद्गीता १८.६६)

भगवंताची भक्ती म्हणजे त्याचाच मी आहे.

सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम् ।
सामुद्रो हि तरङ्ग: क्वचन समुद्रो न तारङ्ग: ॥
(षट्पदी स्तोत्रम्-३ रा श्लोक) शंकराचार्य

देवांच्या भक्तीचा पहिलाच प्रकार आहे बरं, देवा मी तुमचा आहे, म्हणून तुम्ही माझे नाही. तुम्ही माझे म्हणायला, पुढचा अधिकार आहे. मी तुमचा आहे. समुद्राची लाट आहे, लाटेचा समुद्र नाहीये. विशाल पसरलेला समुद्र, त्याच्यात आलेली लाट, त्यापैकी मी एक आहे, तुमचा आहे एवढी भावना माझी आहे. त्याच्यानंतर दुसरी, पुढची भावना आहे. साधना अभ्यास जसा जसा होत जाईल. ममैवासौ-

हा भगवान माझाच आहे. अशी सत्ता, अशी एक प्रेमवृत्ती वाढलेली आहे की माझा आहे हा. आणि त्या 'ममैवासौ' या वृत्तीमध्ये गेलेले आहेत. त्याप्रमाणे पद्मपादाचार्यांची वृत्ती अद्वैत आहे, सगळं एक आहे. पण गुरुमहाराज माझेच आहेत, मी जाऊ देणार नाही, मारु देणार नाही तुम्हाला, संन्यासी आहेत, पण संन्यासी वेषामधे सुद्धा नरसिंह बनले ते आणि त्याला ठार मारलेलं आहे त्यांनी. हिंसा, अहिंसा हा विचार नाही. 'ममैवासौ' या भूमिकेवर आलेले आहेत. शेवटी सैवाहम् ही आणखी साधना, अभ्यासाचा परिपाक, तो आहे.

तर अशा रीतीनं, नरहरी ब्राम्हण जो आहे, त्या नरहरी ब्राम्हणाला महाराज सांगताहेत, बाबा, पापकर्म झालेलं आहे तुझ्या हातून, त्या करिता तुला कांहीतरी साधन करायला पाहिजे. पापक्षय व्हायला पाहिजे. महाराजांची गांठ पडलेली आहे. हाही मोठया भक्तीनं, तळमळीनं आलेला आहे की, सगळ्या तीर्थामधे स्नान करून आणखी माझा व्याधी गेला नाही. तो या ठिकाणी निश्चित जाणार आहे. ही खात्री आहे. पक्की आहे भावना, अधिकार पक्का आहे. तेव्हा तुला कांहीतरी साधन करावं लागेल, की तुझी सगळी पापं गेली, म्हणजे तुझा व्याधी जाईल. इतक्यात एक शेतकरी

मनुष्य, त्याच्या शेतामधे औदुंबराचं झाड वाळलेलं, पडलेलं ते, त्याचं एक लाकूड हे खांद्यावर घेऊन तो घरी निघालेला होता. त्याला बोलावलं, इकडे ये रे म्हणाले. आला तो, त्या नरहरी ब्राह्मणाला सांगितलं बाबा, हे लाकूड औदुंबराचं आहे, हे घेऊन तू संगमावर जा आणि ते आणखी जमिनीमधे रोवून ठेव, त्याला पाणी घालत जा रोज, आणि ज्या दिवशी या झाडाला पानं फुटतील, त्यादिवशी तुझ्या शरीरावरचा कुष्ठरोग संपूर्ण बरा होईल, हे त्याला सांगितलं. बरा होईल हे सांगितल, पण हे करावं लागेल. याला पानं आली पाहिजेत. वाळलेलं लाकूड, किती चार पांच वर्ष पडलं होतं, ते आणलेलं आहे, पण त्याला ती आज्ञा झाली. विश्वास, त्याच्या मनामधे विश्वास आहे. गुरूमहाराजांची आज्ञा म्हणजे वेदस्मृति आहे, त्याप्रमाणे वागायचं. **साधनाभ्यास जे म्हणतात**, साधनाभ्यासाचा परिपाक व्हावा लागतो, भक्ती ही परिपक्व व्हावी लागते. भक्ति करतो म्हणून आम्ही ठरवायचं नाहीये. देवाला ती पसंत पडली पाहिजे किंवा **देव भक्ताला पसंत पडली पाहिजे**, खरी भक्ती याची आहे. आम्ही ठरवून काय उपयोग? आम्ही इतकी भक्ती केली, अमुक केलं, तमुक केलं, हे बाहेरून त्याचं मोजमाप नाहीये. अंतःकरणातलं प्रेम किती स्थिर राहू शकतं, स्वार्थाची हानी कितीही झाली तरीसुद्धा ते प्रेम स्थिर राहू शकतं कायं? ही सगळी परीक्षा आहे. संसार म्हणजे परमार्थाची, भक्तिमार्गाच्या परीक्षेचा आणखी व्यवहार आहे. संसारात राहून तो अभ्यास करायचा, भक्तीचा काय, ज्ञानाचा काय, कर्माचा हा अभ्यास आहे. हा अभ्यास करुन आणि आपल मनही तयार करायच. देवाच्या कृपेला पात्र आपण व्हायच आहे. त्याकरिता आणखी हे करायचं, त्यांनी लगेचच ते लाकूड त्या नरहरी ब्राह्मणांनी घेतलं खांद्यावर. गेला, त्या संगमावर, ती एका बाजूला माती होती तिथं आणखी रोवलेलं आहे आणि ते लावून त्याला पाणी घालायला लागला. एक दिवस झाला, दोन दिवस झाले, तीन दिवस झाले, सकाळी, संध्याकाळी, दुपारी, आपलं पाणी घालतोय. अन्न नाही, पाणी नाही, कांही नाही. एकनिष्ठेनं साधन चालू आहे. सात दिवस झाले. कांही अन्न नाही, पाणी नाही. कांही नाही. शरीरअगदी कृश झालेला आहे. आणतोय पाणी; घालतोय. आता गांवातल्या मंडळींना दया आली. त्यांना वाटलं आपल्या गांवात आलेला आहे हा बिचारा आणि आता मरायची वेळ आली आहे. सगळी मंडळी आणि त्यांच ते शिष्टमंडळ त्या संगमावरती गेलं आणि त्यांनी, नरहरीला सांगितलं, ''काय म्हणाले तू काय करतोस तू ? वाळलेल्या लाकडाला कधीतरी पानं फुटतील कां म्हणाले.'' अंकूर येतील का ? शक्य आहे का? असं कधी झालंय का? म्हणाले हे कसं काय करतोस तू ? अन्नपाणी सुद्धा घेत नाहीस? तो म्हणाला,''महाराजांची आज्ञा आहे. त्यांच्या आज्ञेप्रमाणे करतो आहे आणि याच फळ मला मिळेल असा विश्वासही आहे'' म्हणाले. कसला विश्वास घेऊन बसलास तू ? अरे तुझी पापं जाणार नाहीयेत म्हणून महाराजांनी हे तुला कांहीतरी सांगितलं. त्यांना वाटलं आपोआपच कंटाळा येईल आणि निघून जाईल म्हणाले. म्हणून तुला हे सांगितल. वाळलेल्या लाकडाला पाणी घातलं आणि त्याला पाने फुटतात कां आणि तुझा

रोग जातो, काय संबंध आहे ? महाराजांच त्यांनी हे केलं, त्यांनी, तुला जे सांगितले, जे काम सांगितले आहे ते योग्य नाही आहे. तुझी अशी भयंकर पापं आहेत त्याचं क्षालन कधीही होणार नाही म्हणून त्यांनी तुला हे कांहीतरी सांगितलं आहे. पण त्याची श्रद्धा, निष्ठा मोठी आहे. विश्वास मोठा आहे. त्या गाणगापुरातल्या स्त्रीनं, म्हैशीचे दूध काढलं तिनं. तिची जशी कितीतरी श्रद्धा आहे, अढळ आहे, कांही नाही, तो म्हणाला की, मला महाराजांनी सांगितलेले आहे. ती जबाबदारी त्यांच्याकडे आहे. झाडाला पाने येणार आहेत ही त्यांची जबाबदारी आहे. झाडाला पाने येणं, न येणं, हे त्यांच्याकडे आहे. तो विचार मला करायचा नाही. कोणच्या काळी तुझा रोग जाईल ? एवढाच काळ त्यांनी दाखिवलेला आहे. झाडाला, वाळलेल्या लाकडाला, पानं येणार आहेत असं त्यांच्यावरुन दिसत आहे. या लाकडाला पानं येतील आणि त्यानंतर तुझा रोग जाईल. लाकडाला पानं येतील तोपर्यंत आम्ही केलं पाहिजे म्हणाला हे. त्यांची आज्ञापालन केली पाहिजे, तो विचार आमचा नाही.

झाडाला, वाळलेल्या लाकडाला, पान येत नाहीत पण, वाळलेल्या लाकडाला पानं येणार आहेत असं ते म्हणतात. रोग जाणार आहे असं ते म्हणतात. त्याकरता मी आपलं निष्ठेने करतो आहे. मला कांही याच्याबद्दल तुम्ही सांगू नका. हे एक काम आता बंद झालं. याचाच बुद्धिभेद करावा. यांच्याच मनाचा हे एक झाला. यालाच वाटायला लागलं की खरं आहे बाबा. हे सांगत आहेत सात दिवस आपण केलं पण कांहीही नाही, तेव्हा हे काम सोडून देऊन आणि आपण आपल्या आपल्या गांवाला जावसं यालाच वाटेल. पण नाही तो पक्का निघाला, नाही म्हणाला. अस्तिक्यबुद्धी सुद्धा इतकी दृढ मिळालेली असते ईश्वराच्या कृपेनी, कुणीही कितीही भेद करायला आला तरी जाऊ शकत नाही. इतक्या गांवातील लोकांनी त्याला सांगितलं असं कधीही घडणार नाही, असं कधीही घडत नाही. गांवात राहणारे, महाराजांच्या अलौकिक घटना, महाराजांच्या शक्तीचे प्रयोग, त्यांनी सगळे पाहिलेले आहेत. मेलेला जिवंत केला आणखी अशा कितीतरी गोष्टी घडलेल्या आहेत. पतिताला आणखी दिव्य ज्ञान त्याच्या सातव्या जन्मातले ज्ञान या जन्मात त्यांनी आणखी उपलब्ध करुन दिलेलं आहे ह्या अशा गोष्टी प्रत्यक्ष डोळ्यासमोर पाहून सुद्धा विश्वास बसत नाही. डोळ्यांनी दिसलं म्हणजे खरं मानून कोण तयार आहे ! आत्ता आम्ही म्हणतो डोळ्यांनी दिसेल तर खरं, दिसायला लागला देव तर कोणी त्याला विचारणार नाही.

पुर्वी रेशनिंग सुरु झालं म्हणे, गोष्ट सांगतात काय खरी खोटं कोणाला ठाऊक. तेव्हा आता पांडुरंगाला नैवेद्याला पाहिजे. त्याच्याकरता एक कार्ड काढलं म्हणे आणि ते धान्य आणायला लागले. एक अधिकारी अगदी बुद्धिवादी चिकित्सक अधिकारी आले ते म्हणाले हे कार्ड कशाला काढले म्हणाले, अहो पांडुरंगाला नैवेद्यासाठी. पांडुरंग काय जेवतो काय म्हणाले. त्याला कसल धान्य द्यायचं. तुमच्यापुरत धान्य घ्या म्हणजे ते कार्ड बंद केलं म्हणे काय झालं

कुणास ठाऊक अशा प्रकारे बुद्धिचा जास्ती शहाणपणा फाजील बुद्धी उत्पन्न होते. पांडुरंगाला कुठे जेवायला लागते. पांडुरंग काय जेवतो काय म्हणाले. पांडुरंग म्हणजे मूर्तिच आहे, त्याशिवाय पांडुरंग नाहीये. मूर्तिला जेवण लागत नाही, कांही लागत नाही. ही सगळी मनोवृत्ती अशीच विचारांनी चिकित्सेने अशी बदलत गेली आहे. त्यामुळे या सगळ्या लोकांनी, गांवात राहणारे महाराजांसह सानिध्य आहे, रोज दर्शन होत आहे, रोज अलौकिक चमत्कार सहज होत आहे. त्या चमत्कारांना बदल महाराजांच्या मनाला यत्किंचितसुद्धा जाणीव सुद्धा नाही. होऊन जात आहेत. अहंकार नाही. मी मोठा आहे. कांहीही नाही. हे सगळं पहात असणारी मंडळी आणि आज या ब्राह्मणाचा बुद्धिभेद करण्याला प्रवृत्त झाली आहेत. कशाला बाबा, इतके कष्ट करतोस? व मरतोस कशाला. जा आपल्या गावाला. तुझा रोग बरा होणार नाही. म्हणून महाराजांनी तुला असलं काम दिलेलं आहे. तरी त्याच्या मनावर परिणाम झालेला नाही. तो म्हणाला महाराजांची इच्छा आहे. आज्ञा आहे त्याप्रमाणे मी करणार आहे. मेलो तरी हरकत नाही. मी इथंच मरेन म्हणाला.

मग आता काय करायचं. कांहीतरी उपद्व्याप करायचा असतो. आपल्या मनात आलेले विचार हे चांगले विचार आहेत असा एक आग्रह आहे. सत्याग्रह ज्याला आपण म्हणतो ना. हे सत्य आहे असा आग्रह आपण करायचा. कोणचं सत्य, कोणचं असत्य, कांही आपल्या बुद्धीला निर्णय करता येत नाही. उगीच आमच्याच मनाने सत्य ठरवायचं आणि त्याचा आग्रह धरायचा त्याचा आग्रह करुन त्याच्यावर भर घालायची. त्या ब्राह्मणाला आणखी त्याची बुद्धी बदलणं शक्य नाही, असं पाहिलं त्या सगळ्या शिष्टमंडळांनी, गांवात आले मठामध्ये गेले, महाराजांना नमस्कार करुन बसलेले आहेत. महाराजांना सांगतायत की काय तुम्ही त्या ब्राह्मणाला हे काम दिले, कुष्ठरोग जाण्याचा हा काय उपाय आहे काय म्हणाले? वाळलेल्या लाकडाला तो पाणी घालतोय. दोन-तीन वेळा अन्न नाही पाणी नाही, कांही नाही. सात दिवस झाले आज म्हणाले. मरणाची वेळ आली आहे. ब्रह्महत्या होण्याची पाळी आली आहे म्हणाले. पहा विचार करा तुम्ही म्हणाले. त्याला आम्ही सांगून पाहिलं म्हणाले, पण नाही, तो ऐकायला तयार नाही. मी मेलो तरी इथंच मरणार म्हणाला. **देह जावो अथवा राहो** ही अशा रीतीने तो ऐकायला तयार नाही. तुम्हीतरी सांगा त्याला की, जा बाबा आता, तुझ्या तुझ्या गावाला. ह्यांच्याकडे आलं ते शिष्टमंडळाचे कार्य. काय ह्यांना करायचं होतं ? तो करणारा करतो आहे. महाराजांच्या आज्ञेप्रमाणे. तो जिवंत राहिला काय अथवा मेला काय. यांना कांही दंड भरावा लागतो का ? यांना काळजी करण्याचे कारण काय. पण एकमताने हे ठरवले की हे अयोग्य आहे. महाराजांनी सांगितलेले सुद्धा अयोग्य आहे, असं त्यांनाच सांगतायेत. सांगा बाबा त्याला तुम्ही, मरेल तो बिचारा बाह्मण. **महाराजांनी सांगितलं की भावनेला महत्त्व आहे म्हणाले.**

मंत्रे-तीर्थे द्विजे देवे दैवज्ञे भेषजे गुरौ ।
यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी ॥ गुरुचरित्र ४०/४८ म्हणाले. तो ब्राह्मण सांगतोय महाराजांच्या मुखातून शब्द निघालेला आहे. तो शब्द महत्वाचा आहे. त्या शब्दाप्रमाणे घडून येणार.

त्या शब्दाप्रमाणे 'यस्य सिद्धिर्भवती' अशी श्रद्धा त्या ब्राह्मणाची आहे. यांची श्रद्धा नाहीये. आम्ही बोललेलो आहे ते खरं होणार असं महाराज म्हणतात, आणि त्यांच्याजवळ सांगून काय उपयोग. ज्याला ते सांगितलेलं आहे. त्याची श्रद्धा पक्की आहे, त्याचं फळ त्याला मिळणार आहे. पण या लोकांना सांगताना ते म्हणताहेत, की भावना जी आहे, जीवात्म्याची मनोवृत्ती, ही जर आणखी विश्वासयुक्त असेल, भावना म्हणजे विश्वास, जीवात्म्याच्या मनामध्ये हा पक्का विश्वास असेल तर, त्याप्रमाणे फलश्रुती होते. **मंत्र** पहिले उदाहरण त्यांनी दिलेल आहे.

मंत्रामध्ये शक्ती आहे किंवा नाही गेलं. सामर्थ्य गेलं. 'सन्निधो यथामंत्र:' महाराज म्हणाले सामर्थ्य आहे किंवा नाही.

मंत्रे-तीर्थे द्विजे देवे दैवज्ञे भेषजे गुरौ ।
यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी ॥ गुरुचरित्र ४०/४८

मंत्राचा जप करायचा या मंत्राबद्दल जर संशय उत्पन्न झाला खरंच फळ मिळेल का ? कांही लाख नाही कितीही कोटी जप करुन सुद्धा त्याच फळ मिळणार नाही. त्याचं फळ मिळणार नाही, एक संशय उत्पन्न झाल्यानंतर एक नाही म्हणणारा बाजूला तरी होईल. आहे म्हटल तर पक्क आहे म्हणून केला पाहिजे. जप करील व त्याचे फळ मिळेल. आहे किंवा नाही म्हणजे कांहीच मिळायच नाही. बाजूला ही नाही त्यातही नाही अशा स्थितीमध्ये संदेहामध्ये जन्म जाणार म्हणून मंत्राबद्दल जर भावना असेल तर निश्चित फळ मिळतं. तीर्थक्षेत्रांमध्ये गेल्यानंतर त्या तीर्थामध्ये पावित्र्य आहे किंवा नाही संशय उत्पन्न झाला की कांही फळ मिळणार नाही.

गंगा प्रवाहावर, काशी क्षेत्रांमध्ये एक गोष्ट सांगतात. पुष्कळ लोक गंगेवर स्नानाला यायचे-जायचे. पार्वती माता म्हणाली, शंकराना, काय म्हणाली, सगळ्यांना फळ मिळतय कां म्हणाली गंगास्नानाच. इतकी लोक गंगेमध्ये स्नान करतायत, जातायत. ते म्हणाले, चल म्हणाले तुला दाखवतो कोणाला फळ मिळतं ? शंकर म्हणाले हे कोणाला फळ मिळत हे तुला दाखवितो. तुला पाहायला मिळेल आणि त्यांनी काय केलं अगदी अत्यवस्थ स्थिती मध्ये एक म्हातारा मनुष्य रस्त्यामध्ये पडलेला आहे. शंकराने रुप घेतलं. पार्वतीन आणखी स्त्रीचे रुप घेऊन तिथं ती बसलेली आहे आणि येणाऱ्या जाणाऱ्याला म्हणती आहे, ''अहो कोण गंगा स्नान करुन आलेला कोणीतरी मनुष्यांनी, या माझ्या पतीच्या मुखामध्ये गंगाजल घाला म्हणजे हा पती जिवंत होईल, सावध होईल, पण मी माझ्या जवळ कांहीही पाप शिल्लक

राहिले नाही. मी अगदी आणखी निष्पाप पूर्ण, पापरहित झालेलो आहे असा जो विश्वासाने असेल, आपल्या जवळ कांहीही पाप शिल्लक राहिलेले नाही. त्यांनी मात्र माझ्या पतीच्या मुखात पाणी घातलं म्हणजे तो उठेल.'' प्रत्येकाला वाटायला लागलं गंगेमध्ये स्नान करुन आलेला आहे पण या बाईंची अट आहे.

पाप माझ्याजवळ नाही अशी ज्याला पक्की खात्री आहे त्यांनी पाणी घातलं पाहिजे. कांहीही पाप नाही असं कसं म्हणायचं ? जो तो जायला लागला. एक साधारण खेड्यात राहणारा मनुष्य आला तो म्हणाला, बाईसाहेब, मी निष्पाप आहे. मी आत्ता गंगा स्नान करुन आलो आहे. आत्ता माझं कांहीही पाप माझ्याजवळ नाही. असं तो म्हणाला. मी पाणी घालतो म्हणाला. घातलं पाणी आणि उठून बसला तो म्हातारा. शंकर भगवान म्हणाले, पार्वती, सगळेच गंगास्नानाने मुक्त होतात कां ? हे तुला वाटत होतं नां ? पहा म्हणाले. कोण मुक्त होईल कांही सांगता येत नाही. ठरीव म्हणाले तुझ तू. ही मनोभावना आहे.

मंत्रे-तीर्थे द्विजे देवे दैवज्ञे भेषजे गुरौ ।
यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी ॥ गुरुचरित्र ४०/४८

दैवज्ञ बद्दलही तेच आहे. शास्त्र खोटे नाही. पण शास्त्र सांगणारा जो आहे त्याच्यावर विश्वास पाहिजे. तो शास्त्रज्ञाता आहे, औषधावर विश्वास पाहिजे. तथा गुरौ, गुरुच्या ठिकाणी विश्वास जर असेल

यादृशी भावना यस्य, सिद्धिर्भवति तादृशी

त्यांनी सांगून टाकलं. साधक जीव आहे, सिद्धांनी सांगितलं आहे मी मोठा आहे असं कधीही म्हणायचं नाही. जे खरे सिद्ध आहेत ते खरे मोठे आहेत, ते स्वत:चे सामर्थ्य कधीही सांगत नाहीत. त्रिविक्रम भारतींनी विचारलं महाराज याचं ज्ञान कसं गेलं. ते भस्माने आलं होतं. भस्म धुवून गेलं व ज्ञान गेलं. आम्ही दिलं, आम्ही घालविलं कांहीही बोलले नाहीत या लोकांना.

भावनेचं महत्त्व कसं आहे. विश्वास, साधन, त्या साधनावरती विश्वास पाहिजे. व्यावहारिक साधन, औषध घेतानासुद्धा विश्वास पाहिजे, तर त्या औषधाचं फल मिळेल. हे व्यवहारातल्या सुद्धा गोष्टीवरती विश्वास ठेवावा लागतो. मग ही एक अदृष्य शक्ती आहे. या अदृष्य शक्तीपासून आपलं कार्य करून घ्यायचंय, त्यावेळेला पूर्ण विश्वास पाहिजे, त्याशिवाय कसं होईल?

म्हणून त्यांनी एक कथा सांगितली, एका देशामधे राजा म्हणाले, राजपुत्र होता आणि त्याच्याबरोबर काही भिल्ल मंडळी, पारधी वगैरे निघाले शिकारीला गेले. दुपारच्या वेळेला, पाण्याचा शोध चाललेला आहे. एक त्यातला आणखी, हा निघालेला आहे, तो जो त्यांचा होता बरोबरचा, हा, तो आणखी पाण्याचा शोध करायला निघालेला असताना एक जुनं मंदिर, पडकं

मंदिर त्याला दिसलं. आणि तिथे एक शिवलिंग त्याला मिळालं. शंकरांचा भक्त होता. बराय शिवलिंग चांगलं आहे. आपण पूजा करायला घरी घेऊन जाऊ, असं त्याला वाटलं. इतक्यात तो राजपुत्र जवळ आला, काय म्हणाला, अशी किती तरी शिवलिंगं इथे पडलेली आहेत. काय त्या शिवलिंगात काय आहे? मला म्हणाले पूजा करायची इच्छा आहे. तुम्ही सांगा कशी पूजा करावी, चांगलं मला वाटतं. बर, म्हणाले कर, पूजा. सगळा पूजाविधी सांगितला. रोज आणखी पूजा वगैरे करावी, नैवेद्य स्वयंपाक वगैरे करून तोही द्यावा, नैवेद्य दाखवावा, आणखी चिताभस्म जे आहे, नवीन चिताभस्म, रोज स्मशानामधे जाऊन, ज्याला मृत्यू आलेला आहे, त्याची चिता पेटलेली आहे, त्यातल भस्म आणून ते थोडं नैवेद्य दाखवित जा.

श्मशानेष्वाक्रीडा स्मरहर पिशाचा: सहचरा **श्चिताभस्मालेप: स्त्रगपि नृकरोटीपरिकर: ॥**

(श्री पुष्पदंत विरचित शिवमहिम्न स्तोत्र–श्लोक २४)

भगवान शंकराचं वर्णन आहे. अमंगल वाटतं पण अमंगल नाहीये.

अमङ्गल्यं शीलं तव भवतु नामैवमखिलं तथापि स्मर्तृणां वरद परमं मङ्गलमसि ॥

(श्री पुष्पदंत विरचित शिवमहिम्न स्तोत्र–श्लोक २४)

पुष्पदंतानं सांगितलं आहे.

तर, त्या शबराला सांगितलं, भिल्लाला, राजपुत्रानी. तो घरी आलेला आहे. आणि देवघरामधे ते शिवलिंग त्यांनी स्थापन केलं. पत्नीलाही सांगितलं, भगवान शंकरांच्या कृपेनी आपल्याला शिवलिंग मिळालेलं आहे. आणि त्याची पूजा म्हणाले, आजपासून करायची आहे. सुरु केली. रोज गुरूनी सांगितल्याप्रमाणे स्मशानामधे जाऊन सकाळी, अगोदर ते चिताभस्म आणून ठेवायचं, नंतर पूजेला सुरूवात करायची. चिताभस्म द्यायचं, आणखी नैवेद्यही द्यायचा, अर्पण करायचा.

एके दिवशी अशी परिस्थिती झालेली आहे, की स्मशानामधे, कोणीही मेलेला नाही त्यादिवशी. चिताच पेटली नाहीये. चिताभस्म कुठलं द्यायचं? तो गेला, दुसऱ्या गांवी गेला, तिथंही कुणी मेलं नाही. तिसऱ्या गांवी..... अशा सहा–सात गांवाला हिंडून आला पण त्या सहा–सात गांवात त्यादिवशी कोणालाही मरण आलेलं नाही. चिताच नाही, मग चिताभस्म कुठलं द्यायचं? निराश झाला बिचारा तो शबर. परत आला घरी, आपल्या पत्नीला म्हणाला, काय करावं म्हणाला, इतके दिवस शिवपूजा घडली. गुरूजींनी सांगितल्याप्रमाणे घडली, आज आता चिताभस्मच मिळत नाही, पूजा कशी करायची आहे? आपली बुद्धी तिथे चालवायची नाही. सद्गुरूंच्या शब्दावरती त्याचा विश्वास, त्यांनी सांगितलं, त्याप्रमाणे पूजा करायची आहे. ती पूजा आणखी जर काही प्रतिबंध झाला तर, त्याकरता स्वतःचा देहही अर्पण करायचा आहे.

भगवान शंकरांची पूजा, महाविष्णू करत होते म्हणतात, दररोज. पुष्पदंतांनी वर्णन केलेलं आहे आपल्या महिम्न स्तोत्रामधे. चातुर्मास्य पूजा करायची शंकरांची, आणखी रोज पूजेच्या वेळेला, एक हजार कमळं शंकरांना वहायची, एक एक नांव घेऊन, आपलं एक एक कमळ वहायचं. शंकरांनी एकदा परीक्षा पाहण्याचं ठरिवलं. भगवान पूजा करतायत. काय, बघू या म्हणाले. पूजेला बसलेले असताना सहस्त्रनामाचं उच्चारण चाललेलं आहे, शेवटी नऊशे नव्याण्णव नावं झाली, कमळं संपली. एक कमळ शिल्लक नाही. आता काय त्या वेळेला कुणाला पाठवायचंय काय ? पूजा-बिजा करायची झाली तर, अगोदर सगळी पूजेची तयारी वगैरे, सगळी सामुग्री तयार करून मग पूजेला सुरूवात करायची आहे. जावईबुवा म्हणा किंवा मोठा श्रीमंत माणूस घराला जेवायला यायचाय, सगळा स्वयंपाक वगैरे तयार झाल्यानंतर पानं मांडायची असतात. का जेवायला बसल्यानंतर थांबा थोडसं, तूप आणायचंय अजून, लाडू व्हायचेत, थोडा वेळ थांबा, नाहीतर उठून नंतर जेवा, असं सांगायचं काय? एक कमळ शेवटी कमी पडलेलं आहे. एकदम भगवंतांनी आपल्या डोळ्यामधे बोट घातलं, नेत्रकमळ आहे, पुंडरिकाक्ष भगवान कमळाप्रमाणे आहे ते. ते शेवटचं नाव उच्चारलं ते, नेत्रकमळ अर्पण केलं, झालं, शंकर प्रसन्न झाले. सुदर्शन चक्र त्यांना दिलं असं म्हणतात.

हरिस्ते साहस्त्रं कमलबलिमाधाय पदयोर्यदेकोने तस्मिन् निजमुदहरन्नेत्रकमलम् ।
गतो भक्त्युद्रेकः परिणतिमसौ चक्रवपुषा ।
त्रयाणां रक्षायै त्रिपुरहर जागर्ति जगताम् ॥

(श्री पुष्पदंत विरचित शिवमहिम्न स्तोत्र-श्लोक १९)

सर्व त्रैलोक्याचं रक्षण करण्याकरता, सुदर्शन चक्र आपल्या कृपेनं महाविष्णूंना मिळालं म्हणाले. हा आपला प्रसादाचा महिमा आहे. तर ही, भावना आहे. भावनेनं पूजा झाली पाहिजे, कर्म झालं पाहिजे.

तो, शबर सांगतो आहे, आपल्या पत्नीला, आज म्हणाले गुरूमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे मला पूजा करता येत नाही. तेव्हा मी असं ठरवलंय, चिता भस्म पाहिजे ना? म्हणजे मेलेल्या शरीराची चिता होती, जिवंत शरीरच मी अग्नीमधे अर्पण करतो. ते भस्म घेऊन तू भगवान शंकरांना अर्पण कर म्हणजे आजची पूजा झाली, संपलं. माझं. आता माझी पूजा. आता शेवटची ही पूजा आहे. आजची पूजा तुझ्या हातून तू कर म्हणाले.

ती मोठी पतिव्रता स्त्री. विवेकसंपन्न आहे. धर्मशील वृत्तीची आहे, ती म्हणाली, महाराज, काळजी करायचं काय काम आहे म्हणाली. मी आहे ना. मी माझं शरीर अग्नीमधे अर्पण करते, आपण पूजा रोज करता, आजही आपणच पूजा करा. माझं शरीर आणखी

अग्नीमधे दग्ध झाल्यानंतर, ते भस्म ईश्वराला अर्पण करा आपण. काय हरकत नाही. स्त्री अगदी आनंदाने परवानगी देती आहे. पण याच्या मनामधे थोडासा मोह निर्माण झालेला आहे. ममता आहे, स्त्री, माझी स्त्री आहे. ती ममता थोडी आड आली. काय बाई, काय लोक म्हणतील मला? तुझे आईबाप काय म्हणतील? यानी आपल्या बायकोला जाळून टाकलं, आणि अशी भक्ती केली, अशी पूजा केली, काय याच्या पूजेचा उपयोग? तुझं शरीर किती चांगलं आहे, तेव्हा तुझं शरीर अग्नीमधे कसं मी घालू? स्वतःचं शरीर अग्नीमधे दग्ध करण्याची तयारी आहे, पण स्त्री म्हणते आहे, माझं शरीर दग्ध करा. त्याला मात्र तयार नाही, याला कारण मोह आड आलेला आहे. हा जो मोह उत्पन्न झालेला आहे, ह्यामुळे दुःखी झाला तो. कसं करायचं हे? ती म्हणाली, काय तुमचं हे अज्ञान आहे म्हणाली. अर्धांगी मला म्हणतात, तुमचं अर्ध शरीर म्हणजे मी आहे, माझ्या शरीरावर तुमचा हक्क आहे. तुमच्या कार्याकरता माझं शरीर जर गेलं तर देवाचा प्रसाद तुमच्यावरती होऊन, माझ्यावरतीही होईल म्हणाली. फार तुम्ही या मोहामधे पडू नका. चांगलं नाही, तुमचं आणखी पूजा कार्य आणखी यथासांग घडून येऊ दे. समजूत केली. घरामधे गेलेली आहे, कडया बिड्या लावून घेतल्या. अग्नी लावून द्या म्हणाली. आणि त्यालाही ते पटलं, त्याने संबंध घर जाळून टाकलेलं आहे. स्त्रीही ती त्यात दग्ध होऊन गेली. हा सगळं विसरून गेला.

आज आपली पूजा भगवान शंकरांची थांबणार होती. ती आज आपल्याला चिता भस्म मिळालं, कुणाचं मिळालं, काय झालं, सगळं विसरून गेला. आणलं ते भस्म. शंकराना अर्पण केलेलं आहे. आणखी आरती झाली, नैवेद्य झालेला आहे. रोज त्याचा नियम होता, की सर्व पूजा समाप्त झाल्यानंतर, आंत स्वयंपाकघरात असलेल्या आपल्या स्त्रीला त्यानी हांक मारावी, लवकर ये, तीर्थ-प्रसाद घेण्याकरिता. त्या दिवशीही त्याचप्रमाणे त्याने आपल्या स्त्रीला हाक मारली, लवकर ये बाई, पूजा समाप्त झालेली आहे, तीर्थ प्रसाद ग्रहण करण्याकरता ये म्हणाले. आणि आली लगेच ती. ते घर जसंच्या तसंच, ती स्त्रीही पुन्हा तीर्थ प्रसाद- मग त्याला आठवण झाली, तो म्हणाला, आत्ता तू घरात गेली होतीस, सगळं घर जाळून टाकलं, तुही जळून गेलीस, तुझं भस्म.. नंतर तो म्हणायला लागला. तोपर्यंत कांही आठवत नाही. **देवाची पूजा जर निष्ठेनं झाली तरी संसार सगळा जळून जाईल, पण पुन्हा मिळेल. संसार जळून जाऊ दे म्हणतात सगळे महात्मे,** नको आम्हाला संसार. पण जळून गेलेला संसारसुद्धा पुन्हा निर्माण होऊ शकतो. त्याचं स्मरणसुद्धा नाही, संसार गेला, घरदार गेलं, बायको गेली, काही आठवणसुद्धा नाहीये. ही जर भावना अंतःकरणामधे असेल तर जसाच्या तसा संसार पुन्हा होईल, नेहमीप्रमाणे. पण तो जात नाहीये.

बळीराजाचं राज्य गेलं नाहीये. सर्वस्व त्यांनी दिलं, स्वतःचा देह जरी अर्पण केला, तरी भगवान स्वतः त्याचे पक्षपाती झालेले आहेत. बळीराजाला सांगितलं, की तू सध्या सुतल लोकामधे जाऊन रहा, हा इंद्र जो आहे सध्या, त्याचा अधिकारकाळ संपल्यानंतर पुढचा इंद्र म्हणजे तूच होणार आहेस. देवानीच इंद्र व्हावं आणि दैत्यानी इंद्र होऊ नये असा पक्षपात देवाच्याजवळ नाहीये, वैषम्य नाहीये. जो मनाने देव बनलेला आहे, तो दैत्यकुळामधे जन्माला आलेला असला तरीसुद्धा हा बळीराजा इंद्रपदाचा अधिकारी होण्याला लायक आहे, हे देवानी ठरवलं. त्याला, त्याचं राज्य घेतलं, पण त्याला इंद्रपद पुन्हा दिलेलं आहे. म्हणजे ईश्वराला अर्पण केलं, सर्वस्व अर्पण करण्याची तयारी आहे. श्रीयाळ बालकाचं आणखी हे पाहिजे आहे, मांस पाहिजे, तो अतिथी म्हणतो आहे, दिलं मांस त्याला, अतिथीला दिलेलं आहे, परंतु पुन्हा हांक मारल्याबरोबर तो बालक धावत आलेला आहे. गेला नाही बालक. त्याकरिता धारिष्टयं पाहिजे, धैर्य पाहिजे. 'कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे', हे भगवंताचं सामर्थ्य आहे, त्याच्यावर विश्वास पाहिजे.

महाराजांनी ही कथा, भगवान शंकर प्रसन्न झाले, त्यांनी त्याला वर प्रदान केलेलं आहे. तुला आणखी उत्तम गती मिळेल, समृद्धी सर्व मिळेल, म्हणून त्याला आशीर्वाद दिलेला आहे त्यांनी. साधा आणखी भिल्ल मनुष्य, भावनेनं पूजा त्याने केली, आणि ती पूजा सांग होण्याकरिता स्वतःच्या पत्नीलाही, तिच्या संमतीने, आणखी अग्नीमधे टाकलेलं आहे. आणि तशी पूजा आपली पूर्ण केली. त्याचं फळ त्याला मिळालेलं आहे. **हे भावनेचं फळ आहे म्हणतात महाराज. तुमची भावना, जीवात्मा कर्म करणार आहे, पूजा करणारा तो आहे. त्याच्याजवळ जर भावना असेल तर त्याला फळ मिळू शकेल.**

जीवाचं कर्तृत्व आहे असं भगवान सांगतायत, पण ते कर्तृत्व इतकं उच्च झालं पाहिजे. उच्च भावनेमधे आल्यानंतर कर्ता मी आहे म्हटलं तरी चालेल. ती भावना राहू शकत नाहीये, तो अभिमान नाहीये. हे झालं पाहिजे, सांग पूजा झाली पाहिजे, हा आग्रह आहे. त्यामुळे त्या भावनेचं फळ त्या शबराला मिळालं. तसं म्हणाले या ब्राह्मणाला, नरहरीला सुद्धा फळ मिळेल की, म्हणाले. वाळलेल्या लाकडाला आणखी अंकुर येत नाही म्हणून तुम्हाला कोणी सांगितलं म्हणाले. बघू या काय आहे, चला, म्हणाले. निघाले महाराज. सगळी मंडळी निघालेली आहेत. संगमावर येऊन पोचले, महाराज. तो ब्राम्हण आणखी पाणी आणलं त्यानी. त्याला पाणी घालतो आहे. अगदी सात दिवस अन्न नाही, कृश शरीर झालेलं आहे. महाराजांना नमस्कार करून तो उभा राहिलेला आहे. त्याची भावना शुद्ध आहे. बुद्धिभेद होऊ शकत नाहीये. एकनिष्ठ बुद्धी आहे. ही एकनिष्ठ बुद्धी बनवण्याकरिता आणखी जन्म जन्म अभ्यास करावा

लागतो. अनेक अशा प्रकारच्या घटना पहाव्या लागतात. पुन्हा बुद्धी घसरती, पुन्हा सावरायचा प्रयत्न करायचा आणि मग तिला पक्कं करायचंय, बुद्धीला. त्याकरिता अनेक जन्म घालावे लागतायेत.

आपलं कर्तृत्व आहे, असं माना तुम्ही, पण ते कर्तृत्व तरी ईश्वराची पूजा सांग करण्याकरिता त्या कर्तृत्वाचा, अभिमानाचा उपयोग करा, मी करणार, पूजा मी करणार, चिताभस्म आज देणार मी, त्याकरता माझा देह द्यायला मी तयार आहे. ती स्त्री तयार झाली, मी तुमचीच आहे की म्हणाली, माझा देह काय, तुमचा देह काय. तुम्ही पूजा करता, करा माझं भस्म. म्हणजे **स्वतःचा देहसुद्धा अर्पण करण्याची तयारी आहे.** मी पूजा करणार हा अभिमान जरी असला, तरी त्या अभिमानाने पूजा करताना स्वतःचा देहाभिमान सोडण्याची तयारी पाहिजे. देहाभिमान फार वाईट आहे. देहासक्ती अत्यंत वाईट आहे. देहाची आसक्ती उत्पन्न झाल्यानंतर आणखी धर्माचरण घडत नाही, व्यवस्थित घडत नाही.

थोरल्या महाराजांची गोष्ट काल सांगायची राहिली. कधीही त्यांनी औषध घेतलं नाही. सर्पदंश, विंचू चावले, साप चावल्याबरोबर ते आणखी आसन घालून बसायचे, समाधी लावून. चार-चार तास, पांच-पांच तास, आठ आठ तास, ते विष सगळं उतरल्यानंतर समाधीतून उठायचे. औषध नाहीये. एकदा असा एक मोठा विषारी साप चावला, आठ तास ते समाधीमधे बसलेले होते म्हणे. नंतर समाधी उतरल्यावरती डोकं अतिशय जड झालेलं आहे. काय झालं कुणास ठाऊक. समाधीचा उपयोग नाही. हा साप काय, मग ते पाहिलं कोणीतरी. त्या सापाचा दांत, विषारी दांतच मोडून आंत बसला, इतक्या भयंकर रागानी तो चावला. तो दांत काढून टाकला, मग डोकं शांत झालं. म्हणजे हा देह काय, देह त्याचा आहे, **त्याने निर्माण केलाय, कर्माधार देह आहे, कर्माप्रमाणे काय देहाचं व्हायचं ते होईल. अशी देहाबद्दल उदासीन अवस्था ज्यांच्या मनाची झालेली आहे, त्यांना देवाची भक्ती आणखी दृढ होती आहे. पक्की ज्यांची भक्ती असते. त्यांची भावना उत्तम असते,** त्या भावनेप्रमाणे फळ मिळू शकतं.

प्रसन्न झाले महाराज, हातामधे कमंडलू होत, पाण्याने भरलेल, जवळ गेले त्या लाकडाच्या, त्याच्यावरून तो कमंडलुतलं पाणी त्या लाकडाला घातलेलं आहे. पाणी घातल्याबरोबर, खालपासून वर पर्यंत आणखी सबंध पानं त्यास फुटलेली आहेत, पानं उत्पन्न झाली. इकडे हा जो नरहरी ब्राह्मण, याच्या देहाचा कुष्ठरोगही दूर झाला. वाळलेल्या लाकडाला जर आणखी पानं उत्पन्न झाली तर या सजीव, देहाचा रोग राहणार आहे का? हाही सुंदर देह झालेला आहे. किती तीर्थयात्रा केल्या, किती जप-जाप्य केले, किती पुरश्चरणं केली, किती पाठ केले. नाही गेलं नाही. पण ते फुकट गेलं असे म्हणायचं नाही. त्या सगळ्याही पुण्याने महाराजांचं दर्शन झालेलं आहे. **महाराजांचं दर्शन झाल्यानंतर त्यांची अयोग्य वाटण्यासारखी आज्ञासुद्धा पालन केली पाहिजे,**

अशी बुद्धी पक्की झालेली आहे. हे त्या सगळ्या पुण्याचं फळ आहे. कुष्ठरोग गेला नसेल, त्याने सांगितलं, मी सगळ्या तीर्थयात्रा केल्या, पुष्कळ आणखी अनुष्ठानं केली, कांही झालं नाही म्हणाले. नाही, बाबा त्याचा उपयोग आहे, ते फुकट गेलं नाही. गाणगापुरात आल्याबरोबर, यांच्यापासून आणखी अशाप्रकारचं हे होणार होतं. त्यांच्याबद्दल ही इतकी निःसीम श्रद्धा, दृढ श्रद्धा, दृढ भावना मनामध्ये उत्पन्न झाली. हे कशाने झालं? नाहीतर, इतक्या तीर्थयात्रा, इतकी अनुष्ठानं केली, ते जसं फुकट गेलं, तसं यांच्याजवळही जाऊन पाहू या. हे इथंसुद्धा कांही होणार नाही, आपलं नशीबच असं आहे, असं नशिबाला दोष देऊन आणखी नास्तिकच बनला असता तर काय? पण नाहीये, इथं आल्याबरोबर मात्र पूर्ण विश्वास त्याच्या मनामधे आहे, आणि त्याचा विश्वास घालविण्याचा प्रयत्न लोकांनी केला, तरीसुद्धा तो टिकलाय. हे त्यानी आजपर्यंत केलेल्या सगळ्या पुण्याचं फळ त्याला मिळालेलं आहे, तशी दृढभावना झाली आणि **महाराजांनी स्वतः त्या शुष्क काष्ठाला पल्लवं आणलेली आहेत.**

कार्यकारणभाव, हा जगामधे कधीही नाही, असा कार्यकारणभाव. वाळलेल्या झाडाला, लाकडाला पाणी घातल्यानंतर त्याला पानं येणार आहेत आणि ती पानं फुटल्याबरोबर तुझा, शरीराचा रोग जाणार आहे. कधी असंभाव्य गोष्ट आहे. वाळलेल्या लाकडाला पानं कशी येणार, पाणी घातलं तरी आणि त्या लाकडाला पानं आली म्हणून माझ्या शरीराचा रोग कसा जाणार? हा काय संबंध आहे? दोन्हीही कार्यकारणभाव चिकित्सकाला पटणारे नाहीयेत. कारण कधीच घडत नाही. कार्यकारण भावाची सिद्धी प्रत्यक्ष प्रमाणाने होत असते. कारण असेल तर कार्य होत आहे. कारण नसेल तर कार्य होत नाही. अन्वय आणि व्यतिरेक, हे प्रत्यक्षाने पहावे लागतात. वन्ही असेल तर धूर होतो आणि वन्ही नसेल तर धूर नाही, हे अन्वय व्यतिरेक पाहून त्यांची व्याप्ती, कार्यकारणभावात्मक सिद्ध करावी लागते. करता येती. धूर ज्याअर्थी दिसतोय त्याअर्थी इथे अग्नी आंत असला पाहिजे हा त्यांचा सहजात म्हणजे ही त्याची व्याप्ती, हा अन्वय-व्यतिरेक पाहून आणखी तो कार्यकारणभाव सिद्ध होऊ शकतो.

हा कार्यकारणभाव सिद्ध कसा करायचा? वाळलेल्या लाकडाला पाणी घातलं म्हणजे लाकडाला अंकुर येतात. पण त्याला मुळात थोडे तरी असले पाहिजेत अंकुर. वाळलेल्या लाकडाला कधी उदाहरण पहायला मिळेल का? पाणी घातल्यानंतर आणखी झाडाला नवीन पानं येतात, पण झाड ते जिवंत पाहिजे. कांही पानं आहेत. कांही पानं गेलेली आहे. पुन्हा ते झाड वाढायला लागतं. पाणी घातल आणि व्यवस्था त्याची केली म्हणजे, पण ते जिवंत असलेलं पाहिजे. काही पानं आहेत, काही पानं गेलेली आहेत पुन्हा ते झाड वाढायला लागतं. वाळलेल्या लाकडाला पाणी घातल्यानंतर त्या लाकडाला पानं कशी येणार? हा कार्यकारणभाव हा व्यवहारामधे अन्वय-व्यतिरेक पहायला कुठ मिळणार आणि सिद्ध कसा होणार? दुसरी

गोष्ट, झाडाला पानं आली म्हणजे याच्या शरीराचा कुष्ठरोग कसा जाणार? हेही आहे. रोग एकीकडं आणि औषध दुसरीकडं, असं चालतं कां ? निरोगी माणसाने औषध घ्यायचं, रोगी माणसाचा रोग जायचा हे शक्य कसं आहे ? किंवा एखाद्या दुसऱ्या रोगी माणसाला औषध द्यायचं आणि हा एक रोगी, तिसरा रोगी बरा झाला, असं कधी पाहायला मिळतं कां ? औषधाचा सुद्धा जो उपयोग आहे तो एक समान आधिकरण्य पाहिजे. ज्या ठिकाणी रोग असेल, त्या ठिकाणी औषध दिलं गेलं पाहिजे तर त्या औषधाने तो रोग जाऊ शकेल. झाडाला पानं आली, पाणी घातलं म्हणून, आणि ह्याचा रोग गेला हा कार्यकारणभाव कसा सिद्ध करायचा? चिकित्सेमधे हे बसत नाहीये. नुसत्या बुद्धीने याचा निर्णय करता येत नाहीये. महाराजांची इच्छा आहे, महाराजांची वाणी आहे. त्या, आणखी त्यांनी जे ठरवलेलं आहे, त्या आणखी नरहरीनं, की सद्गुरूंची वाणी आहे आणि त्यांचा संकल्प आहे, त्याप्रमाणे घडून येणार आहे. पहिल्यापासून संकल्प आहे. चिकित्सेच्या नादात तो पडलेला नाहीये. प्रयोग करायचाय, प्रयोग करण्याकरता देह गेला तरी हरकत नाही. सत्य आहे, सत्य समजायला वेळ लागेल, लागू दे. परंतु हे सत्य आहे ही खात्री पहिल्यापासून पाहिजे, तर ते सत्य आणखी उघडकीला येतं, नाहीतर येत नाही. म्हणून चिकित्सा करताना ही चिकित्सा होऊ शकत नाहीये, कोणीही याला बुद्धिवादाने उत्तर देऊ शकणार नाही. एक महाराजांची इच्छाशक्ती आहे किंवा हा जो साधक जो आहे, भक्त आलेला आहे, त्याची भावनाशक्ती आहे. त्यामुळे हे झालं, हेच उत्तर द्यावं लागेल. कार्यकारणभाव कांहीही सांगता येणार नाही, सिद्ध करता येणार नाही. व्यवहारातल्या गोष्टी, कांहीही तिथे उपयोगी पडणार नाहीत. म्हणून ही गोष्ट घडून गेलेली आहे आणि **याला या चरित्रामधे, महाराजांनी, जीवांच्या भावनेलाच महत्त्व दिलेलं आहे.**

झाडाला पाने येणार, अशी त्याची भावना आहे. त्याला भावना कशी झाली, काय झाली, त्याच्या मागच्या जन्माकडे तुम्ही जाऊन पाहू शकणार नाहीत. चिकित्सा कांही इतकी करू शकणार नाही. फक्त समोर असेल तेवढीच चिकित्सा करू शकतो. त्या जीवाची मागची कर्म काय आहेत? त्याचं पुण्य काय आहे? त्या पुण्यामुळे त्याची बुद्धी स्थिर कशी झाली? हा कार्यकारणभाव कुणालाही सिद्ध करता येणार नाही. तो ज्ञानी महात्मा जो असेल तो सांगेल. याचं सगळं पुण्य उपयोगी पडलेलं आहे. त्यामुळे याची बुद्धी स्थिर राहिलेली आहे. त्याचा बुद्धिभेद झाला नाही. शेवटपर्यंत हा टिकून राहिलेला आहे. देह गेला तरी हरकत नाही, महाराजांची वाणी खरी होणार आहे.

तर याप्रमाणे आणखी त्याला फळ मिळालं आणि महाराजांनी सुद्धा शास्त्रप्रमाण जे आहे, शास्त्राने जे भावनेला महत्त्व दिलेलं आहे, चिकित्सा आणि भावना. चिकित्सा करू नका असं शास्त्र म्हणत नाहीये.

श्रोतव्यः श्रुतिवाक्येभ्यो मन्तव्यश्चोपपत्तिभिः।
मत्वा च सततं ध्येय एते दर्शनहेतवः ॥ (वेदान्तसार विद्वन्मनोरञ्जनी टीका खंड-४)

परमात्म्याचं दर्शन पाहिजे ना तुम्हाला? दर्शन नाही म्हणून नाही म्हणू नका. दर्शन होणं शक्य आहे. पण त्याच्याकरता जी साधनं आहेत ती करा. श्रोतज्ञ, श्रृतिवाक्येभ्यः वेदवाक्यांनी त्या परमात्म्याचं जसं वर्णन केलेलं आहे, तसं अगोदर ऐका, ईश्वर कसा आहे, हे सगळं वेदांनी सांगितलंय. त्या ईश्वराचं वर्णन अगोदर श्रवण करा, ऐकल्यानंतर, मनानी त्याची चिकित्सा करा, हे योग्य आहे की अयोग्य आहे, हे त्यांनीच सांगितलंय. 'कर्तव्यस्य उपपत्तिभिः' ही, मन्तव्यश्च उपपत्तिभिः ही अनेक साधनं, युक्ती, नाही म्हणा, होय म्हणा तुम्ही पक्ष घ्या, सगळं करा. दोन्हीही वकील भांडत असतात, हा दोषी आहे, एक वकील म्हणतो, हा निर्दोष आहे, दुसरा वकील म्हणतो, न्यायाधीश तटस्थ आहे. ऐकून घेतो, दोघांचेही पक्ष, दोघांचेही वाणी वक्तृत्व ऐकून घेतो, आणि तटस्थ बुद्धीनं स्वतःचा निर्णय करून त्याप्रमाणे तो दोषी किंवा निर्दोषी ठरवून टाकतो. त्याकरता, तुम्ही वाटेल, तितकी चिकित्सा करा म्हणतात, शास्त्रप्रमाणांनी जे सांगितलेलं आहे, ईश्वराचं वर्णन केलेलं आहे, हे अगोदर ऐका.

शांताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं ।
विश्वाधारं गगनसदृशं, मेघवर्णं शुभाङ्गम् ॥.
लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यं ।
वन्दे विष्णुं भवभयहरं, सर्वलोकैकनाथम् ॥

याचा अर्थ समजून घ्या म्हणतात. काय याच्यामधे ईश्वराची शक्ती कशी काय आहे. त्याचं स्वरूप कसं आहे, हे सगळं वर्णन केलेलं आहे. ते ऐकायचं. हे शक्य आहे काय ? असा करा विचार, हरकत नाही, विचार करायला हरकत नाही. चूक आहे म्हणा अगोदर, पण नंतर बरोबर आहे असंही कळण्याकरिता प्रयत्न करा. हे सांगितलेलं आहे महात्म्यांनी किंवा महाराजांनी त्याच्याप्रमाणे थोडासा विचार करायला लागा. विरूद्ध दिशेचा विचार, एकच विचार केला म्हणजे शेवटी शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांची भेट झालीच नाही असा निर्णय झालाय म्हणतात. काय निर्णय झालाय, इतिहास कसा आहे, इतिहाससुद्धा वाचा... कायदा झलाच नाही. म्हणून एकाच बाजूनं बुद्धी चालवून नाही म्हणा तुम्ही, नाही म्हणण्याकरता काय तुम्हाला काय युक्त्या दाखवायच्यात त्या ऐका लोकांकडून. ऐका की नाही म्हणा. पण आहे म्हणून जे सांगितलेलं आहे, ऐकलेलं आहे त्या बाजूनेही थोडासा विचार करायला लागा. आणि तिथे आपली बुद्धी चालवायला लागल्यानंतर ते खरं आहे असं तुम्हाला वाटायला लागेल. आणि असा पूर्ण विचार करून शेवटी ज्याला आत्माच म्हणतात, त्याचं ध्यान करायला लागा. ध्यान

सदा घडलं पाहिजे त्याशिवाय दर्शन नाहीये. नुसत्या चिकित्सेनं दर्शन नाहीये. केवळ भावनेनंही नाहीये. भावनेचं सुद्धा ध्यानामध्ये पर्यवसान झालं पाहिजे.

तेव्हा ईश्वराचं दर्शन नाही असा अर्थ नाहीये, त्या दर्शनाकरिता हे उपाय सांगितलेले आहेत. त्याच्यामधे मंतव्य, मनन करा, चिकित्सा करा. वाटेल तितकी चिकित्सा करा, परंतु त्या चिकित्सेमधे केवळ नाही ही गोष्ट घेऊ नका. अस्ति पक्षही घ्या आणि त्या पक्षानी, काय मोठ्या – मोठ्या लोकांनी विचार मांडून ठेवलेले आहेत, किती तर्कानी विचार, ईश्वराचं अस्तित्व सिद्ध करण्याकरिता केवळ बुद्धिवादानेही प्रयत्न केला गेलेला आहे. संपूर्ण न्यायशास्त्र त्याच्याकरिता आहे. **कुसुमांजली** सारखे ग्रंथ कुबेराचार्यांनी निर्माण केलेले, ईश्वराचं अस्तित्व सिद्ध करण्याकरता केलेले आहेत. ते वाचले पाहिजेत. आहे म्हणणारा जो आहे पक्ष, त्या पक्षाचे आणखी विचार ऐकायला नकोत का? नुसतं नाही, आम्हाला दिसत नाही, नाही म्हणायचं, तशाच प्रकारच्या लोकांनी तसंच सांगायचं. एकच बाजू ऐकून घेतल्यानंतर तसंच वाटणार. बुद्धी शुद्ध होण्याकरता म्हणून दोन्ही पक्षाचं आणखी श्रवण केलं पाहिजे, मनन केलं पाहिजे. आणि जर बुद्धीमधे दोष असेल तर, जोपर्यंत, ती बुद्धी स्थिर झाली नाही, तर ध्यान लागणं शक्य नाहीये. आणि ध्यास जर झाला नाही तर दर्शन बंद आहे, होणार नाही दर्शन. केली पाहिजे, चांगलं श्रद्धेनं श्रवण केलं पाहिजे. वाटेल तितकी चिकित्साही केली पाहिजे, आणखी चिकित्सेनं बुद्धी स्थिर करून मग त्याचं ध्यान घडलं पाहिजे. म्हणजे साक्षात्कार आपोआप होतोय. ईश्वर दिसत नाही, पण दिसू शकतो. पाहिलेले लोक सांगतायत. त्याचे उपाय सांगतात.

तर अशा रीतीनं, नरहरी भक्ताचं ते वर्णन झालेलं आहे. कुष्ठरोग लगेच निघून गेला. त्यानी केलेली पुण्याई, तीर्थयात्रा, जपजाप्य, अनुष्ठानं, सगळी फलद्रूप झालेली आहेत. ती सद्गुरू महाराजांची भेट झाली, हे कार्य आणि सद्गुरू महाराजांच्या ठिकाणी त्याची बुद्धी पक्की श्रद्धा युक्त झाली हे दुसरं कार्य आहे. नुसते सद्गुरू भेटूनही उपयोग नाहीये. सद्गुरू भेटले आणखी असा बुद्धिभेद करणारे लोक आले, करायला निघाला तो, पाणी घालतोय, उपास करतोय, लोकांनी येऊन सांगितलं, यालाही वाटलं आता कांही अन्न नाही, पाणी नाही, किती दिवस बघायची वाट? इकडे मात्र आम्ही किती दिवस झाले मोजतो, व्यवहारामधे मात्र किती दिवस झाले, काय झालं तरी कांही नाही. पाहू या. एक कोर्टात विरूद्ध निर्णय लागलेला आहे म्हणून काय झालं? दुसरं कोर्ट आहे की. तिथं मोजता येत नाही, दिवस मोजता येत नाही. एका कोर्टात आम्ही काम केलं, पुरे बाबा, आता नाही, दुसरं कोर्ट आहे, तिसरं कोर्ट आहे, सुप्रीम कोर्टाचा निकाल झाला तरी वकील सांगतात दुसऱ्या मुद्दयावर पहिल्या कोर्टापासून पुन्हा आणखी हा खटला करता येईल. पुन्हा पहिल्यापासून सुरू. इथं कंटाळा तुम्हाला कुठे येत नाही, हे खोटं असं कां मानत नाही. देवाजवळ चार दिवस आम्ही देवाला गेलो, प्रदक्षिणा घातल्या, अजून

काही देवाचं दर्शन नाहीये. हे तुम्हाला काय म्हणण्याचा अधिकार आहे? त्याच्या दर्शनाचे जे उपाय आहेत, पाहणाऱ्यांनी सांगितलेले आहेत, त्याच्यावर विश्वास प्रथम बसला पाहिजे. ते उपचार, आणखी उपाय करण्याकरिता देह गेला तरी हरकत नाही, देवाकरता ध्यास लागला पाहिजे म्हणजे देवाचं दर्शन आपोआप होतं आहे. हे पाहणारे स्वत: सांगताहेत, तो अनुभव घेऊन, आणि त्याप्रमाणे ईश्वर साक्षात्कार याला झालेला आहे. नरहरीला. कुष्ठरोग गेलेला आहे. तात्काळ बुद्धि उत्पन्न झाली आणि त्याने स्तोत्र रचलेले आहे.

इंदुकोटि तेज किरण सिंधू भक्तवत्सलम् । नंदनात्रिसूनु दत्त, इंदिराक्ष श्रीगुरुम् ॥

आठच श्लोकांचे स्तोत्र आहेत. गाणगापूरला, नरसोबाच्या वाडीला हे स्तोत्र वगैरे म्हणत असतात. पूर्ण आणि त्याला उपदेश केला आणि इथंच येऊन राहा बाबा तू असं त्याला सांगितलं. तो गांवाकडे जाऊन बायका पोरे सगळ्यांना घेऊन आलेला आहे. आणि शेवटपर्यंत महाराजांचे जवळच राहिलेला आहे. शेवटी कर्दळी वनामध्ये महाराज गेले. तिथसुद्धा हा नरहरी ब्राह्मण त्यांच्याबरोबर गेला होता. ते पुढे निघून गेले आणि नंतर हा आलेला आहे. तर असं हे दिव्य चरित्र सांगितलेलं आहे. हा भक्तीयोग आहे. भक्तीयोगाचे किती प्रकार आहेत. सकाम भक्तीयोग असू दे. आर्ताचा भक्तीयोग असू दे, पण तो सुद्धा भावना त्याच्यामध्ये इतकी दृढ आहे.

भजन्ते मां दृढव्रता: म्हणतात.

ही भक्ती खरी. पापक्षय झाल्यानंतर दृढ भक्ती उत्पन्न होते. खरी भक्ती सुरु होते. त्या भक्ती मार्गामध्ये हे लोक आलेले आहेत. आणखी त्यांच्या या दृढ भक्तीने त्या परमेश्वराचा साक्षात्कार आणखी त्याला खरा झालेला आहे. त्यांचा रोग असाध्य असताना कुठेही रोग गेला नाही, तो रोग त्या ठिकाणी गेला. तिथं पूर्णशक्ती आहे. असं त्यांनी मानलं. त्याने भावना केली, म्हणजे काय चूक झाली काय ? आम्हाला रोग झाला आणि आमचा तो रोग गेला म्हणजे आम्ही खरं मानणार. म्हणजे आम्हाला रोग व्हायला पाहिजे काय ? कबूल आहे कां तुम्हाला ? कुष्ठ रोग व्हायची तयारी आहे कां तुमची ? आम्हाला कुष्ठरोग द्यावा देवांनी आणि मग त्यानी आमचा रोग बरा करुन दाखवावा देवांनी. मग ईश्वरावर आपला विश्वास बसेल. काय जरुर आहे? तुम्हाला व्हायचं असेल तर होईल, तुमच्या कर्मानी. तो जाण्याकरता आला तर जाईल. त्या नरहरी ब्राह्मणासारखी तुमची भावना, दृढभक्ती असेल तर तोहि जाईल.

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।
क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा । **(भ. गी. ४.११)**

ते सुद्धा आणखी स्पष्ट आहे. ईश्वराच काम असं साध सोप नाहीये. तर अशा रीतीने ही नरहरी ब्राह्मणाची कथा झालेली आहे. पुढं आता उद्याच्या दिवसामध्ये, राहिलेल्या कथांच थोडफार चिंतन करायच आहे.

सद्‌गुरु महाराजांचं हे चरित्र आहे. भगवंताचं चरित्र आहे. भगवान हे दत्तात्रेय रुपाने अवतार घेऊन आलेले आहेत. आणि ते सद्‌गुरु मुर्ती आहेत. दया, दयेचा अविष्कार आणखी जास्त आहे. इथं केवळ कायदा नाही. कायद्याप्रमाणे वागणारे ईश्वर स्वरुप आहे. तुमचं कर्म हे, तुम्हाला हे फळ आहे. जास्त बोलायचं नाही. मग दया करणारे हे सद्‌गुरु मुर्ती आहेत. ईश्वराचीच मुर्ती आहेत. दया करणारे संत–महात्मे परमेश्वराच्या विभूती आहेत. त्या मात्र दया करुन त्याच्या त्याकरिता सद्‌गुरु महाराजांचं, भगवंताचं दत्तात्रेय रुपाने आलेलं चरित्र या ठिकाणी आणखी सुरु झालेला आहे. उद्याचा दिवस आणखी राहिलेल्या ज्या कथा आहेत, त्यांचं थोडसं चिंतन करु.

हे पाहणाऱ्या इतरांनी कितीही प्रयत्न केला तरी त्याने त्याचा बुद्धिभेद होऊ दिला नाही. हा बुद्धीचा प्रभाव आहे. बुद्धीने मन आवरावे असे शास्त्रकार सांगतात, बुद्धीच्या बलाने मनाची सुधारणा करायची आहे. मनामध्ये जरी निरनिराळे विचार आले तरी बुद्धीच्या सहाय्याने निग्रह केला पाहिजे. तसा या ब्राह्मणाचा निश्चय झालेला आहे. त्याचे प्रारब्ध भोगून पूर्ण झालेले आहे. त्याच्या निष्ठेचं फळ मिळण्याची वेळ आली आहे.

याचं सर्व शरीर निर्मळ झालं. सगळा कुष्ठरोग त्याचा गेला. साष्टांग नमस्कार त्याने महाराजांना घातला आणि लगेच त्याने महाराजांची स्तुती केली. कवित्व शक्ती उत्पन्न झाली. **''इंदुकोटी तेज किरण सिंधू भक्त वत्सलम्.....''** हे स्तोत्र त्याने रचले.

तो ब्राह्मण या स्तुतीत म्हणतो, ''कोटी चंद्र सूर्यासारखी आपली कांती आहे. सर्व विश्वाला आपण आधार आहात महाराज. सर्व देव आपली पूजा करताहेत. आपण भक्तांवर प्रेम करणारे अत्रिपुत्र आहात. आपण माझं संरक्षण करा.'' याप्रमाणे या स्तोत्रात उत्तम भक्तिभाव व्यक्त झालेला आहे. अनेक सिद्धांत या अष्टकामध्ये व्यक्त केलेले आहेत आणि मी असमर्थ आहे असं शेवटी म्हटलंय.

महाराजांनी संतुष्ट होऊन त्याला आशीर्वाद दिलेला आहे. तुझी कीर्ती वाढेल. तुला धनधान्यादी, पुत्रपौत्रादी संपत्ती मिळेल. योगमार्गामधे तू श्रेष्ठ होशील. तुझ्या कुळामध्ये माझी भक्ती राहील. त्याला महाराजांनी 'विद्यासरस्वती' मंत्राचा उपदेश केला. पुढे महाराजांच्या आज्ञेने तो आपले कुटुंब घेऊन गाणगापुरात महाराजांची सेवा करण्याकरिता येऊन राहीला. म्हणजे योगमार्गही मिळाला त्याला महाराजांच्याकडून. भक्तीच्या योगाने सगळे मिळाले. ईश्वरशक्तीचे वर्णन करण्यासाठी त्याला काव्यशक्ती मिळाली. हे ईश्वर प्रसादाचेच कार्य आहे. अनेक सिद्धांत ज्याच्यामधे आहेत असे स्तुतिकाव्य त्याने केले. तू योगज्ञ होशील असा आशीर्वाद दिला त्याला.

या अशा गुरुभक्तीच्या कथा पुढेही उद्यापासून चिंतनात येणार आहेत. त्याही क्रमाने आपण घेऊ.

॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ॥



॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे समश्लोकी गुरुसंहितेवरील प्रवचन
भगवंत मंदिर – बार्शी, जि. सोलापूर

सातवा दिवस
अधिक श्रावण कृ. १४, शके १९०७, दि. १५ ऑगस्ट १९८५
दुपारी ४.३० ते संध्याकाळी ७

नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांचं चरित्र सिद्धमुनी नामधारकांना सांगताहेत. नामधारकांनी अनेक गुरूभक्तांची चरित्र ऐकली. सद्गुरूंचा प्रसाद त्या त्या भक्तावर कसा झाला हे ऐकलं. श्रद्धा त्या भक्तांची कशी होती, सद्गुरूंनी त्या श्रद्धेप्रमाणे, त्यांचं कार्य कसं केलं हे सर्व ऐकलेलं आहे– त्यानंतर त्यानी विचारलं, महाराज, आमचे पूर्वज महाराजांचे भक्त होते असं मी ऐकलेलं आहे म्हणाले. **सायंदेवांचा हा, नामधारक म्हणजे सरस्वती गंगाधर हा पणतू आहे.** तो विचारतो आहे, त्यांनी, आमच्या पूर्वजांनी, महाराजांची सेवा कशी केली? आणि त्यांच्यावर प्रसाद झालेला आहे त्यांचा. आमच्या पूर्वजांच्या त्या सेवेमुळे, त्या पुण्यामुळे आणि मला आज अशी बुद्धी झाली. सद्गुरूंचं चरित्र ऐकण्याची बुद्धी. ही सुद्धा पुण्यावाचून होत नाही. आपल्या पूर्वजांचं चरित्र ऐकावं अशी इच्छा आहे, नामधारकांची. त्यांची भक्ती, श्रद्धा कशी

होती आणि आपली कशी आहे, याचं परीक्षण करण्याला आणखी योग्य होईल, म्हणून त्यानी ती इच्छा व्यक्त केली.

सिद्धांना आनंद झालेला आहे, सिद्धांच्या बरोबरच आणखी ते सायंदेव होते, महाराजांची सेवा करण्याकरिता. त्यांनासुद्धा त्यांची सेवा पाहून आणखी अत्यंत आदरबुद्धी त्यांच्याबद्दल निर्माण झालेली होती. आणि नामधारकाला ती ऐकण्याची इच्छा आहे, ती सेवा, भक्ती. सद्गुरूंच्याबद्दल मनामधे संदेह धारण करणारा हा नामधारक आहे. सायंदेवाची वृत्ती आणखी मनोवृत्ती कुणीकडं आणि याची कुणीकडं. **माझ्यावर सद्गुरूंची कृपा कां होत नाही असा त्याने पहिला प्रश्न केला होता, नामधारकाने. सिद्धांनी सांगितलं, तुझ्या मनामधे संशय आहे, म्हणून तुझ्यावर कृपा झाली नाही असं तू समजतो आहे. म्हणून हे सगळं गुरूचरित्र सांगण्याचा प्रसंग आलेला आहे.** त्यावेळी सिद्ध सांगतात, पूर्वी एक कथा तुला सांगितलेली आहे, म्हणाले. तुझे पूर्वज म्हणजेच सायंदेव, गाणगापुराजवळच राहणारे, पण एका यवनाच्या राज्याच संरक्षक व्यवस्थापक म्हणून ते नोकरीला राहिले होते, पूर्वी. गोदावरी तीरावरून महाराज संचार करीत असताना आणखी त्यांचं दर्शन झालं या सायंदेवाला. तो जो पोटदुखीची व्यथा असलेला ब्राह्मण त्याला त्यांच्या घरीच महाराजांनी नेलं. त्यांनीही भिक्षा घेतली आणि त्या ब्राह्मणालाही पोटभर जेवायला सांगितलं आणि त्याची व्यथा कायमची दूर झालेली आहे. ते हे सायंदेव. पूर्वी पासून महाराजांचे भक्त होते. उत्तम कर्मशील, धर्मशील अशा प्रकारचे होते. आतिथ्य वगैरे नेहमी करावं आणि महाराजांची भक्ती करण्यामधे त्याचा काळ जात असे.

गाणगापुरामधे महाराज येऊन राहिल्यानंतर त्यांची कीर्ति सर्व ठिकाणी पसरलेली आहे. अनेक भक्त रोज येत आहेत. त्यांची कार्यसिद्धी, अशक्य अशा प्रकारची सुद्धा कार्यसिद्धी, होऊन चाललेली आहे. सहज होऊन चाललेली आहे. अशा वार्ता जिकडे तिकडे पसरल्यामुळे सर्व लोक आणखी दर्शनाला येण्याकरता निघाले, आलेले आहेत, राहताहेत. हे सायंदेवांनाही समजलं. सायंदेवाचं गांवही जवळच होतं. तिथून ते आणखी गुरूदर्शनाच्या इच्छेने निघालेले आहेत आणि गाणगापुरामधे आले.

तत्रैत्य प्रणतो विप्रो मठे दृष्ट्वा परात्परम् ।
नत्वा दण्डवदस्तौषीदुपसंगृह्य पद्द्वयम् ॥ (द्विसाहस्त्री २०.३)

अत्यंत नम्र असे सायंदेव, व्यवहारात ते अधिकारी होते यवनाचे, परंतु पारमार्थिक दृष्टीनं अत्यंत नम्रशील, गुरूमहाराजांच्याबद्दल तर अत्यंत आदरबुद्धी आहे, श्रद्धा आहे, दर्शन झालं. साक्षात् परमात्म्याचं. **सिद्धमुनींनी त्यांचं वर्णन केलेलं आहे, त्यांच्या भक्ती-श्रद्धेचं. गाणगापूर दिसायला लागलं सायंदेवांना. 'दुरूनी देखिले गाणगाभुवन, आपण घाली लोटांगण, करी दंडप्राण नमन ऐशा परी चालीला.'** काय एकेक श्रद्धेचं स्वरूप किती विलक्षण आहे. **यादृशी**

भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी, हे मागं चरित्र सांगितलं आहे सिद्धांनी, त्या नरहरीचं. त्याच्या भावनेप्रमाणे त्याला फळ मिळू शकतं म्हणाले. आपण फल देणारे आहेत, परमात्मा फलदाता आहे. सर्वांच्या कर्माचे फल देण्याचं काम ईश्वराचं आहे. आपण समजतो, आमच्या कर्मानी, आमच्या प्रयत्नांनी फल मिळालं, पण नाहीये. फलदाता तो आहे. तर अशा रीतीनं फलदातृत्व म्हणजे ही शक्ती जरी परमेश्वराची असली. सृष्टी निर्माण करण्याकरता जीवांची कर्म एक सहाय्यभूत घेतली असं सांगतात, पुराणामधे हे वर्णन आहे. 'कालं कर्मश्च', काल, कर्म हे सगळं सहाय्य घेऊन सृष्टी रचना झाली म्हणतात. म्हणजे परमात्मा पराधीन नाहीये. **कर्माचं फल देण्याचं सामर्थ्य ज्याच्याजवळ आहे, त्यांनी कर्माचं सहाय्य घेतलं म्हणजे काय आहे? तर ही जी विविध प्रकारची सृष्टी निर्माण करायची आहे, ही विविधता कर्मामुळे आली. एवढाच त्याचा अर्थ आहे.** जीवांनी कर्म केली, असं जरी मानलं, कर्तृत्वसुद्धा जीवांचं नाही आहे, वस्तुतः हा एक मोठा सिद्धांत आहे.

'मत्तः सर्वं प्रवर्तते', हे भगवान सांगताहेत, प्रसंगाने ते बोलून जातात. वस्तुस्थिती सांगताहेत, त्यात कांही अहंकार व्यक्त करण्याचं नाहीये. कर्तृत्वही त्यांचेच आहे.

तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व जित्वा शत्रून् भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम् ।
मयैवैते निहताः पूर्वमेव **निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥ (भ.गी. ११.३३)**

हे सगळेही वीर गेलेले आहेत म्हणाले. तू आपला नुसता निमित्त ! युद्धाला उभा रहा. म्हणजे जातात. म्हणजे अर्जुनासारखा अजिंक्य, लोकत्रयामधे एक धनुर्धारी म्हणून प्रसिद्ध असणारा, पण त्यालाही भगवान सांगताहेत, तू निमित्तमात्र हो म्हणाले, निमित्तमात्र मात्र व्हाव लागतं, ईश्वराची आज्ञा पालन करणं हेच निमित्त होणं आहे. **आज्ञापालन करणं म्हणजे कर्तृत्व आलं असा अर्थ नाहीये. त्याच्या कृपेनं आणखी सर्व होत आहे.** म्हणून फल देण्याची शक्ती परमेश्वराची आहे. आणि त्याप्रमाणे व्यवस्था चाललेली आहे. ही जाणीव सायंदेवांच्या मनामधे मात्र आहे. साक्षात् महाराज म्हणजे लोकत्रय महेश्वरम् हे जे वर्णन केलेलं आहे भगवंतांनी,

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ।
सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति ॥ (भ.गी. ५.२९)

ईश्वरस्वरूपाचं ज्ञान या प्रकारानी झालं म्हणजे शांती मिळाली, संसारनिवृत्ती झाली. ईश्वरदर्शन असं व्हायला पाहिजे, तर ही जाणीव सायंदेवांच्या मनामधे आहे. म्हणाले. हे तुझे पूर्वज होते.

आले. महाराजांच्या चरणावर मस्तक ठेवलेलं आहे. आणखी स्तुती त्यांनी पुष्कळ केलेली आहे.

परमात्मन्परञ्ज्योतिः श्रीनृसिंहसरस्वति ।
भक्तेश श्रुतिचिन्त्यं ते सर्वतीर्थाश्रयं पदम् ॥ (द्विसाहस्त्री २०.४)

हे नुसतं वर्णन म्हणा, काव्य नाहीये. ही वृत्ती तशी त्यांची बनलेली आहे, दैवी प्रकृत्ती ईश्वरकृपेनं त्यांना मिळालेली आहे. त्या दैवी प्रकृतीला परमेश्वर शक्तीची जी जाणीव झालेली आहे, ती जाणीव व्यक्त होते आहे, वाणीनं फक्त. परमात्मन् परंज्योतीः. परंज्योतीः. म्हणतात, बाकीच्या ज्योती ह्या सगळ्या अपर आहेत. प्रकाश करणारे सगळे पदार्थ असतील, बाह्यवस्तूंचा प्रकाश होईल, पण बुद्धी प्रकाशक शक्ती म्हणजे नेमकं काय? बुद्धिप्रकाश करणं हे इतरांना शक्य नाहीये. बुद्धीचं ज्ञानच नाही ना. अनंत वासना, ज्या बुद्धीमधे, कर्मवासना भरून राहिलेल्या आहेत, कर्म अनुष्ठान केल्यामुळे, बरे वाईट कर्म झालं, त्याच्या अनेक वासना आणखी बुद्धीमधे आहेत. त्या त्या वासनाला अनुसरून किंवा त्यातही जर बदल करायचा असला तो बदल करून, त्या बुद्धीमधे प्रकाश निर्माण करणं, प्रेरणा करणं, बुद्धीप्रेरक शक्ती, ही मात्र दुसरं कोणी नाही, ह्यालाच परंज्योती म्हणतात. किंवा स्वयंप्रकाश आहे, **परंज्योती म्हणजे स्वयंप्रकाश, बाकीचे सगळेही परप्रकाश आहेत. सूर्य चंद्रादिक सुद्धा, त्यांना नेत्राची जरूरी आहे ना?** सूर्यप्रकाशामुळे पदार्थज्ञान होतं पण नेत्र असेल तर ! म्हणजे सूर्यप्रकाशसुद्धा सापेक्ष आहे वस्तुज्ञान करून देण्याकरता, आणि त्याचा स्वतःचा प्रकाश होण्याकरतासुद्धा नेत्राची जरूरी आहे. नेत्र असेल तर सूर्य आहे असं समजल जाईल. नाहीतर नाही. म्हणून स्वयंप्रकाश ज्योती, स्वयंप्रकाश स्वरूप जे आहे ते आपण आहात महाराज. म्हणून सर्वही बुद्धीला प्रकाशित करण्याचं सामर्थ्य, नियमन करण्याचं सामर्थ्य हे सगळंही सामर्थ्य आपल्या ठिकाणी आहे.

श्रुतिचिन्त्यं ते सर्वतीर्थाश्रयं पदम् ॥ (द्विसाहस्त्री २०.४)

आपल हे चरण हे सर्वतीर्थाश्रयम् म्हणतात. सर्वही, जेवढी तीर्थ म्हणून वर्णन केलेली आहेत पुराणामधे, प्रत्येक महानदीच्या तीरावर कितीतरी तीर्थ आहेत. व्यासमहर्षीनी सांगितलेली आहेत. पण ती सर्वही तीर्थ आपल्या चरणाच्या ठिकाणी आहेत, पवित्र चरण आहेत. तीर्थांनासुद्धा पवित्र करण्याचं सामर्थ्य आपल्या ठिकाणी आहे. आणि श्रुतिचिन्त्यम्. हे जे आपले चरण आहेत किंवा हे जे आपल स्वरुप, हे श्रुतिचिन्त्यम्. ते श्रुतिच्या द्वारानी याचं चिंतन करता येतं. श्रुतिद्वारा चिंतनीय आहे, त्याशिवाय नाही. केवल मनाला गोचर नाहीये. श्रुतींनी सुद्धा आणखी आपल्या स्वरूपाचं जे वर्णन केलेलं आहे, ते सुद्धा साक्षात होऊ शकत नाही. **वाचः निवर्तन्ते । अप्राप्य निवर्तन्ते ।** म्हणतात. सापडत नाही, वाणीला आपलं स्वरूप सांपडत नाहीये. असमर्थ आहोत आम्ही, वर्णन करू शकत नाही. हे ज्ञान, आणखी सायंदेवांच्या अंतःकरणामधे अगदी परिपूर्ण आहे.

तर याप्रमाणे पुष्कळ स्तुती आहे त्यांची. स्तुती वगैरे केल्यानंतर गुरुमहाराजांनाही आनंद झाला. महाराजांच्या इच्छाशक्तीचं वर्णन कांही केलेलं आहे. काय काय ज्या कांही कथा झालेल्या आहेत.

मृतो जीवितो येन दुग्धा लुलायी वशा शुष्ककाष्ठं तरूत्वं प्रणीतम् ।
क्षणादन्त्यजोऽप्युद्धतस्तेऽनुभावं क्षितौ कोऽर्हति ज्ञातुमन्यत्तवापि ॥ (द्विसाहस्त्री २०.७)

आपल्या प्रभावाचं ज्ञान, यथार्थ ज्ञान कोणाला होणार आहे. किती शक्ती आहे ईश्वराची, अनंत शक्ती आहे. अंत लागत नाही. कितीही बुद्धी मोठी असू दे. आपल्या विभूती म्हणून ज्या आणखी वर्णन केल्या जातील, किंवा विभूतीरूप झालेले जे महात्मे आहेत, त्यांनासुद्धा आपल्या शक्तीचा अंत लागत नाही म्हणाले. त्या अशा घटना आहेत. मृताला जीवन देणं, वंध्या महिषीला आणखी दुग्ध उत्पन्न करणं, हे सगळं सामर्थ्य आहे. याप्रमाणे अगदी, अंतःकरणपूर्वक श्रद्धा, श्रद्धेनं, भक्तीनं स्तुती केली सायंदेवानी ! आणखी गुरूमहाराज म्हणाले बाबा, चांगलं आहे, तुमच्या स्तुतीनं संतोष झाला, म्हणाले आम्हाला. तेव्हा तुमच्या अंतःकरणामधे नव्हे तर तुमच्या वंशामधे उत्पन्न होणाऱ्या लोकांच्या, भक्तांच्या अंतःकरणामध्ये आणखी भक्ती, श्रद्धा ही निर्माण होईल असा आशीर्वाद दिला महाराजांनी. **वंशामधे निर्माण होणाऱ्या जीवात्म्यांची प्रकृती दैवी बनविणं हे काय कुणाला शक्य आहे?** एका मुलाची प्रकृत्ती, मुलाची बुद्धी कांही कशी सुधारावी वगैरे एखादा कुशल जर असे पालक आणि तसा एक पुण्यशील असेल, तर तो एक मुलाला कांहीतरी उपदेश करून, कांही करू शकतो. दुर्योधनासारखा मुलगा भेटल्यानंतर काय करावं? धृतराष्ट्रांनी, गांधारीनं, सगळ्यांनी सांगितलं, अरे युद्ध करू नकोस. नाही, ऐकलं नाही. इथं–

स्तुत्यानयास्मि ते विप्र भृशं तोषमुपागतः ।
भूयात्ते वंशमात्रस्य श्रद्धाभक्तिर्मयि ध्रुवा । (द्विसाहस्त्री २०.८)

म्हणतात, महाराज इतके प्रसन्न झाले. तुझ्या सर्वही वंशामधे श्रद्धा आणखी भक्ती दृढ होईल, हा वर दिलेला आहे. संपत्ती, सत्ता वगैरे राहील हे कांही वर दिलेला नाही. शुद्ध बुद्धी राहील. कुठं राहता म्हणाले तुम्ही? सगळं स्वस्तिक्षेम आहे की नाही? अगदी आत्मीयतेनं चौकशी केली. सायंदेवांनी सांगितलं महाराज, आपल्या कृपाप्रसादानी सर्वही आणखी कुशल आहे आमचं. कांही, कांही नाही, कांची गांव जवळ आहे इथंच, कडगंची. तिथं मी राहाणारा आहे म्हणाले. संसार सगळा आणखी पाहणारी मंडळी आहेत. बंधू, बंधूंची मुलं, वगैरे सगळी पाहतायत म्हणाले. आता मला कांहीही संसाराची काळजी नाही. फक्त आपली सेवा घडावी, या सेवेकरिता म्हणून मी या ठिकाणी आलेलो आहे म्हणाले. कांही दुसरी इच्छा नाहीये. **'अनन्याश्चिन्तयंतः'**, म्हणून घर सोडून आलो म्हणाले. अनन्य होऊन चिंतन करता येणार

नाही, घरामधे, असं वाटलं असाव, सायंदेवांना, म्हणून घर सोडून आले. कारण तिथं पुष्कळ उपाधी आहेत. निरनिराळ्या प्रकारचे संबंधी आणखी लोक आहेत. त्यासंबंधी, आणखी जीवांच्या सगळ्यां इच्छा पूर्ण करायच्या, त्या सगळ्यांचा आणखी अनुसरण करायचं, गृहस्थाला ते सांगितलेलं आहे नारदांनी. जी जी इच्छा, स्त्री म्हणा, पुत्र म्हणा, जी जी इच्छा करेल **'अनुमोदेन निर्मम:'** म्हणतात अनुमोदन देणं, म्हणजे आसक्ती नाही असं नारदांचं म्हणणं. प्रत्यक्ष आणखी त्याच्यामधे आणखी भाग घेणं, चर्चा करणं, हे करावं, ते करावं म्हणजे त्यात आणखी मन गुंतून राहिलं. परंतु हे सर्वही संबंधी, त्यांना, जी जी इच्छा करतील त्याला अनुमोदन देणं, बराय, करा, तुमच्या इच्छेप्रमाणे करा. पण त्यातही कमी-जास्ती कांही अनुकूल-प्रतिकूल झाल्यानंतर, चिंतन भगवंताचं कसं घडणार, अनन्य होऊन चिंतन कसं घडणार? अन्याचा संबंध येणारच ना? कदाचित बाहेर पडल्यानंतर वासना जर असतील तर पुन्हा संबंध होणारच की त्यापेक्षा घरात राहून काय हरकत आहे? हा एक युक्तिवाद आहे. प्रियंवत राजाला ब्रह्मदेवांनी सांगितलेलं आहे.

भयं प्रमत्तस्य वनेष्वपि स्याद्यत: स आस्ते सहषट्सपत्न: ।
जितेन्द्रियस्यात्मरतेर्बुधस्य गृहाश्रम: किं नु करोत्यवद्यम् ॥ (भा. ५.१.१७)

घरात राहणारा जो आहे मनोनिग्रहानं, मनाकडे लक्ष देणारा गृहाश्रम

किं नु करोत्यवद्यम् ॥

गृहस्थाश्रम कांही करु शकत नाही, बाधा करु शकत नाही. असेल, कांही हरकत नाही. मनामधे जरी काही वासना असल्या आणखी घर सोडलेलं आहे ईश्वराचं चिंतन व्हावं आणखी हे व्हावं, या उद्देशाने, त्या वासनांचा प्रतिबंध होणं शक्य आहे.

परंतु सायंदेव प्रत्यक्ष परमेश्वराच्या जवळ आलेले आहेत. हा एक विचारणीय मोठा प्रश्न आहे, भाग्याचा प्रश्न आहे. परमेश्वर, परंज्योती जो आहे, स्वयंप्रकाश, बुद्धिप्रेरक परमात्मा, त्याच्या जवळ येऊन पोचलेले आहेत, जवळच राहण्याची इच्छा करतायत आणि सेवा करण्याची इच्छा करतायत, अनन्य कां होता येणार नाही? सगळी जबाबदारी आता त्यांच्यावर आहे ना? भक्तवत्सल परमात्मा आहे. भक्ताचं मन आणखी दुसरीकडं चाललेलं आहे, गाणगापुरात येऊन काय उपयोग? घरातच राहिला असता तर काय झालं असतं? ही न्यूनता आणि तत्काळ दूर करण्याची शक्ती आहे, याबद्दल पूर्ण विश्वास आहे सायंदेवांचा. म्हणून, जरी वासना आणखी प्रतिबंधक होत असल्या, पुन:पुन: स्मरण संसाराचं झालं, तर काय सेवा घडणार आणि त्या सेवेचं फल काय मिळणार? तरीसुद्धा इथं महाराजांच्या सान्निध्यामधे ते येऊन राहिलेत. सेवा करायची म्हणतायत. अर्थात जबाबदारी महाराजांची आहे.

इथं आपली मनोवृत्ती ही अनन्य होऊ शकेल आणि अनन्य होऊन आपण आणखी भजन आणि सेवा करू शकू असा विश्वास धरून आलेले आहेत, सायंदेव. गुरुमहाराज म्हणाले,

कष्टं मे सेवनं नाज्ञ कोऽपि ज्ञातुं न शक्यते ।
ग्रामे नदीतटेऽरण्ये दुर्गमेऽपि वसाम्यहम् ॥ (द्विसाहस्त्री २०.१२) म्हणतात.

म्हणतात. सेवा करणार म्हणाले आमची सायंदेवा तुम्ही ? कठीण आहे म्हणाले–सेवा. त्यांनीच सांगितलेलं आहे. आपल्या मनात विचार तोच येतो, काय देवाची सेवा कशी करायची बुवा? कुठं त्यांच्या स्थानामधे जाऊन राहायचं, हे करायचं, स्थानामधे राहण्याचं पुण्यही पुष्कळ आहे. **वेदयज्ञ तपोयोग परिष्ट फलदोऽधिकं, श्रीपादाधिष्ठितस्थान वासिणाम् ।** फल मिळतं म्हणून सांगताहेत. श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी किंवा नरसिंह सरस्वती स्वामी **ददात् फलं लभेत् ।** असे स्वामीं महात्मे ज्या स्थानामधे रहातायत, त्या स्थानामधे रहाणारा जो आहे, नुसतं स्थानमाहात्म्य इतकं आहे, **वेदयज्ञ तपोयोगं परिष्ट फलद: अधिकं फलम् लभेत. स्थानानीच बुद्धीमधे आणखी पालट घडून येत आहे, आणखी सेवेकडे लक्ष आपोआप लागतं आहे हे स्थानाचं माहात्म्य आहे.** पण महाराज सांगताहेत आमचं कांही एक स्थान नाही म्हणाले. नदीतीरावर आम्ही कुठेही फिरतो, म्हणाले. अरण्यामधे राहातो, कुठेही राहातो. तेव्हा अशा दुर्गम स्थानामधे राहणं, तू राहू शकशील कां बाबा? तुझं मन इतकं तयार आहे काय? हा प्रश्न आहे. परीक्षा चाललेली आहे, सेवा करायची माझी इच्छा आहे, पण सेवा करण्यासारखं आमचं हे नाही, कठिण आहे सेवा. ऐकलं त्यांनी, सायंदेवांनी. तेव्हा, माझी इच्छा आहे, महाराज, आपण करवून घ्या म्हणाले. आपल्या सान्निध्यामधे असल्यानंतर काय भीती आहे? सीतादेवीलासुद्धा इच्छा उत्पन्न झाली, ती म्हणाली, रामचंद्रांना म्हणाली, मी तुमच्याबरोबर अरण्यामधे येणार आहे. रामचंद्र म्हणाले, तिथे काय म्हणाले, नोकर चाकर आहेत, खाण्या–पिण्याची व्यवस्था आहे, अरण्य आहे. तिथं कसल काय. पण ते अरण्य म्हणजेच अयोध्या मी समजेन, राजवाडाच तो आहे, आपल्या सान्निध्यामधे, इतकी मनाची तयारी आहे. त्यामुळे सीतादेवीला परवानगी, अनुज्ञा, दिली त्यांनी. यायला हरकत नाही, म्हणाले.

नेहमी जर मनामधे उद्वेग उत्पन्न झाला, पूर्वी आपण कशा, कोणत्या स्थितीमधे होतो आणि आता इथे येऊन पोचलो म्हणून, मनामधे जर खेद निर्माण झाला, तर कशी सेवा घडणार? पण सायंदेवांनी सांगितलं, महाराज, मी मुद्दाम आपली सेवा करण्याकरिता सगळं सहन करायची माझी तयारी आहे. बराय, राहिले सायंदेव. महिना दोन महिने गेलेले आहेत. आणि नंतर एके दिवशी परीक्षा पहायचं ठरिवलं महाराजांनी. त्यांना घेऊन, एकट्यालाच, घेऊन संगमावर महाराज गेलेले आहेत. मल्लिकार्जुन भगवंताचं स्थान आहे, अश्वत्थ वृक्ष आहे.

सायंकाळ झालेला आहे, आणखी मेघ आले आकाशामधे, पाऊस पडायला सुरूवात झाली, पाऊस पडतो आहे. सायंदेवांनी आपल शक्य तितकं, काय पांघरायचं वस्त्रं काय, असेल ते काढलं, बाजुला धरलं, पाऊस लागू नये महाराजांना वगैरे, करतो आहे. बराच वेळ पाऊस पडला, आणखी रात्र झाली, थंडी वाजायला लागली. महाराज म्हणाले, बाबा थोडा अग्नी घेऊन ये, विस्तव शेकायला पाहिजे म्हणाले. जातो म्हणाले. अंधारातून निघालेला आहे, दोन्हीकडे पाहू नकोस म्हणाले. सरळ रस्त्यानी जा आणि परत ये.

अंधारातून आपलं पाऊस थोडा थोडा पडतोच आहे. अंग सगळं भिजलेलं आहे. गुरुस्मरण करीत आणखी गांवामधे आलेला आहे. अग्नी घेतला भांड्यातून आणि परत येण्याकरिता निघालेला असताना, दोन्हीकडं पाहू नकोस म्हणाले, महाराज, काय आहे बुवा? बघू या तरी. कुठे जिज्ञासा पाहिजे, कुठे नको, याचा हा विचार आहे. निषेध केला म्हणजे कां निषेध केला, करून पाहू या काय होतं असं आपल्याला वाटतं.

न्याय्यादर्थादपि किमधिकं लभ्यमुन्मार्गवृत्त्या
वैधादन्नादपि किमधिकं पर्युदस्तेषु भोज्यम् ।
भार्याभोगादपि भवति कः पंचकान्तासु भोगः
प्रायो नेति श्रुतिविषयता विश्वमाधुर्यहेतुः ॥ (पं. नीलकंठ दीक्षित–शान्तिविलास)

हे करू नका म्हणून शास्त्रांनी सांगितलं, तर कां करू नका, करून बघू या, काय होतंय ते बघूया. सामान्य लोकांनाच असं वाटतं असं नाहीये. निषिद्ध विधि– निषेदविधि तो कशा करता पाहिजे ? बंधन आहे असे वाटते. सायंदेवासारख्याला सुद्धा महाराजांनी केलेला निषेध, काय बघू या. काय आहे असं वाटलं. पाहिलं त्याने डाव्या बाजूला एक मोठा पांच फणाचा नाग आपल्याबरोबर येतो आहे. दुसऱ्या बाजूला पाहिलं, तिकडेही एक नाग आहे. दोन्ही बाजूला मोठ्ठे मोठ्ठे नाग आहेत, घाबरला, भिती उत्पन्न झाली. पळतो आहे. भान राहिलं नाही. काय आता हे नाग आपलं काय करतात कुणाला ठाऊक? **'सेवाधर्मः परमगहनः'**, सेवा कठीण आहे म्हणून महाराज म्हणाले होते.

पाऊस बंद झालेला आहे, चंद्रप्रकाश पडलेला आहे. कांही ब्राह्मण मंडळींचे मंत्रोच्चार त्याला ऐकायला येऊ लागले. कोण ब्राह्मण आलेत, काय आहे. येवून पोहंचला. अग्नी प्रदीप्त केलेला आहे आणि थंडी वाजायची कमी झाली. महाराजांनी सांगितलं, बाबा, तुझ्या रक्षणाकरिता ते नाग पाठीवले होते. आणि तू भ्यायलास, आता काय म्हणावं. तसंच निदान, पाहून तरी निदान यायला, भीती कशाला वाटली तुला? महाराजांचीच योजना आहे ही वृत्ती नाहीये. **कोणचाही अनुकूल, प्रतिकूल प्रसंग जरी असला तरीसुद्धा ही ईश्वराची योजना आहे. सर्व कर्तृत्व त्याचं**

आहे, ही जर नि:सीम भावना असेल तर त्याप्रमाणे कशीही प्रतिकूल परिस्थिती असली, तरीसुद्धा, ईश्वराची योजना आहे, असं समजल्यानंतर कांही त्याचा उलगडा कांही काळाने होऊ शकतो. तू आपला पाहू नको म्हटल्यानंतर, पहायला लागला. बर महाराजांनी सांगितल आहे, त्यात त्यांच कांहीतरी त्यांच हे असेल, हेही तुला वाटल नाही. सेवा योग्यता जी आहे, किती प्रतिबंध त्याच्यामध्ये निर्माण होतायेत. बुद्धिमध्ये किती दोष आहेत, आणि त्या दोषामुळे सेवेमध्ये पुष्कळ आणखी न्यूनता, ही उत्पन्न होतीय.

त्यांनी त्याला त्याच्या इच्छेप्रमाणे गुरुभक्ति म्हणजे काय आहे, याबद्दल आणखी एक कथा सांगितली आहे. त्वष्टा ब्रह्मा जो आहे, त्याचा मुलगा, हा, अभ्यास करण्याकरता विद्यार्थीदशेमधे, आपल्या गुरूमहाराजांच्या आश्रमामधे जाऊन राहिलेला आहे. पावसाळ्याचे दिवस आले, पाऊस पडायला लागला, ती पर्णकुटी गळायला लागली. त्या गुरुमहाराजांनी त्या शिष्याला सांगितलं, बाबा, आम्हाला राहाण्यासारखं एक दृढ स्थान, चांगलं घर तू बांधून दे आम्हाला. कधीही गळू नये, असं घर पाहिजे. पत्नीनं सांगितलं, मला एक उत्तमपैकी कंचुकी, चोळी, पाहिजे, नसावी विणली अथवा शिवली म्हणे, म्हणाली. कशी कचुंकी करायची, काय सांगताहेत, एकेक एकेक आपल्या इच्छा ! गुरुपुत्राने पादुका मागितल्या. उदकावरून चालता यावं अशा पादुका पाहिजेत. गुरुकन्येनंही सांगितलं, मला खेळण्याकरता सर्वही सामग्री पाहिजे. चुलीवर स्वयंपाक केल्यानंतर तो उष्ण असू नये, अशा कांही विलक्षण अटी घातलेल्या आहेत. आता सर्वांचच मान्य त्यांना करावं लागतं. गुरू, सद्गुरू आणखी त्यांचे संबंधी, यांनी जी जी इच्छा व्यक्त केली ती मान्य करून तो घरातून बाहेर पडला, मी आणखी करतो म्हणाला. मान्य केलं, **करिष्ये वचनं तव ।** मान्य करायला पाहिजे, त्याचं मग कसं होईल, काय होईल, ती पुढची व्यवस्था ईश्वराची आहे. निघालेला आहे तो विद्यार्थी, परंतु अंत:करणामधे आपण किती असमर्थ आहोत हे त्याला कळलं. काय करणार, इतकं हे सगळं शक्य कसं आहे? कधी न गळणारं घर कसं आणायचं, कुठून बांधायचं, कुणाकडे जायचं, कुणाचं सहाय्य घ्यायचं? अशा चिंतेमधे असताना एक आणखी तपस्वी पुरुषाचं दर्शन त्याला अरण्यामधे झालेले आहे. त्याच्या सद्गुरूंनीच त्या रूपामधे त्याला दिलं असंही म्हणायला हरकत नाही. त्याला एक कांहीतरी अनुकूलता निर्माण झाली, आशा वाटली, पाया पडला त्यांच्या, त्यांनी विचारलं, बाळ, कां, कुठे निघालास? असं असं म्हणाला, गुरूमहाराजांनी, गुरूपुत्र, गुरूकन्या आणखी गुरुपत्नी यांनी मला असं असं करायला सांगितलेलं आहे, त्याकरिता निघालेलो आहे. त्यांनी मग काशीयात्रा करायला त्याला सांगितलं. काशीयात्रा आणखी तू यथाविधी जर करशील, तर भगवान विश्वनाथ प्रसन्न होतील आणि ते तुला वर देतील, तशी बुद्धी देतील. ईश्वराने बुद्धी दिल्यानंतर त्या बुद्धीला अशक्य अशा प्रकारचं कांही नाहीये. हे जरी असंभवनीय अशा प्रकारचं

मागणं जरी वाटत असलं तरी तशी बुद्धी निर्माण झाली, ईश्वरकृपेनं, तर कांही नाही, सहज होऊन जाईल म्हणाले. आश्वासन दिल. सर्व काशीयात्रा विधान त्याला सांगितलं. तो तसा मेधावी असला पाहिजे. बाह्य व्यवहारामधे जरी कदाचित त्याची बुद्धी असमर्थ असली, वयोमानानी, तरीसुद्धा एकदा त्या अवधूतांनी, तपस्वी पुरूषांनी सांगितलं, किंवा त्याला सांगणाऱ्याचेही सामर्थ्य तसं असलं पाहिजे, की याला बरोब्बर सगळंही विधिच ज्ञान एकदा सांगितल्यानंतर झालं पाहिजे. असं त्याचीही शक्ती असेल, इच्छाशक्ती. सर्वही आणखी काशीक्षेत्रामधे कुठं कुठं जायचं, कुठं स्नान करायचं, काय काय विधी करायचा, सगळं त्याला समजून सांगितलं, आणखी ते तपस्वी पुरूष गुप्त झाले. त्याला काशीला नेऊन सोडलं. आणि त्यानेही आणखी यथाविधी, श्रद्धापूर्वक काशीयात्रा केल्याबरोबर आणि विश्वनाथ प्रसन्न झाले.

त्यांनी त्याला आणखी तशा प्रकारची बुद्धी दिली, सर्व सामग्री त्यांनी तयार केली, सद्गुरूंमहाराजांच्याजवळ आलेला आहे. उत्तम घर झालेलं आहे, कंचुकी मिळाली, पादुका मिळाल्या त्या गुरूपुत्राला, तिला सगळी खेळण्याची भांडी. सगळं मिळालेलं आहे. त्यामुळे सद्गुरूंमहाराजांचाही कृपाप्रसाद झाला. ईश्वराचा प्रसाद, **हा ईश्वराच्या प्रसादाची आकांक्षा गुरूसेवा करण्याकरता असली पाहिजे. हे द्वैत जरी थोडं आरंभाला असलं तरी हरकत नाही. ''शिवेरुष्टे गुरुः स्त्राता'', याने कदाचित द्वैत दाखविलेलं असे वाटेल. वाटू दे, कांही हरकत नाही. पण गुरूमहाराजांची भक्ति सेवा आपल्या हातून घडावी याकरिता ईश्वर प्रसादाची आकांक्षा करणारा जो आहे, तो गुरूभक्त, उत्तम गुरूभक्त होतो. आणि त्याला ईश्वरप्रसादाने सद्गुरूंचाही प्रसाद होतो आणि त्याच्या बुद्धीमधे पूर्ण अद्वैत ज्ञान आपोआप निर्माण होतं.** ती काळजी करायची नाही. याप्रमाणे गुरूभक्तीच्या प्रभावाने तो विश्वकर्मा झाला म्हणाले. वाटेल ते करण्याचं सामर्थ्य त्याला प्राप्त झालेलं आहे. देवांचा आणखी मोठा शिल्पकार !

हे चरित्र सायंदेवांना, आणखी रात्री वेळ होता पुष्कळ, तिथंच संगमावर राहिले महाराज, सायंदेव, दोघेच होते. सर्व समजावून सांगितलेलं आहे. काशीयात्रा त्याला झाली त्यावेळेला, आपण काशीला जाऊन आलो असंही त्याला वाटलं म्हणतात. काल अल्प आहे, पण त्या अल्पकाळामधे सुद्धा सगळं होऊन गेलेलं आहे. प्रतिबंध कशाचाही होत नाही, थोड्या वेळामधे यात्रा कशी होणार, काय होणार, सर्वही प्रतिबंध दूर झाले, त्याला सगळं ते काशीयात्रेचं विधान सांगितलं, प्रत्यक्ष ते घडिवलेलं आहे, आणि हे गुरूभक्तीचं सामर्थ्य सांगितलेलं आहे. शंकरांनी पार्वतीला ही कथा सांगितली म्हणून सांगितलं महाराजांनी ! सर्व साध्य गुरुभक्ती, इति भगवान श्रीहरींनी सुद्धा सुदामजींना हेच सांगितलेलं आहे.

इत्थंविधान्यनेकानि वसतां गुरुवेश्मसु ।

गुरोरनुग्रहेणैव पुमान् पूर्णः प्रशान्तये ॥ (भा.(२), १०.८०.४३)

गुरूंचा अनुग्रह जर झाला, तरच पूर्णता प्राप्त होते. प्रशांति. पूर्ण संसार निवृत्ती त्यावेळेस त्यामुळेच होती म्हणाले. हा मोठा गुरूभक्त होता. सायंदेव मोठे भक्त होते. शुद्ध बुद्धी होती, गुरूभक्ती अधिक अधिक व्हावी अशी इच्छा होती. अहंकार कांही नाहीये, म्हणून त्याना आणखी जास्ती जास्ती महाराजांनी समजावून सांगितलेलं आहे.

याप्रमाणे, आणखी, आले मग, दुसरे दिवशी सकाळी, गाणगापुरामधे आले महाराज. सेवा चालू आहे सायंदेवांची. त्यांनी स्तोत्र मोठं उत्तम केलेलं आहे. 'वन्दे श्री नरहरी, सरस्वतीवरम्'. तर ते जे सायंदेव म्हणजे संस्कृतज्ञही चांगले होते असं दिसतंय ! उत्तम स्तुती त्यांनी केली.

मग आपल्या गांवी जाऊन आपल्या सगळ्या परिवाराला घेऊन ते आलेले, सर्वांनाही दर्शन व्हावं या इच्छेनं आणि नंतर त्यावेळेला, अनंत चतुर्दशीचा दिवस आलेला होता. महाराजांनी त्यांना सांगितलं तुम्ही अनंताचं व्रत करा म्हणाले. आता सायंदेव म्हणाले, काय करायचं हे व्रत वगैरे, ह्याची काय जरूरी आहे महाराज, आपली पूजा झाली म्हणजे सगळंच त्यात आलेलं आहे. तरीसुद्धा अनंत व्रताचं माहात्म्य म्हणून महाराजांनी त्यांना सांगितलं. कृष्ण परमात्म्याने धर्मराजाला हे करायला सांगितलं. त्यांनी केलं, त्याला राज्यप्राप्ती झाली. हे सगळं त्याला समजावून सांगितलेलं आहे.

आणि एक कथा सांगितलेली आहे. की सुमंतु ऋषी हे मोठे आणखी अधिकारी, ज्ञानी महात्मे होते. त्यांना एक मुलगी झाली, सुशीला तिचं नांव. आणि त्या सुशिलेची माता तिला मृत्यु आलेला आहे. मग सुमंतु ऋषींना आणखी गृहस्थाश्रम धर्माप्रमाणे आपल्याला अतिथी वगैरे यांचं पूजन करता यावं, सर्वही गृहस्थाश्रमधर्म व्यवस्थित चालावेत, म्हणून त्यांनी दुसरा विवाह केला. पण ती स्त्री मात्र अत्यंत विरूद्ध वागणारी अशा प्रकारची मिळाली. कांही ऐकायचं नाही,विरूद्ध करायचं, पतीच्या विरुद्ध. त्रासून गेले सुमंतु ऋषी. सुशीला उपवर झालेली आहे, इतक्यात कौडिण्य ऋषी त्यांच्या आश्रमात आले. त्यांनाही आणखी यांनी विचारलं, चांगला आहे, म्हणाले. आपल्या या मुलीला हा वर चांगला आहे. आणि त्यांना विचारलेल आहे, त्यांच्याबरोबर विवाह झालेला आहे. एका चिंतेतून सुमंतु ऋषी मुक्त झाले, परंतु ती जी दुसरी स्त्री होती, सावत्र आई, त्या सुशीलेची, ती मात्र आणखी कलहप्रिय असल्यामुळे, तिथं राहू नये असं कौंडिण्यांना वाटलेलं आहे, त्यांनी आपल्या श्वशुरांची अनुज्ञा घेऊन दुसरीकडे प्रयाण केलं. दोन तपस्वी पुरूषांनी एका ठिकाणी राहू नये म्हणतात.

वासे बहूनां कलहो भवेद् वार्ता द्वयोरपि ।
एक एव चरेत्तस्मात् कुमार्या इव कङ्कणः ॥ (भा. ११.९.१०)

अवधूतांनी कुमारी कंकणाचा दृष्टांत देऊन हे सांगितलेलं आहे. दोन मंडळी राहिली तरीसुद्धा साधनाभ्यास व्यवस्थित होणार नाही म्हणाले. एकानीच करावा अभ्यास. तो शुद्ध प्रकारानी झाला पाहिजे, दृढतेनं झाला पाहिजे, त्याच्याकरिता एकट्यानीच सगळं करावं.

एकान्ते सुखमास्यतां परतरे चेतः समाधीयतां ।
पूर्णात्मा सुसमीक्ष्यतां जगदिदं तद्बाधितं दृश्यताम् ॥
प्राक्कर्म प्रविलाप्यतां चितिबलान्नाप्युत्तरैः श्लिष्यतां ।
प्रारब्धं त्विह भुज्यतामथ परब्रह्मात्मना स्थीयताम् ॥ (साधनपंचक-५)

हे इतकं मार्गदर्शन, आचार्यमहाराज करतायत. एकट्यानेच करायचं. म्हणून कौंडिण्य ऋषी बाहेर पडले आपल्या पत्नीला बरोबर घेऊन. जाता जाता आणखी रस्त्यामधे नदीतीरावरती एका ठिकाणी, आह्निक करण्याकरता उतरले, आणि त्या ठिकाणी कांही स्त्रिया अनंताची पूजा करतायत असं या सुशीलेला दिसलं. तिलाही इच्छा उत्पन्न झाली. त्यांच्यापासून तो विधी समजावून घेतला. तिनंही, अनंताची पूजा वगैरे केली. निघाले पुढे. आणि पुढं एका मोठ्या नगरामधे राजा कोणी नव्हता, गेला होता काय झालं होत, ती सगळी मंडळी कौंडिण्य ऋषींच्या समोर आलेली आहेत, या महाराज, आपलीच आम्ही वाट पहातो आहोत, आपण या नगराचे राजे व्हा. सर्व सत्ता आपण सांभाळा. आपण तपस्वी पुरूष आहात. सर्व करू शकाल व्यवस्थित, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कौडिण्य ऋषी आणखी राजसत्ता धारण करून तिथं राहिले.

एके दिवशी दोघे पतिपत्नी बसलेले असताना तिच्या हातामधे तो अनंताचा दोरक त्यांनी पाहिलेला आहे. सूत्रात्म्याचं प्रतीक आहे ते. **'हिरण्यगर्भ सूत्रात्मा प्राणः इत्यभिधीयते ।'** तर ते सूत्र कसल बांधलयस म्हणून यांनी विचारल, काय आणखी मला ताब्यात ठेवण्याकरिता हा काही प्रयोग केलेला आहेस काय, कोणीतरी मांत्रिकानी तुला दिलाय काय. अशी शंका कौडिण्य ऋषीसारख्या आणखी ज्ञानी माणसालासुद्धा उत्पन्न झाली. आणि ती म्हणाली अहो, अनंताची पूजा त्यादिवशी मी केली, अनंताचा दोरक हे....कुठले अनंत, कांही नाही, अनंताच्या प्रसादानी हे तुम्हाला राज्य मिळालं. नाहीये, कबूल नाहीये, माझ्या तपःश्चर्येनं मला मिळालं. तू अनंताची पूजा केली म्हणून मला राज्य कसं मिळणार? आणि त्या वादामधे शेवटी आग्रहामुळे तो अनंत दोरक त्यांनी तोडलेला आहे, अग्नीमधे टाकला. पत्नीनं पटकन तो उचलून गडबडीनं आणला, त्याच्यावर दूध टाकलं. पण एकदम त्यांचं सगळंही पालटून गेलेलं आहे. एकदम जनतेचा विश्वास जो बसलेला होता, सर्व राज्य त्या जनतेनं दिलेलं आहे, ती जनताच सगळी विरूद्ध झालेली आहे.

अंतर्यामी शक्तीवर विश्वास नाही. आपल्याच एकंदर कर्मावरती, आपल्याच प्रयत्नावरती विश्वास ठेवणारे मोठे मोठे ऋषीसुद्धा असतात. त्यांनासुद्धा अशी कदाचित भावना होऊ शकते

की, आपण तपस्वी आहोत, मोठे आहोत, त्यामुळे सुशीलेनं केलेलं अनंतव्रत, त्याला त्यानी कांही महत्त्व दिलं नाही, अनंताकडे लक्षही दिलं नाही. केवळ बहिर्मुख दृष्टीने ते वागले. त्याचं फळ मात्र त्यांना मिळालं. सर्व ऐश्वर्य गेल्यानंतर मात्र त्यांना वाटलं, की हे असलं पाहिजे, कांहीतरी शक्ती आहे, मानावं. मग मात्र मनाचा निर्धार झालेला आहे. अनंताचं दर्शन झाल्याशिवाय अन्न घ्यायचं नाही, म्हणून बाहेर पडले. एक वृक्षाला विचारलं, बैलाला विचारलं, दोन सरोवरं दिसली त्यांना विचारलं, अनंत आम्हाला माहिती नाही, सगळ्यांनी उत्तर दिलं. हे आणखी निराश झाले. तळमळ अंतःकरणामधे अनंतदर्शनाची असल्यामुळे प्रत्यक्ष अनंताने वृद्ध ब्राह्मणवेशामधे दर्शन दिलं. त्यांना घेऊन गेले एका मोठ्या गुहेमधे, आणि तिथं सगळं आपलं खरं स्वरूप त्यांनी दाखवलं आहे आणि मग, त्यांना वरप्रदानही केलं, चूक झाली, त्यांनीही क्षमा मागितली आणि त्यांना वरदान दिलेलं आहे. धर्मबुद्धि, दारिद्रनाशन–

धर्मप्राप्ति दारिद्र्यनाशन । शाश्वत वैकुंठभुवन ऐसा वर दिधला नारायणे ॥

(गुरुचरित्र अ. ४२, श्लोक १४०)

हे त्यांना दिलेलं आहे. शाश्वत वैकुंठनिवास, हे तीन वर दिले. **धर्मबुद्धी ईश्वराने दिलेली आहे. त्यांची बुद्धी कशी आणि त्यांच्या कर्माप्रमाणे हे आत्ताचं उदाहरण आहे. माझ्या तपःश्चर्येचं फळ मला मिळालेलं आहे, राज्य माझ्या तपाने मिळालेलं आहे. ही बुद्धी त्यांच्या कर्मानी त्यांना दिली. पण भगवंतानी, अनंतांनी प्रसन्न होऊन त्यांना धर्मबुद्धी दिलेली आहे.** धर्मप्रेम अंतःकरणामधे निरंतर राहील आणि प्रेमानी, श्रद्धेनं धर्माचरण होईल. अर्थात बुद्धी, ईश्वरप्रणित जी बुद्धी आहे ती अशी आहे. दारिद्र्य कधीही येणार नाही आणि वैकुंठलोकामधे तुला राहायला मिळेल, असा वर दिला. **पुनर्वसु नक्षत्र म्हणजे, कौंडिण्य ऋषी आहेत, पुनर्वसु नक्षत्ररूपाने ते राहिले असं सांगतात.**

तर हा कथाभाग, श्रीकृष्ण परमात्म्याने धर्मराजांना सांगितलेला आहे, तो महाराजांनी या सायंदेवाना सांगितला. तुमचंही गोत्र कौंडिण्यच आहे म्हणाले. आज अनायासे अनंत चतुर्दशी आहे. पूजा करा. यांनी कांही तसं हे केलं नाही. महाराजांचं सान्निध्य असताना अनंताची पूजा कशी करायची, कशाला करावयाची. पण ईश्वर आणखी सद्गुरू यांच्यामधे भेद नसला पाहिजे ही बुद्धी त्यांना दिली महाराजांनी. अनंताची पूजा, आग्रह सोडून त्यांनी केलेली आहे. राहिले तिथं. जावं गांवी, यावं. रहावं महाराजांच्याजवळ मात्र सायंदेव शेवटपर्यंत राहिले होते. गाणगापुरातून महाराज कर्दळीवनामधे जाईपर्यंत, आणखी तिथंपर्यंत ते राहिले होते, शेवटपर्यंत.

हे असे तुमचे पूर्वज म्हणाले. त्यांना सद्गुरूसेवेचा लाभ कसा झाला, नामधारकाला सिद्धांनी सांगितलं. कांही सेवा, प्रसंगानी आणि निरनिराळ्या प्रकारचे विकल्प निर्माण होतात

म्हणाले. बुद्धीचा, अंतःकरणाचा तो स्वभावच आहे. संकल्प विकल्पात्मक मन आहे ना? विकल्प नाहीसा करणं हेच तर हे आहे.

दण्डन्यासः परं दानं कामत्यागस्तपः स्मृतम् ।
स्वभावविजयः शौर्यं सत्यं च समदर्शनम् ॥ (भा.११.१९.३७)

हा स्वभाव आहे म्हणतात भगवान. संकल्पविकल्प होत राहतील. ते दूर करणं, निर्विकल्प अंतःकरण करणं, त्याकरता हे सहाय्य जरूर आहे. फार मोठं शौर्य आहे. हे शौर्य ईश्वरकृपेशिवाय मिळू शकत नाहीये. तेव्हा असे तुमचे पूर्वज होते. महाराजांची त्यांच्यावर कृपादृष्टी होती. शेवटपर्यंत त्यांनी सेवा केली. संसारात राहूनसुद्धा, अलिप्त राहून, अनन्य मन करून सेवा केली.

हे नामधारका, ऐकून घे तू, याचा विचार कर, आणखी गुरूमहाराजांची कृपा संपादन करण्याकरता आपण योग्य आहोत किंवा अयोग्य आहोत याचं तुझा तूच विचार कर.

यानंतर पुढच्या आता कथा आहेत. गुरुभक्तीच्याच कथा आहेत. गाणगापूर क्षेत्रामधे राहणारी मंडळी, त्यातसुद्धा कांही मोठे गुरुभक्त, अधिकारी भक्त होते. ब्राह्मण भक्त एक निघाला. ब्राह्मणांचा आचारधर्म मला ऐकवा, सांगा महाराज, माझ्याकडून करवून घ्या. त्याने अगदी आग्रहानी प्रार्थना केली. महाराजांनी त्याला सर्व सांगितलं आणि तू आचार करून सुखी रहा म्हणाले. कांही तुला आणखी प्रतिबंध होणार नाही, योगक्षेम सगळा आणखी तुझा चालू राहील. असाही भक्त निघालेला आहे.

त्याच गांवामधे एक कोष्टी, विणकरी होता. तंतुक नांवाचा भक्त. तो महाराजांचा मोठा भक्त होता. विवेकज्ञान संपन्न होता मोठा. मठामधे यावं, झाडून काढावं, महाराजांना आणखी नमस्कार करून बसावं, बोलावं, आपला त्याला नाद होता. संसारातलीही कामंही करायची ती करावी त्यानी. शिवरात्र जवळ आली एकदा आणि गावातली मंडळी, त्याचे आप्त इष्ट मंडळी, आणखी गांवातली कांही मंडळी, श्रीशैल्य मल्लिकार्जुनाला दर्शनाकरिता निघाली. पुनर्जन्म नाही म्हणतात.

श्रीशैल्यशिखरं दृष्ट्वा पुनर्जन्म न विद्यते ।

प्रत्यक्ष आणखी मल्लिकार्जुनाचं दर्शन झाल्यानंतर तर काय फळ असत? त्याला विचारलं, कां रे म्हणाले, तू येणार कां आमच्याबरोबर? आठ-पंधरा दिवस लागणार म्हणाले, चालत जायचं. तो म्हणाला काय तुम्ही वेड्यासारखं यात्रेला काय जाता म्हणाला. प्रत्यक्ष महाराज या ठिकाणी असताना, मल्लिकार्जुनाचं दर्शन कशाकरता करायचं म्हणाला? हे तो कांही नास्तिक बुद्धीनं सांगत नाहीये. कारण महाराजांचं दर्शन झालं म्हणजे सगळं आलं, ही त्याची बुद्धी आहे ना? म्हणजे नास्तिक्य नाहीये. पण एक त्याचा आग्रह दिसतो आहे. महाराजांच्या

ठिकाणी सर्व तीर्थ आहेत. सर्व क्षेत्रं आहेत बाकीच्या ठिकाणी जाऊन त्याचं काय करायचं, कशाकरता? म्हणाले. इथंच करा की सेवा तुम्हाला काय करायची आहे ते. त्या लोकांनी याचा नाद सोडला. त्याला कांही पटायचं नाही म्हणाले, असाच कांहीतरी बोलतो. सगळे लोक यात्रेला निघून गेले आणि शिवरात्रीचा दिवस उजाडलेला आहे. हा नित्याप्रमाणे, प्रातःकाळी महाराजांच्या दर्शनाकरता मठामध्ये आलेला आहे.

नमस्कार केला, कां रे म्हणाले, सगळे लोक यात्रेला गेले आणि तू कां गेला नाहीस? काय करायचं जाऊन म्हणाला, शिवलिंगाची पूजा कशाकरिता करायची? तुमचं दर्शन प्रत्यक्ष या ठिकाणी, साक्षात शिवरूप आपण आहात. त्रिमूर्ती स्वरूप आपण असताना, आपल्याला सोडून जायचं अन् त्या शिवलिंगाची, पाषाणलिंगाची पूजा करायची, हे कांही मला पटत नाहीये म्हणालां. त्यावेळी महाराज म्हणाले, तू पहिलयंस का श्रीशैल्य? नाही महाराज आणि इच्छाही नाही, काय करायचं पाहून म्हणाला. **पुण्याची सुद्धा इच्छा नाही, पुण्य होईल असंही वाटत नाही. इथं सगळं पुण्य जवळच जर आहे, तर तिथं जाऊन आणखी पुण्य काय मिळवायचं म्हणाला. बरं म्हणाले,** तुला इच्छा असेल तर जाऊ या, झांक म्हणाले डोळे, आपल्या पादुकात पाय घाल म्हणाले आणि एकदम डोळे उघड म्हणाले. डोळे झांक म्हणाले म्हणजे गाणगापुरात तो होता, उघड म्हटल्याबरोबर श्रीशैल्य दिसायला लागलं. इथं आता चिकित्सेला वेळ नाहीये. प्रत्यक्ष शक्तीचा अनुभव घेणारे जे कांही ईश्वरभक्त असतात, त्यांना चिकित्सा करण्याची इच्छाही नसते आणि वेळही नसतो. तिथं आता श्रीशैल्यला येऊन पोचले त्यांना थोडसं वाटलं, कुठे आलो, कुठं काय कोणाला ठाऊक. ते म्हणाले, आता तू जा म्हणाले, स्नान कर पाताळगंगेचं, मल्लिकार्जुनांची पूजा वगैरे करून ये, म्हणाले. एका झाडाखाली आपले महाराज स्वस्थ राहिलेले आहेत. हा गेला स्नानाला, क्षौर वगैरे केले आणखी पूजासाहित्य घेऊन तो मल्लिकार्जुनाच्या मंदिरात पूजेकरता निघालेला असताना, गाणगापुरातली सगळी मंडळी त्याला भेटली.

त्यांनी विचारलं, कां रे म्हणाले, आमच्या बरोबर. आम्हाला नुसतं तत्त्वज्ञान सांगितलंस आणि आलास की नाही शेवटी आमच्याबरोबर. तो म्हणाला, केव्हा आलो तुम्ही विचारलं कां मला ? एक मिनिटसुद्धा मला यायला लागला नाही. गुरुमहाराजांच्या बरोबर मी आलो. त्यांना कसा विश्वास बसणार? पंधरा दिवस आम्हाला चालायला लागले अन् इथे आम्ही आलो आणि हा सांगतोय आत्ताच्या आत्ता आलो म्हणून. लबाड आहे म्हणाले, आमच्याच पाठीमागून लपत-छपत आलेला आहे, नुसता बडेजावाने, आपला अहंकाराने बोलतो आहे. सोडून दिलं त्यानी. गेला आपला पूजेला, आणि पूजा करताना त्या मल्लिकार्जुनाच्या ठिकाणी साक्षात गुरूमहाराज तिथं आहेत. त्याला दर्शन झालेलं आहे. आणि त्यांचीच पूजा, आता तिथं बोलायला वेळ कुठाय,

हजारो लोक येतायत, पूजा करतायत, बिल्वपत्र वहातायत, आरती करतायत, नैवेद्य दाखिवतायत. त्यात बोलायला कुठे वेळ आहे ? पाहातो आहे नुसतं. सर्व लोकही गुरुमहाराजांची पूजा करतायत, आपणही, त्यानी महाराजांची पूजा केली. आणखी आला परत. काय रे, म्हणाले, झाली पूजा? हो जाऊन आलो म्हणाला. दर्शन घेतलं. पण महाराज, एक माझ्या मनामधे जी शंका आहे, की हे जे लोक आहेत, ते यात्रेकरीता कशा करता इथे आले ? अगोदरही मला वाटत होतं, मी अगोदरही त्यांना सांगितलं म्हणाले, पण कोणी माझं ऐकलच नाही. काय झालं काय? व्हायच काय म्हणाले, मल्लिकार्जुनाची पूजा म्हणजे साक्षात आपलीच पूजा आहे तिथे, आपणच तिथं होता म्हणाला. सर्व लोकांनी आपली पूजा केली, मग गाणगापुरात आपली पूजा करता आली नसती का त्यांना ? ही शंका आहे म्हणाले. कशाला या ठिकाणी यात्रा वगैरे कशाला पाहिजे आहे? गुरुभक्ती मोठी आहे. यात संदेह नाहीये. सद्गुरू महाराज हे सर्वत्र आहेत, मग ते गाणगापूरात असताना कशाला हा प्रयास पाहिजे कशाला? शास्त्र हे प्रमाण आहे, त्याबद्दल कांही अनादर नाही. पण त्याचा हेतू काय म्हणाला. हे समजून घ्यायचंय.

त्याकरता महाराजांनी त्याला आणखी एका राजाची कथा सांगितलेली आहे. स्थानमाहात्म्य आहे म्हणाले. भगवंतांनी ज्या ज्या स्थानामधे आणखी निवास केलेला आहे त्या स्थानाचंही माहात्म्य आहे. त्याकरता यात्रेला जायचं असतं म्हणाले. **यात्रा ही जी करायची, ती त्या स्थानामधे गेलं असताना आपली बुद्धी शुद्धी होते. पापक्षय होतो हे एक कारण आहे. परंतु त्या स्थानांमधे महात्म्यांचं दर्शनही होण्याचा संभव आहे म्हणाले. म्हणून आणि तीर्थयात्राही आवश्यक आहे.** हे एक कारण त्यांनी सांगितलं महाराजांनी. तो राजा आणि त्याची स्त्री पुष्कळ आणखी ऐश्वर्य आहे पण त्याला खाण्यापिण्याचा कांही निर्बंध नाहीये. परस्त्री काय आणि स्वस्त्री काय, तिकडेही निर्बंध नाही, असा तो होता. पण शिवभक्त मोठा होता. त्याच्या स्त्रीनं, राणीनं त्याला एकदा विचारलं की महाराज, केवढी शिवभक्ती आपल्या अंतःकरणामधे आहे आणि ती शिवभक्ती इतकी असताना आपलं वर्तन असं कां आहे ? भक्षाभक्ष्य विवेक नाही, स्त्रियांचाही विवेक नाही. हे कसं काय? त्यांनी आपल्या पूर्जजन्माचा वृत्तांत त्या राणीला सांगितला. पूर्वी म्हणाले, मी श्वानयोनीमधे जन्माला आलेलो होतो, कुत्रा होतो. शिवरात्रीच्या दिवशी मला कांही खायला मिळालं नाही, भूक लागली आणि मी मंदिरामधे प्रवेश केला, कांही मिळेल म्हणून. सगळे लोक मला मारायला धावलेले आहेत, मी पळायला लागलो, प्रदक्षिणा केली, पळतो आहे, पाठीमागे लोक लागलेले आहेत. आरती शंकरांची चाललेली होती. ती आरतीही मला पहायला मिळाली, लोकांनी मला मारलं, प्राण गेला आणि त्यामुळे मी या ठिकाणी जन्माला आलो. शिवमंदिरामधे प्राण गेलेला आहे. आर्तिक्याच दर्शन झालेलं आहे, आणि पूर्वीची प्रकृती पुनरावृत्त झालेली आहे. श्वानप्रकृतीच माझ्यापाठीमागे आली म्हणाले आणि त्यामुळे विवेक कांही मला रहात

नाहीये. असं त्यांनी कारण सांगितलं. माझा जन्म सांगा म्हणाली ती राणी. तूही म्हणाले पूर्वी आणखी एका लहान पक्षाच्या रूपामधे होतीस. तुला एक मांसपिंड सापडला. तो घेऊन निघालेली असताना एक घार तुझ्या पाठीमागे लागली. तू श्रीशैल्य पर्वतावर गेलीस, त्या शिखरावरती फिरू लागलीस, शेवटी घारीनं येऊन तुला मारलं, तुझा प्राण गेला आणि तुला हा जन्म आलेला आहे.

त्या स्थानामधे जाऊन आणि पुण्य झालं म्हणाले. आणि त्या पुण्याचे, उत्कट पुण्य ठरलेलं आहे, ते कांही ज्ञानपूर्वक होवो अगर अज्ञानाने झालं, घडलेलं आहे ते. मग त्या राणीच्या इच्छेप्रमाणे त्यानी पुढच्याही आपल्या जन्मांचं वर्णन केलेले आहे. भूतजन्म, मागच्या जन्माचं ज्ञान आहे. पुढंही कोणचे कोणचे जन्म येणार आहेत, सगळे राजाचेच जन्म त्यांनी सांगितलेलं आहेत. अमुक ठिकाणी मी राजा होणार, तिसऱ्या जन्मात, चौथ्या जन्मात, पाचव्या, सहाव्या, सातव्या आणि नंतर मात्र भगवान कैलासपतीच्या कृपेनं कैलास पर्वतावरती आपण दोघेही जाऊन राहू म्हणाला. हे महाराज त्या तंतुकाला सांगतात.

ते म्हणाले, या स्थानामधे विशेष आविर्भाव आहे. विभूति म्हणजे ही स्थानं सुद्धा विभूतीरुप आहेत ना? **''स्थावरणां हिमालयः''** म्हणून भगवान म्हणताहेत **'अश्वत्थ सर्व वृक्षाणाम्'** म्हणताहेत, काही विशेष आविर्भाव या ठिकाणी, भगवत् स्वरुप, आणखी तेजाचा झालेला आहे. त्या सगळ्या विभूति असल्यामुळे या ठिकाणी येण्यामध्ये कांही दोष नाहीये. तत्त्वज्ञान जरी असलं तरी ते तत्त्वज्ञान आग्रहरहित असलं पाहिजे. **बुद्धेः फलम् अनाग्रहः ।** म्हणतात. हीच खरी तत्त्वबुद्धी बनलेली आहे, आग्रह नाहीये.

विष्णुं ध्यायतु धीर्यद्वा ब्रह्मानंदे निमज्यताम् ।
साक्ष्यहं किंचिदप्यत्र न कुर्वे नापि कारये ॥ **(सार्थ पंचदशी–श्लोक ५७)**

जीवन्मुक्त महात्मा समाधी अवस्थेमधेही राहू शकतो. निर्गुण निराकार आणि आणखी आत्मतत्त्वाचं चिंतनही तो करू शकतो.

व्युत्थानदशेमध्यें आणखी भगवान विष्णुचं चिंतन त्याची बुद्धी करायला लागली, हरकत नाही. बुद्धीचं कार्य, गुणादेशानुवर्तन्ते, चाललेलं आहे, जाईना कां, चांगलं आहे, तेव्हा **कोणच्याही कर्माबद्दल आग्रह नाही, कारण त्या सर्वांचा साक्षी मी आहे. तादात्म्य अध्यास हा पूर्ण केलेला आहे. त्यामुळे त्यांच कर्म होत असलं तर त्यांचा संबंध मला काय? मला कोणच्याही कर्माचा संबंध नाही. हे ज्ञान आणखी झाल्यामुळे मनामध्ये आग्रह नाहीये.** आणि इथं, या ठिकाणी, सगुणसाकार जे परमात्म्याचं स्वरूप आहे तेही आणखी ईश्वराचंच स्वरूप आहे ना? तेव्हा त्या स्वरूपाबद्दल अनादर झाल्यासारखा होतो हा. त्या स्थानामधेही जावं, यावं, पूजा करावी. कांही हरकत नाही. हा सर्वसमन्वय असलेली बुद्धि ही श्रेष्ठ बुद्धि आहे.

म्हणून स्थान माहात्म्य या रुपानी त्या विशिष्ट मल्लिकार्जुनाच महत्त्व महाराजांनी सांगितल आहे. तो म्हणाला महाराज तुमचीच पुजा सर्वांनी केलेली आहे. तू चुकतो आहेस असे म्हणाले नाहीत. काय चूक आहे. याला काय उत्तर देणार. याची भावना, त्याची श्रद्धा त्यामुळे मल्लिकार्जुन भगवान, आणखी साक्षात स्वामी महाराज आहेत.

सगुण स्वरूपाचा साक्षात्कार त्याला झालेला आहे, इतकी ती मूर्ति, त्याच्या अंतःकरणामधे दृढ आहे. निदिध्यास इतका आहे– तो कमी कसा होईल. परंतु सःअहं आणि अहं सः दोन्हीही पाहिजे. दोन्हीही, आणखी हा अभ्यास पाहिजे. म्हणून दोन्हीचंही फळ सांगितलेलं आहे. शिवलिंगही महाराज आहेत, महाराज हे सुद्धा शिवलिंगस्वरूप, शिवस्वरूप आहेत. शिवही महाराज गुरु स्वरूप आहेत असा दोन्हीही अभ्यास म्हणजे दोघांचाही आहे, म्हणजे दोन्हींच ऐक्य सांगितल आहे. आग्रह नको, नाहीतर लोकांचा बुद्धिभेद व्हायचा ना ! याने सांगायचं मला महाराज दिसलेत, तुम्ही सुद्धा महाराजांचीच पूजा केली, कोणी तरी याच्या बोलण्यावर विश्वास ठेवणार नाहीत लोक, अज्ञानी लोक कसा ठेवतील ? पण कोणी ठेवला की त्याचा बुद्धिभेद केल्याचा दोष याला लागणार नाही कां ? तू सावधपणे वागत जा म्हणाले, असला बुद्धिभेद करायचा नाही. तुझ्या मनामधे जे आहे, तू त्याप्रमाणे ध्यान करीत जा. **शिवलिंग, शिवस्वरूप आणि गुरूस्वरूप हे एक आहे हे तुला समजलेलं आहे, हे तुझ्यापुरत ठेव.** तसा अधिकारी कोणी भेटला तर सांग. त्याला सांगण्यापेक्षा तो सुद्धा तुझ्याप्रमाणे त्यालाही ते ज्ञान होईल म्हणाले. हे त्याला समजावून सांगितलं आणि लगेच महाराज आले, गाणगापुरामधे संगमावर येऊन पोचले.

सकाळपासून सगळी मंडळी महाराज कुठे गेले, महाराज कुठे गेले, संगमावर जाऊन पाहिलं तिथं नाही, गांवातही नाही, काय झालं? त्या तंतुकाला महाराजांनी पाठिवलं, जा म्हणाले, गांवात जाऊन सांग, इथं आम्ही आहोत. तो आला गांवात यायला निघाला. लोक भेटले त्याला, क्षौर वगैरे केलेलं आहे त्यांनी. कुठे गेला होतास म्हणाले. तो म्हणाला, श्रीशैल्य पर्वतावरती जाऊन मल्लिकार्जुनांची पूजा करून मी आत्ता आलो. गेला होतास केव्हा? सकाळी गेलो. काय गृहस्था, सकाळी गेलास काय, आणखी आलास काय ? ते महाराजांना विचारा म्हणाला. बरं, महाराज आहेत तिथं म्हणून, सगळी मंडळी गेली, दर्शन झालेलं आहे, सगळं झालेलं आहे.

आता याला आलेला जो अनुभव आहे, हा अनुभव आता सांगणार कसा. याचं शब्दप्रमाण मानणार कोण? शब्दप्रमाण मानायचं म्हणजे तशी बुद्धीची योग्यता पाहिजे. योग्यता आल्याशिवाय शब्दप्रामाण्य मानलंही जात नाही, **हा सर्व समन्वय असलेली बुद्धिच चिंतन त्याची बुद्धि करायला लागलेली आहे. हरकत नाही.** कारण प्रत्यक्ष प्रमाण हे वेगळं आहे ना. प्रत्यक्ष श्रेष्ठ

आहे नां. प्रत्यग श्रेष्ठ आहे, मी संसारी नाही जीवात्मा. प्रत्यगात्मा आहे, दिगंबर शब्दाचा अर्थ करताना, **दिग्भिरवेष्टितमम्बरमेव प्रत्यग्बह्मेति ।** त्वम् पदार्थाचं विवेचन केलेलं आहे. पहिला दिगंबर शब्दानी. संपूर्ण आणखी, देहत्रय आणखी, पंचकोश आणखी यांनी वेष्टित झालेलं हे शुद्ध अंबर आहे, शुद्ध आत्मतत्व म्हणजे तो प्रत्यगात्मा आहे, शुद्धत्वम् पदार्थ आहे असा तू आहेस सांगून काय उपयोग आहे? कारण अनुभवही तसा नाहीये. मी दुःखी आहे, मी असा आहे वगैरे, सर्वांशी तादात्म्य त्याचं झाल्यामुळे, सर्वांनी वेष्टित असलेला तो प्रत्यगात्मा त्या स्वरूपामधे, प्रत्यक्ष प्रमाणाने तसं वाटतंय. शब्दप्रमाण मानायची तयारी कुठाय? बुद्धीची योग्यता नाहीये. बुद्धीची योग्यता ज्यावेळेला उत्पन्न होईल, त्यावेळेला प्रत्यक्ष प्रमाणच खोटं आहे, हे प्रमाण खरं असं वाटतं त्याला, बुद्धिगम्य जे आहे, म्हणून याला आलेला अनुभव याच्यापुरताच राहिलेला आहे, तो कोणाला सांगणार बिचारा? आणि त्याचीही बुद्धी शुद्ध झालेली आहे. आग्रहरहित झालेली आहे. कुणालाही त्याने पुढं सांगितलं नाही. कशाला जाता? **इथं महाराज आहेत, काय करायचंय तुला करून म्हणाले, जाणारे जाईनात म्हणाले, त्यांना काय पुण्य मिळणार नाही असं तू म्हणतोस काय? सद्गुरू महाराजच आहेत, इथंच पूजा करणं त्यालाही पुण्य मिळेल. त्याला जर दूर जाऊन पूजा करायची इच्छा आहे तर त्यालाही पुण्य मिळणारच आहे की, शास्त्र प्रमाणांनी सांगितलेला आहे ना यात्राविधी. तू कशाला आणखी त्यात बुद्धिभेद करतोस?** असं त्याला समजावून आणखी त्याच्या बुद्धीतला तो आग्रह दूर केलेला आहे. तू आपला स्वतःपुरता अनुभव घे. त्याला अनुभव महाराजांनी दिलेला आहे. तुझी बुद्धी योग्य आहे. तू चूक नाही करत, पण लोकांच्या अज्ञानामुळे जे लोकांना वाटतंय तेही ते करू देत. एवढंच त्याला समजावून सांगितलेलं आहे.

यानंतर दुसरा एक कथाभाग सांगतायत सिद्धमुनी. एके दिवशी म्हणजे शिवरात्र नुकतीच झालेली आहे. दुसरा दिवस, पारण्याचा दिवस, त्यादिवशी एक नंदी नांवाचा ब्राम्हण तिथे आलेला आहे. कुष्ठी, कुष्ठरोगी झालेला आहे. कुष्ठरोगाचा आणखी प्रतिकार करण्याकरता, दूर करण्याकरता पुष्कळ त्याने प्रयत्न केले, तुळजापूरामधे जाऊन राहिलेला आहे, उपोषण वगैरे करून, पुष्कळ आणखी चंडीपाठ त्याने केले, कांही नाही, चंदलापरमेश्वरीच्याकडे जा म्हणून सांगितलं, तुळजाभवानीनं. तिथं गेला आहे हा, तिथेही सहा सात महिने उपोषण करून पाठ केले. चंदलादेवीनं सांगितलं, गाणगापुरामधे नरसिंह सरस्वती स्वामी महाराज आहेत. त्यांच्याकडे जा. त्याला राग आला. काय म्हणाला, चालवलंय तुम्ही ? देव म्हणून मी तुमच्याकडे आलो. तुमची शक्ती म्हणजे मोठी आहे, अशा विश्वासाने तुमच्याकडे आलो. तुळजाभवानीनं आणखी तुमच्याकडे पाठवलं, चंदलादेवीकडं. तुम्ही म्हणे गाणगापुरामधे पाठवता आणि माणसाकडे पाठवता मला. स्वामी महाराजाकडं देवीनं पाठवलेलं आहे. नामदेवांना आणखी पांडुरंगांनी

विसोबा खेचरांच्याकडे पाठवलं होतं. तुला आणखी कच्च मडकं राहायचं नाही ना, पक्क मडकं पाहिजे ना व्हायला, मग तिथे जा म्हणाले, म्हणजे होशील, पांडुरंगांनी विसोबांच्याकडे पाठवलेलं असताना ते शिवलिंगावर पाय ठेवून निजले होते. आणि यांनी पाहिल्याबरोबर यांना वाटलं, कसले गुरू आहेत म्हणाले, शिवलिंगावर पाय ठेवतात. पांडुरंगानी ज्यांच्याकडे, मला पाठवलंय, हे गुरू योग्य आहेत असं वाटायला नको कां? हे अयोग्य असतील तर पांडुरंगांनी कशाला पाठवलं असत. पांडुरंगावर तर भक्ती आहे ना ? त्यांचा शब्द प्रमाण आहे ना. परंतु मनाची आणखी स्थिती अशी आहे. विकल्प निर्माण झाला, तो आता त्यांच्यावरच सोपवून दिला, पांडुरंगावर. तुम्हीच आता बघा म्हणाले, मग त्यांचा तो विकल्प दूर केला, सगळं झालं, कथा प्रसिद्ध आहे ती.

तसा हा जो नंदी ब्राह्मण आहे, तुळजाभवानी, चंदलापरमेश्वरी ह्या देवी आहेत. देवयोनीतील देवी आहेत. त्यांनी जर आम्हाला गाणगापुरामधे जायला सांगितलेलं आहे, देवी म्हणून विश्वास आहे, कारण तो भांडतोय ना ? तुम्ही देवी आहात, तुमच्याजवळ शक्ती आहे म्हणून मी आलेलो आहे, हे त्याला मान्य आहे. आता ती शक्ती एवढ्यापुरतीच कशी कमी, माणसाकडे कशाला पाठवता म्हणतो आहे, म्हणजे बुद्धिवाद सुद्धा, त्याच्यामध्ये किती असंगती असते. एकदा विश्वास, अंशतः विश्वास, अंशतः अविश्वास, दोन्हीही बुद्धिवादामधे आहेत. पूर्ण अविश्वासही नाही आणि पूर्णत: विश्वासही नाही. माणसाकडे मी जाणार नाही म्हणाला, मी इथंच आता पुन्हा पाठ करणार, उपोषण करणार, अन्नत्याग करणार आणखी इथंच मरून जाईन म्हणाला. मी जाणार नाही. आता त्याचं भाग्य आहे, महाराजांची कृपा त्याच्यावर होणार आहे, देवीनं सगळं जाणलं आहे, म्हणून देवीनं सांगितलं, त्या सगळ्या पुजाऱ्यांना, भोप्यांना सांगितलं याला म्हणाले मंदिरात उद्या येऊ देऊ नका. बळजबरीनेच जायला लागलं त्याला.

गाणगापुरामधे तुला जायला पाहिजे. देवीला करता आलं नसतं असं नाही. परंतु कांही कांही जीवात्मे जे आहेत त्यांची योजना निरनिराळ्याकडे असती. गोंदवलेकर महाराज, अक्कलकोट स्वामीमहाराजांच्याकडे गेले म्हणे. गुरूशोधाकरिता, पडलेले असताना, त्यांनाही आनंद झाला, माझा बाळ येणार आहे म्हणाले. आला, त्याला भेटले, प्रेमाने भेटले, खायला दिलं, डाळींब दिलेलं आहे, डाळींबाचे दाणे दिले. आणि त्याला सांगितलं की, बाबा तुझे काम माझ्याकडे नाहीये. तुझे गुरू दुसरीकडे आहेत असं सांगून लावून दिलं त्यांना. म्हणजे अक्कलकोट महाराज कांही करणार नव्हते असं नाही. परंतु जो संबंध जीवात्म्याचा ज्याच्याशी आहे, तशाच प्रकारचे सद्गुरू जर भेटले तर त्याचं आणखी जास्ती कल्याण आहे. त्याचे सगळे संदेह वगैरे ते दूर करू शकतात, असाही कांही उद्देश असेल किंवा ईशसृष्टीमधे आणखी असे हे संबंध वेगळे वेगळे असतील कदाचित, म्हणून याचा उद्धार महाराजांच्याकडून व्हावा म्हणजे

तो पूर्ण होईल. हाही उद्देश असेल देवीचा. **देवीची कृपा झाली, रोग दूर झाला, तेव्हढ्यापुरतं बरं झालं, पण मनाची शुद्धी व्हायला पाहिजे ना ? तीही व्हायला पाहिजे.**

म्हणून आग्रहानी त्या पुजाऱ्यांनी सांगितलं, देवीची आज्ञा तुला झालेली असताना तू इथे राहू नकोस म्हणाले. तुला आम्ही मंदिरात येऊ देणार नाही. नाईलाज झाला आणि दुसरे दिवशी तिथुन निघाला आणि शिवरात्रीचे दुसरे दिवशी गाणगापुरामधे येऊन पोचलेला आहे. दहा अकरा वाजायची वेळ, सकाळची. महाराज कुठायत म्हणून त्यांनी विचारले. संगमावर आहेत, येतील म्हणाले. येण्याची वेळ झाली आहे. इतक्यात महाराज आलेले आहेत. आणखी मठामधे गेले. हाही गेला. लांबून साष्टांग नमस्कार घातला आणि महाराज म्हणाले, काय हो, तुम्ही त्या देवीला सोडून आमच्यासारख्या माणसाकडे कशाला आला तुम्ही ? काय कारण आहे? आम्ही काय करू शकणार म्हणाले माणसं ? आमची शक्ती किती आणि देवीची शक्ती किती ? म्हणजे देवीची शक्ती मोठी आहे, ही भावना त्याची वाढती काय पाहिलं त्यांनी. हाही उद्देश आहे. दैवी शक्ती मोठी आहे, माणसाची शक्ती कमी आहे. ही त्याच्या बुद्धीला आणखी भावना आहे. महाराजांचा अनादर करायचा असा ही उद्देश नसेल त्याला. पण मनुष्यवेश असल्यामुळे त्या बुद्धीवरती असा परिणाम झालेला आहे. आचार्य माम्–विजानीयात, म्हणतायेत, परंतु बोलायच कसं ! एकदम कसं बोलणार ? तर देवीकडे कां गेला नाही, तिथं कां राहिला नाही तुम्ही ? रहायच म्हणाले तिथं तुम्ही. इथं जसा हट्ट तुमचा होता, माणसाकडे जायचं नाही, तसं देवीच्याजवळ बाहेर रहायचं होतं, मंदिरात येऊ देणार नाही, नाही राहू दिल तर बाहेर राहून देवीचं आणखी अनुष्ठान, पाठपूजा करता येत नाही काय म्हणाले?

एकदम हा आणखी स्तब्ध झालेला आहे. बुद्धीसाक्षी परमात्मा आहे हा. बुद्धीमधे जे जे विकल्प येतायत, ते सगळे आणखी कळतायत. ही खात्री झाली, आणखी त्याने क्षमा मागितली, महाराज, चूक झालेली आहे माझी, **गच्छतं स्खलनं क्वापि ।** आपण क्षमाशील आहात. जीवाची आणखी स्थिती ही अशीच आहे म्हणाले. चुकाच पुष्कळ होतात. एखादं कांहीतरी घडलं, तर त्याला आपण आणखी क्षमाशील वृत्तीनं, त्याचं कर्म चांगलं आहे, पुण्य आहे, म्हणून आपण त्याच्यावरती कृपा करता हा आपला मोठेपणा आहे. माझ्या एकंदर प्रसंगामुळे, माझ्यावर आलेल्या प्रसंगामुळे माझी बुद्धी अशी झाली म्हणाले. काय करणार? कालिया नागाला, त्याचं दमन केलं, दमला तो, श्वास तोंडातून बाहेर यायला लागला, सगळ्या त्याच्या नागपत्नी आल्या, त्यांनी प्रार्थना केली. सोडून दिलं त्या नागाला, त्यांनी म्हणाले, सांगितलं, महाराज.

वयं खला: सहोत्पत्त्या सर्प: तामसा दीर्घमन्यव: ।
स्वभावो दुस्त्यजो नाथ लोकानां यदसद्ग्रह: ॥ (भा.१०.१६.५६)

महाराज म्हणताहेत.

स्तुती करतानासुद्धा तो सांगतोय, आम्ही जन्मापासूनच अशा स्वभावाचे आहोत म्हणाले. तुम्हीच सगळं जग निर्माण केलंय ना ? तेव्हा आम्हाला सर्पांना, या जातीला अत्यंत रागीट स्वभावाचं तुम्हीच निर्माण केलेलं आहे. म्हणजे त्यातही आपले हे चूक व्यक्त करतात. माझी चूक झाली म्हटला तो, क्षमा मागितली, हे झालं, परंतु म्हणाला, देवा तुम्हीच निर्माण केलं ना आम्हाला, माझी बुद्धी किंवा स्वभाव तुम्हीच दिलेला आहे, त्यामुळे घडलं हे. हे सुद्धा घडायला नको आहे. तसं आणखी याठिकाणी नंदी सांगतो आहे, महाराज, माझ्यावरती असा प्रसंग आला, सर्वांनी माझा त्याग केला, कुठंही मला लोकामधे जाता येत नाही, व्यथा सारखी पाठीमागे लागलेली आहे. पण देवाची उपासना करावी हे शास्त्रीय आहे, प्रमाण आहे, शास्त्र प्रमाण मानून मी आणखी देवीची उपासना केली. त्या देवीने, या दुसऱ्या देवीकडे जायला सांगितलं. तिथंही उपासना केली मी, त्यातही कांही भेदबुद्धी मानली नाही, आज्ञापालन केली. आता त्याही देवीने मला तुमच्याकडे जायला सांगितल्यानंतर मात्र, इथेही शास्त्रप्रमाण नाही की काय? देवी ज्याअर्थी सांगते आहे त्याअर्थी अगदी हा महात्मा...

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसम्भवम् ॥ (भ.गी. १०.४१)

ही विभूती साक्षात परमेश्वराची मूर्ती आहे. **'ज्ञानी तु आत्मैव मे मतम् ।'** असं शास्त्र आहे, भगवत् आज्ञा आहे. पण हे आठवलं नाही म्हणाला. ते दुःखी मी झालो, संकटग्रस्त झालो, व्यथा, क्लेष माझे दूर होईनात, म्हणून, आणि देवीची उपासना करून आपण मुक्त व्हावं, असं शास्त्रप्रमाण मानून मी गेलो. आणि हे शास्त्रप्रमाण मात्र माझ्या दृष्टीला नाही आलं. अत्यंत आणि अज्ञानाने, दुःखाने, क्लेषाने आणखी माझी मनामधे कल्पना आली, चूक आहे. बुद्धीसाक्षीचं ज्ञान बुद्धीला होईल कसं महाराज ? साक्षी आहे तुम्ही, बुद्धीसाक्षी, मला पटलं, आज पटलेलं आहे, आपण मनुष्य नाही आहात. हे आत्ता समजलं. परंतु देवीनं जरी सांगितलं, तरी कसा विश्वास ठेवायचा ? महाराजांच्याकडे जा, देवी सांगती आहे. तरी माझा विश्वास बसला नाही म्हणाला. म्हणजे देवीवरसुद्धा विश्वास कमी आहे हे सिद्ध झालं, हे मान्य करतो मी. तोही विश्वास माझा पूर्ण नव्हता, नाहीतर माझ्या मनामधे आपल्याबद्दल विकल्प उत्पन्न होणं बरोबर नाहीये. क्षमा करावी अशी प्रार्थना केली. पश्चाताप झालेला आहे.

त्या सोमनाथ ब्राम्हणाला महाराज म्हणाले, यांना संगमावर घेऊन जा म्हणाले, तिथं कांही विलंब नाहीये. यानी आपली निंदा केली, देवीच्याजवळ हा बोलला, मनुष्यदृष्टी याने आपल्याबद्दल ठेवली, ती आणखी दूर झालेली आहे, हे पटलं महाराजांना. सोमनाथ ब्राह्मणाला सांगितलं. संगमावर याला स्नान घाला, याची सगळी जुनी वस्त्रं टाकून द्यायला सांगा, नवी वस्त्रं याला नेसायला द्या, आणि घेऊन या म्हणाले. गेले ते. दोघेही गेले, स्नान केलं, शरीराचा

सगळा आणखी कुष्ठरोग दूर झालेला आहे. नवी वस्त्रं नेसून आणि तो नंदी नांवाचा ब्राह्मण, आला. पुन्हा गाणगापुरामधे आला, महाराजांना नमस्कार केला.

महाराजांनी थोडंसं, व्यवहार, अगदी चोख पाहिजे, देवाजवळ, महाराजांच्याजवळ व्यवहारही चोख. काय हो म्हणाले, तुमचं शरीर सगळं आणखी शुद्ध झालं की नाही, तपासून पहा म्हणाले. काय, खाली मान घातली त्याने. चूक झालेलीच आहे, पाहिलं सगळं अंग, पण जांघेला थोडासा आणखी कुष्ठाचा भाग शिल्लक राहिला आहे. तो म्हणाला महाराज, सगळा रोग गेला, पण इथं थोडासा डाग जांघेजवळ शिल्लक राहिला आहे थोडासा. ते तुमच्या मनाला विचारा म्हणाले. आम्हाला काय सांगता? गेलं ना ! मनुष्यसुद्धा रोग बरा करू शकतो ना ? हे तुम्हाला पटलं की नाही ? मग राहिला कसा मग ? राहिला म्हणजे तुम्ही अशी शंका उत्पन्न केली, तुमच्या मनातली अजून शंका गेली नसावी म्हणाले. म्हणून राहिलं असेल. तुमचं तुम्ही मनाची तपासणी करून पहा की. त्याला उपाय. तर स्तुती केली पाहिजे. मनामधे परमेश्वराच्या दिव्य गुणांचं ध्यान करून, चिंतन करून, वाणीनं तशी स्तुती झाली पाहिजे. म्हणजे मन पूर्ण शुद्ध झालेलं आहे. मनामधे एकदा जरी विकल्प उत्पन्न झाला, तरीसुद्धा तो दोष आहे. पश्चाताप झाला तरी **पश्चात्तापेन शुद्ध्यति**, खरी शुद्धी नाहीये. आणखी पुन्हा आणखी त्याकरता हे झालं पाहिजे. म्हणून ही योजना महाराजांनी सांगितली. आमची स्तुती करा वगैरे. त्यांना कांही स्तुती कोणी करण्याची इच्छा नाहीये. हा अमोगा, ऐसे नो व्हावे.

अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् ।
आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रह : ॥ (भ.गी. १३.७)

पण याला शिकवायचंय, तुमचं मन अजुन शुद्ध झालेलं नसेल म्हणाले. अशुद्ध झालं होतं ना ? ते गेलं, शुद्धी झाली की होत चाललेली आहे म्हणा. अजून शुद्ध व्हायचंय. पूर्ण शुद्ध होण्याकरिता तुम्हाला आमची स्तुती करावी लागेल. अर्थात स्तोत्र जे करायचंय, वाणीनं, ते आणखी गुणांचं चिंतन करून गुणवर्णन करायचं आहे. तर ते गुणांचं चिंतन मनाने सुरु झालेलं असताना सर्वही पातकांचा क्षय होईल आपोआप. शुद्ध अंतःकरण झालेलं आहे. **ईश्वराच्या गुणांचं चिंतन सुरु झालेलं असताना अनेक जन्मांच्या पातकांचा नाश होतो आहे. चित्त शुद्ध होऊन जात आहे.** हा त्यात उद्देश असला पाहिजे महाराजांचा. तुम्ही नुसतं वाणीनं आणखी कबूल केलं, तुम्ही महाराज आहात, तुम्ही श्रेष्ठ आहात, तुम्ही माझा सगळा रोग बरा केलात, माझी चूक झाली, मला असं वाटायला, हे सगळं वाणीनं बोलणंही निराळं. मुळापासून शुद्धता झाली पाहिजे, कधीही आणखी अशा प्रकारचा विकल्प मनामधे कधीही उत्पन्न होणार नाही.

तो जो संदीपक होता, विश्वनाथांना, विष्णुंना सांगतोय, नाही, आमचे गुरू महाराज, सर्व समर्थ आहेत, ते सर्व देणारे आहेत, तुमच्याजवळ मला कांहीही मागण्याची इच्छा नाहीये. मनुष्यदृष्टी नाही आहे. तर याप्रमाणे, मनामधे आणखी सद्गुरूंच्या बद्दल दृढ भावना असली पाहिजे. कधीही त्या मनामधे विकल्प उत्पन्न होऊ नये म्हणून स्तुती करायला सांगितली आहे.

मला कांही येत नाही म्हणाला, महाराज. ज्ञान नाही. त्याच्या जीभेवरती थोडी विभूती प्रोक्षण केली. त्याला दिव्य ज्ञान झालेलं आहे. **'दिव्यं ददामि ते चक्षुः ।'** ईश्वरदत्त बुद्धी आहे. ईश्वरानेच बुद्धीचं परिवर्तन केलेलं आहे. त्या बुद्धीमधे ईश्वराच्या स्वरूपाचं माहात्म्य पूर्णपणे पटलेलं आहे आणि त्या बुद्धीच्या प्रभावाने, वाणीच्या द्वारानी आणि परमेश्वराची स्तुती नंदीनामाने केलेली आहे.

आपण कसे कसे जन्माला येतो, कां येतो, पुष्कळ वर्णन केलेलं आहे. जीवाची काय अवस्था आहे, जीव स्वतःला किती मोठा समजतो आहे परंतु कांही नाही, पराधीन जीव आहे. कर्म परतंत्र आहे. गर्भामधे जातो आहे, गर्भातून बाल्यावस्था उत्पन्न होत आहे, किती त्यावेळेलाही पराधीन आहे, आईला कळत नाही, पोटात दुखायला लागलं म्हणजे औषध, आणखी दूध पाजायचं, भूक लागली म्हणजे पोटात दुखायला लागलं असेल म्हणून औषध पाजायचं अशी ही स्थिती आहे. अशा स्थितीमधे फिरत फिरत आम्हाला, जीवात्म्याला यावं लागतं म्हणाले. परंतु आपली कृपा, आपली ज्ञानशक्ती, आपली इच्छाशक्ती इतकी मोठी आहे की, अशाही स्थितीमधे म्हणजे आमच्याच कर्माचं फळ आम्ही भोगत आलेलो आहोत, त्यात तुम्हाला कांही सांगण्याची जरूरी नाही, कशाला सांगायचं? तुम्ही केलेलं कर्म, तुमचं तुम्ही भोगा, सांगता कशाला? पण असं आपण म्हणत नाहीये. जर आणखी अशानं त्रस्त झालेले आर्त आम्ही आपल्याजवळ आलेलो असताना, तुमचं तुमचं कर्म, तुम्ही पाहून घ्या असं म्हणत नाही आपण. आमचा उद्धार करता. आज आपल्याजवळ आल्यामुळे माझा उद्धार झालेला आहे. सर्व लोकांनाही त्यानी सांगितलं की काय तुमचं भाग्य आहे म्हणाले गाणगापुरामधे प्रत्यक्ष आणखी परमात्मा, आणखी विश्व ज्यांनी उत्पन्न केलं तो साक्षात सृष्टि, स्थिती, लयकर्ता इथं येऊन राहिलेला आहे. तुम्ही आणखी त्यांची सेवा करून मुक्त व्हा. तोही भाग गेला. कुष्ठरोग, सगळं बरा झालेला आहे. जांघेवरती असलेला कुष्ठ डाग निघून गेलेला आहे. कवीश्वर म्हणून त्याला उपाधी दिली, वस्त्रं वगैरे दिलेली आहेत.

म्हणजे बुद्धीमधे दोष उत्पन्न होणं हा निसर्ग आहे. स्वभाव आहे मनाचा. पण म्हणून परमात्मा दयाळू आहे याचा अर्थ हा आहे –

अहो बकी यं स्तनकालकूटं जिघांसयापाययदप्यसाध्वी ।
लेभे गतिं धात्र्युचितां ततोऽन्यं कं वा दयालुं शरणं व्रजेम ॥ (भा.३.२.२३)

म्हणून उद्धवजी सांगताहेत. त्याच्याइतका दयाळू कोणीही सापडणार नाही म्हणाले. पूर्ण समर्थ आहे तो. पाप करणारी बुद्धी किंवा मन हे सुद्धा बदलून टाकण्याचं त्याच सामर्थ्य असल्यामुळे त्याला, त्याच्या बद्दल कांही राग येत नाही, उलट दयेनं त्याचं परिवर्तन घडवून आणतात..

अशा रीतीनं, दुसऱ्या एका कवीची कथा सांगतायत. तोही असाच आग्रही आहे. त्या तंतुकाच्या विरुद्ध आहे. जवळच एका गांवामधे तो कवी, चांगला उत्तम कवी होता. शिवभक्त होता. रोज नवीन काव्य करावं, शिवस्तुती करावी आणि शिवाला अर्पण त्याने करावी. आता गाणगापुरामधे नेहमी जाणारी येणारी मंडळी, त्यांनी त्याला सांगितलं, अहो, महाराज गाणगापुरामधे आहेत, प्रत्यक्ष परमेश्वराचे अवतार आहेत. त्यांची कांही स्तुती करा की तुम्ही. त्यांना आनंद होईल. त्याने सांगितलं– नरकेसरी त्याचं नांव. तो म्हणाला, मी माणसाची स्तुती करत नाही. त्याचाही असाच आग्रह आहे. शंकरांचा मी भक्त आहे, शिवस्तुती फक्त करणार. बराय. मग, नित्याप्रमाणे पूजेला मंदिरामधे गेलेला आहे. त्या दिवशी त्याला झोप आली म्हणे. पूजा–बिजा राहिली आणि झोपेमधे स्वप्न पडलेलं आहे. आपण पूजेकरिता बसलेलो आहोत. तिथं शिवलिंग नाही, प्रत्यक्ष महाराज बसलेले आहेत आणि त्यांचीच आपण पूजा करतो आहोत. ते म्हणतायत अहो, आमची कशाला पूजा करता ? शिवलिंगाची पूजा तुम्ही करा. असं त्यांनी सांगितलं. तरी आपण त्यांची पूजा केली. हे स्वप्न पाहिल्याबरोबर, मग मात्र त्याच्या बुद्धीवरती परिणाम झाला. लगेच तिथून आपल्या गांवाहून निघाला, आणि गाणगापुरामधे येऊन महाराजांच्या पायावर मस्तक ठेवलं, चूक झाली महाराज, क्षमा करा, स्तुती वगैरे केली. कां हो म्हणाले, तुम्ही आज इकडे आला, तुम्ही शिवभक्त आणखी माणसाकडे ? नाही म्हणाले. आपण मनुष्य आहे असं मला वाटलं, म्हणजे शिवभक्ती माझी बरोबर झाली नसावी म्हणाला. शिवाची कृपा माझ्यावर आज झालेली आहे की, आपणच शिव आहात हे मला समजले. यामुळे आणखी, आता मी आपल्याला सोडून जाणार नाही. तुमच्या त्या मंदिरामधे रोज पूजा करत जा की म्हणाले. अहो त्या मंदिरामधे आता तिथं देवाची, म्हणजे शिवलिंगाची पूजा करून काय करायचं मला? म्हणाला. आता प्रत्यक्ष तुमचीच पूजा, तुमचीच सेवा, तुमचीच स्तुती आता केली म्हणजे झालं. अशी त्याची बुद्धी बदलून गेलेली आहे आणि तोही तिथे एक मोठा कवी म्हणून प्रसिद्ध राहिलेला आहे. त्याची ही कथा आहे.

एके दिवशी दिवाळी जवळ आलेली आहे. अश्विन मास, अनेक मंडळी, निरनिराळ्या गांवामधे महाराजांचे पुष्कळ भक्त होते. यावं, जावं, त्यांनी आपली सगळी ही आणखी संसारातली व्यथा सांगावी, महाराजांनी कांही मार्ग सांगावा. त्यांची व्यथा, त्यांची संकटं दूर व्हावी, त्यामुळे अनेक लोक तिथे जमत असत. एके दिवशी, दिवाळीच्या पूर्वी, सात गांवाहून सात शिष्य

भक्त महाराजांचे तिथे आले होते. त्या सर्वांनी महाराजांना विनंती केली की, महाराज यावर्षी दिवाळीच्या दिवशी, नरकचतुर्दशीच्या दिवशी आपण आमच्या गांवी यावं. आम्ही आपल्याला अभ्यंग स्नान वगैरे घालणार, आपली पूजा वगैरे करणार, भिक्षा देणार. तेव्हा आपण आमची प्रार्थना मान्य करावी. महाराज म्हणाले, बरायं, कांही हरकत नाही, आम्ही येऊ म्हणाले, आता येऊ म्हणाल्यानंतर तरी यांनी गप्प बसायला पाहिजे की नाही ? त्यांनी पुन्हा, संशय, कुणाच्या घरी येणार महाराज? हे निश्चित सांगा. आता सर्वांनाच सांगितलंय आम्ही येतो म्हणून, सगळयांनी जायला पाहिजे की नको ? पण नाही, सर्वांच्या घरी कसे येतील महाराज ? हे आहे ना. एकटे महाराज आहेत.

आपण जसे एकटे, एका वेळेला एकाच्याच घरी जाऊ शकतो, अनेकांच्या घरी एका वेळेला आपण जाऊ शकत नाही, तसेच महाराज आहेत. मनुष्य म्हटलं नाही, इतकंच काय ते, पण ह्याचा पर्याय, दुसरा आहे. हे मनुष्य आहेत, तसं या दोघांनी म्हटलं. नंदी आणखी नरकेसरींनी, त्यांनी मनुष्य असं म्हटलं नाही, अगदी मोठा अवतार आहे. सगळ मान्य करतायत, पण आपल्याप्रमाणेच महाराज आहेत, एकाच्या घरी एकटे महाराज, एकाच्या घरी नरकचतुर्दशीला जाऊ शकतील. ते कोणाच्या घरी आपण येणार? काय उत्तर द्यायचं आता ? ते म्हणाले, महाराज, ''तुम्ही असं करा म्हणाले, तुमचं तुम्ही ठरवा. कोणाच्या घरी आम्ही यायचं, तुमचा तुम्ही विचार करून आणि ठरवा.'' सध्याची लोकशाही मीटिंग झाली पाहिजे ना? मीटिंग होऊन निर्णय करायचा. त्यांनी टाकून दिलं. आता इथं काय शक्य आहे, जो तो भक्त म्हणाला माझ्या घरी मी नेणार, तो भांडतोय, हा भांडतोय, थोडा वेळ ते भांडण चाललेलं पाहिलं महाराजांनी, सगळयांना म्हणाले, इथं स्वस्थ येऊन बसा म्हणाले, भांडण्याचं कारण नाही. तुमच्या सगळयांच्या घरी आम्ही येऊ, असं आश्वासन दिलं, तरीसुद्धा, सर्वांच्या घरी कसे येतील ? मग एका भक्ताला अगोदर आपल्या जवळ बोलावलं, त्याच्या कानात सांगितलं, तुझ्या घरी नरकचतुर्दशीच्या दिवशी, यावर्षी आम्ही येणार आहोत. कुणालाही सांगू नकोस, मुकाटयाने आपल्या आपल्या घरी निघून जा. त्याला पाठवून दिलं, दुसऱ्या भक्ताला बोलावलं, त्यालाही सांगितलं, तुझ्या घरी आम्ही येणार आहोत. सर्व लोकांमधे जर महाराजांनी हे सांगितलं असतं, सांगितलेलं आहे त्यांनी, आम्ही सगळ्यांच्या घरी येऊ, कोणाला पटलं नाही. त्यामुळे प्रत्येकाला आणखी तसं सांगावं लागलं. आणि ते खरंच आहे. जो तो भक्त कानामधे गोष्ट सांगितलेय महाराजांनी त्याअर्थी आपल्याच घरी येणार आहेत. म्हणजे महाराजांच्या वरचा अविश्वास कायम आहे. महाराजांनी कबूल केलेलं आहे ते आपल्या घरी येणार आहेत हा विश्वास आहे, पण सर्वही ठिकाणी महाराज जाऊ शकत नाहीत, अर्थात सर्व ठिकाणी जाणार नाहीत. आपल्याच घरी येणार. म्हणजे अविश्वास कायम ठेऊन विश्वास आहे

हा. काय भक्ती म्हणायची, काय याला म्हणायचं? दुसरा, तिसरा, चौथा, पांचवा, सहावा, सातवा, सगळ्यांना मुद्दाम जवळ बोलावून कानात त्यांना सांगितलं. आत्ताच्या आत्ता उठून जा कोणाजवळ बोलायचं नाही. कांही करायच नाही. त्याना वाटलं, बरं झालं म्हणाले, न बोलता, आपण बोलायला लागलो म्हणजे पुनः भांडणं सुरु व्हायची. ह्यापेक्षा न बोलताना आपल्या आपल्या गांवाला निघून गेले सगळे लोक.

आणखी नरकचतुर्दशीचा दिवस आलेला आहे, महाराज कुठं तरी जाणार आहेत असं गांवच्या लोकांना कळलं. कुठंतरी जाणारेत. ही भक्तमंडळी बोलवायला आलेली आहे. गांवची मंडळी म्हणाली, महाराज, दिवाळीच्या दिवशी आपण इथे नाही म्हणजे काय म्हणाले, आपली सेवा, आपली पूजा आम्हाला करायला मिळणार नाही कां? नाही म्हणाले, आम्ही जात नाही कुठेही, इथेच राहू. त्यापैकी जर कोणी भक्त तिथे असता आणि गांवच्या लोकांना महाराजांनी जर सांगितलं असतं आम्ही इथेच रहाणार आहोत जाणार नाही. म्हणजे पुन्हा सगळे भांडण करायला आले असते. कारण विश्वासच नाही ना. **सद्गुरूंच्या वाक्यावरती विश्वास कसा पाहिजे, अविश्वास आणि विश्वास, हा विश्वास होऊ शकत नाही. केवळ विश्वास पाहिजे. अविश्वास बिलकुल नाही.** गावातल्या लोकांनाही महाराज आम्ही कुठेही जात नाही म्हणाले. इथंच राहणार आहोत. गांवातल्या लोकांनाही आनंद झाला. आणि झालं, त्यांचंही समाधान झालं. सर्वांचं समाधान करण्याची ही मोठी शक्ती आहे ना ही ! माणसाला, जीवाला शक्य नाही हे ! आणि नरकचतुर्दशीच्या दिवशी, प्रत्येक भक्ताला वाटतय माझ्यावरच महाराजांच प्रेम आहे. माझ्याच घरी येणार आहेत. आले. सातही गांवात सातही भक्तांच्या घरी पूजा घेऊन महाराज आलेले आहेत. गांवातल्या लोकांना महाराज कुठही गेले नाहीत, त्यांच समाधान झालेल आहे. **सर्वांच समाधान करण्याची एक मोठी शक्ती आहे, ती माणसाला, जीवाला शक्य नाही.**

दिवाळी आटोपली आहे. कार्तिक पौर्णिमेला सगळी मंडळी जमली. ते सगळे सात गांवचे भक्त आलेले आहेत. आणि जो तो सांगायला लागला, यावर्षी म्हणाले, नरकचतुर्दशीला आमच्या घरी महाराज आले होते. दुसरा भक्त म्हणाला, काय खोटं बोलतोस म्हणाले, अरे आमच्या घरी आले होते अन् तुझ्या घरी कसे येतील ? म्हणजे अजून अविश्वास कायमच आहे. अजून हा उलगडा झालेला नाही. तो भक्त सांगतोय माझ्या घरी आलले होते. हा सांगतोय माझ्या घरी आलेले होते. सातही जण म्हणाले आमच्या घरी आले होते. गांवातले लोक म्हणाले तुम्ही सगळे खोटं बोलतात. महाराज इथंच होते. **ईश्वराच्या शक्तिबद्दल निर्णय जीवाच्या बुद्धीनं कसा करायचा ?** हा मोठा प्रश्न. मग त्या लोकांनी सांगायला सुरूवात केली.

अरे म्हणाले, माझ्या घरी आले होते मी महाराजांना ही अशी भगव्या रंगाची शाल मी दिलेली आहे. ही पहा ही माझी आहे. तो दुसरा म्हणाला मी दुसरी दिलेली आहे. जरीची दिली आहे. प्रत्येकाने आपली सगळी वस्त्रं दाखवली. म्हणजे प्रत्येकाच्या घरी आले होते हे सिद्ध झालं. आता त्यांच्या त्यांच्यातच निर्णय. भांडणं करतानासुद्धा, निर्णय कसा करायचा, हे वस्त्र मी दिलेलं आहे, दुसरा म्हणतो हे वस्त्र मी दिलेलं आहे, महाराज फक्त ऐकतायत. यावरून काय सिद्ध झालं ? की सर्वांची वस्त्रं महाराजांच्याजवळ आहेत. अर्थात महाराज हे सगळ्यांच्या घरी गेलेले होते. हे सगळ्यांना मान्य झालं. त्यांचं भांडण थांबलं आहे.

गांवात होते, गांवातल्या लोकांना हे मान्य करावं लागलं. ही सगळी वस्त्रं म्हणजे सगळ्या गावांना जे जाऊ शकतात आणि गांवातही राहू शकतात. त्यांचाही अविश्वास गेला आणि मग तो एकदम विश्वास हा दृढ झालेला आहे. अविश्वासाच्यासह जर विश्वास असला तर तो दृढ विश्वास नाही. अविश्वास दूर झालेला आहे. हा चमत्कार, प्रत्यक्ष शक्ती पाहिली. शक्ती प्रत्यक्ष पाहिल्यानंतर मग अविश्वास अंश गेला, पूर्ण विश्वास ! महाराज, आपण अगोदरच हे कबूल करायला पाहिजे होतं. चुकलं आपलं. महाराजांनी एकदा सांगितलं ना, सगळ्यांच्या घरी येतो. ते सगळ्यांनी मान्य करायला पाहिजे होतं. नाही, आपण मान्य केलं नाही. चूक झालं वगैरे सगळ्यांना पटलेलं आहे ते.

मग अशा रीतीनं ही एक लीला, भगवान आणखी सद्गुरुस्वामी जे आहेत असे नरसिंह सरस्वती महाराज, यांची शक्ती किती प्रकारची आहे हे समजून सांगितलेले आहे, शंकरांच्या स्वरूपाच्या ठिकाणी महाराजांच्या स्वरूपाचं दर्शन दिलेलं त्यांनी, प्रत्येकाच्या गांवीही गेलेले आहेत म्हणजे सर्वव्यापी परमेश्वर आहेत. ही त्यांनी आणखी आपली स्वरूपस्थिती दाखवून दिलेली आहे सर्वांना. **महाराज सर्व ठिकाणी आहेत. गेले आले नाहीत. गेले म्हटलं म्हणजे इथे नाही, असं म्हणावं लागेल. सर्व ठिकाणीही महाराज आहेत. ते त्या त्या ठिकाणी प्रगट झाले एवढंच म्हणावं लागतं. शब्दांनी सांगायचं झालं तर एवढच सांगता येईल की गाणगापुरातून महाराज दुसऱ्या भक्ताच्या गांवी गेले असं नाही. तिथंही होते, इथंही होते. पण ते फक्त प्रगट झाले त्या त्या ठिकाणी, त्या त्या भक्ताकडे पूजा वगैरे ग्रहण केली.** एवढंच याचं समाधान करता येण्यासारखं आहे.

यानंतर, आणखी एक कथा सांगतायत. त्या गांवामधे एक शेतकरी रहात होता. त्याचं एक लहानसं शेत होतं किंवा दुसऱ्याचे घेतलं असेल करण्याकरता ! आणि धान्य वगैरे पेरायचं, कष्ट करायचे. चांगला प्रयत्न करायचा आणि महाराजांचीच भक्ती मोठी. रोज महाराज गाणगापुरातून संगमावरती प्रातःकाळी स्नान करण्याकरिता जात होते. हा त्या रस्त्यावरती येऊन उभं रहायचा.

महाराज जातांना आणखी आल्याबरोबर साष्टांग नमस्कार करायचा, महाराज निघून गेले. पुन्हा दुपारी बारा वाजतां महाराज गांवामधे जाण्याकरीता आलेले असताना, त्यावेळेलाही नमस्कार करायचा. ते कांही बोलायचे नाहीत. सकाळी जाताना एकदा नमस्कार, गांवात येताना दुपारी बारा वाजता नमस्कार, चांगला भक्त होता.

एके दिवशी, बरेच दिवस हे चाललेलं आहे, वंदनभक्ती करतो आहे. एकेदिवशी महाराज नित्याप्रमाणे सकाळी संगमावर जाण्याकरता निघालेले असताना, हा आला. शेतातून आला, साष्टांग नमस्कार केला. महाराज उभे राहिले. कां रे बाबा, रोज म्हणाले जाताना नमस्कार, येताना नमस्कार, काय तुझी इच्छा काय आहे? काय पाहिजे तुला? कांही नाही, म्हणाला, महाराज, आपल्या कृपेनं माझं धान्य भरपूर आलेलं आहे, शेत पिकलेलं आहे चांगलं. आपले पाय माझ्या शेताला लागावेत, एकदा आपण या शेतामधे, आणि हे सगळं पहा, म्हणाले. बराय, आले महाराज शेतामध्ये गेले. कणसं बिणसं आलेली आहेत. आठ-पंधरा दिवसामधे मळणी झाली की धान्य घरामधे येणार, अशी स्थिती आहे.

सगळं ते शेत पाहिल्यानंतर महाराज म्हणाले, बाबा, मी सांगेन ते ऐकण्याची तुझी इच्छा आहे काय? तयारी आहे काय ? हो, कांहीही सांगा म्हणाले. वाटेल ते सांगा म्हणाले. बरं. आम्ही, म्हणाले, आत्ता संगमावर जाण्याकरता निघालेले आहोत. बारा वाजता आम्ही परत गांवामध्ये जाणार. तोपर्यंत हे सगळं शेत तू कापून टाक म्हणाले. त्याला सांगितलं, लगेच महाराज निघून गेले. कांही नाही, विचार नाहीये. तयार झालेलं शेत, आठ-पंधरा दिवसांनी धान्य येणार, पण नाही, महाराजांची आज्ञा जशीच्या तशी पालन करायची. गांवात आलेला आहे, मालकाला सांगितलं, मी आत्ताच्या आत्ता शेत कापणार आहे. धान्य, आमचा खंड मी देईन म्हणाला. माझी गुरं ढोरं आहेत, कांही असेल, कर्ज काढून देईन. तुमचं मी भागवीन. चार लोक घेऊन चला, चला म्हणाले, शेत कापायच चला. अरे, काय वेडा आहेस कां म्हणाले. आणखी आठ-पंधरा दिवसांनी धान्य येणार, आत्ताच कापून टाकतो ! तुम्हाला काय कराचंय म्हणाला, माझं शेत मी वाटेल त्या वेळेला कापीन.

बायका-पोरं आड पडायला लागलीत, कापू नका, दगडांनी मारायला लागला त्यांना. गेली बिचारी, डोकं फुटलं सगळं. कापून टाका, वेळ लावायचा नाही, बाराच्या आंत हे काम झालं पाहिजे. ही कशी भक्ती, केवढी विलक्षण असते. किती भक्तीचे प्रकार आहेत. संपूर्ण शेत कापून झालेलं आहे आणि रस्त्यावर येऊन, हात जोडून, महाराजांची वाट पहातो आहे. आले महाराज. साष्टांग नमस्कार घातला, महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणे हे शेत सगळं कापून टाकलं त्यांनी. तरी लगेच त्याची परीक्षा झाली. अरे, काय वेडा आहेस म्हणाले. विनोदे तुज सांगितले. अरे सहज थट्टा करायला गेलो म्हणून म्हणालो, आम्ही, आणि तू लगेच खरं

समजलास काय? आता कसा जगशील म्हणाले. धान्य कसं मिळेल. नाही, तुमचा शब्द म्हणजे प्रमाण आहे. तुमचा शब्द म्हणजे विनोद नाहीये. तुमच्या शब्दाचा अर्थ असा करायचा नाही. वेदाचा शब्द जो आहे. तो असाच घ्यायचा, त्याचा अर्थ आपल्या बुद्धीप्रमाणे करायचा नाहीये, तुमची आज्ञा आहे, शेत कापून टाका, कापून टाकलं. पुढं काय व्हायचं ते होईल? पुढचा विचार नाही. बराय म्हणाले, तुझी श्रद्धा आहे, भक्ती आहे, उत्तम तुला फल प्राप्त होईल असा आशीर्वाद देऊन महाराज गांवामधे आलेले आहेत.

पुढं आठ दिवसांनी, आता बाकीची शेतं सगळी उत्तम अगदी तयार झाली, धान्य तयार झालेलं आहे, कापणी करून धान्य आणायचं, याचं शेत तर सगळं कापून गेलेलं आहे. इतक्यात आठ दिवसांनी भयंकर पाऊस आला. जिकडं तिकडं पाऊस आणि सगळी जी बाकीची शेतं उभी राहिलेली, ती सगळी कुजून गेलेली आहेत. याने नुकतंच ते कापून टाकलेलं आणि ते जे आणखी त्याचे हे होते, त्या पावसाचा उपयोग असा झाला की त्याचं शेत जे होतं ते वाढायला लागलं पुन्हा. कापलेलं होतं नुकतंच, ते वाढलेलं आहे, आणि इतकं वाढलेलं आहे, त्याच्यातून कितीतरी अंकूर अशा प्रकारचे, १०/१०-११/११ प्रकारचे अंकूर निघाले, इतकं पुष्कळ धान्य उत्पन्न झालं. महिना-दोन महिन्यानी.

गांवामधे कोणालाही धान्य नाही, सगळी शेतं आणखी कुजून गेलेली आहेत. त्याच्या एकट्याच्या शेतामधे धान्यं उत्तम तयार झालेलं आहे. तो गेला, राजाकडे गेला, राजेसाहेब, या वर्षी धान्य कुणाला मिळालं नाही, मला पुष्कळ धान्य आहे. यातलं अर्ध धान्य मी तुम्हाला देतो, सगळ्या गांवाला वाटा म्हणाले. त्याला काळाबाजार करता आला असता की त्या वर्षी. खूप पैसा मिळाला असता. एकट्याकडं धान्य होतं. दुसरीकडे गिऱ्हाईकच गेलं नसतं. नाही नाही, ती बुद्धी नाही. दया आहे.

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दु:खं स योगी परमो मत: ॥ (भ.गी. ६.३२)

ही दयाबुद्धी आहे. ईश्वरानीच यांनाही निर्माण केलेलं आहे, मलाही निर्माण केलेलं आहे, यांचं पालन-पोषण करणं, याला आणखी यांच्या करता धान्य देणं हे कर्तव्य आहे.

राजाचीही बुद्धी आणखी बदलली, तो म्हणाला, बाबा, तूच राजा होण्याला योग्य, हे सगळं माझं राज्य तुलाच देतो. म्हणून त्या शेतकऱ्यालाच त्याने राजा केलं. तू राजा होण्याला योग्य आहेस म्हणाले. केवळ माझं धान्य आहे, मी वाटणार नाही, देणार नाही असं म्हणाला नाही. हे सगळंच धान्य, धान्य इतकं निर्माण झालेलं पाहून त्याची स्त्री, मुलं सगळी आणखी त्याला शरण आलेली आहेत. तुमचंच खरं आहे. त्या संन्याशाची आम्ही निंदा केली म्हणाले, आमची चूक झालेली आहे. मग दोघेही पती-पत्नी संगमावर महाराजांच्या दर्शनाकरता गेले.

तिन ओवाळलं त्या स्त्रीनं. सांगितली हकिगत, महाराज इतकं धान्य मिळालेलं आहे. आपल्या कृपेनं. बराय म्हणाले घ्या. आनंदाने रहा. असा त्यांनी आशीर्वाद दिलेला आहे.

तर हा जो आहे शेतकरी, याच्याबद्दल आणखी सद्गुरू वासुदेवानंद सरस्वती महाराजांनी याठिकाणी असं लिहिलेलं आहे. त्याला कांही उन्मत्त झाला काय ? वेड लागलं काय त्या क्षुद्राला, त्या शेतकऱ्याला. त्या शेतकऱ्याला वेड लागलं? की, आपलं धान्य इतकं आलेलं असताना कापून काय टाकतोय, त्या संन्याशाने, काय सांगितलं, बायका मुलांना मारतो आहे, काय, म्हणजे त्याच्या डोक्यावर कांही परिणाम झालेला आहे काय? नाही म्हणाले. गुरुमहाराजांच्या शब्दाकरिता सर्व संसार त्याने सोडून दिलेला आहे. संसार वाटेल त्या वेळेला भक्ताला सोडता येतो, **खरी भक्ती जर असेल, सद्गुरूंची कृपा असेल तर तो संसारातून वाटेल त्या वेळेला बाजूला जाऊ शकतो.** माझं शेत आहे, एकदा पाहा महाराज, धान्य आलेलं आहे आपल्या कृपेनं. आता या वर्षी आम्हाला पुष्कळ धान्य मिळणार आहे, असं, त्याने प्रार्थना केली. म्हणजे संसारामधे मन आहे, धान्य पुष्कळ येणार आहे, महाराजांच्या कृपेचं हे फळ आहे. हे जाणतो आहे, पण कापून टाक म्हटल्याबरोबर लगेच कापून टाकलं. हीही तयारी आहे.

स नोन्मत्तस्तु भरत-प्रऱ्हादकबिभीषणै: ।
मातापित्रग्रजास्त्यक्ता गुर्वर्थे का कथान्यत: ॥ (द्विसाहस्त्री २२.४८)

भरताचं उदाहरण महाराजांनी दिलेलं आहे. आपल्या आणखी राघवेंद्र, रामचंद्र जे आहेत प्रभु. या रामचंद्रांना आपल्या मातेनं अरण्यामधे पाठवून दिलेलं आहे. हे भरताला समजल्याबरोबर, ही माझी आई नाही म्हणाला. शास्त्र असेल वाटेल तसं, **'न मातु: पर दैवतम्'** पण नाही, ही दैवत नाही माता, मी हिला दैवत मानणार नाही. माझे रामचंद्र प्रभु हे माझं दैवत आहेत, त्यांना जीनं आणखी वनामधे पाठवून दिलं, तिला मी माता समजणार नाही. मातेला टाकून दिलं भरतानं. प्रल्हादजीला सांगतो आहे त्याचा पिता की, तु हरीचं भजन करू नकोस, हरिचं भजन करू नकोस, नाही म्हणाला, मी सोडणार नाही म्हणून पित्याचाही त्याग प्रल्हादजीनी केलेला आहे. हरिभजन चालू ठेवलेलं आहे. प्रल्हादजींना काय वेड लागलंय म्हणायचं. बिभिषणाने आपल्या आत्मजाचा, ज्येष्ठ बंधुचा, रावणाचा त्याग केलेला आहे, ज्येष्ठ बंधु म्हणजे पित्यासारखा म्हणून सांगतायत, पण नाही. रामचंद्राचा विरोधी जो आहे तो, तो ज्येष्ठ बंधु जरी असला तरी तो मला मान्य नाही. बिभिषणाने आपल्या ज्येष्ठ बंधूला टाकून दिलेलं आहे. प्रभु रामचंद्र जे आपलं श्रद्धास्थान साक्षात परमेश्वर रामचंद्र आहेत, यांच्याकरिता त्यानी आणखी त्याचा त्याग केलेला आहे. म्हणजे हे वेडे ठरले काय? महाराज विचारतायत.

तसा हा जो आहे, शेतकरी, याने महाराजांची आज्ञा झाल्याबरोबर शेत कापलं, बायका-मुलांना मारलं त्याने, इथ राहाल तर मराल म्हणाले, गेले ते. पण नाही. वेड लागलेलं नाही. तो

खरा शहाणा आहे. त्याचं ज्ञान हे खरं आहे. व्यवहारात आपलं काय होईल, आपल्याला आणखी आपल्या मुला-बाळांना अन्न मिळणार नाही, धान्य मिळणार नाही ही कल्पना सुद्धा त्याच्या मनामधे आलेली नाहीये. ही कल्पना जर मनामधे आली असती तर त्याच्या हातून हे घडलंच नसतं. हे टाकून दे, काढून टाक. कापून टाक म्हटल्याबरोबर कापून टाकलं. संसाराची काळजी नाही. दुसऱ्याचं शेत आहे, त्याचं धान्य द्यायला पाहिजे, कुठलं आणून द्यायचं, कर्ज काढून काय वाटेल ते करता येईल. पुढचा विचार आत्ता नाहीये. आज्ञापालन करायचं आहे. आज नाही, उद्या नाही, उद्या करू, नाही. बारा वाजायच्या आंत कापून टाक म्हटलेलं आहे, ते काय, केव्हातरी कापून टाकायचे नाहीये. ही परीक्षा आहे त्याची. त्याची श्रद्धा, त्याची भक्तीही अगदी कडेलोट झाली आहे. सीमा ही अशी आहे. अशी सीमा, अशी इतकी भक्ती कधी पहायला सुद्धा मिळणार नाही.

महाराजांना समजलं असेल, पुढं पाऊस पडणार आहे. सगळी आणखी, शेतं जाणार आहेत. कापून टाकलं म्हणजे आपोआप याचं शेत वाढेल. कांही कां असेना, महाराजांनी दिलं असं म्हणा किंवा महाराजांना समजून त्यांनी आणखी सांगितल कापून टाक, कांही म्हटलं तरी हरकत नाही. पण त्याचं कल्याण झालेलं आहे. व्यवहारदृष्टीनं अगदी तो वेडा ठरलेला शेतकरी, पण तोच एकटा शहाणा ठरलेला आहे. सगळ्या गांवातले लोक त्याची निंदा करीत होते. बायका मुलं सुद्धा त्याची निंदा आणखी स्वामीमहाराजांची निंदा करीत होते. स्वामीजींनी असं कसं सांगितले आणि याने तरी कसं ऐकलं. पण ज्या वेळेला नंतर पाऊस पडून इतरांची सगळी शेतं कुजून गेली आणि याचं शेत, एकट्याचं शेत आणखी जास्ती वाढलेलं आहे, धान्य पुष्कळ आलेलं आहे. त्यावेळेला मात्र हा शहाणा आहे असं सगळ्यांनी कबूल केलं. त्याला ते शहाणा म्हणण्याचंही कांही नाही, वेडा म्हटला तरी कांही नाही. महाराजांच्या आज्ञेचं पालन झालं, जीवन सफल झालेले आहे. एवढ्या समाधानामध्ये तो आहे. काय गेलं आणि काय नाही याचं कांही लक्ष नाही.

अशा अनेक कथा आणखी या ठिकाणी गुरुचरित्रामधे सांगितलेल्या आहेत. त्यानंतर गाणगापुरातली मंडळी, त्यांना वाटलं एकदा काशीयात्रेला जावं. महाराज आहेत, हे आहेत, तो तंतुक कांही जायला तयार नाही आहे. त्याची खात्री झाली. गेलाही असता, महाराजांनी सांगितलं असतं तर, पण बाकीच्या मंडळींना वाटलं काशीयात्रेला जाऊन यावं. एकदा आपलं ज्योतिर्लिंगाचं दर्शन करून इतरांच्याकरता पिंड प्रदान, श्राद्ध वगैरे करून यावं असं वाटलं. महाराज म्हणाले, अरे, ही गाणगापुरामधे सगळी तीर्थ आहेत म्हणाले. काशी आहे, गया आहे, प्रयाग आहे. सगळी आहेत. म्हणून त्यांनी त्या गाणगापुराचं माहात्म्य सगळं त्यांना समजावून

सांगितलं. भीमा-अमरजा संगम म्हणजेच प्रयाग आहे म्हणाले. या संगमामध्ये स्नान केलं म्हणजे प्रयागस्नानाचं पुण्य आहे.

काशी क्षेत्राचंही माहात्म्य त्यांनी सांगितलं. एक मोठा ब्राम्हण या ठिकाणी शिवभक्त होता म्हणाले. नेहमी शंकरांच्या ध्यानामधे मग्न असायचा, लोकांना वाटायचं की, याला वेड लागलंय, याचं कांही देहभान नाही याला. पुढं त्याचे दोघेही बंधू यात्रेला जाण्याकरिता निघाले, काशीला. त्यालाही त्यांनी विचारलं. तू येतोस कां म्हणाले. कुठं जायचंय? काशीला. त्याने सांगितलं, अरे, भगवान शंकर इथच येतात. आणि काशी इथंच आहे म्हणाले. थांबले ते. मध्यान्हकाळी हा ध्यानस्थ असताना भगवान शंकर आले. त्यांनी सांगितलं देवा, इथंच काशी निर्माण करा की तुम्ही. तुम्ही कुठेही काशी निर्माण करु शकता. वैदिक धर्मामधे आणखी ज्या ज्या देवता सांगितलेल्या आहेत त्या देवतांची ही अशी शक्ती आहे किंवा त्या मंत्राचीही अशी शक्ती आहे, की वाटेल त्या ठिकाणी त्या देवता पुन्हा येऊ शकतात. सोमनाथाची स्थापना पुन्हा झाली की नाही? हजार वर्षापूर्वी आणखी तोडून टाकलेलं सोमनाथाचं लिंग, तोडून टाकलं म्हणजे देव जात नाही, देव फुटला जात नाही. पुन्हा दुसरं शिवलिंग निर्माण करून पुन्हा त्या ठिकाणी देवाचं आवाहन केल्याबरोबर पुन्हा देव येऊ शकतो. देव वाटेल त्या ठिकाणी निर्माण होऊ शकतो. भारताला निराशा कधीही नाहीये. अविचारी बुद्धी ज्यांची आहे, अविचारी बुद्धीनं जरी कांही मोडतोड केली तरी, कांही झाली तरी, आमचा देव जाणार नाहीये. वाटेल त्या ठिकाणी पुन्हा देव निर्माण होऊ शकतो. ही शक्ती ईश्वराची आहे.

त्यामुळे निश्चिंत मनाने, निर्भय मनाने, आणखी आपलं कर्तव्यकर्म, देवाची उपासना वगैरे चालू ठेवण्याला आम्हाला कांहीही भीती वाटत नाही. त्याने प्रार्थना केल्या बरोबर भगवान शंकरांनी कांही हरकत नाही म्हणाले, एक प्रवाह वहायला लागला, लहानसा नदीसारखा, ही गंगा नदी आहे म्हणाले, शिवलिंग प्रकट झालं, काशीच आहे म्हणाले, इथं स्नान करा. तुमच्या वंशात सगळ्यांनी इथंच आणखी काशीयात्रा करावी. महाराज सांगताहेत, हे पहा. म्हणाले, त्या भक्ताच्या करता भगवान शंकरांनी इथं काशीच निर्माण केली. अष्टतीर्थांचं माहात्म्य सांगितलेलं आहे.

इतक्यात त्यांची जी बहीण होती, पूर्वाश्रमातली, रत्नाबाई म्हणून होतं तिचं नांव, ती तिथं आलेली आहे. महाराजांचं दर्शन केलेलं आहे, प्रार्थना करते आहे. कृपा करा महाराज, ते म्हणाले, बाई, तू पूर्वजन्मामधे आणखी एक मांजरीण व्याली होती, आणि कांही न बघताना, एका भांड्यामधे ती पिल्लं तिला झाली होती, त्या भांड्यात पाणी टाकलंस तू, अग्नीवरती ठेवलंस, ती सगळी पिल्लं मरुन गेली. हे तुला पाप लागलेलं आहे. हे ऐकल्याबरोबर तिच्या अंगाला कुष्ठरोग झाला. हे तुझ्या पापाचं फल आहे म्हणाले. तिला

सांगितलं, घाबरू नकोस, पापविनाश तीर्थ आहे म्हणाले, त्या तीर्थामधे जाऊन स्नान तू कर, हा तुझा रोग बरा होईल, पापक्षय होईल. स्नान केलं, तीन दिवसामध्ये तिचा रोग बरा झाला, ती रत्नाबाई, त्याच ठिकाणी गाणगापुरामधेच आणखी महाराजांच्या सन्निद्ध मठ बांधून राहिलेली आहे. महाराजांना आता तिथून जायचंय, अदृष्य व्हायचंय. म्हणून क्षेत्राचं माहात्म्य त्यांनी सांगून दिलेलं आहे. या ठिकाणी आमचा निवास झालेला आहे. असं हे क्षेत्रही पवित्र आहे. **या क्षेत्रामधे येऊन आणखी सर्वांनी आपला पापक्षय करून घ्यावा, तीर्थस्नान वगैरे करून आणखी आपला उद्धार करून घ्यावा, हाच त्यांचा उद्देश आहे.**

त्यानंतर शेवटची कथा आता सांगतायत. तो कुरवपुरामधे श्रीपाद वल्लभ स्वामींचा जो भक्त, एक परीट होता. रजक. त्या परटाला ते राजाचं ऐश्वर्य पाहिल्याबरोबर आणखी इच्छा उत्पन्न झाली, आपण जर राजा झालो तर बरं होईल. महाराजांनी सांगितलं जा म्हणाले. तू राजा हो. आमच्या जवळ राहण्याची योग्यता अजून तुला आलेली नाही. राहयचं इथं आणि राजाचं चिंतन करायचं, काय उपयोग म्हणाले. राज्य कर. तो आणखी एक यवन बादशहा झाला म्हणतात. परंतु त्याचे संस्कार मात्र पूर्वीचे कायम होते. महाराजांची भक्ती झालेली आहे. या धर्मामधेच तो पूर्वी होता, परीट. त्यामुळे देवाची, गुरूची भक्ती करणं वगैरे सर्वांच्याबरोबर प्रेमानी वागणं असा त्याचा स्वभाव होता. यवन जातीमधे जन्माला आला, तरी, देवधर्मावर त्याचा विश्वास आहे, सर्वांना सहाय्य त्यानी करावं, त्याची जी मंडळी होती आणखी त्यांनी त्याला सांगावं, काय म्हणाले तुम्ही, मूर्तिपूजा काय करता, मूर्तिपूजा करणाऱ्याला सहाय्य काय करता म्हणाले. हे काय बरं नाहीये आपल्या धर्मात असं नाही. त्यानी सांगितलं, काय मूर्तीमधे काय, देव नाहीये काय म्हणाले. सगळीकडे जर देव आहे तर मूर्तीमधे देव नाही असं कसं म्हणता. आणि हा श्रेष्ठ आणखी धर्म चांगला. आणि तो धर्म वाईट हे कसं ठरविणार तुम्ही? सर्व ठिकाणी आणखी परमात्मा सर्वत्र आहे. ज्या ज्या ठिकाणी त्याचं आवाहन केलं जाईल त्या त्या ठिकाणी तो व्यक्त होतोय. काळ्या गाईचं दूध आणखी काळं होतं काय कधी? पांढऱ्या गाईचं पांढरं आणि काळ्या गाईचं काळं असं होतं कां कधी, तांबड्या गाईचं तांबडं असतं कां म्हणाले. सर्व ठिकाणी दूध हे सारखं आहे. तसा परमात्मा सर्वही धर्मामधे, सर्व ठिकाणी सारखाच परमात्मा आहे. आमच्या धर्मातला ईश्वर तेवढा निराळा आहे, तुमच्या धर्मातला, मूर्तिपूजा तुम्ही करणारे तुम्हाला ईश्वर नाही कांही नाही. हे चूक आहे म्हणाले. अस त्याने समजूत केलेली आहे, आपल्या लोकांची.

सत्ताधीश तो होता, त्याच्यापुढे त्यांना कांही बोलता आलं नाही. मग, एके दिवशी असं झालं, त्याच्या मांडीला एक मोठा फोड झाला. अतिशय वेदना होतायत. औषधपाणी चाललेलं आहे, निरनिराळे वैद्य काय, सगळी औषधं आहेत, औषधाचा आणखी लेप करतायत, पोटात

औषध घेतायत, बाहेरून. कांही नाही, कांही कमी नाही. मग त्याने एके दिवशी विद्वान आणखी जे काही ज्योतिषी म्हणा, कर्मविपाक जाणणारी ब्राह्मणमंडळी, त्यांना बोलावून आणलं राजवाड्यामधे, आणखी विचारल की, काय खरं सांगा म्हणाले, औषधांनी हे बरं होत नाही, मग याच्याकरिता दुसरा दैवी उपाय आहे काय हे मला सांगा. सगळी आणखी मंडळी, यवनमंडळी बसलेली आहेत, त्या ब्राह्मणांनी काय सांगावं, महाराज इथं काय सांगू आम्ही, आम्हाला कांही सांगता येत नाही, बोलता येत नाही. ते म्हणाले. बोला म्हणाला राजा, तुम्ही कांही भिऊ नका. मग आपण तिकडे जाऊया. आणखी एका तीर्थस्थानामधे आपण जाऊया, तुम्हीही चला. म्हणून ते, राजाला त्यांनी सांगितलं. राजा एका ठिकाणी गेला आणि गेल्यानंतर त्या ठिकाणी एक तपस्वी पुरूष आलेला आहे. राजाने आणखी नमस्कार करून विचारलं, महाराज, मला असा रोग झालेला आहे, फोड झालेला आहे, स्फोटक आणि त्याचे फार क्लेष होतायत, व्यथा होतायत. हे कसा दूर होईल? त्यानी सांगितलं बाबा, जे श्रेष्ठ सत्पुरूष आहेत, महात्मे आहेत, त्यांची जर भेट झाली तुझी, तर त्यांच्या कृपेनं हा रोग जाईल म्हणाले. पापक्षयाची अनेक साधनं शास्त्रानी सांगितली आहेत, परंतु **'सत्पुरूषांची कृपादृष्टी, पापे जाती, जन्म साठी'** म्हणून ते सांगताहेत. शेकडो जन्माचं पाप, सत्पुरुषांच्या कृपादृष्टीनं नाहीसं होत. म्हणजे त्यांची शक्तीच तशी आहे. ते आपल्या शक्तीनं सर्वही पातकांचा क्षय करू शकतात, त्यांची भेट झाली तर तुझा दोष जाईल म्हणाले.

म्हणून त्यांनी एक संतांचं माहात्म्य म्हणून एक कथा सांगितली आहे. एक राजा आहे, त्याला दोन स्त्रिया होत्या, आणि त्या स्त्रियांपैकी ज्येष्ठ स्त्री गर्भिणी झालेली आहे. दुसऱ्या स्त्रीला ते सहन झालं नाही. तिनं तिला विष दिलं, ती कांही मेली नाही, परंतु ती प्रसूत झाली. संपूर्ण तिच्या शरीरालाही आणखी संबंध व्रण झालेले आहेत. त्या मुलाच्या शरीरालाही आणखी व्रण झालेले आहेत. विषाची बाधा झाली आहे. राजाने पुष्कळ उपचार केले कांही बरं होईना. मग शेवटी आपल्या सारथ्याला सांगितलं, रथामधे त्या दोघांना, त्या स्त्रीला आणि मुलाला, घेऊन जा आणि अरण्यामधे सोडून दे म्हणाला. गेला तो घेऊन. सगळ्यांना दुःख झालं, तिच्या सगळ्या बांधवांना, हे राजाराणी आपले आनंदात राहिले. ती बिचारी स्त्री अरण्यातून चाललेली आहे मुलाला घेऊन. आपल्या प्रारब्धाचं आणखी हे फळ आहे, भोगती आहे बिचारी, जाता जाता एक सायंकाळच्या वेळेला तहान लागलेली आहे, एका नगराजवळ ती आली, गुराख्यांनी तिला सांगितलं, या नगराचा राजा चांगला आहे म्हणाले, तू जाऊन त्यांच्या वाड्यामधे राहा. वाड्यातल्या दासीही भेटल्या, त्या तिला घेऊन गेल्या, राजानीही तिला आश्रय दिलेला आहे.

बरेच दिवस तिथे राहिली. पण शरीराचे व्रण कांही बरे नाहीत. जखमा बऱ्या नाहीत. एके दिवशी ऋषभयोगी तिथे आलेले आहेत, आणि त्या ऋषभ योगींनी तिथं आलेले असताना त्या

दिवशीच तिच्या मुलाचे व्रण जास्ती वाढले. वेदना जास्ती झाल्या आणि त्या मुलाचा प्राणान्त झालेला आहे. ती अत्यंत दुःख करू लागली. मुलाची तरी मला आशा होती म्हणाली, मुलगा बरा होईल, तो राज्य मिळवेल, मलाही राज्य आणखी सुख भोगायला मिळेल, त्याला पहायला मिळेल, पण मुलगा राहिला नाही, सगळं व्यर्थ झालं. अशी आणखी दुःख करीत असताना ऋषभयोगी तिच्याजवळ आलेले आहेत. तिला उपदेश करून पाहिला, त्या उपदेशाचा कांही परिणाम नाही. तिनं सांगितलं महाराज, माझी एवढीच आता इच्छा आहे, एकुलता एक मुलगा माझा गेला म्हणाले, माझाही प्राण जावा असा आशीर्वाद द्या. म्हणजे मी या दुःखातून सुटेन. मग त्या ऋषभयोगींनी त्या मुलाच्या शरीरावरती भस्म प्रोक्षण केलं, तो जिवंत झाला, त्याचं शरीरही, सगळे व्रण गेले. बाईच्या अंगावरचेही व्रण गेलेले आहेत. तिचंही शरीर सगळं सुंदर झालेलं आहे. तो भद्रायु पुढे त्यांच्या कृपेनं राज्य प्राप्त त्यानं करून घेतलं. पुढं ती कथा प्रसिद्ध आहे.

तर ही कथा त्या तपस्वी पुरूषांनी या यवन राजाला सांगितली. असे सत्पुरूष असतील त्यांची गांठ घे, त्यांची कृपा संपादन कर म्हणजे त्यांच्या शब्दांनी तुझा रोग बरा होईल. कुठं जाऊ म्हणाला तो? तो कुठे आहेत असे महात्मे? गाणगापुरात आहेत, जा म्हणाले. महाराजांचीच योजना असते. निघाला राजा, सैन्य वगैरे पुष्कळ बरोबर घेतलेलं आहे आणि गाणगापुरामधे येऊन पोचला. चौकशी केली, कुठायत, स्वामिमहाराज कुठायत? सगळी मंडळी घाबरली, इतकं सैन्य बरोबर आहे, हा मुसलमान राजा आहे आणि विचारतोय स्वामी कुठायत म्हणून. काय करावं? भ्याले सगळे, राजाला ते समजलं. राजा म्हणाला, अरे, भ्यायच कांही कारण नाही. मी त्यांच्या दर्शनाला आलो म्हणाले. भ्यायचं काय कारण आहे? मग लोकांनी सांगितलं की संगमावर महाराज आहेत म्हणाले. तुम्ही तिकडे चला. निघाला, स्वामीमहाराज दुरून दिसायला लागल्याबरोबर आपल्या पालखीतून तो खाली उतरलेला आहे, चालत चालत गेला जवळ, आणखी महाराजांच्या जवळ गेल्याबरोबर साष्टांग नमस्कार घातला.

एकदम महाराज म्हणाले, का रे रजका? कुठे राहातोस तू? रजक म्हणजे पूर्वीच्या श्रीपाद स्वामींच्या वेळेला असलेला तो परीट. कांरे म्हणाले, परटा, किती दिवस आम्हाला भेटला नाहीस तू, होतास कुठे ? म्हणाले. त्यांना सगळं माहिती होतं न. पण त्याच्या तोंडातून.. कारे परटा ! म्हटल्याबरोबर त्यांच्या त्या शब्दांनीच त्याला एकदम आपल्या पूर्वजन्माची आठवण झाली. मी कोण होतो आणि आत्ता कोण आहे, श्रीपाद स्वामींची कृपा आहे, त्यामुळे त्यांच्या त्या कुरवपुरामधे परटाचा धंदा करणारा मी असताना, आज यांच्या कृपेने मी राजा बनलेलो आहे. राजा नाही, हे राज्य यांचं आहे. अश्रुधारा डोळ्यातून चाललेल्या आहेत. महाराज, मला तुम्ही दूर लोटलं म्हणाले. मी कसा येणार. मी विसरलो

म्हणजे मी विसरणार. आम्ही जीव सगळे विस्मरणच करणार. आम्हाला स्मरण आपल कसं होणार. आज मी धन्य झालो. आपलं दर्शन झालेलं आहे. हे राज्य सगळं आपलं आहे. माझ एकदा सैन्य पाहता कां ? आपल्या नगराला एकदा चला. तुम्हाला मी घेऊन जाणार ते म्हणाले. बाबा, तुझ्या नगरामध्ये आम्हाला यायचं नाही. काय म्हणाले तुम्ही यवन लोक, गाई मारता म्हणाले. वाटेल ते करता. नाही म्हणाला महाराज. मी आता कायदाच करतो, म्हणाला. कांही कोणी गायी मारायच्या नाहीत. मग झालं की नाही. कबूल कराव लागलं महाराजांना. पूर्वजन्मचा मोठा भक्त होता तो.

फोड नाही, कांही नाही, त्यानी खरोखरच पाहिल, कुठही नाही. रात्रभर तळमळत पडायचा. इतके दिवस त्याला सगळं आणखी वेदना होत होत्या. महाराज म्हणाले, नाही म्हणाले कांही नाही. **'आपणासारिखे करिती तात्काळ'** हे खोटं नाहीये. तू संसारी नाहीस, तू दुःखी नाहीस. तुला कांही दुःख नाही, तू आनंदरूप आहेस. गुरूमहाराजांनी सांगितल्याबरोबर त्याचं सगळं दुःख, संसार सगळा जातो आहे, हे खरं आहे, पण तितकी योग्यता आली पाहिजे, काळ आला पाहिजे. गेला. तो रोग गेला, फोड गेला, आनंद झाला. चला महाराज, आमच्या नगराला, आम्ही म्हणाले पुढे जातो. तुम्ही सावकाश सैन्य बिन्य घेऊन तुम्हाला यायला वेळ लागेल, म्हणून महाराज अदृष्य झाले आणि त्याच्या बेदर नगरामधे येऊन सायंदेवाचा मुलगा तिथे होता, त्याच्या घरी जाऊन महाराज राहिलेले आहेत.

इतक्यात राजाने पाहिलं, महाराज कुठे दिसत नाहीत, त्याला आठवण झाली की आम्ही पुढं जातो म्हणालेत महाराज, म्हणून तो घोड्यावर बसून निघाला वेगाने आणखी राजधानीमधे येऊन पोचलेला आहे. महाराजांच्याजवळ. चला महाराज, राजवाड्यामधे चला. निघालेले आहेत. पायघड्या आणखी, भरजरींची वस्त्रं काय, रेशमी वस्त्र, वस्त्रं पायघड्या अंथरलेल्या आहेत रस्त्यांनी, आणखी त्याच्यावरून महाराज राजवाड्यामधे गेलेले आहेत. चार शिष्य मंडळी फक्त बरोबर आहेत त्यांच्या. सिंहासनावरती बशिवलेलं आहे त्या राजानी, पूजा त्यांची केली, सगळे यवन म्हणायला लागले, काय म्हणाले हा राजा, आमच्या जातीचा, आता या संन्याशाची पूजा करायला लागला. पण त्यांना काय माहिती, त्यांना ज्या वेळेला समजलं की याचा फोड गेला, त्यांच्या कृपेनं, मग त्यांची ती बुद्धी कमी झाली असेल म्हणा, पण कांहींची राहिली असेल. बाकीची जी मंडळी होती, वैदिक धर्माची, त्यांना आनंद झालेला आहे की हा राजा खरोखर चांगला आहे, भाग्यवान आहे, आता आपल्याला काय याच्या योगाने सुख मिळेल, असं मंडळींचं बोलणं चालणं झालेले आहे.

सर्वही स्त्रिया, त्याचप्रमाणे मुलं, नातु–पणतू सगळ्यांना बोलावून सगळ्यांना, महाराजांच्या पाया पडायला लावलं त्या राजानी. म्हणाला, महाराज, आपण दिलेले ऐश्वर्य आहे, आपलेच

हे ऐश्वर्य आहे, माझा याचा काही संबंध नाहीये. महाराज म्हणाले, आता जातो आम्ही गाणगापूरला. काय पाहिजे तुला मागून घे. तो म्हणाला, **'ज्ञान मजला असावे'**, एवढंच. तुम्हाला, तुमचे विस्मरण मला कधी होऊ नये, आत्ता इतके दिवस तर मी विसरलो ना, म्हणाला, महाराज, कुरवपुरातुन जो मी निघालो, या जन्माला आलो आणि या ऐश्वर्यामधे माझं मन गुंतुन गेलं, कुठले गुरूमहाराज आणि कुणी ऐश्वर्य दिलं याची सुद्धा आठवण मला राहिली नाहीये, असं विस्मरण नको, याच्यापुढे मला. नेहमी ज्ञान आपलं असावं, चिंतन करावं एवढी प्रार्थना केली. महाराजांनी त्याला वरप्रदान करून ते गाणगापूरामध्ये आलेले आहेत.

आणि नंतर त्यांचा विचार सुरू झालेला आहे. हे इतकं चरित्र सिद्धांनी नामधारकाला सांगितलेलं आहे आणि शेवटी आता सांगतायत. हे असे यवन लोक, म्हणाले, राजे लोक वारंवार या ठिकाणी येणार आता. हा राजा, याला आणखी फल मिळालं ना, फल दिलं म्हणजे त्याच्याकरिता कांही मुद्दाम संकल्प करून, शक्ती वापरून कांही नाही. कल्पवृक्षाचा स्वभावच असा आहे. कल्पवृक्षाच्या जवळ गेल्याबरोबर मला आणखी उत्तम पंचपक्वान्नाचं जेवण पाहिजे ! लगेच हातात ताट हजर होतं ! हे काय, त्याची स्वाभाविक शक्ती आहे. तसं महाराजांच्या जवळ आलेला यवन असो, हिंदू असो, कुणीही असो, स्त्री, पुरूष कोणीही जरी आला, तरी त्याची इच्छा, त्याचं संकट, काय असेल ते सगळं दूर होत आहेत. ही महाराजांची स्वाभाविक, नैसर्गिक शक्ती आहे, सद्गुरू महाराजांची. त्यात त्यांना कांहीही प्रयास नाहीये. हा चमत्कार दाखवण्याकरता कांहीही त्यांना करावं लागत नाही. मग त्यांनी आता विचार केला की इथं जर गाणगापुरामधे आपण राहिल्यानंतर, असेच राजे लोक वारंवार येत राहाणार आता. आपण जर इथे राहिलो तर हे सगळे लोक येणार, येथे त्यांचे सैन्य वगैरे असणार आणि त्यांची पीडा या लोकांना होणार, त्रास देणार. त्यापेक्षा आपणच कुठेतरी गुप्तपणाने जाऊन रहावं. गाणगापूर सोडावं. असा त्यांनी मनामधे विचार केला आणि सर्व लोकांना सांगितलं. **सायंदेव, नंदी, नरहरी आणि सिद्ध या चार शिष्यांना बरोबर घेतलं आणि महाराज श्रीशैल्य मल्लिकार्जुनाला जाण्याकरिता निघाले.**

कर्दळीवनामधे जायचंय असं म्हणाले. तिथून कर्दळीवन, पुढं जंगलच आहे म्हणतात पुष्कळ. सगळया लोकांना अत्यंत आणखी शोक झालेला आहे, सगळे लोक पाया पडताहेत. महाराज, आम्हाला सोडून जाऊ नका. आजपर्यंत आपण या ठिकाणी राहिल्यामुळे कोणचीच काळजी नाही, कोणचीच भीती नाही, कांही नाही. गोकुळात राहणाऱ्या लोकांना स्त्री-पुरूषांना, गाईंना, कोणाची भीती वाटत होती कां? इंद्राची सुद्धा भीती नाही, म्हणाले, काय इंद्र करतोय? गोवर्धन पर्वत धारण करून भगवंतानी आणखी त्यांचं संरक्षण केलं. त्यामुळे नि:शंक झाले, निर्भय सगळे झालेले होते. ही सगळी गाणगापुरातली मंडळी प्रार्थना करतायत, आम्हाला सोडून जाऊ

नका महाराज ! महाराज म्हणाले, आम्ही इथेच रहाणार आहोत म्हणाले, तुम्ही आणखी भजन करीत चला, उपासना करीत चला, तुम्हाला दर्शन होत जाईल. काळजी करण्याचं कांही कारण नाहीये.

कसंतरी, सर्वांना आणखी आश्वासन देऊन, अक्रूर ज्याप्रमाणे श्रीकृष्णाला मथुरेला नेऊ लागला त्यावेळेला गोकुळातल्या सर्व लोकांची जी अवस्था झाली ती गाणगापुरातल्या लोकांची अवस्था झालेली आहे. महाराज निघाले आहेत. पुष्कळ दूर गेली मंडळी, पोचवायला. सांगितलं, जा आता तुम्ही म्हणाले. तुम्ही मला आणखी आवाहन केलं, बोलावलं म्हणजे मी येईन, दर्शन देईन म्हणाले, आश्वासन दिलं, पुढं निघून गेले. सगळी मंडळी मठामधे आली. मठात महाराज आसनावर बसलेले आहेत. सर्वांनाही दर्शन तिथे झालेलं आहे. म्हणजे थोडंसं समाधान झालं. आहेत, महाराज गेले नाहीत, इथच आहेत. आपली तळमळ जशी असेल त्याप्रमाणे आपल्याला दर्शन होणार, होईल म्हणाले, कांही शंका करण्याचं कारण नाही.

मग तिथून ते, पाताळगंगेच्या तीरावरती आलेले आहेत. त्यांच्या आज्ञेप्रमाणे सायंदेव, नंदी, नरहरी आणि सिद्ध या चौघांनी आणखी पुष्कळ फुलं आणली. पुष्पासन तयार केलेलं आहे, ते प्रवाहावरती घातलेलं आहे. आणि त्याच्यावरती महाराज दंड-कमंडलू घेऊन बसलेले आहेत. पाण्यामधे जाण्याचं कांही कारणच नाहीये. सर्वाधार परमात्मा आहे ना? त्याला पाण्यामधे ते बुडतील कसे? सर्वांना समजावून सांगितलं, चौघांना, तुम्ही अशीच आणखी उपासना, भक्ती करीत रहा, आणखी भजन करीत रहा. आम्ही गेल्यानंतर, आम्ही पोचल्याची खूण म्हणून चार फुलं तुम्हाला येतील म्हणाले, प्रसाद म्हणून. ती फुलं घेऊन तुम्ही आपल्या घरी रहा म्हणाले.

सांगून महाराज एकदम अदृष्य झालेले आहेत. गुप्त झाले. ते पाहतायत बिचारे चौघे. इतक्यात नावाडी मंडळी तिकडून आली. आम्हाला महाराज दिसले म्हणाले. पायामधे सुवर्णाच्या पादुका होत्या. दंड-कमंडलू घेऊन महाराज पुढे गेले, आम्ही पाहिले म्हणाले. त्यांनी आम्हाला सांगितलेलं आहे, तुम्हाला निरोप सांगायला, फुलं येतील ती घ्या, आपल्या-आपल्या घरी जाऊन माझं चिंतन, भजन करीत राहा, असं तुम्हाला सांगितलेलं आहे. इतक्यात ती फुलं आली वहात. आणखी ती चौघांनी चार फुलं घेतलेली आहेत. सिद्धांनी नामधारकालाही तो पुष्पप्रसाद दाखवलेला आहे. त्यालाही आणखी धन्यता वाटलेली आहे.

अशा रीतीनं, नामधारकाला हे संपूर्ण गुरुचरित्र म्हणजे निवडून काढलेलं, संपूर्ण याचा अर्थ जितकं झालंय तितकं असा नाही. पण त्यातून जितकं, मुख्य मुख्य अशा प्रकारच्या कथा ज्या घडल्यायत, ते चरित्र सिद्धमुनींनी नामधारकाला सांगितल्याबरोबर त्याला समाधीच

लागली म्हणतात. देहभान नाहीये. त्या समाधीमधे तो निमग्न झाला. सद्गुरूंचा प्रसाद त्याच्यावरती झालेला आहे. संसार विसरून गेला तो. सिद्धांनी विचार केला, हा जर अशा समाधी अवस्थेमधे राहिला तर जगाचं काम कोण करणार? हा मोठा भक्त आहे, अधिकारी आहे. त्याला सावध केलं पाहिजे आणि याच्याकडून पुढे कार्य करवून घ्यावं. म्हणजे सर्व जीवांचा उद्धार करण्यासारखं कार्य. हा भक्त करू शकेल. म्हणून त्याला समाधीतून बाहेर आणलं सिद्धांनी आणि त्याला पुन्हा अवतरणिका रुपाने संपूर्ण संक्षिप्त गुरूचरित्र सांगितलं. सप्ताह विधीही कसा करावा तेही सांगितलेलं आहे. आणखी तो आता कृतार्थ झालेला आहे.

नंतर महाराजांच्या आज्ञेप्रमाणे, त्या नामधारकांनी, म्हणजे सरस्वती गंगाधर त्यांचं नांव, त्यांनी महाराजांच्या आज्ञेप्रमाणे, सिद्धमुनींच्या मुखातून ऐकलेलं हे संपूर्ण गुरूचरित्र आणि याठिकाणी लिहून ठेवलेलं आहे. तेच गुरूचरित्र आज, सर्वही दत्तक्षेत्रातून म्हणा, किंवा दत्तभक्त ज्या ज्या ठिकाणी रहात असतील त्यांच्या त्यांच्या घरांतून आणि याच पठण म्हणा, चिंतन म्हणा, हे निरंतर चालू आहे.

ईश्वराचा, सद्गुरु स्वरूप ईश्वराचा, अवतार हा झालेला आहे, दत्तात्रेयांचा, त्यांनी श्रीपाद वल्लभ अवतार धारण केला, तिसरा अवतार म्हणजे नरसिंह सरस्वती. कलियुगामधे हे दोन अवतार मुद्दाम धारण करुन सर्व लोकांचं कल्याण करण्याचं कार्य अद्यापीही चाललेलं आहे. पांचशे-सातशे वर्षापूर्वी हे अवतार झाले, एक आंध्र प्रांतात, एक विदर्भ प्रांतात, परंतु संपूर्ण महाराष्ट्रामधे संचार त्यांनी केलेला आहे आणि ते कार्य तेवढ्यापुरतं झालं असं नाहीये. अद्यापीही ते कार्य चालू आहे. त्या त्या क्षेत्रामधे आणि सर्व भक्तमंडळी जाताहेत आणि आणखी आपली, त्यांची इच्छा महाराजांच्या कृपेनं पूर्ण होते आहे. तेव्हा ईश्वर सर्वत्र आहे, सद्गुरुस्वरूप सर्वत्र आहे, ही भावना पुष्कळ भक्तांच्या चरित्रामधे आपल्याला ऐकायला मिळालेली आहे. सातही गांवाला महाराज गेले, म्हणजे सगळीकडे परमात्मा आहे. वाडी क्षेत्रामधेही राहिलेले आहेत. गाणगापूर क्षेत्रामधेही राहिलेले आहेत. दोन्हीकडे राहणे याचा अर्थ सर्व ठिकाणी असणं असा आहे. म्हणजे परमेश्वर हा सर्वव्यापक आहे, हा सिद्धांत वैदिक धर्माचा आहे. परंतु जो सर्वत्र परमेश्वराचं दर्शन होण्याची योग्यता येण्याकरता, एका ठिकाणी कुठे तरी मूर्तिरूपाने, प्रतीकरूपाने त्याची स्थापना करून, त्या ठिकाणी भावनेनं त्याच पूजन, अर्चन, भजन वगैरे केलेलं असताना सर्व व्याप्ती त्याची, सर्वज्ञ तो कसा आहे हे दर्शन होऊ शकतं.

नामदेवांना जसं पांडुरंगांचं दर्शन देवळामधे झालं, प्रत्यक्ष बोलले, चालले, तेच दर्शन गुरूंची कृपा झाल्याबरोबर सर्वत्र पांडुरंग आहे हे त्यांना समजलेलं आहे. तसं ईश्वराचं दर्शन म्हणजे सर्वव्यापी परमेश्वर आहे, तो सर्वज्ञ आहे, पूर्ण शक्ती त्याची आहे, हे दर्शन व्हायला पाहिजे

आहे. हा खरा विश्वास, ही खरी श्रद्धा आहे. ही खरी श्रद्धा निर्माण होऊन त्याप्रमाणे जर भजन सुरू झालं तर त्याचं फळ त्या व्यक्तीला तर आहेच आहे, तो मुक्तच होतो आहे, परंतु त्या व्यक्तीच्या संबंधानी किंवा त्या व्यक्तीच्या संकल्पानी अनेक जीवांचा उद्धार होऊन जातो आहे, संसारही त्यांचा सुखाचा करण्याचं सामर्थ्य त्या भक्ताला मिळतं आणि परमार्थ दृष्टीनेही जीवांचा तो उद्धार करू शकतो. असं परमेश्वराचं सामर्थ्य आहे. हे समजून सांगण्याकरता आणि हे संपूर्ण गुरूचरित्र, सिद्धरुपानी नामधारकाला त्यांनी निवेदन केलेलं आहे.

सद्गुरू श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामिमहाराजांनीही याच दत्तसांप्रदायाचा सर्वत्र आपल्या संचारामधे, प्रचार केलेला आहे. दत्तभक्ती करा, गुरुचरित्र ऐका, गुरुचरित्र वाचा, त्याचं चिंतन करा, त्याचं मनन करा आणि त्याप्रमाणे श्रद्धा, भक्ती वाढवण्याचा आणखी प्रयत्न करा. ती वाढावी याच्या बद्दल आणखी त्या सद्गुरुंच्या जवळ प्रार्थना करा. म्हणजे तुमची श्रद्धा, भक्ती वाढेल, तुमची बुद्धी शुद्ध होईल आणि शुद्ध बुद्धी झाल्यानंतर परमात्म्याचं दर्शन हे आपोआप घडेल. याकरिता म्हणून त्यांचं चरित्र सांगितलेलं आहे. भगवान अंबरीष वरद भगवंतांचाच हा अवतार आहे दत्तात्रेय अवतार. तेव्हा त्यांच्या सान्निध्यामधे, त्यांनीच घेतलेल्या अवतारांचं हे चरित्र, सिद्धमुनींनी नामधारकाला सांगितलं. हे सात दिवसापर्यंत यथामती, या ठिकाणी, चिंतन झालेलं आहे. हे सप्ताह काय, आज पूर्ण झालेला आहे. भगवान अंबरीष वरद प्रभुनी आणि याप्रमाणे सर्वांवरती कृपा करावी, सर्वांची बुद्धी शुद्ध करावी,

सर्वेऽपि सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ॥

ही आणखी त्या सर्वशक्तिसंपन्न परमेश्वराजवळ प्रार्थना करून आणखी, ही वाङ्मयसेवा, आणखी भगवंताला अर्पण केलेली आहे.

॥ श्री गुरुदेव दत्त ॥

अंबरीष वरद श्री भगवान दत्तात्रेय प्रभु की जय ।